

प्रा. दामोदर धर्मानंद कोसंबी हे एक जगद्विख्यात विद्वान व चतुरस्र संशोधक गणितशास्त्र, नाणेशास्त्र, पुरातनवास्तुशास्त्र, प्राचीन भारतीय इतिहास व समाजशास्त्र ह्याचप्रमाणे वैदिक व पौराणिक ग्रंथांचा अभ्यास अशा सर्वच क्षेत्रांत त्यांनी मौलिक भर घातलेली आहे.

त्यांच्या विलक्षण बुद्धिमत्तेला मानवतावादी प्रवृत्तीची व प्रगाढ व्यासंगाला शास्त्रीय दृष्टिकोनाची जोड होती. यामुळे त्यांचे सर्व लिखाण विलक्षण समृद्ध. झाले आहे. मार्क्सवादाचा त्यांनी जीवननिष्ठा म्हणून पुरस्कार केला, इतकेच नव्हे तर भारतीय इतिहास व समाज ह्या संदर्भात तो त्यांनी संपन्न केला आहे. इन्ट्रोडक्शन टू इंडियन हिस्टरी, कल्चर अँड सिव्हिलायझेशन ऑफ इंडिया, ॲन हिस्टॉरिकल आउटलाईन, मिथ अँड रिॲलिटी, सायन्स अँड सोसायटी, एक्साजपरेटेड एसेज ही त्यांची पुस्तके. त्याशिवाय विविध शास्त्रीय विषयांना वाहिलेल्या खास नियतकालिकांतून त्यानी जवळजवळ १५० संशोधनात्मक लेख लिहिले. या लेखांचे जगातल्या अनेक भाषातून अनुवाद झाले आहेत.

प्रा. कोसंबी यांचा जन्म १९०७ साली गोव्यातल्या कोसंबे गावी झाला. प्रख्यात बुद्धिस्ट विद्वान डॉ. धर्मानंद कोसंबी हे त्यांचे वडील. त्यांचे शिक्षण हार्वर्ड युनिव्हर्सिटीत झाले. बनारस हिंदु युनिव्हर्सिटी व अलिगढ मुस्लिम युनिव्हर्सिटी येथे काही काळ कार्य केल्यानंतर १४ वर्षे ते फर्ग्युसन कॉलेजमध्ये प्राध्यापक होते. त्यानंतर टाटा फंडामेंटल रिसर्च इन्स्टिट्यूटमध्ये त्यांनी गणित शाचे संशोधन केले.

आंतरराष्ट्रीय शांतता चळवळीच्या मध्यवर्ती समितीचे ते उपाध्यक्ष व भारतातील शांतता चळवळीचे एक प्रमुख आधारस्तंभ होते. २९ जून १९६६ रोजी त्यांचे निधन झाले.


प्रा. दामोदर धर्मानंद कोसंबी

# प्राचीन भारतीय समाज-संस्कृती संवर्धन

## ऐतिहासिक रूपरेखा

निवेदक : जयंत गडकरी






The Indus Culture.

# प्राचीन भारतीय समाज-संस्कृती संवर्धन : ऐतिहासिक रूपरेखा

लेखक : दामोदर धर्मानंद कोसंबी

निवेदक : जयंत गडकरी

दामोदर धर्मानंद कोसंबी एज्युकेशनल ट्रस्ट

प्रकाशक :
जयंत गडकरी
दामोदर धर्मानंद कोसंबी एज्युकेशनल ट्रस्ट
एलफिस्टन बिल्डिंग, पहिला मजला
१० वीर नरीमन रोड
मुंबई ४०० ०२३

मुद्रक :
एस. व्ही. काणेकर
अमेय मुद्रणालय
सर्व्हिस इंडस्ट्रियल प्लॉट नं. ४६
तुर्भे बसडेपोसमोर, तुर्भे
नवी मुंबई ४०० ६१३

मुखपृष्ठ : कमल शेडगे

किंमत : तीस रुपये

वितरणव्यवस्था :
ग्रंथाली अभिनव वाचक चळवळ
'ग्रंथाली', ३४/९०२, नेहरू नगर
कुर्ला (पूर्व), मुंबई ४०० ०२४

हे निवेदन—
वामन ताम्हणे यांस

श्री. जयंत गडकरी ह्यांची इतर पुस्तके—

- **प्राचीन भारतीय समाजव्यवस्थेतील शूद्रांचे स्थान**
- **भारतीय भांडवलशाहीचा विकास : एक रूपरेखा**

# प्रास्ताविक

मी काही वाचस्पती नाही; पण बऱ्यापैकी वाचन असणारा नक्की आहे. माझ्या वाचनात जे इंग्रजी ग्रंथ आले त्यापैकी ज्या ग्रंथांनी मला झपाटून टाकले त्यातील एक---- प्रा. दामोदर धर्मानंद कोसंबी ह्यांचा 'कल्चर ॲन्ड सिव्हिलायझेशन ऑफ ॲन्शन्ट इंडिया,' हा ग्रंथ होय.

अर्थात झपाटून टाकले ह्या शब्दांनी भावनावशतेचा प्रत्यय येतो. पण कोसंबींच्या ह्या ग्रंथाने मला झपाटले ते सदर ग्रंथातील समाजशास्त्रीय दृष्टीकोन, सूक्ष्म चिकित्सा, प्रखर बुद्धिवाद आणि मानवतावादी गाभा ह्या वैशिष्टयांनी. प्राचीन भारतीय समाज-संस्कृतीच्या संवर्धनाचा हा आलेख मांडताना त्यांनी वास्तवतेचा शोध वास्तव साधनांचाच उपयोग करून कोणताही अभिनिवेश दुरभिमान व भावनाविवशता न बाळगता केला आहे. प्रसिद्ध इतिहासज्ञ रॉबर्ट ग्रेव्ह ह्याने ह्या ग्रंथाबद्दल 'इतिहास अशा पद्धतीनेच लिहिला गेला पाहिजे, पण तो तसा क्वचितच लिहिला जातो' (धिस इज हाऊ हिस्टरी शुड बी रिटन, बट सेल्डम इज.) असे उद्‌गार काढले आहेत.

प्रा. कोसंबी हे आंतरराष्ट्रीय कीर्तीचे चतुरस्त्र संशोधक. त्यांचा थोडक्यात परिचय इतरत्र दिला आहे. प्राचीन भारतीय समाज-संस्कृतीवरील त्यांचे संशोधन वैशिष्टयपूर्ण आहे. वास्तविक भारतीय संदर्भात त्यांनी मानवी समाज व संस्कृतीच्या मूलभूत प्रेरणांचा शोध कमालीच्या हातोटीने केलेला आहे. त्यांची चिकित्सा पद्धती मूलत: मार्क्सवादी आहे, तसे ते आग्रहाने सांगतात. प्राचीन भारतीय इतिहासाच्या मूलग्राही विवेचनात त्यांनी मार्क्सचा ऐतिहासिक भौतिकवादाचा सिद्धान्त समृद्ध केला आहे.

प्रा. कोसंबी ह्यांची स्मृती जागृत ठेवावी, त्यांच्या कार्याची ओळख जनतेच्या अधिक विस्तृत थरात करून द्यावी, त्यांची एक उर्जस्वल परंपरा निर्माण व्हावी, ह्याकरिता आम्ही सदर संस्थेची स्थापना केली. कोसंबी स्मृतिव्याख्यानमाला गेली चार वर्षे ठेवण्यात आल्या. ह्याअगोदर ह्या संस्थेने डॉ. आर. एस. शर्मा ह्यांच्या संशोधनावर आधारित '**प्राचीन भारतीय समाजव्यवस्थेतील शूद्रांचे स्थान**' हा ग्रंथही प्रसिद्ध केला. कोसंबींच्या ग्रंथाचे मराठीतले हे पहिले प्रकाशन सिद्ध करीत असता मला व माझ्या सहकाऱ्यांना कृतकृत्यतेचे समाधान मिळत आहे. त्याचबरोबर आमचा उपक्रम ज्यांना आवडेल, त्यांनी आम्हाला आर्थिक व इतर हातभार लावावा अशी विनंती मी करीत आहे.

मराठी मायबोली व मराठी बांधवांवर माझे प्रेम आहे. प्रा. कोसंबी ह्यांचे विचारधन मराठीतून प्रसृत करताना त्यांचे पांग मी फेडत आहे—अशीच माझी भावना आहे.

ह्या पुस्तकनिर्मितीत प्रा. नलिनी पंडित ह्यांनी जो हातभार लावला, त्याचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख करणे माझे कर्तव्य आहे. माझे हस्तलिखित वाचून, मूळ इंग्रजी ग्रंथातील प्रत्येक विधानांबरोबर ताडून पाहून, आणि अनेक दुरुस्त्या सुचवून ह्या पुस्तकाच्या निर्मितीत त्यांनी मोलाची मदत केली आहे.

मूळ इंग्रजी ग्रंथ शक्यतो त्याच क्रमाने व जरूर लागल्यास क्रम बदलून शक्य तेवढ्या सुबोध भाषेत समजावून सांगावा, असा प्रयत्न ह्या पुस्तकात केला आहे. त्यामुळे ह्या ग्रंथाला निवेदन असे म्हटले आहे.

आमच्या संस्थेचे काम चालू रहावे ह्याकरिता संस्थेच्या अनेक चाहत्यांनी व माझ्या मित्रांनी आर्थिक व इतर मदत केली आहे. सर्वांचा उल्लेख करता येणे शक्य नाही. पण संस्थेतील माझे सहकारी श्री. तासकर ह्यांचा मला आवर्जून उल्लेख केला पाहिजे. त्यांच्या सहकार्याशिवाय ही संस्था चालवणे किंवा हे प्रकाशन करणे शक्यच झाले नसते. त्याच-प्रमाणे सौ. शैला बेल्ले, श्री. बाबासाहेब गावडे, श्री. एम्. एस्. नाईक, श्री. पद्मनाभ बांदोडकर व ग्लॅक्सो एम्प्लॉईज चॅरिटी ट्रस्ट ह्यांनी खास मदत केली आहे.

शुद्धलेखन व स्वच्छ हस्ताक्षरात पुस्तकाची प्रेस कॉपी तयार करण्यात प्रा. विजय पानसरे (शुद्धलेखनाकरिता) सौ. अमिता पानसरे, रवींद्र शिर्के, शशी परब, प्रभू राजगडकर, बि. बि. राठोड, उदय चौधरी ह्यांनी मदत केली. त्यांचेही मी आभार मानतो.

सर्व प्रयत्न करूनही पुस्तकात तत्त्व व तपशील ह्याबाबत काही चुका राहून गेल्या असल्याचे आढळल्यास वाचकांनी त्या नजरेस आणून द्याव्यात. त्यांचा मी उतराईच होईन.

जयंत गडकरी


दामोदर धर्मानंद कोसंबी एज्युकेशनल ट्रस्ट

विश्वस्त

श्री. **वसंतराव मेंगडे**, ॲड्. हायकोर्ट मुंबई

श्री. **जी. डी. तासकर**

बी. ई. एफ्. आय्. ई., एम्. ए. एस्. सी. ई. (यू. एस्. ए.) एल्. एल्. बी.

प्रा. **नलिनी पंडित**

**नारायण सुर्वे**

**बाबुराव बागुल**

**अर्जुन डांगळे**

**जयंत गडकरी**, ॲड्व्होकेट हायकोर्ट मुंबई. (मुख्य विश्वस्त)

| एक |

# ऐतिहासिक परिस्थितीचा मागोवा

## १·१
## विविधतेतील एकात्मता

विविधता हे भारताचे खास वैशिष्टय. वाजवी दृष्टीकोन ठेवून भारताच्या परिस्थितीचा अभ्यास करणाऱ्या कुठल्याही अभ्यासकाला ही गोष्ट प्रथम जाणवते.

ही विविधता अनेक बाबतीत आहे. वेषभूषा, भाषा, शारीरिक व चेहऱ्यामोहऱ्याची ठेवण, प्रथा व समजुती, रहाणीमान, हवापाणी, खाण्यापिण्याच्या सवयी, भौगोलिक परिस्थिती—अशा सर्व बाबतीत ही विविधता प्रत्ययाला येते. श्रीमंत भारतीय युरोपियन पद्धतीचा किंवा मुस्लीम पद्धतीचा वेष परिधान करतात; तर गरीब भारतीय फाटक्या चिंध्या किंवा कमरेला एखादे वस्त्र गुंडाळून रहातात. अजूनही सबंध भारताची अशी एक भाषा किंवा लिपी प्रस्थापित झालेली नाही हे तुम्हांला दहा रुपयांच्या नोटेवरूनसुद्धा कळून येईल. अनेक भारतीय भाषात त्या नोटेची किंमत लिहिलेली असते. सबंध भारताचा किंवा भारतीय असा वंश किंवा वर्ण नाही. गोऱ्या रंगाचे आणि निळ्या डोळयांचे लोक जसे भारतीय आहेत; तसेच काळी कांती आणि काळे डोळे असलेले लोकही भारतीयच आहेत. ह्या दोन टोकांमध्ये पुन्हा विविध रूपे, रंग, कांती व डोळे असलेले भारतीय आहेत. सर्वसाधारणपणे भारतीयांचा केसांचा रंग मात्र काळा असतो. आपल्याकडे खास भारतीय असा सगळीकडे आढळणारा आहार नाही. उत्तरेकडील लोकांना दक्षिणेकडील लोकांचे जेवण आवडत नाही, तर दक्षिणेकडील लोकांना उत्तरे-कडील जेवण आवडत नाही. काही लोकांना मटण, मासे किंवा अंडीसुद्धा चालत नाहीत. काही असे आहेत की, गायीचे (वा बैलाचे किंवा म्हशीचे) मांस खाण्या-पेक्षा मृत्यू पत्करतील. काही ह्यापैकी कुठलीच बंधने पाळत नाहीत. जेवणातले हे निर्बंध त्या माणसांच्या आवडीनिवडींवर आधारलेले नसून, ते धर्म परंपरा आणि भौगोलिक परिस्थिती ह्यांवर अवलंबून आहेत. हवामानाच्या बाबतींतही सर्व तऱ्हेची विविधता आहे. हिमालयात बारा मास पडणारे बर्फ; काश्मीरमधील उत्तर युरोपसारखी थंड हवा; राजस्थान-

मधील तप्त हवेची वाळवंटे; दक्षिणेकडील विषम हवा; पश्चिमेकडील घनदाट जंगले; दोन हजार मैलांचा किनारा; गंगेच्या दुआंबांत असलेल्या मोठमोठ्या नद्या; तेथील कसदार जमीन; इतर अनेक नद्यांचे प्रदेश; काही मोठे तलाव; कच्छ आणि ओरिसामधील दलदलीच्या जागा, ह्या अगदी परस्परविरोधी भौगोलिक वैशिष्ट्यांनी भारतीय प्रदेश नटलेला आहे.

वेगवेगळ्या भौगोलिक प्रदेशांतच नव्हे; तर एकाच प्रदेशांतसुद्धा सांस्कृतिक दर्जा व इतर बाबतींत विलक्षण फरक आढळून येतो. अर्वाचीन भारताने टागोरांसारखे एक प्रचंड व्यक्तिमत्व जागतिक वाङ्मयात निर्माण केले. पण टागोरांच्या निवासस्थानापासून शंभर–दोनशे मैलांच्या अंतरावर अजूनही संथाल आणि इतर आदिवासी समूहांची वस्ती आहे. तेथे शिक्षणाचा संपूर्ण अभाव आहे. त्यापैकी अनेकांना टागोरांचे नावही माहीत नसेल. ह्यांतले अनेक आदिवासी अजून कंदमुळे खाऊन जीवन जगण्याच्या (फूड गॅदरिंग स्टेज) सामाजिक अवस्थेत आहेत. शहरांतील एखाद्या भव्य व सुंदर इमारतीचा आराखडा युरोपियन तज्ज्ञाने किंवा त्याच्या भारतीय शिष्याने केला असेल; पण ती उभी करणाऱ्या कामगारांची साधने अजूनही जुनाटच आहेत. इमारतीचे बांधकाम अजूनही कंत्राटी पद्धतीने करण्यात येते. निरनिराळी कामे करणाऱ्या कामगारांच्या टोळीप्रमुखाला फक्त पैसे द्यावयाचे व त्याने आपल्या टोळीतील कामगारांना कसेही राबवायचे ही पद्धत अजूनही चालू आहे. (गोदरेज ॲन्ड बॉईज ह्या मुंबईतील कारखान्यात मालाची वाहतूक करण्याकरिता अशा टोळीपद्धतीच्या कामाचा अजूनही वापर होतो : निवेदक)

जंगलांत किंवा खेड्यापाड्यांत रहाणाऱ्या अनेकांना आधुनिक यंत्रे, नोकरशाही यंत्रणा, पतपुरवठ्याची आधुनिक पद्धत, यांचा गंधही नसतो. ही माणसे इतक्या दरिद्री व असहाय परिस्थितीत जगत असतात की, अगदी स्वस्त दरात मोलमजुरी करून कशीबशी गुजराण करीत जिवंत रहातात.

पण ह्या सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक विविधतेच्या–विषमतेच्या दृश्यामध्येसुद्धा दोन तऱ्हेची समानता आहे. समाजातल्या राज्यकर्त्या वर्गात काही समान लक्षणे आहेत. भारतीय भांडवलदार वर्ग हा राज्यकर्ता वर्ग आहे. ह्या वर्गात वेगवेगळ्या भाषा बोलणारे आहेत. पण समान हितसंबंधांनी ते दोन व्यापक विभागात जोडले गेले आहेत. पतपुरवठा व कारखान्यांतील यंत्रांच्या साहाय्याने होणारे उत्पादन हे खऱ्या अर्थाने भांडवलदार वर्गाच्या हातात आहे. वस्तूंचा व्यापारविनिमय हे संख्येने मोठ्या असलेल्या मध्यम स्तराच्या व्यापारी वर्गांच्या हातात आहे. भारतातले अन्नोत्पादन हे मुख्यत: लहान लहान शेतीच्या तुकड्यांतून होत असते. सारा किंवा कर पैशात द्यावा लागतो. शेती करण्याकरिता आवश्यक असणारा माल पैसे देवून विकत घ्यावा लागतो. पण अन्नधान्याच्या व्यापारावर मात्र उत्पादक शेतकऱ्यांचे काहीच नियंत्रण नाही. त्यामुळे भारतातील शेतकरी खालच्या मध्यमवर्गीय किंवा गरिबीच्या पातळीवर गेलेला आहे. शेतकऱ्याला किंवा त्याच्या कुटुंबाला आवश्यक असे धान्य सोडून जे अतिरिक्त उत्पादन



होते, तेसुद्धा व्यापारी, मध्यस्थ आणि सावकार ह्यांच्या हाती जाते. अनेक वेळा श्रीमंत शेतकरी हाच सावकार असतो. चहा, कॉफी, कापूस, तंबाखू, ताग, काजू, ऊस, नारळ वगैरे पिकांना नगदी पिके (कॅश क्रॉप्स) म्हणतात. औद्योगिक उत्पादनाशी ही पिके निगडित असतात व त्यामुळे आंतरराष्ट्रीय बाजारपेठांतील उलाढालीशी ही पिके संबधित असतात. बाजारपेठांतील पतपुरवठा करणाऱ्या शक्ती ह्या वस्तूंच्या विक्रयावर व किंमतीवर परिणाम करतात. अनेक वेळा फायद्याचा मोठा हिस्सा ह्या शक्ती लुटतात. तरीसुद्धा जीवनावश्यक वस्तूंच्या (उदा० कापड, भांडी वगैरे) उत्पादनाचा बराचसा हिस्सा हा जुन्या, मागासलेल्या तंत्रानेच केला जाणारा आहे. अशा वस्तूंच्या आधुनिक यांत्रिक उत्पादनाच्या चढाओढीत अशा मागासलेल्या पद्धतीने होणारे उत्पादन अजून टिकून राहिले आहे. देशातल्या राजकीय परिस्थितीवर उत्पादन व व्यापार करणाऱ्या भांडवलदारी विभागांचा ताबा आहे.

लोकसभा–विधानसभांची कायदे करणारी यंत्रणा; शासनाची नोकरशाही यंत्रणा आणि ही यंत्रणा राबवण्याकरिता आवश्यक असणारे इतर व्यवसाय [उदा० वकिली वगैरे] म्हणजे राज्यकर्त्या वर्गाची राज्य चालवण्याची साधने आहेत.

विशिष्ट ऐतिहासिक कारणामुळे आज शासनव्यवस्था हाच भारतातील सगळ्यांत मोठा चालक व मालक आहे. सरकारी मालकीची गुंतवणूक भारतातील सर्व बड्या भांडवलदारांच्या गुंतवणुकीपेक्षा जास्त आहे, पण अशी गुंतवणूक ठराविक क्षेत्रांतच आहे. रेल्वे, पोस्ट ॲंड टेलिग्राफ रेल्वे, विमान वाहतूक, रेडिओ, टेलिफोन, काही बँका (हे बँक राष्ट्रीयीकरणाच्या अगोदर लिहिलेले आहे) आयुर्विमा, संरक्षण खाते ह्या क्षेत्रांतील गुंतवणूक संपूर्णपणे सरकारचीच आहे. वीज व कोळसा ह्यांचे उत्पादनही काही प्रमाणात सरकारी क्षेत्रात आहे. (आता कोळसा धंद्याचेसुद्धा राष्ट्रीयीकरण झालेले आहे.) तेलाच्या खाणी सरकारच्या मालकीच्या आहेत. पण तेलशुद्धीकरण कारखाने मात्र परदेशी भांडवलदारांच्या हातात आहेत. (आता तेल उत्पादन व शुद्धीकरण दोन्ही संपूर्णपणे सरकारी क्षेत्रात आहेत. ते कसे झाले ह्याचा इतिहास मोठा उद्बोधक आहे; पण ह्या पुस्तकाचा तो विषय नाही) पोलादाच्या धंद्यात शासनाने मोठमोठे कारखाने सार्वजनिक क्षेत्रांत काढले आहेत. धान्योत्पादन मात्र सरकार करीत नाही. जेव्हा धान्याचा दुष्काळ पडतो (अनेक वेळा हा दुष्काळ मध्यस्थ व्यापारी साठेबाजी वगैरे करून कृत्रिम रीत्या घडवून आणतात किंवा त्याची तीव्रता वाढवतात.) आणि शहरात स्वस्त दरात मिळणारे मजूर शहरे सोडून जाण्याचा धोका जेव्हा निर्माण होतो तेव्हा आयात केलेले धान्य महत्त्वाच्या शहरातून वाटले जाते. (हे त्यावेळच्या पी. एल. ४८० योजनेखाली मोठ्या प्रमाणात धान्य आयात करण्याच्या धोरणासंबंधी लिहिलेले आहे. त्यानंतर ह्या परिस्थितीत बरीच सुधारणा व बदल झाले आहेत : निवेदक) अर्थात अशी योजना बड्या भांडवलदारांना व व्यापारी मध्यस्थांना दोघांनाही फायद्याची आहे.

अन्नधान्य पुरवठ्याबाबतच्या अनिश्चित परिस्थितीवरील माझ्या दृष्टीने उपाय हा की,

शेतकऱ्यांकडून वसुली पैशात करण्याऐवजी अन्नधान्यांच्या रूपातच करावी, ह्या धान्याचा साठा करणे, क्रय-विक्रय करणे, त्याचे योग्य वाटप करणे, ह्या जबाबदाऱ्या सरकारने घ्याव्यात. हा मार्ग अनेक वेळा सुचवूनसुद्धा आणि प्राचीन भारतात अशीच पद्धत असतानाही त्याबाबतीत काहीही केले गेलेले नाही. आयात केलेले धान्यसुद्धा अद्ययावत पद्धतीने उतरवले जात नाही की स्वच्छ केलेल्या कोठारातून साठवले जात नाही. त्यामुळे अनेक वेळा धान्य फुकट जाते, सडते किंवा उंदरांचे भक्ष्य होते. जीवनावश्यक वस्तूंचे उत्पादन प्रामुख्याने खाजगी मालकीच्या क्षेत्रात आहेत. ह्या बाबतीतही सरकारने हस्तक्षेप केला पाहिजे; कारण तसे न केल्यास फायद्याची हाव असलेल्या भांडवलदारांकडून देशाच्या अर्थव्यवस्थेचा विध्वंस केला जाईल. वेगवेगळ्या सर्व क्षेत्रांतील उत्पादन हे पद्धतशीर योजनाबद्ध रीतीनेच करायला हवे; कारण अनेक तऱ्हेचा कच्चा माल व यंत्रसामुग्री अजूनही आयात करावी लागते व परदेशी गंगाजळीची अतिशय चणचण आहे. (ह्या बाबतीतही परिस्थिती बदललेली आहे. पण नवीन प्रश्न निर्माण झाले आहेत : निवेदक.)

दोन जागतिक महायुद्धे व त्या दरम्यान पडलेला वस्तूंचा तुटवडा, काळाबाजार, महागाई ह्यांतूनच आजच्या भांडवलदारांचे भांडवल मूलत: जमा झाले. त्यावर भारतातील भांडवलशाही पोसली गेली.

आता सरकारला अँटीबायटिक्स व महत्त्वाची औषधे ह्यांचा कारखाना सार्वजनिक क्षेत्रांत काढावा लागत आहे. कारण ह्या क्षेत्रात खाजगी कारखानदारांने व व्यापाऱ्यांनी नफेबाजीचा कळस गाठला व सामान्य जनांच्या जीवनाबद्दल अमानूष बेपर्वाई दाखविली.

भांडवलशाहीच्या अनिर्बंध वाढीवर किंवा व्यवहारावर काही बंधने घालणारे, योजनाबद्ध अर्थव्यवस्थेचा पुरस्कार करणारे सरकार सर्व वर्गांपासून वेगळे व स्वतंत्र आहे असा भास होतो. तसे म्हटले तर ब्रिटिशांकडून घेतलेली नोकरशाही यंत्रणा हीसुद्धा सर्व जनतेपासून अलग अशीच वाटत होती. पण शासन संस्थेचे वर्गीय स्वरूप ठरवण्याकरिता सरकारच्या मूलभूत धोरणांचे परिशिलन करणे आवश्यक असते. शासन व्यवस्था कुठल्या वर्गावर, जनतेच्या कोणत्या विभागावर नियंत्रण करते, कसे नियंत्रण करते, ह्यावरून सरकारवर कोठल्या वर्गाचे नियंत्रण आहे, हे दिसून येते. चीनबरोबर नुकत्याच झालेल्या सरहद्दी-बाबतच्या चकमकींच्या संदर्भात सरकारने आणीबाणी जाहीर केली; स्वत:कडे हुकूमशाही अधिकार घेतले. ह्या अधिकारांचा उपयोग समाजवाद किंवा तसेच निश्चित ध्येय साध्य करण्याकरिता होऊ शकला असता. ज्या अर्थी त्या मार्गाने काही प्रगती झालेली नाही, त्या अर्थी समाजवादाच्या उद्घोषित ध्येयाकडे वाटचाल होत नसून वाटचाल भलत्याच मार्गाने चालू आहे, असे म्हणावयाला जागा आहे. अर्थात शासनाच्या अगदी जहरी टीकाकारालासुद्धा स्वातंत्र्यानंतर काहीच प्रगती झाली नाही, असे म्हणता येणार नाही. ब्रिटिश कारकीर्दीच्या अखेरच्या काळात बंगाल व ओरिसामध्ये जे मानवनिर्मित भयानक



दुष्काळ पडत ते आता बंद झाले आहेत. ब्रिटिशांच्या वसाहतवादी धोरणाचे दुसरे अनेक दुष्परिणामही दूर करण्यात देशाला यश आले आहे. त्याशिवाय आर्थिक व राजकीय परावलंबित्व जवळजवळ नष्ट झाले आहे.

## १·२
## भारतातील राज्यकर्त्या वर्गाची संस्कृती

भांडवलदारी रहाणी व संस्कृती ह्यांचा पुरस्कार करणाऱ्या राज्यकर्त्या वर्गाचे पहिले अगदी सहज दिसून येणारे लक्षण म्हणजे ह्या रहाणीवरील व संस्कृतीवरील 'परदेशी' छाप. स्वातंत्र्य मिळून चौदा वर्षे झाली. (१९६१ साली लिहिलेले हे पुस्तक आहे) तरीसुद्धा राज्यकारभाराची–व्यापारधंद्याची–उच्च शिक्षणाची भाषा अजून इंग्रजीच आहे. अनेक समित्या नेमल्या गेल्या आणि अनेक ठराव झाले; पण परिस्थिती काही बदललेली नाही. भारतांतील बुद्धिमंत हा इंग्रज–अमेरिकनांच्या नुसत्या पोशाखाचेच अनुकरण करीत नाही, तर साहित्यांतही इंग्रजी प्रवृत्तींचे व प्रकारांचे अनुकरण करण्यात धन्यता मानतो. भारतांतील कादंबरी व कथा भारतीय भाषेत लिहिलेली असली तरी अनेक वेळा इंग्रजी वळण घेते. 'नाटक' हा कलाप्रकार भारतात दोन हजार वर्षे अस्तित्वात आहे; पण अलीकडच्या बऱ्याचशा नाटकांवर व जवळजवळ सर्व चित्रपटांवर पाश्चिमात्य देशातील नाटकांची व चित्रपटांची दाट छाया पडल्याचे आढळून येते. त्यामानाने इंग्रजी भाषेच्या प्रभावाला कवितेच्या क्षेत्रांतच थोडीफार टक्कर दिली गेली आहे. पण त्या क्षेत्रांतही अनियमित वृत्तरचना व कवितांचे विषय ह्यावरून परदेशी कवितेचा काही प्रभाव दिसून येतो. पश्चिम युरोपांतील सांस्कृतिक व वाङ्मयीन परंपरांचा व निर्मितीचा फारसा परिचय आपल्या बुद्धिमंतांना झालेला नाही.

खरी गोष्ट अशी आहे की, आपल्या देशातील भांडवलदारी पद्धतीचा उदय हा बाहेरून लादला गेलेला विकास आहे. भारत सरंजामदारी व निमसरंजामदारी ऐतिहासिक अवस्थेत असताना ह्या देशांतील अतिरिक्त संपत्ती काही थोड्या लोकांच्या हातात गोळा झाली होती—पण इतर देशांप्रमाणे त्याचे रूपांतर यांत्रिक उत्पादनाशी निगडित अशा औद्योगिक भांडवलात झाले नाही. ब्रिटिश आक्रमणामुळे व साम्राज्य स्थापनेमुळे ह्या संपत्तीच्या फार मोठ्या हिस्स्याची लूट १८ व्या व १९ व्या शतकात ब्रिटिशांनी केली. ह्या लुटलेल्या संपत्तीच्या जोरावरच इंग्लंडमधील औद्योगिक क्रांती पुरी होऊ शकली, कारण ह्या लुटीचे रूपांतर यंत्रोत्पादन कामाकरिता आवश्यक अशा भांडवलसंचयात झाले.

ब्रिटिश सत्तेच्या नोकरशाही, सैनिकी व पोलिसी यंत्रणेचा भारतातील साधनसंपत्ती-वरील भार सारखा वाढू लागला. ब्रिटिश मालकीच्या उद्योगधंद्यात गुंतवलेल्या भांडवला-वरील व्याज, अमाप नफे व इंग्लिश अधिकाऱ्यांना मिळणारी निवृत्ती वेतने ह्या रूपात बरीच रक्कम तेथे पाठवण्यात येत असे. भारतातील कच्च्या मालाचा भाव 'जैते'

आपल्या लहरीप्राणे ठरवीत. ताग, चहा, तंबाखू, कापूस ह्यांची निर्यात होत असे व तशी निर्यात वाढावी म्हणून ह्या पिकाची लागवड इतक्या व्यापक प्रमाणावर करण्यात आली की, भारताच्या काही विभागातील धान्योत्पादन व अर्थव्यवस्थेचा ढाचाच बदलून गेला. ह्या कच्च्या मालांचे उत्पादन, विनिमय व किंमती ह्यांचा ताबा परदेशी भांडवलदारांच्या हातात राहिला; कारण कच्च्या मालाचे पक्क्या मालात होणारे रूपांतर हे इंग्लडमध्ये होत असे. उत्पादित पक्क्या मालाचा काही भाग भारतातल्या विस्तीर्ण बाजारपेठेत अतिशय महागड्या दराने विकला जाई. नफ्याचा मोठा भाग इंग्लडमधील पैसा पुरवठा करणारा सवकार आणि बर्मिंगहॅम, मँचेस्टर येथील कारखानदार खिशात घालीत. तरीसुद्धा त्यांच्या छायेखाली व्यापार उदीम करणारा दुय्यम दर्जाचा श्रीमंत वर्ग भारतात निर्माण झाला. एकोणिसाव्या शतकाच्या दुसऱ्या अर्ध शतकांत भारतातल्या मजुरांना यंत्रमागावर काम करावयाला शिकवून इंग्लंडच्या मानाने कितीतरी कमी रोजगारीवर राबवता येण्याची व नफे वाढवण्याची शक्यता दिसू लागली.

१८५७ सालचा संग्राम चिरडून काढण्याकरिता जो अतोनात खर्च झाला, तो वसूल करण्याकरिता आयात मालावरील कर वाढवण्यात आला. १९ व्या शतकांत मुंबई येथे कापड गिरण्या व कलकत्ता येथे तागाच्या गिरण्या निघाल्या ह्याची कारणे हीच की येथे स्वस्त मजूर मिळू शकत होते आणि आयात मालावरील कर वाढवले गेले. कच्च्या मालाचे दळणवळण करण्याकरिता रेल्वेची उभारणी करणे आवश्यक होते, त्याकरता यंत्रावर काम करू शकतील अशा कामगारांची गरज होती. नोकरशाही यंत्रणेत कारकुनी कामे करण्याकरिता इंग्लंडहून माणसे आणण्यापेक्षा येथील लोकांनाच तशा कामाला उपयुक्त असे शिक्षण देणे जास्त फायद्याचे होते.

ह्या गरजेपोटी भारतांत प्रथम शाळा व कॉलेजे निघाली. भारतातील लोकही भराभर शिकू लागले व इंग्लंडमधून आयात केलेल्या माणसाच्या १/३ ते १/१० पगारावर त्याच्यापेक्षाही जास्त चांगल्या रीतीने व हुशारीने कामे करू लागले. अर्थात सर्व वरच्या अधिकाऱ्यांच्या जागा 'जेत्या' राज्यकर्त्यां वर्गातील व्यक्तींच्या हातात होत्या. हळूहळू देशांतील मध्यस्थ व्यापारी वर्गाला आपणही गिरण्या काढाव्या असे वाटू लागले. भारतातील एकंदर बाजारपेठ पाहाता त्यांना तशी चांगली संधीही होती. मुंबईतील काही पारशी घराण्यांनी प्रथम गिरण्या सुरू केल्या. कारण व्यापारातील– विशेषकरून चीनला चालणाऱ्या अफूच्या व्यापारांतील दुय्यम भागिदार ह्या नात्याने त्यानी चांगलीच माया जमा केली होती. भारतांतील भांडवलदारीच्या वाढीबरोबर स्वातंत्र्याच्या नव्या विचाराचे वारे वाहू लागले. हे विचारवंत वर वर पाहिले असता एडमंड बर्क व जॉन स्टुअर्ट मिल ह्या विचारवंतांच्या लिखाणाने प्रभावित झाले होते. पण ह्या विचारांना देशातील स्वतंत्र होऊ पहाणाऱ्या भांडवलदारीच्या वाढीचा भौतिक पाया होता.

भारतातील भांडवलदारी जरी सुरुवातीला परदेशी भांडवलदारांशी दुय्यम भागिदारी करणारी भांडवलदारी (कंप्राडोर कॅपिटॅलिझम) होती तरी ते जुन्या भारतीय समाजातील



विविध स्तरांतून आलेले होते. ब्रिटिशांचे राज्य प्रस्थापित व्हावयाच्या अगोदर आणि नंतरही सावकारी व सरंजामी पद्धतीने श्रमजीवी जनतेची लूट करून जी संपत्ती गोळा झालेली होती; त्याचे रूपांतर औद्योगिक भांडवलात होऊ लागले. पण सरंजामदारी पद्धती संस्काराचा पगडा कायम राहिला. अजूनही भारतीय जनतेचा मोठा विभाग सरंजामी अवस्थेत निर्माण झालेल्या धार्मिक श्रद्धा दूर सारू शकत नाही. ब्रिटिश राज्यकर्त्यांचे वसाहतवादी जोखड दूर करण्याची मानसिक तयारी करण्याकरिता राष्ट्राभिमान व इतिहासाभिमान जागृत करण्याची आवश्यकता होती. त्यामुळे त्या काळातील विचारवंतांना भारताच्या इतिहासांतील अनेक सोनेरी पानांचा शोध लावावा लागला. जपानसुद्धा अर्वाचीन काळांतच अद्ययावत झाला, पण जपानमध्ये असा खटाटोप करावा लागला नाही. कारण जपानचा इतिहास नीटपणे लिहून ठेवला गेलेला आहे. जपानमधले औद्योगीकरण हे भारतासारखे परकीयांच्या अंमलाखाली झाले नाही; स्वतंत्र व सार्वभौम अशा भांडवलदारी पद्धतीने झाले. तरीसुद्धा मेईजी काळात जपानमधला बुद्धिवंत हा पाश्चिमात्य संस्कृती, चालीरीती व विचारांची नक्कल करू लागला, ह्यावरून असे म्हणावयास हवे की सांस्कृतिक बदल होण्यामागे सखोल कारणे असतात. (केवळ लष्करी आक्रमण किंवा परकीय पद्धतीचे आकर्षण एवढ्याने ह्या सांस्कृतिक बदलांची कारणे स्पष्ट होऊ शकत नाहीत.) ब्रिटिशांशी दुय्यम भागीदारी करणाऱ्या भारतांतील भांडवलशाहीचा जसजसा विकास होऊ लागला तसतसे परकीयांचे राज्य त्यांना स्वतःच्या आपल्या स्वतंत्र व सार्वभौम विकासाच्या मार्गांतील अडथळा वाटू लागला. ब्रिटिश साम्राज्यवाद्यांचे राज्य घालवून देण्याकरिता जो प्रदीर्घ लढा झाला, त्याचे नेतृत्व ह्याच भांडवलशाहीने केले. भारतातील वैशिष्ट्यपूर्ण परिस्थितीत हा लढा शस्त्रांचा वापर केल्याशिवाय करावा लागला. ह्या लढ्याचे तत्त्वज्ञान व मार्ग हे वैशिष्ट्यपूर्ण अशा भारतीय प्रकृतीचे होते. ह्या लढ्याचे नेते महात्मा गांधी आणि त्याही अगोदरचे नेते लोकमान्य टिळक ह्यांचे व्यक्तिमत्वसुद्धा वैशिष्ट्यपूर्ण भारतीय असेच होते. असे असतानाही भारतातील मध्यम वर्गाला पाश्चिमात्य संस्कृतीची एवढी ओढ वाटावी व स्वातंत्र्यलढा संपल्यानंतर ती ओढ वाटत रहावी; ह्याला खोल अर्थ आहे. त्याची कारणे फार सखोल आहेत. संस्कृतीची वरवरची लक्षणे लक्षात घेऊन संस्कृतीचा अर्थही कळणार नाही की सांस्कृतिक बदलाची कारणेही कळणार नाहीत. (ह्याचा विचार पुढे केला आहे.)

भारतातील भांडवलदारी ही जर्मनी किंवा इंग्लंडच्या मानाने नव्हे तर जपानच्या मानानेही तांत्रिक दृष्ट्या फार काळ मागासलेली राहिली. अद्ययावत् पद्धतीने उत्पादन करण्याकरिता लागणारी यंत्रसामुग्री, पतपुरवठ्याची पद्धत, इतकेच काय राजकीय सिद्धांतसुद्धा आयात केलेले आहेत. भारत स्वतंत्र झाल्यानंतर खऱ्याखुऱ्या अर्थाने भारताला औद्योगीकरणाच्या प्रश्नाला तोंड द्यावे लागले. जास्तीत जास्त उत्पादन करण्याकरिता मोठ्या संख्येने उपलब्ध असलेल्या गरीब मजूर वर्गाच्या शारीरिक श्रमांचा जास्तीत जास्त उपयोग कमीत कमी मोबदला देऊन करून घ्यायचा एवढेच तंत्र भारतीय भांडवल-

होत नाही. प्रदीर्घ काळ राज्य केलेल्या काही राजघराण्यांचे उल्लेखसुद्धा आढळत नाहीत. सर्व हरवल्यासारखे झाले आहे. मुस्लीम आक्रमणापर्यंतच्या काळापर्यंतचे जे उल्लेख आहेत, ते इतके अनिश्चित आहेत की, अनेक राज्यकर्त्यांचे स्वामित्व कोठल्या प्रदेशात पसरले होते हे सांगणे कठिण होते. काश्मीर व खंबायत येथील राज्यकर्त्यांची दरबारी दफ्तरे सोडल्यास इतर दफ्तरे क्वचितच उपलब्ध आहेत. ज्यांना सांस्कृतिक विकासाचा मानदंड मानावे; अशा थोर लेखक वा ग्रंथकर्त्यांनी निर्माण केलेले साहित्य शाबूत आहे; पण लेखकाचा निश्चित काळ ठरवणे कठिण आहे. काही लेखकांच्या बाबतीत साधारणपणे कुठल्या शतकांत तो होऊन गेला असावा, ह्या बाबतीत फक्त अंदाज बांधता येतो. तर काहीच्या बाबतीत फक्त असा एक थोर लेखक होऊन गेला, एवढेच सांगता येते. ह्यामुळे अनेक पाश्चिमात्य इतिहासकार भारताला इतिहासच नाही, अशा निष्कर्षाला येऊन पोहोचले. अर्थात भारताचा प्राचीन इतिहास हा रोम किंवा ग्रीस देशाच्या इतिहासांप्रमाणे तितक्या निश्चितपणे व तशा पद्धतीने सांगता येणार नाही हे अगदी खरे; पण इतिहास म्हणजे तरी काय ? एकामागून एक झालेल्या राज्यकर्त्यांचा उदय व अस्त कसा झाला किंवा त्याच्यात कुठल्या घनघोर लढाया झाल्या, ह्याचीच नोंद ठेवणे म्हणजे इतिहास, अशी कल्पना करून घेणे बरोबर आहे काय ? इतिहासाची ओळख जर त्याच पद्धतीने करून घ्यावयाची असेल तर प्राचीन भारताचा इतिहास लिहिणे खरोखरच कठिण आहे. पण इतिहासाच्या दृष्टीने भारतीय समाजात नागरांचा वापर केव्हा, कुठे सुरू झाला; नागर संस्कृती कशी विकास पावली; ह्या वस्तुस्थितीचा शोध घेणे हे राज्यकर्त्यांच्या नामावळीचा शोध घेण्यापेक्षा जास्त महत्त्वाचे असेल तर भारताला प्राचीन इतिहास आहे. व तो सुसंगतपणे लिहिता येण्यासारखा आहे. ह्या माझ्या पुस्तकाचे सूत्र म्हणून मी इतिहासाची व्याख्या अशी ठरवतो : **इतिहास म्हणजे सजातील उत्पादन साधनांत कालक्रमानुसार झालेल्या बदलांचा इतिहास. ह्या बदलांमुळे घडून आलेल्या समाजातील उत्पादन संबंधाचा व सामाजिक संबंधाचा व त्यात कालक्रमानुसार झालेल्या विकासाचा इतिहास.**

ह्या व्याख्येचा एक फायदा असा आहे की, ऐतिहासिक घडामोडींची केवळ एक साखळी रचण्याऐवजी आपण वेगळी पद्धत अंगिकारू शकतो. संस्कृती हा शब्दही आपल्याला 'सबंध समाजाच्या जीवन पद्धतीची मुख्य लक्षणे' ह्या अर्थाने वापरावा लागेल. आता ह्या व्याख्येसंबंधी अधिक बारकाईने अभ्यास करू या.

काहीजणांच्या मते संस्कृती म्हणजे धर्म, तत्त्वज्ञान, कायदेव्यवस्था, वाङ्मय, कला, संगीत ह्या व असल्या बौद्धिक व आध्यात्मिक क्षेत्रातील मूल्यव्यवस्था. कधी कधी संस्कृतीच्या कक्षेत राज्यकर्त्या वर्गाला पटणाऱ्या व आवडणाऱ्या वागण्याच्या पद्धतींचाही समावेश केला जातो. ह्या बुद्धिमंतांच्या दृष्टीने समाजाचा इतिहास अशा सकृतदर्शनी दिसणाऱ्या संस्कृतिक लक्षणावरून ठरवणे योग्य असते. त्यांना असे वाटते की, इतिहासाच्या अभ्यासकाने आपले लक्ष्य अशा लक्षणांवरच केंद्रित करावे. पण सांस्कृतिक



क्षेत्रांतील परिवर्तनामुळे इतिहासाला चालना मिळते, असे मानणे चुकीचे आहे. ह्या सांस्कृतिक परिवर्तनाला तरी कोठून चालना मिळाली ? हा प्रश्न शिल्लक रहातोच. ते असो.

इतिहासाच्या एका कालखंडांत मध्य आशियांतील तीन प्रमुख ऐतिहासिक संस्कृतींचा संगम घडून आलेला आहे. त्यांना बौद्ध व ख्रिश्चन धर्मांच्या प्रभावाची जोड मिळाली. कुशाण साम्राजाच्या काळात ह्या भागात व्यापारवृद्धी झाली व ठिकठिकाणी केलेल्या उत्खननात मध्य आशियातल्या प्राचीन संस्कृतीचे पुरावे अजूनही सापडतात. तरीसुद्धा एकंदर मानवी संस्कृतीच्या नंतरच्या काळातील विकासाला मध्य आशियांतील सांस्कृतिक विकासाने दिलेले प्रदान फारसे नाही. अरब जरी मागासलेल्या सांस्कृतिक वातावरणांतून पुढे आलेले असले तरीही एकाकाळी भारतीय शास्त्र व कला ह्यांची जपणूक करण्यांत व त्यांचा वारसा पुढील पिढ्यांपर्यंत पोचविण्यात त्यांनी निर्विवादपणे चांगली कामगिरी पार पाडलेली आहे. मध्य आशियात एखादाच 'अल्बरूनी' झाला. पण तोसुद्धा मध्य आशियाचा सांस्कृतिक प्रतिनिधी ह्या नात्याने लिहीत नाही तर इस्लामी संस्कृतीचा प्रतिनिधी या नात्याने लिहितो. मंगोल आक्रमणाने मध्य आशियातील त्या काळच्या विकसित होणाऱ्या संस्कृतीचा धुव्वा उडाला. पण चीनमधल्या संस्कृतीवर त्या आक्रमणाचा तसाच परिणाम झाला नाही. मंगोल आक्रमणानंतर चिनी संस्कृतीची उलट प्रगतीच झाली ह्याचे रहस्य तरी काय ?

माणूस केवळ भाकर-तुकड्यावर जगत नाही हे अगदी खरे ! पण अजूनही भाकर किंवा दुसरे कोठलेही अन्नभक्षण केल्याशिवाय जगणारी मानवी जात निर्माण झालेली नाही. अगदी काटेकोरपणे बोलावयाचे म्हणजे "भाकर (शिजवलेले अन्न) ही माणसाच्या अन्ननिर्मितीच्या प्रयत्नातील एक प्रगतीचे व बऱ्याच कालावधीनंतर टाकलेले महत्त्वाचे पाऊल आहे. ख्रिश्चन धर्म अध्यात्माला भौतिक जीवनापेक्षा अधिक महत्त्व देतो. तरी-सुद्धा "देवा आमच्या वाटणीचा आजचा भाकरतुकडा आम्हाला दे" ही त्या धर्मीयांची दररोज करावयाची प्रार्थना आहे. सकृतदर्शनी ज्याला संस्कृती मानले जाते, अशा सर्व संस्कृतींची उभारणी अतिरिक्त धान्याच्या (म्हणजे उत्पादकाची कमीत कमी गरज भागवून शिल्लक रहाणाऱ्या धान्याच्या) पुरवठ्यावर अवलंबून राहिलेली आहे. मेसोपोटीमियाची भव्य 'झिगरत्' देवळे, चीनची अवाढव्य भिंत, इजिप्तमधील प्रचंड पिरॅमिड्स किंवा आजच्या गगनचुंबी इमारती ह्या अन्नधान्याचा तितकाच प्रचंड पुरवठा असल्याशिवाय बांधल्या गेल्या नसत्या. अन्नधान्याचे व इतर गरजेच्या वस्तूंचे अतिरिक्त उत्पादन, उत्पादनाची साधने व तंत्र ह्यावर अवलंबून असते. हे अतिरिक्त उत्पादन शेवटी त्याचा प्रत्यक्ष उपभोग घेणाऱ्या ग्राहकाकडे कसे व कुठल्या पद्धतीने जाते ह्यावर समाजपद्धती किंवा समाजातले वर्गांचे उत्पादनसंबंध अवलंबून असतात किंवा असेही म्हणता येईल की प्रत्येक समाजातील उत्पादन संबंध (मुख्य सामाजिक संबंध) हे अतिरिक्त उत्पादन त्याचा प्रत्यक्ष वापर करणाऱ्या माणसाच्या वापरात जाण्याची प्रक्रिया ठरवीत

असतात. समाजाची पायाभूत रचना ह्या प्रक्रियेवर अवलंबून असते. अगदी प्राथमिक अवस्थेतील म्हणजे अन्य गोळा करणाऱ्या अवस्थेतील समाजात (फूड गॅदरिंग स्टेज) गोळा झालेल्या वरकड अन्नाचे वाटप त्या समूहातील स्त्रिया करीत असत. पुढल्या काळात अन्नाचे वाटप करण्याचे काम कुटुंबप्रमुख किंवा टोळीप्रमुख करीत असत. नंतरच्या राजेशाहीच्या काळात राजाचे अधिकारी किंव सरंजामदारीच्या काळात सरदार शेतकऱ्याकडून धान्य गोळा करीत व त्याचे वाटप करीत व तसे वाटप करण्याकरिता धान्याची वसुली व विनिमय ह्यांचे नियंत्रण करीत. दासप्रथा असलेल्या समाजात प्रत्यक्ष उत्पादन जरी दास करीत तरी धान्याचे उत्पादन, वसुली व वाटप दासांचे मालक असलेल्या व्यक्तींच्या व त्या वर्गाच्या हातात असे. दासप्रथेतील मालक हे त्या अगोदरच्या समाजातील धर्मगुरूंच्या किंवा टोळी प्रमुखांच्या वर्गातून आलेले असत. जमिनीच्या तुकड्याला बांधलेला शेतकरी म्हणजे भूदास [सर्फस] धान्याचे उत्पादन करीत होता. पण उत्पादनाचे वाटप मात्र सरंजामदार करीत होते. व्यापार-विनिमय व त्यात होणाऱ्या नाण्यांचा वापर ह्यामुळे रोख नाण्यांच्या स्वरूपात व्यापारी वर्गाकडे जी अतिरिक्त संपत्ती जमा झाली त्यांतूनच यंत्राचा वापर करण्याकरिता आवश्यक असणारी भांडवल उभारणी झाली. भांडवलदारी युगात माणूस आपली श्रमशक्ती इतर वस्तूंप्रमाणे विकू लागला. ह्या सर्व अवस्था वेगवेगळ्या राष्ट्रांत व प्रदेशात वेगवेगळ्या स्वरूपांत उगम पावल्या. ब्रिटनमध्ये अगदी अर्वाचीन काळापर्यंत राजेशाही व उमरावशाही होती. पण उत्पादनाचा प्राथमिक घटक मात्र (ज्याला सर्फ म्हणतात) तो भूदास राहिला नव्हता. आता तर नावाला राजा असूनसुद्धा ब्रिटन समाज हा संपूर्णतः भांडवलदारी समाज आहे. ज्या लाकडी सिंहासनावर पहिल्या एडवर्डचा राज्याभिषेक झाला त्याच लाकडी सिंहासनावर सातव्या एडवर्डचा राज्याभिषेक झाला. पण ह्या दोन एडवर्डच्या राज्याभिषेकांदरम्यान इंग्लंडमधील समाजाचे चित्र पार बदलून गेले. जपान व जर्मनी येथील भांडवलदार वर्गाने आपल्या राजनिष्ठेच्या नावाखाली सरंजामदारी नष्ट केली. पण भांडवलदारी वर्गाला उपयुक्त असणाऱ्या जुन्या रूढी मात्र पावित्र्य व अभिमान ह्यांच्या नावाने दृढ करण्यात आल्या.

सामाजिक परिवर्तनाचा विचार करताना खास करून भारतांतील सामाजिक विकासाचा विचार करताना तो विचार यांत्रिक पद्धतीने करून चालणार नाही. भारतामध्ये कुठल्याही घटनेच्या किंवा चळवळीच्या गाभ्यापेक्षा त्याच्या बाह्य स्वरूपाला व पद्धतीला जास्त महत्त्व दिले जाते. त्याचप्रमाणे आर्थिक परिवर्तनाचा इतिहास, हाच तेवढा इतिहास आहे, असेही म्हणून चालणार नाही.

समाजातील एकंदर संपत्तीचा संचय वाढला की, आपोआप सामाजिक विकासाची नवी अवस्था प्राप्त होते असेही नव्हे. त्या अवस्थेतील विविध प्रक्रिया लक्षात घेणे आवश्यक आहे. अमेरिकेतील भू-भागात फार प्राचीन काळापासून सोने व चांदी ह्यांच्या खाणी होत्या, पण अमेरिकेतील आदिवासी हे जंगली अवस्थेतच राहिले. ही खनीज संपत्ती जेव्हा स्पॅनिश चाचे व व्यापारी ह्यांच्या हातात आली, तेव्हा त्याचा



उपयोग त्यानी स्पेनमधील सरंजामशाही व धार्मिक सत्ता बळकट करण्याकरिता केला. ह्याउलट सर फ्रान्सिस ड्रेक व इतर इंग्लिश चाचे व व्यापारी ह्यांच्या हातात त्यांचा काही भाग आला तो इंग्लंडला सरंजामदारी अवस्थेतून भांडवलदारी अवस्थेत परिवर्तन होण्याकरिता मदतकारक ठरला.

सामाजिक विकासाच्या प्रत्येक अवस्थेत जुन्या परंपरा व समजुती आणि उगवत्या वर्गाला पोषक अशा विचारसरणी ह्यांचा सतत संघर्ष चालू असतो. विविध तऱ्हेची दडपणे कधी परंपरेच्या स्वरूपात तर कधी परंपरेच्या विरोधी असणाऱ्या बंडाच्या स्वरूपात समाजावर येत असतात.

भाषेची वृद्धीसुद्धा काही आपोआप होत नाही. समाजातील वस्तूंची वृद्धी व त्यांचा विनिमय ह्यांच्या वाढीबरोबर भाषेची वृद्धी झालेली आहे. नव्या वस्तू, नवीन शब्द, नव्या कल्पना ह्यांची उत्पत्ती ह्या प्रक्रिया एकत्र घडत आल्या आहेत. उत्पादन साधने व तंत्र ह्या क्षेत्रात जेव्हा प्रगतीचे क्रांतिकारक पाऊल पडते, तेव्हा अधिक व्यापक समाजाची उभारणी होते. म्हणजे निरनिराळ्या जनसमूहांचे अधिकाधिक व्यापक स्तरांवर आर्थिक व सामाजिक संबंध प्रस्थापित होतात. जुन्या उत्पादन पद्धतीने बांधलेल्या सामाजिक रचनेत बदल घडून येण्याची आवश्यकता निर्माण होते. लहान टोळीचा प्रमुख कुठल्याही शासकीय किंवा नोकरशाही यंत्रणेशिवाय टोळीतील सभासदांचे नियंत्रण करू शकत असे. पण सार्वभौम राजा मात्र नोकरशाही व सरंजामशाही यंत्रणेशिवाय राज्य चालवू शकत नव्हता. उत्पादन व्यवस्थेतील नवी अवस्था नव्या समाजाच्या व नव्या संस्कृतीच्या स्वरूपात प्रकट होते. जेव्हा उत्पादन व्यवस्था प्राथमिक किंवा मागासलेली असते, तेव्हा सामाजिक संस्कृती (किंवा त्यातील बदल) धर्मश्रद्धा, आचार किंवा उपचार ह्यांच्या स्वरूपात प्रकट होतो. नव्या उत्पादन साधनांशी धर्मविचारांना, राज्यव्यवस्थेला किंवा प्रस्थापित संस्कृतीला जुळवून घेता आले नाही तर समाजात द्वंद्व निर्माण होते. कधी कधी जुना ढाचा–धर्म किंवा समाजसुधारणेच्या नावाने किंवा तशा आवरणाखाली मोडला जातो. पण असे पाऊल क्रांतिकारकच असते. कधी अशा झगड्यात जुनी व्यवस्था कायम ठेवण्यात ज्या वर्गाचे हित असते असा वर्ग विजयी होतो. तसे झाल्यास सामाजिक विकासाची गती कुंठून रहाते. सांस्कृतिक ऱ्हास होतो व समाजाचा शक्तिपात होतो.

भारतातील प्राचीन इतिहासातील नागर संस्कृतीच्या विकासाच्या काळात भारतात झालेली सामाजिक व सांस्कृतिक प्रगती; पण त्यानंतर मध्ययुगीन काळांत आलेले शैथिल्य आणि परकीय आक्रमकांसमोर भारतीय समाजाने दाखवलेला कमकुवतपणा ह्यावरून हेच दिसून येते.

## १·४

# भारतीय समाज-संस्कृतीच्या अभ्यासाकरिता ग्रामीण व आदिवासी समाजाच्या अभ्यासाची आवश्यकता

भारताच्या प्राचीन इतिहासाबद्दल अधिकृत नोंदी व साहित्याचा अभाव असताना हा इतिहास लिहायचा तरी कसा—असा प्रश्न आहे. तसे पाहिले तर नष्ट झालेल्या रोमन संस्कृतीचा इतिहास तरी कसा लिहिला गेला ? अर्थात त्याबद्दल त्या काळी लिहिले गेलेले असे साहित्य उपलब्ध होतेच; पण साहित्यांतील ज्या अनेक शब्दांचा अर्थ लागत नव्हता तो अर्थ पुरातत्त्व शास्त्राच्या संशोधन साहाय्याने लावला गेला. ऐतिहासिक वाङ्मयात उल्लेखिल्या गेलेल्या अनेक व्यक्ती खरोखरच होऊन गेल्या; हे उत्खननात सापडलेल्या नाण्यांवरून, पुतळ्यांवरून किंवा दफन भूमीत सापडलेल्या आलेखांवरून सिद्ध करण्यात आले. ह्या पुराव्यांमुळे ऐतिहासिक नोंदींना (साहित्याला) दुजोरा मिळाला आहे. उत्खनन शास्त्रज्ञ प्राचीन इतिहासाचे गाडले गेलेले अनेक पुरावे उपलब्ध करीत आहेत. आणि अशा पुराव्यांचा जेवढ्यापुरता वाङ्मयीन लिखाणाला दुजोरा मिळतो, तेवढ्यापुरतेच वाङ्मयीन पुराव्यांना विश्वसनीय मानण्यात येते. ऐतिहासिक साहित्यांत सांगितलेले समाजांतील लोक प्रत्यक्षात कसे जगत होते हे उत्खननांतील पुराव्यांवरून कळू शकते. त्या पुराव्यांमुळे काही शब्दांचा अर्थ लागू लागला आहे तर काही शब्दांचा प्रथम लावलेला अर्थ वेगळा ठरला आहे. आजही आदिवासी अवस्थेत जगत असलेल्या जनजमातींच्या जीवनपद्धतीचा सूक्ष्म अभ्यास व पुरातत्त्वशास्त्र ह्यांच्या संयोगाने लेखी साहित्य उपलब्ध होणाच्या अगोदरच्या काळातील समाजाची जीवनपद्धती, संस्कृती कशी होती ह्यांचा अभ्यास करता येणे शक्य झाले आहे. त्याला 'प्रि–हिस्टरी' म्हणजे प्राग् ऐतिहासिक समाजांचा अभ्यास असे नाव देण्यात आले आहे. भारतामध्येही अशा सर्व साधनांचा उपयोग करून प्राचीन भारतीय समाजव्यवस्थेचा व संस्कृतीचा अभ्यास करता येईल. भारतीय पुरातत्त्वशास्त्र किंवा उत्खननशास्त्र सगळेच महत्त्वाचे प्रश्न सोडविण्याइतके (किंवा महत्त्वाचे प्रश्न निर्माण करण्याएवढेही) प्रगत झालेले नाही. तरीसुद्धा इतिहासकारांच्या दृष्टीने एक अत्यंत महत्त्वाची परिस्थिती भारतात आहे. भारतामध्ये वेगवेगळ्या प्रदेशात अजूनही अत्यंत जुन्या पद्धतीच्या समाज-जीवनाचे अवशेष शिल्लक आहेत. विविध स्वरूपामध्ये त्याचे दर्शन होते. त्याचा अभ्यास करण्याकरिता शहरे सोडून गावोगाव फिरावे लागेल. शिक्षण, आकाशवाणी, व्यापार किंवा आधुनिक राजकीय घडामोडी यांचे परिणाम खेड्यापाड्यात व अंतर्गत भागातही जरूर झाले आहेत. १९ व्या शतकानंतर आलेल्या व वाढलेल्या रेल्वे मार्गांचा व इतर वाहतूक साधनांचा परिणाम आदिवासी जीवनावरही काहीसा झालेला आहे. तरीसुद्धा त्यांच्या प्रथा, सवयी व पद्धती ह्यात डोकावून पाहाता येईल. दळणवळणाची साधने असलेल्या भागांपासून जेवढे दूर जावे तेवढे अधिक जुने जग पहावयास मिळू शकते. भारत हा अजून शेतकऱ्यांचा देश आहे.



शेतकी तंत्र जरी जुने असले तरी शेती व्यवसाय देशभर पसरलेला आहे. बहुतेक जमीनही हजार-दोन हजार वर्षे कसली गेली आहे. भारतातील दर एकरी उत्पन्न इतर विकसित देशाच्या मानाने भलतेच कमी आहे; कारण जमीन तुकड्यातुकड्यांनी व जुन्या तंत्राने कसली जाते. विहंगम दृष्टीने पाहिले तर भारतातील दळणवळणाच्या साधनांचा अभाव चटकन नजरेत भरतो. पश्चिम युरोप किंवा अमेरिका ह्याप्रमाणे येथे रेल्वे व रस्ते यांचे जाळे पसरलेले दिसून येत नाही. याचा अर्थ असा की उत्पादनाचा बराचसा भाग स्थानिक पातळीवर विकला जातो. ह्या मागासलेल्या उत्पादन व विनिमय पद्धतीमुळे अनेक प्रदेशांत अजूनही आदिवासी जनसमूह शिल्लक आहेत. काही ठिकाणी हे समाज आता अस्तंगत होत आहेत. पण तरीही त्या अवस्थेतून पुढे गेलेल्या समाजात जुने संस्कार शिल्लक आहेत.

भारतातील खेड्यापाड्यांतील अर्थव्यवस्था ही मुख्यतः मोसमी वाऱ्यावर अवलंबून आहे. हा पाऊस जून ते सप्टेंबर या चार महिन्यांत पडतो. दक्षिणेपेक्षा उत्तरेकडे पाऊस उशिरा सुरू होतो. पूर्वेकडच्या किनाऱ्यावर पाऊस दोन वेगवेगळ्या हप्त्यांत पडतो. या फरकामुळे वेगवेगळ्या प्रदेशात उत्पादन-विनिमयाचे वार्षिक चक्र वेगवेगळ्या वेळी सुरू होते. इतका पाऊस पडूनसुद्धा अनेक प्रदेश ओसाड वाटतात. हॉलंड किंवा इंग्लंडसारखा हिरवेगारपणा दिसत नाही. अनेक ठिकाणी गवतही नष्ट झालेले आहे. पाणी जोरात वाहून जमिनीची धूप होते. अर्थात ही आपत्ती अलीकडच्या काळात वाढलेली आहे. जंगलतोड झाल्यामुळे हा प्रश्न फारच उग्र झाला आहे. प्राचीन काळांत ज्या काळाचा आपण ह्या पुस्तकांत विचार करणार आहोत, त्या काळात मोसमी पावसांनी निर्माण केलेले प्रश्न वेगळे असतील. उत्तर पंजाब, सिंध आणि राजस्थान हे प्रदेश त्या काळातसुद्धा जवळजवळ कोरडे प्रदेश होते. पण जमीन इतकी सुपीक होती की, थोड्या पावसानेही उत्तम पिके येऊ शकत. गंगेच्या खोऱ्यातील जमीन सुपीक आणि पाऊसही भरपूर. त्यामुळे त्या भागात प्राचीन काळात भरपूर जंगले होती. उत्तर प्रदेश, बिहार व बंगाल ह्या भागात दलदल व जंगले असणार. पश्चिमेकडील किनाऱ्यांवरील डोंगराळ प्रदेशात व आसाममधील टेकड्यांच्या प्रदेशात लाकूडतोड मोठ्या प्रमाणात झाली असली तरी अजूनही जंगले आहेत. ज्या ठिकाणी लाकूडतोड झाली, अशा समुद्रकिनाऱ्याजवळील सपाट प्रदेशात वर्षाला तीन पिके काढणे शक्य आहे. पण तेथील दाट वस्ती स्थानिक उत्पन्नावर जगू शकत नाही. तिथली स्थानिक अर्थव्यवस्था नारळासारख्या नगदी पिकांवर अवलंबून राहू लागली आहे. जंगलव्याप्त प्रदेशांतील खनीज द्रव्यांचा शोध घेण्याचा योग्य असा उपक्रम अलीकडेच सुरू झाला आहे. ह्या जंगलातील आदिवासी समाज (उदा० भिल्ल, निल-गिरीमधील तोडा, संथाल, आरे ऑन) प्राचीन इतिहासकारांच्या व समाजाच्या अभ्या-सकांचा विषय आहे. दक्षिणेकडील पठारांना दाट जंगलांचे आवरण नाही. पूर्वीही नव्हते. तेथील जंगलाचे सातत्य सपाट व मोकळ्या पठारांनी मोडले गेले आहे. पश्चिमेकडील

ओसाड प्रदेशात बासाल्ट व आग्नेय भागात ग्रानाईट सापडते. सर्वसाधारणपणे जमीन फारशी सुपीक नाही. तरीसुद्धा काही भागांतील काळी जमीन अनेक पिकांकरिता खास करून कपाशीच्या पिकांकरिता फार चांगली आहे. अशा जमिनीची नांगरण करण्याकरिता जड लोखंडी नांगराचा उपयोग करावा लागतो. गुजरातमधल्या जमिनीचे खास गुणधर्म आहेत. ही सर्व चर्चा एवढ्यासाठी केली की, जमिनीच्या व वातावरणाच्या विविध गुणधर्मांचा परिणाम तेथील ऐतिहासिक विकासावर झालेला आहे व तो विकास प्रत्येक ठिकाणी वेगवेगळ्या पद्धतींने घडला आहे, ह्यांची नोंद घ्यावी. वेगवेगळ्या प्रदेशातील वैशिष्ट्यपूर्ण भौगोलिक परिस्थिती व वैशिष्ट्यपूर्ण इतिहास ह्यामुळे भारतातील वेगवेगळ्या प्रदेशातील शेतकरी समाजजीवनात विविधता आहे. तथापि सर्व भारतीय समाजाचे असे खास वैशिष्ट्य म्हणजे जातीव्यवस्था. जातीव्यस्थेचा पहिला व साधा अर्थ हा की एकाच अर्थव्यवस्थेने बांधलेल्या समाजाची वेगवेगळ्या गटांत झालेली विभागणी. हे सर्व गट एकाच ठिकाणी राहतात. पण एकत्रित रीत्या नांदत मात्र नाहीत. आता कायद्याने जरी सर्व जाती समान असल्याचे मान्य करण्यात आलेले असले, तरीही धर्म व परंपरागत संस्कारामुळे वेगवेगळ्या जातीत रोटी-बेटी व्यवहार होऊ शकत नाही. भांडवलदारी समाजातील यंत्रावरील उत्पादनपद्धतीमुळे जातीव्यवस्थेचा भौतिक पाया उखडला जात आहे. काही प्रगती झाली आहे (अर्थात राजकीय व सामाजिक प्रभाव पाडण्याकरिता जातीव्यवस्थेचा उपयोग अजूनही केला जातो). भारतातील बहुसंख्य लोक-आपल्यापेक्षा खालच्या थरांतील अशा मानल्या गेलेल्या जातीमधील माणसाकडून शिजवलेले अन्न घेत नाहीत. म्हणजे जातीपातींची एक उतरंड आहे. भारतात शेकडो जाती निर्माण झाल्या आहेत. पण जुन्या धर्मशास्त्राप्रमाणे मात्र चारच वर्ण आहेत (ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र) ब्राह्मण म्हणजे धर्मकर्मे पूजापाठ करणारे; क्षत्रिय वर्ण म्हणजे योद्धे; वैश्य हे व्यापार किंवा शेतीव्यवसाय करणारे व शूद्र हे मुख्यतः कसबी, निमकसबी व्यवसायी व इतर शेतमजूर वगैरे अशी समाज विभागणी होती.

तर ही रचना मुख्यत: वर्गरचना होती. (ह्या विषयावरील अधिक विवेचनाकरिता प्रतिष्ठानचे 'प्राचीन भारतीय समाजव्यवस्थेतील शूद्रांचे स्थान' हे पुस्तक वाचकांनी जरूर पाहावे.) ह्या मुळातल्या वर्गरचनेत जाती व उपजाती ह्यांचा जो उदय झाला तो मुख्यत्वे सर्वसाधारण भारतीय समाजात विविध टोळी-संघांचा, (ट्राईब्स) गणांचा व जमातींचा जो समावेश झाला त्यामुळेच होय. अनेक जातींच्या नावावरून हे लक्षात येते. त्या त्या प्रदेशातील अर्थरचनेतील त्या त्या जातीय गटाच्या आर्थिक स्थानाप्रमाणे त्या जातीचे सामाजिक स्थान टरत गेले आहे. दोन वेगवेगळ्या प्रदेशातील जातीजमातींच्या उतरंडीत, एकाच जातीचे स्थान तेच किंवा सारखेच असेल असे नाही. सामाजिक दर्जातील फरक वाढत गेल्यामुळे जातीमध्ये नवी उपशाखा (उपजात) निर्माण होत गेली व मूळ जातीच्या दोन उपशाखात बेटी व्यवहार बंद झाले. ह्या जातीजमातींच्या उतरंडीच्या सर्वात खालच्या पायरीवर आहेत—अन्न गोळा करून रहाणाऱ्या अवस्थेतील समाज-



समूह (फूड गॅदरर्स) सर्वसाधारण भारतीय समाज धान्योत्पादन [फूड प्रोड्यूसर] असल्यामुळे ह्या फूड गॅदरर्सचा समावेश भिक्षा मागून चोऱ्या करून जगणाऱ्या 'जातीं'मध्ये करण्यात आला. त्यांच्या ह्या सवयींमुळे [व्यवसायामुळे] त्याला ब्रिटिशांनी गुन्हेगार जमातींच्या श्रेणीत समाविष्ट केले. सर्वसाधारणपणे ह्या जमाती स्वत:च्या जमातींच्या परंपरागत मानल्या गेलेल्या नियमाच्या बाहेरील शासनसंस्थेने लादलेले कायदे मानण्यास तयार नसतात. भारतीय समाजात ह्या ज्या फळ्या पडलेल्या आहेत, त्या प्राचीन भारतीय इतिहासाविषयी व संस्कृतीविषयी बरेच काही सांगून जातात. अर्थात् ह्या विषयावरचा अभ्यास पूर्वग्रह न ठेवता केला पाहिजे. काही जातीसमूह हे अगदी खालच्या थराला पोहोचले किंवा राहिले ह्यांचे एक कारण म्हणजे जुन्या किंवा अर्वाचीन काळापर्यंतही त्यांनी धान्योत्पादन जीवनपद्धतीचा किंवा नागर संस्कृतीचा स्वीकार केला नाही. ज्यांना खालील दर्जाच्या जाती मानले जाते, त्या जातीसमूहांत अजूनही टोळीसंघ समाजात [ट्रायबल] प्रचलित असलेली यातुकर्मे व उपचारात्मक प्रकार व समजुती अस्तित्वात आहेत. त्यापेक्षाही वरच्या समाजथरात जगणाऱ्या समाज-विभागात जुन्या धार्मिक समजुती व विविध परंपरांच्या मिश्रणातून निर्माण झालेल्या पुरातन कथांचे व देव-देवतांचे प्राबल्य आहे. त्याहीपेक्षा अधिक वरच्या थरांत त्याच पुरातन कथा व देव ब्राह्मणांनी सोयीनुसार उदात्तीकरण केलेल्या स्वरूपात वर्चस्व गाजवताना आढळून येतात. त्याहीपेक्षा वरच्या समाजथरात ज्यांना 'हिंदु संस्कृती' समजले जाते त्यामध्ये धार्मिक ग्रंथाचे, नियमांचे व आदर्शाचे पालन करण्यात धन्यता मानण्यात येते. देव व दानव ह्यांच्या पुराण कथा व धर्मविधी ह्यांना श्रद्धांची कितीही भावुक वलये चढवलेली असली तरीही त्याचे मूळ स्वरूप हे मागासलेल्या समाजांतील विधींचे व पुरातन कथांचेच आहे. ह्या देशातील ब्राह्मणी संस्कृतीने केलेले एक मुख्य काम म्हणजे प्राचीन काळातील वेगवेगळ्या समूहातील देवदैवते, पुरातन कथा व समजुती ह्यांना एकत्र करून त्यांची अशी काही गुंफण केली की जणू काही एका ऐतिहासिक घटनेतील ती सर्व सुसंबद्ध सूत्रे होती. ह्या प्रक्रियेतून विविध स्वतंत्र समूहांना त्यांनी व्यापक अशा शेती व्यवसायी प्रादेशिक समाज चौकटीत सामावून घेतले. एकमेकांशी प्रत्यक्ष संबंध नसलेल्या विविध समूहांच्या दैवतांना अधिक निश्चित स्वरूप देऊन त्यांना एकत्र आणले. (सिंक्रेटीझम). त्यांच्यात नाती प्रस्थापित केली. पुढे त्यांना एका सर्वाधिकारी देवाच्या दरबारातही बसवले. भारतातल्या महान धर्मनेत्यांनी उद्घोषिलेली विविध तत्त्वज्ञानेही ह्या 'समन्वयीकरणा'च्या प्रक्रियेतूनच निर्माण झाली आहेत. जेव्हा एखादे विशिष्ट तत्त्वज्ञान किंवा विचारधारा निर्माण होई, तेव्हा समाजाचा विकास होण्याकरिता त्याचा उपयोग होत असे. पण पुढे ह्याच तत्त्वज्ञानाचे जेव्हा कठोर धर्मपंथांत रूपांतर होई तेव्हा सामाजिक विकासाला त्याचा अडथळा होत असे. समाजातील वरिष्ठ वर्गांचे व वर्णांचे हितसंबंध जपण्याकरिता तो अडथळा अंधश्रद्धांच्या स्वरूपात जतन केला जाई. त्याचा परिणाम समाज मागासलेला रहाण्यात होई. विविध धर्म किंवा धर्मविचार म्हणजे

इतिहास नव्हे, पण त्या धर्मविचारांचा उदय व अस्त हे इतिहास संशोधनाला उपयुक्त पडणारे 'साहित्य' आहे. भारतीय समाजाचे तर हे वैशिष्ट्यच आहे कीं, ह्या समाजातील महत्त्वाचे फेरबदल हे हिंसात्मक आंदोलनाच्या स्वरूपात होण्याऐवजी धर्मविचार व चौकट ह्यातील फेरबदलांनी सिद्ध झालेले आहेत. भारतातील प्राचीन वाङ्मय हे मुख्यतः 'धर्मविचार व क्रियाकर्मे ह्याचे वर्णन' ह्या स्वरूपाचे आहे. त्या ग्रंथकर्त्यांनी ऐतिहासिक व सामाजिक वस्तुस्थितीबाबत फारसा जिव्हाळा दाखविलेला नाही. इतर साधनांचा वापर करून जमवलेली माहिती उपलब्ध नसेल तर केवळ धर्मग्रंथाच्या आधारे भारतीय समाजाचा इतिहास लिहिणे कठिण आहे.

अर्थात अशा माहितीवर अगदी हास्यास्पद निष्कर्षांनी भरलेला इतिहास अनेकांनी लिहिलेला आहे.

## १.५
## भारतातील गावगाडा

भारतीय समाजातील धार्मिक वर्चस्व, जातीयता, वास्तव दृष्टीकोनाचा संपूर्ण अभाव ह्या वस्तुस्थितीमागच्या कारणांचा शोध घेतला पाहिजे. आपल्या देशात गावगाड्याची व त्याला बांधलेल्या उत्पादन विभाणीची जी पद्धत रूढ झाली, त्यात ह्या दोषाचे रहस्य आहे. भारतीय मानसिकतेत षड्ऋतूंचे चक्र हे सर्वाधिक महत्त्वाचे. त्यामुळे जीवन हे रहाटगाडगे आहे. त्यात बदल होणारच नाही, ही भावना रुजलेली आहे. परदेशी अभ्यासकांना ह्या परिस्थितीमध्येच पूर्वीच्या किंवा भारताच्या अपरिवर्तनीय संस्कृतीचे दर्शन घडते. ख्रिस्तपूर्व १५ शतकात खोदल्या गेलेल्या भारहत् लेण्यात जी बैलगाडी व झोपडी दिसते किंवा इ. सनाच्या २ ऱ्या शतकात खोदल्या गेलेल्या लेण्यांतून जो नांगर व नांगरधारी दिसतो, तोच आजही भारतातल्या अनेक खेड्यात दिसतो. तरीसुद्धा प्राचीन समाजाचा व संस्कृतीचा अभ्यास करताना हे विसरून चालणार नाही की, त्या काळात नांगराचा वापर हे उत्पादन साधनातले फार मोठे पुढे पडलेले पाऊल होते. अन्न गोळा करून किंवा चरावू गुरे घेऊन भटकणाऱ्या टोळ्यात जी समाजव्यवस्था होती, त्यामध्ये ह्या नव्या उत्पादन साधनांनी फार क्रांतिकारक व गुंतागुंतीचे बदल घडवून आणले. आजही आपल्या खेड्यापाड्यांचे एकंदर दृश्य हे आत्यंतिक गरिबी व असहायता ह्यांचेच दृश्य आहे. अनेक खेड्यांत देवळाशिवाय सार्वजनिक अशी इमारत अस्तित्वात नसते. मोठे गाव किंवा ज्या ठिकाणी त्या पंचक्रोशीचा बाजार भरतो अशी गांवे सोडल्यास अनेक खेड्यातून दुकानेही नाहीत. गरजेच्या वस्तू फेरीवाल्यांकडून किंवा आठवड्याच्या बाजारात विकत घेतल्या जातात. उत्पादनाची विक्री ही मध्यस्थामार्फत चालते. आणि अनेक वेळा हा मध्यस्थ गावचा सावकार असतो. ह्या सावकारांची गावच्या अर्थव्यवस्थेवरील पकड व त्यामुळे निर्माण होणारा कर्जबाजारीपणा ह्यावर इलाज करणारी खाजगी वा सरकारी व्यवस्था अजूनही प्रस्थापित झालेली नाही. मोसमी पाऊस संपल्यानंतर हळूहळू पावसाचे



दुर्भिक्ष वाढत जाते. अनेक खेड्यात तर बारा महिने चांगले पिण्याचे पाणीसुद्धा उपलब्ध नसते. भूक आणि रोगराई ही भारतीय जीवनाची अंगेच आहेत.

स्वच्छता व वैद्यकीय मदतीचा अभाव ह्यामुळे असहायतेची भावना प्रबळ झाली आहे. परंपरागत आगतिकतेची भावना हा सामाजिक उत्थानाच्या मार्गातील मोठा अडथळा आहे. **एवढे असले तरीही ह्या मागासलेल्या व दरिद्री अवस्थेतील शेतकऱ्यांनी निर्माण केलेले व त्यांच्याकडून वसूल केले गेलेले अतिरिक्त धान्य व इतर उत्पादन हाच भारतीय नागर जीवनाचा व संस्कृतीचा पाया आहे.**

वर वर पहाता खेड्यात सर्वत्र दारिद्र्य असल्याचे दृश्य दिसते. (नगदी व व्यापारी पिके काढणाऱ्या भागांत आज भांडवलशाहीच्या वाढीमुळे वेगळे दृश्य दिसते) तरीही खेड्यात वर्गभेद आहेत. बहुसंख्य शेतकरी लहान तुकड्याचे मालक आहेत. त्यापैकी काही थोडे स्वतःच्या जमिनीवरील उत्पादनावर निर्वाह करू शकतात. काही सरकारच्या नवीन जमीन-विषयक धोरणांचा व कायद्यांचा फायदा घेऊन 'सधन' शेतकरी झाले आहेत.

अजूनही मोठी व सुपीक शेते स्वतः कसवणूक न करणाऱ्या मालकांकडेच आहेत. कुठलेही खेडे किंवा गाव स्वयंपूर्ण नाही. अगदी आडवाटेला असणाऱ्या खेड्यालासुद्धा कापड विकत घेण्याकरिता किंवा सरकारी कर देण्याकरिता आपला उत्पादित माल विकावा लागतो. तसे म्हटले तर कपडा, लोखंड मीठ, इत्यादी वस्तू मिळवण्याकरिता बहुतेक सर्व खेड्यांना अगदी जुन्या काळातसुद्धा आपल्या वस्तू पंचक्रोशीबाहेर विकाव्या लागत असत. त्यामुळे त्या काळातसुद्धा अगदी थोड्या प्रमाणात का होईना व्यापाराकरिता उत्पादन करावे लागत असेच. आता असे उत्पादन भांडवलदारी अर्थव्यवस्थेशी जोडले गेले आहे. तरीही भारतीय गावगाड्याचे वैशिष्ट्य हे की, अजूनही भारतीय खेडे काही वस्तू सोडल्यास स्वयंपूर्ण रीतीने जगू शकते. लोकसंख्येची वाढ व भारतीय हस्तव्यवसायाचा नाश ह्यामुळे जेव्हा खेड्यातील माणसाला कामाकरिता शहरी जावे लागले व आपल्या कुटुंबाकरिता पैसे पाठवावे लागले तेव्हा खेड्यातील जीवनावर शहराचा प्रभाव प्रत्यक्ष दिसू लागला. त्याअगोदर शहर व खेडे ह्यांचा संबंध फक्त वसुली करणाऱ्या फिरत्या अधिकाऱ्यापुरता असे. भारतातील एकंदर उत्पादनापैकी व्यापाराकरिता केलेल्या उत्पादनाचे प्रमाण (कमोडिटी प्रॉडक्शन) कमीच होते. आजही इतर प्रगत देशांच्या मानाने कमी आहे. (जे उत्पादन स्वतःच्या किंवा कुटुंबांच्या गरजेकरिता वापरले जाते किंवा ज्याची वसुली राजा सरंजामदार किंवा सरकार मोबदला दिल्याशिवाय करते, ते व्यापारी उत्पादन नव्हे. विक्रीकरिता केलेले उत्पादन ते व्यापारी उत्पादन या अर्थाने हा शब्द वापरला आहे) भारतीय खेड्यापाड्यांत धातूंच्या भांड्यांच्या वापराचे प्रमाण इतर प्रगत देशांच्या मानाने अजूनही कमी आहे. मातीची भांडी वापरली जातात तेव्हा कुंभार हवा, नांगर किंवा बैलगाडीच्या धावा करायला लोहार हवा, घरे बांधायला सुतार हवा. ह्या सगळ्या व्यवसायांत खास कसब लागे. गावांतील देवदेवतांची पूजा करण्याकरिता, क्रियाकर्मे करण्याकरिता माणूस हवा. तो ब्राह्मण किंवा पुरोहित असे; पण काही जमाती-

मध्ये व प्रदेशात तो ब्राह्मण असेच असे नाही. केस कापणारा नाभिक, मेलेल्या जनावरांचे कातडे काढणारा ढोर, चामड्याच्या पखाली व वहाणा बनवणारा चांभार, सरकार व गांव ह्यांची विविध सरकारी–बिनसरकारी कामे करणारा महार, अशा विविध गरजा पुरवणाऱ्या व्यावसायिक समूहगटांच्या जाती बनल्या. मध्ययुगातील युरोपमध्ये वेगवेगळ्या कारागिरांच्या श्रेणी होत्या त्याचेच एक पण नि:संशय रीत्या वेगळे व वैशिष्ट्यपूर्ण स्वरूप म्हणजे 'जाती'. मध्ययुगीन भारतीय समाजातील अर्थव्यवस्थेतील सर्वात जटील प्रश्न होता अशा विविध कसबी-निमकसबी कारागिरांकडून गावाकरिता उत्पादन व सेवा मिळविण्याचा. जाती व्यवस्थेमुळे गावातील बहुसंख्य शेतकऱ्यांपासून आणि एकमेकांपासूनसुद्धा विभक्तपणे नांदणारे, तरीसुद्धा एकत्र राहणारे हे विविध समूह म्हणजे जाती. एका बाजूने शेतकरी ही विविध कामे करू शकत नव्हता तर कारागीर स्वत:च्या जातीबाहेर विवाहसंबंध जोडू शकत नव्हते. त्याचबरोबर सर्वसाधारणपणे छोटे खेडे विविध तऱ्हेच्या कसबी कारागिरांचे एखाददुसरेच कुटुंब पोसू शकत होते.

सुतार किंवा लोहार ह्यांनी स्वतंत्र वसाहती करून मुख्यतः विक्रीसाठी उत्पादन करणे मध्ययुगात अशक्य झाले. प्राचीन भारतीय इतिहासाच्या विशिष्ट कालखंडात मात्र अशा वसाहती होऊन गेल्या आहेत. त्या का व कशा मोडल्या व गावगाडा कसा निर्माण झाला ह्यांचा विचार नंतर ह्या पुस्तकात करू.

ह्या कसबी कामगारांचे उत्पादन विकत घेणे किंवा त्या त्यावेळी कामाचा मोबदला देणे, हे मागणी अनियमित असल्यामुळे शक्य नव्हते. त्याची सेवा चालू ठेवण्याकरिता बलुतेदारीची पद्धत उदयास आली. गावातील धान्योत्पादनाचा ठराविक हिस्सा ह्या सेवेकरिता ठरवण्यात आला व त्यांना सामाजिक चौकटीत शाश्वती देण्यात आली. गतिशून्य गावगाड्याच्या अर्थरचनेचे रहस्य हे बलुतेदार पद्धतीत आहे. अजूनही ह्या पद्धतीचे अवशेष अनेक खेड्यापाड्यात आढळून येतात. कसबी कामाचा मोबदला पैशात देण्याची पद्धत आता अधिकाधिक रूढ होत आहे, वस्तूंच्या रूपात (खास करून धान्यात) मोबदला देण्याची पद्धत नष्ट होत आहे. आता वाहतूक व्यवस्था सुधारल्यामुळे नाभिकसुद्धा गावोगावी फिरू लागला आहे. लोहार हा अधिक व्यापक भागाकरिता काम करू शकतो व आपला माल बाजारात विकू शकतो. अनेक ठिकाणी पत्र्याच्या वा लोखंडाच्या भांड्यांनी मातीच्या भांड्यांची जागा घेतली आहे व ह्या भांड्यांकरिता पैशाच्या रूपात मोबदला मागितला जातो. **युरोप व इतर देशांत कसबी कामांची उत्क्रांती पुढे शास्त्र व तंत्रज्ञानात झाली. भारतीय समाजव्यवस्थेत मात्र अशी कसबाची कामे करणाऱ्या जातींना समाजावर असलेल्या परावलंबित्वामुळे नीच स्थान प्राप्त झाले. वरिष्ठ समजल्या जाणाऱ्या वर्ग-वर्णांना कसब किंवा अंगमेहनत ह्याबद्दल त्यामुळे वाटणारा तिरस्कार ह्या कारणानेसुद्धा पाश्चिमात्य देशाप्रमाणे भारतांत ह्या कसबांची परिणती शास्त्र-विज्ञानतंत्र ह्यांच्या वृद्धीत झाली नाही.**



भारतातील जंगलात अजूनही कातकरी [महाराष्ट्र] भिल्ल [मध्यप्रदेश] ओरेऑन [बिहार] अशा अनेक आदिवासी जमाती आहेत. ह्या जमाती आता कुठे अन्न गोळा करून जगण्याच्या (फूड गॅदरिंग स्टेज ऑफ सोसायटी) पद्धतीतून बाहेर पडत आहेत. जंगले नष्ट होण्यामुळे, रोगराई व उपासमार ह्यामुळे आणि नागर संस्कृतीच्या आक्रमणामुळे अनेक जमाती नष्टही झाल्या आहेत, तर काही नागर संस्कृती असणाऱ्या समाजात सामावल्या गेल्या आहेत. कधी कधी हे आदिवासी जवळपासच्या गावांमध्ये शेतीच्या कामाकरिता जातात. तेथे त्यांना अत्यंत तुटपुंज्या मोबदल्यावर राबवले जाते. बहुतेक वेळा हा मोबदला धान्याच्या स्वरूपात दिला जातो. काही आदिवासी लहानसहान पशूपक्ष्यांची शिकार करून जगतात. कंदमुळे, साप, उंदीर व माकडे मारून खाणारे आदिवासीसुद्धा आहेत. जादूटोणा व मंत्रतंत्र ह्यांचेही प्रस्थ अनेक आदिवासी जमातींत आहे. एखाद्या क्रियाकर्मांकरिता किंवा इच्छा साध्य होण्याकरिता मानवी बळी दिल्याच्या आरोपावरून आदिवासींची धरपकड केल्याची बातमी वर्तमानपत्रांतून अजूनही वाचावयास मिळते. काही ठिकाणी आदिवासींची दगडधोंड्यांच्या स्वरूपातली दैवते व शेतकऱ्यांची ग्रामदैवते ह्यांत साधर्म्य आढळून येते. दोन्ही समाज एकमेकांच्या दैवतांची आराधना करताना आढळून येतात. अनेक वेळा ग्रामदेवतांच्या उत्सवाच्या वेळी ठिकठिकाणचे लोक कुलाचार करण्याकरिता एकत्र येतात. त्याचे कारण त्यांचे मूळ दैवत किंवा कूळ एक असते. अनेक ग्रामदेवतांच्या नावावरून त्यांचे मूळ आदिवासी स्वरूप काय असावे, हेही कळू शकते. कधी कधी एखाद्या जातीचे व आदिवासी जमातीचे नावसुद्धा एकच असते, पण त्यांच्यात बेटी व्यवहार होत नाही, कारण ग्रामवासी झालेले मूळ आदिवासी हे सामाजिक दृष्ट्या वरच्या स्तरात गेलेले असतात, त्यांच्या खाण्यापिण्याच्या रहाण्याच्या पद्धतीत फरक पडलेला असतो. ग्रामवासींना आदिवासींच्या मानाने अधिक नियमितपणे अन्न मिळते. तरी हे दोन्ही गट एकाच मूळ समूहातून उद्भवलेले आहेत, असे दाखवणारे काही पुरावे शिल्लक राहतात. एकाच मातृदेवतेची किंवा कुळदैवतेची समान पद्धतीने पूजा—हा असा एक पुरावा होय. ग्रामवासी ज्या समाजात मिसळतात त्या समाजातील इतर देवदेवताचीसुद्धा पूजा करतात. अगदी प्राथमिक अवस्थेतील देवांच्या मानाने असे देव एक पायरी वरचढसुद्धा असू शकतात. कुठे शेतकरी क्षेत्रपाल समजल्या जाणाऱ्या नागाची किंवा त्याच्या प्रतिमेची पूजा करतात. तर मूळ पूर्वजांची पूजा युग्ममूर्तींची पूजा करून केली जाते. वंशपरंपरेने कसल्या जाणाऱ्या जमिनीच्या एखाद्या कोपऱ्यात हे वंशज कुळाचे मूळ पुरुष व स्त्री ह्यांची युग्मे देवदेवतांच्या स्वरूपात कल्पून त्याची पूजा करतात.

म्हसोबा हा देव महाराष्ट्रातल्या शेतकऱ्यांचा देव. पण प्रत्येक ठिकाणी त्या त्या ठिकाणच्या शेतकऱ्यांनी त्याचे स्वरूप आपल्या कल्पनेप्रमाणे वेगळे ठेवले आहे. पेरणी नांगरणी, कापणी इत्यादी हंगामाला शेतकरी अनेक लहानसहान दैवतांची पूजा करतात. वेताळ हा अर्धा राक्षस आहे. अक्राळविक्राळ आहे. तरीही देव मानला गेला आहे. अधिक वरच्या स्तरावर ब्राह्मणांना मान्य असे शिव, विष्णु त्याचे राम, कृष्ण इत्यादी अवतार हे देव व त्यांच्या बायका देवता मानल्या गेल्या आहेत. ग्रामवासी त्यांचीही पूजा

करतात. कधी कधी स्थानिक ग्रामदैवते हे उच्च स्तरांवरील ब्राह्मणी देवदेवींची अवताररूपे असल्याचा दावा केला जातो. उदा. खंडोबा. हा शंकराचा अवतार असल्याचे सांगितले जाते. अनेक जुन्या मातदेवता पार्वतीचीच रूपे असल्याचे सांगितले जाते. ह्या सर्व चर्चेवरून हे दिसून येते की, आदिवासी जमातींचा नागर समाजात समावेश होत असता त्यांची जुनी दैवते नष्ट करण्यात आली नाहीत, तर त्यांना धर्माच्या देव्हाऱ्यात सामावून घेतले गेले, ह्या पद्धतीने समान दुवा नसणाऱ्या अनेक जमातींना एकत्र आणून नवा नागर समाज निर्माण केला गेला.

भारताच्या सामाजिक विकासाच्या इतिहासातील ही प्रक्रिया महत्त्वाची आहे. त्यामुळे दोन महत्त्वाचे परिणाम घडून आले. एक असा की, पारध, पशुपालन, प्राथमिक शेती अशा विविध अवस्थेतील जाती-जमातींना त्यामुळे नागर संस्कृतीपर्यंत मजल मारता आली. त्याबरोबर ह्या विविध समाजाची स्वायत्तता टिकल्यामुळे त्या अवस्थेतील जुन्या अंधश्रद्धांना धक्का लागू शकत नाही. भारतीय समाज मागासलेला राहिला.

भारतातील ग्रामवासी हा ऋतुचक्रात जीवन जगतो. खेड्यांच्या परंपरेचा आधार घेऊन अभ्यास करण्यातील सर्वांत मोठी अडचण म्हणजे घटना क्रमांच्या नोंदीचा अभाव. घटना पन्नास वर्षांपूर्वी घडलेली असो की पंधराशे वर्षांपूर्वी, ग्रामवासीयाला त्याचे महत्त्व सारखेच. भारतातील चार युगांची कल्पना ही चार मुख्य ऋतूंच्या आवर्तनाशी मिळती जुळती आहे. केव्हा तरी जगबूड होणार व पुन्हा नवे चक्र सुरू होणार ही त्यांची जगाच्या विकासाबद्दलची कल्पना. पावसाळ्यानंतर जे घडते त्याच्याशी साधारणपणे हे मिळतेजुळते आहे. प्रत्येक वर्ष हे सारखेच असते, फरक इतकाच की कधी कधी धान्याची पैदास चांगली असते तर कधी कधी दुष्काळ व महामारी असते. शेतकऱ्यांत शिक्षणाचा अभाव असल्यामुळे घटनांची नोंद होत नाही. थोडेफार शिक्षण घेतले तरी त्याचा प्रत्यक्षात फारसा उपयोग होत नाही. त्यामुळे तो पुन्हा पुन्हा अज्ञानाच्या अंधकारात बुडून जातो. पुस्तके, वर्तमानपत्रे किंवा इतर वाचन सर्वसाधारण ग्रामवासियांच्या आवाक्याबाहेर राहिले आहे. ग्रामवासियांच्या परंपरा शोधताना काळजीपूर्वक विचार केला पाहिजे. समाजाच्या वरवरच्या व्यवहारात बदल झाले तरी गावागवांतून जुन्या खास प्रथा, क्रियाकर्मे व रिवाज शिल्लक आहेत. अनेक ठिकाणी तेथील सरंजामदार किंवा पुरोहित वर्ग ह्यांनी जुन्या प्रथांवर नवी रंगरंगोटी करून त्या आपल्या हिताकरिता राबवण्याकरिता जतन करून ठेवल्या आहेत. (उदाहरणार्थ : सत्यनारायण पूजा) आपल्या व्याख्येनुसार ज्यांना इतिहासाचा अभ्यास करावयाचा असेल, त्यांना आवश्यक असा तपशील अशा अनेक स्वरूपात खेड्यापाड्यात शिल्लक आहे. फक्त अभ्यासकाला तशी दृष्टी व निरीक्षणशक्ती असायला हवी.

आतापर्यंत आपण जी भूमिका मांडली, जी प्रमेये मांडली, त्याचा आढावा घेणे आवश्यक आहे. ह्या प्रकरणात प्रथम आपण असे सांगितले की, ह्या देशांतला सर्वांत प्रभावी वर्ग हा भांडवलदार वर्ग आहे. आणि ह्या देशातल्या शहरी संस्कृतीवर भांडवलदारी



उत्पादन व्यवस्था आणणाऱ्या परदेशी संस्कृतीचा छाप आहे. दुसरी गोष्ट आपण मांडली ती ही की, देशांत, खास करून खेड्यापाड्यांतून धार्मिक आचारविचार, संस्कार, संस्था, प्रथा, रीतीरिवाज इत्यादीतून जुन्या आदिम व प्राचीन जीवनपद्धतीचा ठसा अजूनही आढळून येतो. ह्या जीवनपद्धतीचे अनेक अवशेष अजूनही खेड्यापाड्यांत व प्रत्यक्ष धर्मव्यवस्थेत शिल्लक आहेत. माझे पहिले विधान सर्वसाधारणपणे मान्य व्हावे. अर्थात देशाभिमानापायी काहीजण भारताच्या आधुनिक संस्कृतीमध्ये परकीय आक्रमकांनी जी भर टाकली आहे ती अमान्य करतील. माझे दुसरे जे विधान आहे त्यामुळे काही मध्यमवर्गीय विचारवंतांना देशाचा अपमान केला असल्यासारखे किंवा स्वाभिमानाला धक्का बसल्यासारखे वाटेल.

वास्तविक आदिम संस्कृतीमध्ये लज्जास्पद व हास्यास्पद असे काही नाही. ह्या संस्कृतीवर जेव्हा सरंजामदारी किंवा भांडवलदारी पद्धतीचा दुष्ट प्रभाव पडतो आणि त्याचे विकृतीकरण होते तेव्हा त्याचे मूळ स्वरूप भ्रष्ट होते. प्राचीन भारताचा विकास एका परीने जगाच्या इतर देशांच्या विकासाच्या मानाने अधिक सुसंस्कृतपणे झालेला आहे. जुन्या आदिम प्रथा, दैवते व श्रद्धा ह्यांचा बळाचा व हिंसेचा वापर करून मोडून टाकण्याऐवजी त्यांचा संयोग किंवा समन्वय (सिंक्रेटीझम) करण्यात आला. त्याना सामावून घेण्यात आले. युरोप किंवा अमेरिकेच्या धर्तीवर भारताचा विकास झाला असता तर क्रौर्य व हिंसा ह्यांचा आतोनात वापर करावा लागला असता.

ह्या चर्चेवरून असे दिसून येते की भारतीय सामाजिक व सांस्कृतिक इतिहासाची खास वैशिष्ट्ये आहेत. हे पुस्तक वाचताना गैरसमज होऊ नये ह्याकरिता ह्या वैशिष्ट्यांचा ओझरता उल्लेख आताच केला पाहिजे. जुन्या ऐतिहासिक नोंदी; सरकार दरबारची दप्तरे, महत्त्वाच्या लढायांच्या तारखा, राजेरजवाड्यांच्या किंवा महत्त्वाच्या व्यक्तींच्या सनावळी ह्या दृष्टीने पाहिले तर प्राचीन भारताचा इतिहास फारसा उपलब्ध नाही. एखाद्या राजाच्या किंवा महत्त्वाच्या माणसाच्या बाबतीतले चरित्र लिहिले गेले असेल तर ते कथा कादंबरी म्हणून वाचावे. त्यावर संपूर्ण विश्वास ठेवता येत नाही. त्याचबरोबर दुसऱ्या टोकाचा आणखी एक गैरसमज होण्याची शक्यता आहे. मार्क्सवादी अभ्यासकांच्या मते मानवी समाज हा खाली दिलेल्या सामाजिक अवस्थांतून गेलेला आहे. आदिम साम्यवाद; पितृप्रधान कुटुंबपद्धत किंवा आशियाही उत्पादन पद्धत (अनिश्चित) ग्रीक किंवा रोमन पद्धतीची गुलामगिरी; सरंजामदारी; भांडवलदारी आणि काही देशात आता समाजवाद. भारतीय इतिहास हा अशा ठराविक चाकोरीत यांत्रिकपणे बसवता येणार नाही. पहिली गोष्ट अशी की, ह्या खंडप्राय देशाचे सर्व विभाग एकाच वेळी ऐतिहासिक दृष्ट्या एकाच सामाजिक अवस्थेत नव्हते. त्याशिवाय असेही आढळून येते की, सर्वसाधारण समाज नव्या ऐतिहासिक अवस्थेत गेल्यानंतरही अनेक ठिकाणी जुन्या उत्पादनपद्धती व त्यातून निर्माण होणाऱ्या प्रथा-पद्धती, संस्कार, धर्मव्यवहाराचा आणि रीतीभातीचा ढाचा शिल्लक राहिलेला आहे. भारतातील एकंदर समाजाची प्रगती होत असता काही

विभाग जुन्यालाच कवटाळून बसले. सामाजिक विकासाचा विचार करताना त्या त्या काळातील मुख्य मोठ्या विभागात प्रचलित असलेल्या, सर्वात पुढारलेल्या उत्पादन-पद्धतीवर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे. त्याशिवाय भारतीय इतिहासाच्या कुठल्याही कालखंडात ग्रीक-रोमन पद्धतीची गुलामगिरीची प्रथा रूढ झाल्याचे दिसत नाही. अर्थात अगदी जुन्या काळापासून ते ह्या शतकाच्या मध्यापर्यंत भारतात 'दास' होते. हे पुस्तक लिहीत असतानाच केरळमध्ये काही आदिवासींची विक्री झाल्याची बातमी आली आहे. मला सांगायचे आहे ते हे : ग्रीक किंवा रोमन गुलाम पद्धतीमध्ये श्रमशक्तीच्या पुरवठ्याचे प्रमुख साधन म्हणून गुलामगिरीचा जसा उपयोग केला गेला तसे भारतात कोठल्याही कालखंडात झाले नाही.

ज्यांच्या श्रमशक्तीतून निघालेले अतिरिक्त उत्पादन हिसकावून घेता येते अशा गुलामांची जागा वर्णव्यवस्थेतील शूद्रांच्या वाट्याला आली; तरीही 'शूद्र' हे त्याच अर्थाने शरीरासह विकले गेलेले गुलाम होते, असे म्हणता येणार नाही. भारतातील संरजामदारी समाजव्यवस्थेत गुलामांना जे महत्त्व प्राप्त झाले त्याचे कारण काही गुलाम हे राजाचे सैनिक व अधिकारी होते. त्यामुळे राजाला आपल्या सरदारांवर अवलंबून रहाण्याची गरज कमी होत असे. राजाच्या पदरी जे गुलाम सैनिक असत त्यांचा सरदार-दरकदारांना धोका वाटे, ही काही ठराविक चाकोरीतील गुलामगिरी होऊ शकत नाही. भारतीय संरजामदारव्यवस्थेत असे गुलाम सरदार झालेले आहेत. संपत्ती बाळगून समाजात प्रतिष्ठा पावलेले आहेत. उदाहरणार्थ दिल्लीचे सुरुवातीचे राज्यकर्ते आणि अहमदनगरच्या बहामनी राज्यांचे संस्थापक हे गुलाम घराण्यातून आलेले आहेत. भारतातील सरंजामदारी व्यवस्थेचीसुद्धा खास वैशिष्टये आहेत. भारतामध्येही शिक्षा केल्यामुळे झालेले; घरकामाला बांधलेले; नाचगाणी करून करमणूक करणारे, जनानखान्यात असणारे; असे दास-दासींचे प्रकार सरंजामदारीच्या आधीच्या काळात आणि त्यानंतरही होते. परंतु शिक्षा म्हणून ज्यांना दास केले जाई असे लोक सोडले तर बाकीच्या दासांना पगारी नोकरांपेक्षा अधिक चांगली वागणूक मिळे; कारण त्यांना विकत घेण्याकरिता पैसे द्यावे लागत असत. युरोप-मधल्या गुलामगिरीच्या परिस्थितीशी सर्वस्वी विरोधी अशी ही परिस्थिती आहे. युरोपमधील सरंजामदारी अवस्थेत गुलामगिरी नाहीशी झाली. ब्राझीलमध्ये गुलामगिरीची अवस्था सरंजामदारीच्या अवस्थेअगोदर आली नाही. अमेरिकेतील गुलामगिरी पद्धत सरंजामदारी अवस्थेशिवायच आली. (सरंजामदारी अवस्था अशी अमेरिकेत अवतर लीच नाही) कापसाच्या मळ्यांवर (मोठ्या शेतावर) भांडवलदारी पद्धतीने शेती होई. तेथे काम करण्याकरिता शेतमजुराऐवजी गुलामांना आफ्रिकेतून आणण्यात आले. शंभर वर्षांपूर्वी रक्तपाती युद्धानंतर ही गुलामगिरी नष्ट करण्यात आली. त्याचे पडसाद अमे-रिकेसारख्या सर्वात प्रगत अशा भांडवलदारी देशाच्या दक्षिण भागांत अजूनही उमटत आहेत. भारताच्या सामाजिक व सांस्कृतिक इतिहासाबद्दल मी जे मांडीत आहे त्यामागे माझा स्वत:चा काही सिद्धांत मांडण्याचा केवळ अट्टाहास आहे, असे नाही. इतिहासाची



एक व्याख्या मी स्वीकारली आहे. परिशिलनाची पद्धत अंगिकारलेली आहे. कारण इतर पद्धती खराखुरा इतिहास समजून घेण्याच्या दृष्टीने निरुपयोगी आहेत. असे अनुभवाने सिद्ध झाले आहे. ह्यानंतरच्या प्रकरणांत मी जो इतिहास लिहिला आहे, त्याचे वर्तमान-काळातील समाजव्यवस्थेशी नाते आहे.

**इतिहासाच्या अभ्यासकाने भूतकाळासंबंधीच्या रोमांचकारक कल्प-नांच्या प्रेमात पडू नये की भूतकाळाला नाकारून त्यातून मुक्त होण्याचा यत्न करू नये. वर्तमानकाळाचा खरा अर्थ समजून घेण्याची गुरुकिल्ली ह्या दृष्टीने भूतकाळाचे मर्म त्याने समजवून घेण्याचा यत्न केला पाहिजे.** वर्तमानकाळातील सामाजिक प्रश्नांचा मूलभूत अर्थ समजण्याची कुवत जेव्हा इतिहास-कारात येते तेव्हाच त्याला खरा इतिहास लिहिता येतो. ऐतिहासिक आकलनाच्या संदर्भात वर्तमानकाळाचे आकलन जसे करावे, त्याचप्रमाणे इतिहासाचे आकलन वर्तमान-काळाच्या संदर्भात करावे. इतिहासकाराचे खरे कार्य हे भूतकाळ व वर्तमानकाळ ह्यातला दुवा प्रस्थापित करणे व दोहोंबद्दल मर्मग्राही विवेचन करणे, हे आहे.

अशा तऱ्हेने इतिहास लिहिण्याची तांत्रिक पात्रता किंवा पुरेशी कुवत माझ्यात नसलेही किंवा दुसऱ्या एखाद्या कारणाकरिता एखाद्या वाचकाला ह्या ग्रंथातील विवेचन समाधानकारक वाटणार नाही. पण तरीसुद्धा हे पुस्तक वाचायला घेताना आपण सर्व-साधारणपणे कुठली अपेक्षा करावी, हे त्याला माहीत असावे. ह्या पुस्तकांत खालील सामाजिक व सांस्कृतिक अवस्थांचा थोडक्यात विचार करण्यात येईल, भारतातील समाजाची आदिम व टोळी-संघप्रधान भटकी व निमभटकी अवस्था; सिंधू संस्कृती व त्या सिंधू संस्कृतीचा शेवट करणारे आर्यांचे आक्रमण; वर्ण, जातीव्यवस्थेचा उदय व त्या व्यवस्थेच्या जोरावर लोखंड आणि नांगर ह्यांच्या साह्याने आर्यांनी गंगेच्या खोऱ्यात केलेली वस्ती, बौद्धधर्म व मगध आणि कोसल सर्वभौम सत्तांचा उदय, धान्योत्पादन व ग्रामसंस्था ह्यांच्या पायावर मौर्यांनी उभारलेले साम्राज्य, त्या साम्राज्याचा अस्त, दक्षिणेककडील राजसत्तांचा विकास; सरंजामदारीच्या उदयाची पार्श्वभूमी आणि बुद्धधर्माचा अस्त, असा मागोवा घेतला जाईल. साधारणपणे इतिहासाच्या ह्या कालखंडाला भारताच्या प्राचीन संस्कृतीचा कालखंड म्हणता येईल. कारण त्यानंतर मध्ययुगाला सुरुवात होते. मुसलमानी आक्रमणाचा भाग येतो.

* * *

| दोन |

# प्राग् ऐतिहासिक काळ व प्राथमिक समाजजीवन

## २·१
## सुवर्णयुग!

' एका परिपूर्ण सत्ययुगातून माणसाचा ऱ्हास कसा झाला. ह्याबद्दलच्या कथा सर्व देशांत व सर्व समाजात प्रचलित आहेत. हिंदुधर्माप्रमाणे सध्याचे युग हे कलीयुग मानतात. ह्या युगापूर्वी तीन युगे झाली असे मानतात. सर्वसाधारण समजूत अशी : पहिले युग म्हणजे सत्ययुग (किंवा कृतयुग) ते आदर्श होते. त्या युगात माणसे नि:स्वार्थी होती. त्यांना व्याधी किंवा दु:ख माहीत नव्हते. त्यांना श्रम करायला लागत नव्हते, कारण पृथ्वी सुजलाम् सुफलाम् होती. माणसाच्या गरजा पुरवीत होती. माणसे साधी, सरळ व सद्‌गुणी होती; आणि हजारो वर्षे जगत होती. पण पुढे माणसांत स्वार्थ निपजला. ते खाजगी संपत्ती बाळगू लागले. हाव वाढली तसे संपत्तीच्या मागे लागून ते संपत्तीचा संचय करू लागले. त्यामुळे अवनती होत होत त्रेतायुग, द्वापारयुग आणि कलीयुग आले. कालानुक्रमाने नंतर येणारे प्रत्येक युग हे अगोदरच्या युगापेक्षा अधिक भ्रष्ट ठरते. आयुर्मर्यादा कमी झाली. रोगराई, गरीबी, लढाया, भूक ह्यांनी मानवी जीवनाला ग्रासून टाकले. कारण का, तर म्हणे माणूस भ्रष्ट झाला. बुद्ध व जैन धर्मीयांच्या जुन्या धर्मग्रंथातसुद्धा अशाच तऱ्हेच्या कल्पना दिसून येतात. त्यानंतरच्या ब्राह्मण धर्मग्रंथात मन्वंतराची कल्पना मांडली आहे. त्या कल्पनेप्रमाणे कलीयुगाचा शेवट 'प्रलयात' होणार आणि त्यानंतर ही पृथ्वी पुन्हा उद्धरली जाणार व पुन्हा सत्ययुग अवतरणार--अर्थात परत सर्व ऱ्हास व जगबूड होणारच. भूतकाळात अशी अनेक मन्वंतरे होऊन गेली आणि भविष्यात होणार, अशी कल्पना मांडण्यात आली आहे. ऋतुचक्राचा तोच तोच फेरा होत असल्याने भारतीय ग्रामजीवनात जी भावना निर्माण केली आहे, त्याचा आविष्कार म्हणजेच, कालचक्र हे रहाटगाडग्यासारखे फिरणारे, पण न बदलणारे आहे. ऑक्टोबर महिन्यातील सुगीच्या हंगामानंतर थंड हवेचे, उत्साहाचे व उल्हासाचे दिवस येतात. नंतर अन्नधान्याची कमतरता भासू लागते. उन्हाळा येतो. जमीन तापते आणि कडक उन्हामध्ये पराकाष्ठेचे श्रम करून पेरणी करावी लागते. त्यानंतर पाऊस कोसळतो; सर्व जमीन पाण्याखाली जाते. त्यातून पुन्हा धान्य उगवते, जमीन फुलते आणि पुन्हा तेच चक्र सुरू होते.

सत्ययुग किंवा सुवर्णयुगाची कल्पना लोकमानसात कितीही खोलवर रुजलेली असली तरीही इतिहासाच्या कुठल्याही कालखंडात हे सुवर्णयुग प्रत्यक्षात अवतरले नव्हते हे आपण पुराव्यानिशी सिद्ध करू शकतो. ख्रिस्तपूर्व २५ वे शतकापासूनचे ऐतिहासिक दाखले भारतात जरी उपलब्ध नसले तरी भारताबाहेर उपलब्ध आहेत. त्यापूर्वीच्याही काळातील मानवी जीवनपद्धतीचा अंदाज आपण ऐतिहासिक नोंदी व उत्खननात आढळणारे विविध पुरावे यांच्यावरून करू शकतो. भूगर्भाचे जेव्हा उत्खनन करण्यांत येते तेव्हा भूगर्भात वेगवेगळे विषम (अनुईव्हन) थर दिसून येतात. अधिक खालचे थर हे अधिक जुन्या काळचे असतात. त्यावरून भूतकाळाचा संदर्भ स्पष्टपणे लागू शकतो. ह्या थरात मानवी समाजाच्या जीवनपद्धतीचे पुरावे मिळतात. हे पुरावे कधी माणसांच्या किंवा जनावरांच्या हाडांच्या किंवा कवटीच्या किंवा दातांच्या स्वरूपात असतात. अगदी एखादा दातसुद्धा त्या माणसाच्या शरीररचनेबद्दल बरेच काही सांगू शकतो. ज्या जनावरांची त्या त्या काळात माणसे शिकार करीत किंवा पालन करीत त्यांची हाडे माणसांच्या हाडाच्या आसपास मिळतात. ज्या थरात हे पुरावे मिळतात, त्यावरून घोड्याच्या अगोदर कित्येक शतके माणसे कुत्र्याचे पालन करू लागली हे सिद्ध करता येते. आणि त्या दोहोच्या मधल्या काळात खिल्लारे व शेळ्यामेंढया ह्यांचे पालन ते करू लागले, हे दिसून येते. मातीची भांडी, दगडी हत्यारे, धातूच्या वस्तू ह्या सर्व चिजा माणसांनी बनवल्या आहेत. त्याना हस्तोत्पादित वस्तू (आर्टिफॅक्टस) म्हणतात. इजिप्तसारख्या कोरड्या हवेच्या प्रदेशांत लाकडी साधने, हाडे, दात, टोपल्या, लोकर, रेशीम ह्यांची वस्त्रे; धान्ये; वल्कलांवर काढलेली व गुहेत चितारलेली चित्रे वगैरे चिजा उत्खननात आढळतात. ज्या थरांत ह्या वस्तू सापडतात त्यावरून ह्या वस्तूंचे उत्पादन मानवाने कोणत्या क्रमाने सुरू केले हे सांगता येते. उत्पादित धान्याला 'आर्टिफॅक्टस' म्हणत नाहीत तरीही धान्योत्पादन हे मातीच्या भाड्यांप्रमाणे प्रदीर्घ काळ केलेल्या मानवी प्रयत्नाचे व हजारो वर्षांच्या अनुभवाचे फलित आहे. वेगवेगळ्या नैसर्गिक गवतातून जास्तीत जास्त अन्नसत्व असलेल्या गवताच्या बिया धान्योत्पादन करण्याकरिता निवडल्या गेल्या. जर मानवी जीवन जगबुडीमध्ये संपुष्टात आले असते तर उत्पादनाकरिता वापरण्यात येणाऱ्या धान्याच्या सर्व जाती नष्ट झाल्या असत्या व त्या जागी रानटी गवते वाढली नसती. असो.

भूगर्भातील विविध स्तरांना वर सांगितल्याप्रमाणे निश्चित कालानुक्रम आहे. त्या स्तरांतील फ्लोरीनचे प्रमाण, कोळसा, चुंबकीय थर, ह्यांचा वैज्ञानिक पद्धतीने अभ्यास केल्यास उत्खननामध्ये सापडलेल्या निरनिराळ्या वस्तूंचा काळ तज्ज्ञांना निश्चित करता येतो.

अशा रीतीने जेव्हा आपण भूतकाळाचा शोध घेत जातो व त्याची संगती लावतो

तेव्हा आपण शेकडो शतके (बऱ्याच वेळा उडया मारत मारत) मागे जातो आणि शेवटी माकडापासून मानवी अवस्थेला जेमतेम पोहचलेल्या 'जावा' माणसापर्यंत; 'पेकिंग' माणसापर्यंत किंवा त्याहीपेक्षा मागील आदिमानवी काळांतील आफ्रिकेत मिळालेल्या आदिमानवी कवटी (प्रो कॉन्सल स्कल) पर्यंत पोहोचतो.

त्यानंतर आपण पुरातत्त्व शास्त्राच्या कक्षेतून बाहेर पडून भूगर्भशास्त्राच्या कक्षेत प्रवेश करतो. आदिम काळाच्या पडद्यामागे जाऊन जीवोत्पत्ती शास्त्राच्या क्षेत्रात प्रवेश करतो. पण ह्यामध्ये कुठेही तथाकथित सुवर्णयुगाचा पुरावा मिळत नाही. माणूस अगदी सतत आणि सरळ रेषेने प्रगती करीत आला आहे, असे मुळीच नाही, पण एकंदरीत त्याचे पाऊल प्रगतिपथावरच पडलेले आहे. अगदी पाशवी अवस्थेपासून त्याने अद्ययावत् उत्पादनसाधनांची निर्मिती व वापर करण्यापर्यंत मजल मारलेली आहे. आपली संख्या, संस्कृती व कर्तबगारी ह्यांच्या जोरावर पृथ्वीवर मानवाने वर्चस्व प्रस्थापित केले आहे. मात्र अद्याप त्याला मानवी जीवनावर ताबा मिळवता आलेला नाही. जुन्या अश्मयुगांतील माणसाची हाडे आज उकरली असता दिसून येते ते हे की, अती प्राचीन काळात तो हजारो वर्षे जगत तर नव्हताच, पण चाळीस वर्षे जगणेसुद्धा त्याला कठिण होते. तो आजच्या पेक्षा जास्त सशक्त तर नव्हताच उलट अधिक रोगग्रस्त होता. **सत्ययुग किंवा सुवर्णयुग हे भूतकाळात कधीही नव्हते ते अवतरणार आहे माणसांच्य भविष्यकाळात.**

## प्राग् ऐतिहासिक काळातील प्राथमिक जीवन

उत्खननात मिळालेल्या नुसत्या पुराव्यांवरून प्राग् ऐतिहासिक काळातल्या माणसांच्या व त्या समूहांच्या जगण्याच्या पद्धतींचा पुरेसा सुगावा लागत नाही. त्या जीवनपद्धतीचे पुरेसे चित्र उभे करावयाचे असेल तर सुधारलेल्या प्रगत जगापासून दूर रहाणाऱ्या काहीशा प्राथमिक अवस्थेत जगणाऱ्या विविध आदिवासी जमातींच्या जीवनाचा तौलनिक अभ्यास करणे जरूर आहे. ह्या अभ्यासावरून 'कुठली साधने कशी तयार केली गेली', 'कशी वापरली गेली,' ती साधने वापरणारा माणूस व समाज कशा तऱ्हेने जगत होता, ह्याचा हळूहळू उमज पडत जातो. त्या साधनांवरून त्या काळच्या सामाजिक रचनेबद्दल निष्कर्ष काढता येतात. हे निष्कर्ष अगदी स्पष्ट असतात असे नाही. ऑस्ट्रेलियातील किंवा ब्राझीलमधील आदिवासी जमातींचा आपल्याला अभ्यास करता येतो. त्याचाच अर्थ असा की, इतर समाजांशी त्यांचा काही ना काही संबंध साधला गेला आहे. असा कुठलाही संबंध हा नवा बदल केल्याशिवाय रहात नाही. त्याशिवाय हेही लक्षात ठेवले पाहिजे की, कुठलाही मानवी समाज हा अनंत काळापर्यंत त्याच स्थितीत राहू शकत नाही. एकतर तो अधिक गतिमान असे नवे रूप धारण करतो किंवा नष्ट होतो. आपण ज्या प्राग् ऐतिहासिक मानवसमूहांचा विचार करू इच्छीत आहोत, ते ह्या पृथ्वीतलावरून अस्तंगत झालेले आहेत. काही मानवसमूहांच्या वंशजांनी आधुनिक नागर संस्कृतीपर्यंत मजल मारली तर काही नष्ट झाले. ह्या सुधारित जगापासून दूर कानाकोपऱ्यांत जे आदिवासी



समूह मागासलेल्या अवस्थेत जगत आहेत त्याचे कारण हे आहे की, त्या समाजात अशा काही कल्पना, मानसिक प्रवृत्ती, रीतीभाती, प्रथा आणि दैवी समजुती खोलवर रुजल्या की, त्यामुळे नवी समाजधारणा स्वीकारायला ते प्रवृत्त झाले नाहीत. ज्या विविध जंगली जमाती अजूनही अस्तित्वात आहेत, त्यांची समाज संघटना सारखी नाही, पण प्रत्येक संघटना इतकी साचेबंद आहे की, नवे असे काहीही स्वीकारायला ते तयार होत नाहीत. विचारांचा व संस्कारांचा मानवसमूहांच्या विकासक्रमांवर जो परिणाम होतो, त्याकडे कुठल्याही भौतिकवाद्याने दुर्लक्ष करता कामा नये.

जगभर जे उत्खनन झाले आहे, त्यावरून मानवी जीवनाच्या विकासाच्या सर्वसाधारण पायऱ्या ठरवण्यात आल्या आहेत. सर्वात खालच्या थराची म्हणजे अर्थातच जुनी व पहिली पायरी म्हणजे जुने अश्मयुग (पॅलिओलिथिक एज) ह्या युगात छिलके उडवून केलेल्या ओबडधोबड दगडांची हत्यारे (साधने) सापडतात. त्यांचा व लाकडाचे तुकडे व हाडे ह्यांचा उपयोग एकाच वेळी केला गेला असावा. लाकडाचे तुकडे व हाडे हे पुरावे काळाच्या ओघात नष्ट झाले आहेत. ह्या जुन्या अश्मयुगाचा हळूहळू विकास झाला. दगडाची हत्यारे करण्याचे तंत्र सुधारत गेले. त्याकरिता जवळजवळ एक लाख वर्षे लागली. त्यानंतर नवे अश्मयुग (निऑलेथिक एज) आले. या युगात दगडांची हत्यारे घासूनपुसून अणुकुचीदार करण्यात आली. (ह्या दोन कालांच्या दरम्यानच्या काळाला मेसोलेथिक एज म्हणतात.) अश्मयुगांचे हे थर नंतर इतर थरांनी झाकलेले आहेत. त्या थरांत धातूंची साधने व हत्यारे आढळतात. उपयोगात आणलेला पहिला धातू तांबे होय. कच्चे तांबे असलेल्या मातीतून पक्के तांबे वितळवून काढण्याकरिता मातीच्या भांड्यांना लागते तशी भट्टी पुरेशी होती. पण तांबे हे ठिसूळ असल्यामुळे त्याचे दुसऱ्या धातूबरोबर (टिनबरोबर) मिश्रण करावे लागे. त्यामधून 'ब्रॉन्झ युग' निर्माण झाले. टिन पुरेशा प्रमाणात उपलब्ध नव्हते, त्या अर्थी 'ब्रॉन्झ युग' अवतरण्याअगोदर प्रदीर्घ काळ तसे प्रयत्न झाले असणार. खिस्तपूर्व हजारो वर्षे दूरच्या पल्ल्यांवर प्रदीर्घ मार्गावरून व्यापार चालू होता. ब्रॉन्झ कमी प्रमाणात उपलब्ध असल्यामुळे त्याचा साठा काही थोड्या लोकांकडेच झाला. त्याचा अर्थ असा की, ब्रॉन्झ युगामध्ये समाजाचे विघटन वर्गात झाले असणार. ब्रॉन्झ युगात धातूच्या खाणीकरिता व पाण्याच्या पुरवठ्याकरिता टोळीसंघ (ट्राईब्स) करून राहणाऱ्या मानवसमूहांनी एकमेकांवर हल्ले केले. बऱ्याच लढाया केल्या. खिस्तपूर्व २० वे १० वे शतक ह्या दरम्यान जगातल्या अनेक टोळीसंघांनी सतत स्थलांतर केले आहे. त्यांनी युरोप व युरेशिया ह्या भागांत बरीच भ्रमंती केली. पण त्यापूर्वीही जवळजवळ हजार वर्षे इजिप्त व मेसोपोटेमिया येथील नद्यांच्या खोऱ्यातून राहणाऱ्यांनी प्राथमिक पद्धतीने शेती व्यवसाय व तद्जन्य संस्कृतीची स्थापना केल्याचे दिसून येते. नगर राज्य (सिटी स्टेटस), सार्वभौम राज्य (मोनॅर्खी), पुरोहित सत्ता (टेम्पल प्रिस्टहूड) ह्या राज्यसंस्था आणि युद्धतंत्र ह्या सांस्कृतिक विकासात निर्माण झाले, पण असा विकास काही थोड्या प्रदेशात व अपवादात्मक प्रमाणात झाला होता.

उत्खनन शास्त्राप्रमाणे आजचे युग हे लोहयुग आहे. ह्या युगात लोखंडाचा मोठ्या प्रमाणावर शोध लागल्यामुळे ते भरपूर प्रमाणात उपलब्ध झाल्यामुळे जड लोखंडी नांगराचा वापर वाढला. त्यामुळे सबंध जगभर पुढारलेला शेती व्यवसाय प्रस्थापित होऊ शकला. वास्तविक नव्या अश्मयुगातही काही प्रमाणात प्राथमिक अवस्थेतील शेतीचा उदय झाला होता. त्याला 'अश्मयुगीन क्रांती (निओलेथिक रेव्होल्यूशन) म्हणतात. पण शेती व्यवसाय फक्त काही ठराविक जागीच ज्या ठिकाणी जंगले साफ करण्याची आवश्यकता नव्हती, अशा ठिकाणीच एका मर्यादित प्रमाणात विकास पावला. [इराक, इजिप्त सिंधूचे खोरे, इराणमधील पठारे, तुर्कस्तान, पॅलेस्टीन, डॅन्यूब नदीचे खोरे, [कदाचित] चीनमधील काही भाग.] लोखंडाच्या शोधामुळे जंगले साफ करणे आणि खडकाळ जमीन नांगरणीखाली आणणे सोपे जाऊ लागले. त्याशिवाय लोखंड मुबलक प्रमाणात उपलब्ध होत असल्यामुळे ते काही फक्त थोड्या योद्ध्यांच्या किंवा टोळीप्रमुख किंवा राजन्याच्या कुटुंबाकडे संचित होऊन राहिले नाही. तसे पाहिले तर जगातील पहिली 'नगरे' प्राथमिक शेती व्यवसायाचा उदय झाल्यानंतर इ. स. पूर्वी ८० पासून ते ७० शतकांच्या काळात काटलहयुमुक [तुर्कस्तान] व जेरिको [पॅलेस्टिन] येथे बांधली गेली आहेत. पण मागासलेल्या तंत्रामुळे भौगोलिक अडचणीमुळे त्या शेती व्यवसायाचा आजूबाजूच्या प्रदेशातसुद्धा प्रसार होऊ शकला नाही. त्या काळचा शेती व्यवसाय अन्न गोळा करणे व पशुसंवर्धन करणे ह्या व्यवसायांशी दुय्यम असाच राहिला. इजिप्त व इराक येथील नद्यांच्या खोऱ्यातील शेती व्यवसायासारखा तो मुख्य व्यवसाय व संस्कृतीचा आधार झाला नाही.

खिस्तपूर्व २० व्या शतकाच्या काळात लोखंडाचा शोध लागल्यानंतरच खऱ्याखुऱ्या अर्थाने शेती व्यवसाय हा मुख्य व्यवसाय होऊ शकला. लोखंडाचा शोध प्रथम हिटाईट लोकांना गवसला आहे. त्यांनी ते रहस्य काही काळ स्वत:पुरते जपून ठेवले असे दिसते. अगदी खिस्तपूर्व १३५० ह्या वर्षीसुद्धा लोखंडाचे उत्पादन इतके कमी होते की, फारोहा तुतानखमिन ह्या पुरोहित राजाचे (प्रिस्ट किंग) दफन सोन्याच्या पेटीत करण्यात आले आहे. त्याच्या दफनभूमीवर जो चौथरा उभा केलेला आहे, त्यात तांबे, सोने, ब्रॉन्झ, हत्तीचे दात व इतर किंमती धातू व वस्तू आहेत. पण मस्तकाखाली केवळ एक लोखंडाची पट्टी आहे.

लोखंडाच्या शोधामुळे जगातील बहुसंख्य लोकांना सुखाचे दिवस आले, असे मुळीच नाही. ब्रॉन्झ युगात व लोहयुग सुरू झाल्यानंतरही आशिया मायनरमध्ये शेती करून राहणाऱ्या ज्या लहानसहान जमाती होत्या, त्यांच्यावर बाहेरून आलेल्या टोळीसंघांनी हल्ले करून अनेकांना नष्टही केले आहे. अशा हल्ल्यांमध्ये पराभूत केलेल्यांना व्यक्तिगत किंवा सामुदायिक रीत्या गुलाम केले गेले व त्या पद्धतीच्या स्वरूपात माणसाची श्रमशक्ती एकत्र करून उत्पादनाकरिता उपलब्ध करण्यात आली. तेव्हाच लोखंडाचा व्यापक प्रमाणावर उपयोग होऊ लागला. धान्योत्पादन वाढले; पण माणसांची पिळवणूकही वाढली. व्यापार किंवा वाहतुकीचे मार्ग ह्यापासून दूर राहणाऱ्या ज्या जमाती होत्या,



त्यांच्या समाजपद्धतीत बराच काळ फरक पडला नाही. त्या अश्मयुगातील 'अन्न गोळा करून' राहण्याच्या पद्धतीला चिटकून राहिल्या. नागर संस्कृतीच्या रोखाने जी प्रगती झाली त्यातून ते वगळले गेले.

प्राग ऐतिहासिक काळांतील प्राथमिक सामाजिक अवस्थेची नक्की लक्षणे सांगणे सोपे नाही. अगदी नव्या जमान्यातील कल्पनावादी विचारवंतसुद्धा असे समजतात की, प्राथमिक सामाजिक अवस्थेतील माणूस हा रानटी असला तरी उदात्त मनाचा होता; निसर्गाचे अपत्य असणारा हा माणूस आधुनिक संस्कृतीच्या संस्काराने भ्रष्ट व स्वार्थी झालेला नव्हता; सर्व दुर्गुणांपासून मुक्त होता–वगैरे वगैरे. खरे सांगायचे तर नैसर्गिक मानवाबद्दल आणि तथाकथित त्याच्या सभोवतालच्या स्वर्गीय वातावरणाबद्दलची ही कथा खिस्तोफर कोलंबसाने इझाबेला राणीला लिहिलेल्या पत्रापासून सुरू झाली असावी. हा संशोधक भारतातील समृद्ध प्रदेशाचा व तेथील सुवर्णनगरांचा शोध घेण्यास निघाला तो तेथे पोहोचला नाही. तो पोहोचला कॅरिबिअन बेटात. त्या बेटात राहणाऱ्या आदिवासी माणसांचे व त्यांच्या नैसर्गिक अवस्थेचे त्याने असे काही वर्णन केले की जणू काही त्याने काही आगळे व वेगळे संशोधन केले. ह्या पत्रामुळे युरोपियन खास करून उदारमतवादी युरोपियन विचारवंतांच्या कल्पनेला नवीन चालना मिळाली. बायबलमधील 'गार्डन ऑफ एडन'नंतर कधीही न दिसलेली स्वर्गीय सामाजिक अवस्था जगात प्रत्यक्षात असल्याचे त्यांच्या प्रत्ययाला आले. नैसर्गिक मानवाच्या ह्या शोधामुळे रूसोच्या विचारधारांना व व्हाल्टेअरने समाजातील विषमतेवर केलेल्या भेदक टीकेला भरभक्कम आधार मिळाला. काही विचारवंत अजूनही आदिम साम्यवादाबद्दल अशा तऱ्हेने लिहितात की, जणू काही तो एक असा आदर्श समाज होता की, जिथे समाजातील सर्व सभासद समाजातील उत्पादन (शिकार किंवा जे काही असेल ते) सारखे वाटून घेत होते. आपल्या साध्यासुध्या गरजा एकमेकांच्या सहकार्याने भागवत होते. आता अशी कल्पना करणे म्हणजे सुवर्णयुगाच्या कल्पनेची लाल नसली तरी गुलाबी आवरणांतील आवृत्ती पैदा करणे होय !

अन्न गोळा करून राहणारा समाज हा छोटा साचेबंद असलेला समाज होता. त्या समाजातील खास लक्षणे ही त्या ठिकाणच्या त्या काळातील अन्नाच्या उपलब्धतेवर अवलंबून असे. अशी उपलब्धता कमी असल्यामुळे मृत्यूचे प्रमाण आजच्या मानाने जास्त व जननाचे प्रमाण कमी असे. ग्रॅहॅम क्लार्क हा एक अत्यंत कसोशीने अभ्यास करणारा व काळजीपूर्वक निर्णयाप्रत येणारा पुरातत्त्व संशोधक आहे. त्याच्या मते जुन्या अश्मयुगात इंग्लंड आणि वेल्समधील लोकवस्ती ही एका वेळी दोनशे पन्नास किंवा त्याच्या आसपास असावी. तीसुद्धा लहान लहान गटात असावी. मेसॉलिथिक युगात (जुने अश्मयुग व नवे अश्मयुग ह्यांच्या दरम्यानच्या काळात) ती लोकसंख्या पाचशेच्या आसपास असावी. नव्या अश्मयुगात ती एका वेळी वीस हजारपर्यंतच वाढली असावी. भारतासारख्या देशात निसर्ग दयाळू व समृद्ध आहे. (अर्थात येथेही तो सर्व काळ तसा नसतो; कारण कधी कधी वर्षानुवर्षे अवर्षण किंवा अतिवर्षण होते, तरीही जंगलातून

‘ अन्न गोळा करून जगणे ’ येथेच सर्वांत जास्त सुलभ आहे) त्या ठिकाणीसुद्धा अश्मयुगात त्या लोकवस्तीचे प्रमाण दर दहा चौरस मैलामागे एकापेक्षा जास्त असणे संभवनीय नाही.

कुठल्या ना कुठल्या स्वरूपात अन्न जतन करता आल्याशिवाय व त्याचा साठा करता आल्याशिवाय लोकसंख्या मोठ्या प्रमाणावर वाढणे व मानवसमूहांची वसतीस्थाने निर्माण होणे अशक्यच होते. मानवी जीवनाच्या इतिहासात अन्नाचे जतन करण्याची कला ही अन्न गोळा करण्याच्या अवस्थेच्या वरची; पण बरीच नंतरची पायरी आहे. जनावरांचे मांस (शिकार करून गोळा केलेले अन्न) जतन करण्याकरिता मिठाची आवश्यकता असते. सर्वच ठिकाणी मीठ मिळत नाही. म्हणजेच दुरून आणावे लागते. त्याचप्रमाणे जतन केलेले अन्न ठेवण्याकरिता टोपल्या, चामड्याच्या पिशव्या, मातीची भांडी वगैरे लागतात. तेव्हा ह्या कलाही वृद्धिंगत व्हाव्या लागतात. बरे, सर्व तऱ्हेचे अन्न काही जतन करता येत नाही. धान्य, कठिण कवचाची फळे आणि काही झाडांची मुळे ‘ हे अन्न ’ जतन करायला सोपे असते; पण हे अन्न काही शिजविल्याशिवाय भक्षण करता येत नाही.

म्हणजेच अग्नीचा उपयोग करण्याचे तंत्र त्याला माहीत असावे लागते. तेवढा अग्नीवर ताबा मिळवलेला असावा लागतो. अन्न शिजविण्याकरिता भांड्यांचा उपयोगही अस्तित्वात आलेला असावा लागतो. अशा प्रगत सामाजिक अवस्थेला पोचण्यापूर्वीही माणसांचे सामाजिक जीवन टोळी-संघाच्या स्वरूपात विकास पावले होते. कारण त्या-अगोदरच हजारो वर्षे तो स्वतःच्या अवयवांबाहेरील साधनाचा वापर करणारा (टूल युझिंग ॲनिमल) प्राणी झाला होता.

अन्न गोळा करून राहणाऱ्या प्राग ऐतिहासिक समाजाची दोन मुख्य लक्षणे होती. अन्न जर जतन करता येत नसेल तर ते ताबडतोब भक्षण करावे लागते तेव्हा ते वाटून घ्यावे लागत असणार. पण असे अनेक पशुसमूहही आहेत की, जे अन्न वाटून घेतात. प्राथमिक समाजातल्या मानवसमूहामध्ये ‘अन्न वाटून घेणे’ ही सामूहिक जबाबदारी झालेली असली पाहिजे. आजही खास प्रसंगी सबंध समाजाला जेवणावळ घालण्याची (अन्न देण्याची) जी प्रथा आहे, ती प्रथा अशा परंपरेतूनच निर्माण झाली. अर्थात त्याचा अर्थ असा नव्हे की, समूहांतले सर्व सभासद अन्न सारखे सारखे वाटून घेत होते. साधारणपणे ‘अन्न गोळा करणारे’ समूह वाजवीपेक्षा जास्त अन्न गोळा करू शकतच नव्हते कारण त्यांना त्यांचा साठा करता येत नसे की ते जतन करता येत नसे. तेव्हा त्यांना ‘हाव’ असण्याचा प्रश्नच नव्हता. केवळ ‘मौज’ म्हणून ते शिकार करीत नसत. आजच्या समाजात योग्य भाव न मिळाल्यास अन्न सडू दिले जाते पण उपाशी जनतेला वाटले जात नाही. अशा घटना त्या काळी घडत नसत हे नक्कीच. अन्न गोळा करण्यात सर्व समूहाला भाग घ्यावा लागे तेव्हा ते वाटून घ्यावे लागे. एवढ्याच अर्थाने सुवर्ण-युगाच्या कल्पनेत काही तथ्य आहे, असे म्हणता येईल; पण हे विसरता कामा नये की प्राथमिक अवस्थेतील ह्या माणसांची सारी शक्ती ही अन्न शोधण्यात खर्च होत असे. ह्या मानवसमूहांची संख्या त्या त्या भागातल्या नैसर्गिक वातावरणाप्रमाणे मर्यादित असे व



विभागांत जास्त प्रमाणात मिळणाऱ्या खास अन्नावर (म्हणजे पशु, मासे, पक्षी, फळे, मुळे, किटक) त्यांचे लक्ष केंद्रित होई. ह्याचा अर्थ एखाद्या जनावरावर किंवा झाडावर (वगैरे) अवलंबून रहाणे वाढू लागले. हे समूह स्वतःला केवळ रक्तसंबंधी मानत नव्हते तर आपला समूह ज्या वृक्षाची फळे खातो किंवा ज्या पशुपक्ष्यांचे मांस खातो त्यातून निर्माण झाला किंवा त्या वस्तूंचा किंवा हाडामांसांचा बनलेला आहे, अशी भावना त्या माणसांच्या मनात निर्माण झाली होती. दुसऱ्या तऱ्हेचे अन्न भक्षण करणारे आपले रक्तसंबंधी नाहीत आणि सुरुवातीच्या काळात तर ती आपल्यासारखी माणसे नाहीत अशी भावना होती. ह्याला आपण खास अन्नदेवकाची (फूड टोटेम) कल्पना म्हणू. ठराविक तऱ्हेचे अन्न गोळा करण्याचे खास तंत्र असे. त्या तंत्राचे प्रगटीकरण केल्यास (फॉर्मल एक्स्प्रेशन) ते अन्न मिळू शकते, असा विश्वास त्यांना वाटे. त्यांतून यातुकर्मे व यात्वात्मक सामर्थ्यविधी निर्माण झाले. अग्नी अन्न शिजवितो, तेव्हा अग्नीला अन्न अर्पण केल्याने अन्नवृद्धी होईल, असा समज दृढ झाला. त्यातून अग्नीला बळी देण्याची प्रथा रूढ झाली. यात्वात्मक सामर्थ्याने निसर्गातील अद्भुत शक्तींची मदत मिळते, त्या शक्तींचे समाधान होते. असे समज रूढ झाले. पुढे असे यात्वात्मक विधी करणारे खास लोक निर्माण झाले. असे लोक इतर प्रत्यक्ष काम न करणारे काहीसे परपुष्ट विभाग होऊ लागले. ह्या विविध विधीप्रकारांचा, क्रियाकर्मांच्या पद्धतींचा अभ्यास करणे आपल्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. कारण मानवी समाजाच्या सांस्कृतिक जीवनाच्या चळवळींची बिजे त्यामागे आहेत. शिकार मिळविण्याच्या तंत्रातून शिकारीचा नाच (काही माणसे जनावर होतात. काही शिकार करतात.) तयार झाला, पण असे नाच करणे हा एक विधी (रिच्युअल) होता. असा विधी केल्याने शिकारीच्या तंत्राचा विकास होतो किंवा शिकार मिळू शकते अशी समजूत होती. ह्या प्रथेतून पुढे अनेक हजारो वर्षांनी आजच्या जमान्यातील बॅले (समूह नाच) नाटके वगैरे जन्माला आली. शीत युगात (आईस एज) फ्रान्स आणि स्पेनमधल्या गुहेतून काढलेली जनावरांची चित्रे आता ‘कलात्मक आविष्कार’ असल्याचे मानले जाते. पण त्यावेळी ती काढण्यामागे कलावृद्धीचा उद्देश नव्हता. ती चित्रे जिथे प्रकाशाचा शिरकाव होऊ शकत नव्हता अशा खोल गुहेत चरबीच्या तेलात भिजविलेल्या व पेटवलेल्या मशालींच्या प्रकाशांत काढलेली आहेत. त्या चित्रांवर जी छिद्रे पडलेली आहेत, त्यावरून त्या चित्रांचा उपयोग लक्ष्यवेध करण्याचा सराव करण्या-करिता केलेला असावा, असे दिसून येते. समागम करणाऱ्या पशुयुग्मांची जी अनेक चित्रे आहेत, ती त्या प्राग ऐतिहासिक मानवसमूहांनी जननोत्पादन करण्याकरिता जे यातुविधी निर्माण केले, त्यांचा आविष्कार आहे.

त्या काळचे मानवसमूह एका जागी स्थित (सेडेंटरी) नव्हते. ते अन्नाच्या शोधार्थ भटकत असत. तरीही काही ठराविक प्रदेश स्वतःकरिता राखून ठेवण्याचा (इतरांना हटवण्याचा व येऊ न देण्याचा) प्रयत्न ते मानवसमूह करीत असत. त्यावेळच्या ज्या भावना व कल्पना असत त्या भावना व कल्पना ठराविक आवाजात (ध्वनित) ते व्यक्त करीत असत. ह्या

अवस्थेमागील कारणमीमांसा आता शास्त्रीय दृष्टीकोनांतून लावता येते. त्या काळांतील प्राथमिक समाजांतला माणूस समाजांत दृढ झालेल्या विधी व प्रथा ह्यापासून विचलित होण्याचे धैर्य करू शकत नसे. कारण त्याशिवाय जीवन जगणेही शक्य नव्हते; अशी त्याची व समाजाची समजूत होती.

वेगवेगळया दोन किंवा अधिक समूहांना एकमेकांच्या जवळ आणण्याची (व एकत्र करण्याची) प्रक्रिया प्रथम जीवनावश्यक वस्तूंची 'अदलाबदल' (बार्टर) करण्याच्या स्वरूपात झाली. अर्थात् 'मुक्त अदलाबदल' प्राथमिक अवस्थेतील अगदी खालच्या पायरीवरील जनसमूहांना ज्ञात नसावी. (जसे एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस शोधल्या गेलेल्या टोब्रायन्ड बेटांतील आदिवासी अवस्थेतील लोकांत मुक्त अदलाबदल चालू असल्याचे दिसते) अनुवांशिक रक्तसंबंधी जमात टोळयांत (क्लॅन्स) आपसांत अन्नाचे वाटप करण्याच्या अवस्थेनंतर अदलाबदल अशा दोन रक्तसंबंधी जमात टोळ्यांत (क्लॅन्स) एकमेकांना भेट देण्याच्या स्वरूपांत प्रथम सुरू झाली असावी. ह्या भेटी सरसकट होत नसत, पण ज्यांना आपण विनिमय-मित्र (ट्रेड फ्रेन्डस) म्हणू अशा दोन जमातींत ती होऊ लागली. अशी भेट मागता येत नसे व नाकारताही येत नसे. त्याच्या किंमतीचा सौदा होत नसे. पण ज्यांना अशी भेट मिळे, त्या समूहांकडे ज्या 'अतिरिक्त वस्तु' असत. त्याची परत भेट देण्याची नैतिक जबाबदारी त्यांच्यावर येई. ह्या बाबतींतील विकासक्रमाबाबत सर्वसधारणपणे जे सर्वमान्य मत आहे, त्याप्रमाणे अन्नवस्तूंच्या अदलाबदलीनंतर वेगवेगळी अन्नदैवते मानणाऱ्या वेगवेगळया अशा जमात टोळयांमध्ये (क्लॅन्स) स्त्री-पुरुषांची अदलाबदल होऊ लागली व ते एकत्र येऊ लागले. त्यांच्यात लैंगिक संबंध-विवाह प्रस्थापित झाले. ह्या अदलाबदलीतून विविध मूळ जमात–टोळयांना विविध तऱ्हेचे अन्न भक्षण करणे शक्य झाले. अन्न प्रकारांची व्याप्ती वाढली. एकमेकांकडून मिळणाऱ्या माहितीमुळे अधिक चांगली साधने (टूल्स) तयार करता येऊ लागली. अन्न गोळा करण्याच्या, जतन करण्याच्या तंत्रात सुधारणा होऊ लागली. दोन किंवा अधिक मूळ जमात टोळ्या (क्लॅन्स) ह्यांच्या एकत्र येण्याने त्यांच्या प्रगटीकरण पद्धतीत (भाषा–हावभाव) वाढ झाली. ह्या एकत्रीकरणाच्या प्रक्रियेत टोळी-संघ [ट्राईब्स] निर्माण झाले.

सर्व प्राथमिक भाषांचे व्याकरण क्लिष्ट असल्याचे आढळून येते. 'झाड,' 'जनावर' अशा सारख्याच प्रकारच्या वस्तूंना समानार्थी 'शब्द' किंवा समानार्थी 'कल्पना' अशा भाषांत अस्तित्वांत नसतात. प्रत्येक वस्तू त्याच्या विशेषनामाने म्हणजे प्रत्येक झाड, जनावर याच्या खास नावाने ओळखले जाते. संस्कृत, ग्रीक, फिनीश ह्या भाषा प्राथमिक मानव-समूहांच्या भाषांच्या मानाने खूपच विकसित आहेत, तरीसुद्धा त्या जुन्या भाषा आहेत व त्यांचे व्याकरण नंतरच्या काळात विकसित पावलेल्या भाषांच्या मानाने कितीतरी क्लिष्ट आहे. **मानवसमूहांच्या भाषा ह्यासुद्धा एकमेकांशी वाढणाऱ्या व्यवहारातून वृद्धिंगत होत असतात. माणूस केवळ अन्नोत्पादक अवस्थेकडेच नव्हे तर विचार करण्याच्या अवस्थेत जाऊ लागतो, तेव्हा तो विचार करणारा**



**पशू होतो.** परस्परांपासून वेगवेगळया असलेल्या वंशांतील लैंगिक संबंध (विवाह) हे जननाच्या दृष्टीने अधिक फायद्याचे असतात, हे अनुभवातून सिद्ध झालेले आहे. छोट्या जमातींमधील अंतर्गत लैंगिक संबंधातून (इन् ब्रिडींग) जन्माला आलेल्या मुलांची शारीरिक व मानसिक वाढ खुंटल्याचे आढळून येते. वेगवेगळया आंतरजमातीय विवाहातून जन्माला आलेली मुले दोन्ही जमातीमधील आपल्या आईबापांपेक्षा अधिक सुदृढ होतात. शीत-युगाच्या शेवटच्या अवस्थेतील क्रॉग मॅग्नन आदिमानव हा अचानकपणे सुदृढ झाला, ह्याचे कारण हेच असावे की, शीतयुगाच्या काळातील वाढ खुंटलेल्या दोन तऱ्हेच्या आदि-मानवापासून हा क्रॉग मॅग्नन निर्माण झाला असावा. **आजची सर्व लोकसंख्या ही अगदी प्राग् ऐतिहासिक काळापासून विविध मानवसमूहांच्या लैंगिक संबंधातून जे मोठे मानवसमूह झाले त्यांचे वंशज आहेत. त्यामुळे 'शुद्ध वंशांची (प्युअर रेस) कल्पना ही मानवी समाजाच्या विकासाच्या संदर्भात टाकावू आहे** मानवसमूहांच्या एकत्र होण्याने झालेली भाषेची प्रगती मात्र जास्त गतीने झाली. अर्थात मानवसमूहांच्या एकत्र येण्याचे हे जे फायदे झाले, ते कोणी नीटपणे ठरवून किंवा तशा तऱ्हेची योजना करून केले गेले असे नव्हे. निसर्गक्रमाने जे समूह एकमेकांशी वस्तूंची, कल्पनांची, भाषेची व वर-वधूंची अदलाबदल करू लागले, ते एकत्र आले. त्यांची संख्या, ज्ञान, कसब, वाढीला लागले. एकत्र न येणारे आदिमानवसमूह कालौघात नष्ट झाले. ह्या अनुभवातूनच भारतीय धर्मपरंपरेत सगोत्र सपिंड विवाहावर बंदी आली आहे. ते निषिद्ध मानले गेले आहेत. अशा तऱ्हेने वेगवेगळे अन्नदेवक (फूड टोटेम्स) मानणाऱ्या समूहांचे जे एकत्रीकरण झाले, त्यांतून अधिक व्यापक असे टोळीसंघ (किंवा संघटोळया म्हणू) (ट्राइब्स) निर्माण झाले, हे वर सांगितले आहेच.

आता अशा टोळी–संघांतील पुरुष व स्त्रिया तेच अन्नदेवक मानणाऱ्या स्त्री-पुरुषांशी विवाह करू शकत नव्हते, पण टोळी-संघांच्या बाहेरही विवाहसंबंध होत नव्हते. कारण टोळी-संघ हीच त्याच्या सामाजिक जीवनाची चौकट झाली होती. त्याशिवाय एक कुरण एक पाण्याची जागा, एक रहाण्याकरिता ठिकाण ह्यावरून टोळी-संघाच्या ज्या आपसात लढाया होत, त्यामुळे तसा संबंध न आलेल्या टोळीसंघाबद्दल विश्वास नसे. ह्यांतूनच टोळीबाहेरील माणसाकडून शिजवलेले अन्न न घेण्याची प्रथा सुरू झाली. संघ-टोळीत सामावलेले अनेक मूळ समूह (क्लॅन्स) आपआपली अन्नदेवके मानीत, पण त्याचबरोबर सर्व टोळी समाजाची समान अशी दैवते निर्माण झाली. अनेक मूळ टोळयांचे (क्लॅन्स) टोळी-संघात (ट्राइब्स) संघटन होण्याची जी प्रक्रिया झाली, त्याचा ठसा मानव समाजाच्या सामाजिक जीवनावर उमटलेला आहे.

## २·३
## भारतातील प्राग ऐतिहासिक मानव

आतापर्यंत आपण प्राग ऐतिहासिक मानव व त्याचा सामाजिक विकास ह्यासंबंधी सर्वसाधारण विधानांची मांडणी केली. केवळ अंदाज करत बसण्याऐवजी जगभर झालेल्या

संशोधनाच्या आधारे काही तर्कशुद्ध सिद्धांत मांडण्याचा प्रयत्न केला. भारतातील प्राग ऐतिहासिक परिस्थितीविषयी आपण काही निश्चितपणे मांडलेले नाही. त्याबद्दलची माहिती अतिशय अल्प आहे. पण जगातील इतर प्राग ऐतिहासिक मानवाच्या सामाजिक विकासापेक्षा भारतातील प्राग ऐतिहासिक मानवाचा विकास वेगळ्या तऱ्हेने झाला असेल, असे मानावयास जागा नाही. प्राग ऐतिहासिक काळातील भारतातील मानवाची प्रगती वर वर्णन केलेल्या सर्वसाधारण पद्धतीप्रमाणे झाली, असे गृहीत धरले तरच आपल्या ग्रामीण व आदिवासी समाजजीवन ह्यात दिसणाऱ्या लक्षणांचा व संस्कृत ग्रंथातील अनेक संदर्भांचा अर्थ लावता येतो. त्याशिवाय कोटलीच तर्कशुद्ध संगती लावता येत नाही.

भारतातील प्राग इतिहासाबद्दलच्या दोन खास वैशिष्ट्यांची नोंद घेणे आवश्यक आहे. शेवटचे शीतयुग हे युरोपमध्ये, जेवढे कठोर व व्यापक होते, तेवढे ते भारतीय उपखंडात नव्हते. जेव्हा उत्तरेकडील देशात शीतयुग होते, तेव्हा दक्षिणेकडील देश त्यापासून मुक्त राहिले. भारताच्या पूर्वेकडील देशात युनान व ब्रह्मदेश येथे प्राग ऐतिहासिक मानवांनी प्रवेश केला असण्याची दाट शक्यता आहे. ऐतिहासिक काळातसुद्धा त्यांचे आगमन चालू रहाण्याची शक्यता आहे. पूर्वेकडील भागात अश्मयुगातील जी दगडी साधने मिळतात, त्याचे युनान व ब्रह्मदेश येथील अश्मयुगातील मानवांच्या दगडी साधनांशी साम्य आहे. दगडांची जात व करण्याचे तंत्र तेच आहे. **दुसरे वैशिष्ट्य हे की, भारतातील हवामान व नैसर्गिक परिस्थिती ह्यामुळे अन्न गोळा करणे अधिक सुलभ होते. त्यामुळे "अन्न गोळा करून रहाणारे" मानवसमूह त्याच सामाजिक अवस्थेत बराच काळ राहू शकले.** शिकार व मासेमारी ही अन्नसाधने सोडली तर युरोपात किंवा इतरत्र आशियांत फार तर पाचसात कडधान्याचे प्रकार आहेत, तर भारतातील महाराष्ट्रासारख्या अगदी सर्वसाधारण पिकाऊ देशातसुद्धा अन्नधान्याचे चाळीस प्रकार आहेत. ह्या सर्व प्रकारांची आता मशागत केली जाते. पण अनेक प्रकार नैसर्गिक रीत्या जंगलातही उगवतात. ज्या प्रकारांचा संचय करता येतो. (स्टोअरिंग) त्यात तांदूळ, गहू अशी अन्नधान्ये, अनेक प्रकारच्या भाज्या व तेलबिया ह्यांचा सामावेश होतो. दालचिनी, लवंग प्रकारामुळे अन्नाला चव तर येतेच; पण त्यात जीवनसत्वेही असतात. **मांसाहार केल्याशिवाय भारतांत समतोल आहार साधता येतो. ह्या साध्या वस्तुस्थितीचा परिणाम भारतीय धर्मविचार व संघटना ह्यांच्यावर झालेला आहे. त्यामुळे धर्मविचारांत अहिंसेला महत्त्वाचे स्थान मिळाले आहे.** भारताच्या आजूबाजूच्या प्रदेशातील मानवसमूह अन्नोत्पादन करण्याच्या अवस्थेत गेल्यानंतरसुद्धा हजारो वर्षेपर्यंत भारतातील जनसमूह 'अन्न गोळा करण्या'च्या अवस्थेत राहिले. अजूनही भारतातील जंगलात रहाणाऱ्या आदिवासींना पोट भरण्याकरिता गोळा करण्यासारख्या अनेक प्रकारच्या वस्तूंची माहिती आहे.

समाजात जर मागासलेली उत्पादनपद्धती टिकून राहिली तर मागासलेली जीवनपद्धती समज, संस्कृती टिकून रहाते. भारत हा असा एक देश आहे की, जिथे जुन्या पद्धती



व विचार शतकानुशतके टिकून राहिले आहेत. जुनी उत्पादनपद्धती जाऊन नवी उत्पादन पद्धती केव्हा व कुठल्या अवस्थेत आली हे निश्चितपणे सांगणे कठिण होते. जुने विचार व नवे विचार, जुने संस्कार व नवे संस्कार ह्यांची दोन्ही बाजूंनी देवघेव झालेली आहे. (म्युच्युअल कल्चरेशन.) मुस्लिम आक्रमणापूर्वी हजारो वर्षे येथील मानवसमूहांपेक्षा प्रगत असे जे मानवसमूह भारतात आले, त्यांनी येथील आदिवासींवर प्रभाव पाडला. त्याचबरोबर त्या नवागतांनीही आदिवासींच्या अनेक प्रथा व श्रद्धा ह्यांचा स्वीकार केलेला आहे.

ज्याला आपण आधुनिक अर्थाने 'समाजव्यवस्था' असा शब्द वापरतो, तशी समाजव्यवस्था अंमलात येण्याकरिता समाजात विषम वर्ग व त्याचे उत्पादनसंबंध निर्माण व्हावे लागतात. समाजातील अतिरिक्त उत्पादन (सरप्लस प्रॉडक्शन) होण्याची व त्याचा ओघ वरिष्ठ वर्गाकडे जाण्याची प्रक्रिया निर्माण व्हावी लागते. भारतात अशी व्यवस्था धर्मरचनेच्या स्वरूपात उभारली गेली. निसर्ग व अद्भूत शक्ती ह्यांवरील श्रद्धा टिकवून धरणारी अन्न गोळा करून जगण्याची पद्धती ह्यांचे अस्तित्व येथे फार काळपर्यंत टिकून राहिले. युरोप किंवा अमेरिकेप्रमाणे येथे अन्नोत्पादक समाज संघटीत करण्याकरिता तेवढ्या प्रमाणात बळाचा वापर करावा लागला नाही.

आता आपणासमोर दोन कामे आहेत. भारतातील प्राग् ऐतिहासिक मानवाबद्दल जी काही माहिती आहे ती मांडणे आणि भारतीय समाजांमध्ये प्राथमिक जीवनाचे जे अवशेष दिसून येतात, त्याआधारे प्राग् ऐतिहासिक मानवाने ह्या समाजाला जे योगदान केले आहे, त्याचा शोध घेण्याचा प्रयत्न करणे.

भारतातील प्राग् ऐतिहासिक मानवाचा शोध घेण्यांत पहिली अडचण त्याचा काळ निश्चित करण्याबाबत येते. जेव्हा उत्तरेकडे एकतंत्री राजसत्ता स्थापन होत होत्या, तेव्हा दक्षिणेकडील प्रदेशांत मागासलेले मानवसमूह होते.

सोन व्हॅली [पश्चिम पाकिस्तान] येथे उत्खननात सापडलेल्या पुराव्यांवरून अश्मयुगांतील तेथील मानव लेव्हॅलॉईस पद्धतीने आपली दगडी हत्यारे अणकुचीदार करीत असे, असा निष्कर्ष काढण्यात आला आहे. त्यावरून उत्खननांतील ह्या पुराव्यांचा काळ सर्वसाधारणपणे ख्रिस्तपूर्व ५००० ते १०,००० वर्षे ह्या दरम्यानचा असावा, असा अंदाज केलेला आहे. अशाच तऱ्हेची दगडी हत्यारे सबंध युरेशियन प्रदेशातील उत्खननांत अनेक ठिकाणी आढळतात, पण त्यावरून ह्या मानवसमूहांच्या हालचालींसंबंधी निश्चित माहिती सांगता येत नाही. ख्रिस्तपूर्व ५००० वर्षे ह्या काळात वापरल्या गेलेल्या दगडांच्या लहान अवजारांचे [मायक्रोलिथ] साठे मात्र युरोपपासून ते पॅलेस्टिनपर्यंत सर्व प्रदेशात आढळून येतात. तसेच त्याचे सातत्य इराण व अफगाणीस्तान येथील गुहांतून राहणाऱ्या मानवाने केलेल्या तशाच दगडी हत्यारात टिकून आहे. त्यावरून भारतातही सापडणारी तशाच तऱ्हेची साधने किंवा हत्यारे त्याच किंवा जवळपासच्या काळातली असावीत, असे समजायला हरकत नाही. ही साधने भारतात निर्माण झाली व तेथून सर्व

ठिकाणी पसरली असे मानायला आधार नाही. प्राग् ऐतिहासिक मानवाची सामाजिक परिस्थिती सर्व प्रदेशात जवळजवळ सारखीच असणार, असा अंदाज करावयास हरकत नाही.

दगडांची लहान लहान साधने प्रथम मोठ्या दगडांच्या साधनांबरोबर सापडतात. कदाचित मोठ्या दगडांची साधने करताना उडालेले ते छिलकेही असावेत. नंतरच्या दोन अश्मयुगांमधला जो 'मेसोलिथिक' दगडी साधनांचा काळ होता, त्या काळात मात्र जगभर लहान-लहान हत्यारांचे साठे मोठ्या दगडांच्या हत्यारांच्या साठ्यांशिवाय असलेले सापडतात.

भारताच्या आग्नेय किनाऱ्यांवरील तेरी प्रदेशांत मातीची भांडी वापरण्याच्या काळाअगोदरच्या काळांत वापरले जाणारे दगडी हत्यारांचे साठे उत्खननांत मिळाले आहेत. उत्खननांतील ह्या थरांचा काळ साधारणपणे खिस्तपूर्व ४००० वर्षे किंवा त्यापेक्षाही हजार दोन हजार वर्षे अगोदरचा ठरलेला आहे. (पुरातत्त्व शास्त्राप्रमाणे प्राग् ऐतिहासिक काळाच्या अंदाजाबाबत हजार-दोन हजार वर्षांचा फरक महत्त्वाचा मानला जात नाही) त्याचप्रमाणे सुंदर चमकदार दगडांच्या साधनांचे साठे पश्चिम प्रदेशातील दळणवळणाच्या मार्गांवर सापडतात.

सर्वांत जास्त साठे लहान लहान तळी व ओढ्यांच्या काठी सापडतात. जमिनीची धूप झाल्यामुळे अनेक ठिकाणी ही तळी व ओढे आटून गेले आहेत. पण त्या धूप होण्यामुळे ही हत्यारेही उघड्यावर आली आहेत. त्याचबरोबर अशा जागी मानव वस्तीच्या खुणा मात्र आढळून येत नाहीत. ही हत्यारे सुंदर, चमकदार दगडांची आहेत. छिलके उडवून त्याना घासून टोकदार केलेली आहेत. त्याचा विविध तऱ्हेने उपयोग करता येऊ शकेल अशी ती आहेत. लाकूड, शिंग किंवा हाड ह्यांचा दांड्यासारखा उपयोग करून, त्यात ती बसवता येतील अशी आहेत. त्यावरून त्या काळाचा 'मॅक्रोलिथिक मानव' हा काही अन्न गोळा करण्याच्या अवस्थेतील सर्वांत खालच्या पायरीवर नसावा, असाच निष्कर्ष काढावा लागतो. अन्न गोळा करण्याची सर्वांत खालची पायरी म्हणजे मोठ्या दगडांचा ओबडधोबड हत्यारांनी प्राण्यांना मारणे ही होय. भारतात सापडलेली ही दगडी हत्यारे (साधने) ही चाकू करवत किंवा विळा अशा तऱ्हेने वापरण्यासाठी आहेत. त्यांचा उपयोग चामडी साफ करणे, गवत विंजणे वगैरे कामाकरिता होऊ शकेल अशी आहेत. काही साधने तर घासून घासून एखाद्या सुईसारखी बारीक व टोकदार केलेली आढळतात. त्याचा उपयोग कातडी शिवण्यासाठी करण्यात येत असावा. मातीची भांडी बनविण्याअगोदर हजारो वर्षे चामड्याच्या पिशव्यांचा उपयोग अन्न साठवण्याकरिता केला जाई.

कर्नाटक आणि आंध्र ह्या ग्रानाईट सापडणाऱ्या प्रदेशांत मोठ्या दगडांची हत्यारे सापडतात. पण त्यांच्या एकंदर स्वरूपांवरून ती जुन्या अश्मयुगातील नसून लोहयुगाच्या सुरुवातीच्या काळांतील असावीत, असे दिसते. महाराष्ट्रांत काळ्याभोर दगडांचे खडक, ते निसर्गाने निर्माण केले आहेत; पण प्राग् ऐतिहासिक माणसाने त्यावर जागोजागी खोदकाम



करून आपल्या अस्तित्वाच्या खुणा त्यावर उमटविल्या आहेत. कुठे कुठे हे खोदकाम चार सेंटिमीटरपर्यंत खोल आहे. हे दगड इतके कठिण आहेत की, अगदी पोलादाचे अस्त्रसुद्धा त्यावर वापरण्याचा प्रयत्न केल्यास वाकले जाईल. काही ठिकाणी तीन टन वजनापर्यंतचे मोठमोठे दगड एकमेकांवर रचून ठेवलेले आढळतात. इतक्या ठिकाणी असे खोदकाम केलेले आणि दगडावर दगड रचून ठेवलेले आढळतात की हे काम वर्षानुवर्षे काय, पण शतकानुशतके चाललेले असावे. पण हे सर्व करण्याचा नक्की उद्देश काय असावा, ह्याचा पत्ता लागत नाही. ह्या दगडी खोदकामाची आकृती वर्तुळाकार किंवा लंबवर्तुळाकार आहे. पण त्यावर माणसांचे, जनावरांचे किंवा तसे सादृश असलेली चित्रे आढळून येत नाहीत. पण ज्या अर्थी हा मेगॅलिथिक मानव अशा तऱ्हेचे खोदकाम वर्षानुवर्षे करत होता त्या अर्थी हे सर्व करण्याकरिता आवश्यक असा अन्नसाठा त्याला उपलब्ध असावा. एक असा अंदाज करता येतो की, मेगॅलिथिक मानव कुठल्यातरी जनावरांचे पालन करीत व आडोसा म्हणून दगडाच्या भिंती त्यानी उभ्या केल्या असाव्यात व खोदकाम केलेले असावे. खडकावर व मोठ्या कातळांवर जे खोदकाम केलेले आहे, त्या ठिकाणी जी दगडी हत्यारे मिळाली आहेत, ती ओढ्याच्या किंवा पाण्याच्या जागी मिळणाऱ्या लहान हत्यारांपेक्षा जास्त जड व मजबूत आहेत. ओढ्याजवळच्या मॅक्रोलिथ मानवाला हरण, शेळ्या, ससा अशा जनावरांची पातळ चामडी साफ करावी लागत असावीत, तर खडकाळ प्रदेशांतील मेगॅलिथ माणसाला जाड चामडी साफ करावी लागत असावी. त्यामुळे त्याच्या दगडी हत्यारांत फरक पडला असणार. ही दोन तऱ्हेची साधने वापरणाऱ्या मानवसमूहांचे एकमेकांशी कशा प्रकारे संबंध होते ह्याचा थांगपत्ता लागत नाही.

## २·४
## प्राथमिक अवस्थेतील उत्पादन साधनांचे अवशेष

ह्या प्राग् ऐतिहासिक मानवसमाजाचा विकास नागर संस्कृतीपर्यंत कसा झाला, हे शोधण्याकरिता कुठले शास्त्र वापरता येईल बरे? ॲन्थ्रॉपेमिट्री म्हणजे माणसाच्या शारीरिक वाढीचा व त्यातील बदलांचा अभ्यास करण्याचे शास्त्र वापरून पहाण्यात आले आहे. ह्या शास्त्राप्रमाणे माणसांची उंची, वजन, कवटीचा आकार, नाकाची जाडी व लांबी, कातडीचा रंग इत्यादींचा तौलनिक अभ्यास करून निष्कर्ष काढण्याचे प्रयत्न करण्यात आले आहेत. पण ही पद्धत संपूर्णपणे फसलेली आहे. सर्व ॲन्थ्रोपेमिट्रिक लक्षणे काही थोड्या पिढ्यांतच त्यांच्या रहाणीमानाच्या दर्जानुसार बदलतात असे आढळून आले आहे. भारतातील आदिवासी समूह हे शरीराने छोट्या चणीचे आहेत. हे एक समान लक्षण सोडले तर ते समान शारीरिक लक्षणांनी युक्त नाहीत. प्राग् ऐतिहासिक माणसांची शारीरिक लक्षणे हीसुद्धा समान असतात, असेही मानण्यास जागा नाही. चांगले अन्न व नियमित काम ह्यामुळे उंचीत व बांध्यात काही थोड्या पिढ्यांतच फरक पडू शकतो. त्याबाबत जे काही थोडेफार संशोधन झाले आहे. त्यावरून उंची व बांधा

सुधारल्यास कवटीच्या आकारात व नाकाच्या ठेवणींतही फरक पडू शकतो, असे दिसून आले आहे. विविध भाषांचे संशोधन हा दुसरा मार्ग होय. पण ते इतर कुठल्या दृष्टी-कोनांतून उपयुक्त असले तरी आपल्या उद्दिष्टांच्या दृष्टीने फारसे उपयुक्त होऊ शकत नाही. भारतातील मुख्य बारा किंवा तेरा भाषा (व जवळ जवळ ७५३ बोली) पुढे दिलेल्या तीन वर्गात विभागल्या आहेत. १) इंडो आर्यन गट : उत्तरेकडील व पश्चिमे-कडील पंजाबी, हिंदी, राजस्थान व बिहार येथील अनेक बोलीसह बंगाली, गुजराती, मराठी, उडीया २) द्रविडीयन : तेलगू, तामीळ, मल्याळी, कानडी, तुळू वगैरे दक्षिणेतील भाषा ३) आस्ट्रो एशियाटिक गट : ज्यांत मुंडारी, ओरान, संथाली आणि इतर सर्व आदिवासी भाषांचा मारूनमुटकून समावेश केलेला आहे. प्राचीन भारतीय जमातींबद्दल असा एक सिद्धांत मांडला जाई की, आदिवासी लोकांना द्रविडीयन लोकांनी आक्रमण करून प्रथम जगलांच्या कानाकोपऱ्यांत पिटाळून लावले, आणि नंतर आर्यांनी आक्रमण करून द्रविडीयन जमातींना उत्तरेकडून दक्षिणेकडे पिटाळून लावले. ह्या सिद्धांतामधील आर्यांचे आक्रमण हे ऐतिहासिक दृष्ट्या सिद्ध झालेले आहे. पण बाकीचा भाग केवळ कल्पनाविलास आहे. भारताच्या वायव्य भागात 'ब्राहु' भाषा बोलणाऱ्या लोकांचा एक गट आहे. ब्राहू भाषा द्रविडीयन भाषा-गटांत मोडावी. हा समूह म्हणजे आर्य भाषा बोलणाऱ्या समूहांच्या सागरातले द्रविडीयन भाषा बोलणारे एक बेट होय. कदाचित् हा भाषागट–समूह ऐतिहासिक काळात केव्हातरी तेथपर्यंत पोहचला असावा. कारण इ. सनाच्या ११ व्या शतकात अनेक द्रविडीयन्स उत्तरंकडे गेल्याचे उल्लेख आहेत. माणसाच्या जीवनपद्धतीचा भाषेवर जो परिणाम होतो, त्याचे संशोधन भाषाविषयक तज्ज्ञ क्वचित करताना आढळून येतात. भारतातल्या सर्व आदिवासी भाषांना जरी एकाच गटांत कोंबले असले तरी ह्या आदिवासी भाषा ह्या एका गटाच्या नाहीत. आसाममध्ये प्रत्येक खोऱ्यात अनेक टोळ्या [ट्राइब्स] वेगवेगळ्या भाषा बोलतात. तेथील बोलीभाषांची संख्या जवळजवळ एकशे पंचाहत्तर आहे. पण त्या सर्व मुंडारी भाषेच्या किंवा कोणत्याही एका भाषेच्या उपशाखा नाहीत त्याचप्रमाणे आसामी आदिवासी व टोळ्या ह्यांना द्रविडीयन जनसमूहांनी जंगलांतल्या कानाकोपऱ्यांत ढकलून दिले, असेही म्हणतात येणार नाही. द्रविडीयन लोकांनी आक्रमण करून आदिवासीना पिकाऊ जमिनीवरून जंगलात पिटाळून लावले, असा सिद्धान्त मांडणारे विचारवंत हे विसरतात की, लोहयुग येण्या-अगोदर ह्या पिकाऊ जमिनीच्या ठिकाणी दाट जंगले व दलदलीचे प्रदेश होते. प्राथमिक अवस्थेतील मानवसमूह जंगलात खोलवर रहाणे पसंत करण्याऐवजी जंगलांच्या काठावर रहाणे पसंत करीत असत म्हणजे आज त्यांची जेथे वस्ती आढळते, तशाच ठिकाणी ते रहात असत. ज्यांनी प्रथम पशुपालन करावयाला किंवा प्राथमिक पद्धतीने शेती करायला सुरुवात केली. त्यांना दुसऱ्यांना जंगलात लोटण्याची आवश्यकता नव्हती. शेवटचा मुद्दा असा की आर्यांचे आक्रमण जरी ऐतिहासिक दृष्ट्या सिद्ध झाले असले तरी द्रविडीयन आक्रमण सिद्ध झालेले नाही. वंशशास्त्राचा जो अभ्यास अलीकडे झालेला आहे. व त्याची



मला जेवढी माहिती आहे, त्यावरून 'ब्राहू' भाषेवर जरी द्रविडीयन भाषेची जरी छाप असली तरीही ब्राहु भाषा बोलणारे लोक हे द्रविडियन नाहीत. प्राग् ऐतिहासिक मानवाचा–ऐतिहासिक नागर समाजात व संस्कृतीत झालेला विकास ह्या विषयाचा मागोवा घेण्याचा एकच मार्ग आता उरला आहे; तो म्हणजे उत्पादन साधने व उत्पादन-संबंध ह्यांच्या विकासाचा व प्राग् ऐतिहासिक काळाबाबत सापडलेल्या पुराव्यांचा तौलनिक अभ्यास करणे हाच होय! भारतात आता अशा जमाती शिल्लकही नाहीत की, ज्या दगडाचे बाण किंवा भाले (काठीवरील बाणाचे शस्त्र) किंवा दगडी कुऱ्हाडी बनवतात. पश्चिमेकडील घाटातले कातकरी असे सांगतात की त्यांचे बापजादे टोकदार सुळक्यांचे दगडी बाण बनवीत असत. आता हे कातकरी तशा तऱ्हेचे बाण बनवू शकत नाहीत की तसे बनवले गेलेले बाण दाखवूही शकत नाहीत. अंदमानातील आदिवासी समूह हे ब्रिटिशांच्या सहवासात आल्यानंतर काचेची शस्त्रे बनवू लागले. कारण काच ही कुठल्याही दगडापेक्षा अधिक टोकदार होऊ शकते. आदिवासी जमातींतसुद्धा कालांतराने धातूची साधने बनवली जाऊ लागली. दगडाच्या साधनांचा (मॅक्रोलिथ) वापर करण्याचा फक्त एकच अपवाद मला माहीत आहे. दक्षिणेकडील व मध्य भारतांतील धनगर जमातीचे लोक बोकडाचे किंवा मेंढ्याचे लिंगविच्छेदन करण्याकरिता दगडाच्या हत्यारांचा वापर करताना आढळतात, ह्याचे कारणही हे की, निर्जंतुक न केलेल्या धातूंच्या चाकूपेक्षा दगडाच्या हत्याराने केलेल्या विच्छेदनांत जखम चिघळण्याचा धोका कमी असतो. एका विच्छेदन क्रियेनंतर हे दगडाचे शस्त्र टाकून दिले जाते. ज्यू धर्मातील लोकसुद्धा सुंता करण्याकरिता (धातूंची इतर साधने उपलब्ध असतानाही) अणकुचीदार दगडाचा उपयोग करीत होते. कारण हेच की जखम चिघळण्याचा धोका कमी असे. त्याचप्रमाणे लोखंड व पोलाद ह्यांचा वापर अस्तित्वात असतानाही पशुबळी देण्याकरिता रोमन्स दगडी व ब्रॉन्झ कुऱ्हाडी ह्यांचा उपयोग करीत. जुनाट विधी कसे शिल्लक रहातात, हे ह्यावरून दिसून येते.

धनगर हे शेळ्यामेंढ्या पाळणारे भटक्या जातीचे लोक आहेत. दहाबारा धनगर कुटुंबे (त्याला 'वाडी' म्हणतात) जवळजवळ तीनशे साडेतीनशे शेळ्यामेंढ्या घेऊन ८–९ महिने डोंगरपठारांवर फिरतात आणि पावसाळ्याचे चार महिने आपल्या मुक्कामाला परत येतात. आता नव्या जमान्यात धनगर शेती व्यवसायाला उपयुक्त व दुय्यम काम करणारे व्यवसायी झाले आहेत. आता त्यांचे मुख्य उत्पन्न शेळ्यामेंढ्यांचे मांस किंवा जंगलातून गोळा केलेले अन्न नसून, शेतकऱ्यांकडून मेंढ्यां बसवण्याबद्दल मिळणारे पैसे व धान्य आहे. शेळ्या व मेंढ्या ह्यांच्या लेंड्या जमिनीचा कस व उत्पन्न वाढवते. त्यामुळे ह्या भटक्या जमातीचा आठ महिन्यातील जवळजवळ चारशे मैलांचा फेरा ज्या भागातून जात असे त्या जमिनी आता शेतजमिनी झालेल्या आहेत. आता तर ते त्यांची मूळची 'धनगरी' भाषा बोलण्याऐवजी ज्या शेतकरी समाजात ते वावरतात त्यांची (हिंदी किंवा मराठी किंवा इतर) भाषा बोलतात. धनगर अजूनही शेळ्यामेंढ्यांचे मांस किंवा लोकर किंवा जुन्या पद्धतीचे लोकरीचे कांबळे विकून आपल्या मुख्य उत्पन्नात भर घालतात. आज ते ज्या समाजात

वावरतात त्या समाजातील शेतकऱ्यांपेक्षा खालील पायरीवरील जातीचे स्थान त्यांना प्राप्त झाले आहे. असे असले तरीही जुन्या काळात होणाऱ्या त्यांच्या हालचालीचा, म्हणजे कुठल्या प्रदेशात गुरे चारण्याकरिता ते फिरत असत, कुठल्या प्रदेशात ते पावसाळ्यांत मुक्काम करीत, ह्या हालचाली ते कुठल्या मार्गावरून—वाटा आडवाटांवरून करीत असत इत्यादींचा अभ्यास करता येतो. लक्षात येण्यासारखी खास वस्तुस्थिती ही होती की, धनगरांच्या ज्या सगळ्यात चांगल्या जुन्या वाटा आहेत त्यातील सर्वात उत्तम कऱ्हा नदीच्या डाव्या किनाऱ्याने जाणारी वाट होय [जेथे कधीच घनदाट जंगले नव्हती]. ही वाट प्राग् ऐतिहासिक काळापासूनची असावी; कारण ह्याच वाटेवर लहान व चकचकीत दगडी साधनांचे (मॅक्रोलिथस) साठे सापडले आहेत. वेगळ्या शब्दात सांगायचे म्हणजे धनगरांच्या जीवनपद्धतीची मुळे प्राग ऐतिहासिक काळापर्यंत खोल रुजलेली आहेत. धनगर समाजामध्ये प्रेते जाळण्याप्रमाणे पुरण्याची चाल अस्तित्वात आहे. पण त्यांची जुनी पद्धत मृतांना पुरण्याचीच होती. पुरण्याच्या प्रथेपासून दहन करण्याची प्रथा ही भारतात झालेली प्रगती आहे. विठोबा व खंडोबा हे धनगर जमातीचे खास देव. त्यांच्या अस्तित्वाचा मागोवा इ. सनाच्या चौथ्या शतकापर्यंत लागू शकतो. अर्थातच हे देव आता सर्व हिंदु समाजाची 'दैवते' झाली आहेत. 'वीर' नावाचे देवस्थान असे आहे की, ज्या ठिकाणी तेथील दैवताला (मूळ पुरुषाला) वर्षातून एकदा मानवी बळी देण्याची प्रथा बराच काळ चालू होती. हे दाखवणाऱ्या खुणा अजूनही आहेत. पण ह्या ठिकाणी रहाणारे लोक आता धनगर जातीचे नाहीत. अर्वाचीन काळातील शेती व्यवसाय अंगिकारल्यानंतर त्यांच्या मूळ जातीत फेरबदल झाला आहे. पण 'वीर' येथील मूळ वस्ती स्थापन करणारा मूळ पुरुष हा धनगर होता व तो धनगरांचा 'देव' मानणारा होता. ह्याबद्दल अगदी पक्का आणि वादातीत पुरावा आहे.

आपण धनगरांप्रमाणे इतर समाजांचाही अभ्यास करू शकतो. उदा.–भिल्ल घ्या. मुळात हे आर्यपूर्व जमातीचे लोक आहेत, पण द्रविडियन्सही नाहीत. आता ही जमात डोंगरावरती किंवा कडेकपारीमध्ये असणारी सगळ्यात कमी कस असलेली शेती करणारे निम-आदिवासी समूह झालेले आहेत. अजूनही ते धनुष्यबाण वापरणारे, शिकार करणारे, मासे मारणारे व जंगलातील अन्न गोळा करून जगणारे असे मानवसमूह आहेत. मध्ययुग काळात त्यांनी पशुपालनाचाही काही प्रयत्न केला आहे व शेती व्यवसाय हा अगदी अलीकडच्या काळांतच त्यांनी सुरू केला. (जंगलातील जमीन त्यांना कसावयास मिळू लागली आहे.) त्याचा परिणाम असा झाला आहे की, त्यांची बोली भाषा ज्या गुजर जमातीची गुरे ते वळवतात किंवा ज्यांची निकस जमीन ते करतात, त्यांच्या भाषेच्या—गुजराती भाषेच्या—जवळपास आली आहे. हा नेहमीचाच प्रकार आहे. जेव्हा दोन मानवसमूहांच्या भाषांचा एकमेकांशी संबंध येतो, तेव्हा ज्या मानवसमूहांची उत्पादन पद्धती अधिक प्रगत असते, अशा समूहांची भाषा दुसऱ्या भाषेवर प्रभाव पाडते. खुद्द भिल्ल भाषेचा प्रभाव भिल्ल जमातीशी दुय्यम स्थान असणाऱ्या नहाल ह्या जमातीच्या



भाषेवर पडलेला आहे. भिल्ल जमातीपेक्षा नहाल जमातीचे लोक एकेकाळी वेगळी भाषा बोलत असत. आता ते भिल्लांची भाषा बोलतात. ह्या भिल्ल टोळ्यांचे खास वैशिष्ट्य हे की जरूर पडेल तेव्हा त्यांनी लढाया केल्या आहेत; पण नियमितपणे सैनिकी पेशा पत्करलेला नाही. खिस्तपूर्व पहिल्या शतकात भिल्लांपैकी काही माळवा प्रांतात राजे झाले. पण ते राजघराणे लवकरच नष्ट झाले. तसेच गोंड ह्या जमातीचे लोक अजूनही आदिवासी अवस्थेत आहेत; पण सरंजामदारीच्या काळांत गोंड राजे होऊन गेल्याचे ऐतहासिक उल्लेख आहेत. ही गोंड सरदार घराणी अजूनही अस्तित्वात आहेत. पण ते स्वतःला बाकीच्या आदिवासी गोंडांपासून वेगळे व वरच्या दर्जाचे समजतात. निलगिरी पर्वतावरील तोडा लोक व त्यांची जीवनपद्धती हा वंशशास्त्रज्ञांचा खास विषय आहे. सगळ्यांत मागासलेले चेंचू जमातीचे लोक; त्यांची मूळ भाषा नष्ट झाली आहे. आता ते ज्या शेतकऱ्यांकडे काम करतात त्या शेतकऱ्यांची 'तेलगु' भाषा बोलतात. ह्या सगळ्यांचा अर्थ असा की मागासलेल्या समाजाचा जेव्हा इतर प्रगत उत्पादनतंत्र असलेल्या समाजांशी संबंध येतो, तेव्हा प्रगत उत्पादक समाजाचा प्रभाव त्यांच्यावर पडतो.

प्राचीन भारतीय संस्कृतीचा अभ्यास करणारे अनेक विचारवंत जुन्या आदिवासी व टोळी समाजपद्धतीच्या जीवनाचे व संस्कृतीचे कोठले परिणाम शेती व्यवसायी समाज व नागर संस्कृती ह्यांच्यावर झाले ह्याचा अभ्यास करण्यास विसरतात. अजूनही अनेक जमाती व टोळीसमूह (उदा.–पश्चिमेकडील किनाऱ्यावरील गावडा, ओटाओ, संथाल, कोलना वगैरे) ज्याला 'शिफ्टींग कल्टीवेशन' म्हणतात. त्या पद्धतीने म्हणजे कसण्याची जमीन पाळीपाळीने बदलून कसत असतात. जमिनीवरील गवते वगैरे जाळली जातात. त्यांच्या राखेत बी टाकले जाते. कधी कधी लाकडाच्या दांड्याने (ज्याला मराठीत 'टोंब्या' म्हणतात) लहान लहान खड्डे खणून त्यांत बी टाकले जाते व पीक काढले जाते. वर्ष दोन वर्षांत ह्या जमिनीचा कस नष्ट होतो व नव्या जमिनीचा पट्टा वर सांगितल्याप्रमाणे जाळला जातो. जुन्या जमिनीच्या पट्ट्यांवर सहा ते दहा वर्षांत पुन्हा झाडेझुडपे उगवतात. पुन्हा तो जमिनीचा पट्टा जाळून ती जमीन पेरणीकरिता वापरण्यात येते.

ह्या पद्धतीने काढलेल्या पिकावर पद्धतशीरपणे नांगरणी केलेल्या जमिनीप्रमाणे जास्त लोक जगू शकत नाहीत. पण नांगराने करावयाच्या शेतीकरिता जास्त श्रम करावे लागतात. जमिनीची खुरपणी करणे, त्यातील दगडधोंडे काढून टाकणे, तण काढून टाकणे, नांगरणी करणे, वगैरे प्रक्रिया कराव्या लागतातच; पण जमिनीचा कस कायम ठेवण्याकरिता खत-पाणीही करावे लागते. त्याचा अर्थ असा की, ही सर्व साधने, नांगर, बैल वगैरे सर्व साधने ह्याच्या जोडीला जमिनीची ठराविक तुकड्यांत विभागणी होणे व अशा तुकड्यांच्या जमिनीची खाजगी मालकी होणे हे ओघानेच आले. अन्नाच्या विपुलतेबरोबर लोकसंख्या वाढून भिन्न वर्ग निर्माण होतात.

महाराष्ट्रांतील अनेक खेड्यांमध्ये अजूनही नांगरणीबरोबर भाजणीची पद्धतही साधारणपणे अस्तित्वांत आहे. अर्थात ही पद्धत गावाबाहेरील खडकाळ नापीक जमिनीवर

काही जादा पिके काढण्याकरिता वापरली जाते. भाताची रोपे तयार करण्याकरिता जमीन तयार करण्याची पद्धत वापरली जाते. ती ह्या 'स्लॅश अॅन बर्न' पद्धतीवरून उचललेली आहे हे दिसून येते. ह्या जमिनीवर वाफे तयार करताना त्यावर झाडांची पाने, खते, माती व भुसा ह्यांचे थर थापतात. हे थर काही प्रमाणात वाळेपर्यंत आणि तरीही काही प्रमाणात ओलावा असेपर्यंत सुकू देतात. तसा ओलावा असतानाच त्याला आग लावली जाते. मग हे थर धुमसतात. ह्यांच्या धगीमुळे नव्या रोपांना लागणारे खत हे ह्या थरांत (वाफ्यांत) रुजले जाते. मग ह्या थरात (वाफ्यांत) रोपे केली जातात. ही रोपे वाढल्या-नंतर ती शेतांत लावली जातात. हे वाफे त्यामुळे रिकामे होतात तेव्हा शेतकरी ह्या वाफ्यात कडधान्ये, डाळी वगैरेंची पिके काढतात. ह्या पद्धतीवरूनच क्रॉप रोटेशन म्हणजे आळीपाळीने पिके लावण्याच्या उपयुक्त पद्धतीचा शोध लागला असावा.

डोंगराच्या उतारावरील शेती करताना अजूनही शेतकरी किंवा आदिवासी, टोंब्यांचा उपयोग करतात. प्राग ऐतिहासिक काळातील लोकसुद्धा अशाच टोंब्यांचा उपयोग करीत. फरक फक्त इतकाच आहे की, ठोंब्यांचे वजन पडावे ह्याकरिता पूर्वीच्या काळी त्याच्या खालच्या बाजूला गोल दगडांची वेटोळी लावीत. आताचा टोंबा लोखंडाचा व लांब असतो आणि त्याला अणकुचीदार टोक असते. असे असूनही त्याचे मूळ स्वरूप जुन्या टोंब्यातच आहे हे सहज समजते.

डोंगरावरील शेतात नाचणी, वरी, शाम्ब ही कमी कसाची पिके काढली जातात. काही ठिकाणी ही धान्ये जंगलातही उगवलेली आढळतात. डोंगराळ उतारावरील जमिनींवर नेहमीच्या पद्धतीने नांगरणी करणे जरूर किंवा शक्यही नसते. पण ह्या जमिनी वारंवार आठदहा वर्षे पडीक ठेवाव्या लागतात. डोंगरामध्येच सपाट केलेल्या जमिनीच्या लहान तुकड्यांवर नांगराऐवजी कुदळी वापरतात. हे काम स्त्रिया करतात. त्यामुळे पुरुषांच्या अधिक श्रमाच्या शेतीला जोड मिळू शकते. प्राथमिक अवस्थेतील बहुतेक टोळी-संघ समाजांत टोंब्यांचा किंवा कुदळीचा उपयोग करून शेती करण्याचे काम स्त्रियांकडे असे. शिकार करण्याचे काम मात्र पुरुषांकडे असे. मच्छीमार हा आता काही खास जातींचा व्यवसाय झाला आहे. पण पूर्वीपासून काही जमातीचे लोक जाळ्यांचा उपयोग केल्याशिवाय मासेमारी करीत असत. ते माशांना एखाद्या चिंचोळ्या वाटेत किंवा झाडाच्या पानांनी बांधलेल्या छोट्या जागेत ढकलीत व हाताने मासे पकडीत असत. ह्या तऱ्हेने अजूनही ज्या ठिकाणी मासेमारी होते; अशा ओढ्यांच्या व नद्यांच्या तीरांजवळील डबक्यांच्या जवळ मला अनेक मॅक्रोलिथस म्हणजे छोट्या दगडांची साधने सापडली आहेत. मातीच्या भांड्याबाबतही तसाच अनुभव आहे. सिंधू संस्कृतीच्या प्रदेशात पाच हजार वर्षांपूर्वी जलदगतीने फिरणाऱ्या चाकावर बनवलेली मातीची भांडी उत्खननांत सापडली आहेत. पण दक्षिणे-तल्या उत्खननांत चाकाशिवाय केवळ हातांनी बनवलेली ओबडधोबड भांडीही सापडली आहेत. ती प्राग् ऐतिहासिक मानवांनी बनवलेली आहेत. अजूनही काही थोड्या ठिकाणी त्याच प्रकारे त्याच पद्धतीची भांडी बनवली जातात. एका पद्धतीत शेवता नावाचे अगदी



हळू फिरणारे चाक वापरतात किंवा कधी कधी चाक वापरलेही जात नाही. खास वैशिष्ट्य हे की, चाक फिरवण्याचे काम स्त्रियाच करतात. लाकडाच्या पट्टीने पुरुष मातीच्या गोळ्याचा बाहेरचा भाग सारखा करतात, तर मुठीएवढ्या दगडाच्या ऐरणीवर तो गोळा दाबून फिरवण्याचे काम स्त्रिया करतात. उत्खननात अशा दगडाच्या ऐरणी दोन ते तीन हजार वर्षांचा जुना काळ दाखवणाऱ्या थरांत मिळालेल्या आहेत. प्राग् ऐतिहासिक काळात मातीची भांडी बनवण्याचे काम मुख्यत: स्त्रिया करीत असत. अर्थात नंतरचे कुंभाराचे चाक हे खास पुरुषांचे 'साधन' होते.

## २.५
## प्राथमिक समाजव्यवस्थेतील सांस्कृतिक अवशेष

जर उत्पादनतंत्रात प्राथमिक व प्राग ऐतिहासिक पद्धतीचे अवशेष एवढ्या मोठ्या प्रमाणात सापडतात तर समाजव्यवस्थेत तशा प्रकारचे अवशेष शिल्लक न राहिले तरच आश्चर्य! प्रत्यक्षात आजच्या समाजव्यवस्थेत असे अनेक अवशेष परंपरा व श्रद्धा ह्या स्वरूपात शिल्लक आहेत. उदाहरणार्थ अगदी श्रीमंत घरात दिवाबत्तीकरिता विजेचा किंवा तेलाचा उपयोग केला जातो; पण वाटण वाटण्याकरिता सपाट पाट्याचा व वरवंट्याचा उपयोग केला जातो. पाटा वरवंटा हे चक्क अश्मयुगातले साधन आहे. पाट्याच्या आकारात आता (काही प्रदेश सोडून) फरक झाला आहे. खोबरे, मिरच्या किंवा मसाले वाटण्याकरिता अजूनही त्याचा उपयोग केला जातो. प्राग् ऐतिहासिक काळाने हा पाटा-वरवंटा वापरणाऱ्या लोकांवरही आपला ठसा उमटवलेला आहे. वरच्या जातीतील व वर्गांतील स्त्रिया वाटण करताना वरवंट्याचा वरचा भाग धरून वाटण करतात, तर खालच्या जातीतील स्त्रिया वरवंट्याची दोन्ही चिंचोळी टोके धरून वाटण करतात. अर्थात दुसरी तऱ्हा ही जास्त कष्टदायक आहे. पण जुन्या खोलगट पाट्यामध्ये — ज्यामध्ये धान्य व डाळी ह्यांचेही पीठ करण्यात येई—वरवंट्याचे टोक धरणेच जास्त योग्य व सुलभ असे. धान्याचे पीठ करण्याकरिता सर्व ठिकाणी जाते वापरले जाते किंवा जेथे विजेची उपलब्धता असेल तेथे त्यावर चालणारे यंत्र वापरले जाते. आताच्या बिनकसबी मजूर वर्गात मुख्यत: कनिष्ठ जातींतून आलेल्या लोकांचाच जास्त मोठा भरणा आहे.

समाजात जी वर्गीय व जातीय विषमता झाली त्याचे महत्त्वाचे कारण हेही आहे की, काही जमाती ह्या धान्योत्पादनाच्या सामाजिक अवस्थेनंतरच्या काळात पोहोचल्या. त्यामुळे मागासलेल्या राहिल्या व शोषीत झाल्या. हे एक महत्त्वाचे ऐतिहासिक व सामाजिक सत्य आहे. अन्नोत्पादक तंत्राचा प्रभाव समाजातील वरिष्ठ स्तरांवर लवकर पडला आणि त्या तंत्राशी निगडित अशी (नांगर, जाते वगैरे) साधने लवकर वापरू लागल्या. ह्याच वरवंट्याशी निगडित असा एक अर्थगर्भ प्रघात फार पूर्वीपासून चालत आलेला आहे. कोठल्याही हिंदुधर्मग्रंथात त्याचा उल्लेख आढळून येत नाही. पण तरीही तो

वर्षानुवर्षे चालत राहिलेला आहे. मूल जन्माला आल्यानंतर दहाव्या दिवशी (काही ठिकाणी सहाव्या किंवा बाराव्या दिवशी) मुलाच्या पाळण्याभोवती वरवंट्याला आडवेतिडवे फिरवण्यात येते. नंतर त्या वरवंट्याला कुंची टोपी घालून पाळण्यात घातले जाते. वरवंट्यासारखाच मुलगा स्वच्छ व कणखर व्हावा ही इच्छा ह्या विधीतून दिसून येते. त्यानंतर ह्या वरवंट्याला शेंदुर फासण्यात येतो व त्याला पुष्पमाला घातली जाते. असे विधी अनेक सूचक आणि गुंतागुंतींच्या कल्पनांनी भरलेले असतात. शेंदुर थापून माळ घालणे म्हणजेच त्या वरवंट्याला एकाच वेळी मूल व मातृदैवत अशा दोन्ही स्वरूपात पाहिले जाते. ही प्रथा महाराष्ट्रांतील ब्राह्मण वर्गासह सर्व वर्गांच्या स्त्रियांत कित्येक वर्षे चालत आहे व ती निश्चितपणे प्राथमिक अवस्थेतील समाजापासून घेतली आहे. ह्या विधीला ब्राह्मण पुरोहित किंवा पुरुषवर्ग हजर रहात नाहीत, हे खास लक्षात ठेवले पाहिजे. अशा प्रथांवरून अन्न गोळा करणाऱ्या व अन्नोत्पान करणाऱ्या समाजांत आपसात झालेल्या सांस्कृतिक देवघेवीची प्रक्रिया दिसून येते. अशा अनेक जुन्या प्रथा ह्या आदिवासी जनते-मध्ये व खालच्या जातींतील स्त्रियांच्यात प्रचलित आहेत. सर्वसाधारणपणे असा पुरातन ठेवा स्त्रियांनीच जतन केला आहे. पण दुर्दैवाने प्रत्यक्ष संशोधन करणारे कार्यकर्ते पुरुष असल्यामुळे त्या बाबतची माहिती देण्यास स्त्रिया उत्सुक नसतात. स्त्रियांनी जे अनेक शब्द जपून ठेवलेले आहेत. त्यावरून कदाचित जुन्या आदिवासी भाषांचाही काही पत्ता लागू शकेल. अर्थात ते काही सोपे काम नाही.

अनेक जुन्या धार्मिक चालीरीती व पद्धती ह्यांचा मागोवासुद्धा अगदी प्राग् ऐतिहासिक काळापर्यंत जातो. वसंतोत्सवामधील होळीचा सण साजरा करण्याची पद्धत उदारणादाखल घेता येईल. आता होळीच्या प्रसंगी अत्यंत बीभत्स धांगडधिंगा घालतात ते सोडा पण होळीच्या दिवशी अग्नीभोवती नृत्य करण्याची व काही ठिकाणी अग्नीवरून चालण्याची प्रथा होती. होळीच्या दुसऱ्या दिवशी स्त्री पुरुष उघडपणे एकत्र येऊन लैंगिक हावभाव करीत. ज्या काळात पुरेसे अन्न मिळू शकत नसे व जनन कठिण असे, अशा काळांतील अधिक विमुक्त स्त्री-पुरुषसंबंधांचे अवशेष आहेत. आजच्या काळांत जास्त श्रम करून जास्त अन्न मिळवता येते. त्यामधून लैंगिक भूक व त्या प्रश्नाकडे पाहण्याचा दृष्टीकोन ह्यांत बदल झाला आहे. त्यामुळे जुन्या विधींना आजचे बीभत्स व विकृत स्वरूप आलेले आहे. होळीच्या सणांतील काही प्रथांवरून ह्या प्रथा प्राग् ऐतिहा-सिक काळांतील मातृप्रधान समाजाशी संबधित असाव्यात असे दिसून येते. काही ठिकाणी एक पुरुष स्त्रीवेष धारण करतो (त्याला 'कोळीना' असे म्हणतात) व बाकीचे त्याला घेऊन होळीभोवती नाचतात. बंगलोरमधल्या सुप्रसिद्ध 'कारगा' समारंभात भाग घेणाऱ्या प्रमुखाला स्त्रीवेष धारण करावा लागतो. फासेपारधी जमातीचे अनेक विधी पुरोहिताला (भगवे) स्त्रीवेष धारण करूनच करावे लागतात. पुरुष प्रधान कुटुंब व्यवस्था आल्यानंतर अनेक विधी प्रथा व प्रघात ह्यांचा पुरुषवर्गाने ताबा घेतला असला तरीही जुन्या काळी ह्या विधींवर स्त्रियांचीच मक्तेदारी होती. ब्राह्मणी ग्रंथांत व पुरातन कथांत ज्यांचा उल्लेख



केला गेला आहे, अशी अनेक दैवते व स्थाने ही मुळांत मातृदैवतांची स्थाने होती. अजूनही रस्त्यापासून दूर खेड्यापाड्यांत अशी अनेक मातृदैवतस्थाने अस्तित्वात आहेत. ज्या ठिकाणची पूजा-अर्चा आदिवासी जमातींच्या पुरोहित वर्गाच्या हातात आहे, अशी स्थाने सोडली तर अशा अनेक देवळात आता स्त्रियांना मज्जाव करण्यात आला आहे. जेव्हा मातृसत्ताक पद्धतीच्या समाजाचे पितृसत्ताक समाजात परिवर्तन झाले, तेव्हा जुन्या विधी प्रकारात बदल करण्यात आले. पुरोहितपद हे पुरुषांकडे आले.

ग्रामस्थांच्या देवदेवतांचा तर्कशुद्ध अभ्यास करणे हेसुद्धा मोठे उद्बोधक ठरावे. ह्या सर्व देवदेवता दगडाच्या तुकड्यांवर लाल किंवा भगवा शेंदुर लावून बनवलेल्या असतात. हा रंग म्हणजे रक्त सिंचनाला आलेला पर्याय आहे. अजूनही अशा अनेक देवदेवतांना खास प्रसंगी पशुबळी देण्यात येतो. जेव्हा ही गावे शेती-व्यवसायामुळे संपन्न झाली आणि ब्राह्मणी संस्कृतीचे संस्कार त्यांच्यावर झाले तेव्हा त्या देवाचे मारुती, गणपती किंवा वेताळ अशा ठराविक देवांत त्यांचे रूपांतर झाले. काही ठिकाणी दगडांच्या ओबडधोबड तुकड्यांऐवजी कशाबशा घडवलेल्या मूर्तीही आल्या. पण तरीसुद्धा ह्या देवतांचे मूळ ओबडधोबड स्वरूप कधीच संपूर्णपणे बदलू शकले नाही. नागरी संस्कृतीच्या क्षेत्रातील विकास पायरी पायरीने कसा झाला हे आजसुद्धा दाखवता येते. ज्या ठिकाणी जुन्या प्राग् ऐतिहासिक दैवस्थानाच्या जागी सुधारलेली देवळे आली, तेथून थोड्याच अंतरावर जुने ओबडधोबड दगडी दैवतस्थान अजूनही पूजले जाते असे आढळून येईल. त्याचे तेच जुने नाव कायम आहे किंवा कसे हे सांगण्याचा मात्र काही मार्ग नाही. एक लक्षात ठेवण्यासारखा अपवाद म्हणजे बुद्ध जन्माच्या ठिकाणच्या देवताचा. ह्या ठिकाणची देवता लुम्मीनी (रुम्मीनी) ह्याच नावाने गेली पंचविशे वर्षे पूजली जात आहे. जुन्नर येथील मानमोडी नावाची देवता ही इसवी सनाच्या सुरुवातीच्या काळात ज्या ठिकाणी बौद्ध लेणी खोदली गेली तेथे होती आणि बुद्ध धर्माचा प्रभाव नष्ट झाल्यानंतर हजार वर्षांनी पुन्हा त्याच नावाने तेथे अवतरली. अनेक वेळा एखादे दैवत नवसाला पावते असे समज झाल्यामुळे लोकप्रिय होते. आणि त्यानंतर ते दैवत शिव किंवा विष्णु अशा देवांचा किंवा लक्ष्मी, पार्वती, अशा देवींचा अवतार मानले जाऊ लागले. काही देवता अशा आहेत की एखाद्या विशिष्ट विभागात त्यांचे चांगलेच प्रस्थ आहे पण; त्यांच्या नावाचा नेमका उगम कसा झाला, हे मात्र सांगता येत नाही. मेंगाई, मांधाई, सोंगजाई, उदालाई, कुंभालजा, झांझानी वगैरे देवतांचा ह्या संदर्भात उल्लेख करता येईल. ह्या देवतांच्या नावाचा शेवट 'आई' ह्या शब्दाने होतो, म्हणजे ही मातृदैवते आहेत. कदाचित असेही असू शकेल की, आता अस्तंगत पावलेल्या (किंवा मोठ्या समाजात संपूर्णपणे मिसळून गेलेल्या) काही मूळ आदिवासी जमाती व टोळ्या ह्यांच्या त्या देवता असाव्यात. पेडण्या जवळील बोलाई देवतेची अजूनही एका प्रचंड प्राग् ऐतिहासिक दगडी देवळात पूजा करण्यात येते. (वास्तविक गायकवाड ह्या मुळात धनगर आणि नंतर सरंजामदार झालेल्या घराण्याने तेथून मैलभर अंतरावर ह्याच देवतेचे अद्ययावत् मंदिर बांधलेले आहे.) इ. सनाच्या १२ व्या

शतकापासून ह्या दैवताचे अस्तित्व असल्याचा पुरावा आहे. सर्वसाधारणपणे मातृदैवते ही काही कुळांची व जातीजमातींची खास दैवते असतात. सर्व समाजाची नसतात. पण अशा दैवतांचा प्रभाव त्या कुळाच्या जातीजमातीच्या बाहेर वाढतो. ह्याचे एक कारण त्या दैवतांचे स्थलांतर होते. उदा.—बोलाईच्या देवळापासून साठ किलोमीटर अंतरावर एका गावांत बोलाईचे परंपरागत भक्त आहेत. त्या सर्वांचे आडनाव 'वाजी' (घोडा) असे आहे. बोलाई देवता चोराबरोबर पळून गेली, अशी दंतकथा आहे. त्यावरून ही देवता बराच काळ नागर संस्कृतीच्या कह्यांत न गेलेल्या टोळ्यांची देवता असावी, असा तर्क करता येतो. ह्या भागात जनसमूहांची एवढी स्थलांतरे झाली आहेत की, आदिऐतिहासिक काळांपासून सतत पूजा चाललेली आहेच, असे सांगता येणार नाही. पण स्थलांतर करणाऱ्या टोळ्यांच्या स्मृतींमध्ये मात्र ह्या नवसाला पावणाऱ्या मूर्ती ह्या नेहमीच अतिमानवी शक्तीशी निगडित राहिल्या. टोळीसंघ-समूह संस्कृतीत देव किंवा दानव (चांगले व वाईट करू शकणाऱ्या शक्ती) ह्यांची पूजा त्याच्यापासून सुरक्षित रहावे ह्याकरिता केली जाई. सर्वसाधारणपणे असे घडते की, एखाद्या शेतकऱ्याच्या स्वप्नांत एखादी देवी किंवा वेताळ दिसतो. ह्या देवतेही घुमटी जवळपास असेल, तर तेथे जाऊन तो पुन्हा स्वप्ने पडू नयेत म्हणून तो त्या देवतेला नारळ देतो. तर कधी कोंबडा तर कधी बकरा बळी देतो. कधी ही देवी स्वप्नात नव्या जागी दिसते तेव्हा शेतकरी– खास करून त्या वर्षी चांगले पीक आले असेल तर नव्या जागी अशा देवीची स्थापना करतो व त्या ठिकाणी पूजाअर्चा चालू होते. बहुतेक ठिकाणी अशा मूर्ती शेंदुर थापलेल्या दगडाच्या आहेत किंवा ओबडधोबड आकार असलेल्या मूर्तीच्या आहेत. जेव्हा एखादे कुटुंब जुन्या देवतेची नवीन जागी पूजा सुरू करीत असे, तेव्हा हळूहळू ह्या देवतेचे प्रस्थ वाढे. जर अशा देवतेने सबंध समाजाला दुष्काळ, रोगराई, संकट ह्यापासून वाचवले तर त्याचे प्रस्थ सबंध समाजांत वाढत जाई. एक खास गोष्ट अशी की, नवनव्या देवता ह्या जुन्या प्राग् ऐतिहासिक देवतांच्या स्थानांवरच ओबडधोबड दगडी आकारांत तयार केलेल्या स्वरूपात आढळतात. काही वर्षांपूर्वी अशा एका दगडी मूर्तीचा शोध मला पुण्याजवळच्या जंगलात लागला. त्या भागात वेताळाची पूजा करणाऱ्यांना जेव्हा ती मूर्ती मी दाखवून दिली तेव्हा त्यानी ताबडतोब त्या मूर्तीची लाल शेंदुर लावून व हार घालून प्रस्थापना केली. आता हे दैवत बरेच लोकप्रिय झाले आहे व त्याचे नाव 'नंदी' (शिवाचे वाहन) असे ठेवण्यात आले आहे.

भारतीय जीवनात जुन्या प्राथमिक समजुतींचे अवशेष अद्यापही शिल्लक राहिलेले आहेत. अजूनही मासिक पाळीच्या काळांत स्त्रियांना स्पर्श करणे म्हणजे विटाळ होणे असे समजले जाते. हा निर्बंध आता नव्या शहरी जीवनामुळे मोडत चालला आहे. अजूनही खास समारंभप्रसंगी गोंधळी समाजातल्या लोकांना 'गोंधळ' घालायला बोलवण्यात येते. ह्या गोंधळी लोकांचे वैशिष्ट्यपूर्ण संगीत व गाण्याची पद्धत असते. गोंधळी हे नांव जुन्या गोंड आदिवासी समाजाशी मिळते जुळते आहे. अजूनही अनेक खेड्यापाड्यात आणि गावात घरांच्या पुढच्या भागात किंवा ओव्यावर झोपाळा बांधण्याची पद्धत आहे. साधारणपणे प्रथितयश कुटुंबांकडे असा झोपाळा असतो. ह्या झोपाळ्याची कडी चामड्याच्या वादीत अडकविण्याची पद्धत अगदी अलीकडच्या काळांपर्यंत होती. काही शतकांपूर्वी ही वादी कमरेच्या जागी असलेल्या मांसपेशी व कातडी ह्यांची केलेली असे. ही अश्मयुगीन पद्धत कित्येक शतके चालू होती. त्याचप्रमाणे अनेक जुन्या विधीप्रसंगी असलेल्या मानवबळी ऐवजी पशुबळी देण्याची पद्धत नंतरच्या काळांत रूढ झाली (मानव बळी होण्याचा मान अर्थात काही ठराविक जमातीमधील माणसांनाच मिळत असे) ज्या माणसाला बळी देत असत, त्याची बळी देण्यापूर्वी देवासारखी पूजा केली जाई.

देवदेवतांबद्दल असणाऱ्या श्रद्धांचा अभ्यास करून त्या कशा अस्तित्वात आल्या; हे पाहिले पहिजे. केवळ मानसशास्त्र व समाजशास्त्र ह्या दृष्टीकोनातूनच त्याचा अर्थ लावण्याचा प्रयत्न पुरेसा नाही. अनेक श्रेष्ठ देवांना (वरच्या दर्जातील ब्राह्मणी देव) एक किंवा अनेक बायका आणि पुत्रपौत्र असतात. त्यांच्या परिवारात भूते किंवा राक्षससुद्धा असतात. गणपतीसारखा मानव व हत्ती ह्यांचा संयोग असलेला देव हा शिवपार्वतीचा मुलगा मानला जातो. हे देव निरनिराळ्या आदिवासी समूहांच्या पशुदैवतांवर आरूढ होत असल्याचे दाखवले जाते. ह्या सगळ्याला एक खोल आणि ऐतिहासिक अर्थ आहे. ह्या श्रेष्ठ देवांचा परिवार, त्यांचे भूत राक्षस गण आणि त्यांची वाहने ह्या सर्वांतून वेगवेगळ्या विविध समूह टोळीसंघाच्या एकत्रीकरणाची प्रक्रिया दिसून येते. समग्र समाजाच्या उदयाची लक्षणे देवदेवतांच्या नात्यागोत्यांत व संबधांत दिसून येतात. ह्या देवदेवतांच्या एकत्रीकरणाला श्रद्धा व धर्म ह्यांचे अधिष्ठान देण्याकरिता अनेक पुराणे लिहिली गेली. सर्व पुराणे अतिप्राचीन कालापासून (किंवा पहिल्यापासून) अस्तित्वात आहेत असा दावा केला जात असला, तरी पुराणे इसवी सनाच्या सहाव्या ते बाराव्या शतकांत लिहिलेली आहेत. त्यात वारंवार फेरबदलही केलेले आहेत. ह्या पुराणात अंधश्रद्ध जनतेला भारून टाकणाऱ्या दंतकथा आहेत. त्यानंतर देवांचे सरंजामदारी दरबार भरवले गेले. त्यांच्या जीवनकथा रचण्यात आल्या. अद्भूततेची वलये असलेली, समजण्यास कठिण अशी तत्त्वज्ञाने निर्माण करण्यात आली. पुढील काळांत तत्त्वज्ञाने, गूढवादी संप्रदाय ह्याची सुधारलेली अवस्था आली. भारतातील धार्मिक विकास हा अशा विविध अवस्थांतून गेला आहे. अन्न दैवतांचे किंवा मातृदैवतांचे एकत्रीकरण (किंवा समन्वयीकरण) एकाच वेळी किंवा सतत झाले असे नाही; पण निरनिराळ्या ठिकाणच्या स्थानिक दैवतांचे अनुयायी हे जसे नागर सामाजात समावले गेले, तशी ती प्रक्रिया सर्व देशभर निरनिराळ्या काळी चालू राहिली. ज्या जमाती आपल्या पूजादैवतांसह व्यापक शेती व्यवसायी समाजात सामावल्या गेल्या त्यांनी आपली वैशिष्ट्ये व वेगळेपणा टिकून धरण्याचा हरतऱ्हेने प्रयत्न केला. जातीपातीच्या व्यवस्थेमुळे हे प्रयत्न यशस्वी झाले. समाजाला आवश्यक असे उत्पादन करण्याचा कोणताही व्यवसाय न करणाऱ्या ब्राह्मण पुरोहित वर्गाने अशा प्रयत्नांना उत्तेजन

दिले. कारण त्यामुळे अशा प्रत्येक जमातीचे वेगवेगळे धर्मकार्य किंवा पूजाविधी करण्याची कामे त्यांच्याकडे आली. अनेक जाती तर एकमेकांशी रोटी व्यवहारसुद्धा करीत नाहीत. बेटी व्यवहार तर जवळजवळ जातीपुरता बंदिस्त होता. ज्यांच्याशी रोटीबेटी व्यवहार होऊ शकतो ते आपले खास. जात वा उपजात म्हणजे रक्ताचे नाते ज्यांच्याशी जोडता येते ते अशी व्याख्या झाली. प्राथमिक अवस्थेतही ज्या दोन मूळ रक्तसंबंधी समूहांमध्ये (क्लॅन्स) अतिरिक्त अन्नाची देवघेव होऊ शकत असे, त्याच दोन समूहांमध्ये आपसात विवाह होऊ शकत असत. जातींतच रोटीबेटी व्यवहार करण्याची प्रथाही अशा जुन्या (क्लॅनीश व ट्रायबल) प्रथेतूनच वाढीला लागली. ह्या सर्व जातीव्यवथेत ब्राह्मण वर्गाचे जे अग्रस्थान होते, त्यामुळे ही जातीव्यवस्था टिकू शकली. त्यांच्या हातचे अन्न सर्व जातीचे लोक खाऊ शकत, पण त्यांच्या मुली मात्र ब्राह्मणाशीच लग्न करू शकत. पुढे उत्पादन-संबंध बदलले तरी वेगवेगळ्या समूहांना अलग अलग आणि तरीही एकत्र बांधून ठेवणारा जातीचा दुवा शिल्लक राहिला. **जाती व्यवस्था ही मुख्यतः उत्पादनाच्या प्राथमिक पातळीवरची वर्गव्यवस्थाच होती.** जातीचा दुवा हा शेत व्यवसायी समाजांतील वेगवेगळ्या कुटुंबांना साधणारा रक्ताच्या नात्याचा दुवा होता. पण त्याचबरोबर काही जाती व्यवसायाप्रमाणे ठरवल्या गेल्या. श्रेणींनी जातीची जागा घेतली. बैदु, वडार, विणकर, कोळी, चांभार, सुतार ह्या जाती व्यावसायिक आहेत वनंतर तसा व्यवसाय करणाऱ्या सर्वांना त्याच जातीच्या नावाने ओळखण्यात येऊ लागले. त्यात उपजातीही निर्माण झाल्या. अनेक जातींचे टोळी समाजांतील मूळ स्वरूप त्या जातीच्या नावावरून ओळखता येते. बिहारमधील, बंगालमधील 'कैवर्त' ही जात मासे मारणाऱ्यांची आहे. तसे महाराष्ट्राच्या काही भागात कोळी समाज हा 'भोई' ह्या जातीवाचक नावाने ओळखला जातो. काही जातीच्या नावात त्यांच्या पशुदैवताचा उल्लेख आढळून येतो. आपण वाजी ह्या जमातीचे उदाहरण घेतले. तशी अनेक उदाहरणे आहेत. संबध गावच्या गाव किंवा एखाद्या प्रदेशांतील घराण्यांच्या मूळच्या पशुदैवताचे रूपांतर आडनावांत झालेले दिसते. 'मगर', 'लांडगे,' 'मोरे' 'पिंपळे' ही नावे बोलकी आहेत. पशुदैवत मानणाच्या काळापासून चालत असलेल्या प्रथा अजून शिल्लक आहेत. उदा.—मोऱ्यांच्या वंशात मोर ह्या प्राण्यांचे मांस खायला अजूनही बंदी आहे. पिंपळे घराण्यातील माणसांनी पिंपळाच्या पानावर जेवू नये किंवा जळणासाठी त्या झाडाच्या फांद्या कापू नयेत, असे परंपरागत निर्बंध होते.

भारतासारख्या विस्तीर्ण प्रदेशात अन्नोत्पादन करणाऱ्या समाजव्यवस्थेचा विस्तार हे त्या काळच्या विकासाचे ऐतिहासिक चित्र आहे. अन्नोत्पादन करणाऱ्या समूहांची जननशक्ती अधिक चांगली असल्यामुळे त्यांची लोकसंख्या वाढली व त्यांनी नवीन नवीन वस्त्या प्रस्थापित केल्या. अन्नोत्पादक समाजातील जनसमूह व विरळ वस्त्या करून राहाणारे, अन्न गोळा करणारे आदिवासी समूह ह्यांचा एकमेकांशी संघर्षाच्या किंवा देवाणघेवाणीच्या स्वरूपात संबंध येणे साहजिकच होते. अन्न गोळा करणारे समूह लहान



टोळ्यांत विभागलेले होते. एक चौरस किलोमिटर क्षेत्रांत नांगराने केलेल्या शेतीवर शंभर माणसे पोसली जाऊ शकतात. पण तेवढ्याच विभागात मिळणाऱ्या शिकारीवर किंवा नैसर्गिकरित्या मिळणाऱ्या अन्नावर एक माणूससुद्धा जगू शकणार नाही. पशुपालन अवस्था ही अन्न गोळा करणे व नांगराने शेती करणे ह्या दोन अवस्थेमधली अवस्था आहे. चांगली खते व पाणीपुरवठा ह्यांच्या साधनाने शेतीचा प्रसार अधिक विस्तारित क्षेत्रात करता येतो. भारतात (म्हणजे सध्याच्या पाकिस्तानांत) पहिल्या प्रथम शेती व्यवसाय हा पश्चिम बंगाल व सिंधू नदीच्या खोऱ्यात साधारणपणे खिस्तपूर्व ३००० ते १७५० ह्या काळाच्या दरम्यान अस्तित्वात आला. अर्थात ठराविक तऱ्हेच्या (कसाच्या) जमिनीपलीकडे त्याचा विस्तार झाला नाही. त्यानंतर शेती व्यसायाचा खरा विस्तार पूर्वेकडे गंगेच्या खोऱ्यात जवळ जवळ १८०० किलोमिटर प्रदेशांत झाला. शेती व्यवसायांतील नवीन तंत्रामुळे (जड लोखंडी नांगर व पाणीपुरवठा) जसा हा विकास झाला त्याप्रमाणे विकासाला अनुरूप अशी नवी समाजव्यवस्था जातीव्यवस्थेच्या स्वरूपात जन्माला आली. जवळजवळ एक हजार वर्षे म्हणजे जवळजवळ इ. स. पूर्व सातव्या शतकापर्यंत शेती व्यवसायाचा प्रसार होत होता. जुन्या अवस्थेच्या चौकटीत (टोळी-संघ किंवा गणपद्धतीच्या समाज चौकटीत.) हा विकास शक्य नव्हता. नवी जातीव्यवस्था निर्माण झाल्यामुळे गुलामगिरीच्या पद्धतीचा अवलंब केल्याशिवाय अतिरिक्त संपत्तीचा संचय करणे व शेतीचा विकास करणे शक्य झाले.

त्यानंतर शेती व्यवसायी समाजाच्या विस्ताराचा रोख दक्षिणेकडील पठारावर वळला त्यावेळी उत्तर भारतात लोखडाचा शोध व लोखंडी नांगराचा उपयोग होत असल्यामुळे शेतीचे तंत्र अधिक प्रगत झाले होते. दक्षिणेतील हा नवा भूप्रदेश अगदी वेगळ्या तऱ्हेचा होता. तेथील जमीन लागवडीला आणण्याकरिता व तेथे वस्ती वसवण्याकरिता नवे तंत्र अंमलात आणणे आवश्यक होते. ह्या प्रदेशात जातीव्यवस्थेला एक नवे प्रयोजन प्राप्त झाले. दक्षिणेकडील विविध जनसमूहांना नव्या समाजात सामावून घेण्याकरिता; त्यांच्या देवदेवतांना व यातुकर्मविधींना प्रतिष्ठा देण्यासाठी ब्राह्मणांनी पुराणे लिहायला सुरुवात केली. आदिवासी टोळ्यांच्या प्रमुखांना क्षत्रियप्रमुख बनवण्यांत आले. उत्तर भारतात टोळी-संघ समाज–जीवनाच्या अवस्थेतून वर्गव्यवस्था वर्णव्यवस्थेच्या स्वरूपात उदयास आली होती. पण दक्षिणेतील जातीव्यवस्था बाहेर आलेल्या शक्तींच्या प्रेरणेने आलेली वर्गव्यवस्था होती. शेवटी सरंजामदारीच्या काळात जातीव्यवस्थेने वर्गव्यवस्थेचे कामही सुकर केले. कारण त्यामुळे राज्यव्यवस्थेकडून बळाचा फारसा वापर न होता प्रत्यक्ष उत्पादनकर्त्या विभागाला श्रम करण्याच्या कामाला बांधून ठेवता आले. नवी गावे वसवली गेली. तेथील शेतकरी हे साधारणपणे एकाच जमातीचे किंवा मूळ टोळीसंघ समूहांचे असत. जमीन अशा गटांच्या ताब्यात असे. .त्या जातीबाहेरचा माणूस त्या गटाच्या संमतीशिवाय त्या प्रदेशात स्थायिक होऊ शकत नसे व जातीबाहेर काढलेल्या माणसाला समाजात जागाच नसे. प्रत्येक जनसमूहाच्या स्वतःच्या प्रथा, चालीरीती, विधी व प्रघात

असत. राजा, त्यांचे अधिकारी व पुरोहित सल्लागार हे निरनिराळ्या गटांतील तंटे त्या ठिकाणच्या स्थानिक पद्धती व प्रथा लक्षात घेऊनच मिटवीत असत. वेगवेगळ्या जमातीतील अंतर्गत झगडे जाती–जमातींचे प्रमुख मिटवीत असत. त्यांना जात-पंचायत बसणे, असे अजूनही म्हटले जाते. जाती-जमातींतील भेदभाव व ब्राह्मणी कावा ह्यामुळे भारतवासीय हे अंधश्रद्ध झाले व परकी आक्रमणासमोर असहाय ठरले. तरीसुद्धा सरंजामदारी शोषण व अत्याचार ह्यांच्या विरुद्ध गरीबांना जातीव्यवस्थेने त्या काळी संरक्षण दिले आहे. करांचा बोजा असह्य झाल्यास सर्व गावाने जमीन कसण्यास नकार देणे हा विरोध करण्याचा एक अखेरचा मार्ग होता. तेव्हा जमीन भरपूर प्रमाणात उपलब्ध होती. किंवा जंगले साफ करून नवीन जमीन लागवडीला आणण्याची शक्यता होती तोवर अशा तऱ्हेने गाव सोडून जाण्याचा मार्ग विरोध दर्शविण्याकरिता अंमलात आणणे शक्यही होते. गावकऱ्यांच्या अशा कृत्याला मराठीत 'गामवई' म्हणत. अर्थात् सरंजामदारीच्या नंतरच्या अवस्थेत लागवडीखाली आणण्यासारख्या जमिनीचा तुटवडा आल्यानंतर बाहेरच्या गावातील आपल्या जातभाईंच्या पाठिंब्याशिवाय अशा रीतीने गाव सोडणे त्यांना शक्य नव्हते. जातभाई हक्काने अशा तऱ्हेचा पाठिंबा मिळवू शकत असत. एवढी एक जमेची गोष्ट सोडली तर जातीव्यवस्थेने भारतीय समाजावर सर्वात जास्त गंभीर दुष्परिणाम केलेले आहेत. **आपला ठराविक जन्म हा गतआयुष्यातल्या पापपुण्याप्रमाणे झालेला आहे. ह्या किंवा अशा अनेक समजुतीमुळे जातीव्यवस्था अत्यंत खुळ्या अंधश्रद्धेचा पाया झालेली आहे. भारतातील जनतेत दुफळी पाडण्याकरिता ब्रिटिशांनी जातीव्यवस्थेचा पद्धशीर उपयोग केला. भांडवलदारी लोकशाहीत अजूनही राजकीय गटबाजीकरिता त्याचा उपयोग करण्यात येत आहे. त्यातून अजूनही जातीय दंगली उसळत असतात. संपूर्णपणे सडलेली व टाकावू झालेली ही जातीव्यवस्था आणखी किती काळ शिल्लक राहणार, ह्या प्रश्नाचे उत्तर मूलतः ह्या देशाच्या औद्योगिकीकरणावर व आधुनिक उत्पादन तंत्राच्या प्रगतीवर अवलंबून आहे.** जातीचा कायदा आता अधिकृत कायदा नाही. इतकेच नव्हे तर कायद्याने सार्वजनिक ठिकाणी जातीय पद्धतीने वर्तन करण्यास बंदी केली आहे. 'सेन्सस'-मध्येही 'जात नोंदवली जात नाही. शहामृगाने आपली मान वाळवंटात खुपसावी त्याप्रमाणे केवळ कायद्यात 'जात' नाकारून चालणार नाही. प्रत्यक्षात जातीव्यवस्था नष्ट झाली पाहिजे. त्याचे कालबाह्य स्वरूप समजले पाहिजे. तरीसुद्धा शहरी जीवनातली गर्दी; सर्वांना एकत्र काम करण्याची व रहाण्याची गरज; रेल्वे, बसवहातूक यातून एकत्र प्रवास करावयास लागणे; इत्यादींमुळे आणि ह्या समाजांवर प्रभाव गाजविणाऱ्या नगदी व्यवहाराच्या आणि नाणेव्यवस्थेच्या प्रभावामुळे जातीजमातींची एकमेकावर असलेली उतरंड मोडत चालली आहे. यंत्रयुगात ब्राह्मण पुरोहिताला स्थान नाही. कारण ते यंत्र शास्त्रीय नियमानुसार चालते मंत्रतंत्राने चालत नाही. यंत्रयुगीन समाजव्यवस्थेत जातीव्यवस्थेला स्थान असता कामा नये.



| तीन |

# भारतातील पहिली नगरे

## ३·१
## सिंधू संस्कृतीचा शोध

मागील दोन प्रकरणांमध्ये आपण प्राचीन भारतातल्या सांस्कृतिक देवघेवींची चर्चा केली. भारतातील बहुसंख्य शेतकरी वर्ग व आदिवासी समूह ह्यांनी एकमेकांच्या संस्कृतीवर कसा प्रभाव पाडला आहे ते पाहिले. अर्थात अधिक चांगले अन्न उत्पादन तंत्र ह्यामुळे अन्नोत्पादक शेतकरी समाजाचा प्रभाव परिणामकारक ठरला. टोळी-संघ जीवन (ट्रायबल) हळूहळू नाहीसे झाले. सर्व प्रदेशात ही प्रक्रिया एकाच गतीने एकाच क्रमाने एकाच वेळी झाली; असे मुळीच नाही. तरीही प्रगतीची रूपरेषा सर्वसाधारणपणे, सारखी आहे. भारतात नागरी जीवन कसे सुरू झाले, त्याचा विकास कसा झाला, ह्या प्रश्नांचाही आता विचार केला पाहिजे. 'सिव्हिलायझेशन' म्हणजे देशाच्या एकंदर जीवनात नागरी जीवन पद्धतीचा पुढाकार असणे होय.)

आजच्या काळातील भारतातील शहरे ही जरी परदेशातून आलेल्या उत्पादन पद्धतीतून निर्माण झाली असली, तरी भारतात यंत्रयुग अवतरण्याअगोदरही किंवा सरंजामदारी मध्ययुगीन कालाचा प्रारंभ होण्यापूर्वीही नगरे होती. प्राग् ऐतिहासिक समाजव्यवस्थेच्या गर्भातून ही नगरे आली तरी कशी? त्यांचा विकास कसा काय झाला असावा?

एकदोन पिढ्यांपूर्वी सर्वमान्य मत असे होते की, भारतात थोड्याफार महत्त्वाची अशी नगरे लवकरात लवकर इसवीसनापूर्वी एक हजार वर्षांपूर्वी निर्माण झाली. ही नगरे पशुपालन करणाऱ्या भटक्या आर्यांच्या वंशजांनी बांधली असा अंदाज होता. वायव्येच्या दिशेकडून ब्रॉन्झ युगात आर्यांचे आक्रमण झाले, ते साधारणपणे इ. स. पूर्व १५०० वर्षे ते १००० वर्षे ह्या काळात झाले असावे. त्यांनी आपसात लढाया केल्या. त्याचप्रमाणे पंजाबमधल्या मूळच्या आर्यपूर्व आदिवासी टोळ्यांशीही त्यांच्या लढाया झाल्या. त्यानंतर गंगेच्या खोऱ्यात त्यांची प्रगती झाल्यानंतर तेथे नगररचना व नागरी जीवन निर्माण झाले; अशी सर्वसाधारण समजूत होती. जुन्या मताप्रमाणे भारतातील पहिले शहर म्हणजे (बिहार-

मधील) पाटणा होय; पण हा केवळ जुन्या संस्कृत ग्रंथ, ऋचा व कथा ह्यावरून केलेला अंदाज होता. पण १९२५ साली पुरातन वास्तू-शास्त्रज्ञांनी पृथ्वीच्या पोटात गडप झालेल्या व इतिहासाच्या पानांवरून हरवलेल्या अशा नगरांचा शोध लागला. त्यातील दोन मुख्य शहरे म्हणजे मोहोंजोदारो व हरप्पा ही होय, ही नगरे सिंधू नदीच्या खोऱ्यांत व नद्यांच्या काठी बसलेली होती. दक्षिणेकडील मोहोंजोदारो हे सिंधू नदीच्या काठी होते तर 'हरप्पा' हे सिंधूची उपनदी 'रावी' हिच्यां काठी होते. आता ह्या नद्यांची पात्रे सरकलेली आहेत. इतिहासात तसे अनेक वेळा घडलेले आहे. ह्या नगरांत जी घरे सापडली आहेत ती भव्य व अनेक मजली आहेत. ती चांगल्या पक्क्या भाजलेल्या विटांनी बांधलेली आहेत. त्या घरांतून न्हाणीघर, संडास, अशा सुविधा आहेत. हरप्पाच्या उत्खननांतून सापडलेली मातीची भांडीसुद्धा अतिशय सुबक व चांगली गती असलेल्या चाकावर काढलेली आहेत. त्यांच्या आकारावरून तशा भाड्यांचे उत्पादन विपुल प्रमाणात होत असावे असेही दिसते. सोने, चांदी, रत्ने असे हरवलेले वैभवही ह्या उत्खननांत सापडले आहे. ह्या दोन नगरांची रचना रेखीव व वैशिष्ट्यपूर्ण आहे. २०० × ४०० चौरस वार असलेल्या चौकात घरे बांधली आहेत. मुख्य रस्ते चांगले रुंद असून त्याला काटकोन करणाऱ्या गल्ल्याही आहेत. जगात कोठेही इतक्या जुन्या काळांत अशी पद्धतशीरपणे बांधलेली घरे आढळून येत नाहीत. इजिप्तमध्ये सापडलेल्या जुन्या नगरातील घरे तेथील राजांच्या भव्य थडग्यांच्या किंवा देवळांच्या मानाने नगण्य आहेत. सुमेरिया, अक्काड, बॅबिलोन येथेही जुनी 'नगरे' सापडली आहेत; पण त्यांच्या बांधणीत सिंधू संस्कृतीतील नगरांच्या बांधणीसारखा पद्धतशीरपणा आढळून येत नाही. सिंधू संस्कृतीतल्या नगररचनेतील कौशल्य खरोखरच आश्चर्यचकित करणारे आहे. तेथील रस्ते एकमेकांना काटकोनात मिळतात. सांडपाण्याची व्यवस्था तर अगदी उत्तमच आहे. गटारातील केरकचरा काढून टाकता यावा, ह्याकरिता ठराविक जागी छोटे हौद आहेत. अगदी अद्ययावत काळापर्यंत भारतातील कुठल्याही शहरात सांडपाण्याची इतकी चांगली व्यवस्था नंतरच्या काळातसुद्धा अस्तित्वात आलेली नव्हती. अनेक शहरातून तर अजूनही इतकी चांगली व्यवस्था अस्तित्वात आलेली नाही. ह्या दोन्ही शहरांत धान्याची एवढी मोठी कोठारे आढळली आहेत की, ती एखाद्या व्यक्तीच्या किंवा कुटुंबांच्या खाजगी मालकीची असणे संभवत नाहीत. त्या कोठारांभोवती लहान खोल्यांची दारे आहेत, त्या घरातून कोठारातले धान्य कुटण्याकरिता किंवा साफ करण्याकरिता ठेवलेले मजूर किंवा गुलाम रहात असावेत, असा अंदाज करता येतो. त्या काळी बराच व्यापार होत असावा व काही व्यापार समुद्रापलीकडील प्रदेशांत होत असावा, असाही निष्कर्ष काढण्याइतका पुरावा मिळाला आहे.

ह्या संशोधनामुळे भारताच्या प्राचीन इतिहासाबद्दलच्या सर्व कल्पनांची पुन्हा तपासणी करणे प्राप्त झाले. भारताचा सांस्कृतिक विकास सरळ रेषेत व सातत्याने झालेला नाही. काही ऐतिहासिक कारणांमुळे एका कालखंडात त्या संस्कृतीची पीछेहाट नागरी जीवना-



पासून पशुपालन अवस्थेतील भटक्या जीवनाकडे झाली. हरप्पासारख्या मोठ्या नगरांचा अर्थ हा की, ह्या नगरवासियांना लागणारा धान्यपुरवठा करणारा शेती व्यवसाय असलेला भूप्रदेश भोवताली होता. तेथे शहरातल्या लोकांना लागणारे अतिरिक्त धान्य पैदा होत होते. **साधारणपणे 'नगर' हे सत्तेचे केंद्र असते व एक किंवा अनेक नगरांचे अस्तित्व हा संघटित शासनसंस्थेच्या अस्तित्वाचा पुरावा असतो. नागरी समाजात काही लोक धान्य (वस्तू) उत्पादन करतात; काही लोक धान्योत्पादन करीत नाहीत; पण उत्पादन करणाऱ्यांची कमीत कमी गरज भागवून वरकड असलेले उत्पादन आपल्या ताब्यात घेतात, हेच वर्ग अशा नागरी समाजव्यवस्थेला आवश्यक असणाऱ्या बाकी सर्व व्यवस्थाव्यवहारांवर आपला ताबा ठेवतात. म्हणजेच श्रमविभागणी असलेली वर्गीय रचना समाजात उदय पावल्याशिवाय 'नगरे' निर्माण होऊ शकत नाहीत. अशा वर्गीय रचनेत साहजिकच उत्पादन न करणाऱ्या थोड्यांचे उत्पादन करणाऱ्या बहुजनांवर राज्य असते.** हराप्पा संस्कृतीमधील नगररचनेवरून हा सिद्धांत त्या काळच्या समाजाला लागू होतो. पण प्रश्न असा आहे की, त्या जुन्या काळात उदयास पावलेली ही शहरे नष्ट का झाली? त्यांचा थांगपत्ता नाहीसा का झाला? असे झाले का की, दुसरी मोठी शहरे निर्माण झाली. त्यामुळे ह्या नगरांचे महत्त्व संपले आणि म्हणून ती नष्ट झाली. इराकमध्ये आक्रमकांनी अशी जुनी शहरे जिंकली. त्यांचा ताबा घेतला; पण त्या शहरांचे सातत्य कायम राहिले. ती नष्ट पावली नाहीत. बॅबीलोनियाचा सुप्रसिद्ध राजा हमुराबी (ज्याने अनेक नवे कायदे प्रस्थापित केले व ख्याती मिळवली) हासुद्धा आर्यांसारखाच रानटी टोळ्यांचा वंशज होता. पण त्या ठिकाणची जुनी नगररचना व संस्कृती वृद्धिंगत झाली. भारतात मात्र जुन्या नगररचनेची संस्कृती खंडित झाली. असे का घडले?

मेसोपोटेमिया येथील उत्खननांत सापडलेल्या इतर पुराव्यांवरून असा निष्कर्ष काढता येतो की, इसवीसनापूर्वी तीन हजार ते दोन हजार ह्या वर्षांच्या काळात भारतातील ह्या (म्हणजे सिंधु संस्कृतीतील) नगरांचा आणि तेथील नगरांचा व्यापारी संबंध होता. सिंधु संस्कृतीचा काळ साधारणपणे इ. स. पूर्व ३००० ते २००० वर्षे असा धरण्यात येतो. ह्या संस्कृतीचा शेवट जास्तीत जास्त उशीरा म्हणजे खिस्तपूर्व १७५० च्या सुमारास झाला असावा. अर्थात् असा शेवट व्हावयाच्या अगोदरच बराच काळ सिंधू संस्कृतीच्या जीवनपद्धतीचा ऱ्हास होत होताच. (त्याची कारणमीमांसा नंतर करू.) पण प्रत्यक्ष शेवट हा अचानकपणे झाला असावा. मोहोंजोदारो नगर तर जाळून टाकले गेले. तेथील नागरिकांची कत्तल करण्यात आली. हरप्पा येथील उत्खननाच्या वरील स्तरांचा विध्वंस झाल्यामुळे तेथील पुरावा असा अंदाज करण्याइतका पुरेसा नाही. ह्या नगरांच्या विध्वंसनांच्या पुराव्यांवरून जुन्या संस्कृत वेद वाङ्मयांतील अनेक संदर्भांचा अर्थ लागला. जुन्या वैदिक संस्कृत वाङ्मयांत शत्रूंचा निःपात केल्याचे; त्यांची संपत्ती लुटल्याचे, त्यांची नगरे जाळून टाकल्याचे; अनेक उल्लेख आहेत. सर्वसाधारणपणे इसवी सनापूर्वीच्या दोन सहस्रकांच्या

काळात पशुपालन अवस्थेतून प्राचीन भारतीय संस्कृतीचा उदय झाला किंवा ब्रॉझ युगाला सुरुवात झाली, असा समज पन्नास वर्षांपूर्वी होता. परंतु प्रत्यक्षात हा काळ एका मागासलेल्या संस्कृतीने आपल्यापेक्षाही प्रगत अशा नागरी विकसित संस्कृतीवर मिळवलेल्या विजयाचा काळ आहे. ह्या काळात भारतीय नागर संस्कृतीच्या विकासाला नवी चालना मिळण्याऐवजी तिची पीछेहाट झाली.

सिंधू संस्कृतीचा शोध लागल्यामुळे इतिहासकारासमोर नवा पेच निर्माण झाला आहे. त्या संस्कृतीची लिपी अजून उलगडलेली नाही. त्याशिवाय ज्या नोंदी आहेत, त्या छाप्यावरील चित्रांच्या स्वरूपात किंवा खापरांवर लिहिल्या आहेत. लिपीचा उडगडा न झाल्यामुळे त्या शब्दांचे अर्थ लावता आलेले नाहीत. इतिहासाचा संदर्भ हा नेहमी प्राचीन लिखाण, शिलालेख इत्यादी साधने ह्यांचा व उत्खननातून मिळालेले पुरावे ह्यांचा मेळ घालूनच लावावा लागतो. सिंधू संस्कृतीबद्दल उत्खननातून मिळालेले भरपूर पुरावे आहेत; पण ऐतिहासिक नोंदी मात्र वाचता आलेल्या नाहीत. कोणतीही व्यक्ती किंवा घटना ह्यांचा तेथील संशोधित वस्तूंशी संबंध जोडता येत नाही. ते लोक कोणती भाषा बोलत, ह्याचाही थांगपत्ता लागलेला नाही. ह्याउलट ज्या आक्रमकांनी ह्या संस्कृतीचा विनाश केला, त्याच्या संबंधीचे पुरावे उत्खननांत सापडत नाहीत. त्यामुळे अनेक जुन्या संस्कृत शब्दांचा तपशीलवार अर्थ लागत नाही. सिंधू संस्कृतीतील नागरी जीवनाचा विनाश आणि त्यानंतरचे इतिहासांतील जुन्यांत जुने सातत्याने चाललेले नागरी जीवन ह्यामध्ये जवळजवळ सहाशे वर्षांचा काळ लोटला आहे. सिंधू संस्कृतीचा विनाश होण्याची ही घडामोड भारतीय उपखंडाच्या एका कोपऱ्यात (आता पश्चिम पाकिस्तान येथे) झाली. बाकी सगळा भारतीय प्रदेश हा अन्न गोळा करणाऱ्या (फूड गॅदरर्स) आदिवासींच्या विरळ वस्त्यांनी व्यापलेला होता. ते अश्मयुगांतील विविध तऱ्हेच्या टोळी पद्धतीचे जीवन जगत होते. इ. स. पूर्व तिसरे शतक व दुसरे शतक ह्या काळांत सिंधू संस्कृती होती. पण तिचा विनाश कसा झाला, ह्याचा शोध घेण्यात मात्र अनेक अडचणी निर्माण झाल्या आहेत. तरीसुद्धा तेथे सापडलेल्या लक्षणांवरून काही ठाम अंदाज करता येतात.

## ३·२
## सिंधु संस्कृतीतील उत्पादन व्यवस्था

सिंधू संस्कृतीबद्दल एक खास वैशिष्ट्य असे की, ही संस्कृती आता सुपीक व विकसित असणाऱ्या भारताच्या इतर प्रदेशांत विस्तार पावली नव्हती. सिंधू संस्कृतीचा विस्तार एका विशिष्ट तऱ्हेनेच झालेला आहे. ह्या संस्कृतीमधील समाजाची अनेक व्यापार केंद्रे व लहानसहान वसाहतीसुद्धा सापडत आहेत. अशी केंद्रे व वसाहती खंबायतचे आखात (गुजरात) ते मक्रान किनाऱ्यावरील सुतकागेन—डोरपर्यंत सापडली आहेत. हा सर्व विभाग भारतातील इतर प्रदेशांच्या मानाने रूक्ष व खरखरीत आहे. (कदाचित त्या काळी त्या प्रदेशातील हवा आजच्या मानाने अधिक चांगली असेल. जंगलतोडीमुळे हा प्रदेश आता जास्त खरखरीत झाला असला तरीसुद्धा हवेत फार मोठा फरक पडला असल्याचे



संभवत नाही). प्रश्न असा आहे की, सर्वात प्राचीन आणि तरीही इतकी भव्य नागरी व्यवस्था इतक्या खरखरीत प्रदेशातून वाहणाऱ्या नद्यांच्या काठावरच का बरे विकसित झाली? उत्तर अगदी सरळ आहे. नदीमुळे पाण्याची तर सोय होतेच, पण अशा काळात फक्त नद्यांकडूनच पाणी मिळू शकते. त्याशिवाय महत्त्वाचे अन्न–मासे; तेसुद्धा अशा नद्यांतून मिळतात. नद्यांतून छोट्या लाकडी होड्यांतून वाहतूक करता येते. त्यामुळे नद्यांच्या काठावरील प्रदेशात लोकसंख्या वाढते. पण प्रदेशाच्या खरखरीतपणामुळे प्रादेशिक व्याप्तीवर मर्यादा येतात. त्यामुळे अशी लोकसंख्या त्या काठांवरील प्रदेशापुरती मर्यादित रहाते. पण गैरसोयीचा हा भाग सोडल्यास दुसरे दोन फायदे अशा वस्त्यांना मिळतात. एक तर अशा वाळवंटात जंगली जनावरे, साप व इतर किडे नसतात. जंगले नाहीशी करण्याची दगदग केल्याशिवाय नद्यांच्या पाण्यांबरोबर वाहून येणाऱ्या गाळाच्या जमिनींवर प्राथमिक साधनांनी शेती करता येते. भोवतालच्या खरखरीत प्रदेशात जी काही झाडेझुडपे असतात ती जाळून टाकता येतात व दगडी साधनांच्या साहाय्याने शेती नांगरता येते. भारतातल्या मोसमी पावसावर वाढलेल्या जंगलाची साफसफाई ही अधिक चांगल्या धातूच्या साधनाशिवाय (लोखंडाच्या कुऱ्हाडीशिवाय) करता येणे शक्य नव्हते. त्यामुळे तशी साधने निर्माण होईपर्यंत तेथील जमीन लागवडीला आणता आली नव्हती. त्याचबरोबर खरखरीत व ओसाड जमिनीला नियमितपणे पाण्याचा पुरवठा झाल्यास अशी जमीन इतर जमिनीपेक्षा सुपीक होऊ शकते. सर्व अति प्राचीन नगर संस्कृती (नाईल, तैग्रीस युफ्राटीस, डॅन्युब, जुनी चिनी) अशाच नद्यांच्या काठांवर उदयास आल्या आहेत. नाईल नदीच्या भोवतालचा प्रदेश तैग्रीस युफ्रायटीसच्या दुआबातील प्रदेश असेच गाळाच्या जमिनीचे, परंतु कोरडे व रूक्ष आहेत. डॅन्युब नदीच्या किंवा अत्यंत जुन्या चिनी संस्कृतीच्या प्रमुख स्थानांचा परिसर हासुद्धा अशा तऱ्हेच्या गाळांच्या जमिनीचा आहे. अमेझॉन व मिसीसिपी ह्या जगातील सगळ्यात मोठ्या नद्या आहेत. पण अतिप्राचीन काळात तेथे कुठलीही संस्कृती उदयास पावली नाही; कारण त्यांच्या काठांवर इतकी दाट जंगले होती की, अद्ययावत साधनांशिवाय ती साफ करणे शक्य नव्हते. गंगेच्या काठांवरसुद्धा इ. सनापूर्वी पहिल्या हजार वर्षांच्या अगोदर नागरी वस्ती आल्याचे आढळत नाही. कारण तेथे घनदाट अरण्ये होती. गंगेच्या काठी नागरी संस्कृतीची सुरुवात होण्याच्या काळात सिंधू संस्कृतीची स्मृतीही लोप पावली होती. सिंधू संस्कृती ब्रॉझ युगातील आहे. दगडाची सुबक अणकुचीदार हत्यारे जरी चाकू आणि लहान साधने म्हणून वापरली जात होती तरीही उत्पादनाची साधने ही ब्रॉन्झची होती. अगदी कणखर ब्रॉन्झची होती. तांब्याची नव्हती. तांब्याचा अंश असलेली माती राजस्थानमध्ये मिळत असे व पश्चिमेकडील प्रदेशात त्याची निर्यात करता येण्याएवढ्या प्रमाणात तांबे उपलब्ध होते. बॅबीलोनिया येथे त्या काळाबद्दल झालेल्या उत्खननात ज्या नोंदी उपलब्ध झाल्या आहेत त्यावरून असा निष्कर्ष काढता येतो. सिंधू प्रदेश व इराक (मेसोपोटेमिया) ह्यातील व्यापाराच्या मार्गावरील एक केंद्र पार्शियन

गल्फमधील बहेरिन येथे होते. मेसापोटेमियाच्या प्राचीन कथात ते 'तीलमुन' ह्या नावाने उल्लेखिले गेले आहे. सुमेरियन दंतकथेप्रमाणे अमर असलेला 'नौहा झिसुद्रा' ह्याने जगबुडीनंतर आपले प्रस्थान ठेवले होते ती जागा हीच असावी. पुरातन कथेतील महान योद्धा गिलगामेश अमर होण्याचे रहस्य जाणून घेण्याकरिता नोहाला भेटण्याकरिता येथेच आला होता. 'अलोक तिलमून' ह्या नावाने ओळखले जाणारे व्यापारी 'बेहेरिन' येथून चालणारा व्यापार करीत असल्याचे उल्लेख 'क्यूनिफॉर्म' लिपीत मातीच्या खापरांवर सापडले आहेत व नंतर झालेल्या उत्खननावरून त्याला दुजोरा मिळत आहे. सिंधू शहरात सापडलेले मातीचे गोल छापे (बटन्स) आणि मेसोपोटेमिया येथील तशाच तऱ्हेचे छापे दोन्ही ठिकाणी 'बेहेरिन'मधून आले असावेत असा अंदाज आहे. त्यानंतर हा व्यापार असिरियना राजांच्या संरक्षणाखाली चालत असे. मेसोपोटेमियन्स सिंधू प्रदेशाला 'मेलुहा' ह्या नावाने ओळखीत असावेत. खिस्तपूर्व १७५० सालानंतरच्या त्यांच्या साहित्यात ह्या मेलूहांचे उल्लेख आढळत नाहीत. कारण सिंधू संस्कृतीच्या नगरांच्या विनाशामुळे दोहोमधला व्यापार त्यानंतर खंडित झाला. त्याशिय 'मगान किंवा मक्कान' नावाचे दुसरेही व्यापार माध्यमाचे केंद्र होते. पण त्या नावाची जागा अजून निश्चित करता आलेली नाही. बहुधा हे केंद्र भारत व बेहरिन ह्यांच्या मध्यावर कोठेतरी असावे. तांबे व ब्रॉंझ ह्याशिवाय मोर, हस्तिदत व हस्तिदंत वस्तू (खास करून कंगवे व फण्या) त्याचप्रमाणे माकडे, मोती व सुती कापड ह्यांची निर्यात सिंधु संस्कृतीच्या काळी होत असे. त्या बदल्यात चांदी व इतर वस्तूंची आयात होत होती.

इराकमधील (मेसोपोटेमिया) उत्खननांत भारतीय पद्धतीची सिल्स (बटणे) सापडली. आहेत. त्यावरून तेथेही भारतीय व्यापारी वर्गाची छोटी का होईना वस्ती असावी. उलट येथे मात्र इराकी व्यापाऱ्यांची वस्ती नसावी किंवा असल्यास फारच छोटी असावी. मेसोपोटेमियन पद्धतीचे छापे (बटन्स) येथील उत्खननांत सापडले आहेत. पण त्यांच्यावरून ते छापे भारतातच बनले असावेत असे दिसते. ह्या दोन देशांतला व्यापार समुद्रमार्गाने चाले. त्या जहाजांना खवळलेल्या समुद्रांना तोंड द्यावे लागे. म्हणजेच सिंधू संस्कृतीमधील व्यापाऱ्यांनी नौकानयनाचे तंत्र चांगलेच आत्मसात केले असावे. वाहनांचा मार्ग चुकल्यास किंवा किनाऱ्यांचे अवगाहन करता न आल्यास त्यावेळचे खलाशी जहाजावरून कावळा सोडीत व तो कावळा नेमका ज्या बाजूला किनारा जवळ असे अशा दिशेने जात असे. त्या काळांत मेसोपोटेमियांत कावळे नव्हते. त्यामुळे कदाचित त्यांचे व्यापारी येथे का येत नसत ह्यांचा अंदाज लागू शकतो. भारतातून निर्यात होणाऱ्या वस्तू ह्या चैनीच्या वस्तू होत्या. गहू, बार्ली, तांदूळ इत्यादी धान्यांचे उत्पादन त्या काळापासूनच ह्या प्रदेशांत होत होते. सिंधू नदी व तिच्या उपनद्या ह्यातून भरपूर मासे अजूनही मिळतात. खोऱ्यातील जमीन अजूनही चांगलीच सुपीक आहे. सिंधू नदीच्या उत्खननांतील छाप्यांवर मोठे वशींड असणाऱ्या झेबूची व सपाट पाठ असलेल्या 'उरुस'ची चित्रे आढळली आहेत (दोन्ही बैलांच्या जाती आहेत. त्यापैकी उरुस ही जात नष्ट झाली आहे.)



काहीं छाप्यांवर गेंडा, हत्ती, एडका (रॅम) ह्यांची एकत्र चित्रे असलेली किंवा वेगवेगळी चित्रे आढळली आहेत. पण एवढ्यावरून त्या काळी त्या भागात भरपूर पाऊस पडत असावा, जंगले असावीत. वन्य प्राण्यांचा संचार होत असावा असे निष्कर्ष काढणे बरोबर होणार नाही. ह्या प्राण्यांची शिकार पंजाबमध्ये १६ व्या शतकापर्यंत होत असे. हिमालय प्रदेशातला हत्ती हा सरंजामदारीच्या काळात अस्तंगत पावला. सिंधू संस्कृतीच्या जीवनात ऱ्हिनो प्राण्याला फारसे स्थान नव्हते व हत्तीही तोपर्यंत माणसाळविला नव्हता. आता म्हैस किंवा रेडा ह्यांचे संबंध भारतभर पालन होते. पण सिंधू संस्कृतीमधील अगदी थोड्या छाप्यावर त्यांचे चित्र आहे. ह्या चित्रात हा रेडा आपल्या शिंगांनी शिकाऱ्यांना उडवीत असलेला दाखवला आहे. त्यावरून त्या काळात रेडा माणसाळविला गेला असल्याचे दिसत नाही. काही छाप्यांवर तीन तोंडांच्या देवाचे चित्र आहे. त्याभोवती इतर श्वापदे आहेत. हा देव काहीसा नंतरच्या काळात अवतरलेल्या पशुपती शंकरासारखा दिसून येतो. इतर काही छाप्यांवर दुसऱ्या देवदेवतांची चित्रे आहेत. एका छाप्यांवर जहाजांची (त्यावरचे शीड आणि वल्ही, आणि चक्र ह्यासकट) चित्रे आहेत. दोन छाप्यांवर माणूस वाघाचा गळा दाबून त्याला ठार मारत असल्याचे चित्र आहे. सुमेरियन छाप्यांवरसुद्धा सुमेरियन योद्धा गिलगामेश हा सिंहाला ठार मारत असल्याचे चित्र आहे. अर्धमानव आणि अर्धबैल असलेला 'एन्कीडू' हा अनेक सुमेरियन छाप्यांवर गिलगामेशचा सहकारी असल्याचे दाखवले आहे; पण त्या 'एन्कीडू'चे चित्र सिंधू संस्कृतींतल्या भारतीय छाप्यांवरसुद्धा आढळले आहे. ह्यावरून सिंधू संस्कृतींच्या काळात भारताचा संबंध त्या प्रदेशांशी होता हे दिसून येते.

सिंधू संस्कृतीचे सर्वांत वैशिष्ट्यपूर्ण लक्षण म्हणजे धान्य उत्पादन करण्याचे तंत्र. ते कसे असावे, ह्यांची संगती लावण्याचा प्रयत्न केला पाहिजे. अशी संगती लावण्याकरिता सिंधू संस्कृती व इजिप्त आणि मेसापोटेमिया येथील नद्यांच्या काठांवर उदयास पावलेल्या संस्कृती ह्यांचा तौलनिक अभ्यास करणे आवश्यक आहे. सिंधूच्या खोऱ्यात मोहोंजो दारो व हरप्पा ही दोनच मोठी व सुंदर शहरे आढळतात. त्यांच्या मानाने बाकीच्या वस्त्या ह्या बऱ्याच छोट्या छोट्या आहेत. छोट्या वस्त्यांची संख्याही बरीच कमी आहे. (आता अशा अनेक वस्त्या सापडलेल्या आहेत.) इजिप्तमध्ये नाईल नदीच्या खोऱ्यांच्या संकुचित प्रदेशांत त्या जुन्या काळांतील जास्तीत जास्त दाट वस्ती होती. त्या नदीच्या ७५० मैल लांबीच्या काठांवरील प्रदेशात दहा हजार चौरस मैलांची जुन्या प्राथमिक पद्धतीने कसली जात होती. रोमन काळात तेथे जवळजवळ सत्तर लाख लोकसंख्या होती. त्याशिवाय रोम शहराला त्या शेती व्यवसायाचे अतिरिक्त उत्पन्न दिले जात होते आणि भूमध्य समुद्राभोवतालच्या प्रदेशांच्या इतर भागांत त्या धान्याचा व्यापार करण्यात येई. नाईल नदीच्या खोऱ्याची जास्तीत जास्त रुंदी तीस मैल आहे नद्यांच्या काठांवरील गाळाची जमीन दहा मैल रुंदीपेक्षा जास्त नाहीं. आणि जरी इजिप्तमध्ये पावसाचे प्रमाण कमी असले तरीही दरवर्षी येणाऱ्या अलोट पुरांमुळे व त्यातून येणाऱ्या गाळामुळे ही

जमीन नव्याने तयार होत असते. मेसोपोटेमियातील इसवी सनपूर्व तीन हजार वर्षापूर्वीची शेती ही नद्यांचे पाट काढून त्याच्यावर केली जाई. सिंधू खोऱ्यांच्या मानाने तेथील प्रदेशांची व्याप्ती कमी असताही आणि जमीन त्या मानाने कमी सुपीक असताही जवळ-जवळ बारा महत्त्वाची नगरे आणि इतर लहान नगरे अस्तित्वात आली होती, असे दिसून येते. ह्या नगरांच्या भोवताली धान्योत्पादनाचे प्रदेश होते. नगरांतून स्वतंत्र उत्पादन व्यवसाय व स्वायत्त नागरी राज्यसंस्था (सिटी स्टेट्स) निर्माण झाल्या होत्या. त्यांच्यांत आपसात लढायाही होत असत. ह्या दोन संस्कृतींच्या मानाने सिंधू संस्कृती इतक्या दूरवर पसरलेली असतानासुद्धा त्या ठिकाणी मात्र फक्त दोनच मोठी नगरे निर्माण झालेली दिसतात. असे का ? इजिप्तमधील फॅरोहाच्या पिरॅमिडससारखी प्रचंड स्मारके किंवा मेसोपोटेमधील संस्कृतीप्रमाणे विविध शहरे सिंधू संस्कृतीमध्ये का निर्माण झाली नाहीत ? ह्या प्रश्नाचे उत्तर हेच असू शकते की, सिंधू संस्कृतीचा सतत तंत्रविकास झाला नाही. कालवे किंवा पाट काढून शेती करण्याची व जड लोखंडी नांगर वापरण्याची पद्धती रूढ झाली नाही. सिंधू संस्कृतीच्या छाप्यावर खुरप्यांची निशाणी आहे. पण नांगराची नाही. आता सिंध व पंजाबमधील शेती समृद्ध झाली आहे. त्याचे मुख्य कारण म्हणजे कालवे व जड नांगराचा वापर हे होय. पंजाब हा आता पाच नद्यांचा प्रदेश आहे. पण पूर्वीच्या काळी तेथे सात नद्या होत्या. गग्गर आणि सरस्वती या दोन नद्या आता संपूर्ण शुष्क होऊन नष्ट झाल्या आहेत. सिंधू प्रदेशातील नद्या अजूनही पुरांनी फुगतात व त्यांचा गाळ विस्तीर्ण प्रदेशात पसरतो. ह्या जमिनी अजूनही चांगल्याच उत्पादक आहेत. सिंधू संस्कृतीच्या जनसमूहांनी कालवे बांधले नाहीत. पण पुराच्या पाण्यावर धरणे बांधली, ज्यामुळे पुराचे पाणी अडकवले जाऊन पाहिजे तेथे पसरवता येत असे. काही जागी असे बांध ठराविक मोसमांतच बांधले जात. धान्याचे अतिरिक्त उत्पादन नद्यांतील वाहतूक मार्गाने मुख्य शहरात पाठवले जाई. जेथे धान्याची कोठारे होती तेथे धान्य साफ केले जाई. त्या समाजांतील धान्योत्पादन न करणारे व्यापारी, वाहातूक करणारे व इतर वर्ग अतिरिक्त धान्योत्पादनांवर पोसले जात. ज्यांच्या हातात व्यापार व सत्ता असे, ते तेथील (शहरांतील) भव्य प्रासादांत रहात. निरनिराळ्या वस्तू बनवणारे कारागीर शहरांची किंवा धान्याची साफसफाई करणारे समाजांतील खालच्या दर्जातील लोक लहान लहान दोन खोल्यांच्या घरातून रहात असत. कालवे काढणे किंवा जड नांगर वापरणे अशासारख्या उत्पादनतंत्रांचा विकास न झाल्याने सुरुवातीपासूनच अतिरिक्त धान्योत्पान मर्यादित राहिले. त्यामुळे नवीन नगरे निर्माण झाली नाहीत. संस्कृतीचा विस्तार इतर प्रदेशांत झाला नाही की राजघराणींसुद्धा उदयास आली नाहीत.

## ३·३
## सिंधू नगर संस्कृतीची खास वैशिष्ट्ये

सिंधू संस्कृतीमधील धान्योत्पादन करणाऱ्या वर्गाकडून अतिरिक्त उत्पादन कुठल्या मार्गाने व कसे वसूल केले जाई, ह्याबाबत शक्य तेवढा तर्कशुद्ध अंदाज बांधणे जरूर आहे. ह्या



बाबतीतही सिंधु संस्कृतीतील नगराची तुलना इजिप्त व मेसोपोटेमिया शहरांच्या (विकासा) बरोबर करणे आणि त्यातील फरक समजावून घेण्याचा यत्न करणे हा एक मार्ग असा तर्कशुद्ध अंदाज बांधण्यास उपयुक्त होईल.

सिंधू संस्कृतींतल्या नगरांबाबत आढळून येणारा एक मुद्दा असा की, काही हजार वर्षांच्या काळात त्यांच्या विकासामध्ये फारसा फरक पडल्याचे आढळून येत नाही. उत्ख-ननाच्या अगदी खालच्या थरांपासून दोन्ही शहरे व्यवस्थित आखणी केलेली असताना आढळतात. दोन्ही शहरांच्या बांधणीचा सर्वसाधारण आराखडा (लेआऊट) समान असल्याचे आढळून येते. त्या आराखड्यातही शेवटपर्यंत (म्हणजे ती शहरे उध्वस्त होईपर्यंत) फारसा बदल झाल्याचे आढळून येत नाही. मातीच्या भांड्यांचा, साधनांचा, छाप्यांचा (सील्स) प्रकारही तसाच राहिलेला आहे. अक्षरे (लिपी) तीच राहिली आहेत. ही अवस्था नंतरच्या ऐतिहासिक काळांतील भारतीय भाषेतील सतत बदलणाऱ्या स्वरूपाशी अगदी विरोधात्मक आहे. (नंतरच्या ऐतिहासिक काळातील भारतीय भाषेच्या अक्षरातील वळणात इतके फेरबदल झाले आहेत की एखाद्या साहित्याचे कालमान ठरवि-ण्याकरिता त्या लिपीचा आधार घेता येतो.) सिंधू संस्कृतीतल्या शहरांचे सर्वांत खालचे तळ हळूहळू वर आलेले दिसतात. मोहोंजोदारो येथील घरांचे सर्वात खालचे मजले हे कदाचित पुराच्या पाण्यापासून वाचवण्याकरिता भरून काढले असावेत व त्यावर नवीन मजले चढवले असावेत. काही घरे पडलेल्या घरांच्या ढिगाऱ्यांवर बांधली गेली आहेत. रस्तेही असेच एकमेकांवर बांधले गेले आहेत. पण खास लक्षात घेण्यासारखी बाब अशी की, रस्ते किंवा घरे यांची पद्धत वा योजना (प्लॅन) काही बदललेल्या दिसत नाहीत. विटांच्या मूळ पायावर विहिरी इतक्या उंच बांधल्या गेल्या आहेत की, उत्खनन जसजसे खोलवर जाते तशा त्या कारखान्यांच्या उंच चिमण्यांप्रमाणे दिसतात. अगदी वरच्या थरातच पडझड दिसून येते. भांडी बनवण्यास लागणाऱ्या भट्ट्या शहरातच, पण नंतरच्या काळा-तील थरात आढळल्या आहेत. पण शहरात किंवा वस्त्यांत पक्क्या विटा बनविण्याच्या भट्ट्या मात्र आढळून येत नाहीत. ह्यावरून घरांना वापरणाऱ्या विटा शहरे किंवा वस्त्यांच्या बाहेर ज्या ठिकाणी मोठ्या भट्ट्या लावण्याकरिता सोयीचे असे इंधन मिळू शके, अशा ठिकाणी बनवल्या जात असाव्यात; आणि शहरात आणल्या जात असाव्यात. लाकूड हिमालयातून येत असावे. ते प्रचंड नद्यांच्या प्रवाहातून खाली सोडले जात असावे. वरच्या थरातील काही घरांकरिता जुन्या नष्ट झालेल्या घरांचेच (लाकूड) सामान उन्हात भाजलेल्या कच्च्या विटांच्या साहाय्याने वापरले असल्याचे आढळून येते. सिंधू संस्कृतीच्या या हजार वर्षांच्या काळातच इजिप्तमधील संस्कृतीत जवळ जवळ बारा राज-घराणी सत्तेवर येऊन गेली. अक्काड जनसमूहांनी सुमेरमध्ये आक्रमण करून ते जिंकले. तेथे राजा सारंगाव ह्याने साम्राज्य स्थापन केले ते त्यांच्या वंशजांच्या काळात कोसळूनही पडले. प्रत्येक मेसोपोटेमियन शहरात अनेक बदल घडून आले. पण सिंधू संस्कृतीच्या प्रदेशात मात्र तसे बदल घडून आले नाहीत.

सिंधू संस्कृतीच्या समांतर काळांतील इतर दोन संस्कृतीप्रमाणे–एखादा दुसरा अपवाद सोडल्यास सिंधू संस्कृतीतील नगरांत किंवा आजूबाजूस भव्य सार्वजनिक स्मारके उभारल्याचे दिसत नाही. मोहोंजोदारो येथे ७० मिटर लांबीचे खांबांनी युक्त असे एक सभागृह आढळले आहे. त्याशिवाय इतर ठिकाणी अशी सभागृहे बांधलेली आढळत नाहीत. कुठेही मृत्युलेख, आलेख किंवा राज्यकर्त्यांनी नोंदलेली एखादी द्वाही (डिक्रीज) किंवा पुतळा आढळत नाही. मोठ्या घरांच्या भिंती चांगल्या पक्क्या विटांच्या ७ फूट रुंदीच्या आहेत. त्यावरून त्या भिंतींवर अनेक मजली इमारती उभारल्या गेल्या असाव्यात. त्यांच्या काठांवर उदयास पावलेल्या इतर नागर संस्कृतीप्रमाणे एखादे घर इतर घरापेक्षा खास मोठे व भव्य असलेले आढळून येत नाही किंवा प्रचंड देवालयेही आढळून येत नाहीत. घरांची पुढील बाजू ही अतिशय रूक्ष, कुठल्याही तऱ्हेची कला–कुसर नसलेली अशी आढळून येते. कुठेही मोझेक किंवा फ्रेस्कोच्या चकचकीत टाईल्स किंवा चांगल्या प्लॅस्टरचा उपयोग किंवा शोभादायक कलाकुसर किंवा चित्रे असलेले दरवाजे वगैरे आढळून येत नाहीत. बहुतेक ठिकाणी घराचे प्रवेशद्वार हे रस्त्याच्या बाजूला असलेल्या गल्लीत आढळते. हे दारसुद्धा ठेंगणे पटकन बंद करता यावे असे आहे. ह्या सर्वांचा अर्थ असा की, ह्या शहरांतील संपत्ती ही इतर ठिकाणच्या त्याच काळांतील संस्कृतीप्रमाणे देवालये किंवा योद्ध्यांची विजयचिन्हे ह्याकरिता वापरली गेलेली नाही. त्याचबरोबर हेही दिसून येते की, ह्या घरांतून जी काही संचित संपत्ती असावी, ती चोर, लुटारू किंवा समाजविरोधी व्यक्ती ह्यांच्यापासून सुरक्षित नव्हती. त्या शहरावर जी सत्ता होती त्या सत्तेकडे फारसे मोठे पोलीसदल असल्याच्या खुणा दिसत नाहीत.

ह्या सर्व चर्चेनंतर दृष्टोत्पत्तीस येणारे शहरांचे तिसरे खास लक्षण म्हणजे तिथे सापडलेल्या शस्त्रांचा कमकुवतपणा. मोहोंजोदारो येथे कारागिरांची जी साधने सापडली आहेत (टूल्स) ती चांगली ब्रॉन्झची कणखर आहेत. जी शस्त्रे सापडली आहेत ती मात्र त्यामानाने बरीच कमकुवत आहेत. बाण व भाले लहान आहेत. तलवारी तर सापडल्याच नाहीत. जे चाकू किंवा खंजीर सापडले आहेत ते चांगले कणखर; पण त्यांचा मुख्यत: उपयोग अवजारे (टूल्स) म्हणून केला जात असावा. शस्त्रे म्हणून नव्हे. काही छाप्यांवर धनुर्धारीचे चित्र आहे. पण त्या काळातली बाणाची टोके ब्रॉन्झ धातूची केलेली आढळत नाहीत. त्यावेळची जी काही राज्यसत्ता असेल ती लोकांचे फारसे दमन करणारी सत्ता असावी असे दिसत नाही. दोन्ही शहरांच्या एका बाजूला एक सार्वजनिक व्यासपीठ केलेले आढळते. हरप्पा येथील व्यासपीठाभोवती संरक्षक कोट उभारलेला आहे; पण तो नंतरच्या काळात उभारला असावा असे दिसते. हे व्यासपीठ १० मीटर उंचीचे आहे. त्याला वर चढण्याकरिता दोन्ही बाजूला पायऱ्या केल्या आहेत.

सिंधू संस्कृतीतल्या शहरांच्या अवस्थेत आढळणारी ही स्थितीशीलता ही केवळ लोकांच्या आळशीपणामुळे किंवा जुनाटपणामुळे झाली असेल असे नाही. त्याची कारणे अधिक सखोल असणार. बॅबीलोनिया व सुमेरिया येथे व्यापार करणाऱ्या व्यापाऱ्यांना



कॅनॉल इरिगेशनचे (कालवे व पाट काढण्याचे) तंत्र नक्कीच माहीत झाले असणार. पण सिंधू संस्कृतीच्या परिसरात कालवे खणले गेले असल्याचे दिसत नाही. कुऱ्हाड किंवा तत्सम अधिक चांगल्या तऱ्हेचे साधन तयार करण्याइतकी यांत्रिक पात्रता असतानाही ब्रॉन्झचे साधन म्हणून त्या काळचे लोक अगदी जुने 'सेल्ट'च (म्हणजे कोयत्यासारखे असलेले साधन) वापरत असताना दिसतात. त्यावरून काही विशिष्ट कारणामुळे सिंधू संस्कृतीतल्या लोकांना ठराविक मर्यादेपलीकडे प्रगती करण्याची इच्छाच नव्हती. असे असते तर अशी इच्छा निर्माण का झाली नाही किंवा निर्माण झाली असल्यास ती का मारली गेली ह्याची कारणमीमांसा केली पाहिजे. पण त्याअगोदर त्या संस्कृतीच्या दुसऱ्या एका खास वैशिष्ट्याचे संशोधन करणे आवश्यक आहे. ह्या नगराच्या स्वरूपावरून असे मुळीच दिसत नाही की, अगदी मागासलेल्या अवस्थेतल्या वस्त्यांची हळूहळू वाढ होत होत तेथे नगरे निर्माण झाली. त्याचा अर्थ असा की, ही नगरे निर्माण करणारे लोक एका विकसित अवस्थेत दुसऱ्या कोठल्या तरी प्रदेशातून त्या ठिकाणी आले असावेत. त्या अवस्थेच्या अव्याहतपणावरून (बदल न होणारा) हेही दिसून येते की, जी पद्धत त्यांनी अंगिकारलेली होती ती त्या काळच्या परिस्थितीला योग्य अशीच होती. सिंधू संस्कृतीच्या वसतिस्थानांच्या वायव्येला असलेल्या बलुचिस्तानमध्ये आदिऐतिहासिक काळातील गावांचे पुरावे उत्खननात सापडले आहेत. 'हरप्पा'पेक्षाही अधिक जुन्या थरात जी मातीची भांडी सापडली आहेत, ती बलुचिस्तानमधील मातीच्या भांड्यांसारखीच आहेत. त्यावरून कदाचित् सिंधू संस्कृतीतील जनसमूह तेथूनही आले असावेत; पण एवढे निश्चित की, सिंधू नदीच्या किनाऱ्यावर बाहेरून आलेले हे लोक मोठ्या संख्येने आक्रमण करून आलेले असे दिसत नाहीत. सिंधू संस्कृतीतल्या शहरांची बांधणी व तंत्र हे अगदी खास पद्धतीचे आहे. ते दुसऱ्या कुठल्या तरी (सुमेरियासारख्या) मोठ्या प्रमाणावर विकसित झालेल्या संस्कृतीकडून उसने घेतलेले नाही. तसे पाहिले तर सुमेरियन हेसुद्धा तैग्रिस युफ्रायटीसच्या काठावर उदयास आलेले नाहीत, तर कुठल्यातरी डोंगराळ मुलुखातून आलेले आहेत. त्यांची मुख्य देवळे ५० फूट उंचीच्या मुद्दाम बनविलेल्या मातीच्या टेकड्यांवर बांधलेली आहेत. हे टेकाडे मानवनिर्मित आहेत हे महत्त्वाचे आहे. मेसोपोटेमिअन नगरांच्या सर्वांत खालच्या थरांत अगदी जुन्या पद्धतीची जी मातीची भांडी सापडली आहेत, त्यांचा काल खिस्तपूर्व पांच हजार वर्षांचा असावा. इराकमधील पठारांवर असलेल्या मागासलेल्या शेती व्यवसायी समूहांच्या भांड्यांसारखाच त्यांचा आकार आहे. इजिप्तमधील पहिल्या राजसत्तासुद्धा ह्या बाहेरून तेथे आलेल्या व स्थायिक झालेल्या लोकांनी स्थापन केलेल्या आहेत. ह्या तिन्ही नागर संस्कृती त्या नद्यांच्या काठांवरील भौगोलिक प्रदेशांच्या नैसर्गिक वैशिष्ट्यानुसार वृद्धिंगत पावलेल्या आहेत.

ह्या सर्व ऐतिहासिक वस्तुस्थितीचे सर्वांत पटणारे विवरण हेच की, ह्या तिन्ही ठिकाणचे जनसमूह हे विकासाच्या एका अवस्थेत दुसऱ्या भागांतून तेथे आले. कारण त्यांच्या मूळ प्रदेशात (ज्यांचा निश्चित पत्ता अजून लागलेला नाही) वाढत्या लोकवस्तीला

वाव राहिलेला नसावा. विकसित अवस्थेत आले, असे एवढ्यासाठी म्हणायचे की, ह्या जनसमूहांना शेती, विटा करणे, घरांची रचना करणे आणि काही प्रमाणात संरक्षक सैन्य उभारणे इत्यादि कला व्यवसायांचे ज्ञान होते. सैनिकांची आवश्यकता एवढ्याकरिता होती की, पाणीपुरवठ्याच्या जागा ताब्यात घेण्याकरिता व ठेवण्याकरिता लढाया होत असत. नद्यांच्या काठावरील शेती प्रसाराच्या प्रभावामुळे अन्न गोळा करणारे समूह आपोआप अन्नोत्पादन करू लागत, असे होत नसे. ह्या अन्न गोळा करणाऱ्या आदिवासी समूहाचे सामाजिक स्थित्यंतर करण्याचा प्रश्न नंतरच्या भारतीय इतिहासातसुद्धा वारंवार सोडवावा लागला आहे. अन्नोत्पादन करणाऱ्या समूहांची लोकसंख्या जास्त गतीने वाढत असे व ते अन्न गोळा करणाऱ्या समूहाच्या प्रदेशात आक्रमण करीत, त्यातून लढाया होत असत. त्याचप्रमाणे अन्नोत्पादन करण्याकरिता लागणारे जादा श्रम हे सक्तीने येणे शक्य आहे हे लक्षात आल्यानंतर शस्त्रांच्या जोरावर पराभूत केलेल्या समूहांना 'गुलाम' करण्यात येऊ लागले व त्यांचा उपयोग वरकड उत्पादन करण्याकरिता करण्यात येऊ लागला. सिंधू, नाईल किंवा तैग्रीस, युफ्रायटीस ह्या नद्यांच्या काठांवरील प्रदेशांतील लोकांच्या संस्कृतीचा उगम कोठे झाला असावा ह्याबद्दल निश्चित माहिती नाही; पण ह्या नद्यांच्या प्रदेशांत जेव्हा त्यांचे आगमन झाले त्या काळच्या विकासाच्या अवस्थेचे चित्र अनातोलिया येथील काटल ह्यूयूक व पॅलेस्टाईनमधील जेरिको येथील उत्खननात आढळून येते. ह्या उत्खननाच्या थरांचा काळ खिस्तपूर्व सहा हजार वर्षांपूर्वीचा आहे. कोटल ह्यूमूर्ग येथे अगदी लहान नगर सापडले आहे. बाहेरून येणाऱ्या आक्रमणाला तोंड देण्यासाठी कच्ची तटबंदी तेथे केलेली आढळते. वेताच्या टोपल्यापासून मातीची भांडी वापरण्याच्या अवस्थेपर्यंत ते येत असलेले दिसून येते. जेरिकोमध्ये तर मातीची भांडी बनवण्याच्या अवस्थेअगोदरच्या अश्मयुगाच्या अवस्थेत उभारलेले दगडांचे छोटे मिनार आढळतात. हे मिनार पाण्याच्या झऱ्यांच्या भोवती त्या झऱ्यांचे संरक्षण करण्याकरिता उभारलेले आहेत असे आढळून येते. अर्थात् अनातोलिया किंवा जेरिको ह्या ठिकाणी आढळलेल्या संस्कृतीचा व नाईल नदीच्या काठी नंतर समृद्ध पावलेल्या संस्कृतीचा अगदी निकटचा संबंध होता असे नाही व तसा पुरावा सापडलेला नाही; पण विकासाची एक मधली अवस्था ह्या अर्थाने त्या ठिकाणच्या पुराव्यांचा उल्लेख केला आहे. ह्या दोन अवस्थांमधील काळ व भौगोलिक अंतर भरून काढणारे उत्खनन व संशोधन कदाचित यापुढे होईल. पण इतके निश्चित की, पुढे जी नागर संस्कृती (नाईल, मेसोपोटेमिया किंवा सिंधु नदी येथे) वृद्धिंगत झाली, त्याची बीजेही छोटया (स्थानिक) जागी शेती व्यवसाय करणारे जे लहान मानवसमूह होते, त्यांच्या समाजव्यवस्थेत होती.

## ३·४
## सिंधू संस्कृतीची समाजव्यवस्था

सिंधू संस्कृतीची समाजरचना कशी असावी, ह्याचा अंदाज घेण्याचा प्रयत्न करण्या-अगोदर सिंधू संस्कृतीतील दोन्ही शहरांबाबतच्या एका खास वैशिष्ट्याचा उल्लेख केला



पाहिजे. दोन्ही शहरात मोठ्या श्रीमंत घरापासून काहीशा अंतरावर १० फूट उंचीचा एक विस्तीर्ण चबुतरा आहे. दोन्ही शहरातला हा चबुतरा लंब चौकोनी आकाराचा व सारख्याच क्षेत्रफळाचा आहे. हरप्पा येथील चबुतरा आता तेथल्या विटा चोरीला गेल्यामुळे उध्वस्त झाल्यासारखा झाला आहे आणि मोहोंजोदारो ह्या ठिकाणच्या त्या चबुतऱ्यांवर दुसऱ्या शतकात बांधल्या गेलेल्या बुद्धिस्ट स्तूपांचा काही भाग आलेला आहे. ह्या चबुतऱ्याच्या आकारावरून ती जागा सार्वजनिक कामासाठी वापरण्यात येत असावी असे वाटते. त्या चबुतऱ्याभोवतालची तटबंदी तितकी जुनी किंवा पक्की नाही. त्यावरून त्या जागा लष्करी कामाकरिता वापरण्यांत येत असाव्यात असे वाटत नाही. त्याचप्रमाणे मोहोंजोदारो येथे मोकळ्या पण बांधीव जागेभोवती (गोलाकार असे) बऱ्याच खोल्यांचे व अनेक मजल्यांचे बांधकाम आहे. (आता मजल्यांची पडझड झाली आहे.) मधल्या जागेत २३×२९ फूट लांबी-रुंदीचा व ८ फूट खोल असा तलाव आहे. त्या तलावाची फरशी चांगल्या पक्क्या विटांनी बांधलेली आहे. तलावाच्या दोन्ही बाजूस तलावात उतरण्याकरिता पायऱ्या आहेत. तलावा-तील पाणी काढून टाकण्याकरिता एका बाजूला मोऱ्या बांधल्या आहेत. तलावाच्या बाजूस विहीर खणलेली आहे. त्या विहिरीचे पाणी तलावांत भरले जात असावे असे दिसते. त्या बांधीव इमारतींतील खोल्यांची दारे एकमेकांसमोर येत नाहीत. काही खोल्यातून वरच्या मजल्यावर जाण्याकरिता जिने बांधलेले आहेत. हा सार्वजनिक विहारतलाव असावा, कारण मोहोंजोदारो व हरप्पा ह्या दोन्ही ठिकाणी सर्व घरांतून स्नानगृहे व विहिरी आढळ-तात, त्या अर्थी हा तलाव केवळ सार्वजनिक स्नानगृह नसावे. ह्या विहारतलावांचा उद्देश निश्चितपणे काही धार्मिक विधी किंवा उपचार करण्याचा असावा. पुरातन भारतीय ग्रंथांत अशा तलावांचा उल्लेख 'पुष्कर' किंवा 'पुष्करिणी' असा केला गेला आहे. ऐतिहासिक काळांत अनेक ठिकाणी खास करून देवालयाजवळ अशा तऱ्हेचे पुष्कर बांधलेले आढळून येतात. अजूनही असे पुष्कर देवळांजवळ बांधण्याची प्रथा आहे. पूर्वीच्या काळी विधीपूर्वक स्नान करण्याकरिता, शुचिर्भूत होण्याकरिता, त्याचप्रमाणे राजे किंवा पुरोहित ह्यांना अभिषेक करण्याकरिता ह्या पुष्करांचा उपयोग केला जात असे. फार जुन्या काळापासून भारतात राज्यारोहणप्रसंगी राजाला अभिषेक करण्याची प्रथा आहे. ह्या पुष्कराचे घाट तीर्थक्षेत्रांची आठवण करून देतात. तीर्थक्षेत्र म्हणजेच पवित्र पाण्याची जागा. ह्या सर्व लक्षणांवरून मोहोंजोदारो येथील विहार-तलाव व नंतरच्या ऐतिहासिक काळांतील पुष्कर ह्यांच्यात काही दुवा असावा असे म्हणता येईल. पण सर्वांत जुन्या संदर्भावरून 'पुष्करां'चा संदर्भ फार प्राचीन काळी करण्यात येणाऱ्या सुफली-करण विधीशी आहे. हे विधी आदिवासी टोळ्या सार्वजनिक रीत्या करीत असत. पुष्कर ह्या 'अप्सरां'च्या जागा आहेत. अप्सरा ह्या मुळात मातृदेवता 'जलदेवता' आहेत. नंतर त्यांना अतिमानवी सुंदर स्त्रियांचे कल्पित रूप प्राप्त झाले. अनेक पुरातन कथांतून ह्या अप्सरा राजा किंवा श्रेष्ठ ब्राह्मण ह्यांना नादी लावत व त्यांच्या अध:पतनास कारणीभूत होत असत. नाच, गाणे अशा कलांत त्या प्रवीण असल्याचे

दाखवले जाई. ह्या अर्धदेवतांची नावे विशिष्ट प्रदेशांशी संबंधित असत. अनेक राजवंशाचा उदय हा त्या वंशाचे मूळ पुरुष व अप्सरा ह्यांच्या समागमातून झालेला आहे; अ ा कथा आहेत. अप्सरांना लग्न करता येत नसे किंवा एखाद्या पुरुषाबरोबर संसार मांडता येत नसे. ह्या सर्व नंतरच्या कथा व समजुतीवरून मोहोंजोदारो येथील तलाव व भोवतालच्या इमारतीचा अर्थ लावता येईल. ह्या तलावात पुरुष नुसते स्नान करीत असत) असे नव्हे, तर भोवतालच्या खोल्यातून तेथील स्त्रियांशी ते समागम करीत असत. त्यामुळे ह्या खोल्यांची दारे एकमेकांसमोर येत नाहीत.) सर्व परिसर तेथील मातृदेवतांचा असावा व ह्या स्त्रिया त्या मातृदेवतांना वाहिलेल्या असाव्यात. हा तर्क अगदी ओढाताण करून काढल्यासारखा वाटणे शक्य आहे. पण ह्या तर्काला इतर ठिकाणच्या पुराव्यांवरून दुजोरा मिळू शकतो. सुमेर व बॅबीलोनिया येथील 'इष्तर' ह्या देवतांच्या बाबतीतही अशीच प्रथा असल्याचे सिद्ध झाले आहे. तेथील देवळांच्या परिसरात होणाऱ्या समागम समारंभात मोठ्या कुळातील स्त्रियाही भाग घेत असत. 'इष्तर' ही देवी अप्सरांसारखी अनेक पुरुषांशी संबंध ठेवणारी आणि तरीही आजन्म कुमारी राहणारी अशी देवता होती. अप्सरांप्रमाणे 'इष्तर' हीसुद्धा जलदेवता होती. तसे बघितले तर सिंधू संस्कृतीतील शहरातला सार्वजनिक चबुतरा हा मेसोपोटेमियन 'झिगरत'चाच नमुना आहे. सिंधू संस्कृतीतील दोन्ही नगरांच्या व त्या काळाच्याही पूर्वीच्या कालावस्थेचे अवशेष दाखवणाऱ्या उत्खननांत पक्ष्यांचे काहीसे भीतीदायक मुखवटे घातलेल्या स्त्रियांच्या मातीच्या पुतळ्या सापडलेल्या आहेत. जन्म किंवा मृत्यूप्रसंगी होणाऱ्या विधीत ज्याची पूजा होत होती अशा मातृदैवतांचा संदर्भ त्यावरून दिसून येतो.

ह्या ठिकाणी इजिप्त व मेसोपोटेमिया येथील समांतर संस्कृतींत आढळणाऱ्या परिस्थितीचा तुलनात्मक विचार आवश्यक आहे. नाईल नदीच्या काठावरील इजिप्त संस्कृतीत 'फारोहा' हा सर्वसत्ताधीश पुरोहित राजा होता. तो धर्मप्रमुख व राजप्रमुख दोन्ही होता. त्याचे राज्य मोठ्या प्रमाणात असलेल्या पुरोहित वर्ग व विविध श्रेणीतील शस्त्रधारी उमराव ह्यांच्या साहाय्याने चाले. त्या काळची संस्कृती धर्मप्रधान होती व त्यावर पुरोहित वर्गाची मिरासदारी होती. शेतकरी धान्योत्पादन करीत व इतर वस्तू प्रयासाने आणि लष्कराच्या साहाय्याने बाहेरून आणाव्या लागत. राजसत्तेशिवाय असे वाटप वेगवेगळी नगरे व गांवे ह्यांच्यात होऊ शकले नसते. धान्य व इतर वस्तूंची पैदास करण्याकरिता जनतेचे व लष्करांचे नियंत्रण व वस्तु पैदास करण्याकरिता करावे लागणारे दमन व आक्रमण ही 'फारोहा'च्या सत्तेची मुख्य कार्ये होती. त्यामुळे ह्या मध्यवर्ती सत्तेशी संबंधित अशी सर्व स्मारके पिरॅमिडसारख्या भव्य प्रमाणात उभारलेली आहेत. सिंधू संस्कृतीत अशा प्रकारची स्मारके आढळून येत नाहीत. त्याअर्थी तेव्हा तेथे तशी मोठी लष्करी राजसत्ता अस्तित्वात असावी असे दिसत नाही. सिंधू संस्कृतील नगरांत राजवाड्यासारखा भव्य प्रासाद सापडलेला नाही आणि सापडलेली शस्त्रे कमकुवत आहेत. मोहोंजोदारो व हरप्पा येथे योद्धयांची स्मारकेही आढळून येत नाहीत. काही ब्रिटीश



पुरातत्त्व शास्त्रज्ञांनी ही दोन शहरे म्हणजे एकाच राजसत्तेच्या उत्तर व दक्षिण टोकांना असलेल्या राजधान्या असाव्यात असा तर्क केलेला आहे. हा तर्क इजिप्तच्या उदाहरणांवरून काढलेला एक आंधळा निष्कर्ष आहे. इतकेच नव्हे तर अशी प्रगत संस्कृती एखाद्या प्रबळ साम्राज्य सत्तेशिवाय निर्माणच होऊ शकत नाही हा साम्राज्यवादी ग्रह त्या निष्कर्षामागे आहे. तुलनात्मक दृष्ट्या मेसोपोटेमियाची संस्कृती सिंधू संस्कृतीला अधिक जवळची वाटते. मेसोपोटेमियात नगर राज्यांचा (सिटी स्टेट) उदय झाला होता. इजिप्तप्रमाणे तेथे आर्थिक गरजांकरिता आक्रमणे करण्याची आवश्यकता नव्हती की गरजेच्या वस्तूंचा पुरवठा व वाटप करण्याकरिता मध्यवर्ती सत्तेची आवश्यकता नव्हती. मेसोपोटेमियन अर्थव्यवस्थेत व्यापाराने अधिक महत्त्वाची कामगिरी पार पाडली आहे. मेसोपोटेमियन प्रदेशात अनेक नगरे व नगरातून अनेक देवालये (झिगरत) आढळतात. प्रत्येक देवालयाच्या परिसरात मोकळी जमीन आहे. त्यावरून ती जमीन त्या देवालयाच्या मालकीची असावी व ती देवालये सत्तेची केंद्रे असून व्यापारात भागिदारी करीत असावीत असे दिसते. सिंधू संस्कृतीत सापडलेल्या दोन्ही नगरात मात्र असे एकच केंद्र आढळते. मेसोपोटेमियन व्यापारी हे श्रीमंत होते. जमीन जायदाद, गुलाम, पाळीव जनावरे अशा संपत्तीने संपन्न होते. त्यांच्या परंपरा, व्यापारविनिमय, वारसाहक्क, पतपुरवठा इत्यादीबद्दलचे नियम ह्याबाबतचा पुरावा उपलब्ध आहे. पण सिंधू संस्कृतीच्या समाजरचनेबद्दल मात्र तसा पुरावा उपलब्ध नाही. मेसोपोटेमियातील घरे मात्र सिंधू संस्कृतीच्या घरांसारखी सुबक नव्हती, तेथील (सॅनिटरी) सांडपाण्याची व्यवस्थासुद्धा सिंधू संस्कृतीत आढळणाऱ्या नगरासारखी पद्धतशीर दिसत नाही. अर्थात सिंधू संस्कृतीतल्या व्यापाऱ्यांनी इराकमधील व्यापारी वर्गाशी संबंध असतानासुद्धा त्यांच्याकडून मातीच्या खापरांवर (क्ले टॅबलेटस) लिहिण्याची पद्धत का उचलली नाही? अधिक चांगली साधने व शस्त्रे ह्याचा वापर ते त्यांच्याकडून का शिकले नाहीत? खास करून कालवे व पाट काढणे, जड नांगर वापरून शेती करणे अशा विद्यांचा त्यांच्याकडून का अंगिकार केला गेला नाही? हे सर्व प्रश्न मनाला संभ्रमित करणारे प्रश्न आहेत. ह्या व्यापाऱ्यांपैकी काही जणानीं तरी नक्की तैग्रिस व युफ्रायटीस नद्यांच्या काठावरील समृद्ध शेती पाहिली असणारच, मग तेथील अधिक प्रगत तंत्राची लागण येथे का झाली नाही? उत्तर असेच असू शकते की, अशा प्रगत तंत्रामुळे ह्या व्यापारी वर्गाचा फारसा फायदा होण्याचा संभव नसावा. जमीन त्यांच्या मालकीची नसावी. जमीन मध्यवर्ती देवालयातल्या पुरोहित वर्गाच्या हाती असावी. देवालयाचा व्यवस्थापक पुरोहित वर्ग त्या जमिनीचा वापर स्वत:च्या अमलाखाली करीत असावेत. पुरोहित वर्ग एकदा प्रस्थापित झाला की, तो नवे संशोधन व तंत्र ह्यांना विरोध करतो. पुरोहित वर्गाच्या जुन्या परंपरा व साधने ह्यांनाच चिकटून रहातो. आपली मिरासदारी राखू शकणाऱ्या तंत्रपद्धतींत बदल करणे पुरोहित वर्गाला आवश्यक वाटत नव्हते, तर व्यापारी वर्गाला फारसे फायदेशीर वाटत नव्हते. मेसोपोटेमियामध्ये नंतरच्या काळात पुरोहितांच्या धर्मसत्तेच्या दर्जापेक्षाही वरील दर्जाची 'इश्शाकू' नावाच्या राजवंशाची सत्ता

प्रस्थापित झाली. इश्शाकू नगरातील सैन्याचा प्रमुख पण धर्मनिरपेक्ष सत्ताधीश होता. पुढे त्याला ईश्वराचा अंश असणारा राजा मानण्यात आले. त्याने आपल्या नगरांमधील देवालयांच्या व्यवस्थापनांमध्ये हस्तक्षेप केला नाही. परंतु जिंकलेल्या नगरांमध्ये मात्र मनमानी कारभार केला. सिंधू संस्कृतीतल्या नगरांत अशा राजाची अधिसत्ता निर्माण झाल्याचेही पुरावे नाहीत. ह्याचा अर्थ असा की, अशी अधिसत्ता निर्माण होण्याची ऐतिहासिक गरज तेथे निर्माण झाली नाही. धान्याचे अतिरिक्त उत्पादन गोळा करण्याकरिता ते उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्यांवर फारसा बलप्रयोग करावा लागत नसावा. म्हणजेच पाशवी सत्ता व बळ ह्यांच्या ऐवजी धर्माचा (मानसिक संस्काराचा, भावनेचा व श्रद्धेचा) उपयोग केला जात असावा. नंतरच्या भारतीय समाजातसुद्धा धर्माचा उपयोग वारंवार तशाच पद्धतीने करण्यात आला आहे. धर्माच्या प्रभावामुळे भारतीय समाज स्थितिशील राहिला. भारतीय इतिहासात धार्मिक संस्कारामुळे समाजाचे बराच काळ साचेबंद होणे आणि त्यातच अचानक युद्धे, आक्रमणे व बेबंदशाही ह्यांचा धुमाकूळ माजणे, ह्या गोष्टी वारंवार घडल्या आहेत.

सिंधू संस्कृतीच्या नगरात अगोदर सांगितल्याप्रमाणे काही उत्तम व श्रीमंत नागरिकांची घरे दिसतात, पण त्याहूनही वेगळे व अगदी भव्य असा प्रासाद काही आढळून येत नाही. त्यावरून मेसोपोटेमियाच्या मानाने त्यांच्या संपत्तीचा मोठा वाटा लाटणारा राजा किंवा तशी सत्ता प्रस्थापित झाल्याचे दिसून येत नाही. व्यापारावरील कर कमी असणार. फायद्याचे प्रमाण जास्त असणार. त्याचबरोबर त्यांच्या संपत्तीला पोलीसी संरक्षण मिळत असावे म्हणूनच घरे मजबूत पण कलाकुसर नसलेली अशी आहेत. ह्या नगरांच्या उध्वस्त पुराव्यांवरून त्या नगरांचा शेवट व्हावयाच्या अगोदर त्या नगरात चोर व लुटारू ह्यांचे वास्तव्य असल्याच्या खुणा दिसून येतात. ह्या व्यापाऱ्यांनी आपले लिखाण कदाचित कापड, ताडपत्रे, पाने अशाच नष्ट होणाऱ्या वस्तूंवर लिहिले असावे. पण अशीही शक्यता आहे की, त्यांचा व्यवहार इतक्या थोड्या वर्तुळापुरता मर्यादित होता की, ते आपल्या स्मृतीवर अवलंबून राहू शकत होते. नोंदी ठेवण्याची अवश्यकता भासत नसावी. हे वैशिष्ट्य नंतरच्या भारतीय समाजातही कायम राहिले आहे. केवळ शब्द देणे व तो पाळणे ह्याला भारतीय समाजात फार मोठी नैतिक प्रतिष्ठा प्राप्त झालेली आहे. कोणताही व्यवहार लिहून नोंदवणे म्हणजे अविश्वासाचे प्रदर्शन करणे, असे अजूनही मानले जाते. सर्व परकीय अभ्यासकांना भारतीय संस्कृतीच्या ह्या आदर्शाबद्दल अजूनही अचंबा वाटतो.

सिंधू संस्कृतीत आढळणारी एकमेव सत्ता म्हणजे नगरांतील मुख्य देवालयांची असावी. ह्या देवालयांच्या व्यवस्थापनाकडेच अतिरिक्त धान्याचे वाटप करण्याची व्यवस्था असावी. त्या संस्कृतीत आढळणारी धान्याची कोठारे देवालयांच्या मालकीची होती किंवा त्या धान्यावर अखेरचा अधिकार देवालयांकडे असावा. त्या धान्याची साफसफाई करण्याचे काम ह्याअगोदर सांगितल्याप्रमाणे धान्याच्या कोठाराभोवती बांधलेल्या लहान खोल्यांतील मजुरांचे असावे. कदाचित् हे मजूर देवालयांच्या मालकीचे गुलामही असतील. मेसापोटे-



मियांत अशा मजुरांना कल्लू (किंवा गल्लू) म्हणत असत. सिंधू संस्कृतींत धान्य किंवा इतर उत्पादन ह्यांच्यात देवालयाची सत्ता कितपत भाग घेई, ह्याचा अंदाज करावयास पुरेसा पुरावा उपलब्ध नाही. पण अशाच तऱ्हेच्या समाजांबाबत जे परकीय पुरावे उपलब्ध आहेत त्यावरून अशा उत्पादनात त्याचा मोठा भाग होता असेच दिसते. ह्या व्यापारी वर्गाचे वैशिष्ट्य हे की त्यांचे जे छापे उपलब्ध झाले आहेत त्यावरील सर्व चित्रे पुरुषी जनावरांची (पशुदैवताची) आहेत. जी चित्रे मानवी आहेत तीसुद्धा पुरुषांचीच आहेत. त्यावरून ह्या व्यापाऱ्यांनी आपली स्वतःची दैवते सुरू केली; पण त्यांत स्त्री-दैवतांना स्थान नव्हते असे दिसते. व्यापारातून मिळणारा नफा व त्याचबरोबर शासकीय उत्पन्न ह्यांतील फरक ह्यांचा काहीसा संदर्भ त्यावरून लागतो.

सिंधू संस्कृतीतील जीवनपद्धतीबाबत इतकाच जास्तीत जास्त अंदाज आपण बांधू शकतो. पण इतके निश्चित की, ही संस्कृती सतत विकसित होऊ शकत नव्हती. सिंधू संस्कृतीच्या काही वसाहती उत्तरेकडे सागर किनाऱ्याजवळ सापडलेल्या आहेत. पण त्या अगदी कमी व अगदी छोट्या छोट्या आहेत. मुख्य नगरातील लोकसंख्यासुद्धा इ०स० पूर्व हजार वर्षांच्या सुमारास घसरत गेलेली आढळते. सिंधू संस्कृती अस्तंगत पावल्या-नंतर त्याच्या परंपरेचे अवशेष नंतरच्या भारतीय संस्कृतीमध्ये कितपत शिल्लक राहिले, हाच खरा प्रश्न आहे. नंतरच्या भारतीय वजनांचे प्रमाण व मोजमाप करण्याची पद्धत ह्यांचा उगम सिंधू संस्कृतीतल्या हरप्पा व मोहोंजोदारो येथील पुराव्यांशी मिळताजुळता आहे. सुमेरियन बॅबीलोनियन संस्कृती व बायबलमधील कथांप्रमाणेच भारतीय साहित्यातील कांही कथा सिंधू संस्कृतीच्या काळापासून शिल्लक राहिल्या असाव्यात. जगबूड करणाऱ्या महापुराच्या कथा संस्कृत वाङ्मयाच्या नंतरच्या काळात, सुरुवातीच्या नव्हेत, आलेल्या आहेत. आक्रमक आर्यांचा जुन्यांशी असलेला झगडा संपल्यानंतर जुन्या-नव्यांचा संगम साधण्याच्या उद्देशाने त्या कथा पुन्हा सांगण्यात आल्या असाव्यात. आर्य व आर्येतर-ह्यांच्यात समन्वय साधण्याचा नंतर (म्हणजे आर्यांच्या आक्रमणानंतरच्या काळात) जो प्रयत्न झाला त्यामुळे इतिहासाची साहित्याची व विविध विधी-कर्मे ह्यांची पाने उलट्या दिशेने व गतीने लिहिल्यासारखी वाटतात. इजिप्तच्या जुन्या संस्कृतीतसुद्धा एकामागून एक राजवंश राज्यावर आले, पण समाजाच्या मूळ ढाच्यामध्ये व जीवनामध्ये फार मोठे बदल झाले नाहीत. फारोहांच्या दरबारी कामकाजात फरक पडले. त्यांनी जी नवी आक्रमणे केली त्यात त्यांना खनीज संपत्तीचे नवे साठे व गुलाम मिळाले. त्यामुळे पडणारे फरक फक्त साहित्यात दिसतात. सर्वसामान्य नागरिकांचे जीवन मात्र तसेच संथ राहिले. इजिप्तमधील काही आक्रमक हेसुद्धा आर्य होते, असाही शोध लागलेला आहे. मेसो-पोटेमिया येथील पंथ व भाषा ह्यांच्यात नव्या आक्रमणामुळे बदल होत गेले; पण नगरे कायम राहिली. फार तर सत्तेचा केंद्रबिंदू सुमेरियन बॅबीलोनियन, असिरियन, पर्शियन अशा राज्यकर्त्यांबरोबर एका नगराकडून दुसऱ्या नगरात गेला. तेथील कालवे व पाट यांची पद्धती कोसळली तेव्हा अन्नोत्पादन करणाऱ्या समाजाची ही संस्कृती उध्वस्त झाली.

त्या जमिनीचे वाळवंट झाले. सिंधू संस्कृतीची पडझड होण्याचे एक कारण हेही असू शकते की, तेथील नद्यांनी आपला प्रवाह मार्ग बदलला असावा व त्यामुळे तेथील नगरांचे बंदर म्हणून असलेले महत्त्व नष्ट झाले. धान्याची वाहतूक व पुरवठा कठिण झाला असावा (इतिहासात अनेक नद्यांनी आपले प्रवाह-मार्ग बदललेले आहेत) अर्थात् ह्या संस्कृतीचा शेवट होण्याचे कारण हेच की, ह्या संस्कृतीवर आक्रमण करणारे समूह शेती व्यवसायी नव्हते. त्यांनी पुराचे पाणी अडवण्यासाठी घातलेले बांध फोडून टाकले. (जुन्या ऋग्वेदात तशा अर्थाची अनेक वचने आहेत.) त्यामुळे धान्योत्पादन व त्यावर अवलंबून असणारी नगरे ह्यांचा विनाश झाला. साचेबंद तंत्र व्यवस्था यामुळे सिंधू संस्कृतीचा ऱ्हास अगोदरच सुरू झाला होता. आर्यांच्या आक्रमणाने त्याचा नाश झाला तरीही जुन्या-नव्यांचा नंतर संगम होऊन नवीन समाजरचना नंतरच्या काळात निर्माण झाली.

※



| चार |

# आर्य

## ४·१
## आर्य जनसमूह

आर्य हा शब्द मूळ संस्कृत भाषेतला आहे. त्या भाषेतील आणि त्यावरून इतर भाषेंत वापरल्या जाणाऱ्या ह्या शब्दांचे अर्थ असेः 'स्वतंत्र' (गुलाम नसलेला), 'उमद्या चारित्र्याचा;' 'सवर्ण'. इतर अनेक शब्दांप्रमाणे शतकानुशतकाच्या काळात ह्या शब्दांचा अर्थसुद्धा काळाच्या ओघात बदलत गेलेला आहे. नंतरच्या काळात हा शब्द जरी सन्मानार्थी संबोधन म्हणून वापरला गेला तरी अगदी सुरुवातीच्या काळातील साहित्यांत हे अभिधान खास टोळी-संघाकरिता (ट्राईब) वापरले जात होते. प्राचीन काळात हे टोळीसंघ भारतात आले. प्राचीन भारतीय इतिहासाचे अनेक भाष्यकार सिंधू संस्कृती ही आर्य संस्कृती असावी असे मानतात. काही भाष्यकार आर्यांच्या आक्रमणापासून भारताच्या इतिहासाची सुरुवात करतात. काही भाष्यकारांच्या मते सिंधू संस्कृतीमधील लोक अगोदरच्या काळात आलेल्या आर्य वंशाचे असावेत. भारतीय संस्कृतीची ज्या ज्या वेळी भरभराट दिसून येते, त्यावेळी तशी भरभराट आर्यांनीच घडविलेली असणार अशा दूरभिमानापोटी तसा दावा मांडण्यात येतो. जर्मनीतील नाझी पंथाने आर्यांच्या वंश-श्रेष्ठत्वाचा जो नारा लावला, त्यामधून जी हिडीस विचारसरणी प्रसारित करण्यात आली, त्यामुळे हा गोंधळ अधिकच वाढलेला आहे. आर्य नावाचा एखादा शुद्ध रक्त-वंश (Race) अस्तित्वात होता, हेच विधान खरे नाही.

ज्यांना आर्य समजण्यात येते अशा जगातील अनेक जनसमूहांचे एक समान व्यव-च्छेदक लक्षण म्हणजे त्या सर्वांच्या भाषा एकच कुटुंबातील आहेत. ह्या सर्व महत्त्वाच्या भाषा सबंध युरेशियन खंडात पसरलेल्या आहेत. संस्कृत, लॅटीन, ग्रीक ह्या आर्यांच्या जुन्या भाषा. लॅटीन भाषेने इटालियन स्पॅनिश, फ्रेंच, रुमानियन ह्या दक्षिण युरोपांतील भाषांना जन्म दिला. त्याशिवाय जर्मन, इंग्लिश, स्विडीश ह्या ट्युटॉनिक भाषा आणि रशियन पोलीश इ. स्लाविक भाषा ह्यासुद्धा आर्यन भाषांच्या साखळीतल्याच भाषा

आहेत. आर्य व आर्येतर भाषा ह्यांच्या तौलनिक अभ्यासावरून व ह्या भाषांतील समानार्थी शब्दांवरून हे सिद्ध करता येते. युरोपमधील फिनीश हंगेरियन आणि बास्क ह्या आर्य भाषा नाहीत. हिब्रू आणि अरेबिक ह्या प्राचीन सुमेरियन संस्कृतीत उद्‌भव झालेल्या भाषा आहेत. पण त्याही आर्य भाषा नाहीत. त्याचप्रमाणे मंगोली, चिनी, जपानी, तिबेटी आणि इतर अनेक भाषा ह्या आर्य भाषा नाहीत. भारतातल्या आर्यांच्या भाषा ह्या मूळ संस्कृत भाषेच्या इतर भाषांशी झालेल्या संकरातून जन्माला आल्या आहेत. पाली, मागधी आणि अनेक प्राकृत भाषा प्रथम अस्तित्वात आल्या. त्यांच्यापासून हिंदी, पंजाबी, मराठी, बंगाली ह्या आजच्या भाषा अवतरल्या. भारतात आर्येतर भाषा बोलणारे तामीळ, तेलगु, कन्नड, मल्याळी अशा द्राविडी भाषा (गटाचे) बोलणारे फार मोठे विभाग आहेत व भारतीय संस्कृतीच्या दृष्टीने त्यांना महत्त्वाचे स्थान आहे. त्याशिवाय भारतात आदिवासी भाषा बोलणारेही अनेक समूह आहेत. त्यांना 'ऑस्ट्रिक' भाषासमूह असे म्हणतात. पण तसा एक भाषासमूह करण्याला काहीच अर्थ नाही. कारण ह्या समूहांतील मुंदारी, तोडा, ओराअन वगैरे भाषांचा एकमेकांशी काहीच संबंध नाही. मुख्य प्रश्न असा आहे की, अनेक भाषांतील साधर्म्य किंवा त्यांची मूळ भाषा एक असणे ह्यावर आर्य नावाचा एक वंश होता असे म्हणता येईल का ?

वंश ह्या शब्दांची व्याख्या कितीही मोकळीढाकळी केली तरी भुऱ्या केसाचे स्कॅंडेनेव्हियन्स आणि काळ्या रंगाचे बंगाली एकाच वंशाचे आहेत असे म्हणणे दुरापास्त आहे. आणि हे दोन्ही जनसमूह आर्य साखळीतील भाषाच बोलतात. कवटीच्या आकारावरून वंश ठरवण्याच्या पद्धतीला (बॅचिसेलॅफिक ग्रामर) काहीच अर्थ नाही असा निर्णय युरोपियन शास्त्रज्ञांनी एका शतकापूर्वीच घेतला आहे तर प्रत्यक्षात आर्य हा शब्द भाषासमूहांचा व त्या बोलणाऱ्या जनसमूहांना उद्देशून वापरला जातो. अर्थात फार प्राचीन काळी स्वतःला आर्य म्हणवून घेणारे व आर्य ह्या नावाने ओळखले जाणारे लोक असल्याचा उल्लेख काही प्राचीन लिखाणात सापडतो. खिस्तपूर्व ४८६ साली मृत्यू पावलेला अखेमेनिड राजा, पहिला डेरियस स्वतःला 'आर्यन वंशातील महान आर्य;' 'पर्शियन सुपुत्र' 'अखेमेनिड साम्राज्याचा राजा' असे म्हणवून घेत असे. तसा उल्लेख त्याच्या बद्दलच्या आलेखात आहे. त्यावरून काही काळ अखेमेनिड टोळ्या व पर्शियन टोळ्या ह्यांच्या समन्वित जनसमूहाला 'आर्य' म्हणत, असे म्हणता येईल.

वेदवाङ्मयांत (म्हणजे सर्वात जुन्या भारतीय वाङ्मयात) आर्यांचा उल्लेख 'वैदिक देवांची पूजा करणारे' असा आहे. वेदवाङ्मयाची कालसंगती लावण्यात आली आहे. त्यावरून ऋग्वेद हे सर्वांत जुने वेद आहेत. त्यानंतरच्या काळांतले ते 'यजुर्वेद' हे वेद दोन शाखांत–शुक्ल व कृष्ण–लिहिले गेले आहेत. त्यानंतरचे सामवेद व त्यानंतर बऱ्याच काळानंतर अथर्ववेद लिहिले गेले आहेत. ऋग्वेदाचा बराचसा भाग हा खिस्तपूर्व १५०० ते १२०० वर्षे ह्या काळांतील घटनावर आधारलेला आहे. ऋग्वेद काळांतील आर्य–हे जगातील आर्यांप्रमाणेच–जसे येथल्या आर्येतर जमातींशी व आदिवासींशी लढले तसे आपसांतही



लढत होते. तेव्हा त्यावेळची आर्य भाषा बोलणाऱ्या काही लोकांनीच स्वतःचा उल्लेख 'आर्य' असा केला असावा. डेरियसचा मुलगा झरक्झीस ह्याच्या सैन्यात आर्यांची पथके (कॉंटिजेन्टस) होती. त्याचप्रमाणे पर्शियन लोकांच्याही पूर्वी पर्शियात वास्तव्य असलेले 'मेडस' हे स्वतःला आर्य म्हणवून घेत असत. इराण हा शब्द मूळ 'आर्यनाम' ह्या शब्दांवरून आलेला आहे. (आर्यनाम म्हणजे आर्यांचा प्रदेश.) जरी ग्रीक पर्शियन व पंजाबातील त्यावेळचे समूह आर्य भाषाच बोलत असले तरीही अलेक्झांडरच्या काळातील इतिहासकार फक्त सिंधू नदीच्या उजव्या तीरावर वस्ती करून राहणाऱ्या जनसमूहाचाच उल्लेख 'आर्य' असे करतात.

जुनी आदिम (प्रिमिटिव्ह) आर्य भाषा बोलणारे आर्य कसे होते ? कशा तऱ्हेचे जीवन जगत होते ? जुन्या आदिम भाषेमध्ये कावळा, घोडा, अशी विशेषनामे आढळतात. पण पक्षी, पशू, झाड अशी सामान्यनामे अभावानेच असतात. भाषाशास्त्रज्ञांनी आर्य भाषेतील अनेक शब्दांचे मूळ शोधून काढण्याचा प्रयत्न केला आहे. त्या निष्कर्षाप्रमाणे वृक्ष हा शब्द साधारणतः उत्तर युरोप व हिमालयात उगवणाऱ्या 'बर्च' वृक्षाबद्दल वापरण्यात येत असावा. त्याचप्रमाणे 'मत्स्य' हा शब्द 'सालमंड' ह्या माशाबद्दल वापरला जात असावा. तर अशा तऱ्हेने अनेक शब्दांच्या बाबतीत विवरण करण्यात येत आहे. पृथ्वीच्या पाठीवर निरनिराळ्या ठिकाणी ठराविक तऱ्हेचेच वृक्ष, पक्षी, मासे वगैरे आढळतात. अर्थात मानवसमूहांनी एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जी वाटचाल केली तेव्हा त्यांनी आपल्या बरोबर लागवडीला दुसरीकडील वृक्ष नेले—त्यांची नोंदही घेतली पाहिजे. पुरातन काळातील भौगोलिक परिस्थितीचा अभ्यास करताना तेवढी खबरदारी घेतली पाहिजे. उदाहरणार्थ 'चहा' हा मुळात चीनमधून आणला गेला, तो त्या वस्तूचा 'शब्द' बरोबर घेऊन आला. तेव्हा चहा हा आर्य शब्द आहे आणि ज्याअर्थी चिनी भाषेत तसाच शब्द आहे, ह्याअर्थी चिनी भाषा आर्य भाषेची शाखा आहे असे म्हणणे मूर्खपणाचे ठरेल. तर अशा तऱ्हेने खबरदारी घेऊन विचार केल्यास भारतात आलेले मूळ आर्य हे युरेशियाच्या उत्तर विभागाशी परिचित होते व ते तेथून आले असावेत, असा निष्कर्ष काढता येतो. अर्थात भाषिक विवरणातून येणाऱ्या निष्कर्षांना सुद्धा मर्यादा आहेत. रक्तसंबंधी (नातेवाईक) माणसांबद्दल विविध आर्य भाषांत असणाऱ्या शब्दांत विलक्षण ध्वनिसाम्य आहे. उदा० पितृ, मातृ, भ्राता, श्वशुर, विधवा वगैरे. त्यावरून असाही निष्कर्ष काढता येऊ शकतो की, विविध आर्य भाषा बोलणाऱ्यांची मूळ कुटुंबव्यवस्था सारखी असावी, आणि खरोखरच पूर्वीच्या काळी तशी एखादी संघ-टोळी अस्तित्वात असावी; पण त्याचबरोबर हेही लक्षात ठेवले पाहिजे की, विविध आर्य भाषेतील सर्वच शब्दांत ध्वनिसाम्य नाही. संस्कृतमध्ये दुहिता म्हणजे मुलगी—जी दूध काढते ती. इतर आर्य भाषेत ह्या अर्थाचे जे शब्द आहेत ते कितीतरी साम्य असलेले आहेत. त्यावरून अनेक युरोपियन इतिहासकारांनी आर्यांच्या कुटुंबाविषयी हृद्य चित्रे रंगवली. पण दुर्दैवाची गोष्ट अशी की, ह्या विविध आर्य भाषेत 'दूध'

ह्या वस्तूकरिता वापरल्या जाणाऱ्या शब्दात मात्र ध्वनिसाम्य नाही. गाय व घोडा ह्या प्राण्यांकरिता वापरले जाणारे शब्द ध्वनिसाम्य असणारे आहेत. त्यावरून आर्यांच्या अर्थव्यवस्थेतील मुख्य प्रमुख व्यवसायाचा अंदाज करता येतो एवढेच, पण भाषिक विवरणाची पद्धत फार ताणून चालणार नाही.

### ४·२

एक सर्वसाधारण सिद्धान्त म्हणून असे विधान करता येईल की, जेव्हा एखादी भाषा इतर विविध भाषिकांवर लादली जाते (किंवा इतर विविध भाषिक ती भाषा आपलीशी करतात.) तेव्हा अशा भाषिकांची उत्पादनाची पद्धत व तंत्र हे जास्त प्रगत असते. आर्य ज्या प्रदेशातून आले तेथील भौगोलिक व नैसर्गिक परिस्थिती मात्र अशी नव्हती की जेथे फार मोठ्या प्रमाणावर लोकसंख्या राहू शकते किंवा वाढू शकते. त्याअर्थी त्यांनी फार मोठ्या संख्येने आक्रमण केले असण्याचा संभव नाही. त्यांनी ज्या प्रदेशांवर आक्रमण केले. तेथले अनेक प्रदेश तर असे होते की जेथे नागर संस्कृती उदयास आली होती. शेती व्यवसाय प्रस्थापित झाला होता. असे होते तर मग आर्यांनी स्वतःची संस्कृती व भाषा इतर भाषिक जनसमूहावर कशी प्रस्थापित केली? ते त्यांना शक्य का झाले? अगदी व्यापक अर्थाने जगाच्या संस्कृतीत त्यांनी कोठली भर घातली? भारतात आलेल्या आर्यांविषयी बरीच माहिती उपलब्ध आहे. पण तरीसुद्धा हे मुख्य प्रश्न अनुत्तरित राहिले आहेत. ख्रिस्तपूर्व दुसऱ्या सहस्रकात जे इंडो–इराणियन लोक भारतात आले त्यांना आर्य म्हणत हे ऐतिहासिक नोंदी व भाषिक पुरावे ह्या दोहोवरून सिद्ध झालेले आहे. हे आर्य भटक्या टोळी-संघ समाजव्यवस्थेत संघटित असणारे व लढाऊ वृत्तीचे होते. ते पशुपालन करीत. तेच त्यांचे मुख्य अन्न होते. युरेशिया खंडाच्या विस्तीर्ण चराऊ कुरणात त्यांची गुरे चरत असत. त्यांनी घोड्याला माणसाळवून रथाला जोडले होते. त्यामुळे इतर समूहाशी झालेल्या लढयात ते सरस ठरले. भारतात येणाऱ्या आर्य टोळ्यांची समाजरचना पुरुषप्रधान होती. संघ–संपत्तीचे मालक पुरुषच होते व संघावर त्यांचेच प्रभुत्व असे. आर्यांची दैवतेही मुख्यतः पुरुषी स्वरूपात होती. अर्थात् काही थोडी स्त्रीदैवते त्यांनी कोठल्या तरी जुन्या काळात किंवा जुन्या समूहांकडून आत्मसात केलेली होती.

आर्य संस्कृतीबद्दल विचार करताना, संस्कृती शब्दाचा जो अभिप्रेत अर्थ ह्या ठिकाणी आहे तो स्पष्ट असला पाहिजे. खितपूर्व तिसऱ्या सहस्रकात भारतात जी नागर संस्कृती अस्तित्वात होती–आणि ज्यांवर आर्यांनी हल्ले केले; त्यांचा विनाश केला; त्या संस्कृतीशी तुलना केली तर आर्य हे अधिक सुसंस्कृत नव्हते. पुरातत्त्व शास्त्र जे निकष लावून संस्कृतीचा अभ्यास करतात, त्या पद्धतीने अभ्यास करण्याकरिता लागणारी सामुग्री म्हणजे उत्खननात सापडणारी मातीची भांडी, अवजारे इत्यादी. ह्या सुरुवातीच्या काळातील आर्यांच्या संस्कृतीचा शोध घेण्याकरिता ही साधने उपलब्ध नाहीत. जागतिक इतिहासात



ह्या आर्यांना जे महत्त्व प्राप्त झाले ते त्यांच्या गतिशीलतेमुळेच. त्यांचे अन्नही पशूंच्या कळपांच्या स्वरूपात असल्याने ते त्यांना आपल्याबरोबर कोठेही नेता येत असे. त्याचप्रमाणे घोडे, रथ व बैलगाडी ह्यामुळे एका प्रदेशातून दुसऱ्या प्रदेशात जाणे—आक्रमण करणे त्यांना शक्य झाले. ख्रिस्तपूर्व तिसऱ्या सहस्रकात नद्यांच्या काठावरील विकसित नागर संस्कृतीपासून दूर असणाऱ्या किंवा प्राथमिक तऱ्हेने शेती करणाऱ्या रानटी किंवा आदिवासी जीवन जगणाऱ्या मानवसमूहांच्या विविध वस्त्या होत्या त्या समूहांनी आपल्या भोवती उभारलेल्या वेगळेपणाच्या भिंती आक्रमक आर्यांनी क्रूरपणे मोडून टाकल्या. ही त्यांची खरी कामगिरी आहे. ह्या आक्रमणांच्या क्रमांत निरनिराळ्या जमातीचे जे जे तंत्र त्यांना उपयुक्त वाटले ते त्यांनी आत्मसात केले, आणि आक्रमण करीत ते पुढे गेले. त्यांच्या आक्रमणाने इतर जनसमूहांच्या जीवनपद्धतीचा इतका विध्वंस झाला की, बहुतेक ठिकाणी जुन्या जीवनपद्धतीची पुनर्उभारणी करणे शक्य झाले नाही. तरीसुद्धा आर्यांची इतर वसाहतीवर केलेली आक्रमणे आणि इजिप्त सत्तेने व नंतर असिरियन सत्तेने केलेली आक्रमणे ह्यात मूलभूत फरक आहे. जेव्हा इजिप्शियन 'फारोहा' आक्रमण करी, तेव्हा तो लूट किंवा खंडणी किंवा लोखंडाच्या खाणीचा ताबा किंवा गुलाम घेऊन आपल्या स्थानी परत जात असे. ज्या वस्त्यांवर तो आक्रमण करी, त्या अगदी नष्ट झाल्या तरच तेथील जीवनपद्धती नष्ट होत असे. नाही तर आक्रमण संपल्यानंतर तेथील जीवनपद्धती पूर्वीप्रमाणे चालू राही. पण आर्यांचे आक्रमण पुढे जाई. फारोहाप्रमाणे ते आपल्या स्थानी परत जात नसत. आर्यांच्या आक्रमणांचा उद्देश व पद्धत ही फारोहाच्या आक्रमणांप्रमाणे नसे. आक्रमण करीत करीत आर्य आपल्या मूळ स्थानापासून दूर गेले होते. ते आक्रमण करताना कधी तात्पुरत्या तर कधी कायमच्या वस्त्या करीत होते. संपत्ती घेऊन परत फिरत नव्हते. त्यांच्या आक्रमणानंतर जिथे आक्रमण होई त्या प्रदेशांतील मानवी जीवन व इतिहास वेगळ्याच पातळीवर पुन्हा सुरू होई. आर्यांचे आक्रमण संपल्यानंतर त्या प्रदेशात प्राथमिक पद्धतीच्या शेती व्यवसायावर जगणाऱ्या छोट्या छोट्या जमातींचे अलग अलग व बंदिस्त जीवन पूर्वीच्या पद्धतीने चालू ठेवणे शक्य नव्हते. ह्या विविध जमातींनी आपली तंत्रे गुप्त राखून त्यांना यातुकर्मविषीशी निगडित केले होते. आर्यांच्या आक्रमणानंतर ही विविध तंत्रे गुप्त राहू शकली नाहीत. आर्यांना व इतरांना त्याची ओळख झाली. आर्य व आर्यपूर्व एकमेकात मिसळले गेले. त्यातून समन्वित असे नवे जनसमूह निर्माण झाले. अशा समन्वित समूहांची ठिकठिकाणी नवी आर्य भाषा तयार झाली.

ख्रिस्तपूर्व दुसऱ्या शतकाच्या प्रारंभी एक व अखेरीस एक अशा आर्यांच्या आक्रमणांच्या दोन मुख्य लाटा मध्य आशियातून निघाल्या. दोहोंचा परिणाम भारतावर व सर्व युरोप खंडावरही झाला. ह्यापैकी कुठलेही आक्रमण मुद्दाम ठरवून आखलेले किंवा दिशा ठरवून केलेले दिसत नाही. ज्या मूळ वसतिस्थानातून ते येथे आले (साधारणपणे आजच्या उझबेकीस्तानाचा हा प्रदेश असावा) तेथील प्रदेश (कदाचित बराच काळ पाऊस न

पडल्यामुळे) गुरांना चराऊ कुरण म्हणून अपुरा पडू लागला असावा. तेव्हा आपली गुरे घेऊन ते नव्या चराऊ कुरणांच्या शोधार्थ निघाले असावेत. त्यांची आक्रमणे नेहमी एका निश्चित दिशेने झाली असे नाही. पहिल्या प्रथम जे आर्य भारतीय उपखंडात घुसले, त्यापैकी काही परत गेले असावेत. एक तर त्यांचा पराभव झाला असेल किंवा येथील हवामान त्यांना मानवले नसावे. हैती येथे खिस्तपूर्व दुसऱ्या सहस्रकाच्या थरांत सापडलेल्या काही छाप्यांवरील वशिंड असलेल्या खास बैलाच्या चित्रावरून हे सिद्ध होते.

भरतवर्षातील आर्यांशी अगदी जवळचे संबंधित आर्य म्हणजे पर्शिया येथील आर्य होत. पर्शियन व मेड येथील जनसमूहांच्या त्या काळच्या भाषा संस्कृत भाषेच्या अगदी जवळच्या आहेत. मिट्टानियन येथील पुराव्यानुसार खिस्तपूर्व १४०० च्या सुमारास आर्यांच्या देवाची पूजा आर्य भाषेत करणाऱ्या जनसमूहांची वस्ती इराण येथील 'लेक उम्रिये' येथे होती. खिस्तपूर्व सहाव्या शतकांत झोरोस्तरने केलेल्या धार्मिक सुधारणांचा अमंल होण्यापूर्वी पर्शियनस् इंद्र, अग्नी, वरुण व मित्र ह्या देवांची पूजा करीत असत. त्यानंतर भारत व पर्शिया देशात फक्त अग्नी हेच समान दैवत राहिले. संस्कृत 'देव' शब्दाला पार्शियन भाषेत जो 'डेमन' असा समान शब्द आहे त्याचा अर्थ मात्र नेमका उलट 'दानव' असा झाला आहे. अवेस्ता ह्या पर्शियन ग्रंथात 'सात नद्यांचा प्रदेश (पंजाब) हा आर्यांचा प्रदेश', असल्याचा उल्लेख आहे. काही इंडो-इराणी देव हे कास्पीयन समुद्राच्या किनाऱ्यावरील प्रदेशांतून आलेले आहेत. इराणमधल्या जुन्या लिखाणांत 'यीमा' राजाची व त्याच्या 'वरा'ची कथा आहे. त्या कथेवरून असे दिसते की 'वर' ही एक अशी आयताकृती जागा असे की, जेथे जगात पाप निर्माण होईपर्यंत, कोणालाही मृत्यू येत नसे की थंडी वाजत नसे. त्यानंतर लोकांनी धर्मबंधन तोडल्यामुळे त्यांच्यावर पडलेला शाप दयाळू यिमाने स्वत:वर ओढवून घेतला आणि मृत्यू पत्करला. तो पहिला मर्त्य होय. ऋग्वेदांतील यम हासुद्धा पहिला मर्त्य आहे. आपल्या पूर्वजांचा हा मृत्यूदेव अजूनही मृत्यू पावलेल्यांचा देव आहे. (मृत्यू पावलेली माणसे यमलोकात जातात अशी समजूत आहे.) मुळात समजूत अशी होती की, मृत्यू पावलेली माणसे यमराज्यांतील आपल्या पूर्वजांना जाऊन मिळत असत. त्यानंतर अशी समजूत प्रस्थापित झाली की, पुण्यवान लोक स्वर्गात वास करतात व नरकात गेलेल्या पापी माणसांचा छळ करण्याच्या व्यवस्थेचे प्रमुखपद यमाकडे असते. सोविएत पुरातत्त्व शास्त्रज्ञांनी उजबेकिस्तान येथे कुंपण घातलेल्या बंदिस्त जागांचा (एन्क्लोजर्स) शोध लावला आहे. त्यालाच वर सांगितलेल्या यमाच्या कथेत 'वर' असे म्हटले जात असे. त्याचा आकार व क्षेत्रफळ इराणियन धर्मग्रंथात सांगितलेल्या 'वराचे' आहे. भारतात 'वर' देणे ह्या शब्दाचा अर्थ इच्छाशक्तीच्या जोरावर माणसाची आयुर्मर्यादा वाढवणे. त्याचे शुभ करणे असा आहे. 'वर' ही जागा माणसांना मृत्यू पावण्यापासून एकेकाळी वाचवणारी होती; ही जी जुनी समजूत होती, त्याचा संदर्भ ह्यावरून लागू शकतो. प्राग् ऐतिहासिक काळातील समाज वर्तुळाकार बांधलेल्या दगडी घरात रहात असत व गुरांना मधल्या चौकात बांधीत असत. ती जागा



सर्व तऱ्हेच्या संकटापासून मुक्त रहावी अशा भावनेतून ही दंतकथा व समजूत निर्माण झाली असावी. आर्यांचे भारतात आक्रमण होण्यापूर्वी यम व त्याचे राज्य ही कल्पना निर्माण झाली आहे. ग्रीक पुराणामध्येही पुन्हा ह्या 'वर'चा उल्लेख हेराक्लसने (हरक्यूअसने) ऑजिअस राजांच्या गुरांचे गोठे अलक्यूअस नदीचे पात्र वळवून साफ केल्याबद्दलची जी कथा आहे त्यात आला आहे.

१४ व्या शतकाच्या उत्तरार्धात ऋग्वेदी वाङ्मयाचे संपादन दक्षिण हिंदुस्थानात केले गेले. तोपर्यंत ऋग्वेदाचे पठण केले जाई व त्यातील ऋचा स्मृतिबद्ध केल्या जात. त्यामुळे ऋग्वेदाची सर्वच परंपरा शिल्लक राहिली असे म्हणता येणार नाही. प्रत्यक्षात ऋग्वेदांतील घटना ह्या पंजाबात घडलेल्या आहेत. पण पुढे ऋग्वेदी परंपरा ठेवणाऱ्या ब्राह्मणांचा त्या भागाशी शतकानुशतके संबंधच राहिला नाही. त्यामुळे ऋग्वेदांत ज्या स्थानांचा उल्लेख आहे. त्याचा नेमका ठावठिकाणा लागत नाही. संस्कृत भाषेचे स्वरूप बदलत गेल्यामुळे अनेक शब्दांचा निश्चित अर्थ लागणेही कठिण जात आहे. ओल्ड टेस्टेमेंट किंवा बायबल ह्या ग्रंथांना ठराविक भागांत राहणाऱ्या व त्या भागांशी संबंधित असलेल्या लोकांच्या इतिहासावर प्रकाश टाकणारे ग्रंथ म्हणून जेवढे महत्त्व देता येते तेवढे महत्त्व ऋग्वेदाला देता येत नाही. त्याशिवाय पॅलेस्टिनमधील उत्खनन भारतीय उत्खननांच्या मानाने बरेच प्रगत आहे. बायबलमध्ये सांगितलेल्या अनेक घटनांना त्या उत्खननांवरून दुजोरा मिळतो. ह्याउलट आर्य हे सतत स्थलांतर करणारे होते. नद्यांची व पर्वतांची नावे ते त्यांच्याबरोबर आणीत व वाटेत तशा तऱ्हेच्या दिसणाऱ्या नद्यांना व पर्वतांना तीच परिचित नावे देत. उदा.—वेदांतील पवित्र नदी सरस्वती हिचे नाव अफगाणीस्थानांतील हेल्मंड, पार्शियन भाषेतील हरावैथी, असिरियन भाषेतील अरकेंतू ह्या नद्यांवरून दिले आहे. उत्तर पंजाबमधील ही नदी पुढे कोरडी पडली. पुरातत्त्व शास्त्राप्रमाणे हवा असलेला दुसरा कोणताही पुरावा उपलब्ध नसल्यामुळे व ऋग्वेदांत जो पुरावा आहे तो लक्षात घेता एक निश्चित निष्कर्ष निघतो तो हा की, ह्या आर्यांनी सिंधू संस्कृतीवर आक्रमण केले व त्याचा विध्वंस केला. त्याला सिंधू संस्कृतीच्या उत्खननांतील पुराव्यांची जोड आहे. ऋग्वेदातील प्रमुख देव अग्नी. ह्या अग्नीवर सर्वांत जास्त ऋचा रचलेल्या आहेत. त्यानंतरचा महत्त्वाचा देव आहे इंद्र. हा इंद्र एखादा आडदांड मानवी टोळी–संघ प्रमुख (ट्रायबल चीफ) वाटावा असाच आहे. ब्रॉन्झ युगातील आर्यांच्या आक्रमणातील रानटी समूह नेत्यांची ती प्रतिमा आहे. कदाचित् असेही घडले असेल की, इंद्र नावाच्या कोण्या एका पूर्ववैदिक आर्यांच्या शूर योद्ध्याला किंवा टोळीच्या प्रमुखाला पुढे देवत्व प्राप्त होऊन इंद्राची प्रतिमा निर्माण झाली किंवा आर्यांच्या आक्रमणांचे नेतृत्व करणाऱ्यांना परंपरेने हे पद प्राप्त झाले. ऋग्वेदामध्ये अनेक वेळा इंद्राला सोमरस पिण्याकरिता व युद्धात नेतृत्व करण्याकरिता आवाहन करण्यात आले आहे. (सोमरस हे उत्तेजित करणारे पेय होते असे दिसते. पण ते नेमक्या कोणत्या वनस्पतीपासून निर्माण केले जाई ह्यांचा अंदाज लागलेला नाही.) इंद्राने आर्यांच्या शत्रूंचा पराभव केला; देव न मानणाऱ्या लोकांचा नि:पात

केला; त्यांची संपत्तीमान घरे लुटली; असे उल्लेख ऋग्वेदात वारंवार येतात. ज्या दानवांची कत्तल इंद्राने केली त्यापैकी काही नावे अशी आहेत—शबर, पिभ्रु आर्षसनस, नामुची, शुष्ण (हे नाव कदाचित दुष्काळाला किंवा दुष्काळाच्या देवतेला दिले असावे.) वेदांतील प्रत्येक कथा ही त्या काळच्या एखाद्या प्रत्यक्ष प्रसंगाशी जोडलेली होती की केवळ कल्पनेतील भरारी होती हे सांगणे कठिण आहे; पण तरीही त्यांचा ऐतिहासिक व सामाजिक संदर्भ लावता येतो. आर्य जेव्हा एखाद्या दुसऱ्या जातीजमातीचा, टोळीचा किंवा दुसऱ्या संस्कृतीच्या जनसमूहांचा पराभव करीत, तेव्हा त्यांचा प्रत्यय त्यांच्या देवांनी दुसऱ्याच्या दैवताचा परभव केल्याच्या कथेत दिसून येई. उदाहरणार्थ नामुचीच्या सैन्यात अनेक स्त्रिया होत्या, असा उल्लेख आहे. त्या मानवी होत्या की त्या जमातीच्या मातृदेवता होत्या हा प्रश्न आहे, त्याचप्रमाणे ह्या दानवाला दोन बायका होत्या, असाही उल्लेख आहे. मेसोपोटेमिया येथील उत्खननात सापडलेल्या छोट्या छाप्यावर दोन नद्यांच्या अधिपती असलेल्या दैवताचे चित्र आहे. त्याबाबतचा तर हा उल्लेख नसावा? येथे येण्याअगोदरही आर्यांनी इतर संस्कृतींचा विनाश केला होता. आर्यप्रमुख अभ्यावर्तीन छायामान ह्याच्या वतीने इंद्राने (म्हणजेच इंद्राच्या आशीर्वादाने त्या प्रमुखाने) हरियुपिया येथील वाराशीकांच्या संस्कृतीचा पराभव केल्याची कथा आहे. नष्ट केलेल्या जमातीचे नाव वृचिवत् असे होते. "याव्यायती नदीवर झालेल्या लढाईत त्या जमातीच्या १३० सैनिकांची पुढली फळी ही मातीच्या भांड्याचा चुरा करावा तशी इंद्राने फोडून काढली;" "त्यानंतर त्या विरोधी सैन्याला जुने वस्त्र टराटर फाडून टाकावे तसे पराभूत केले. उरलेसुरले सैन्य व लोक भयग्रस्त होऊन सैरावैरा पळाले", असे उल्लेख ऋग्वेदात आहेत. ही लढाई हरप्पा येथील असावी. आर्यांच्या आपसांत किंवा आर्येतर जमातीशी झालेल्या लढायांचे वर्णन अतिशय कडव्या शब्दात केलेले आहे. त्याचप्रमाणे ऋग्वेदात 'नार्मिनी' नावाचे नगर जाळून टाकल्याचा उल्लेख आहे. मोहेंजोदरो तर नसेल? पण ते नगर जाळून टाकले ह्यापलीकडे त्या बाबतीत इतर कोठलाही उल्लेख नाही. आर्यांचे शत्रू सावळ्या किंवा काळ्या रंगाचे (कृष्णवर्णाचे) व अपऱ्या नाकाचे (अनसा) असल्याचे उल्लेख वेदांत आहेत. इंद्राने ज्या तटबंदी असलेल्या नगरांचा विध्वंस केला, त्याची तुलना काळ्या गर्भवतीशी केलेली आहे.

ऋग्वेदांत 'अडवलेल्या नद्यांची सुटका करण्याच्या महान कृत्याबद्दल' इंद्राची वारंवार स्तुती केलेली आहे. एकोणिसाव्या शतकामध्ये ह्या ऋचांचा अर्थ 'इंद्राने पाऊस पाडला,' 'ढगांत अडकलेले पाणी सोडवले,' असा केला जाई. इंद्राला पर्जन्यदेव मानले जाई. एकोणिसाव्या शतकात समजूत अशी होती की, प्राचीन काळात घडणाऱ्या नैसर्गिक चमत्कारांना दंतकथांचे स्वरूप प्राप्त झाले असावे. होमरच्या ग्रंथातील ट्रॉय शहराच्या विध्वंसनाचा अर्थसुद्धा त्या पद्धतीने लावला गेला. पण वेदांत मात्र पर्जन्य हा स्वतंत्र देव आहे. इंद्राने ज्या नद्यांची सोडवणूक केली, त्यांना वेदांतील कथेप्रमाणे दानवांनी कृत्रिम बंद घालून अडवले होते. "वृत्र हा दानव डोंगराच्या उतारावर



सापासारखा विळखा घालून बसला होता;" ह्या वेदवाक्यांतील अलंकार बाजूला ठेवल्यास वृत्र हा 'दानव' म्हणजे दानवांनी नदीवर घातलेला बांध होता, असे दिसून येते. ऋग्वेदांतील पुढला उल्लेख असा आहे :– "ह्या दानवाचा बीमोड केल्यानंतर त्याच्या शरीरातून मोठमोठे दगड रथांच्या चाकासारखे घरंगळून पडले आणि मुक्त झालेले पाणी त्याच्या मृत शरीरावरून वाहू लागले." वृत्र ह्या शब्दांचा भाषा शास्त्रज्ञांनी लावलेला अर्थ 'अडथळा,' 'बांध' (बॅरीअर, ऑब्सटेकल) असा आहे. वेदात इंद्राला वृत्रहं (म्हणजे वृत्राचा ध्वंस करणारा) म्हटले आहे. इराणमधील सर्वश्रेष्ठ झोरोष्ट्रियन देव (जो प्रकाशाचा देव आहे.) त्याला वृत्रघ्न अशी संज्ञा आहे. उपमा-उत्प्रेक्षा ह्यांनी अलंकारित केलेल्या ह्या कथांवरून सिंधू संस्कृतीतल्या ह्या शेती व्यवसायाचा विनाश कसा केला गेला ह्याचे चित्र दिसते. त्याचबरोबर "इंद्राने 'विबाली' नावाच्या नदीचे पूर थोपवून तिला सरळपणे वहावयास लावले" असा उल्लेख आहे. सिंधू संस्कृती-तील लोक पुराच्या पाण्यावर बांध घालून त्याचे पाणी जमिनीवर पसरवीत व त्यावर शेती करीत हे आपण मागील प्रकरणात पाहिले आहे. नद्यांवरील बांध फोडल्यामुळे व त्या प्रदेशातील पावसाचे प्रमाण कमी असल्यामुळे आर्यांना सिंधू संकृतीच्या जागी कायम वसतिस्थान करणे शक्य झाले नाही. (त्यामुळे त्या नगरांचे सातत्य राहिले नाही.)

ऋग्वेदांमध्ये ज्या आर्यपूर्व जमातीचा नेमका उल्लेख आढळतो, तो 'पणीं'चा होय. त्याचे वर्णन "श्रीमंत असलेले, लोभी असलेले व दुसऱ्यांच्या संपत्तीवर डोळा ठेवणारे, इंद्रासमोर हार खाणारे" असे केलेले आहे. उत्तर ऋग्वेदात पणी व इंद्राची मध्यस्थ कुत्री सरमा ह्यांचा संवाद आहे. वास्तविक 'सरमा' हे नाव जलदेवतेचे असावे. ह्या संवादातील ऋचा अशा आहेत की, त्या हावभाव करून म्हणावयाच्या आहेत. त्यावरून काही महत्त्वाच्या ऐतिहासिक प्रसंगांची स्मृती ह्या ऋचा म्हणावयाच्या समारंभात जागवण्याचा उद्देश दिसून येतो. ह्या ऋचांवरील भाष्यकारांनी असा अर्थ लावला आहे की, देवांच्या गायी पणींनी पळवल्या व शांततेच्या मार्गाने परत मिळविण्याकरिता देवांनी 'सरमा'ला मध्यस्थी करण्यास पाठविले. प्रत्यक्षांत मात्र ह्या ऋचांतून गायी पळवल्याचा उल्लेख नाही. उलट देवांनी अगदी सरळ सरळ उद्दामपणे पणींकडे गायींची 'खंडणी' मागितली आहे. आणि पणींनी ती रागाने धुडकावून लावली आहे. त्यावर देवांनी त्यांना गंभीर परिणाम घडतील अशी धमकी दिलेली आहे. आक्रमण करण्याकरिता सबब निर्माण करण्याची ही आर्यांची पद्धत दिसते. पणी हे नाव आर्य दिसत नाही. पण ह्या शब्दाची संस्कृत भाषेत व त्यानंतर इतर संस्कृतोद्भव भाषांत अनेक महत्त्वाची रूपे निर्माण झाली आहेत. संस्कृतमध्ये वणिक म्हणजे व्यापारी—त्यापासून बनिया वाणी अशी रूपे आली. संस्कृतमध्ये 'नाणे' ह्या शब्दाला 'पण' व व्यापारविषयक वस्तूला 'पण्य' म्हणतात. भारतातील जुन्या नाण्यांच्या वजनांचे प्रमाण हे तंतोतंत मोहेंजोदारो येथे सापडलेल्या वजनांच्या मापाएवढे आहे. पर्शिया किंवा मेसोपोटेमिया येथील वजनांच्या प्रमाणात नाही. कदाचित 'पणी' हे व्यापारी असतील व मोहेंजोदारो नष्ट झाल्यानंतरही व्यापार व उत्पादन ह्याची परंपरा त्यांनी टिकवून धरली असेल.

ऋग्वेदात स्थिर वस्त्यांचा उल्लेख किंवा वर्णने नाहीत. (नगरांचा तर प्रश्नच नाही.) वाचन, लिखाण, कला, स्थापत्यशास्त्र वगैरेबद्दलही त्यात काहीच उल्लेख नाही. यज्ञ-विधींच्या वेळी ऋचा तालासुरात म्हणाव्या लागत तेवढेच संगीत. ऋग्वेदातील सर्व तंत्रज्ञान रथाची बांधणी व साधने बनवण्याच्या बाबतीतील आहे.

हे तंत्रज्ञान मुख्यत: त्वष्ट्री ह्या तंत्रज्ञाचे आहे. त्वष्ट्री हा सिंधू संस्कृतीतला असावा, असेही मानण्यास जागा आहे. ऋग्वेदाच्या काळात आर्यांच्या टोळ्यांत (जमातीत) वर्ण व वर्गभेद निर्माण झालेले दिसत नाहीत. कारागिराला (रथकार), आर्यांच्या संघपद्धतीच्या जीवनात मानाचे स्थान होते. समाजाचे ते स्वतंत्र (दास नसलेले) सभासद होते. पुढे ह्या जीवनपद्धतीचा जसा क्षय होऊ लागला, तसे त्यांना खालच्या वर्णात लोटले गेले. वस्त्रे विणणे हे काम मुख्यत: स्त्रियांचे होते. पुरुषांच्या सामाजिक जीवनाचा केंद्रबिंदू 'सभा' होता. सभा म्हणजे संघ-सभासदांची किंवा प्रमुख सभासदांची एकत्र बैठक. सभा 'सभेची जागा' अशाही अर्थाने वापरला गेला आहे. ती जागा पुरुष आणि फक्त पुरुषच आपल्या करमणुकीकरिता वापरत. सभेच्या जागेत द्युत (जुगार) खेळले जाई. ऋग्वेदात द्युतांचे विलक्षण वेड असलेल्या आर्यांचा उल्लेख आहे. त्याचप्रमाणे रथशर्यती, नर्तिका, मुष्टियोद्धे ह्यांचीही वर्णने काही ठिकाणी आहेत. आर्यांनी ज्या नागर संस्कृतीचा विध्वंस केला, त्यांच्या मानाने आर्य हे सांस्कृतिक दृष्ट्या मागासलेले जनसमूह होते, हेच ह्यावरून दिसून येते.

## ४·३
## आर्यांची पूर्वेकडील प्रगती

ऋग्वेदाच्या उत्तर भागातील (नंतरच्या काळातील) आर्यांच्या विजयाच्या कथा ह्या खऱ्या ऐतिहासिक असण्याचा जास्त संभव आहे. ह्या कथांचे नायक मानवी आहेत. त्या सर्व कथांत सुदासाची कथा सर्वात जास्त प्रसिद्ध आणि ऐतिहासिक दृष्ट्या महत्त्वाची आहे. सुदासाने दहा राजन्यांचा पराभव केला त्याचे वर्णन ह्या कथेत आहे. सुदास हा पैजवनाच्या कुळातील दिवोदास ह्याचा मुलगा. ह्या नावातील 'दास' हे अभिधान आश्चर्यकारक आहे. पुढील संस्कृत वाङ्मयात दिवोदासाचा अर्थ 'स्वर्गाचा सेवक' असा सांगितला गेला आहे. परंतु मुळात दास किंवा दस्यू नावाच्या जमातीचे लोक हे आर्येतर व कृष्णवर्णी असल्याचे उल्लेख पूर्व ऋग्वेदांत आले आहेत. आर्य व आर्येतर ह्यांच्यातील फरक अनेक वेळा वर्णावरून सांगितला गेला आहे. आर्य हे गौरवर्णी व दास हे कृष्णवर्णी असल्याचे अनेक उल्लेख ऋग्वेदांत आहेत. 'दास' ह्या शब्दाला नंतर 'गुलाम' असा अर्थ प्राप्त झाला. त्यानंतरच्याही काळांत दास म्हणजे 'शूद्र वर्णाचा' किंवा नोकर असलेला असे अर्थ प्राप्त झाले. ऋग्वेदाच्या काळांतच एका राजाचे नाव सुदास असावे, एका राजाला दास ही उपाधी असावी–ह्याचा अर्थ खिस्तपूर्व १५०० वर्षे इतक्या जुन्या काळातही आर्य व आर्येतर ह्यांच्यात काही संमीलन झाले असावे असा



होतो. सुदास हा भरतवंशाचा किंवा भरतवंशातील 'त्रित्सु' हा टोळीचा प्रमुख होता. भारताला आता भारताची भूमी ह्या अर्थी भारत म्हटले जाते. भरतवंश हा निश्चितपणे आर्य होता तरी त्याने सुदास अशी उपाधी घ्यावी, ह्यावरून त्यावेळच्या आर्यांना 'वांशिक' शुद्धतेचे फारसे सोवळे वाटत नव्हते हे स्पष्ट दिसते किंवा आर्येतर टोळ्यांशी तशी गरज लागल्यास संबंध जोडणे व त्यांचे नाव घेणे ही प्रक्रिया झाली असणे शक्य आहे व तसे घडलेलेही आहे. सदर कथेत सुदासाच्या विरोधकांची नावे दिली आहेत. ही नावे त्या टोळींची व टोळीप्रमुखांची (राजन्यांची) अशी दोन्ही आहेत. वास्तविक ह्या कथेतील सुदासाच्या विरोधकांची नावे दहापेक्षा जास्त आहेत. हे राजन्य आर्य असावेत. निदान त्यापैकी काही नक्कीच आर्य असावेत. त्यातील एक 'पख्त' हे नाव पख्तून किंवा पठाण टोळीशी संबंधित आहे. पठाणांची 'पुश्तू' भाषा ही भारतीय आर्य-भाषांपैकी एक आहे. (ग्रीक इतिहासकार हेरोडोटस ह्याच्या ग्रंथातही पक्त्यान नावाच्या भारतीय टोळीसंघाचा (ट्राईब) उल्लेख आहे. अलीना (म्हणजे मधमाशी) व मत्स्य अशा दोन राजन्यांचाही उल्लेख आहे. ही नावे टोटेमिक म्हणजे अन्न किंवा पशुदेवकांची आहेत. नंतरच्या ऐतिहासिक काळांत मत्स्य वंशाचे राज्य हल्लीच्या भरतपूरजवळ असल्याचे दिसून येते. पातंजलीने आपल्या व्याकरणांत द्विरुक्ती अलंकाराचे जे उदाहरण दिले आहे, त्यात 'उत्तरेकडील भरतवंशीय' असे एक उदाहरण आहे. त्याचप्रमाणे सिग्रू हे आणखी एका राजन्याचे नाव ह्या लढाईच्या संदर्भांत आढळून येते. हे नाव वृक्षावरून पडलेले आहे. सुदासाच्या शत्रूंच्या यादीत 'भृगु' हे नावही आहे. ऋग्वेदांत इतर ठिकाणी भृगूने इंद्राकरिता बनविलेल्या रथाचे खास कौतुक केलेले आहे. हेच नाव पुढे अत्यंत महत्त्वाचे ब्राह्मण गोत्र म्हणून प्रसिद्धीस आले आहे. 'परुष्णी' नदीचे पात्र वळवण्याचा प्रयत्न केल्यामुळे हे युद्ध झाले. परुष्णी नदी रावीची उपनदी होती. रावीने आपले पात्र अनेक वेळा बदलले आहे. 'घोगऱ्या आवाजाचे पुरुजन' भरत कुलाशी रक्तसंबंधित होते, तरीही सुदासाशी युद्ध करणाऱ्यांच्या यादीत त्यांचे नाव आहे. पुढल्या काळातील वाङ्मयात तर भरतवंश पुरुवंशाचीच शाखा असल्याचा उल्लेख आहे. ऋग्वेदातील अनेक ऋचांतून पुरुवंशाचे पुरोहित भरतवंशाला कधी सुयश चिंतीताना तर कधी शाप देताना आढळतात. त्यावरून ह्या दोन वंशात कधी मैत्री तर कधी तंटे चालत असावेत असे दिसते. अगदी जुन्या अशा ऋग्वेदी वाङ्मयात दिसून येणारे आर्य व अनार्य ह्यांच्यातील कडव्या संघर्षाच्या पेक्षा हे तंटे वेगळ्या तऱ्हेचे असल्याचे दिसून येते. ह्या पुरुजनांचे राज्य हरप्पा प्रदेशात बरीच वर्षे राहिले. त्याचा प्रसार नंतर पंजाबपर्यंत झाला. खिस्तपूर्व ३२७ वर्षी अलेक्झांडरचे जे आक्रमण झाले तेव्हा 'पौरस' ह्या पुरु राजाने त्या आक्रमणाला खंबीरपणे विरोध केला. पंजाबमधील पुरी हे आडनाव बहुधा जुन्या पुरुवंशातून उद्‌भवलेले असावे.

दशराजन्याच्या कथेतील सुदासाच्या विजयाच्या ऋचा वशिष्ठ ऋषींनी गायलेल्या आहेत. अजूनही ब्राह्मणांमध्ये जी महत्त्वाची सात गोत्रे मानली जातात, त्यातील वशिष्ठ

हे एक महत्त्वाचे गोत्र आहे. सुदासाचा अगोदरचा पुरोहित विश्वमित्र हा कौशिक (घुबड) हे पशुदेवक मानणाऱ्यांच्या कुळातील होता. ऋग्वेद्काळात पुरोहित वर्गाची कामे ही ठराविक व्यक्तींची मक्तेदारी नव्हती. पूर्वऋग्वेदांत 'वर्ण' हा शब्द फक्त गोऱ्या रंगाचे आर्य व काळ्या किंवा सावळ्या रंगाचे अनार्य ह्यांच्यातील भेद दाखवण्याकरिता-तेवढ्याच मर्यादित आर्थाने वापरला गेला आहे.

जुन्या काळातील ग्रीक, रोमन इत्यादी समाजांप्रमाणे आर्यांनाही आपल्या कुलदैवताची आराधना करण्याकरिता आचार व विधी करावे लागत होते. ती जबाबदारी परंपरेने वा रिवाजाप्रमाणे टोळीतल्या पुरुष सभासदांवर पडत असे. असा सभासद वय, परंपरा किंवा निवड याअन्वये नेमला जाई. वेदांमध्ये निरनिराळे यज्ञविधी करणाऱ्या निरनिराळ्या पुरोहितांचा उल्लेख असला तरी पौरोहित्य करण्याची मक्तेदारी असलेला ब्राह्मण वर्ण किंवा जात अस्तित्वात आली नव्हती. ऋषी 'वशिष्ठ' हे नवीन प्रकारचे पुरोहित आहेत. त्यांचा जन्म मित्र (सूर्य) व वरुण ह्या वेदिक काळातल्या दोन देवतांपासून झाला असल्याची कथा आहे. त्याच कथेप्रमाणे त्यांचा जन्म उर्वशी ह्या अप्सरेच्या 'मना'पासून झाला असल्याचेही सांगितले गेले आहे. आता 'उर्वशी' ह्या अप्सरेच्या जन्माबद्दल जी कथा आहे, त्याप्रमाणे "ही उर्वशी दोन देवांचे बीज ज्या कुंभात पडले होते त्या कुंभातून जन्माला आली. आणि एका पुष्करात 'विजेचे वस्त्र परिधान केलेली' अशी सापडली." वर वर दिसणाऱ्या ह्या दैवी व चमत्कारिक कथेचा अर्थ लावता येणे शक्य आहे. वशिष्ठ ऋषी हे आर्यपूर्व समाजातील मातृदेवतेची मानवी प्रतिनिधी असणाऱ्या स्त्रीचा मुलगा आहे. त्यामुळे त्याला 'पिता' नव्हता. पण पितृसत्ताक आर्य समाजाच्या घडीत नंतर त्याचा समावेश करण्याकरीता व मानाचे स्थान देण्याकरिता त्याला 'पिता' देणे व त्याची आर्यपूर्व 'माता' (मातृकुल) नाकारणे त्याच्याबद्दलच्या दंतकथेत आवश्यक ठरले. दुसऱ्या एका ब्राह्मण गोत्राचा मूळ पुरुष 'अगस्ती' हा मातीच्या घटांतून जन्माला आला असल्याची कथा आहे. मातीचा घट हे गर्भाशयाचे प्रतीक आहे. त्याचा अर्थ मातृदैवत मानणाऱ्या समाजात त्याचा जन्म झाला असावा. ऋग्वेदांतील जे मूळ सात ऋषी आहेत, त्यांची नावे नंतरच्या ब्राह्मणग्रंथातील ऋषींच्या कुळांच्या नावाशी जुळत नाहीत.

विश्वामित्र हा आठवा ऋषी. तो खराखुरा आर्य ऋषी होता. कुंभातून जन्माला आलेल्या अशा दृष्ट्या ऋषींची गणना श्रेष्ठ आर्य पुरोहितामध्ये होणे हा सांस्कृतिक दृष्ट्या मूलभूत शोध आहे. येथील आर्यपूर्व समाज व आर्य ह्यांच्या समन्वयांतून पुढे सर्व धार्मिक पूजा प्रघात, विधी व उपचार कार्ये करण्याची मक्तेदारी असलेला ब्राह्मणवर्ग निर्माण झाला असावा. आज आपल्याकडे जे जुने 'पवित्र' ग्रंथ आहेत, ते ब्राह्मणांनी जतन केलेले व पुनर्लिखित केलेले आहेत. त्यामुळे साहजिकच त्या ग्रंथांत त्यांनी समाजातले आपले महत्त्व फुगवून सांगितले आहे. तरीसुद्धा ह्या ब्राह्मण वर्गाने एक महत्त्वाचे सामाजिक कार्य पार पाडले आहे व त्या कार्यांचा उल्लेख क्वचितच केला जातो. ते कार्य म्हणजे निरनिराळ्या आर्य व आर्येतर गटांना, समूहांना, कुळांना त्यांच्या दैवतांसह



एकत्र गुंफणे व समान दैवतांची पूजा करणारा एक समाज निर्माण करणे. हे त्यांनी कसे साधले, ते पुढे पाहू. आर्य व अनार्य अशा दोन्ही राजांची स्तुती करीत, त्यांना 'शुभ' चिंतीत असणाऱ्या नव्या व्यावसायिक पुरोहितांच्या उदयाचे पुरावे ऋग्वेदांत आहेत. 'वसअश्व्य' ह्या ऋषीने बलभूत व तरुक्ष ह्या दास राजांना व त्यांच्या कुलांना दानाच्या मोबदल्यात अनेक आशीर्वाद दिल्याचे ऋग्वेदांत उल्लेख आहेत. बलभूत व तरुक्ष ही नावे आर्य नाहीत. संस्कृत साहित्यात इतरत्र त्याचा उल्लेख नाही. नंतरच्या वेदांत असुर राजांचा व बलवान असुर व्यक्तींचा उल्लेख आहे. हे उल्लेख असिरियन राजाबद्दलचे असावेत. ह्या असिरियन राजांपैकी तिसरा 'तिलगथ पिलेसर' ह्याने आर्य प्रदेशावर आक्रमण करून 'हेलमंड' नदीच्या परिसरांतील प्रदेश जिंकला होता. पणींचा राजा 'ब्रिबु' ह्याने आसरा दिल्याबद्दल दुसऱ्या एका ऋषीने त्याची स्तुती करण्यासाठी ऋचा रचलेल्या आहेत. पूर्वेकडे आक्रमण करणाऱ्या आर्यांची परिस्थिती भारतीय उपखंडात प्रथम आक्रमण करणाऱ्या आर्यांपेक्षा वेगळी होती. त्यांच्याकडे आता **टोळी संघाच्या सामायिक मालकीचे असलेले (टोळीसंघप्रमुखांच्या व्यक्तिगत मालकीचे नव्हे) दास होते**. त्याचप्रमाणे आर्य व आर्येतर ह्यांच्या सम्मीलनातून निर्माण झालेला नवा खास पुरोहित वर्ग उदयास आलेला होता. ह्या काळाच्या बाबतीत उत्खननांतून मिळणारे पुरावे उपलब्ध नाहीत ह्याचा उल्लेख अगोदरच केलेला आहे. ऋचांतून एकाच वस्तूचे–रथाचे–तपशिलवार वर्णन केलेले आढळते. वेदकाळातील एखादा रथ कधी काळी उत्खननात सापडेल अशी अशा नाही. खास आर्यांची अशी वैशिष्ट्यपूर्ण मातीची भांडी (पॉटरी) सापडलेली नाहीत. पुरातत्वशास्त्रज्ञ ह्या काळाच्या अगदी शेवटच्या काळापर्यंतचे खास आर्यांचे असे उत्पादनतंत्र निश्चित करू शकलेले नाहीत. भारताबाहेरील आर्यांच्या इतर शाखांत नसलेली दैवते भारतात आलेल्या आर्यांनी इतर आर्यपूर्व (व आर्येतर) जमातीकडून घेऊन आपलीशी केली असावीत, असा अंदाज करता येईल. तसे केल्यास प्रभात समयाची देवता उषा, इंद्राचा रथ व अस्त्रे बनवणारा कुशल कारागीर देव 'त्वष्ट्री' आणि ऋग्वेद काळात अस्पष्ट स्वरूपात आढळणारा विष्णू (ह्या विष्णूला पुढील काळात फार थोर स्थान मिळाले) ही ऋग्वेदांत असणारी दैवते त्यांनी इतर समाजांतून घेतलेली असावीत. त्यापैकी उषेची कथा अशी आहे : उषेची (म्ह० उषा दैवत मानणाऱ्यांची) व इंद्राची बिआस नदीजवळ लढाई झाली. त्या लढाईत उषेची बैलाची गाडी मोडून पडली व ती पळून गेली. तसेच 'त्वष्ट्री' ह्या देवाबद्दलची दंतकथासुद्धा मजेशीर आहे. इंद्र व त्रिता ह्या दोन वीरांनी त्वष्ट्रा नामक तीन तोंडांच्या पुरोहित असलेल्या दानवाला मारल्याची कथा आहे. हा त्वष्ट्रा त्वष्ट्रीचा मुलगा आहे. पुन्हा त्या ऋचा तिन्ही तोंडे गमावलेल्या त्वष्ट्रानेच रचल्या आहेत. त्याचे तीन पक्ष्यांचे तोंड असलेल्या प्राण्यांत रूपांतर झाले. त्यापैकी दोन पक्षी ही ब्राह्मण गोत्रे आहेत. ह्या कथेचा साधा अर्थ असा की, ज्याप्रमाणे, उषा नष्ट होऊ शकली नाही; त्याप्रमाणे त्वष्ट्राही नष्ट होऊ शकला नाही. पुढील काळातील उपनिषदांच्या रचनाकारांत त्वष्ट्रा हा थोर रचनाकार असल्याचा स्पष्ट उल्लेख

आहे. उत्तर कालीन ऋग्वेदांतील नव्या पुरोहित वर्गाने इंद्राशी वैर मानणाऱ्या समूहांशी संबंध जोडले व त्यांच्या दैवतांची आराधनाही अशा समन्वित समाजात सुरू झाली.

## ४·४
## ऋग्वेदकाळानंतरचे आर्य

सर्वच आर्य टोळी-संघ पूर्वेकडे एकाच वेळी व संथ गतीने पसरले असे नाही. त्याचप्रमाणे उत्तरेकडून अधिकाधिक आर्य टोळयांच्या लाटा आल्या व त्यामुळे सिंधू नदीवरील आर्यांना पूर्वेकडे हटावे लागले—असाही साधासुधा निष्कर्ष काढता येणार नाही. वर सांगितल्याप्रमाणे पुरुजन हे खिस्तपूर्व चवथ्या शतकापर्यंत पंजाबच्या परिसरातच राहिले. हे आर्य मुख्यत: पशुपालन करणारे निमभटक्या समाजातील लोक होते. अशा निमभटक्या पशुपालन करणाऱ्या समाजाची लोकसंख्या उत्तरेकडील प्रदेशावर एका मर्यादित प्रमाणातच राहू शकली असती. त्यामुळे पौरवांच्या लहानसहान शाखा व वसाहती इतर प्रदेशात पसरू लागल्या. त्यांच्या दक्षिणेच्या बाजूला वाळवंट असल्यामुळे त्या दिशेने प्रसार होणे शक्य नव्हते. पूर्वेकडे यमुनेच्या जवळ दाट जंगले होती. ती लोखंडाच्या कुऱ्हाडीशिवाय साफ करणे शक्य नव्हते. पण पंजाब व गंगेच्या खोऱ्यांमधील प्रदेश कमी पावसाचा चिंचोळा प्रदेश व दुसरा हिमालयाच्या पायथ्याखाली असलेला प्रदेश हा दाट जंगलाचा नव्हता. त्यामुळे अग्नीचा उपयोग करून जमीन साफ करता येत होती. राजस्थानातून तांबे मिळू शकत होते, पण लोखंडाच्या खाणी गंगेच्या खोऱ्यात दूर होत्या. मातीतून धातू वेगळा करणे व त्याचा उपयोग करणे ह्यांचे केवळ ज्ञान असून भागत नाही, तर त्याचा साठाही उपलब्ध असणे हे सामाजिक विकासाला आवश्यक असते. पूर्वेकडे प्रसार पावताना सुरुवातीला आर्यांच्या टोळयांचे लहान लहान गटात विभाजन झाले असावे. पण त्याबाबत काही ऐतिहासिक माहिती उपलब्ध नाही. खिस्तपूर्व १० वे ते ८ वे शतक ह्या काळातील परिस्थितीबद्दलची काही माहिती यजुर्वेदांतून मिळू शकते. यजुर्वेदाला जोडून शतपथ ब्राह्मण ग्रंथ आहेत. त्यामुळे खिस्तपूर्व ६०० वर्षे ह्या काळापर्यंतच्या परिस्थितीबाबतही काही माहिती उपलब्ध होते. ह्या सर्व ग्रंथांबद्दलचा व त्यातील समाजरचनेच्या माहिती-बद्दल अगदी निश्चित काळ ठरविता येत नाही. त्याचप्रमाणे जी माहिती उपलब्ध आहे, त्यावरून त्या काळच्या सामाजिक स्थितीबद्दल जुजबी अंदाज बांधता येतात. अलेक्झां-डरच्या आक्रमणाच्या काळातही पंजाबमधल्या काही जमाती गरजेप्रमाणे वेगवेगळया कुटुंबामध्ये धान्य वाटून घेत व अतिरिक्त धान्याचा व्यापार करावयाच्या ऐवजी ते जाळून टाकीत. काही इतक्या मागासलेल्या होत्या, तर काही जमाती समृद्ध झालेल्या होत्या व त्यांनी आक्रमण करून राज्ये प्रस्थापित केली होती. सातव्या शतकात ह्युयेन सँग हा चिनी प्रवासी भारतात आला होता. सिंधू नदीच्या उत्तर खोऱ्यांतील काही जमातींमध्ये **गट-विवाह पद्धतीचा (ग्रुप मॅरेजेस)** अवलंब होत असलेला पाहून तो आश्चर्य-चकित झाला. कदाचित अशा तऱ्हेने विवाह करणारे हे ऋग्वेदानंतरच्या काळातील अभिर



नावाच्या जमातीचे असावेत; कारण त्यांच्यात गट-विवाह पद्धती बराच काळ चालू होती. ह्याचा अर्थ असा की, आर्यांची जीवनपद्धती मध्ययुगाचा उदय होईपर्यंत त्या भागातसुद्धा सर्वत्र पोहोचली नव्हती. सबंध देशाच्या सामाजिक परिस्थितीबाबत एक समान निष्कर्ष काढणे शक्य नाही. पण त्या काळात जे महत्त्वाचे बदल घडले व जे पुढे महत्त्वाच्या अशा सर्व प्रदेशात घडून आले त्यावरच आपल्याला लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे.

यजुर्वेदामध्ये जे विधी आहेत, त्यावरून यजुर्वेदाच्या काळातसुद्धा आर्य मुख्यत: पशुपालन अवस्थेत होते, हे दिसून येते. तरीसुद्धा त्यातल्या अनेक प्रार्थनांवरून शेती-व्यवसाय व धातूंच्या उपयोगाचे वाढते महत्त्व लक्षात येते. 'मला दूध, दही, मध मिळावे' 'माझ्या स्वजनांबरोबर बसून (**संग्धी-सपिटी**) मला जेवण करता यावे' ह्या-बरोबरच 'पाऊस पडो-नांगरणी होवो', 'शत्रूंवर विजय मिळो', 'तांदूळ, बार्ली, गहू, कुयव, तीळ, कडधान्ये, नाचणी, वाल धान्ये मिळोत', 'दगड, माती, डोंगर, पठारे, झाडे मला यशदायी होवोत', 'सोने, तांबे, शिसे, टिन, लोखंड ह्यांची वृद्धी होवो', 'फळ, पाने, फुले, नांगरणीखालील जमीन जे देते त्यात व नांगरणीशिवायची जमीन जे देते त्यात सर्वात वृद्धी होवो' अशा प्रार्थना यज्ञप्रसंगी केलेल्या आहेत. हे फलित यज्ञ केल्याने मिळत असे, अशी समजूत असल्यामुळे अशा प्रार्थना यज्ञ करताना केल्या जात असत. ह्या ऋचांचा काळ इसवीसनपूर्व ८०० वर्षांचा असावा, असा अंदाज केला गेला आहे. त्यावरून त्या काळच्या आर्यांसमोर लोहयुगात निर्माण होणाऱ्या नवीन समस्या निर्माण होत होत्या असे सिद्ध होते. ब्रॉन्झयुगातील ऋग्वेदी समाज त्या-वेळच्या श्रीमंत नगर संस्कृतीच्या समाजांची लूट करण्यात व पशुपालनासाठी नवी कुरणे धुंडाळण्यात समाधान मानत होता, तर यजुर्वेदकाळातील त्याचे वंशज लोहयुगात पदार्पण करीत होते. व त्यांना नव्या समस्यांना तोंड द्यावे लागत होते. सिंधू संस्कृतीच्या परिसरांत व पूर्वेकडे मार्गक्रमण करीत जे आर्य स्थायिक झाले त्यांची पुढे उन्नती झाली. यमुनेपासून पन्नास मैल अंतरापर्यंत जाणे आर्यांना सोपे गेले असावे; कारण तेथील जंगले विरळ होती व अग्नीचा उपयोग करून ती साफ करता आली. पण ह्या जमिनीवर शेती व्यवसाय प्रस्थापित करण्याकरिता जुनी समाजपद्धती (संघ-समाजव्यवस्था) पुरेशी ठरणारी नव्हती. त्यामुळे **ह्याच काळात कष्टाची कामे करणाऱ्या 'शूद्र' वर्णाची उत्पत्ती झाली.** कदाचित 'शूद्र' हे नाव मुळात एखाद्या जमातीचे असावे व त्यांना जिंकल्या-नंतर — जिंकलेल्या आर्य व इतर आर्येतर सर्व टोळयांना व जमातींना ते नाव देण्यात आले असावे. (अलेक्झांडरच्या सैन्यालाही सिंधू नदीच्या उत्तरेकडील प्रदेशात 'ऑक्सीड्रॉकॉय' नावाच्या जमातीने विरोध केला होता.) पुढे विविध श्रमांची कामे करणाऱ्या वर्गाला 'शूद्र' संबोधण्यात येऊ लागले. ते शूद्र हे प्रथम **सामाजिक दास** म्हणजे सबंध नव्या टोळीसंघाचे दास होते. त्यांना टोळी-संघ सभासदाला असणारे हक्क नव्हते; पण ते समाजसंघटनेचे एक भाग होते. समाजपद्धतीत सामावलेले होते. क्षत्रिय (योद्धे व टोळीतील प्रमुख), ब्राह्मण (यज्ञभाग करणारा पुरोहित वर्ग), वैश्य (शेती व्यवसाय व

पशुपालन करणारा) ह्या वर्णांना संघाच्या सभासदांचे हक्क होते. प्रतिष्ठेचे स्थान होते. **यजुर्वेदाच्या काळात 'वर्ण' ह्या शब्दाचा अर्थ बदलला. 'वर्ण' ह्या शब्दाला आता श्रमविभागणीवर आधारलेला वर्गीय अर्थ प्राप्त झाला.** ज्या 'आर्य' संघामध्ये संपत्तीच्या मालकीच्या तत्त्वांचा विकास झाला व व्यापार व विनिमय ह्यांची वाढ झाली, अशा संघ समाजाचे विघटन होऊन वर्गाधिष्ठित वर्णव्यवस्था उदयास पावली. पण ह्याचा अर्थ असा नव्हे की, प्रत्येक आर्य टोळीमध्ये ह्या चार वर्णांचा उदय एकाच काळात झाला. काही टोळी-संघ ह्या काळांतसुद्धा एकत्र होते तर काही संघ समाजांत आर्य-शूद्र एवढीच विभागणी झाली होती. पण तरीही ग्रीक किंवा रोम ह्या समाजांत ज्याप्रमाणे गुलामांचा विक्रय होई, त्याचप्रमाणे भारतात ह्या काळांत दास शूद्रांचा विक्रय होत नव्हता; कारण तेवढ्या प्रमाणावर खाजगी मालकी व विनिमयाकरिता उत्पादन करण्याकरिता होणारा व्यापार विकास यजुर्वेदिक काळापर्यंतसुद्धा झाला नव्हता. तेवढी मोठी राज्ये किंवा साम्राज्ये निर्माण झाली नव्हती. त्यापेक्षा महत्त्वाचे हे की, जमीन व गुरे अजूनही टोळ्यांच्या सामाजिक मालकीची होती. तेव्हा ह्या दोन तऱ्हेच्या समाजविभागणीचा प्रश्न हा कोणाच्या चांगुलपणाचा किंवा औदार्याचा किंवा चांगले-वाईटपणा व क्रौर्याचा नसून समाज विकासाच्या विशिष्ट गरजांचा आहे. आर्य टोळ्यांमध्ये गुरांची मालकी रक्तसंबंधी कुळांमध्ये सामायिक होती, हे सहजगत्या सिद्ध करता येण्यासारखे आहे. गोठा ह्या शब्दाचा अक्षरश: अर्थ गुरे एकत्र बांधण्याची जागा 'गोठा' असा आहे. हाच शब्द ज्या दोन कुळांत विवाह होऊ शकत नाही; अशा रक्तसंबंधी घराणी किंवा कुटुंबांकरिता (एक्झोगॅमस) वापरला जातो. गोत्राची गुरे ओळखता यावी, ह्याकरिता त्यांच्यावर खास छाप मारले जात. नाकांत किंवा कानांत खास खूण अडकवली जाई. ह्या परंपरेतूनच पुढे निपुत्रिक माणसाची जायदाद गोत्रांत वाटून घेतली जावी, असा धर्म-नियम अस्तित्वात आला. (शूद्र वर्णाचा उद्भव व त्यांचे बदललेले स्वरूप, ह्याचे वस्तुनिष्ठ व साधार विवेचन डॉ. आर. एस. शर्मा ह्यांच्या 'शूद्राज इन अॅन्शन्ट इंडिया,' ह्या पुस्तकात पाहावे. त्यावरील निवेदनही प्रसिद्ध झाले आहे.) शूद्र वर्णाच्या उदयाचा भारतीय समाजव्यवस्था व संस्कृती ह्यांवर फार मोठा परिणाम झाला. ग्रीस व रोमन येथील गुलामांप्रमाणे त्यांची खरेदी व विक्री होत नव्हती व मुख्यतः व्यापारी उत्पादनकरिता त्याचा साधन म्हणून उपयोग केला गेला नाही; कारण येथील विशिष्ट अर्थव्यवस्थेत तसे करण्याची गरज नव्हती. तरीसुद्धा समाजातील उत्पादनकर्त्या नसणाऱ्या वर्गाला जगण्याकरिता लागणारे **अतिरिक्त संपत्तीचे उत्पादन गुलामांऐवजी शूद्र वर्णीय हेच करीत होते.** समाजांत शूद्र वर्ण निर्माण झाला, ह्याचाच अर्थ असा की, पूर्वीच्या एकसंघ—संघ-समाजव्यवस्थेचा ऱ्हास होत होता व वर्णव्यवस्थेवर आधारलेला प्रादेशिक समाज अस्तित्वात येऊ लागला होता. ह्या काळांत अनेक ब्राह्मण पुरोहित हे विविध कुळांचे व जमातींचे समान पुरोहित म्हणून काम करताना आढळतात. त्याचा अर्थ असा की, विविध टोळ्यांत अधिक जवळचे सामाजिक संबंध निर्माण होत होते. ह्याउलट काही द्ररिद्री ब्राह्मण गोत्रे पूर्वेकडील घनदाट अरण्यांत जाऊ लागली होती. कधी



कधी ते गुरांचा लहानसा कळप बरोबर नेत असत; तर कधी कधी हे तापसी एकट्यानेच जात असत. अनेक वेळा हे ऋषीमुनी कुठलेही शस्त्र घेतल्याशिवायही जात असत. त्यामुळे जंगलात रहाणाऱ्या नाग इत्यादी आदिवासी जंगली जमातींशी मैत्रीचे संबंध प्रस्थापित करणे त्यांना सोपे जाई. व्यापारीसुद्धा जंगलात धातू व इतर संपत्ती गोळा करण्याकरिता जात असत. त्यांच्या बरोबरीला योद्धे (क्षत्रिय) त्यांचे निषादासारख्या हिंस्र टोळ्यांपासून संरक्षण करीत. समाजातील योद्धा वर्गाचे रूपांतर ह्या काळात व्यावसायिक झाले. ते वेगवेगळ्या कुलप्रमुखाकरवी व्यापाराकरिता युद्धे करू लागले. प्राचीन धर्मग्रंथ अग्नीला बळी देण्यात येणाऱ्या यज्ञविधीबद्दलचे आहेत. अग्नीशिवाय इतर देवतांनाही सामूहिक यज्ञात बळी मिळत असे, पण 'पवित्र' अग्नीची उपस्थिती आवश्यकच असे. यजुर्वेदाच्या व ब्राह्मण ग्रंथाच्या काळात यज्ञविधी व त्यानुसार होणारे आचार-उपचार वाढू लागले व त्यांचा काळही लांबू लागला. महिनोमहिनेही यज्ञविधी चालत असत. बळी देण्यात येणारी विविध तऱ्हेची जनावरे व त्यांची संख्या आजही आपल्याला आश्चर्यच करील अशी आहे. सर्वांत उच्च दर्जाचे बळी 'मानव', 'बैल' व 'घोडा' हे होते. पण यजुर्वेद व ब्राह्मण ग्रंथातून असे दिसून येते की, जवळजवळ सर्व तऱ्हेच्या पशुपक्ष्यांचा बळी देण्यात येत असे. त्याकरिता होणाऱ्या प्रार्थनांप्रमाणे हे यज्ञविधी पशू व अन्न ह्यांची वृद्धी व्हावी, ह्याकरिता केले जात. पण अशा तऱ्हेच्या हत्येला जे आत्यंतिक महत्त्व प्राप्त झाले, त्यावरून असे दिसते की, विविध समाजसमूहांतील अन्नाचा साठा कमी होत असावा. प्रत्यक्षात यज्ञविधीमुळे समाजांतील साधनसंपत्तीचा विध्वंस होत होता. त्यातूनच आक्रमणे व लढायांत विजय मिळावा, ह्याकरिता काही यज्ञविधी आवश्यक मानले जाऊ लागले. अगोदरच्या ऋग्वेद काळात अश्वमेध यज्ञ केवळ 'घोड्याला बळी देण्याचा व सामूहिक रीत्या त्यांचे मांस वाटून खाण्याचा' एक यज्ञविधी होता. ते स्वरूप बदलले आणि आता अश्वमेधाकरिता निवडलेला घोडा वर्षभर मोकळा सोडीत असत. त्याला दुसऱ्या टोळीने वा जमातीने अडवल्यास युद्धाला कारण मिळे. अशा रीतीने राज्य विस्ताराकरिता अश्वमेधाचा उपयोग केला जाई. सतत होणारी आक्रमणे, लढाया व त्याकरिता होणारे यज्ञयाग ह्यामुळे ब्राह्मणांना भरपूर दक्षिणा मिळे व क्षत्रियांना भरपूर काम मिळे. पुरोहितांना ज्या दक्षिणा मिळत त्या कधी कधी हजारो गायी, सोने, जमीन अशा स्वरूपात असत. लढायांमुळे क्षत्रियांचे प्रभुत्व व महत्त्व वाढले **ऋग्वेदी यज्ञ संस्थेचे सामूहिक स्वरूप नष्ट झाले व त्याला नवा सामाजिक अर्थ प्राप्त झाला.** समाजातल्या कष्टकरी वर्गांचे दमन व पिळवणूक करण्याला धार्मिक अधिष्ठान देण्याचा उद्देश यज्ञविधी व नवे कर्मकांड ह्या अन्वये अंमलात आणला गेला. ऐतरेय ब्राह्मणांत विश्वांतर सौदस्मनांच्या यज्ञविधीबाबत ज्या कथा आहेत, त्यातील ऋचेत तर स्पष्टपणे म्हटले आहे की, 'वैश्य म्हणजे खंडणी देणाऱ्या प्रदेशासारखे आहेत. राजाला त्यांची स्वत:च्या लहरीप्रमाणे लूट करता येते. त्यांच्या संपत्तीचा मनाप्रमाणे उपभोग घ्यावा;' 'शूद्र हे दास आहेत, दुसऱ्यांकडून पिळवणूक करून घेण्याकरिता ते आहेत (अन्यस्यप्रेश्यः) त्यांना मनाप्रमाणे मारता येते.

(यथा कामवध्या.)' (असे अनेक पुरावे डॉ. शर्मा ह्यांच्या ग्रंथात आहेत.—निवेदक.) ह्यावरून वैश्य व शूद्र ह्या दोन उत्पादक घटकांवर वरच्या वर्गातील दोन वर्णियांचा अधिकार प्रस्थापित केला गेला होता हे दिसते. वर्णव्यवस्थेचे मूलभूत स्वरूप ओळखण्यात आता अडचण राहू नये. भारतीय समाजातील पहिला कर 'बळी' हाच होता. यज्ञविधीच्या वेळी इतरेजन संघ वा गणप्रमुखांना (राजन्यांना) भेट देत असत. (सक्तीच्या भेटीची प्रथा अर्वाचीन काळापर्यंत 'नजराणा' देण्याच्या स्वरूपात चालू होती) त्या संक्रमण काळात 'भागदुघा' नावाचा एक अधिकारी असल्याचेही दिसून येते. भेटीचे प्रमाण ठरविणे, भेट वसूल करणे व भेट राजन्य कुलांमध्ये वाटून देणे इत्यादी कामे तो करीत असे.

ह्या काळात नाव घेण्यासारखी नगरे निर्माण झाली नाहीत. संकट किंवा आक्रमणांच्या काळांत सर्व संघटोळीजन राजन्यांच्या संरक्षक वस्तीच्या ठिकाणी गोळा होत असत. त्या काळी पंजाबमधील नद्यांच्या पात्रांत बदल होत, तसेच धातूंचे ज्ञान व उपयोगाचे प्रमाण अल्प होते. त्यामुळे फार मोठ्या व कायमच्या वस्त्या असलेली नगरे निर्माण झाली नाहीत. पण पसरलेल्या टोळीचा सर्वांत छोटा घटक 'ग्राम' हा होता. त्यावरून पुढेही कायम वस्त्यांना '**ग्राम**', 'गाव' संबोधण्यात येऊ लागले. ह्या काळांत मात्र 'ग्राम' हा सजातीय कुटुंबांचा आपली गुरे व दास ह्यांना घेऊन स्थलांतर करण्याच्या अवस्थेतील गट असे. त्यांचे नेतृत्व ग्रामणीकडे असे. ग्रामणी हा टोळीसंघप्रमुखाला जबाबदार असे. उन्हाळ्यामध्ये 'ग्राम' आपली गुरे घेऊन पाण्याजवळील कुरणांच्या शोधार्थ जात असत. पावसाळ्यांत पठारांवर वस्ती करण्यास जात असत. त्या ठिकाणी धान्ये पिकवीत. कधी कधी एकाच ठिकाणी स्थलांतर करणाऱ्या दोन ग्रामांची गाठ पडून कुरणाकरिता किंवा पठारावरील जागेकरिता 'चकमक' होई. त्यातून 'संग्राम' हा शब्द जन्म पावला. 'संग्राम' म्हणजे शब्दश: दोन ग्रामांची भेट 'एकत्र येणे.' ह्या एकत्र येण्यातून एकाच कुरणाकरिता एकाच नांगरणीयोग्य जमिनीकरिता दोन ग्रामांचा झगडा होई म्हणून संग्राम शब्दाला 'लढाई' हा अर्थ प्राप्त झाला. एकाच टोळीसंघातील सर्व ग्रामे होम–हवन-यज्ञविधीकरिता किंवा दुसऱ्या टोळ्यांच्या आक्रमणाला विरोध करण्याकरिता एकत्र येत. त्यांना '**राष्ट्र**' म्हणत. ह्या सर्व जनसमूहांचा प्रमुख साधारणपणे टोळी-संघांतील वेगवेगळ्या कुळांतील सर्वात प्रमुख कुळातील असे किंवा हे प्रमुखपद वेगवेगळ्या कुळांत पाळीपाळीने जाई किंवा प्रसंगी टोळीसंघाच्या 'समेत' त्यांची निवडही होई. 'राजन्ये' हा शब्द टोळीप्रमुख, प्रमुख क्षत्रिय, योद्धा. राजा, राजपुत्र अशा अनेक अर्थांनी वापरला गेला आहे. राजन्यांचे अधिकार टोळीसंघ वा गण ह्यांच्या परंपरा व रीतिरिवाजांप्रमाणे मर्यादित असत. पण सतत चालणाऱ्या लढायांमुळे विविध कुळांत व कुलप्रमुखांत होणाऱ्या झगड्यांमुळे, कटकारस्थानांमुळे सर्वात बलवान प्रमुखाचे अधिकार वाढत गेले. प्रमुखपद आपल्या कुटुंबाकडे ठेवण्याची वृत्ती बळावली. त्यातून पुढे एकतंत्री राजेशाहीचा उदय झाला. अंतर्गत शांतता राखण्यासाठी बरोबरी करू पाहणारे इतर कुळे व टोळीप्रमुख ह्यांना काबूत



ठेवण्यासाठी त्यांना हद्दपार करणेसुद्धा आवश्यक झाले. त्यातून राजाला (दुसऱ्याला 'अपरुद्ध' हद्दपार करण्याचा) अधिकार प्राप्त झाला. **ह्या सर्वांमागे शूद्र व इतर वर्णांची पिळवणूक करून मिळणाऱ्या संपत्तीवर जास्तीत जास्त अधिकार आपल्याकडे असावा ही इच्छा होती.** समाजांत वर्गीय भेद पडल्यामुळे अंतर्गत दुफळीमुळे संघव्यवस्था व गण-व्यवस्था ह्यांना एकत्र सांधणारे दुवे खिळखिळे होऊ लागले. टोळ्यांची एकसंघता नाकारणारी, वर्गीय विभागणीच्या तत्त्वावर उभी रहाणारी, **पिळवणुकीला आधार व संरक्षण देणारी तशी धर्म-नीती, मूल्य व्यवस्था प्रस्थापित करणारी शासन संस्था** निर्माण होण्याकरिता आवश्यक असणारी परिस्थिती निर्माण झाली.

## ४·५
## नागर जीवनाचे पुनरुत्थान

आपण ज्या सामाजिक अवस्थेचे वर्णन वर केले आहे, त्या समाजव्यवस्थेला खचितच नागर-संस्कृती म्हणता येणार नाही. भारतातील हिंदुत्वनिष्ठ अजूनही वेदांना सर्वश्रेष्ठ ग्रंथ मानतात, पण वेदकाळांतील असलेली व्यवस्था चालू राहिली असती तर भारतीय संस्कृतीबद्दल फारसे लिहिण्यात अर्थही राहिला नसता. टोळी-संघातील अंतर्गत झगडे वेगवेगळ्या टोळ्यांतील युध्दे, संघर्ष इत्यादींचा शेवट होण्याकरिता उत्पादनाची वृद्धी होणे व त्याकरिता समाजाची नवी रचना होणे अवश्यक झाले होते. यजुर्वेदांच्या काळात होणाऱ्या होम-हवन यज्ञविधी (फायर सॅक्रीफाईज)चे व पशुबळीचे प्रमाण एवढ्या मोठ्या प्रमाणावर वाढले होते की, समाजांतील उत्पादन करणाऱ्या वर्गांवरील त्याचा भार असह्य झाला होता. त्या यज्ञविधीच्या संदर्भात निर्माण झालेल्या मूल्य-व्यवस्थेमुळे समाजाचा विकास खुंटला होता. ह्या सर्व परिस्थितीत नवा समाज व संस्कृती कशी पुढे आली ते नंतर मुख्यत: आपण पुढील प्रकरणात पाहू. पण ह्या नव्या समाजाची व संस्कृतीची सुरुवात कशी झाली; त्याची प्राथमिक अवस्था काय होती ह्याचा मागोवा ह्या प्रकरणात घेता येईल.

उत्तर भारतात इसवीसनपूर्व पहिल्या सहस्रकांत नागरी जीवन नव्याने उदय पावत होते. खिस्तपूर्व ७ व्या शतकापासून अस्तित्वांत असलेली चांदीची नाणी सापडली आहेत. त्यावरून त्या काळात नागरी संस्कृतीच्या लक्षणांचा म्हणजे व्यापार, हिशोब ठेवणे, रस्ते, लिपी यांचा उदय झाला असणार; पण निश्चितपणे कोठली लिपी वापरली ह्याचा नेमका पत्ता लागत नाही. पंजाबच्या मुख्य विभागात रहाणारे आर्य साक्षर नव्हते, हे निश्चित; पण तरीसुद्धा 'ब्राह्मी' लिपीचा उपयोग खास करून नव्या नागरी वस्त्यांत सुरू झाला होता, असे मानण्यास जागा आहे. पुढील काळांत बुद्धाने राजगीर येथील नगरांत रहाणाऱ्या लोकांच्या चांगल्या वागणुकीचा दाखला इतरांना दिल्याबद्दलची कथा आहे. त्यावरून नगरांची वाढ त्या काळापर्यंत म्हणजे खिस्तपूर्व सहाव्या-सातव्या शतकापर्यंतसुद्धा फारच अल्प प्रमाणात झाली असल्याचे दिसून येते. ह्या काळापर्यंत फक्त

दोनच मुख्य नगरे निर्माण झाली होती. बाकीची छोटी नगरे (टाऊन्स) अशी होती की, जेथे सर्व माणसे एकमेकांना ओळखत असत. लहानसहान गावांतून तर रहदारीचे रस्तेही नव्हते. आता आपण ज्याला (सिव्हिल मॅनर्स) समाजात वागण्याचा शिष्टाचार समजतो तो प्रकार जेमतेमच अस्तित्वांत होता. सामाजिक (किंवा सामूहिक) जीवन जगण्याकरिता एकत्र येण्याची जागा '**संथगारा**' हीच होती.

हरप्पा व मोहेंजोदारो ह्यांच्या विध्वंसनानंतर (ह्यांतील हरप्पा येथे जेत्यांनी काही काळ निवास केला असावा असे दिसते. मोहेंजोदारो मात्र जाळून भस्म केल्यासारखे वाटते.) नवी छोटी नगरे सिंधूच्या खोऱ्याच्या पूर्वेकडील टोकाला व त्याच्यापलीकडे बांधली गेली. ही नगरे हरप्पा मोहेंजोदारोच्या मानाने निश्चितपणे लहान होती; पण सबंध समाजाचा मुख्य व्यवसाय जरी पशुपालन हाच होता तरीही ह्या नगराचा भर शेती व्यवसायावर होता. यजुर्वेदांत बारा बैल जोडलेल्या नांगराचा उल्लेख आहे. अजूनही तसा जड नांगर वापरला जातो. जेथे जमीन खडकाळ असते, अशा ठिकाणी असा नांगर वापरल्याशिवाय खोल नांगरणी करता येत नाही व तशी नांगरणी केल्याशिवाय धान्योत्पादन होत नाही. हा नांगर कठिण लाकडाचा असू शकेल व तसे कठिण लाकूड ब्रॉन्झच्या हत्यारांनी तासून काढावे लागेल. परंतु पूर्व पंजाबमधील लहान नद्यांच्या जवळील जमीन इतकी खडकाळ आहे की, तेथे जमीन नांगरायला लोखंडाच्या नांगराची आवश्यकता आहे. मग त्यांनी लोखंडी नांगर वापरला होता काय? तसे असेल तर हे लोखंड कोठून आले? असे प्रश्न निर्माण झाले आहेत. त्याचप्रमाणे ब्रॉन्झच्या साधनांकरिता अधिकाधिक तांब्याचीही जरूरी भासत असणार. तेव्हा ते तांबे त्यांना कोठून मिळाले?

भारतात धातूंचा खरा व भरपूर पुरवठा हा ख्रिस्तपूर्व ८ व्या शतकापासून पूर्वेकडून (बिहार येथून) येऊ लागला. भारतातील लोखंड व तांबे ह्यांच्या समृद्ध खाणी गंगेच्या खोऱ्यांच्या पूर्वेकडील टोकाच्या प्रदेशात बिहारमधील धालभूम, मानभूम, सिंगभूम जिल्ह्यांत आहेत. त्या भागांत भरपूर पाऊस पडत असल्यामुळे अजूनही दाट जंगले आहेत. गंगेच्या खोऱ्यांत जंगले साफ करून जमीन लागवडीला आणणे फायद्याचे होते. बिहारच्या आग्नेय भागांतील जंगले इतकी दाट आहेत की, ती साफ करून शेती व्यवसाय करणे, अगदी अलीकडच्या काळापर्यंत फायद्याचे समजले गेले नाही. आजही पोलादाच्या कारखान्यांच्या परिसरात जुन्या पद्धतीचे आदिवासी जीवन जगणाऱ्या टोळ्या आहेत. ह्या भागांतील 'तांबे' उपयोगात आणल्याचा पुरावा उत्खननात सापडला आहे. कच्च्या तांब्याची माती ज्या ठिकाणी सापडते, तेथे (ती माती वितळवून तांबे काढण्याकरिता लागणाऱ्या) विटांच्या भट्ट्या सापडल्या आहेत. त्याचप्रमाणे वितळवलेली मातीही सापडली आहे. त्याचा काल मात्र अजून निश्चित केला गेलेला नाही. त्याचप्रमाणे ख्रिस्तपूर्व हजार वर्षांच्या काळांत उपयोगात आणली गेलेली तांब्याची अनेक साधने गंगेच्या खोऱ्यात सर्वत्र सापडली आहेत. त्यात फेकून मारता येतील असे कोयते, खांद्यावर लटकवता येतील अशा कुऱ्हाडी अशी साधने आहेत. कुऱ्हाडी २ फूट लांबीच्या आहेत.



त्याचाही उपयोग 'शस्त्रे' म्हणून केला गेला असावा. तांब्याची साधने तयार करण्याकरिता ठराविक तपमानाच्या भट्ट्या करण्याचे ज्ञान लागते. त्याचा अर्थ असा की, ही साधने त्या काळातील येथील आदिवासी जनसमूहाची नसून तेथे गेलेल्या व्यापाऱ्यांची असावीत. अशाच चांगल्या भट्ट्यांवर चांगल्या दर्जाची मातीची भांडी होऊ शकतात. खरं म्हणजे मातीच्या भांड्यांच्या भट्ट्यांवरून पुढे धातू वितळविण्याकरिता लागणाऱ्या भट्ट्यांचा विकास झाला; पण गंमत अशी की, ह्या ब्रॉन्झ धातूच्या साधनांच्या साठ्याबरोबर जी मातीची, भांडी सापडली आहेत, ती मात्र अगदीच कच्ची व खडबडीत आहेत. त्यावरून सिंधू संस्कृतीमधील किंवा आर्य संस्कृतीतल्या प्रगत जनसमूहांनी कायम वस्त्या येथे केल्या असल्याचे दिसत नाही. तेव्हा ही साधने प्रवास करणाऱ्या आर्य व्यापाऱ्यांची असावीत. हस्तिनापुरासारख्या आर्यांच्या वसतीस्थानाच्या जवळपास जे उत्खनन झाले आहे, त्यांत आर्यांच्या राखी रंगाच्या पक्क्या भांड्याखालच्या थरांत ही कच्ची खडबडीत भांडी सापडली आहेत. ह्यावरून असेही दिसून येते की, आर्यांच्या दुसऱ्या आक्रमणाची जी लाट आली त्यांतले सर्व आर्य काही पंजाबमध्ये पशुसंवर्धन करीत थांबले नाहीत. त्यातले काही धाडसी असावेत व ख्रिस्तपूर्व दुसऱ्या सहस्रकांत सबंध आशियात ज्ञात असलेले धातूचे—लोखंडाच्या धातूचेही ज्ञान त्यांना असावे. ह्या घनदाट जंगलात जाणारे ते पहिले आर्य प्रवासी असावेत. गंगेच्या खोऱ्यांतली जंगले घनदाट असल्यामुळे त्या काळापर्यंत तेथे शेती व्यवसाय स्थिर नव्हता आणि आर्यांच्या नव्या वस्त्या एखाद्या साखळीप्रमाणे उत्तरेकडील विरळ जंगलांतून हिमालयाच्या पायथ्याशी असलेल्या छोट्या पठारापर्यंत, तेथून पुढे दक्षिण नेपाळ व तेथून पुन्हा दक्षिणेकडे वळून बिहारच्या चंपारण्य भागात गंगेच्या रोखाने पसरल्या. तेथील जमीन त्यांनी जाळून साफ केली. गंगेच्या जवळील जमीन त्या पद्धतीने साफ करणे अशक्य होते. आर्यांच्या ह्या भागांतील मूळचा प्रसार गंडक नदीच्या पश्चिमेकडील पठारांकरिता मर्यादित कसा राहिला, हे शतपथ ब्राह्मणांतील एका परिच्छेदावरून दिसून येते. साधारणपणे हा काळ ख्रिस्तपूर्व ७ व्या शतकाच्या जवळपास असावा. चंपारण्याच्या दिशेने आर्यांची आगेकूच झाली, त्याचे कारण त्यांच्या दक्षिणेकडे राजगीरच्या आसपास लोखंडाच्या खाणी आहेत. गंगेच्या खोऱ्यांतील आर्यांचे सर्वांत जुने छोटेसे ठाणे राजगीर होते, असे सिद्ध झाले आहे. कारण लोखंडाचा खाणीकडे जाण्याचा तोच एक मार्ग होता.

ज्या नागर वस्त्यांचे सातत्य नंतरच्या इतिहास काळांत टिकून राहिले, अशा नगरवस्त्या ह्या नद्यांच्या वाहतूक मार्गाच्या जवळपास वाढल्या. इंद्रप्रस्थ (दिल्ली कुरू प्रदेशांतील) हस्तिनापूर, यमुनेवरील कोसंबी (कौसंबी), गंगेवरील बनारस (काशी) ही शहरे पुढे प्रसिद्धीस आली. इसवीसनापूर्वी पहिल्या सहस्रकांत ही शहरे वसवली गेली, त्या अर्थी जलद गतीने वाहणाऱ्या ह्या नद्यांवर नौकानयन हे बऱ्याच अगोदरच्या काळापासून ज्ञात असावे. ऋग्वेदांतील एका ऋचेप्रमाणे उतथ्य व ममता ह्यांचा मुलगा दीर्घतमस हा वृद्धावस्थेत नावाडी होता. शंभर वल्ह्यांनी वल्हवलेल्या पाण्यावरून तीन दिवस प्रवास

करून आलेल्या जहाजांचा ओझरता उल्लेखही ऋग्वेदांत आहे. ह्या सर्व विश्लेषणावरून त्या अगदी प्रथम पूर्वेस येणाऱ्या अनामिक आर्यांना नौकानयनाची माहिती असावी. खिस्तपूर्व आठव्या शतकात (जेव्हा आर्यांच्या मुख्य शाखा पूर्वेपर्यंत पोहोचल्याही नव्हत्या) बनारसजवळ एक लहानसा तळ ह्या विजीगिषु आर्यांनी ठोकला होता, असा पुरावा आढळला आहे. लोखंड सापडल्यानंतर कुऱ्हाडीच्या साहाय्याने जंगले तोडून गंगेच्या खोऱ्यात व्यापक प्रमाणावर वस्त्या करणे आर्यांना शक्य झाले. आमचे हे निष्कर्ष केवळ कल्पनाशक्तीचे खेळ नाहीत. ह्या अगदी सुरुवातीच्या काळात जे धाडसी आर्य नद्यांच्या जवळील जंगलात गेले, त्यांना नद्यांतून माशांचे व जंगलातून पशूंचे मांस मिळे. ह्या भागात प्रवेश करण्याकरिता फक्त ईर्षा व धाडस ह्यांची जरूरी होती व ते गुण अगदी सुरुवातीच्या काळांतील त्या भागात जाणाऱ्या विजीगिषु आर्यांच्यांत होते.

अगस्ती ऋषीबद्दलच्या ज्या कथा आहेत त्यावरून विंध्य पर्वताच्या दक्षिणेस धडक मारणारे आर्य हे त्या कुळातील असणे संभवनीय आहे. अर्थात कथेपलीकडे ह्या निष्कर्षाला दुसरा दुजोरा नाही. म्हैसूर राज्यातील ब्रह्मगिरी येथे मोठ्या दगडाची साधने (मेगॅलिथस) सापडली आहेत. ती रायपूर जिल्ह्यातील अश्मयुगीन गुराख्यांची आहेत. रेडिओ कार्बन टेस्टप्रमाणे हे पुरावे खिस्तपूर्व तिसऱ्या सहस्रकाच्या अखेरच्या काळातील आहेत, त्याचबरोबर नर्मदेच्या काठावर खिस्तपूर्व दुसऱ्या सहस्रकांतील मातीची भांडी व ब्रॉन्झची भांडी खास इराणियन–आर्यन पद्धतीची आहेत. काही साधनेसुद्धा सापडलेली आहेत. त्यावरून काही पुरातत्त्व शास्त्रज्ञांनी त्या काळात येथील प्रदेशांशी इराणियन लोकांचा संबंध आला असावा, असा अंदाज बांधला आहे. तसे असेल तर आर्यांचे हे इतके जुने प्रसरण संभ्रमित करणारे आहे. सिंधू संस्कृतीच्या काळातच शांततावादी आर्यांचे प्रसरण दक्षिणेपर्यंत झाले होते काय? असा प्रश्न निर्माण होतो. ब्रॉन्झची साधने करण्याची विद्या शिकल्यानंतरच दुसऱ्या लाटेबरोबर आलेल्या आर्यांनी लूटमारीला प्रारंभ केला काय? खिस्तपूर्व पहिल्या सहस्रकाच्या सुरुवातीस गंगेच्या खोऱ्यात आलेल्या आर्यांच्या आगमनाचा पुरावा उत्खननांतून भरपूर प्रमाणात मिळू शकतो, पण रायपूर व म्हैसूर येथील उत्तरेकडील लोकांच्या आक्रमणाचे जे पुरावे आहेत, ते नंतरच्या काळातील म्हणजे लोहयुगाच्या काळातील आहेत.

## ४·६

## महाकाव्याच्या (एपिक) काळातील आर्य

कुरु प्रदेशातील दिल्ली व मिरत ह्या सुरुवातीच्या काळात उदय पावलेल्या नगरांचा भारतीय परंपरेवर कायमचा ठसा पडलेला आहे. ब्राह्मणी धर्मपरंपरेने काशीला जरी पवित्र क्षेत्रांचे स्वरूप नंतर आले तरी पंजाब व उत्तर प्रदेश ह्यांच्या सीमेवरील प्रदेशाला प्राचीन ऐतिहासिक काळापासून लष्करी महत्त्व प्राप्त झाले असे दिसते. कुरु प्रदेशातील पानीपत येथील अनेक महत्त्वाच्या लढायांमध्ये उत्तर भारताचे भवितव्य ठरवले गेले. आर्य



टोळीसंघ, त्यांचे राजन्य, कुलगणप्रमुख त्यांच्यांतील वाढत्या संघर्षाचा उल्लेख वर आला आहे. अशाच एका लढाईला पुढे महाभारत ह्या महाकाव्याचे स्वरूप प्राप्त झाले. त्या लढाईत भाग घेणाऱ्या राजांच्या नावाच्या पिढ्या पुढे ऐतिहासिक काळातही शिल्लक होत्या. त्यांच्या मागच्या पिढ्यांची संख्या लक्षांत घेता ह्या लढाईचा काळ खिस्तपूर्व ८५० हा असावा. प्रत्यक्षात ही लढाई अत्यंत लहान प्रमाणावर झाली असावी. पण त्या लढाईला ग्रीक पुराणातील ट्रॉय येथील छोट्या लढाईला जसे महाकाव्याच्या स्वरूपात महत्त्व प्राप्त झाले, तसेच महत्त्व प्राप्त झाले.

कुरु प्रदेशांतील हस्तिनापूर येथील आर्यांचे एक वसतीस्थान हे पुरु वंशियाचे होते. (हस्तिनापूर नं. २ येथे सापडलेली भुऱ्या रंगाची भांडी पुरु–कुरु वंशियांची असावीत) ह्याच पुरूंच्या एका छोट्या शाखेने पांडवांनी इंद्रप्रस्थ (दिल्लीच्या पुराणा किल्ल्याजवळचा प्रदेश) येथील जंगले जाळून वसवले. जंगले जाळून साफ करण्याची ही क्रिया महाभारतात होम यज्ञाच्या स्वरूपात सांगितली आहे. त्या जळणाऱ्या जंगलांतून बाहेर पडणाऱ्या प्रत्येक जिवंत प्राण्याची कत्तल करण्यात आली. त्या जागेवर नांगरणीखालील शेती व्यवसाय प्रस्थापित करण्यात आला. त्यानंतर एकाच कुलांतील दोन राजन्यांत स्पर्धा होऊन एकमेकांना नष्ट करणारे युद्ध झाले. त्याचे पुढे महाकाव्यात रूपांतर होतांना असे दाखवले गेले की, जणु काही लाखो सैनिकांनी सबंध जगावर राज्य प्रस्थापित करण्याकरिता प्रचंड युद्ध केले. (अर्थात त्यांनी जगाची कल्पनाही तेवढीच मर्यादित असणार) त्या वेळचे उत्पादनतंत्र कथेत कल्पिलेल्या सैन्याचे पोषण करण्याइतके प्रगतही झालेले नव्हते. प्रत्यक्षांत कुरु प्रदेशांत खिस्तपूर्व ५ व्या शतकापर्यंत कुरुपुरूचे टोळीसंघराज्य (ट्रायबल किंगडम) चालू होते, हे पुराव्यानिशी सिद्ध झाले आहे. कुरूंचे राज्य त्यापलीकडे सबंध भारतभरच काय, परंतु उत्तरेकडील प्रदेशांवरसुद्धा पसरले गेले नाही. कुरूंचा ह्या लढाईनंतरचा वंशज परीक्षित ह्याचा राज्यभिषेक तक्षीला (तक्षशिला) येथे भव्य प्रमाणावर झाला, अशी कल्पना महाभारतात आहे. पण प्रत्यक्षात तक्षशिला हे इ. स. पूर्व चौथ्या शतकापर्यंत एक लहानसे गांव होते. तक्षशिलेला नंतरच्या काळांत ऐतिहासिक महत्त्व प्राप्त झाले. महाभारत युद्धानंतर चौथ्या पिढीतल्या कुरु–राजन्याला आपली राजधानी हस्तिनापूर येथून कोसंबी येथे हलवावी लागली, ह्याला उत्खननांतून मिळालेल्या पुराव्यांची जोड आहे.

पण ह्या युद्धाचा सगळ्यात मोठा परिणाम म्हणजे महाभारत ह्या काव्याची निर्मिती हा होता! ही घटना सांस्कृतिक दृष्ट्या महत्त्वाची आहे. **इलियडप्रमाणे ह्या काव्याचा जन्म एका प्रतिष्ठित राजघराण्याचा अस्त होण्याच्या शोकामुळे झाला.** जेत्यांचे राज्य चालू असल्यामुळे लवकरच हे काव्य त्यांच्या विजयाची गाथा केली गेली. महाभारताला 'हा जय नांवाचा इतिहास आहे,' असे नाव पडले व ते अजूनही अस्तित्वात आहे. महाभारतातील प्रत्येक कथेचे निरूपण करण्याअगोदर काही पवित्र ऋचा म्हणण्याचा प्रघात पडला. त्या ऋचा वैदिक परंपरेतील आहेत. त्या गाणाऱ्याला सूत म्हटले जाई. पुढे ह्या ऋचा म्हणणारा सूत किंवा ब्राह्मण ज्या राजाचा किंवा राजन्याचा आश्रित असे

किंवा ज्या राजाकडून ही कथा सांगण्याबद्दल त्याला दक्षिणा घ्यावयाची असे, त्यांच्या कुळांची परंपरा ह्या सूताला मोठ्या गौरवाने सांगावी लागत असे. ह्या राजन्यांना प्रतिष्ठा देण्यासाठी किंवा त्यांच्या वाढत्या अधिकारांना दैवी आधार *देण्याकरिता अशा राजाचे कूळ हे इंद्र, विष्णू , अग्नी, वरुण अशा देवतांपासून निर्माणं झाले असल्याचा व ते दैवी आधिकार त्याला परंपरेने मिळाले असे हे स्तुतिपाठक कवी व गायक दाखवीत असत. त्याचप्रमाणे विरोधी राजन्यांना राक्षकुळांतले दाखवीत असत. पुढे ह्या सर्व स्तुतिपाठक कवी, गायक ह्यांना सूत म्हटले जाऊ लागले. प्रत्येक राजन्याची अशी गौरवगाथा हीसुद्धा महाभारतात सामील केली गेली. ह्या गौरवाच्या ऋचा संस्कृतमध्ये स्मृतिबद्ध कराव्या लागत. त्या फक्त ब्राह्मणांनाच माहीत होत्या. त्यावर त्यांचाच ताबा होता. महाभारताची नंतरची ब्राह्मणी आवृत्ती इसवीसनापूर्वी २ रे शतक ते इसवीसनाचे दुसरे शतक ह्या काळांतील आहे व तीच आता शिल्लक आहे. त्यात ८०,००० ऋचा आहेत व त्याशिवाय काही गद्य परिच्छेदही आहेत. ह्या आवृत्तीवर सुरुवातीला जे निवेदक (प्रोलोग) आहे त्यात स्पष्ट सांगितले आहे की, अगोदरच्या आवृत्तीत २४००० ऋचा होत्या. पण ती अगोदरची आवृत्ती नष्ट झाली आहे. महाभारताची नवी आवृत्ती (लेखी नव्हे, तोंडी) करणाऱ्यांनी नव्या श्रोत्यांना आकर्षित करण्याकरिता नव्या कथा, नव्या कल्पना महाभारताच्या कथेत घातल्या. त्यामुळे तथाकथित मूळ लढाईशी संबंधित नसलेल्या अनेक कथा-पोटकथा महाभारतातल्या वेगवेगळ्या पात्रांनी सांगितलेल्या दिसतात. महाभारतातील हा फुगवटा साहजिक दिसावा, ह्याकरिता महाभारताची सर्व कथा जनमेजय राजाने केलेल्या यज्ञसंमारंभाच्या (कथेच्या) चौकटीत घालण्यात आली. तिसऱ्या जनमेजय राजाने नागांचा संपूर्ण निःपात करण्याकरिता महायज्ञ केला, अशी कथा आहे. ह्या कथेत नाग हे असूर किंवा राक्षस असून त्यांना आपल्या इच्छेप्रमाणे साप किंवा मानव ह्याचे शरीर धारण करता येत असे. त्यापैकी एकाने जनमेजय राजाचा पिता परीक्षित ह्याला दंश करून ठार मारले, अशीही कथा आहे. अशा अनेक दिवस चालणाऱ्या यज्ञाच्या वेळी अनेक दिवस कथा सांगाव्या लागत, त्यामुळे महाभारताचे स्वरूप केवळ एका महायुद्धाचे राहिले नाही तर एका महायज्ञाशी संबंधित रचलेले साहित्य झाले. महाभारताची वृद्धी इसवीसनाच्या दुसऱ्या शतकापर्यंत चालू होती. देशांतील वेगवेगळ्या भागात महाभारताच्या ज्या आवृत्त्या आहेत त्यांची तुलना करून जे मध्यवर्ती महाभारत तयार केलेले आहे ते इसवीसनाच्या चौथ्या शतकातील आहे. त्याअगोदरची जुनी आवृत्ती कशी होती, हे सांगता येत नाही. महाभारतात नंतर झालेली 'वृद्धी' ही धार्मिक प्रकृतीची आहे. पण वैदिक धर्मविधीपासून अगदी वेगळी आहे. बुद्ध धर्माच्या उदयाने व प्रसाराने ब्राह्मण धर्मांचे (यज्ञयाग करणे, पशुबळी देणे) स्थान डळमळीत झाले होते, पण महाभारतामुळे ह्या ब्राह्मणवर्गाला आपली गेलेली प्रतिष्ठा पुन्हा मिळवता येणे शक्य झाले. **महाभारतात नंतर जी वाढ केली त्यांत सर्वांत हुषारीने केलेली वाढ 'भगवद् गीतेची' आहे.** भारतीय युद्धाच्या सुरुवातीलाच कृष्णाने अर्जुनाला



केलेल्या उपदेशाच्या रूपाने हे तत्त्वज्ञान मांडले गेले आहे. पण प्रत्यक्षांत कृष्णाला देवाचे स्थान इंद्र, अग्नी, वरुण ह्या देवांच्या मानाने किती तरी नंतरच्या काळांत मिळालेले आहे. (हे भारतीय युद्ध झाले, तेव्हा तो देव म्हणून अस्तित्वांतच नव्हता हे पुढील प्रकरणावरून दिसून येईल.) कृष्णाचे वर्चस्व त्यानंतरच्या बऱ्याच काळानंतर प्रस्थापित झाले. भगवद् गीतेतील संस्कृत भाषा ही इ. सनानंतरच्या तिसऱ्या शतकानंतरची आहे. पण महाभारताची चौकट ह्या अर्थी जनमेजयाच्या यज्ञाची जी कथा आहे, ती फार महत्त्वाची आहे व त्यांचे ऐतिहासिक महत्त्व अनेकांना अजून ओळखता आलेले नाही. त्या कथेतून त्या काळच्या समाजातल्या प्रवाहांचा काही शोध घेता येतो. जनमेजयाला हा सर्पयज्ञ अर्धवट सोडावा लागला, कारण ब्राह्मणपिता व नागमाता ह्यांचा पुत्र 'अस्तिक' ह्याने तो कौशल्याने थांबवला. जनमेजयाचा मुख्य पुरोहित ('होता') सोमेश्वर हासुद्धा मिश्र वर्णाचा होता. वास्तविक नंतरच्या ब्राह्मण ग्रंथातील नियमांनुसार ब्राह्मण पुरुषाला ब्राह्मणेतर स्त्रियांपासून झालेल्या संततीला ब्राह्मण मानले जात नसे. ज्या अर्थी त्या काळचे ब्राह्मण आपल्या पूर्वजांचा नागांशी असलेला संबध उघडपणे आणि अभिमानाने सांगू शकत, त्या अर्थी 'नाग' हे दानव किंवा अशा आर्येतर जमातीचे असले तरीही काही प्रतिष्ठा असलेले जनसमूह असावेत. 'अस्तिक' हा 'यायावर' वंशाचा होता. (यायावर म्हणजे भटक्या.) ह्याच वंशात पुढे इ. सनाच्या नवव्या शतकांत 'राजशेखर' नावाचा प्रसिद्ध कवी होऊन गेला. तो मात्र ब्राह्मण नव्हता; त्याने 'कहामण' (राजपूत किंवा मराठा) जातीतील स्त्रीशी विवाह केला. मग हे नाग लोक कोण होते ? ते विषारी सर्प व मानव ह्या दोन्ही स्वरूपांत प्राचीन वाङ्मयात वारंवार येतात. त्यांना नष्ट करण्याकरिता महायज्ञ केले गेले. पण त्याचबरोबर पुराणातील अनेक श्रेष्ठ पुरुषांनी नाग स्त्रियांशी विवाह केल्याच्याही कथा आहेत. अशा संबंधातून प्रतिष्ठित सुपुत्रांचा जन्म झाला आहे.

ह्या प्रश्नाचे उत्तर जे प्राचीन वाङ्मय ज्या स्वरूपात उपलब्ध आहे, त्यावरूनच द्यावे लागेल. जरी सुरुवातीला नाग हे पशुदेवक मानणाऱ्या आदिवासीकरिता हा शब्द वापरला गेला तरी पुढे विविध आदिवासी समूहांना 'नाग' ह्या सर्वसाधारण नावाने ओळखले जाऊ लागले. नागपूजा बहुतेक आदिवासी जमातीमध्ये अजूनही होते. महाभारतात ज्या नागांचा उल्लेख आहे, ते कुरुप्रदेशातील आदिवासी आहेत. जेथे आर्यांनी जमीन साफसूफ करून प्रथम वस्त्या केल्या. आदिवासी हे अन्न गोळा करू राहाणाऱ्या (फूड गॅदरिंग) अवस्थेत होते. पंजाबमधील पठारावर किंवा तेथील नद्यांच्या काठच्या रेताड प्रदेशांपेक्षा गंगेच्या खोऱ्यातील जंगलांत अन्न गोळा करून जगणे जास्त सोपे जाई. ज्या जंगलातील नागांना जिंकून घेणे किंवा नष्ट करणेही आर्यांना कठिण गेले. ज्याप्रमाणे पश्चिमेकडील आदिवासींना दास किंवा शूद्र बनवता आले तसे उत्तरेकडील नागांच्या बाबतीत करणे आर्यांना जमले नाही. जोपर्यंत नाग अन्न गोळा करण्याच्या अवस्थेत राहू शकले तोपर्यंत ते आर्यांच्या चौकटीबाहेर राहिले. त्यांना समाजांतील खालच्या पातळीवर

ढकलता आले नाही. खुद्द वेदांमध्ये टोळींचा आश्रय सुटल्यामुळे किंवा सोडून देऊन जंगलात जाऊन शांतपणे अन्न गोळा करून जगणाऱ्या ब्राह्मणांच्या कथा आहेत. ब्राह्मणांची विद्याभ्यासाची जी परंपरा आहे, त्याप्रमाणे मुंज झाल्यानंतर बटूला बारा वर्षे जंगलातील गुरूच्या आश्रमात रहावे लागे. तेथे त्यांची गुरे पाळावी लागत, वेदपठण करावे लागे, पौरोहित्यांचे ज्ञान मिळवावे लागे. ह्या आश्रमातून शेती व्यवसाय किंवा शिकार करणे ह्याचे शिक्षण सहसा मिळत नसे त्या काळात जंगलांत जाऊन आश्रम उभारणाऱ्या किंवा शिकणाऱ्या ह्या ब्राह्मणांच्या बरोबर स्वतःच्या जातीचा स्त्री वर्ग गुरुकुलाचा उदय होईपर्यंत जात नसे. ह्या ब्राह्मणांचा व आदिवासी स्त्रियांचा वैवाहिक संबंध येत असे. हे ब्राह्मण निःशस्त्र व शांततावादी असल्यामुळे नागांशी त्यांचा खटका उडत नसे. आसाममधील हल्लीच्या नागांप्रमाणे गंगेच्या खोऱ्यातील आदिवासी काही लढाऊ नव्हते. जंगलामधील लहान लहान वस्त्यांतून ते अन्न गोळा करून जगत असत. हस्तिनापूर येथे सापडलेली मातीची कच्ची व खडबडीत भांडी ही या आदिवासींची असावीत. **जसजशी जंगले साफ केली गेली तसतसे हे आदिवासी शेती व्यवसायात सामील झाले असावेत. पण त्यांनी आपली दैवते मात्र परंपरेने कायम ठेवली.** कुरुकुलाचा अंत झाल्यानंतर त्यांच्या गतवैभवाचे वर्णन करणाऱ्या सूतांची जी पहिली पिढी होती, त्यांच्याशी ह्या नागांचे मैत्रीचे संबंध असावेत हे त्या महाकाव्याच्या सुरुवातीच्याच खंडात नागवासीयांच्या पूर्वजांबद्दल जे गौरवपूर्वक उल्लेख आहेत त्यावरून दिसून येते. वास्तविक या नाग पूर्वजांचा व भारतीय युद्धाचा काहीच संबंध नाही. ह्याउलट यदुवंशाचा नायक महाभारतातील मानवी देव श्रीकृष्ण ह्यांच्या पूर्वजांच्या गौरवकथा महाभारतानंतरच्या हरिवंशात आल्या आहेत. भारतीय शिल्पांत नागांना अनेक वेगवेगळ्या संदर्भात महत्त्वाचे स्थान प्राप्त झालेले आहे. समुद्रात बुडू नये म्हणून 'शेष' नागाने पृथ्वीला आपल्या मस्तकावर धारण केले आहे. विष्णु 'शेषशायी' आहे. शिवाच्या गळ्यांत नाग आहे तर गणेशाच्या हातातील शस्त्र आहे वगैरे वगैरे. त्याशिवाय नाग स्वतंत्रपणेही दैवत मानले जाते. वर्षातून एकदा नाग पंचमीला त्याची पूजा करतात. त्या दिवशी जमीन खणत नाहीत. धातूंचा वापर करीत नाहीत. (म्हणजे शेतीविषयक कृती करीत नाहीत.) त्याशिवाय भारतातील शेतकरी नागाला क्षेत्रपाल मानतात ते वेगळेच. **महाभारताकडे इतिहास या अर्थाने पहाणे कठिण आहे, पण त्या काळच्या समाजातील सांस्कृतिक देवघेवीची एक प्रक्रिया ह्या महान काव्यांतून दिसते ती अत्यंत महत्त्वाची आहे.** महाभारतांतील अगदी जुन्या कथांची तीन वेगवेगळी उगमस्थाने आहेत. एक : पुरु–कुरु लढाईबद्दलची संग्राम गीते (वॉर बॅलड्स्), दोन : आदिवासींच्या लोककथा, तीन : यादवाच्या पूर्वजांबद्दलच्या गौरवकथा. ह्या सर्व विसंगत कथा त्या काळच्या समाजाला पचतील व रुचतील अशा तऱ्हेने एकत्र केल्यानंतरही त्यात भर पडत राहिली. या कथांचा पहिला उगम दिल्ली मथुरा या प्रदेशांत जेथे महाभारताची पहिली रचना झाली तेथे झाला. तेव्हा लोखंडाचे ज्ञान झाले होते, (पण साठा मर्यादित होता.) अशा वेळी झाला असावा.



उत्तर वेदिक काळांतील आर्यसमूह, अन्न गोळा करणारे आदिवासी समूह आणि कृष्णाचे यादव एकत्र येऊन आपसात तंटे सोडवून अधिक कुशल शेती व्यवसायी समाज निर्माण करण्याची शक्यता निर्माण झाली होती. धातूंचा तुटवडा व तिन्ही जमातींचे बलाबल यामुळे कुठल्याही एका संघ-समूहाला केवळबळाचा वापर करून इतर जमातींना नष्ट करणे शक्य नव्हते. तसे प्रयत्न यशस्वी झाले नव्हते. तेव्हा त्यांच्या पुराणकथा एकत्र करण्यात आल्या. (समाजातील समन्वयाच्या त्या निदर्शक होत्या.) कश्यप ऋषीने ह्या सर्व जमातींना एकत्र आणण्याची मोठी कामगिरी केली. या गौरव कथांना एकत्र गुंफण्याचे कार्य प्रथम भृगु ऋषीने केले. ही सांस्कृतिक देवघेव इतकी यशस्वी झाली की, ती पुढच्या काळातही चालू राहिली. मध्य युगातही पुराणे त्याच धरतीवर पुनर्रचित करण्यात आली. धार्मिक समजुतींना एकत्र गुंफून त्याच्या आधारे अधिक उत्पादक समाज निर्माण करण्याची प्रक्रिया जेव्हा संपुष्टात आली, तेव्हा ह्या प्रक्रियेच्या मर्यादा स्पष्ट झाल्या हे मुस्लिम आक्रमण ज्या सहजपणे यशस्वी झाले त्यावरून सिद्ध होते. **ब्राह्मण पुरोहित वर्गाने विविध समूहांना एका समाजात बांधण्याचे जे कार्य केले ते एका काळी महत्त्वाचे असले तरी त्या समाजात ब्राह्मणांचे व अंधश्रद्धेचे वर्चस्व एवढे माजले की, ब्राह्मण सांगेल ते तर्कदुष्ट असो, की वस्तुस्थितीशी विसंगती असो, की सामान्य ज्ञानाच्याही विरोधी असो ते खरे मानण्याची प्रवृत्ती बळावली. त्यामुळे समाजाचे भौतिक ज्ञान व संस्कृती यांची वाढ खुंटून राहिली.**

| पाच |

# टोळी संघ–समाजव्यवस्थेपासून ते प्रादेशिक समाजव्यवस्थेकडे वाटचाल

## ५·१
## नवे विचार व धर्म

भारतात बुद्ध धर्माचा उदय झाला आणि जवळजवळ अस्तही झाला. तरीही जगांतील लाखो लोकांच्या दृष्टीने भारताची प्रतिमा ही 'बुद्धाचा देश' अशी आहे. कारण बुद्ध धर्म भारताच्या एका महत्त्वाच्या ऐतिहासिक संक्रमण काळात उदयास आला आहे. आशियातील लाखो लोकांच्या दृष्टीने प्राचीन भारताने जगाला खास करून आशिया खंडाला दिलेले सर्वात मोठे योगदान म्हणजे बुद्धविचार व तद्जन्य कला व संस्कृती. ब्रह्मदेश, थायलंड, कोरिया, जपान, चीन ह्या देशातील शिल्प व इतर कला ह्यामध्ये भारतीय वातावरणांत वाढलेल्या बुद्धविचारांच्या संस्कारांचे जे फुलोरे आहेत, त्याविना त्या कलाशिल्पांचे वैशिष्टयच हरवल्यासारखे झाले असते. मंगोल व तिबेट ह्या देशांचे जे पुरातन वाङ्मय आहे, त्यावर बुद्धविचारांचा मोठा पगडा आहे. सिलोन, ब्रह्मदेश, थायलंड आणि इंडोचायना ह्या देशांतील लोक बुद्ध धर्म मानतात; एवढेच नाही तर त्यांच्या समाजांत नागरी संस्कृतीचा उद्धार आणि जोपासना होण्यात बौद्ध धर्मांचा फार मोठा वाटा आहे, असेही मानतात. इसवीसनपूर्व पांचव्या शतकाच्या काळात खास करून चीनच्या अंतर्गत प्रदेशांत जी आर्थिक प्रगती झाली, शेती व्यवसाचा जो विकास पावला त्यामध्ये बौद्धमठांनी (मोनेस्ट्रीज) फार मोठी कामगिरी केलेली आहे. बुद्धाच्या आयुष्यातील घटनांशी संबंधित अशी जी स्थळे भारतात आहेत, त्याचे दर्शन घेण्याकरिता अजूनही हजारो यात्रेकरू बर्फाच्छादित डोंगर, वाळवंटे आणि तुफानी सागर पार करून येतात. आता ही गोष्ट कदाचित आश्चर्याची वाटेल; पण बुद्ध धर्माच्या उदयाच्या काळांत त्यांची प्रगती पूर्वेकडच्या बाजूपेक्षांही पश्चिमेकडील प्रदेशात जास्त झाली होती. **अफगाणिस्तानमधील बामियन येथील खडकातून कोरून काढलेला साठ मीटर उंचीचा पुतळा त्याला साक्ष आहे.** मध्य आशियामध्ये उध्वस्त झालेले अनेक स्तूप आहेत.



बुद्ध धर्माचा खिश्चन धर्माच्या उदयावर व विचारांवरसुद्धा प्रभाव पडलेला आहे. पर्वतावरील प्रवचने (सेरेमन ऑन द माऊंटस) ह्या नावाने प्रसिद्ध असलेला येशू खिस्ताचा जो संदेश बायबलमध्ये आहे त्याची जवळीक जुन्या करारापेक्षाही (ओल्ड टेस्टॅमेंट) बुद्ध धर्माशी अधिक आहे. त्याचप्रमाणे खिस्ताबद्दल ज्या अद्‌भूत घटना (उदा. पाण्यावरून चालणे इ.) सांगितल्या गेल्या आहेत, त्या बुद्ध-धर्मीय वाङ्मयात कितीतरी अगोदरपासून प्रचलित आहेत. तसेच अनेक खिस्ती संतांबद्दलच्या कथा बुद्धाच्या चरित्रावरून घेतल्या असाव्यात असे दिसते. बगदादच्या हरुन अल रशिदच्या ह्या खलीफाच्या काळांत बर्मेसाईड हे कुटुंब राज्यकारभार चालविणाऱ्यांपैकी होते. ते नवबहार येथील बौद्ध मठांचे अधिपती (परयक) होते. इस्लाम धर्मांत त्यांनी प्रवेश केल्यानंतरही आपल्या जुन्या श्रद्धा ते जतन करीत असल्याचा संशय त्यांच्यावर घेतला गेला होता.

बुद्ध धर्मांचा जो विस्तार झाला त्याची दोन वैशिष्टये आहेत. भारताबाहेर जो विस्तार झाला तो शस्त्रांचा वापर केल्याशिवाय झाला आणि जसे मुसलमान धर्माबाबत झाले, त्याप्रमाणे ह्या धर्मविस्ताराबरोबर भारताचा राजकीय प्रभाव वाढला असे नाही. सम्राट अशोकाचे नाव भारताबाहेरही वंदनीय झाले आहे, ते बौद्धविचारांचा थोर राजा म्हणून; त्याने केलेल्या स्वाऱ्या किंवा विजय ह्यामुळे नव्हे. कुशाणांचे राज्य भारतीय सरहद्दीवलीकडे मध्य आशियांतही होते. त्यांनी बुद्ध धर्माला आश्रय दिला होता. पण भारताबाहेर बुद्ध धर्माचा प्रसार कुशाणांनी केला असे म्हणता येणार नाही. कुशाणांनी बुद्ध धर्मांबरोबरच शैव वगैरे इतर भारतीय पंथांनाही आसरा दिला होता. पण बुद्ध धर्माप्रमाणे ते भारताबाहेर प्रसार पावले नाहीत. हॅन घराण्यातील मिन–टी ह्या राजापासून चीनमधील अनेक राजांनी व अधिपतींनी बौद्ध धर्म प्रसारकांना मुद्दाम बोलावून घेतले आहे. तरीसुद्धा ज्या भूमीत हा धर्म जन्म पावला त्या भारतात मात्र सरहद्दीवरील काही विभाग सोडल्यास तो जवळजवळ अस्तंगत पावला. आजसुद्धा जर अगदी सुशिक्षित भारतीयाला असे सांगितले की काही काळापर्यंतच अस्तित्वांत असणारा बुद्ध धर्म हेच प्राचीन भारतीयांचे जगाच्या संस्कृतीला दिलेले सर्वात मोठे योगदान आहे, तर तो एक तर उद्विग्न किंवा आश्चर्यचकित होईल. असो. बुद्ध धर्माचा उदय आणि अस्त ह्यांच्या जवळजवळ पंधराशे वर्षांच्या काळात भारतीय समाजवस्थेत अनेक स्थित्यंतरे झाली. पशुसंवर्धन करणाऱ्या निमभटक्या टोळी, समाजापासून ते प्रादेशिक समाजांचा उदय, राजेशाही ते सरंजामदारी अशी स्थित्यंतरे भारतात झाली.

समाजाच्या ह्या वेगवेगळ्या अवस्थांमध्ये बुद्धधर्माने कोणती भूमिका वठवली? काय प्रभाव पाडला? किंवा ह्या स्थित्यंतराचा कोणता परिणाम ह्या धर्मावर झाला? इत्यादी प्रश्नांची उत्तरे शोधून काढणे भारतीय व्यवस्थेचा अभ्यास करण्यास उपयुक्त आहे. त्याचबरोबर बुद्धविचारांमध्ये परस्परविरोधी, काहीसे संभ्रमित करणारे जे बदल झाले, त्याचाही विचार करणे आहे.

खिस्तपूर्व सहाव्या शतकामध्ये चीनमध्ये कन्फ्यूशिअसचे तत्त्वज्ञान निर्माण झाले. इराणमध्ये झोरोस्तर ह्या तत्त्ववेत्त्याने अनेक धर्मसुधारणा घडवून आणल्या. त्याच काळात गंगेच्या खोऱ्यात नवीन विचारांचे अनेक उद्गाते होऊन गेले. बुद्ध हा त्यांपैकी एक आणि त्या सुरुवातीच्या काळात तो सर्वात प्रभावी होता असेही नाही. त्या काळच्या ज्या विविध विचारधारा होत्या त्या सर्वांची माहिती प्रत्यक्षपणे उपलब्ध नाही. तर ह्या विचारधारांवर वैदिक विरोधकांनी जे हल्ले केले आहेत त्यावरून ह्या विचारधारांची माहिती मिळते. अर्थात ही माहिती काहीशा दूषित दृष्टीकोनातून दिलेली आढळते. जैन धर्म अजूनही अस्तित्वात आहे. जैन धर्माने बुद्ध धर्मांच्या अगोदर ह्या देशात मूळ धरले होते, असे समजण्यास जागा आहे. म्हैसूर येथील उत्खननावरून 'आजिवीक' हा पंथ जवळजवळ चौदाव्या शतकापर्यंत तग धरून होता असे दिसून येते. जैन धर्मांच्या दोन मुख्य शाखांचे मूळ उपासक महावीर व मक्खली गोसाला हेसुद्धा बुद्धाच्या जवळपास काळांतील अनेक विचारवंतांपैकी होते. (जैन पंथाच्या म्हणण्याप्रमाणे त्याअगोदरही त्यांचे अनेक तिर्थंकर होऊन गेले व त्यांतील पार्श्व हे बहुधा इतिहासांत होऊन गेलेले व्यक्तिमत्त्व असावे.) ज्या भागांत बुद्धाने प्रवचने केली त्या ठिकाणी त्यांनीही प्रवचने केलेली आहेत. स्वत: बुद्धानेही आपल्यापेक्षा अगोदरचे पण जवळजवळ त्याच काळांतील 'कालमा' ह्या टोळीतील 'अलारा' व 'रामाचा मुलगा उद्दक' ह्यांचा शिकवणुकीचा मागोवा घेऊन त्यांचा विकास केलेला आढळतो. त्यामुळे बुद्ध हा जरी नि:संशयपणे थोर धर्मसंस्थापक असला तरी बुद्धधर्म हा केवळ त्याच्या व्यक्तिगत गुणांतून आणि प्रतिभेतून निर्माण झाला; आणि माणसांच्या किंवा समाजांच्या अपुरेपणामुळे त्याचा ऱ्हास झाला, असे मानता येणार नाही. हे एवढ्याकरिता लक्षात घेतले पाहिजे की, ज्या अर्थी त्याच काळांत जवळजवळ त्याच भौगोलिक विभागांत एवढे विविध पंथ व विचार उगम पावले त्या अर्थी **जुने पंथ वा विचार ह्यांची जागा नव्या विचारांनी घेण्याची सामाजिक गरज निर्माण झाली होती.** उदयोन्मुख समाजांच्या गरजांच्या दृष्टीने जुने पंथ व विचार टाकाऊ ठरत होते. ह्या गरजा काय होत्या, ह्याचे विश्लेषण करायचे असेल तर ह्या विविध विचारधारांतील समान लक्षणे व त्या विचारधारांच्या उपासकाचे समाजांतील वर्गीय स्थान ह्यांचा विचार केला पाहिजे.

नव्या परिस्थितीत केवळ जुने ग्रंथ व विचार ह्यांचे पुनरुज्जीवन करण्याचा प्रश्न असता, तर नवा धर्म हा सिंधू नदीच्या तीरावर जेथे जुन्या हरप्पा संस्कृतीचे अवशेष व स्मृती शिल्लक होती तेथे किंवा वैदिक संस्कृतीचे मुख्य स्थान अशा वायव्येकडील प्रदेशांत उदयास आला असता. केवळ नैतिक पुनरुत्थानाचा प्रश्न असता तर नव्या धर्माला कुरुक्षेत्रही जेथे नैतिक उपदेशाने खच्चून भरलेले महाभारत रचले गेले, ती भूमी किंवा मथुरा किंवा आसपासची भूमी जेथे अत्यंत अद्भूत अशी कृष्णभक्ती प्रथम पसरली, ती भूमी सुयोग्य ठरली असती.

प्रश्न असा आहे की, गंगेच्या खोऱ्यात असणाऱ्या पूर्वेकडील नव्या आणि त्यावेळी



मागासलेल्या आणि लागवडीला येत असणाऱ्या प्रदेशात हा नवा धर्म का उदयाला आला ? ह्या प्रदेशांत आर्यांची वस्ती नंतरच्या काळात झालेली आहे. ह्या प्रदेशात नवे वर्ग उदयास आले होते. **शेतकऱ्यांचा वर्ग ह्या प्रदेशात महत्त्वाचा वर्ग म्हणून उदयास आला होता.** उत्तर वैदिक काळातील पशुपालन मुख्य व्यवसाय असणाऱ्या टोळी-संघ समाजपद्धतीमधील वैश्यांचे स्थान, स्वतंत्र शेती व्यवसाय करणाऱ्या किसानांनी घेतले होते. त्यांच्यापुरती टोळी समाजपद्धती संपली होती. **उत्पादन साधने बदलली होती. उत्पादनसंबंध, सामाजिक संबंध बदलले होते.** ह्या समाजात नवा व्यापारी वर्ग समृद्ध झाला होता. '**श्रेष्ठी**' ही व्यक्ती समाजात महत्त्वाची मानली जाऊ लागली होती. '**श्रेष्ठी**' ह्या शब्दाचा वापर साधारणपणे कर्ज देणारा सावकार किंवा कसबी व्यवसाय करणाऱ्या श्रेणीचे प्रमुख (चीफ ऑफ ट्रेड गील्ड्स) ह्यांना उद्देशून वापरला जाई. ह्या श्रेष्ठींना त्या काळातील राज्यकारभारात जरी प्रत्यक्ष अधिकार नव्हते तरी सार्वभौम राजेसुद्धा त्यांना मानाने वागवीत असत.

ह्या वर्गांच्या उदयाचे लक्षण दाखवणारा त्या काळच्या साहित्यात वारंवार येणारा दुसरा महत्त्वाचा शब्द म्हणजे '**गहपती**' (गृहपती) हा होय. **गृहपती** म्हणजे **स्वत:च्या बारदाना असणाऱ्या संयुक्त कुटुंबाचा प्रमुख.** कुटुंबाचे सर्व यज्ञविधी करणारा हा यजमान होय. अर्थात हे यज्ञविधी राजन्याच्या यज्ञविधीपेक्षा वेगळे व तेवढे मोठे नव्हते. समाजात ह्या गृहपतींना मानाचे स्थान होते. कारण त्या कुटुंबाच्या संपत्तीचा तो अधिकारी होता. ही संपत्ती त्याने व्यापार, वस्तूंचे उत्पादन किंवा शेती व्यवसाय करून मिळवलेली असो की तो कोठल्याही जातीचा वर्णांचा असो. (अर्थात असे गृहपती मुख्यत: क्षत्रिय किंवा वैश्य वर्णांत असले तरी शूद्र समजल्या जाणाऱ्या कसबी कारागिरी करणाऱ्या व कुटुंबे ह्याचे प्रमुख हेसुद्धा गृहपती होते, हे डॉ. आर. एस. शर्मा ह्यांच्या शूद्राज इन ॲन्शन्ट इंडिया ह्या पुस्तकावरून दिसून येईल : निवेदक) स्वत:ची कौटुंबिक जायदाद असणारा हा वर्ग होता आणि जरी कुटुंबाचे पालन करण्याची जबाबदारी त्याच्यावर होती आणि वारसा हक्काच्या बाबतीत परंपरेने चालत आलेल्या जाती-जमातीच्या नियमानुसार तो बांधला गेला असला (आणि जायदाद संयुक्त कुटुंबाच्या मालकीची असली) तरी त्याचा उपयोग करण्याचे बरेचसे स्वातंत्र्य ह्या 'कर्ता' असलेल्या पुरुषाला होते. **थोडक्यात टोळी-संघ किंवा जात-जमात ह्याऐवजी 'कुटुंब' ह्या संस्थेला प्राधान्य येत होते व संघ किंवा जाती-जमाती ह्यांची त्यावरील बंधने शिथिल होत होती.** वैदिक यज्ञाअगोदर होणाऱ्या सतत लढाया, त्या वैदिक यज्ञविधीमधील पशुबळी देण्याची पद्धत इत्यादींमुळे शेतकरी वर्ग व व्यापारी ह्यांचे अतोनात नुकसान होत असे. कारण अशा यज्ञांत त्यांची गुरेढोरे जबरदस्तीने वसूल केली जात. व्यापाऱ्याला तर त्या विभागाचा राजा किंवा त्याचा संघ किंवा गणराज्य ह्यापलीकडे जाऊन इतर जाती-जमातींशी सलोख्याचे संबंध प्रस्थापित करण्याची गरज निर्माण झाली होती, त्याशिवाय व्यापार करणे किंवा तो वृद्धिंगत करणेच अशक्य होते. शिवाय

लुटालूट होणार नाही, अशा तऱ्हेने व्यापारमार्गाचे संरक्षण होईल अशी व्यवस्था निर्माण होणे त्यांच्या हिताचे होते. ह्या गरजा काही प्रमाणात एकतंत्री सार्वभौम राजेशाहीच्या स्वरूपातील शासन संस्थेअन्वयेच पुऱ्या होणे शक्य होते. अशी एकतंत्री सार्वभौम राजेशाहीच विविध छोट्या टोळ्या, गणराज्ये व राजन्य ह्यांच्यातील लहानसहान लढायांचा अंत करून सबंध प्रदेशावर पहारा करून लुटालूट बंद करू शकत होती.

कस्सकः कर्षक ह्या शब्दांनी प्रतीत होणारा स्वतंत्र मालकी हक्काच्या जमिनीची लागवड करणारा शेती व्यवसायी शेतकऱ्यांचा वर्ग त्या काळच्या 'गृहपती' श्रेष्ठी वगैरे शब्दामधूनसुद्धा प्रचितीला येतो. ह्याअगोदर सांगितल्याप्रमाणे भारतात मोठ्या प्रमाणावर उत्पादनाकरिता गुलाम उपलब्ध नव्हते. अन्न गोळा करून रहाणारे आदिवासी समूह शेती उत्पादनाला लागणारे श्रम करावयास तयार नव्हते. जंगले साफ करून शेती व्यवसाय प्रस्थापित करणारे हे शेतकरी त्यांच्या संघ-टोळ्यांच्या व जाती-जमातीच्या बंधनातून मुक्त होऊन लहान लहान कौटुंबिक गटांनी स्वतःच्या बळावर नव्या जमिनी लागवडीला आणीत होते. अशा शेतीमधून निर्माण होणाऱ्या अतिरिक्त उत्पादनाच्या व्यापारांतून होणारा फायदा हाच त्यांच्या उपक्रमशीलतेला उद्युक्त करणारा होता व हे टोळ्यांची व जातीजमातींची बंधने नष्ट होऊन, त्यांच्या मालकी हक्कांचे संवर्धन होण्यानेच शक्य होते. टोळी-संघ किंवा गणराज्ये ह्यांची जमीन किंवा पशुधन प्रमुख कुळांच्या सामायिक मालकीची असे. आणि गणसभा त्यांचे फेरवाटप करू शकत असे. पण ह्या उपक्रमशील कुटुंबांनी गंगेच्या खोऱ्यांत लागवडीखाली आणलेली जमीन अशा बंधनात ठेवलेली त्यांना आवडणे शक्यच नव्हते. थोडक्यात जमीन, पशुधन, जायदाद, त्यांतून मिळणारा फायदा हा खाजगी मालकीचा असणे ह्या वर्गांना हवे होते व नव्या परिस्थितीत त्यांनी तो प्रस्थापित करून घेतला होता.

पंजाब व आसपासचा प्रदेश त्याबाबतीत जुनाट संस्काराखाली राहिला. ब्राह्मण ग्रंथात आढळून येणारे टोळी-संघ व गणराज्य जीवन तेथे चालू राहिले. यजुर्वेदातील क्षत्रिय कुलराजन्य संस्था ही शेती उत्पादनाच्या अनिर्बंध विकासांवर मर्यादा आणीत होती आणि सामान्य शूद्र शेतकऱ्यावर असह्य बोजा लादत होती. यज्ञविधीकरिता सक्तीने शेतकऱ्यांची गुरेढोरे वसूल केली जात (अर्थात अशी सक्ती धर्माज्ञेच्या नावाने चालत असे. पाहा—शूद्राज इन् ॲन्शन्ट इंडिया—प्रकरण ३ व ४ : निवेदक) पालि भाषेतील साहित्यामध्ये राजन्यांच्या यज्ञांच्या बाबतीत ज्या कथा आहेत, त्यावरून हे दिसून येते. ही सर्व व्यवस्था उच्च कुलांतील क्षत्रिय व यज्ञविधी करणारे ब्राह्मण पुरोहित ह्यांच्याच केवळ हिताची होती. सामान्य शेतकऱ्यावर बोजा लादणारी व शेतीच्या विकासात अडथळा आणणारी होती. सहाव्या शतकातील पसेनदी व बिंबिसार ह्या राजांनीही असे पशुबळी असणारे यज्ञविधी करून ब्राह्मणांना गावे दान केलेली आहेत; पण **ख्रिस्तपूर्व सहाव्या शतकातील सर्व नव्या विचारवंतांनी व पंथांनी वैदिक यज्ञविधींना साफ नकार दिला आहे.** ह्या नव्या पंथात नवे



ब्राह्मण विचारवंतसुद्धा आहेत. उदा. जुने यज्ञविधी नाकारणाऱ्या नव्या विचारवंतात व त्यांच्या पंथात पुरान कस्सप व बेलात्थीचा मुलगा सम्जय ह्या ब्राह्मणांचाही समावेश आहे. यजुर्वेदामध्ये मानवी बळीचा उल्लेख आहे, तरीही शतपथ ब्राह्मणांच्या काळांतच मानवी बळी देण्याची प्रथा लोप पावली होती. अर्थात गढया, किंवा शहराचे दरवाजे भक्कम व्हावे ह्याकरिता किंवा पाण्याच्या जोराने धरण फुटू नये, ह्याकरिता मानवी बळी अशा कामाच्या पायथ्याशी गाडण्याची प्रथा केवळ अपवाद म्हणून बराच काळ चालू राहिली. त्याचप्रमाणे घोड्याचा बळी देणारे अश्वमेध यज्ञही जवळजवळ बंद झाले. गंगेच्या खोऱ्यांत वस्ती झाल्यानंतर अश्वमेध झाल्याची फारशी उदाहरणे नाहीत. (पसेनूही ह्याने केलेला व पुढे शुंग राजांनी केलेले अश्वमेध हे अपवादात्मक आहेत.) उत्तर वैदिक काळांतील मुख्य पशुबळी म्हणजे खिल्लारे, सहाव्या शतकांत ज्या धार्मिक व वैचारिक सुधारणा झाल्या, त्यामुळे खिल्लारांना बळी देण्याची प्रथा इतकी नष्ट झाली की, आजही हिंदू धर्मीयांत गोमांसभक्षण संपूर्ण निषिद्ध मानले जाते. अगदी अद्ययावत पण जुनाट विचारांचा हिंदु गोमांसभक्षण हे मानवी मांस भक्षणासारखेच निषिद्ध मानतो, पण वैदिक ब्राह्मण हे यज्ञांत मारल्या जाणाऱ्या खिल्लारांच्या मांसावर पुष्ट होत असत. शतपथ ब्राह्मणांतील एका सुप्रसिद्ध परिच्छेदांत गाईचे व बैलाचे (अनुदुह) मांसभक्षण का वर्ज्य करावे, ह्याची चर्चा आहे. चर्चेच्या शेवटी याज्ञवल्क्य म्हणतात, "ते काही असो, पण जोपर्यंत ते मांस माझ्या अंगावर मास चढवते, तोपर्यंत मी ते खात रहाणार." आता अशा विधानामुळे हिंदु धर्म अभिमान्यांना अवघडल्यासारखे वाटेल; पण त्यावेळच्या वस्तुस्थितीबद्दल केलेले ते स्पष्ट विधान आहे. विविध ब्राह्मण ग्रंथांना नंतर उपनिषदांची जोड देण्यात आली. त्यावेळी घडल्या गेलेल्या स्थित्यंतराची दखल जरी प्रत्यक्षपणे घेण्यात आली नसली, तरी अप्रत्यक्षपणे ते दिसून येते. ब्राह्मण ग्रथांचा मथितार्थ **उपनिषदात** संपूर्णपणे बदलण्यात आला आहे. उपनिषदांतील यज्ञाचा उल्लेख हा गूढ तत्त्वज्ञानाच्या संदर्भात केलेला आहे. यज्ञाचा मूळचा व्यवहारी व रक्तपाती अर्थ संपूर्ण बदललेला आहे. सिंधू नदीच्या पश्चिमेकडील आपले शिक्षण झाल्यानंतरही उपनिषदांतील ब्राह्मण हे पूर्वेकडील अश्वपती कैकय आणि प्रवाहन जैवाली ह्यांच्यासारख्या क्षत्रियांकडे यज्ञधर्माचा गर्भितार्थ समजून घेण्याकरिता येत असत. उपनिषदामध्ये 'ब्रह्म' ही नवी कल्पना जन्माला आली. पारलौकिक, पवित्र आणि तरीही संपूर्ण अनिश्चित अशी ही अवस्था प्राप्त करून घेणे, ब्राह्मीभूत होणे किंवा उमगून घेणे हे जीवनाचे सर्वात मोठे सार्थक असल्याचे सांगितले गेले. उपनिषदांत ज्या इतर गूढ प्रश्नांची चर्चा केली गेली आहे, ते प्रश्न आणि सहाव्या शतकातल्या गंगेच्या खोऱ्यातील तत्त्ववेत्यांनी उपस्थित केलेले प्रश्न सारखेच आहेत ते असे– आत्मा आहे काय? आत्मा असल्यास त्याचे स्वरूप काय? मृत्यूनंतर माणसाचे काय होते? मानवी जीवनाचे सार्थक कशात आहे? वगैरे वगैरे. उपनिषदांत बुद्ध किंवा त्याचा पंथ किंवा वैदिक विचारविरोधी इतर पंथ ह्यांचा उल्लेख नाही; त्यामुळे अनेकांची अशी समजूत झाली आहे की, उपनिषदे बुद्धविचारांच्याही अगोदर उदयास

आली आहेत. शतपथ ब्राह्मणांना जोडून जी उपनिषदे लिहिली गेली आहेत, त्यातील एका उपनिषदात काशीमध्ये अजातशत्रू नावाचा राजा होऊन गेल्याचा उल्लेख आहे. त्यावरून ही समजूत खरी नाही असे म्हणता येईल; कारण हा राजा बुद्धाच्या काळात होऊन गेला व त्याच्यापेक्षा लहान होता. पण महत्त्वाची वस्तुस्थिती ही आहे की, **खिस्तपूर्व सहाव्या शतकात यज्ञ व होमहवन, बहुदेवदैवते यांच्या विरोधी ज्या अनेक विचारधारा उदयास येत होत्या, त्यापैकी उपनिषदे आहेत.** सार्वभौम एकतंत्री राजेशाहीच्या विकासाला समांतर धार्मिक विकास म्हणजे समान विधी नियम असणारा धर्म असणे साहजिकच होते. दोन्ही विकास एकाच सामाजिक गरजेतून निर्माण झाले होते. अशा धर्माचा अंमल जगातील इतर देशात शस्त्रे, युद्धे व दडपशाही ह्यांच्या जोरावर बसवला व पसरवला गेला. पण भारतातील परिस्थिती वेगळी होती. गंगेच्या खोऱ्यात दाट जंगले होती. विविध समूहांना परंपरागत धर्मविधी व देव ह्यामध्ये आपली ओळख किंवा अस्मिता दिसते; तसे वैशिष्ट्य टिकवून धरण्याची ते धडपड करतात. त्यांना भारतातील जंगलात आसरा मिळाला असता. भारतात अजूनही अनेक जमातींचे खास नियम, पूजा, विधी, प्रथा चालू आहेत. पूर्वेकडील ह्या नव्या विचारवंताचे विचार, जुन्या चालीरीती, प्रथा, दंडक ह्यांना ओलांडून जाणारे होते. ह्या विचारवंतापैकी अनेकांनी तर दुसऱ्या किंवा हलक्या समजणाऱ्या जाती-जमातीकडून अन्नग्रहण न करण्याचा दंडकही मोडून काढला. ह्या विविध विचारवंतात असे काही होते की, जे स्वतः आणि त्यांचे शिष्यगण भिक्षांदेही करून जगत, आणि जंगलामध्ये एकान्तवासात राहात. ते स्वतः कुठलीही हत्या न करता केवळ निसर्गापासून मिळणारे अन्नग्रहण करीत. काही ब्रह्मचर्य व देहदंड सोशीत. यज्ञकर्मातून संपत्ती कमावणाऱ्या अगोदरच्या लोभी पुरोहिताप्रमाणे ह्या विचारवंतांचा भार समाजावर पडत नसे. यजुर्वेदी व त्यानंतरच्या काळातले ब्राह्मण यज्ञयागातून मोठ्या देणग्यांची अपेक्षा करीत. हत्ती, खिल्लारे, रथ, सुंदर गुलाम स्त्रिया, सोनेनाणे, अशा तऱ्हेच्या दान-दक्षिणा-भेटी ह्या यज्ञयाग करणाऱ्या ब्राह्मणांना त्यावेळच्या राजांकडून मिळाल्याचे उल्लेख साहित्यात आहेत. पण विद्वान ब्राह्मण वर्गावरही ह्या त्यागी विचारधारांचा प्रभाव पडला. त्याग व साधी राहणी हे नवे आदर्श निर्माण झाले. उपनिषदातही भुकेल्या ब्राह्मणाने खालच्या जातीतील माहुता-कडून अन्नग्रहण केल्याची कथा सांगितलेली आहे. पूर्वेकडील प्रदेशात पशुबळी देण्याच्या यज्ञयागांचा खिस्तपूर्व सहाव्या शतकानंतर जवळजवळ शेवट झाला. ह्यापुढील काळातील ब्राह्मण पुढे सर्व जाती-जमातींची विविध धार्मिक कार्ये करू लागले. त्यांनी नव्या श्रद्धा व पूजापद्धती आत्मसात केल्या आणि काही श्रद्धा जुन्या पूजापद्धतीत बसवल्या. तोंडाने वेदांची 'परम पवित्र' असल्याची स्तुती चालूच राहिली, ही गोष्ट वेगळी.



## ५ : २
## मध्यममार्गीय विचारधारा

भारतीय तत्त्वज्ञानाच्या उत्तरकाळात ज्या मुख्य विचारधारा निर्माण झाल्या, त्यांची पाळेमुळे इ०स० पूर्व सहाव्या शतकातल्या परिस्थितीत आढळतात हे आपण पाहिले. अजीता (की अजीत ?) हा तत्त्वज्ञानी 'केशकंबळी' ह्या टोपणनावाने प्रसिद्ध होता. त्याने संपूर्ण 'भौतिकवादी' विचारसरणीचा पुरस्कार केला होता. त्याच्या मताप्रमाणे चांगली कृत्ये करण्याने किंवा दानधर्म करण्याने मुक्ति मिळते वगैरे सर्व खोटे होते. चांगले-वाईट, दानधर्म, दयाबुद्धी, ह्यांचा आणि माणसाच्या नशिबाचा किंवा मृत्यूनंतरच्या अवस्थेचा काही संबंध नसतो, असे विचार त्याने मांडले. 'लोकायत' विचाराबाबत चार्वाकाचे नाव सगळ्यात महत्त्वाचे मानण्यात येते आणि चार्वाकाच्या मूळ विचारांचे सर्व साहित्य आता मिळू शकत नाही. पण 'लोकायत' विचारावर 'अजीत'चा प्रभाव असल्याचे दिसून येते. ह्याच लोकायत विचारातून पुढे मगध साम्राज्यातील अत्यंत व्यवहारी अशा शासकीय तंत्राचा उगम झाला, असेही म्हणता येईल. कात्यायन ह्या विचारवंताने जमीन, पाणी, वारा आणि प्रकाश ह्या (कधीही नष्ट न होणाऱ्या) नैसर्गिक मूलतत्त्वांत सुख-दुःख आणि चैतन्यमय प्राण ह्यांचाही समावेश केला. त्याच्या विचारा-नुसार इतर नैसर्गिक मूलतत्त्वाप्रमाणे सुख-दुःख, प्राण निर्माण करता येत नाही की नष्टही करता येत नाही.

"शरीरात घुसणारे तलवारीचे पाते फक्त शरीराच्या मांसपेशी व हाडे ह्यात घुसणारे धातूचे पाते आहे." माणसाच्या चैतन्यमय 'जीवा'चा ते शेवट करू शकत नाही, असा विचार कात्यायनाने मांडला आहे. त्यातूनच पुढे न्याय—वैशिष्ट्रिक ह्या दर्शनाचा उगम झाला. ब्राह्मण गोत्रातील काश्यप ऋषीने 'सांख्य' तत्त्वज्ञानाचा पाया घातला (अर्थात ह्याबाबतही वाद आहेत.) त्याचेही मूळ विचारवाङ्मय आता नष्ट झाले आहे; पण त्याने सृष्टीचा उगम व विस्तार गुणात्मक प्रकृतीतून झाला आहे; आत्मा हा प्रकृती-पासून भिन्न असून तो केवळ साक्षी आहे, असा विचार मांडला. (भारतीय तत्त्वज्ञानावरील संशोधक देवीप्रसाद चटोपाध्याय ह्यांचे लोकायत व इतर पुस्तके जिज्ञासूंनी जरूर पाहावीत. —निवेदक) मख्खली गोसाला ह्याने ह्या कल्पनेचा विस्तार करताना आत्म्यास जन्ममरणाच्या चक्रातून पुन्हा पुन्हा जावे लागते आणि ज्या अवस्थेत तो जन्माला येतो त्या अवस्थेतील पापपुण्याचा आणि चक्रातील पुढील जन्माचा काहीच संबंध नसतो. (म्हणजे चांगल्या कृत्यानेही पुढील जन्माची मर्यादा ओलांडली जाऊ शकत नाही, की मुक्तीही मिळू शकत नाही, असा विचार मांडला) पुढे गीतेने हा विचार मोडून काढला व चाकोरीतून (अगदी स्त्रिया, वैश्य व शूद्र ह्यांनाही) मुक्त होण्याचा भक्तीमार्ग दाखवला.

जैन महावीराच्या अगोदर पार्श्व ह्या विचारवंताने सत्य, अहिंसा, अस्तेय, असंग्रह, अशी चार व्रते सांगितली आहेत. जैन महावीराने त्यात ब्रह्मचर्य ह्या पाचव्या व्रताचा समावेश केला. महावीर हा लिच्छवी ह्या क्षत्रिय घराण्यांतील होता. महावीराने बराच

काळ एकांतात चिंतन केले. पराकोटीचा देहदंड सोसला. साधूंकरिता पार्श्वाने तीन पदरी वस्त्र पांघरावयास परवानगी दिली होती. ते वस्त्रसुद्धा महावीराने सोडून दिले. तो नग्नावस्थेत राहू लागला. त्या धर्माचे उपासक पाण्यातले जीवजंतू पाणी पिण्यामुळे मरू नयेत त्याकरिता पाणी गाळून पिऊ लागले. श्वासोच्छ्वासामुळे हे जीवजंतू मरू नयेत ह्याकरिता नाकातोंडावर कापडाचा तुकडा बांधू लागले. भर उन्हात किंवा पावसात तपश्चर्या करून देहदंड सोसणे, हा केवळ जैन धर्मपंथातच नव्हे तर इतर अनेक पंथांचाही मुक्तीचा मार्ग होता. ह्याउलट गोसाला हासुद्धा नग्नावस्थेतच राही; पण नशापाणी करीत असे. त्याने विविध प्रकारांच्या सामूहिक लैंगिक आचारांचा पुरस्कार केला. अर्थात अशा आचारांचा उगम आदिवासी समाजातील यातुकर्मात व (जमीन व स्त्रिया ह्यांच्याकरिता असणाऱ्या) सुफलीकरण (पुनर्जनन] विधीत होता. नंतरच्या तंत्राचारांचा उगमही अशा सुफलीकरण विधीत होता. एक गोष्ट कधीही विसरता कामा नये, ती ही की, आपल्या समाजाच्या काही विभागात जादूटोणा, जुन्या देवतांच्या पूजापद्धती व आचार ह्यांचे कायमचे आकर्षण राहिले आहे. समाजातला जो अधिकृत आणि अधिक सुधारलेला धर्म असतो, तोसुद्धा ह्या पद्धतींचा काही प्रमाणात अंगिकार करतो. ह्या खास तांत्रिक पूजापद्धतीमुळे माणसात काही खास गुण किंवा बळ निर्माण होते असाही अनेकांचा समज असतो. गोसालाच्या काळातसुद्धा त्याच्या विरोधकांना त्याचे लैंगिक आचार बीभत्स व शरीराचे चोचले पुरवणारे वाटत होते. आदिवासी टोळ्यांचे जे वैदू होते त्यांनी जे वैद्कीय उपाय सुचवले त्याचाही परिणाम सर्वसंगपरित्याग करणाऱ्या साधूच्या जीवनपद्धतीवर आला. श्वासनिरोधन करणे, अन्नत्याग करणे किंवा आसने करणे ह्यामुळे अद्‌भुत शक्ती प्राप्त होते, असा समज निर्माण झाला होता. त्यातून पुढे योगशास्त्र निर्माण झाले. उष्ण प्रदेशात राहणाऱ्या व शारीरिक कष्टाचे काम न करणाऱ्या व्यक्तींना योगाचा फायदा जरूर मिळतो. कारण त्यामुळे शरीरातील स्नायूंवर ताबा मिळवता येतो. पण योगसाधनेमुळे अतींद्रिय सामर्थ्य होते, योग्याला उडता येते किंवा नाहीसे होता येते किंवा गूढ शक्ती प्राप्त होते, असे समज पसरवले गेले आहेत, ते चुकीचे आहेत. एका बाजूला शरीरसुखावर भर देणारे भोगवादी तर दुसऱ्या बाजूला शरीराला कष्ट देणारे कायाक्लेशवादी ह्या दोन टोकांच्या विचारसरणीचा विचार केल्यास बुद्धाचा विचार हा मध्यममार्गीय होता.

**बुद्धविचारांचा कणा म्हणजे अष्टांग मार्ग.** ह्या अष्टांग मार्गाची पहिली पायरी म्हणजे योग्य दृष्टीकोन. सर्व जग हे तृष्णा, हाव, स्वार्थ आणि त्याकरिता चालणाऱ्या लबाडीच्या व्यवहारांतून निर्माण झालेल्या दुःखाने भरलेले आहे. ही हाव, हा स्वार्थ नष्ट करणे म्हणजेच मनःशांती प्रस्थापित करणे होय. हा दृष्टीकोन अंगीकृत करणे म्हणजेच योग्य दृष्टीकोन स्वीकारणे. दुसरी पायरी म्हणजे योग्य ध्येय. दुसऱ्याची संपत्ती हिरावून घेऊन स्वतःची वाढवणे; संपत्ती आणि लालसा ह्यात रममाण होणे हे अयोग्य आहे. आपल्याबरोबर इतरांच्याही सुखाची पर्वा करणे; सर्वांवर प्रेम करण्यात आनंद पावणे; हेच ईप्सित होय; असे मानणे म्हणजेच योग्य ध्येय. तिसरी पायरी म्हणजे योग्य वाचा. खोटे बोलणे, दुसऱ्याची बदनामी करणे; कुत्सित किंवा मत्सरी बोलणे; उगाचच बडबड करणे; (इत्यादी.) ह्यामुळे समाजात भांडणे, हत्या व दुःख निर्माण होते. योग्य वाचा ही सत्यान्वित असली पाहिजे. मैत्री प्रेम पसरविणारी असली पाहिजे. चौथी पायरी योग्य कृती; चोरी, हत्या, व्यभिचार वगैरे कृती केल्यामुळे समाजाचा अधःपात होतो. म्हणून अशा कृत्यापासून दूर राहिले पाहिजे आणि समाजाचा फायदा होईल अशी कृत्ये केली पाहिजेत. योग्य साधनांनी जीवन व्यतीत करणे ही पाचवी पायरी. समाजाचे नुकसान होईल अशा साधनांच्या साहाय्याने जीवन व्यतित करणे योग्य नाही. दारू विकणे, जनावरांची हत्या करणे किंवा हत्या करणाऱ्या माणसाला जनावरे विकणे ही साधने योग्य नव्हेत. प्रामाणिकपणाने श्रम करून जगणे हाच उत्तम मार्ग होय. मनावर ताबा मिळवणे ही सहावी पायरी. दुष्ट व पापी विचार मनांत येऊ न देणे. असे विचार मनात आल्यास ते काढून टाकणे; चांगल्या विचारांची पूर्तता करण्याकडे लक्ष देणे; स्वच्छेने मानसिक शिस्त बाणवून घेणे म्हणजे मनावर ताबा मिळवणे होय. योग्य जाणीव ही सातवी पायरी. माणसाचे शरीर हे अपवित्र, अस्वच्छ वस्तुमानाने भरलेले आहे. शारीरिक लालसा आणि मानसिक ओढा ह्यामुळे पापी विचार मनात येतात, त्याची जाणीव ठेवणे म्हणजे योग्य मनन व चिंतन ती खरी योग्य जाणीव.

यावरून अगदी सहज दिसून येते की, **बौद्ध हा त्यावेळचा एक सामाजिक धर्म होता.** अष्टांग मार्गातील प्रत्येक पायरीचा बुद्धाच्या (किंवा बुद्धाच्या नावे लिहिलेल्या) प्रवचनांत विकास केला आहे. ब्रह्मचर्यासारखे कडक नियम फक्त मठात राहणाऱ्या, सर्वस्व वाहिलेल्या भिक्षूंना (भिक्खू) लागू होते. पंथाच्या सर्वसामान्य अनुयायांना ते नियम लागू नव्हते. बुद्ध मठातील व्यवहार व संघटना ही, टोळी-संघप्रधान समाजातील सभेच्या पद्धतीप्रमाणे चालवण्यात येई. खुद्द बुद्धाच्या आयुष्यात त्याच्या मठातील (संघातील) शिष्यांची संख्या पाचशेवर गेली नसेल; पण त्याला हजारो अनुयायी होते. संघाचे नियम हे 'विनय' (शिस्तीचे नियम) ह्या नावाने प्रसिद्ध आहेत आणि ते बुद्धाच्या नावे सांगितले गेले आहेत. प्रत्यक्षात बुद्धाच्या आयुष्याचा उत्तर काळात आणि त्याच्या निर्वाणानंतर ते ग्रंथित केले असावेत. खुद्द बुद्धाच्या काळातही त्याचे मूलभूत आदर्श व नियम मानणारे सहा भिक्षुक एकत्र येऊन संघ स्थापन करून संघाच्या कार्यांकरिता आपले स्वतःचे नियम बनवू शकत होते. भिक्षापात्र पाण्याचा लोटा आणि तेलाची लोटी ह्याशिवाय दुसरी कोठलीही मालमत्ता बाळगण्याचा हक्क भिक्षूंना नव्हता. नाजूक प्रकृतीच्या भिक्षुंना खडावा वापरण्यास मिळत. दुपारचे जेवण हे शिळ्या अन्नाची भेसळ करून केलेले असावे; भिक्षुकाने कुठल्याही यजमानांच्या घरात एक रात्रही राहू नये असे नियम भिक्षूंकरिता होते. (नंतर हा नियम तीन रात्रीपर्यंत सैल करण्यात आला.) भिक्षू जरी गावात भिक्षा मागीत तरी त्याचा निवास गावाबाहेर झाडांच्या खाली डोंगरातल्या गुहेत किंवा ज्या ठिकाणी माणसांची प्रेते पुरली किंवा जाळली जात किंवा पशुपक्ष्यांना खाण्याकरिता फेकली जात, अशा ठिकाणी असे.

त्या काळातील रानटी समूह अद्‌भूत शक्ती मिळवण्याकरिता मानवी मांस भक्षण किंवा इतर वामाचार करीत असत. तसे आचार करण्याच्या जागाही ह्याच असत. अशा दृश्यांनी घाबरू नये, उलट स्वतःच्या मनोबळावर अशी सर्व संकटे पार करावीत असा आदेश बुद्ध भिक्षूंना देण्यात आला आहे. बुद्ध भिक्षू हे जंगलातील प्रवासाला घाबरत नसत. अनेक वेळा ते व्यापाऱ्यांच्या जथ्थ्यांबरोबर प्रवास करीत, पण रात्र मात्र ते जथ्थाच्या तळाबाहेर घालवीत. बुद्ध भिक्षू हा फायद्याकरिता किंवा शेतीकरिता श्रम विकू शकत नव्हता. सर्वसंगपरित्याग आणि भिक्षा मागून जगणे ह्यामुळेच तो सामाजिक कर्तव्य करण्यास मोकळा राहात असे. अष्टांग मार्गाने समाजाला व जनतेला न्यावे हे बुद्ध भिक्षूचे सामाजिक कर्तव्य होते. पुनर्जन्माच्या फेऱ्यातून माणसाला मुक्त करून निर्वाणाप्रत न्यावे, हेच बुद्ध धर्माचे ध्येय होते. अर्थात 'निर्वाण' ही कल्पना गूढच राहिली; कारण तिचे विश्लेषण कधीही केले गेले नाही. आत्म्याच्या अस्तित्वाबद्दलच्या प्रश्नाला बुद्धाने उत्तर दिलेले नाही. पण पुर्नजन्म व आत्म्याचे परिभ्रमण ह्या कल्पना त्या काळच्या समाजात रुजल्या होत्या. वेद आणि उपनिषदामध्ये ह्या कल्पना नाहीत. **अगदी मागासलेल्या अदिवासी समाजांत मृत्यू पावलेला माणूस हा टोळीच्या अन्नदेवकात सामील होतो अशी कल्पना होती.** पुनर्जन्म व आत्म्याचे परिभ्रमण ह्या संकल्पना त्या कल्पनेच्या पुढील पायऱ्या होत. प्राथमिक संकल्पनेतील बुद्ध विचारांमध्ये पुनर्जन्म हा माणसांच्या कर्मावर म्हणजे चांगल्यावाईट कृत्यावर अवलंबून आहे. प्रत्येक जीव चांगले कर्म करून अधिक उच्च दर्जाच्या योनीत पुनर्जन्म घेऊ शकतो. नीच कर्म करणारा खालच्या योनीत (म्हणजे जीवाणु किंवा पशू) जन्म घेतो. चांगले केलेले कर्म गोळा केलेल्या धान्यासारखे आहे. एवढेच नव्हे तर त्याला चांगली फळे येतील असे बीज टाकल्यासारखे आहे असे बुद्धवचन आहे. एका कथेमध्ये अपकृत्य करणारा इंद्र राजा नीच योनीत जन्माला येतो व पापमुक्ती झाल्यानंतर स्वर्गात जातो. पुण्यवान मानवी व्यक्ती स्वार्गात जाऊन देवाच्या दरबारात बरोबरीने बसू लागल्या. अष्टांग मार्ग, सर्वसंगपरित्याग, विरागी जीवन तरीही मानवी जीवनाबद्दल अपरंपार करुणा आणि सर्वसामान्य माणसाला योग्य मार्ग शोधून काढण्यास मदत करणे, त्यामुळे भिक्षूंना निर्वाण मिळू शकते असे बुद्धाने शिकविले.

## ५·३
## बुद्ध आणि त्यावेळचा समाज

बुद्धाच्या काळचे सामाजिक जीवन कसे होते, ह्याचा शोध घेण्याकरिता त्याची स्वतःची जीवनकथा पाहाणे उपयुक्त होईल. अर्थात तसे करताना त्याच्या जन्माबद्दल किंवा जीवनाबद्दल ज्या अद्‌भूत दंतकथा रचलेल्या आहेत, त्यांचे पटल बाजूला सारून ती जीवनकथा लक्षात घ्यावी लागेल. बुद्धाचा जन्म शाक्य (सक्क) ह्या क्षत्रिय गणात झाला. शाक्य हे आर्य होते व आर्यभाषा बोलत. गणामध्ये ब्राह्मण नव्हते किंवा जातीभेद



निर्माण झाले नव्हते पण आर्य व दास होते. शाक्य क्षत्रिय होते. पण ते मुख्यतः शेती व्यवसायी होते. बुद्धाचा पिता ह्यानेही सर्वांच्या बरोबरीने नांगर चालवल्याची कथा आहे. शाक्य गणराज्याची राज्याच्या सिमेबाहेर ही व्यापारी केंद्रे (निगम) होती. शाक्य गणाचा प्रमुख हा क्षत्रिय कुळराजन्यांमधून आळीपाळीने निवडला जाई. ह्या वस्तूस्थितीमधून पुढे गौतम हा राजपुत्र असल्याची व परित्याग करण्याअगोदर चैनीमध्ये राहात असल्याची दंतकथा निर्माण झाली. राजन्य हे नाव गणप्रमुखपदी निवडण्यास अधिकार असणाऱ्या क्षत्रिय कुळांतील प्रत्येक पुरुषाबद्दल वापरले जाई. बुद्धाच्या काळी शाक्य जरी गणराज्य म्हणून स्वतःचा कारभार पाहात होते, तरी त्यांनी कोसल राजाचे सर्वसाधारण स्वामित्व (सुझेरेन्टी) मान्य केले होते. मृत्यूची शिक्षा देण्याचा अधिकार त्या राजाला होता. (त्यावेळी पसेनदी कोसलचा राजा होता.) त्या बाबतीत शाक्य हे त्यावेळच्या मल्ल व लिच्छवी ह्या गणराज्यापेक्षा वेगळे होते. मल्ल व लिच्छवी ही सामर्थ्यवान व लढाऊ गणराज्ये होती. त्यांनी कुणाचेही स्वामित्व मान्य केले नव्हते आणि त्यांचा सर्वोच्च प्रमुख क्षत्रिय कुळांतून पाळीपाळीने निवडला जाई. त्याची तुलना त्या काळच्या कुलगणराज्य असणाऱ्या ग्रीक गणराज्याशी करता येईल; कारण त्या गणराज्यांनीही कुणाही राजाचे स्वामित्व मान्य केले नव्हते.

भारत आणि नेपाळ ह्यांच्या सध्याच्या सरहद्दीवरील प्रदेशांत शाक्य गणराज्य होते. हा विभाग अविकसित व दरिद्री होता. त्यांच्या शेजारी 'कोळ' ह्या आदिवासी जमातीची वस्ती होती. त्यांनी बुद्धाची प्रवचने ऐकली होती व त्याच्या रक्षेचा हिस्सा मागितला होता, अशी कथा आहे. रोहिणी नदीच्या पाण्यावरून शाक्य व कोळ ह्यांच्यात संघर्ष झाला व शाक्यांनी नदीच्या पाण्यात विष टाकल्याची कथा आहे. बुद्धाचा जन्म शालवृक्षाच्या राईमध्ये झाला. शाल हे शाक्य गणाचे वृक्षदैवत होते व ते 'लुंबीनी' ह्या मातृदेवतेला प्रिय असणारे होते. बुद्धाच्या आईने—मायाने—पवित्र पुष्करिणीत स्नान केल्यानंतर बुद्धाचा जन्म झाला व बुद्धाची आई त्याचा जन्म झाल्यानंतर एका आठवड्याने वारली, अशा कथा आहेत. लुंबीनी दैवताची अजूनही त्याच जागी 'रुमिन्दी' ह्या नावाने पूजा होते. शस्त्रे चालवणे, घोड्यावरून रपेट करणे, रथ चालवणे, त्याचबरोबर गणांच्या प्रथा परंपरा सांभाळणे असे क्षत्रिय कुळांतील **राजाला** आवश्यक असे सर्व शिक्षण गौतमाने तरुणपणी घेतले. त्याचे शाक्य गणातील कच्चना ह्या स्त्रीशी लग्न झाले व त्याला राहुल नावाचा पुत्र झाला. वयाच्या २९ व्या वर्षी राहुलच्या जन्मानंतर एका वर्षाने गौतमाने घराचा व गणाचा त्याग केला; कारण नव्या विचारांचा प्रभाव गौतमावर पडला. जीवनातील दुःखाचा उगम कोणता व ते नष्ट कसे करावे हे शोधून काढण्याची आच त्याला लागली. त्याने मुंडण केले. संन्यास घेतला व तो मानवमुक्तीच्या मार्गांचा शोध घेण्याकरिता बाहेर पडला. सहा वर्षे त्याने अनेक विचारवन्त व उपासकाकडून मार्गदर्शन घेतले. प्रत्यक्ष प्रयोग केले; पण त्याचे समाधान झाले नाही. प्रथम त्याने भिक्षू वृत्ती स्वीकारली; पण पुढे तर लोकवस्तीपासून दूर जंगलात जाऊन आत्यंतिक

शारीरिक क्लेश असणारी उपासनाही केली. शेवटी गयेपासून जवळ निरंजरा नदीच्या काठी पिंपळ वृक्षाच्या खाली ध्यानस्थ असता, त्याला सत्याचा आविष्कार झाला. त्या पिंपळ वृक्षालाच बोधी वृक्ष म्हणतात. ही जागा पुढे जगातील सर्व बौद्धधर्मीयांच्या यात्रेची जागा झाली. ह्या बोधी वृक्षाच्या फांद्या टिकठिकाणी नेऊन लावण्यात आल्या.

बुद्धाचे पहिले प्रवचन बनारसजवळील सारनाथ येथे झाले. त्या प्रवचनाच्या वेळी बुद्धाने आत्यंतिक कडक उपासना सोडल्याबद्दल रागावून दूर गेलेले शिष्य होते. त्याचे पुढील पंचेचाळीस वर्षांचे आयुष्य हे पायी भ्रमन्ती व प्रवचने करीत आपला संदेश पोचवण्यामध्येच खर्च झाले. कधी कधी बुद्ध एखाद्या सामाजिक प्रश्नाचा विचार करण्याकरिता एकांतवासात जात असे. उतारवयामध्ये त्याचा आनंद हा शिष्य त्याच्या बरोबर त्याची काळजी घेण्याकरिता राहू लागला, ह्या आनंदानेच पुढे आपल्या आठवणी-प्रमाणे बुद्धाची विविध वचने एकत्र केली असे बौद्ध धर्म परंपरेत मानले जाते. बुद्धाच्या आयुष्याच्या काळात त्याच्या वचनांचे लिखाण झाले नव्हते. कोसल देशाची राजधानी श्रावस्ती (सावत्थी) येथे बुद्धाने इतर कोणत्याही ठिकाणापेक्षा जास्त प्रवचने केली आहेत. बुद्धाची भ्रमंती ही मुख्यत: कोसल प्रदेशात झाली. यमुनेच्या तीरावरील मथुरेपर्यंत तो बहुधा पोहोचलेला नाही. पण बुद्धाने कुरुप्रदेशाला एकापेक्षा अधिक वेळा भेट दिली आहे. तसेच त्या विरुद्ध दिशेने असलेल्या गंगेच्या दक्षिणेस असलेल्या व नव्याने लागवडीखाली आलेल्या दक्षिणगिरी (दक्खिनागिरी) प्रदेशांनाही बुद्धाने भेट दिली आहे. तसे करताना बुद्ध वारंवार राजगीर व गया ह्या प्रदेशातून गेलेला आहे. बुद्ध दिसायला कसा होता ह्याबद्दल निश्चित माहिती नाही. त्यावेळी काढलेले चित्र किंवा शिल्प नाही. [तो खरा सर्वसंगपरित्यागी होता.–तेव्हा हे साहजिकच] हजारो वर्षे बुद्ध हा बोधीवृक्ष, पावलांच्या खुणा, धर्मचक्र अशा खुणांनीच प्रतीत होत होता. पुढे बुद्ध धर्माची भरभराट झाल्यानंतर व त्या धर्माला राजा व श्रेष्ठी ह्यांचा आश्रय मिळाल्यानतर प्रतिभाशाली कलावंतांनी त्याच्या मूर्ती बनवल्या. सतत भ्रमंती करण्यामुळे बुद्ध काटक झाला होता. बुद्धाने वयाच्या ७९व्या वर्षी पाटण्याजवळ गंगेचे पात्र पोहून ओलांडले असल्याचे नमूद झाले आहे. अत्यंत उतारवयात स्वतःच्या शरीराबद्दल 'कशीबशी एकत्र असलेली झिजून गेलेली गाडी' असे काहीशा चेष्टेने त्याने उद्‌गार काढले आहेत. राजगीरपासून श्रावस्ती येथे जात असता मल्ल गणराज्याच्या 'कुसिनारा' ह्या मुख्य ठाण्याला त्याचे निर्वाण झाले.

बुद्धाचे आयुष्य हे संकटे व रोमांचकारक घटनांनी भरलेले आहे. दक्षिणगिरी प्रदेशात तसेच मथुरेजवळ यक्ष देवता मानणारे दुष्ट समूह होते ते अपरिचित प्रवाशांना गूढ प्रश्न विचारीत व त्यांना उत्तरे देता न आल्यास त्यांना आपल्या देवतेला बळी देत असत. बुद्धाने असे रक्तपाती यज्ञविधी सोडण्यास त्यांचे मन वळवले. बिंबीसार राजाने आगळे रूप असणाऱ्या ह्या भिक्षूला तो क्षत्रिय आहे; आणि शस्त्रविद्येत निष्णात आहे हे जाणून सेनापतीपद बहाल केले; आणि बुद्धाने ते नाकारल्यावरही दोघांचे संबंध सलोख्याचे



राहिले. मागंदिय ह्या ब्राह्मणाने बुद्धाची जात वेगळी असतानाही आणि त्याने आजन्म ब्रह्मचर्याची शपथ घेतली असतानाही आपल्या रूपवती कन्येशी त्याने विवाह करावा अशी विनंती केली. बुद्धाने अर्थातच ती नाकारली. त्या कन्येने आपला अपमान झाला म्हणून आयुष्यभर बुद्धाशी वैर केले. पुढे तिचे लग्न एका युवराजाशी झाले व तिने सूड उगवण्याचा प्रयत्न केला. इत विरोधी विचारसरणींच्या उपासकांनी त्याच्यावर आरोपही केले. अंगुलीमाल नावाच्या वाटसरूंचे जीव घेणाऱ्या दरोडेखोराचे बुद्धाने हृदयपरिवर्तन घडवून आणले. तो संघात सामील झाला व एक भिक्षू म्हणून निर्वाणाप्रत गेला. सुदत्त नावाच्या एका श्रीमंत व्यापाऱ्याने (ज्याला अनाथपिंडीका असेही म्हणत) जेता ह्या युवराजाकडून झाडांची राई विकत घेतली व पावसाळ्याच्या दिवसात बुद्ध व त्याचे अनुयायी ह्यांना निवासस्थान म्हणून अर्पण केली. ही आमराई घेताना त्याने सबंध आमराईभर चांदीची नाणी पसरवून ती विकत घेतली. अनेक गृहपती व्यापारी व इतर स्त्री-पुरुष बुद्धाची प्रवचने ऐकत व त्या प्रवचनांमधून सर्वसामान्य नागरिकांची कर्तव्ये, चांगले कर्म व त्यामुळे मिळणारा उत्तम दर्जाचा पुनर्जन्म ऐकून ते तृप्त होत, अशा अनेक कथा आहेत. सर्वात भुरळ पाडणारी गोड कथा आहे ती एका दाम्पत्याबद्दलची. बरीच वर्षे सुखाने संसार केलेल्या ह्या दाम्पत्याला पुढील जन्मी पुन्हा पतिपत्नी व्हायचे होते त्यांनी बुद्धाला कोणती उपासना करावी ते विचारले. बुद्धाने त्याना सांसारिक आयुष्यातील विविध लहानसहान कर्तव्ये करीत निष्पाप आयुष्य जगण्यास सांगितले. सारिपुत्र व मोग्गलान हे बुद्धाचे ब्राह्मण शिष्य त्या काळी बुद्धापेक्षाही जास्त प्रसिद्ध असणाऱ्या समजय ह्यास सोडून संघात सामील झाले. संघाची प्राथमिक संघटना बनवण्यात व सुरवातीची वाढ करण्यात त्यांचा फार मोठा हातभार लागलेला आहे. त्याशिवाय इतर क्षेत्रातील अनुयायीसुद्धा बुद्धाला मिळाले. 'उपाली' हा नापिक एका संघाचा प्रमुख होता. बुद्धाचा चुलत भाऊ देवदत्त ह्यास भिक्षू संघामध्ये अधिक कडक शिस्त हवी होती व जनसंपर्क नको होता; पण बुद्धाने त्यास नकार दिला. बुद्धाचा खून करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप त्याच्यावर केला गेला आहे. ज्यांना खुद्द बुद्धाने संघात सामील करून घेतले असे अनेक भिक्षू हे कनिष्ठ वर्णियातून आले होते व ते संघात महत्त्वाच्या पदाला पोहोचले. मगध आणि कोसल दोन्ही प्रदेशाचे सार्वभौम राजे बुद्धाचा आदरपूर्वक सन्मान करीत व दोन्ही सार्वभौम राजांनी त्या धर्माला अश्रय दिला होता; पण राजे, श्रीमंत व्यापारी, श्रेष्ठी ह्यांच्याबरोबर 'कुंड' ह्या लोहारा-सारख्या सामान्य माणसालाही प्रवचनामध्ये स्थान मिळत असे. बुद्ध धर्मांच्या प्रसारावर व त्या काळच्या परिस्थितीवर काही प्रकाश टाकणारी 'सुत्तनिपात'मधील एक कथा येथे सांगण्यासारखी आहे. कोसल राज्यातील एक ब्राह्मण बावटी हा काही अनुयायांसह श्रावस्ती सोडून दक्षिणपथावरील मुळा व गोदावरी ह्यांच्या संगमावरील प्रदेशात नवी वस्ती स्थापन करावयास गेला त्या प्रदेशात 'घोडा' हे पशुदैवत मानणाऱ्या आदिवासींची वस्ती होती. (ह्या आदिवासी जमातीमधून पुढे नागरीकरण झाल्यानंतर शांतवाहन ह्या कुलाचा विकास झाला) हे आदिवासी प्रथम जंगली धान्ये मुळे, खोडे असे अन्न गोळा करून खाऊन

राहात. हळूहळू ह्या ठिकाणी एका ग्रामाचा उदय झाला. त्या ठिकाणी बावरीने वैदिक पद्धतीने यज्ञ केला. यज्ञामधील दान दक्षिणा संपल्यानंतर तेथे एक ब्राह्मण आला व त्याला देण्याकरिता काही न उरल्यामुळे त्याने बावरीला शाप दिला. त्यावेळी बुद्धाची कीर्ती तेथपर्यंत पसरली होती त्या शापाचा प्रतिकूल परिणाम फक्त गौतम बुद्धच नष्ट करू शकेल असा विश्वास वाटून बावरीने आपले सोळा अनुयायी बुद्धाला भेटण्यास पाठवले. (त्यांचा प्रवासमार्ग महत्त्वाचा आहे) हे शिष्य प्रथम पैठण येथे गेले. नंतर ते व्यापाऱ्याच्या जत्थ्याबरोबर औरंगाबाद ओलांडून नर्मदेवरील महेश्वर येथे गेले. तेथून उज्जैन, गोनध्धा (गोंड प्रदेशातील अनोळखी ठाणे) भिल्सा, कोसंबी, साकेत (फैजाबाद) सावत्थी अशा ठिकाणांना भेटी देत ते उत्तरपथाच्या पूर्वेकडील असणाऱ्या सेतव्य कपिलवस्तू (शाक्यांची राजधानी) कुसीनारा, पावा, (दोन्ही मल्ल गणराज्यांची ठाणे) भोगानगर वेशाली अशा ठिकाणांना भेटी देत राजगीरला गेले तेथील त्या नगराच्या बाहेरील दगडी गुहेमध्ये ते बुद्धास भेटले. त्यांनी बुद्धास अनेक प्रश्न विचारले, त्यातील काही असे आहेत. ह्या जगाचे आवरण कसले आहे ? ह्या जीवनातील परस्परविरोधी प्रवाहातून माणसाने कुठला धडा घ्यावा ? साधु, क्षत्रिय, ब्राह्मण व इतरेजन ह्यांच्यावर देवाला बळी देण्याबाबतीत कोणते निर्बंध आहेत, खरा साधू कोण ? जो तत्त्वज्ञानी आहे तो की ज्याला वैदिक यज्ञविधीची संपूर्ण माहिती आहे तो ? जो स्वतःला लालसा आणि संशय ह्यांतून मुक्त करून घेतो, त्याला मिळणाऱ्या मुक्तीचे स्वरूप काय ? हे प्रश्न सुरुवातीच्या उपनिषदात उपस्थित केलेल्या प्रश्नासारखेच आहेत.

ह्या कथेमध्ये पैठण हे श्रावस्ती हा दक्षिण व्यापार मार्ग निटपणे आखून दिला आहे. त्या काळी कोसल हे मगधापेक्षा जास्त महत्त्वाचे होते. गोदावरी नदीच्या तीरावर खिस्तपूर्व सहाव्या शतकाच्या मध्यापर्यंत शेतीचा प्रसार झाला नव्हता. **त्यानंतर शेती व ग्राम ह्यांचा प्रसार बऱ्याच झपाट्याने झाला. कारण लोखंडाचा उपयोग व उत्तरेकडून आलेल्या जड नांगराचा उपयोग करण्यात** येऊ लागला. दक्षिणेकडील प्रदेश प्राग ऐतिहासिक काळांतून ऐतिहासिक काळात साधारणपणे बुद्धाच्या काळापासून प्रवेश करू लागले. असे वरील कथेवरून दिसते. नर्मदेवरील महेश्वर व गोदावरी जवळील नेवासा येथे जे उत्खनन झाले आहे त्यावरून ह्या निष्कर्षाला दुजोरा मिळतो. दक्षिणेकडील ब्राह्मणांनी नेवासे ते प्रयारासंगम ही भूमी नेहमीच पवित्र मानली असल्याची नोंद इतिहासात वारंवार आढळते. इसवीसन तेराव्या शतकात **आळंदीच्या** ब्राह्मणांकडून होणाऱ्या छळापासून मुक्त होण्याकरिता ज्ञानेश्वराने नेवासे येथील आश्रय घेतला होता. ह्या ठिकाणी त्याने आपले गीतेवरील भाष्य 'ज्ञानेश्वरी' लिहिली. ह्या ज्ञानेश्वरीमुळे मराठी भाषेला आजचा आकार मिळाला आहे. **गीतेतील** त्याच्या ह्या भाष्यांतून सर्व जातीमधील संत कवींना स्फूर्ती मिळाली आहे, हे खरे असले तरी हेसुद्धा लक्षात ठेवले पाहिजे की, दक्षिणेकडे शेतीचा असा विकास झाला नसता तर गीतेवर भाष्य लिहिण्याची जरूरीच निर्माण झाली नसती.



बौद्ध धर्मग्रंथात गृहपती व शेतकरी ह्यांची कर्तव्ये सांगितली आहेत. ही कर्तव्ये जात, संपत्ती किंवा व्यवसायनिरपेक्ष आहेत. ब्राह्मण ग्रंथाप्रमाणे करावयाचे विधी व रूढाचार ह्यांचे मात्र स्तोम नाही. उलट ब्राह्मण ग्रंथात सांगितलेल्या नियमित व खास प्रसंगी करावयाच्या विधी-उपचारांविरुद्ध अत्यंत सोप्या शब्दात सुटसुटीतपणे विवेचन केले आहे. 'जातीची प्रतिष्ठा व भेद प्रत्यक्षात जरी अस्तित्वात असले तरी ते कायम स्वरूपाचे असू नयेत, कारण त्याला नैतिक किंवा तात्त्विक आधार नाही. ते भेद काही कायमचे असणारे नाहीत. सत् प्रवृत्त आयुष्य जगण्याकरिता विधी रूढाचारांची गरज नाही. चांगले शुद्ध जीवन व विधी रूढाचार ह्यांचा अर्थाअर्थी काही संबंध नाही' अशी मांडणी बौद्ध साहित्यात केली आहे. मूळ बुद्धधर्म ग्रंथ हे मुख्यत: बुद्धाची प्रवचने व संवाद आहेत; ते नेहमीच्या साध्या सरळ भाषेत लिहिलेले आहेत. त्यामध्ये गूढ आणि लांबलचक आधिभौतिक कल्पनांचा खेळ मांडलेला नाही. सर्व समाजाला उद्देशून लिहिलेले ते नव्या तऱ्हेचे आगळे असे धर्मसाहित्य होते. केवळ काही थोडे तथाकथित विद्वान किंवा त्यांचे अनुयायी ह्यांच्यापुरते ते साहित्य मर्यादित नव्हते. सगळ्यात महत्त्वाची गोष्ट ही की, बुद्धाने (किंवा त्याच्या अगदी सुरुवातीच्या कोणा अनामिक शिष्याने) 'चक्रवर्ती राजाची नवी कर्तव्ये सांगण्याचे धाष्टर्य केलेले आहे.' 'लुटारू आणि दरोडेखोर ह्यांचा त्रास असलेल्या प्रदेशात निव्वळ कर वसूल करीत राहणारा राजा त्याचे कर्तव्य पार न पाडणारा राजा होय' असे परखड भाष्य त्याने केलेले आहे. त्याचबरोबर दरोडेखोरी, लूटमार व अंतर्गत सामाजिक संघर्ष केवळ दहशत आणि कडक शिक्षा ह्यांनी बंद करता येणार नाहीत. **सामाजिक अनीती व दुष्कृत्ये ह्यांचे मूळ दारिद्र्य व बेकारी ह्यात आहे.** अशी परिस्थिती केवळ दानधर्म करून बदलता येत नाही. उलट दानधर्म व देणग्या ह्यामुळे अनीती व दुष्कृत्ये ह्यांना उत्तेजनच मिळते. अशा परिस्थितीवरील खरा उपाय हा आहे की, राजाने शेती व पशुपालन करू इच्छिणाऱ्यांना बी–बियाणे व धान्य ह्यांचा पुरवठा करावा. ज्यांना व्यापार करावयाचा असेल त्यांना भांडवल पुरवावे. राजाने आपल्या सेवकांना पुरेसा पगार तोही वेळेवर द्यावा म्हणजे जानपदांना लुटण्याचे विविध मार्ग शोधून काढण्याच्या भानगडीत ते पडणार नाहीत. संपत्ती निर्माण करण्याने व जानपदांना संपन्न करण्यानेच त्याची ठगांपासून मुक्तता होईल. उद्योगप्रधान व सुखी समाजातच नागरिकांना आपल्या मुलांना नीटपणे मोठे करता येते. राजाने आपल्या उर्वरित संपत्तीचा विनियोग करण्याचा सर्वात चांगला मार्ग म्हणजे कल्याणकारी सार्वजनिक कामे करणे हा होय, अशा सार्वजनिक कामात विहिरी खणणे, तळी बांधणे, व्यापारमार्गावर झाडांच्या राया बांधणे इत्यादींचा समावेश असावा. '(इत्यादी इत्यादी)'. **चक्रवर्ती राजाची ही कर्तव्ये म्हणजे अर्थशास्त्रातील दृष्टीकोन आहे.** ज्यावेळी समाज वैदिक यज्ञ करणाऱ्या टोळीसंघ समाजापासून घनदाट जंगले साफ करून एका प्रादेशिक समाजाकडे वाटचाल करीत होता, तेव्हा अशा प्रकारचा दृष्टीकोन मांडणे ही केवळ विलक्षण बौद्धिक झेप आहे. ह्या नव्या विचारधारेमध्ये काहीही त्रुटी असल्या तरी (त्याअगोदर

संपूर्ण अगतिक समजल्या जाणाऱ्या) माणसाचा स्वत:च्या जीवनावर काही ताबा आहे असे ह्या विचारधारेत सांगितले गेले. अर्थात ही विचारधारा–माणूस शास्त्रीय ज्ञान व तांत्रिक प्रगती ह्यांच्या जोरावर निसर्गावर सतत वाढते नियंत्रण करू शकतो–हे सांगू शकली नाही की अशा नियंत्रणामुळे निर्माण होणाऱ्या सुखसंपत्तीचे वाटप सर्व मानव-समाजात होऊ शकते हे सांगू शकली नाही. त्या काळचा समाज प्रगतीचा जो टप्पा होता त्यामध्ये हे शक्यच नव्हते.

जेव्हा एका अनामिक गावी बुद्धाचे निर्वाण झाले तेव्हा शाक्य गणाचा नि:पात केला गेला होता. त्याला आश्रय देणारे दोन्ही सार्वभौम राजे अत्यंत विपन्नावस्थेत मेले होते. सारिपुत्र मोग्गालान्न हे दोन्ही शिष्योत्तम निर्वाणाला गेले होते. त्यांची विचारधारा मृत्यूनंतर बराच काळ प्रसार पावली व विकसित होत गेली; कारण त्यावेळी उदयास येणाऱ्या समाजाच्या गरजांच्या दृष्टीने ती अत्यंत सुयोग्य होती.

## ५·४
## कृष्ण आणि त्याचा भक्तिपंथ

अगदी विसाव्या शतकापर्यंत भारतातील लाखो सामान्य जनांचा खरा धर्म म्हणून टिकून राहिला तो बुद्धधर्म नव्हे तर कृष्णाचा भक्तिपंथ होय. कृष्ण हा सगुण परमेश्वर आहे. संकट काळी त्याचा धावा करता येतो. बुद्ध जरी मानवी धर्माची शिकवणूक सांगणारा महान् उपदेशक असला तरी कृष्णाप्रमाणे त्याचा धावा करता येत नाही. कृष्ण व बुद्ध ह्यांच्या व्यक्तिमत्वांत जागोजागी परस्परविरोध आहे. पण तरीही कृष्णाच्या नावाने सांगण्यात येणाऱ्या अनेक विचारधारा ह्या बुद्धधर्माकडून घेतल्या गेलेल्या आहेत. कृष्णाची अभिधाने भगवत्, नरोत्तम, पुरुषोत्तम हीसुद्धा बुद्धापासून घेतलेली आहेत. बुद्ध ही इतिहासात होऊन गेलेली व्यक्ती आहे, तर कृष्णाबद्दल अनेक कथा, दंतकथा, काव्ये, महाकाव्ये पुराणे इत्यादीमध्ये उल्लेख असले तरी एक किंवा अनेक कृष्ण होऊन गेल्याचा ऐतिहासिक पुरावा सापडत नाही. **कृष्णाबद्दल जे विविध उल्लेख आहेत त्यांचे संकलित स्वरूप म्हणजे त्याची बहुरंगी, बहुढंगी अत्यंत व्यापक आणि परस्पर-विरोधी गुणांनी युक्त अशी प्रतिमा.** प्रत्यक्षात एका मानव धर्माचे शिक्षण देणाऱ्या बुद्धाच्या व्यक्तिमत्वावर कथा-दंतकथांचे जसे आवरण पडले गेले तसा त्या धर्माचा ऱ्हास झाला. पण कृष्णाची प्रतिमा ही कथा-दंतकथांमधील त्याच्या अतिमानवी व दैवी स्वरूपावरच आधारलेली होती व जसजशी त्यामध्ये वाढ होऊ लागली तरी तसतसे त्याच्या एकत्रित परिणामामुळे कृष्णभक्ती संप्रदायाचा व्याप वाढला आहे. बुद्धाच्या प्रवचनाची भाषा साधी व सुटसुटीत आहे. त्याच्या विवेचनात एक तर्कशुद्धता आहे, तशी तर्कशुद्धता किंवा साधेपणा कृष्णाच्या नावाने सांगण्यात येणाऱ्या तत्त्वज्ञानात नाही. कृष्णाच्या नावाने जी गीता सांगितली गेली आहे, त्यातील संस्कृत अत्यंत उच्च दर्जाचे आहे आणि परस्परविसंगत विचार इतक्या खुबीदार पद्धतीने गुंफलेले आहेत की, त्याचा



वाचक कोणत्याही कृत्याची तरफदारी, त्यामुळे होणाऱ्या परिणामांची जबाबदारी झटकून टाकून करू शकतो.

कृष्णाच्या प्रतिमेतून साकार होणारे व्यक्तिमत्त्व बहुरंगी व परस्परविसंगत गुणदोषांनी भरलेले आहे. कृष्ण हा दैवी गुण असणारा मोहक व लाडका बालक आहे, खट्याळ गुराखी आहे, गोपींचा प्रेमिक आहे, अनेक स्त्रियांचा पती आहे, तरी राधेबरोबरच त्याचे गूढ मीलन झालेले आहे. एका बाजूला तो निवृत्ती धर्माचा प्रणेता आहे, चिरंतन शांतीचे प्रतीक आहे; तरीही दुसऱ्या बाजूला हाच श्रीकृष्ण स्वत:चा मामा कंस त्याचा वध करणारा आहे, दुसऱ्याच्या घरी यज्ञप्रसंगी पाहुणा असलेल्या शिशुपालाचे डोके उड-विणारा आहे. नीतिमत्तेचा मूळ स्त्रोत्र कृष्णाच्या नावे सांगण्यात येतो, पण भारतीय युद्धात कठिण प्रसंगी कृष्णाने दिलेला सल्ला मात्र सभ्यता, शिष्टाचार व औदार्याशी विसंगत आहे. श्रद्धाळू माणूस किती विसंगत गोष्टी पचवू शकतो, याचे कृष्णगाथा हे उत्तम उदाहरण आहे. भगवत्–गीतेमधील परस्परविरोधी विधानांमधून जो संधिसाधु शहाजोगपणा दिसतो, त्याला कृष्णाच्या परस्परविरोधी प्रतिमेची पार्श्वभूमी आहे. मागासलेली उत्पादन साधने वापरणाऱ्या विविध गटसमूहांच्या एकत्रीकरणातून निर्माण झालेल्या सामाजिक संबंधांचे प्रतिबिंब गीतेमध्ये पडलेले दिसते.

कृष्णाबद्दलच्या कथांची जडणघडण इसवीसनानंतर म्हणजे रामानुजांच्या वैष्णव धर्माच्या उत्कर्षापर्यंत चालू होती. आपण फक्त इ. स. पूर्व चौथ्या शतकापर्यंतचा विकास पाहू. कृष्णाचे खास वैशिष्ट्य म्हणजे चक्र. तो चक्रपाणी आहे. मिर्झापूर जिल्ह्यांतील बौद्ध-वाङ्मयातील दख्खिनगिरी गुहेमधील चित्रांत रथ चालविणारा माणूस चक्राने आदिवासींवर हल्ला करीत असल्याचे चित्र आहे. चक्राबद्दल एवढाच पुरावा उत्खननांत सापडला आहे. हा पुरावा इसवीसनपूर्व आठव्या शतकांतील असावा. कारण त्यावेळेस बनारस येथे आर्यांनी आपली पहिली वसाहत केली होती. हे रथ चालविणारे आर्य असावेत व लोखंडाच्या शोधाकरिता गंगेपलीकडच्या खोऱ्यात जात असावेत. हे चित्रसुद्धा काळ्या कडव्या लोखंडाची माती वापरून काढलेले आहेत. चक्र हे वेदांतील आर्यांचे शस्त्र नाही आणि बुद्धाच्या काळांत त्याचा वापर बंद झाला होता.

**ऋग्वेदांतील कृष्ण हा इंद्राचा शत्रू व दानव आहे.** ऋग्वेदांतील ही उपाधी कोणा एका व्यक्तीची नसून सावळ्या किंवा काळ्या रंगाच्या इंद्राशी लढणाऱ्या समूहाची आहे. त्याचबरोबर ह्या जुन्या वेदांमध्ये यदू (यादव) हे पाच मुख्य आर्य टोळ्यांपैकी (पंच जन:) एक आहेत आणि 'कृष्णकथा' तो यादव प्रमुख असल्याच्या पायावर रचलेल्या आहेत. वेदांमधील ऋचा गाणारे कधी यदूची स्तुती करताना आढळतात तर कधी त्यांना दूषणे देताना आढळतात. अर्थात पंजाबमधील आर्य टोळ्यांच्या आपसा-तील झगड्यांत ह्या ऋचा म्हणणारे ते ऋषी कोठल्या बाजूने होते, ह्यांवर अवलंबून असणार. कृष्ण हा अंधकवृष्णी कुळांतील सात्वत वंशाचा असल्याचेही सांगितले गेले आहे व त्याचा मामा कंस ह्याच्यापासून त्याचे रक्षण करण्याकरिता त्याला बालपणी जवळच्या

गोकुळांमध्ये (म्हणजे गुराख्यांच्या संघ वा श्रेणीमध्ये) वाढविलेला आहे. बालपणीच त्याला पळवून नेल्यामुळे कृष्ण 'अभिर' ह्या गोपालन करणाऱ्या निम भटक्या टोळीमध्ये वाढला. अभिर हे आज अहिर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या जातींचे पूर्वज होत. कंसाची बहीण देवकी व तिचा नवरा वासुदेव ह्यांना अटकेत टाकले होते. तरीसुद्धा आपल्या दैवी सामर्थ्यामुळे कृष्ण गोकुळाला जाऊ शकला. त्याने बालपणीच इंद्रापासून गुरांचे रक्षण केले. यमुनेच्या डोहामध्ये असलेल्या व त्यामुळे ते पाणी पिण्यास अयोग्य करणाऱ्या 'कालीया' या विषारी नागाचा पराभव करून कृष्णाने त्याला घालवून दिले. कृष्ण व बलराम ह्यांनी कंसाचा वध करण्यापूर्वी त्याच्या मल्लांना चीत केले, अशा अनेक दंतकथा आहेत. या दंतकथांच्या संदर्भात हे लक्षात ठेवले पाहिजे की, अनेक आदिवासी जमातीमध्ये बहिणीचा मुलगा ह्या प्रमुख पदाचा वारसदार असे व त्याला अगोदरच्या प्रमुखाचा पराभव किंवा नायनाट करून ते पद घ्यावे लागे. ह्या परंपरेची छाया ह्या दंतकथेवर पडलेली आहे. स्वत:च्या संघसमाजाबाहेर कृष्णाचा संबंध मातृदेवता मानणाऱ्या आदिवासी टोळ्यांशी आला. पुतनेची कथा अशा आदिवासी समूहांच्या पराभवातून निर्माण झाली असणार ! अजूनही पुतना ही देवी रोग आणणारी देवता समजली जाते. मथुरा प्रदेशाचा काही भाग पुतनेच्या नावाने आणखी ओळखला जातो. ज्या गोकुळात बालकृष्ण वाढला ते गोकुळ वृंदावन येथे कायमचे वस्तीला गेले. वृंदावन या शब्दाचा अर्थ 'गणांच्या देवतेचे रान' असा आहे. अजूनही कृष्णाचे लग्न ह्या देवतेचे चिन्ह 'तुलसी' ह्या छोट्याशा औषधी झुडुपाशी लावले जाते. दरवर्षी लग्न लावण्याची प्रथा सुरू झाली, ह्याचा अर्थ हा की, मातृदैवतांची जी मानवी प्रतिनिधी किंवा समूहप्रमुखांची सखी असे, तिचा बळी देण्याची प्रथा होती, ती कृष्णाने बंद केली.

कृष्णाचे अनेक मातृदैवतांशी विवाह झाले आहेत. त्याच्या बायकांची संख्या सोळा सहस्र एकशे आठ असल्याचे सांगितले जाते. त्यांत अनेक अप्सरा आहेत, तर काही मातृदेवता अगदी जुन्या आर्यपूर्व जमातीच्या आहेत. **उदा.** जांबवती ही अस्वल पशुदेवक मानणाऱ्या टोळीप्रमुखाची मुलगी आहे. त्यावरून त्या जमातीचे यादवांशी किंवा आर्यांशी झालेल्या समन्वयांचे निदर्शन होते. 'रुक्मिणी' ही भोज ह्या त्यावेळी जंगली असणाऱ्या आदिवासी जमातीमधील आहे. कृष्णाच्या अनेक बायका ह्या अप्सरा आहेत. अप्सरा ह्या मातृदैवते मानणाऱ्या जमातींच्या इतिहासाच्या निदर्शक आहेत. ह्या सर्व संबंधातून कृष्णभक्ती हा त्या त्या जमातींचे जे पंथ होते, त्यांना मागे सारून सहजरीत्या कशी पसरत गेली हे दिसून येते. तथाकथित महाभारत युद्धानंतर छत्तीस वर्षांनी यदुवंशाचा यादवी युद्धात नाश झाल्याची कथा आहे. पण कृष्णभक्ती व तो पंथ त्यानंतरही सतत वाढत होता. इसवीसनाच्या सहाव्या शतकात मथुरेवर शूरसेनांचा ताबा होता हे सर्वांना ज्ञात आहे. त्यांचा यादवाशी काहीही संबंध नसला तरी मथुरा हे केंद्र असणारा कृष्णपंथ त्यांनी वाढवला (मध्ययुगांतील जाधव घराण्यांना प्रतिष्ठा प्राप्त करून देण्यासाठी ब्राह्मणांनी त्यांची वंशपरंपरा यादवापर्यंत नेऊन भिडविली) कृष्णाचे



विवाह पुरुषप्रधान आर्य व मातृप्रधान आर्यपूर्व समूह ह्यांच्या एकत्र होण्याच्या प्रक्रियेतील महत्त्वाचे पुढे पडलेले पाऊल दर्शविते. हे लक्षात ठेवले पाहिजे की, अन्न गोळा करून राहणाऱ्याचे जसे अन्न निर्माण करणाऱ्या समाजात परिवर्तन होते, तसे काही काळाकरिता अन्न निर्माण करणाऱ्यांचा अन्न गोळा करणाऱ्यांमध्येही ऱ्हास होऊ शकतो. ह्या दोन्ही प्रक्रियेत दोन किंवा विविध समाजांचे एकत्रीकरण होते व एकमेकांच्या देवदेवता आपल्याशा करून ते शक्य केले जाते. देवतांच्या विवाहाबद्दल ज्या दंतकथा असतात त्यामध्ये अशा एकत्रीकरणाचे प्रतिबिंब पडलेले असते. त्यातून निर्माण होणारा समाज निसर्गावर अधिक नियंत्रण मिळविणारा व अधिक उत्पादक समाज असतो.

कृष्णभक्ती व कृष्णपंथ वाढण्याची प्रक्रिया महाभारतामधील आणखी काही कथांवरून दिसून येते. एक कथा आहे—कृष्णाने इंद्रापासून गोकुळातल्या खिल्लारांचे रक्षण केल्याची दुसरी कथा ही पांडवांनी कृष्णाच्या मदतीने खांडव वन जाळीत असताना इंद्राने केलेल्या. नागांच्या संरक्षणाची. दोन्ही कथा एकाच महाभारतात आहेत. महाभारताच्या मूळ कथासूत्राशी कृष्णाचा प्रत्यक्ष संबंध नाही. तो महाभारताच्या नंतरच्या विकासात आला आहे. ऋग्वेदातील (याअगोदर सांगितलेले) यदूंचे अनिश्चित स्थान व कृष्णाचा काळा रंग लक्षात घेता, कृष्णासंबंधीच्या कथा ह्या जशा आर्य व आर्येतर संघगण समाजाच्या मिश्रणातून पुढे आल्या असाव्यात; तशाच नागासंबंधीच्या परस्परविरोधी कथा ह्या आर्य व आर्यपूर्व आदिवासी समूह ह्यांच्यातील संघर्ष व सम्मीलन दाखविणाऱ्या आहेत. कृष्ण व इंद्र यांच्याबद्दलच्या दोन्ही तऱ्हेच्या कथा ऐकणारे लोक अशा दोन तऱ्हेच्या समूहांतून आलेले असल्याशिवाय एकाच महाभारतात त्यांचा अंतर्भाव होणे शक्य नाही. इद्राशी झालेल्या संघर्षाबद्दलचा कृष्णकथेचा नोंद घेण्यासारखा परिणाम झाला आहे. खिस्तपूर्व चवथ्या शतकात ग्रीकांचे आक्रमण झाले, त्या ग्रीकांनी अशी नोंद केली आहे की, पंजाबमधील सपाटीवर राहणाऱ्या लोकांत हेराक्लसची पूजा केली जाते. तर पहाडी प्रदेशात डायनॉसीसची. ग्रीकांचा हेराक्लस देव भारतीय कृष्णासारखा आहे. हेराक्लस सूर्याच्या प्रखरतेने काळा पडलेला बलदंड मल्ल आहे. त्यानेही कालीयासारख्या बहुमुखी सापाचा वध केलेला आहे. कृष्णाप्रमाणेच त्यानेसुद्धा अनेक स्त्रिया व अप्सरांशी विवाह केलेले आहेत. कृष्णाचा मृत्यू हा तर भारतीय कथांपेक्षा ग्रीक कथांशी अधिक जवळचा आहे. जरस या सावत्र भावाने मारलेला विषारी बाण पायाच्या तळव्याला लागून कृष्णाचा मृत्यू ओढवला अशी कथा आहे. अशी जखम मृत्यूस कशी कारणीभूत झाली, असा प्रश्न भारतीयांना पडेल, पण ग्रीक पुराणांमध्ये अखिल्स व इतर जुन्या महापुरुषांचा मृत्यू असाच झाल्याचे सांगितले गेले आहे. अगदी जुन्या ग्रीक समाजामध्ये मानवी बळी देताना भावाकडून विषारी बाण मारून बळी देण्याची जी प्रथा होती, त्याचे प्रतिबिंब ग्रीक पुराणातील कथांवर पडलेले आहे. दुसरा ग्रीकांचा देव 'दिऑन्युसस्' हा भारतीय इंद्रासारखा आहे. (सबंध ऋग्वेदांत इंद्र हा भरपूर सोम पिणारा व सतत लढाया करणारा देव आहे.) ग्रीकांनी त्यांच्या ग्रंथांत जे उल्लेख केले आहेत त्याचा अर्थपूर्ण संदर्भ लक्षात

घेतला गेलेला दिसत नाही. त्याचा अर्थ असा की, ग्रीकांचे आक्रमण होण्याच्या काळात पंजाबमधील उत्तम लागवडीखाली आलेल्या प्रदेशामधील शेती व्यवसायाची समाजांमध्ये इंद्रभक्तीचा लोप होऊन कृष्णभक्तीचा प्रसार झाला.

इंद्राची जागा कृष्णाने घेण्याचा ऐतिहासिक क्रम केव्हा झाला, याबद्दल निश्चित व तपशीलवार माहिती नाही; पण त्याची कारणे मात्र अगदी सहज समजण्यासारखी आहेत. मुख्यतः पशुपालन करणाऱ्या भटक्या निमभटक्या समाजाचे परिवर्तन शेती व्यवसायायी समाजांत होत होते. वेदांतील पशुबळी किंवा तत्सम यज्ञविधी आणि टोळीसंघातील संघर्ष ही परिस्थिती जुन्या समाजाशी सुसंगत होती. पण शेती व्यवसायी समाजाला मात्र असे विधी व परिस्थिती परवडण्यासारखी नव्हती. अशा समाजाच्या विकासाला अडचण आणणारी होती. कृष्ण हा गुराढोराचा संरक्षणकर्ता होता. इंद्र, वरुण व वेदांतील इतर देव पशुबळी असणाऱ्या वैदिक यज्ञविधींशी संबंधित होते. भटक्या निमभटक्या टोळ्या जेव्हा शेती व्यवसायाकडे वळू लागल्या तेव्हा त्यांनी इंद्राला सोडून कृष्णाला जवळ केले.

त्याचप्रमाणे ज्या आर्यपूर्व जमाती होत्या, त्या आर्यांकडून शेती व्यवसाय शिकत होत्या. आपापल्या मातृदेवतांची पूजा राखून ठेवून आणि आपल्या देवतांना कृष्णाच्या बायका ठरवून त्यांना आर्यांशी सम्मीलन करणे सोपे गेले. कृष्णाचा भाऊ बलराम हासुद्धा शेतकऱ्याचा देव आहे. त्याला 'संकर्षण' असे नाव आहे व 'नांगर' हे त्याचे शस्त्र आहे. बलराम हा केवळ शेतकऱ्यांचाच नव्हे तर आदिवासी नागांचाही देव आहे. कृष्ण हा विष्णूचा तर बलराम हा शेषशायी नागाचा अवतार मानला जातो. बुद्धाबद्दलच्या दंतकथासुद्धा नागांचा संदर्भ सोडू शकत नाहीत. बुद्धाने जंगली नागांना आपल्या धर्मात घेतले; विषारी नागांना माणसाळवले; नैसर्गिक आपत्तीपासून मुसिलिंदा नावाच्या नागाचे बुद्धाचे संरक्षण केले; इत्यादी कथा आहेत. त्याशिवाय बुद्ध हा पूर्वजन्मी एक सुशील नाग असल्याचीसुद्धा कथा आहे. प्रश्न असा निर्माण होतो की, ह्या सर्व रानटी जाती-जमातींनी आपला नसलेला देव पूजण्यास सुरुवात का केली असावी? उत्तर असे असू शकेल की, पूर्वेकडील मगध साम्राज्याच्या आक्रमणामुळे पश्चिमेकडे सरकणाऱ्या आदिवासी जमाती व तेथील यदुवंशीय लोक ह्यांचा त्या काळी संगम झाला असावा.

त्या काळात स्वतःला आर्य समजणाऱ्या लोकांच्या जीवनपद्धतीमध्ये मुलभूत फरक होऊ लागले होते. गंगेच्या खोऱ्यातील ब्राह्मण व क्षत्रिय उत्तरापथावरील वायव्येकडे असणाऱ्या तक्षिला येथे किंवा त्यापलीकडेही उच्च शिक्षण घेण्याकरिता जाऊ लागले होते. या उच्च शिक्षणामध्ये यज्ञ, मंत्रोच्चार, आर्यांचे शिष्टाचार, वैद्यकी, शुद्ध संस्कृत भाषेचे शिक्षण इत्यादींचा समावेश होता. पूर्वेकडील व्यापारी व्यवसायात असलेल्या आर्यांनी आपल्या व्यापारमार्गावरील इतर आदिवासी समूहाबरोबर साधीसुधी बोलीभाषा वापरण्यास सुरुवात केली होती. या भाषेचा उगम जरी संस्कृत भाषेपासून झालेला असला तरी वैदिक उच्चारांची आणि व्याकरणाची शुद्धता याबद्दल फारसा आग्रह नव्हता. अस्पष्ट उच्चार, अशुद्ध व्याकरण, गावठी हेल व शिवराळपणा ह्यामुळे या भाषेची पश्चिमेकडील



लोक थट्टा करीत असत. तरीसुद्धा तक्षिला व आसपासच्या प्रदेशातील गुरुकुलांत येथील विद्यार्थ्यांना त्यांच्या जातीबद्दल किंवा कुळांबद्दल फारशी चौकशी न होता प्रवेश मिळत असे. हे उपनिषदे व बौद्ध साहित्यांवरून दिसून येते. सरहद्दीवरील वरिष्ठ वर्णीय हे गोऱ्या रंगाचे होते, तर गंगेच्या खोऱ्यांतील व पूर्वेकडचे ब्राह्मण हे अधिकाधिक श्यामल वर्णीय होऊ लागले होते. 'काळ्या रंगाचा बाजारातील काळ्या वाटाण्यांच्या ढिगासारखा दिसणारा माणूस' ब्राह्मण असेल असा विश्वास बाळगणे त्यांना जड जाई. त्याच वेळी पूर्वेकडील ब्राह्मण मात्र काळ्या रंगाचा बुद्धिमान पुत्र व्हावा याकरिता बृहदारण्यकोपनिषदात सांगितलेले गुंतागुंतीचे विधी करण्यास तयार होत असे. पूर्वेकडील प्रदेशात एकदा का दुसरा माणूस हा आपल्या जातीचा आहे, हे कळले की, त्याच्या रंगाचा विटाळ मानला जात नसे. कुठल्याही रंगाच्या स्त्रीच्या सौंदर्याची स्तुती केली जाई. उत्तरेकडे जातीपातींची बंधने इतकी शिथिल होती की, पूर्वेकडील लोक मद्र, गांधार, कंबोज येथील लोकांना भ्रष्ट व रानटी समजू लागले. त्या प्रदेशात खरे तर फक्त दोनच जाती होत्या. एक आर्य म्हणजे स्वतंत्र असलेले व दुसरी दास; म्हणजे गुलाम असलेली. प्रत्यक्षात ह्या जाती नसून ते वर्गच होते. पण दास स्वतंत्र होऊ शकत व आर्य कर्जबाजारी झाल्यास किंवा इतर कारणपरत्वे दासही होत. म्हणूनच एका वर्गातील व्यक्ती दुसऱ्या वर्गात फारसा धार्मिक गाजावाजा न होता प्रवेश करू शकत असे. याचा अर्थ असा आहे की, कडक थंडी असणाऱ्या ह्या प्रदेशात जेथे अन्न गोळा करून राहणे अशक्य होते आणि अन्नोत्पादनाशिवाय गत्यंतर नव्हते, अशा प्रदेशांत गुलामगिरी पद्धतीचा विकास झाला होता. ही पद्धती अनेक बाबतीत ग्रेकोरोमन गुलामगिरीच्या पद्धतीशी सुसंगत तुलना करण्यासारखी होती. पूर्वेकडील प्रदेशात गुलामगिरी नव्हती; पण विविध व्यवसायांवर आधारलेली, अधिकाधिक कडक होत जाणारी जाती पद्धती विकसित होत होती. कुरु प्रदेशांच्या पूर्वेकडील ब्राह्मण, नागांशी केलेला विवाह एक वेळ खपवून घेत, पण पेशावर किंवा बाल्ख येथील कुटुंबातील एक भाऊ पुरोहित तर दुसरा भाऊ शेतकरी तर तिसरा योद्धा किंवा न्हावी असणे हे त्यांना धक्कादायक वाटे. तेथे हे भाऊ कुठलाही संकोच न बाळगता एकमेकांची कामेसुद्धा करीत. सरहद्दीवरील प्रदेशातील स्त्रियांना वागणुकीत अधिक मोकळेपणा असे. आजही सुसंस्कृत भारतीय कुटुंबामध्ये स्त्रियांनी परकीयांसमोर विनयशीलता दाखवावी. घरातील श्रेष्ठ पुरुषांसमोर फार नम्रतेने वागावे, अशी अपेक्षा केली जाते. परंतु सरहद्दीवरील तत्कालीन स्त्रिया ही बंधने पाळीत नसत. स्त्री-पुरुष एकत्र मांसभक्षण व मद्यपान करीत. उत्सवप्रसंगी बेहोष होऊन अर्धनग्नावस्थेत नाचही करीत. पूर्वेकडील ब्राह्मणांना असे वर्तन अश्लाघ्य वाटे. वधूच्या पित्याला किंमत देण्याची आणि स्त्रीचे हरण करून तिच्याशी विवाह करण्याची प्रथा त्यांना घृणास्पद वाटे. (महाभारतामधील कृष्ण व त्याच्या वंशांत तशी प्रथा होती. मध्ययुगीन अभिरांमध्येही ती चालू होती.) ह्या दोन्ही पद्धतीचे विवाह पुढे ब्राह्मण ग्रंथात अनार्य ठरवून निषिद्ध ठरविण्यात आले. तरीसुद्धा मद्र व बाल्हिक येथील स्त्रिया, सौंदर्य, प्रेमळ वृत्ती व पतिनिष्ठा ह्या गुणांबद्दल आख्यायिका रचण्याइतक्या

प्रख्यात होत्या. या प्रदेशांतील काही योद्धयांच्या विधवा पतीच्या शवाबरोबर सती जात असत. सतीची घृणास्पद चाल पूर्वेकडील प्रदेशांत इसवीसनाच्या सहाव्या शतकापर्यंत म्हणजे सरंजामदारीचा उदय होईपर्यंत अस्तित्वात आली नाही. पश्चिमेकडील लोकांची पूर्वेकडील स्वत:ला शहाणे व वेगळे समजणाऱ्या लोकांबद्दल काय भावना होती, याबद्दल कोठेही नोंद नाही. पण पूर्वेकडील खालच्या जातीतील साहसी युवक पश्चिमेकडे प्रवास करून ब्राह्मणांच्या सर्व युक्त्या-प्रयुक्त्या शिकून येत व जेथे त्यांचे कूळ माहीत नसे, अशा प्रदेशात ब्राह्मण म्हणून मान्यता मिळवीत हे दिसून येते. सरहद्दीवरील प्रदेशांतील त्यांचे गुरुजन त्यांच्या जातीबंधनाच्या बाबतीत दुर्लक्ष करीत, त्यामुळे हे शक्य होई. अर्थात जातीबंधने प्रत्यक्षात व्यवसायाधिष्ठित अशी प्राथमिक वर्गवारी होती. त्यापेक्षा अधिक अर्थ त्याला प्राप्त झाला नव्हता.

उत्तरापथावरील व्यापारी चांगलाच वाढला होता. बुद्धाला अंतर्ज्ञान प्राप्त झाल्यानंतर आठ आठवड्यांच्या आतच त्याचे अनुयायी झालेले प्रवासी तप्पुसा व भल्लुका हे दोघे भाऊ व्यापारी होते. ते उत्तरापथावरील ओरिसाहून बुद्धगयेमार्गे राजगीरला चालले होते. त्यांच्या नावांवरून ते धातूंच्या व्यापारात असावे असे दिसते. सुरुवातीलाच बुद्ध भिक्षू होणाऱ्यांत कप्फीन नावाचा तरतरीत व धारदार नाकाचा काश्मीरमधील क्षत्रिय होता. तक्षिलेचा राजा पुक्कुस म्हातारपणी मगध देशाला भेट देण्याकरिता पहिल्याप्रथमच जात असता मृत्यू पावला. त्याआधी आठ दिवस अगोदर त्याने बुद्धाची भेट घेतली होती. गाईने शिंगे भोसकून त्याला ठार केले, अशी आख्यायिका आहे. अशा बहुस्तरीय समाजाला एकत्र बांधणारा दुवा कोणता होता ? **हा समाज काही विविध संघ समूहांचे एकत्रीकरण नव्हते, प्रादेशिक समाजाचे स्वरूप त्याला आले होते. केवळ त्याला सांधणारा दुवा समान धर्म विधींचा किंवा समान भाषेचा नव्हता, तर सर्वांच्या सामान्य गरजा व त्या भागविण्याकरिता एकमेकांत होणारा विनिमय हा होता.** पूर्वेकडील प्रदेशात ज्या विचारधारा निर्माण झाल्या, त्यांचा प्रादुर्भाव हा उत्तरापथ व दक्षिणापथ ह्या व्यापार मार्गामुळे जो व्यापारविनिमय वाढला, त्यामुळेच झाला. एवढ्या विस्तारित प्रदेशात पसरलेले आर्य व त्यांच्याशी संबंधित मिश्र जाती—जमाती ह्यांना व्यापारी उत्पादनाने एकत्र बांधले होते. आर्यांचे मूळ वैदिक विधी व भाषा ह्यांचा पगडा नव्या परिस्थितीच्या परिसरात कमी होत चालला. नव्या देवदेवता व नवे धर्मपंथ ह्यांचा प्रभाव पडू लागला.

## कोसल व मगध

समाजव्यवस्थेचा केंद्रबिंदू टोळी-संघ न मानता त्यापलीकडे जाऊन प्रादेशिक समाजाचा विचार करणाऱ्या तत्त्वप्रणालीचा उद्भव खिस्तपूर्व सहाव्या शतकात झाला, हे आपण पाहिले. त्याच काळात प्रादेशिक शासनाचा विचार करणाऱ्या राजकीय प्रवाहांचा उदयही याच काळात झाला. सबंध प्रादेशिक समाजाकरिता एक समान धर्म व एक समान शासन या रोखाने एकाच वेळी धर्म व समाजव्यवस्था ह्या दोन्ही क्षेत्रात जी समांतर गती



चालली होती, **त्याचा वर्गीय पाया एकच होता.** तो म्हणजे नव्या शेती व्यवसथी समाज व्यवस्थेतील गृहपती, (श्रीमंत शेतकरी, बडा व्यापारी, श्रेणी-संचालक) शेतकरी, व्यापारी ह्या वर्गांच्या नव्या गरजा पुरविण्याचा. बुद्ध किंवा जैन धर्मीय संस्थापकांनी सांगितलेली विचारसरणी या उदयोन्मुख वर्गाच्या हिताची असली तरी त्यांना आरले संघ व मठ ह्यांची संघटना जुन्याच गणपद्धतीच्या पायावर उभी करणे साहजिक वाटले. पण नव्या तऱ्हेच्या शासनसंस्थेचा विचार करणाऱ्या विचारवंतांना मात्र टोळी-संघपद्धती किंवा गणपद्धतीमधून निर्माण होणारी विविध समूहातील अलगता मोडून काढण्याकरिता सार्वभौम एकतंत्री राजेशाहीची स्थापना करण्याचा एकच उपाय दिसला. अशी राजेशाही टोळीसमूह व्यवस्था किंवा गणव्यवस्था निर्घृणपणे मोडून काढून सबंध समाजाला नव्या समान राजकीय व सामाजिक व्यवस्थेखाली आणू शकत होती. ह्या काळात सार्वभौम राजसत्ता स्थापन करण्याकरिता प्रदीर्घ काळ जे संघर्ष झाले, त्यामागेनिर्घृणपणे व्यवहार व डावपेच सांगणारी, कुठलाही पर्याय नाकारणारी तर्कशुद्ध व पद्धतशीर राजकीय विचार-सरणी होती. त्यामध्ये नीतिमत्तेचे ढोंग नव्हते, की दुसऱ्याचे भले करण्याचा आव नव्हता. राजकारणाला सैद्धांतिक पाया देणारे हे विचारवंत त्या काळच्या धर्मप्रवर्तकांइतकेच ऐतिहासिक महत्त्वाचे आहेत. त्यांची बौद्धिक कुवत तेवढीच मोठी होती. **त्यांची नावे 'कौटिल्याचे अर्थशास्त्र' या एकाच ग्रंथात आढळतात.**

अर्थशास्त्र हा तशा अनेक ग्रंथांपैकी शेवटचा व कदाचित सगळ्यांत महत्त्वाचा असावा. त्याच विषयावरील अनेक ग्रंथांतील निष्कर्षांचे एकत्रीकरण त्यात आहे. अर्थशास्त्राचा विचार आपण पुढील प्रकरणांत करू. पण अर्थशास्त्र लिहिताना ज्या अनेक विचारवंतांचा अभ्यास कौटिल्याने केलेला आहे, त्यांची नावे थक्क करणारी आहेत. भारद्वाज, कात्यायन, पराशर, उशन, बृहस्पती इत्यादी नावे ब्राह्मण ग्रंथकर्त्यांची असावीत. त्याशिवाय 'बहुंदतीचा पुत्र', किंजलक कौनपदंत, पिषुण, विशालाक्ष, वातव्याधि, दीर्घकारायण, इत्यादी नावे क्षत्रिय ग्रंथकर्त्यांची आहेत. त्यातील सर्वात महत्त्वाचा पंथ 'अंभी' याचा आहे. अर्थशास्त्राने ज्यांच्याकडून परंपरा घेतली त्याची संपूर्ण यादी दिलेली नाही. अर्थशास्त्रामध्ये ह्या विचार-वंताच्या संपूर्ण विचारांचा अभ्यास नाही; पण संदर्भ आवश्यक असेल त्या ठिकाणी त्या त्या विचारवंताच्या दृष्टीकोनाचा उल्लेख करून एखादा न्यायाधीश ज्याप्रमाणे अगोदर दिलेल्या निकालाची अभ्यासपूर्ण छाननी करतो तशी छाननी केली आहे. ह्या विविध ग्रंथकर्त्यांच्या अस्तित्वाचा काळ दिलेला नाही; अर्थात हे समजण्यासारखे आहे. धर्म वेत्यांना आपल्या तत्त्वज्ञानावर प्रवचने देऊन लोकांची मने जिंकावयाची होती. याउलट शासनव्यवस्थेवरील सल्लामसलत काही थोड्या राज्यकर्त्यांना दिलेली होती. ती गुप्त ठेवूनच अधिक प्रभावी ठरणार होती. खिस्तपूर्व सहाव्या शतकातील सर्वसंगपरित्याग करणारे भिक्षू, धर्मवेत्ते हे भारतात नंतरच्या काळात ज्यांचा सुळसुळाट झाला अशा परोपजीवी संन्याशांपेक्षा किंवा मठाधिपतींपेक्षा कितीतरी उच्च दर्जाचे होते; कारण त्या संन्यस्त भिक्षू धर्मवेत्यांनी संबंध भारतीय समाजाचे टोळी-संघबद्ध समूह जीवनापासून ते प्रादेशिक

समाजापर्यंत (फ्रॉम ट्राईब टु सोसायटी) जे परिवर्तन झाले त्याला फार मोठा हातभार लावला आहे. सर्वभौम राजेशाहीकडे वाटचाल होत असताना लढाया, कट-कारस्थाने, खुनाखुनी, भाऊबंदकी आणि जुन्या श्रद्धांना धक्का बसणे, अशा अनेक गोष्टी घडल्या. पण त्या घटना नव्या समाजरचनेच्या गरजांतून घडल्या. पुढे मध्ययुगीन एकतंत्री हुकूमशाहीत बदल होतानाही तशाच घटना घडलेल्या आहेत. पण फरक हा होता की, मध्ययुगीन हुकुमशाहीमधील बदल केवळ वरच्या स्तरांवर घडणारे बदल होते. त्यामुळे समाजरचनेचा पाया बदलला नाही.

इसवीसनपूर्व सातव्या शतकाच्या काळांत भारतात परंपरागत अशी सोळा जानपदे होती. यापैकी ख्रिस्तपूर्व सहाव्या शतकाचा शेवट व पाचव्या शतकाचा उदय होण्याच्या काळात सार्वभौम राजेशाहीकरिता जो अखेरचा संघर्ष झाला, त्या काळापर्यंत चार जानपदे आपले महत्त्व टिकवू शकली. त्यापैकी लिच्छवी किंवा वज्जी आणि मल्ल ही दोन जानपदे एकतंत्री राजसत्ता न मानणारी कुलगणराज्ये होती. (म्हणजे गणराज्याचे अधिकार हे ठराविक क्षत्रिय कुळांकडे सामूहिकरीत्या होते. त्यांचा ज्येष्ठ नेता पाळीपाळीने किंवा स्पर्धेने किंवा इतर मार्गाने निवडला जाई.) ही दोन गणराज्ये आपल्या 'सभे'-मार्फत जानपदाचा कारभार करीत. सतत कवायती करून आपले लष्करी सामर्थ्य टिकवून धरीत. त्यांचा कारभार समान घटकांना समान वागणूक ह्या अलिखित पण निश्चित तत्त्वावर चालत असे. दोन्ही गणांमध्ये कुलगणराज्ये होती; तशीच शेती व इतर व्यवसाय करणारी मंडळीसुद्धा होती. शेती व इतर व्यवसाय करणाऱ्यांचे स्थान दुय्यम होते. (शेती करणारे सर्वच गणसभासद नसत.) दोन्ही गणांतील विविध राजन्य हे ह्या काळांत संपत्ती बाळगू लागले होते. त्यामुळे त्यांच्यात उच्च-नीच भेद निर्माण होऊ लागले होते. लिच्छवी गणाचे मुख्य नगर व सभेची जागा 'वैशाली' होती. मल्लगणाच्या विविध शाखा होत्या, त्यापैकी दोन मुख्य नगरे पावा व कुसिनारा ही होती. हे दोन्ही गण जरूर पडे तेव्हा मोठे सैन्य उभे करू शकत होते. ख्रिस्तपूर्व पाचव्या शतकाच्या सुरुवातीला ह्या दोन्ही गणराज्यांनी संघराज्य स्थापन केले होते. एकतर ह्या संघराज्याला नवा प्रदेश पादाक्रांत करावा लागणार होता किंवा आपले स्वातंत्र्य गमवावे लागणार होते अशी परिस्थिती निर्माण झाली होती. दुसरा पर्याय नव्हता. नेपाळ सरहद्दीच्या दक्षिणेकडून चंपारण्य जिल्ह्यातून गंगेपर्यंत व गंगेच्या दुसऱ्या तीरावरील लोखंड व तांब्याच्या खाणीपर्यंत जाणारा जो उत्तरापथ होता, त्या मार्गाचा काही भाग या दोन गणराज्यांनी व्यापला होता. त्यांच्या वायव्येकडे कोसल राजसत्ता होती. इतर सोळा जानपदांप्रमाणे कोसल व मगध हीसुद्धा अगोदर टोळी संघ किंवा गणराज्येच होती, हे त्यांचा उल्लेख नेहमी अनेकवचनी केला जातो, त्यावरून दिसून येते. ब्राह्मण ग्रंथामध्ये मागध ही मिश्र किंवा वर्णसंकरातून निर्माण झालेली जात असल्याचे सांगितले गेले. [मनुस्मृती १०·२६·२९] मागध ही जात व्यवसायाने भाट व व्यापारी असल्याचाही उल्लेख आहे. जानपद या शब्दाचा मूळ अर्थ म्हणजे टोळी-संघाचे किंवा गणाचे वसतिस्थान हा होता



पुढे देश, राज्य, जिल्हा अशा अर्थाने तो रूढ झाला, त्यावरून गंगेच्या खोऱ्यांमध्ये कसा विकास झाला हे दिसून येते.

ख्रिस्तपूर्व सहाव्या शतकातील आर्य किंवा आर्यसंस्कृती आत्मसात केलेले संघ–समाज यांच्या गणव्यवस्थेत एक महत्त्वाचा फरक होता. आर्गिव्ह बोएशिअन्स, लॅसिडेमोनियन्स इत्यादी ग्रीक गणराज्यांत जमिनीच्या खाजगी मालकीचा पूर्ण विकास झाला होता. भारताच्या मानाने ग्रीकांकडे कमी जमीन व ती कमी पिकाऊ होती. भारतात मात्र जमीन मुबलक असून लागवड पाळीपाळीने केलेल्या तुकड्यात होत असे. ह्या काळात गणांची जमीन सामाजिक मालकीची होती. गणसभेला जमिनीची कसवणूक एका कुटुंबाकडून दुसऱ्या कुटुंबाकडे देण्याचा अधिकार होता. याउलट ज्या सार्वभौम राजेशाहीचा उदय होत होता त्याचे अस्तित्व हे खाजगी जमिनीची सातत्याने कसवणूक करण्यामधून निश्चितपणे येणाऱ्या कर-महसुलीवर अवलंबून होते.

कोसल व मगध ह्या दोन राजेशाहीमध्ये कोसल हे जुने व ख्रिस्तपूर्व सहाव्या शतकापर्यंत अधिक सामर्थ्यवान होते. त्याचे मुख्य ठाणे किंवा नगर सावत्थी (श्रावस्ती) हे होते. पण त्यापूर्वीचेही जुने मुख्य स्थान मात्र दक्षिणेस साकेत हे असावे. साकेत म्हणजेच अयोध्या, जेथून रामायण या महाकाव्यांचा नायक 'राम' हा त्या काळापर्यंतच्या अज्ञात प्रदेशात राज्य सोडून निघून गेला. त्याच्या अज्ञातवासातील प्रवासाचा मार्ग हा नंतर 'दक्षिणापथ' या व्यापारमार्गापर्यंत पोचला. बावरीच्या बाबत उपलब्ध माहितीप्रमाणे सावत्थी हे ठिकाण इ. स. पूर्व सहाव्या शतकातील दोन मुख्य व्यापारमार्ग जेथे भेटतात, अशा ठिकाणी आहे. त्याशिवाय कोसल राजाने 'काशी' (बनारस) हे जानपद बऱ्याच लढाया करून जिंकल्यानंतर गंगेच्या प्रवाहावरील वाहतुकींवर त्यांची सत्ता प्रस्थापित झाली. काशीवरील विजय इ. स. पूर्व सातव्या शतकातील असावा, कारण त्यानंतर काशी या गणसंघ-समाजाविषयी काहीच उल्लेख आढळत नाही. काशीच्या ब्रह्मदत्त नावाच्या सद्‌गुणी राजाविषयी आख्यायिका आहेत. त्यावरून व उत्खननातील पुराव्यांवरून काशी हे ऐतिहासिक महत्त्वाचे नगर होते, हे दिसून येते. गंगेच्या तीरावरील बंदर या नात्याने 'काशी' नगराला एवढे महत्त्व होते की, नंतर कोसल राज्याचा उल्लेख 'काशी कोसला' असा केलेला आहे. काशीची सुती व रेशमी वस्त्रे त्यावेळीही प्रसिद्ध होती व काशीच्या कषाय रंगाच्या कफन्या बुद्ध भिक्षू परिधान करीत. या काळातसुद्धा प्रचंड धैर्य असलेले उपक्रमशील नाविक गंगेतून समुद्रापर्यंत जाऊन व्यापार करीत असावेत. सुरुवातीला मुख्यत: हा व्यापार मिठाचा असून चांगला फायदेशीर असावा. मगध राज्य मात्र व्यापार मार्गाच्या दृष्टीने काही इतक्या मोक्याच्या ठिकाणी नव्हते. ते गंगेच्या तीराच्या पलीकडे आणि मुख्य व्यापारमार्गाला असणारा आडमार्ग जंगलात जेथे जवळजवळ नाहीसा होतो, अशा ठिकाणी होते. पण भारतीय इतिहासात पहिले एकतंत्री सार्वभौम राज्य होण्याचा मान पटकावणाऱ्या ह्या जानपदांच्या ताब्यात व्यापारमार्गापेक्षाही अधिक महत्त्वाच्या गोष्टीचा ताबा होता. महत्त्वाच्या धातूंच्या पुरवठ्यावर ह्या राज्याचा ताबा

होता. ह्या राज्याची त्यावेळची राजधानी राजगीर येथे त्यापूर्वीही आर्यांचे सर्वांत जुने ठाणे होते. त्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे राजगीरजवळील टेकड्यांमध्ये लोखंड सहज-गत्या उपलब्ध होते. तेथील खडकांतील कच्चे लोह खोल खाणी केल्याशिवाय खडकांतील दगड तासून काढता येई व दगडी कोळशांच्या भट्टीवर वितळवता येऊन त्याची साधने किंवा भांडी बनविता येत असत. राजगीरच्या ठाण्याबाबत आणखी एक महत्त्वाची बाजू ही की, त्याच्या भोवती टेकड्या होत्या व त्याशिवाय फार पूर्वीपासून आर्यांनी वादळापासून संरक्षण होईल अशा जवळजवळ पंचवीस मैल लांबीच्या दगडी भिंती उभारून त्याच्या संरक्षणाची व्यवस्था केलेली होती. या बंदिस्त जागेमध्ये गरम व थंड झऱ्यापासून पाणी मिळण्याची व्यवस्था होती. चराऊ कुरणाच्या उपलब्धतेमुळे वाईट हवामान असतानाही हे ठाणे बऱ्याच काळपर्यंत सांभाळता येत असे. राजगीरच्या आग्नेयेस 'गया' ही मगधांची बऱ्याच अगोदरपासूनची वसाहत होती. गयेच्या पलीकडे जंगले होती व त्या जंगलातून धाडसी साहसप्रिय व्यापारी कच्च्या लोखंडाच्या शोधार्थ आग्नेय दिशेने राजगीरच्या पलीकडे असलेल्या टेकड्यांच्या प्रदेशात जात असत. कच्चे लोखंड त्याच ठिकाणी वितळवून गंगेच्या मध्यवर्ती खोऱ्यात व्यापार करण्याकरिता आणले जाई. लोखंडाचा हा प्रदेश शेती करण्याच्या दृष्टीने फारसा फायदेशीर नव्हता. परंतु मगध साम्राज्याच्या सत्तेची वाढ होण्याकरिता लोखंडाच्या उपलब्धतेचा फार उपयोग झाला. कारण या सत्तेने लोखंडाच्या कुऱ्हाडींचा उपयोग करून गंगेच्या खोऱ्यातील जंगले साफ करून तेथील जमिनी लागवडीखाली आणल्या.

या काळातील सोळा जानपदांची नावे माहीत आहेत; परंतु केवळ त्यांचाच विचार करून चालणार नाही. साफ न केलेल्या जंगलामधून अन्न गोळा करून जगणाऱ्या दगडी कुऱ्हाडींचा (पाषाण मुग्गर) वापर करणाऱ्या अनेक छोट्या रानटी जमाती राहत होत्या. जथ्यांनी प्रवास करणाऱ्या फिरत्या व्यापारांचा व्यापार कालानुक्रमे जसा पसरू लागला, तसा ह्या व्यापारांना अशा टोळ्यांपासून असणारा धोका वाढू लागला. दोन जानपदांमधील प्रदेशात अंतर असे व त्यातील जंगलामधून प्रवास करताना व्यापारी सशस्त्र संरक्षक घेत असत. शाक्य ह्या तशा लहानच असणाऱ्या गणाची आपल्याला माहिती झाली, कारण त्या गणामध्ये भगवान बुद्धाचा जन्म झाला. अल्लाकप्प येथील 'बुली' या टोळीने बुद्धाच्या रक्षेचा काही भाग आपल्याला मिळावा, अशी मागणी केल्याचे नमूद झाले आहे. मिथिला हे जानपद व एका नगराचे नाव इतिहासात नमूद झाले आहे; पण त्या संघ-समाज संघाचे अस्तित्व ह्या काळापर्यंत नष्ट झाले होते. त्या संघ-समाजाचा शेवटचा इक्ष्वाकू वंशातील राजा सुमित्र बुद्धजन्माच्या काळाच्या आसपास मृत्यू पावला असल्याचे दिसते. कोसल राज्याने 'मिथिला' आपल्या साम्राज्याला जोडण्याअगोदर मिथिलेने विदेह राज्य काबीज केले किंवा ती राज्ये कोसल साम्राज्याने काबीज केल्यानंतर जोडली गेली; पण इसवीसनापूर्वी सहाव्या शतकात या दोन्ही संघाचे वा गणांचे स्वतंत्र अस्तित्व नष्ट झाले होते. त्याचप्रमाणे 'अंग' हे स्वतंत्र गणराज्यसुद्धा मगध साम्राज्याने ह्या



काळापर्यंत काबीज केले होते. अंगांचे मुख्य ठाणे 'चंपा' (भागलपूर) याचे महत्त्व इतके कमी झाले की, त्याला एका छोट्या ग्रामाचा दर्जा प्राप्त झाला व बिंबिसार राजाने यज्ञामध्ये ते गाव एका ब्राह्मणाला दान दिले.

त्या काळातील सामाजिक व सांस्कृतिक विकासाच्या दृष्टीने या गण-राज्यांपेक्षा जास्त महत्त्व व्यापाऱ्यांच्या हालचालीला आहे. त्यांना 'सार्थवाह' किंवा 'वैदेहिक' म्हटले जाई. विदेहाचे ते 'वैदेहिक' असा अर्थ करीत. व्यापार व्यवसाय जरी आता कोणतीही एक टोळी किंवा जानपदांपुरताच मर्यादित नसला आणि या काळापर्यंत 'विदेह' जान-पदाचे स्वतंत्र अस्तित्व नष्ट झाले असले तरी त्या नावावरून एके काळी 'वैदेहिक' हा टोळी-संघसमाज मुख्यत: व्यापार करणारी श्रेणी होती असे दिसून येते. व्यापार करणारे जथ्थे हे तक्षिलेपासून (तक्षशिला) ते मगध साम्राज्याच्या अगदी शेवटच्या टोकापर्यंत साखळीसारखे पसरले होते. त्यातील अधिक साहसी व्यापारी तर माहिती झालेल्या जानपदांच्या पलीकडे दक्षिणेकडे जाऊन व्यापार करीत. आता हा व्यापार केवळ दोस्ती झालेल्या दोन टोळी-संघांच्या सुरुवातीच्या व्यापारासारखा केवळ वस्तूंची देवघेव करण्याचा विनिमय राहिला नव्हता. (कदाचित् काही रानटी टोळ्यांपुरता तो त्या पद्धतीने चाललाही असेल.) **ख्रिस्तपूर्व सातव्या शतकाचा अखेर होण्यापूर्वीच नाण्यांचा वापर व्यापारात सुरू झाला होता, हे त्या त्या काळांतील नाण्यांवरून दिसून येते. ह्या चांदीच्या नाण्याला कर्षापण असे म्हणत.** मगध देशात त्याचे वजन ३.५ ग्राम इतके होते. कोसलमध्ये जी नाणी सापडली आहेत, तिचे वजन त्याच्या ३/४ इतके आहे. ह्या वजनाचा संबंध सिंधू संस्कृतीशी जाऊन भिडतो. कारण या वजनाची दगडी वजने मोहेंजोदारो येथे सापडलीआहेत. सुरुवातीला ही नाणी ठराविक वजनाच्या चांदीच्या तुकड्याच्या स्वरूपात व्यापाऱ्यांच्या श्रेण्यांनी उपयोगात आणली. ही वापरात असताना ह्या श्रेण्या वारंवार त्याचे वजन करून त्याची अचूकता पारखत असत. ही पारख नाण्यांच्या एका बाजूला मारलेल्या छोट्या खुणांवरून सिद्ध होत असे. इसवीसनपूर्व सहाव्या शतकापासून त्या नाण्यांच्या दुसऱ्या रिकाम्या भागावर राजांचे छाप येऊ लागले. राजे नवी नाणीही पाडू लागले. या छाप्यांवरून व नाण्यांवरून राजघराण्याचा काळ स्थूलमानाने ठरविता येतो. कारण घराणे बदलले की, नाण्यांमध्ये फरक पडत असे आणि कोषांतील जुन्या राजांच्या छाप्यांची नाणी बाहेर काढण्यापूर्वी नवा राजा त्यावर आपला वेगळा छाप मारीत असे.

ह्या नाण्यांचे वजन अगदी अद्ययावत नाण्यांप्रमाणे योग्य प्रकारे जोखण्यात येई. नाण्यांच्या स्वरूपावरून किंवा एवढ्या मोठ्या प्रमाणावर त्याचा वापर होत होता; यावरूनच व्यापार व त्याकरिता होणाऱ्या उत्पादनाचा (कमोडिटी प्रॉडक्शन) चांगलाच विकास झाला होता, हे दिसून येते. वेताच्या टोपल्या किंवा इतर वस्तू करणारे कुंभार, लोहार, विणकर इत्यादींची गावे होती. (खास करून बनारस-जवळील अशा गावांची नोंद आहे.) हे कारागीर रक्तसंबंधी गटांच्या अन्वये आपल्या श्रेण्या (संघ) बनवत असत. त्याची रचना साहजिकच त्याच्या परंपरेतून आलेल्या

टोळीसंघ किंवा गण समाजपद्धतीवर होती. ही प्रक्रिया अजूनही आसामसारख्या टोळी जीवन असणाऱ्या प्रदेशात दिसून येते. व्यापार-उदीम वाढल्यामुळे ह्या श्रेण्यांकडे चांगली संपत्ती जमा होई; पण ती व्यक्तीच्या मालकीची नसे. श्रेणीप्रमुख श्रेणी सभासदांच्या गरजेनुसार किंवा श्रेणीबाहेरील व्यक्तीकरिता किंवा संघटनेकरिताही त्याचा विनिमय करू शकत असत. (भारतातील मागासलेल्या आणि तरीही खास व्यवसाय करून जगणाऱ्या गरीब जमातींमध्ये अशी व्यवस्था अजूनही चालू असल्याचे आढळते. त्याची पाळेमुळे या काळातील पद्धतीमध्ये किंवा त्यापेक्षाही अगोदरच्या काळात रुजलेली आहेत.) उत्तर-वेदांच्या काळातील कसबी कारागीर हा (आपण याअगोदर पाहिल्याप्रमाणे स्थलांतरित होत असणाऱ्या ग्रामांतील वैश्य किंवा शूद्र जमातीचा होता. आपण ज्या काळाचा विचार करीत आहोत, त्या काळात या कसबी कारागिरांची गावे किंवा पेठा वसल्या होत्या हे आपण पाहिले आहे. तेव्हा साहजिकच या गावांचे सर्व उत्पादन गावात किंवा जवळच्या छोटया नगरात विकले जात असणे शक्य नव्हते. त्या उत्पादनाचा बराच हिस्सा विशेष करून कापड व धातूंच्या वस्तू फिरत्या व्यापाऱ्यांच्या साहाय्याने दूरवरच्या पल्ल्यांवरील बाजारपेठात विकला जाई. नैसर्गिक उत्पादनापैकी सर्वात आवश्यक 'मीठ' हे काही पंजाबप्रमाणे बिहारमध्ये सहजगत्या पैदा करता येत नसे. ते अगदी समुद्रकिनाऱ्यापर्यंत जाऊन शोधावे व आणावे लागे. टोपल्या बनविण्याकरिता आणि बांधकाम करण्याकरिता बांबू हे अगदी महत्त्वाचे उत्पादन झाले होते. चंदनाच्या लाकडापासून लेप करून त्याचा उपयोग उन्हाळी वातावरणात शरीराला थंडपणा आणण्याकरिता व ते स्वच्छ राखण्याकरिता सर्रासपणे केला जाई; कारण तोपर्यंत साबणाचा शोध लागला नव्हता. हा सर्व माल पाचशे किंवा त्यापेक्षाही जास्त बैलगाड्या असणारे फिरते व्यापारी एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी नेत असत. त्या बैलगाड्यांच्या चाकांच्या धावा जनावरांच्या कच्च्या कातड्यांच्या असत. उत्तरपथावरील व्यापारमार्गाची जमीन ही फारशी खडकाळ नसल्यामुळे तशा बैलगाड्या तेथे वापरात येऊ शकत होत्या.

**दक्षिण पथावरील व्यापार मार्ग** हा मात्र खडकाळ व डोंगरमार्गांतील दुर्गम वाटा, यातून गेलेला होता. ते मार्ग निश्चितपणे ठरलेलेही नव्हते. तेथे ओझी वाहू शकतील अशी जनावरे व हमाल ह्यांचा उपयोग करावा लागे. त्या जंगली प्रदेशात धान्य, चामडी, शिंगे, मध अशा अनेक वस्तूंचा व्यापार केला जाई. असा व्यापार सुरुवातीचा बराच काळ तेथील आदिवासी टोळ्यांच्या प्रमुखांतर्फे केला जाई. हे प्रमुख व्यापाराकरिता लागणाऱ्या वस्तू आपल्या जमातीकडून गोळा करीत; पण व्यापाराकरिता ह्या वस्तूंची निश्चित उपलब्धता असण्याकरिता खाजगी मालमत्तेचा उदय होणे आवश्यक झाले. तसेच वाहतूक करण्याकरिता गुलाम किंवा शूद्र असणाऱ्या हमालांची उपलब्धता असणेही आवश्यक होते. उत्तरेकडून येणाऱ्या व्यापाऱ्यांशी संबंध आल्यानंतर व त्यांच्याशी केलेल्या व्यापारातून संपत्ती जमा झाल्यानंतर हे टोळीप्रमुख आपल्या सर्वसामान्य टोळीसभासदांपासून वेगळे होऊ लागले. त्यांचा सामाजिक दर्जा वेगळा होऊ लागला. खाजगी मालमत्तेचा प्रादुर्भाव झाला. अजून त्यांच्यात नंतर अस्तित्वात आलेली वर्ण किंवा जाती व्यवस्था किंवा त्याही नंतरच्या काळांतील ग्राम व्यवस्था निर्माण झाली नव्हती; पण त्याची मुळे रुजू लागली होती. ह्या प्रदेशात व्यापाराच्या रूपाने जे आक्रमण झाले, त्याचे परिणाम होऊ लागले. हा व्यापार जसा वाढू लागला, तसतसे अनेक लोकसमूह त्याच्या कक्षेत आले, सामील झाले. हा व्यापार अव्याहतपणे चालू ठेवण्यासाठी निर-निराळ्या गटांतील परस्परसंबंध ठरविणारे नियम करणे आवश्यक झाले; आणि बळाच्या जोरावर त्याची अंमलबजावणी करणाऱ्या दंडसत्तेची जरूरी भासू लागली.



आता आपण शासन व्यवस्थेतील सैद्धांतिक प्रश्नाकडे वळू या. **उगवत्या शासन-व्यवस्थेचे राज्य करण्याचे मुख्य साधन खडे सैन्य असणे साहजिकच होते.** असे खडे सैन्य केवळ मोहिमा करण्याकरिता नव्हे तर राज्यव्यवस्था चालविण्याकरिता असणार होते. त्यामुळे ते अत्यंत शिस्तबद्ध, प्रशिक्षित व सज्ज असणेही आवश्यक होते. पुन्हा असे सैन्य हे टोळी किंवा गणराज्ये मोडून प्रादेशिक समाजव्यवस्था चालविण्याकरिता उभे करावयाचे असल्यामुळे ते पराजित टोळी-संघ व गणराज्ये यांच्या तर्फे (सरंजामदारी पद्धतीत होते तसे) खंडणीसारखे उभारता येणे शक्य नव्हते. असे सैन्य हे टोळी-संघ किंवा गणसमाजाच्या प्रथा, त्यांच्या प्रमुखांचे अधिकार किंवा त्यांच्याशी असणारे इमान न बाळगणारे असे असणे आवश्यक होते. ते नियमित पगारी पद्धतीवर उभारणे शक्य होते. पुन्हा असे सैन्य उभारणे हे नियमित करांच्या रूपाने पैसा गोळा केल्याशिवाय शक्य नव्हते. क्षत्रिय कुळांची मिरासदारी असणारी गणराज्ये अशा तऱ्हेच्या करपद्धतीला मान्यता देणेही शक्य नव्हते. मल्ल किंवा लिच्छवी ही गणराज्ये लढाऊ असली तरी असे पगारी खडे सैन्य निर्माण करता येणे त्यांना शक्य नव्हते. टोळी-संघ समाज किंवा कुलगणराज्ये ह्यांनी उभ्या केलेल्या भिंती मोडून टाकणे हे केवळ सार्वभौम राजाला शक्य होते. असा राजा व त्याचे सैन्य टोळी-संघ नियम किंवा प्रथा-पद्धती यांच्या बंधनात राहणारे नव्हते. टोळी-संघ किंवा गणराज्ये सभासदांचा खाजगी मालमत्तेचा हक्क मानीत नव्हती, उलट नवी शासन व्यवस्था अशा पद्धतीमधून मिळणाऱ्या करांच्या उत्पन्नावर अवलंबून असणार होती.

मगध राज्यकर्त्यांचे अर्थविषयक व शासनविषयक सल्लागार होते. त्यांनी अशी शासन व्यवस्था उभी करण्याकरिता निःसंकोचपणे मार्ग सांगितले. (त्यातील कौटिल्याच्या अर्थ-शास्त्राचा विचार नंतरच्या प्रकरणांत केला आहे.) **त्यांचा मुख्य भर हा जंगले साफ करून राज्याच्या मालकीखाली जमीन लागवडीखाली आणणे व खाणी व धातू यांच्या उत्पादनावर शासनाची मक्तेदारी निर्माण करणे यावर आहे.** शासनाच्या उत्पन्नाचे ते मुख्य साधन आहे. मगध व कोसल देशांतील इ. स. पूर्व सहाव्या शतकातील राजे हे असे सार्वभौम राजे होण्याची गरज भागवणारे होते. दोन्ही राजे पुराणांमध्ये सांगितलेल्या तथाकथित खालच्या कुळांतील होते. त्यामुळे त्यांच्यावर टोळी-संघ गण किंवा कुळांचे सक्त निर्बंध नव्हते. पाली वाङ्मयात बिंबिसाराच्या घराण्याचा उल्लेख नाही; परंतु संस्कृत पुराणांवरून

तो शिशुनाग वंशाचा होता. 'नाग' ही उपाधी वैदिक परंपरेत बसत नाही. त्यामुळे हे घराणे मूळ आदिवासी किंवा आर्येतर जमातींमधून आलेले, निदान आदिवासी दैवत मानणारे असावे, असा निष्कर्ष निघतो. ब्राह्मण ग्रंथात हा वंश क्षेत्रबंधू म्हणजे युद्धाकरिता एखादा यज्ञ करण्यापर्यंतकडे वैदिक परंपरा न पाळणारा, नंतर केला गेलेला खालच्या दर्जाचा क्षत्रिय वंश आहे. राजगीर येथील सर्वात जुने बौद्धपूर्व पूजास्थान 'मणियार मठ' हे नाग दैवतांशी निगडित आहे. यावरून तेथील राजे नागांशी संबंधित असणे स्वाभाविक आहे. कोसलचा राजा पसेनदी स्वतःला 'इक्ष्वाकू' कुळांतील असल्याचा दावा करीत होता. त्याचा तो आग्रह त्यावेळीं मान्य झाल्याचे दिसत नाही, हे एका घटनेवरून दिसून येते. त्याने शाक्य कुळातील स्त्रिबरोबर विवाह करण्याची इच्छा प्रदर्शित केली. शाक्य गणराज्य पसेनदीच्या स्वामित्वाखाली होते, तरीही पसेनदीचे कूळ त्यांना हलक्या दर्जाचे वाटल्यामुळे ते अडचणीत आले. शाक्य हेसुद्धा स्वतःला इक्ष्वाकू वंशाचे समजत होते. त्यांनी महानामशाक्य ह्या राजन्याला आपल्या नागमुंडा या दासीपासून झालेली 'वासभखत्ती' या नावाच्या मुलीला विवाहाकरिता देऊ करून पसेनदी राजाला फसविले. ही फसवणूक पुढे लक्षात आली; पण या वासभपासून झालेला पुत्र विदुदभ हाच पुढे राजा झाला. (त्यानेच आपल्या कुळाचा अपमान झाल्याच्या निमित्ताने शाक्यांचा विध्वंस केला.) मगध राजा बिंबिसार याने स्वतःला 'सेनिया' ही उपाधी लावून घेतली होती. त्यावरून असे दिसते की, कोठल्याही टोळी-संघ गणसमाजाशी संबंधित नसलेले असे खडे सैन्य उभे करणारा पहिला राजा तो होता. पसेनदीने तर प्रथम 'सेनापती' हे पद निर्माण केले व आपल्या मुलाला त्या पदावर नेमले. 'सेनापती' हा शब्द प्रथम विदुदभ सेनापती अशा संदर्भात वापरलेला आहे. विदुदभ सेनापती व्हायच्या अगोदर मल्ल गणांतील बंधुल हा पराक्रमी पुरुष गण सोडून पसेनदीच्या सैन्याचा जवळजवळ सेनापतीच झाला होता. राजसत्ता बळकावण्याच्या प्रयत्नात तो आहे असा संशय आल्यामुळे राजाने त्याचा खून करविला. अर्थात हे केवळ गैरसमजामुळे घडले; कारण बंधुलाचा पुतण्या 'दीर्घकारायण' हा राजाचा मंत्री होता, त्याला काढून टाकण्यात आले नाही. दीर्घकारायण हासुद्धा अर्थशास्त्राच्या परंपरेतील राजनीतिविशारद होता.

कोसल व मगध या दोन्ही सार्वभौम सत्तेमध्ये काही काळ तरी लढाया झाल्या नाहीत. दोन्ही सत्तांनी ह्या काळात निर्माण झालेल्या नव्या धार्मिक विचारवंतांना आश्रय दिलेला आहे. हे दोन्ही सत्ताधीश बुद्धाचा आदर करणारे होते. तसेच इतर पंथांचेही आश्रयदाते होते. वैदिक ब्राह्मण धर्मालाही ते अनेक यज्ञ करून आश्रय देत असत. या दोन राजघराण्यांत विवाहसंबंधही झाला होता. बिंबिसाराची मुख्य राणी ही पसेनदीची बहीण होती व त्या लग्नात पसेनदीने काशीजवळील एक गाव बिंबिसाराला 'सप्रेम भेट (आंदण) दिले होते. या काळांत त्या दोन्ही सत्ता जंगलातील आदिवासी समूह, गणराज्ये, आर्यटोळ्यांची राज्ये यांच्याशी लढाया करण्यात गुंतलेल्या होत्या. अशा लढाया जिंकण्याकरिता ते पशुबळी असणारे यज्ञ करीत, ब्राह्मणांना गावांच्या दक्षिणा देत व शेतकऱ्यांचे पशु



(सक्तीने) काहीही किंमत न देता वसूल करीत. त्या काळापर्यंत नव्या समाजाच्या विकासाला घातक ठरणाऱ्या वैदिक यज्ञयागांच्या पगड्यांतून ह्या राज्यांची सुटका झाली नव्हती. कोसल व मगध या दोन साम्राज्यांच्या झगड्याची पहिली ठिणगी बिंबिसाराचा मुलगा आजातशत्रू याने पाडली. या राजपुत्रामागे कोणी तरी राजनीती विशारद असला पाहिजे. त्याने आपल्या बापाला कैदेत टाकले. बिंबिसार तुरुंगात उपासमार होऊन मेला. या निर्घृण कृत्याबद्दल त्या काळच्या बौद्धधर्मीय लेखकांनी जरी त्याला दूषणे दिली असली तरी अजातशत्रू न्यायी व कर्तबगार राजा असल्याचे ते मान्य करतात. उपनिषदांत तर अजातशत्रू हा तत्त्वज्ञ राजा असल्याचा उल्लेख आहे. अजातशत्रूच्या ह्या अपकृत्याने चिडून पसेनदीने काशी जानपदांतील आपल्या बहिणीला हुंडा म्हणून दिलेल्या गावाची देणगी रद्द केली. हे गाव सोडण्यास अजातशत्रू तयार नव्हता; कारण ते गंगा नदीच्या व्यापारमार्गावरील महत्त्वाचे ठाणे होते. त्या गावावरून दोन सैन्यांत लढाया झाल्या; पण ते ठाणे मगधाच्या ताब्यांत राहिले.

मगधासारखाच प्रकार कोसल राज्यातही चालू होता. तेथील प्रधानमंत्री दीर्घकारायण याने राजमुद्रा विदुदभ या सेनापती असलेल्या राजपुत्राकडे दिली आणि त्याच्या नावाने द्वाही फिरविली. एका सेविकेशिवाय म्हाताऱ्या पसेनदीला कोणीही साथ दिली नाही. तो आपल्या भाच्याकडे आश्रयाला आला; परंतु त्याचा प्रवेश होण्याअगोदरच राजगीरचे दरवाजे रात्रीकरिता बंद झाले होते. हे दरवाजे दुसऱ्या दिवशी सकाळी उघडण्याच्या आतच थकलेल्या पसेनदीचा अंत झाला होता. अजातशत्रूने पसेनदीची उत्तरक्रिया मोठ्या थाटामाटाने केली आणि कोसलच्या गादीवर आपला हक्क असल्याची घोषणा केली; पण काही काळ हा हक्क शाबित करता आला नाही. केवळ विदुदभाशीच नव्हे तर त्या काळच्या लिच्छवी, मल्ल अशा स्वतंत्र आणि शक्तिशाली गणराज्यांचा नाश केल्याशिवाय ते शक्य नव्हते. अशी गणराज्ये ही सार्वभौम राजाच्या प्रगतीला अडथळा होती; कारण एक पद्धती म्हणून ते मर्यादित लोकशाहीला जपत होती आणि शस्त्रसज्ज असल्यामुळे लष्करी हालचालींनाही पायबंद घालणारी होती. शाक्य गणांचा निःपात करून विदुदभानेसुद्धा दुसऱ्या बाजूने चाल केली. अर्थात हे कृत्य त्याने उत्तरापथ मार्गावरील गणांचे स्वातंत्र्य संपविण्याकरिता केले होते. या काळांत लिच्छवी गणराज्याने उत्तरेकडून गंगेच्या काठावरील प्रदेशांवर ताबा मिळविला व नदीवरून होणाऱ्या व्यापारावर ते जकात वसूल करू लागले. मगध राजा व ही गणराज्ये या दोघांनाही जकात द्यावी लागल्यामुळे व्यापारी तक्रार करू लागले. तेव्हा मगधांकडून गंगेवर पाटलीपुत्र येथे गंडक शोण व गंगा यांच्या त्रिवेणीसंगमावर एक संरक्षक सैनिकी ठाणे वसविण्यात आले. मगधाच्या या हालचालींना प्रत्युत्तर म्हणून लिच्छवींने मल्ल गणराज्याशी संधी करून संघराज्य केले. लिच्छवी गणराज्य कौटिल्याच्या अर्थशास्त्रात सांगितलेल्या कारस्थानाचा अवलंब करून मोडण्यात आले. मगध देशातील तथाकथित अपमानित झालेला एक ब्राह्मण मंत्री लिच्छवींकडे गेला. वास्तविक लिच्छवी व मल्ल या गणराज्यांत ब्राह्मणांना खास स्थान नव्हते; व

ते वैदिक यज्ञयागही करीत नसत. तरी त्या ब्राह्मणाचे महत्त्वाचे स्थान, प्रतिष्ठा, आणि मगध राजाचे उद्दिष्ट त्यास माहीत असण्याचा संभव—यामुळे लिच्छवींनी त्याचे स्वागत केले. या निवासाचा फायदा घेऊन त्याने या गणराज्यांतील एका राजन्याला दुसऱ्या राजन्यांविरुद्ध उठविणे; प्रत्येक राजन्याने आपल्याला मिळणाऱ्या संपत्तीपेक्षा अधिक वाटा मागणे; गणसभा भरविण्याबाबत उदासीनता पसरविणे; सामायिक सैन्याचे संचलन; सहभोजन इत्यादींबाबत निष्काळजीपणा दाखविणे; अशा प्रवृत्ती जोपासण्यास सुरुवात केली. अर्थात या डावपेचांचा मुख्य गाभा खाजगी संपत्तीबाबत कुलराजन्यांत स्पर्धा व लोभ पसरविणे हा होता व त्या काळी गणराज्यांत भेटी घेणे, कर गोळा करणे यामधून जमा झालेली संपत्ती कुलराजन्य खाजगी संपत्ती म्हणून मानू लागले होते; त्यामुळे त्या पद्धतीचा आतून क्षय होत होता. म्हणूनच असे कारस्थान यशस्वी होऊ शकले. अजातशत्रूच्या त्या मंत्री असणाऱ्या हेराने प्रवेश करावयाच्या अगोदर लिच्छवी गणांत अंतर्गत फूट झाली होती. हे त्या गणांत महावीरासारखा एक लोकोत्तर धर्मोपदेशक होऊन गेला यावरून दिसून येते. मल्ल बंधुल व दीर्घकारायणासारखे शूर व चतुर पुरुषोत्तम गण सोडून बाहेर पडले व राजांच्या पदरी राहिले; यावरून शूर व कर्तृत्ववान व्यक्तींना गणराज्यांच्या मर्यादा समाधानकारक वाटत नव्हत्या असेही दिसते. पुढे अंतर्गत कलहाने इतके तीव्र स्वरूप धारण केले की लिच्छवीच्या गणसभा नियमितपणे होणे थांबले. गणराज्याचा कारभारच थंडावला. अजातशत्रूच्या हेराने वेळेवर राजाकडे निरोप पाठविला व त्याच्या सैन्याने लिच्छवीचा अगदी सहज पराभव केला. मल्ल गणराज्याचा कधी व कसा विनाश झाला, याची तपशीलवार माहिती उपलब्ध नाही; पण तो विनाश त्याच काळात आणि लवकरच झाला असावा. मल्लांचा जरी उच्छेद पूर्णपणे झाला असला तरी त्यांना कुस्तीची एवढी आवड होती की कुस्तीगिरांना 'मल्ल' म्हणून ओळखले जाऊ लागले. लिच्छवी गणांच्या विनाशाला कारणीभूत असणाऱ्या कारस्थानी ब्राह्मणांचे खरे नाव माहीत नाही; पण तो 'वस्सकार' नावाने माहीत आहे. 'वस्सकार' म्हणजे 'जो दुसऱ्याला शरणागत आणतो' तो होय. या वस्सकाराची राजनीतीवरील मते व धोरणे अर्थशास्त्रांमध्ये जी अनेक नावे दिली आहेत त्यामध्ये खऱ्या नावाने दिली असावीत; पण ते खरे नाव नक्की कोणते हे सांगता येत नाही.

कोसल प्रदेश जिंकण्याचा प्रश्न हा काहीसा मगधांच्या नशिबाच्या जोरावर सुटला. विदुदभाने आपल्या सैन्याची छावणी राप्ती नदीच्या कोरड्या पात्रात उभी केली होती. नदीच्या वरच्या प्रदेशात अचानक पडलेल्या अतिवर्षणामुळे नदीच्या पात्रात पाण्याचे लोंढे आले व ती छावणी वाहून गेली. राजा व सैनिक दोघेही नष्ट झाले. शाक्यांचा उच्छेद केल्याबद्दल त्यांना देवांनीच शिक्षा दिली, असा प्रवाद नंतर पसरला. कोसल राज्यावर अधिकार प्रस्थापित करण्याचा अजातशत्रूचा मार्ग मोकळा झाला. वरील कथानक हे जुन्या वाङ्मयामध्ये ऐतिहासिक दृष्ट्या सुसंगतपणे मांडले गेले आहे; अशी कल्पना करून घेण्याचे कारण नाही. विविध कथा आणि दंतकथा यामधून मिळालेली माहिती



एकत्र करून तिचा कालानुक्रम लावण्याचा प्रयत्न येथे केलेला आहे. प्रचलित ऐतिहासिक साहित्यात कोणत्याच स्वारीचे, लढाईचे किंवा भूप्रदेशांचे वर्णन सापडत नाही. अजातशत्रूचे राज्य कोठपर्यंत पसरले होते, याचीसुद्धा निश्चित माहिती नाही. इतके नक्की की त्या वारसदारांना तशी कामगिरी करावयास बराच प्रदेश शिल्लक होता.

अवंतीचा राजा प्रद्योत हा मगधावर हल्ला करण्याची तयारी करीत होता आणि त्याकरिता राजगीरची संरक्षक तटबंदी पक्की करण्यात आली, असा जाता जाता केला गेलेला उल्लेख एका कथेत आहे. अवंतीचे राज्य हे खूप श्रीमंत व बलशाली होते. त्यांची उज्जैन ही राजधानी दक्षिण व्यापारमार्गावरील महत्त्वाचे ठाणे होते. त्या काळच्या सोळा महत्त्वाच्या जानपदांपैकी ते एक महत्त्वाचे जानपद होते. अवंतीचे राज्य हे शेवटी मगधांनी काबीज केले; पण कोणत्या मगध राजाने ती कामगिरी केली, याचा पत्ता नाही. यमुनेच्या किनाऱ्यावरील कोसंबी येथील वत्सांचे राज्य हेसुद्धा सोळा जानपदांपैकी एक महत्त्वाचे राज्य होते. त्यांचा राजा उदयन याचे उज्जैनच्या राजांशी सतत भांडण असे. हा उदयन राजा 'वासवदत्ता' या नाटकाचा नायक आहे. कुरु, शूरसेन, मत्स्य अशी अनेक जानपदे ही ऋग्वेदातील काळांतील दाशराज युद्धापासून चालत आलेली आणखी काही जानपदे होती. ती जानपदे खिस्तपूर्व चवथ्या शतकानंतर शिल्लक राहिली नाहीत.

खिस्तपूर्व पांचव्या शतकाच्या मध्यापर्यंत गंगेच्या खोऱ्यात मगधांचे राज्य हे सर्वांत बलवत्तर राज्य होते, तरीही त्या काळापर्यंत ते सार्वभौम राज्य झाले नव्हते. ते एकतंत्री राजसत्ता असणारे शासन होते. दोन्ही व्यापारमार्गाच्या ईशान्य टोकांवर त्यांचे अधिपत्य होते व भरपूर कच्चे लोखंड असणाऱ्या सर्व प्रदेशांवर त्यांची सत्ता प्रस्थापित झाली होती. तरी त्या राजाला एक प्रचंड कार्य करावयाचे होते, ते म्हणजे गंगेच्या खोऱ्यांतील घनदाट जंगले साफ करून नव्या जमिनी लागवडीला आणण्याचे कार्य. या साम्राज्याला लष्करी सामर्थ्य असणारा बलशाली प्रतिस्पर्धा शिल्लक नव्हता; पण अनेक लहान लहान टोळ्यांना नमविणे अजून बाकी होते. शेती व्यवसायाच्या वृद्धीतून निर्माण होणारी आक्रमणाची ही प्रक्रिया सर्व पृथ्वी पादाक्रांत केल्याशिवाय संपणे शक्य नव्हते. एवढे खरे की, त्या काळच्या भारतीयांच्या कल्पनेप्रमाणे उत्तरेकडील हिमाच्छादित पर्वतापासून चार महासागरांपर्यंत पसरलेल्या भारताचा प्रदेश हीच पृथ्वी होती. ही प्रक्रिया पूर्ण होण्यास दोन शतके लागली.

| सहा |

# मगध साम्राज्यातील धर्म आणि शासन

## ६·१
## मगध साम्राज्याची पूर्तता

खिस्तपूर्व ४ थ्या व ५ व्या शतकाचा काळ हा पुरातत्त्व शास्त्रज्ञांच्या मताप्रमाणे—'नॉर्दन ब्लॅक पॉटरी'चा (काळ्या मातीच्या भांड्याचा) काळ होय. काळ्या मातीच्या भांड्यांचा काळ हा राखी रंगाच्या मातीच्या भांड्यांच्या काळानंतरचा व तंत्रदृष्ट्या अधिक प्रगत काळ आहे. खिस्तपूर्व सहाव्या शतकात बहुधा दारू व तेल साठवण्याकरिता व त्यांचा व्यापार करण्याकरिता ह्या सुबक भांड्यांचा उपयोग करण्यात येत असावा. ह्या काळातील लेखी वाङ्मय किंवा निश्चित तारखा देणारे फारसे आलेख शिल्लक नाहीत. पण खिस्तपूर्व ३२७ व्या वर्षी आलेक्झांडरचे आक्रमण झाले. त्यामुळे ह्या काळातील बरीच माहिती उपलब्ध होते. ग्रीक इतिहासकारांना भारताचे जे दर्शन घडले, ते कसे होते हे दिसून येते. ह्या आक्रमणाचा भारतीय जीवनपद्धती व संस्कृती ह्यांवर कायमचा असा परिणाम झालेला नाही. एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे. सर्वच परकीय निरीक्षकांना आणि त्याचप्रमाणे ग्रीक निरीक्षकांनाही भारत देश हा अत्यंत विलक्षण आचंबित करणारा असा प्रदेश वाटे. ह्या देशात हत्तीसारखे अगदी विश्वाससुद्धा बसणार नाही असे प्रचंड प्राणी होते आणि तरीसुद्धा त्यांना माणसाळवता येत होते. लोकर कापूस चक्क झाडावर उगवत होती. बांबू केवढे तरी उंच होते. **त्यापेक्षाही आश्चर्याची गोष्ट म्हणजे मधापेक्षाही गोड असलेली साखर भारतात उत्पादित केली जाई.** अगदी नाइलच्या तुलनेतही मोठ्या असलेल्या नद्या धो धो वहात होत्या. त्यांच्या लांबीचा पत्ता लागत नव्हता. ज्यांना भारतीय छोट्या नद्या समजत—त्यांचीही खोली चकित करणारी होती. जमीन तर अशी की, थोड्या श्रमातसुद्धा दोन किंवा तीन पिके काढता यावी, आणि ग्रीकांना मात्र (खरे म्हणजे तेथील गुलामांना) खडकाळ पठारांवर एक पीक काढण्याकरितासुद्धा कंबरडे मोडेपर्यंत काम करावे लागत असे. गुलामांचा उपयोग केल्याशिवाय भारतात व्यवस्थित उत्पादन होत होते, ही गोष्ट ग्रीकांच्या दृष्टीने आश्चर्याची बाब होती. प्लेटोसारखा उदार



तत्त्वज्ञानीसुद्धा गुलामगिरीच्या पद्धतीनेच नागरशासन (सीटी स्टेट्स्) व नागर संस्कृती यांची उभारणी होते, अशी कल्पना करीत होता. तत्कालीन ग्रीक नागर संस्कृतीमध्ये स्वार्थ बोकाळलेला होता, लबाडी व कारस्थाने माजली होती. कायदेबाजीचा कहर झाला होता. तशी परिस्थिती भारतात नव्हती. लेखी करार केल्याशिवाय व्यवहार होई. दिलेला शब्द पाळणे ही नीतिमत्ता होती. एरियन हा ग्रीक प्रवासी म्हणतो, 'खरोखरच ह्या देशातील लोक खोटे बोलतच नाहीत' अर्थात ज्या तत्त्ववेत्त्याने एरियनच्या ह्या उद्‌गारांचा उल्लेख केला आहे तो दि ऑडॉरस सिक्यूलस आदर्श समाजाची कल्पना करण्यात गुंग होता. त्याने कदाचित ओरियनच्या म्हणण्याचा अतिरेक केला असेल. ग्रीक समाजातल्या गुलामगिरीच्या दुष्ट व्यवस्थेमुळे निराश झालेले अनेक ग्रीक मानवतावादी तत्त्वज्ञानी भारतीय परिस्थितीबाबत कुठल्याही उदार गैरसमजावर विश्वास ठेवीत. तरीसुद्धा ग्रीकांच्या लिखाणाचा अर्थ योग्य ती खबरदारी घेऊन लावण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

सिंधू नदीच्या पश्चिमेकडील प्रदेश हा खिस्तपूर्व ५१८ च्या काळात झालेल्या पहिल्या डेरियसच्या आक्रमणापासून पार्शियन सत्रापांच्या अंमलाखाली होता. आपण ज्या काळाचा ह्या प्रकरणात विचार करीत आहोत, त्या काळात हा प्रदेश विसाव्या सत्रापांच्या अंमलाखाली होता. ह्या प्रदेशातून अखनेमिड साम्राज्याला बरीच संपत्ती मिळत असे. इतिहासकार होरोडोटस् ह्यांच्या निवेदनानुसार "भारतातून पर्शिअन साम्राज्याला ३६० टॅलन्टस म्हणजे जवळजवळ नऊ टन सोन्याची माती भेट मिळत असे. तिबेट किंवा काश्मीर येथील पठारांतील खाणीतून व सिंधू नदीच्या वरील भागात वाहून आलेल्या रेतीतून हे उत्पन्न होई. सत्रापाच्या राज्यातील लोकर व लोकरीचे कपडे त्या काळी केवळ भारतातच नव्हे तर जगातही प्रसिद्ध होते. (अर्थात भारत ह्या शब्दाचा ह्या पुस्तकापुरता दिलेला अर्थ येथेही ध्यानात ठेवावा.) वास्तविक झरक्झीसच्या सैन्यात भारतीय आर्यांची एक तुकडी होती तेव्हा अलेक्झांडरच्या आक्रमणाअगोदरही ग्रीकांना भारताबद्दल माहिती असावी. त्या काळातील दूरवरच्या पल्ल्यांवरील (ज्याला आता आंतरराष्ट्रीय व्यापार म्हणता येईल) व्यापाराचे एक ठाणे पुष्करावती नावाचे नगर होते. ग्रीकांना ते 'प्युकिलोटीस' ह्या नावाने परिचित होते. आज ते 'चारसद्धा' नावाने ज्ञात आहे. पुष्करावती म्हणजे कमलपुष्पाची तळी असलेले नगर (सिटी ऑफ आर्टीफिशिअल पाँड्स्). भारतीय संस्कृतीत असलेला 'पुष्करां'चा संदर्भ आपण सिंधू संस्कृतीचा शोध घेताना मांडला आहे. ह्या नगरातील एक नाणे उपलब्ध आहे. त्या नाण्यावर एका बाजूला मोठे वशींड असलेला बैल आहे व दुसऱ्या बाजूला पुष्करावतीचे 'अंभी' (अंबा?) देवता हातात कमळ घेऊन बसली आहे. हे नाणे जरी इंडो-ग्रीक काळातील व त्या पद्धतीचे असले तरीही जुन्या मातृसत्ताक काळातील स्मृती ह्या नाण्यांच्या मुद्रेत जागृत ठेवलेली आहे. सिंधूच्या पूर्वेस गांधार जानपदाच्या बाजूला तक्षिला (तक्षशिला) हे सांस्कृतिक व व्यापाराचे केंद्र या काळात अस्तित्वात आले होते. तक्षशिला येथील उत्खननांत नाण्यांचे साठे सापडले आहेत. त्यावरून अलेक्झांडरच्या आक्रमणावेळी

तक्षशिलेत मगध साम्राज्याचीच नाणी वापरली जात असे दिसून येते.

अजातशत्रूंच्या वारसदारांच्या काळात नाण्यांचा वापर चांगलाच वृद्धिंगत झालेला होता. आणि ती नाणीही चांगल्या दर्जाची होती. ह्या पुराव्यावरून असे दिसून येते की खिस्तपूर्व पांचव्या शतकापासून सबंध उत्तर पथांवर (उत्तरेकडील व्यापारी मार्ग) मगधांचा ताबा होता.

अखेमिनीड साम्राज्याच्या शेवटच्या हद्दीपर्यन्त म्हणजे सिंधू नदीपर्यन्त चाल करून अलेक्झांडरने त्या विभागातील सत्रापांचा पराभव केला. अलेक्झांडरने पर्शियातले विजय अगदी सहजगत्या मिळवले होते. त्याच्याकडे कुणाकडेही नव्हते एवढे सैन्य जमा झाले होते. आणि पर्शियातील अमाप संपत्तीही जमा झाली होती. त्यामुळे भारतासारख्या समृद्ध देशाबाबत त्याची हाव अधिकच बळावली. तीस दिवसांच्या वेढ्यानंतर 'चारसद्धा' पडले. उत्खननांत 'चारसद्धा' नगराच्या भोवती खणलेल्या खंदकाचा पुरावा सापडलेला आहे. त्यानंतर सिंधू नदी ओलांडून तो भारतखंडात आला. तक्षशिलेचा राजा 'अंभी' ह्याने लढाई न करता शरणागती पत्करली. अलेक्झांडरला देणग्या देऊन संतुष्ट केले. त्यानंतर मात्र तेथील प्रदेशातील प्रत्येक टोळी-संघ राज्याने (ट्रायबल किंगडम) अलेक्झांडरशी अटीतटीने मुकाबला केला. अर्थात् ही सर्व टोळी-संघ राज्ये एकत्र येऊन काही अलेक्झांडरशी लढलेली नाहीत. तक्षशिलेचे सैन्य तर अलेक्झांडरच्या सैन्यात सामील झाले व आपल्या शेजाऱ्यां-विरुद्ध उभे राहिले. त्या प्रदेशातून अलेक्झांडरच्या सैन्याला आवश्यक मालाचा पुरवठाही होत होता. भारतीय सैन्य त्या काळापर्यंतसुद्धा रथ वापरत होते. मॅसिडोनियन सैन्यातील घोडदळ व त्यांचे लांब भाले (सिरीसा) ह्यांच्या समोर भारतीय सैन्याचा टिकाव लागू शकला नाही. आक्रमक सैन्य ब्रॉन्झचे चिलखत वापरत होते, तर भारतीय सैन्य हे ढाली व चामड्याचे चिलखत वापरीत होते. भारतातील हत्ती घोडदळाला हुसकावू शकत होते; पण त्याचबरोबर जखमी झालेले हत्ती स्वतःच्याच सैन्यांत गोंधळ माजवीत. हत्तीला पुढे करून शत्रू सैन्यावर आक्रमण करावयाचे तर अशा हत्तीच्या सभोवती घोडदळ व पायदळ ह्यांची संरक्षक फळी उभारावी लागे. एका शस्त्राच्या बाबतीत मात्र भारतीय सरस होते ते म्हणजे धनुष्यबाण. हे बाण चिलखतांना पार करून शरीरात घुसत असत. स्वत: अलेक्झांडरला तशी जखम झाल्याचा उल्लेख आहे. त्याचे चिलखत चिरून बाण त्याच्या बरगडीत घुसला व त्याचा जवळजवळ मृत्यूच ओढवला होता.

त्या काळात 'क्षत्रिय जमातीचे लोक' व्यावसायिक योद्धे होते. त्यांनीही ह्या टोळी राज्यांच्या सैन्यात लढाई केली. एका प्रसंगी तर त्यांनी अलेक्झांडरच्या सैन्याचा पराभव करून युद्ध थांबविण्याचे अलेक्झांडरकडून मान्यही करून घेतले; पण युद्ध थांबविल्यानंतर हे व्यावसायिक सैन्य परत जात असताना युद्ध थांबविण्याचे वचन मोडून अलेक्झांडरने त्यांच्यावर अचानक हल्ला केला व त्यांना कापून काढले. अलेक्झांडरच्या ह्या विश्वासघातकी कृत्याबद्दल त्याच्या चरित्रकारांनीही त्याला क्षमा केलेली नाही.

सिंधू प्रदेशातील नद्यांच्या जाळ्यातील दुसरी महत्त्वाची नदी झेलम (तिला ग्रीकांनी



'हिडॅस्पस' असे नाव दिले आहे.) ह्या नदीच्या परिसरात वेदिक काळापासून 'पुरु' वंशाचे राज्य होते. तेथील राजाच्या नावाचा उल्लेख आक्रमकांनी 'पोरस' असा केला आहे. ग्रीक आक्रमकाच्या विरोधात पोरस राजाने सर्वात मोठे सैन्य उभे केले. अलेक्झांडरने एका बाजूने नदी पार करण्याचे नाटक करून दुसऱ्याच जागी नदी पार केली. पुरूचे सैन्य रथांतून त्याला अडवायला गेले असता अलेक्झांडरच्या घोडदलाने त्यांची कत्तल केली. मुख्य लढाई दिवसभर चालली व त्यात पुरूचा निःपात झाला. स्वत: पोरस जखमी झाला व त्याने शेवटी शरणागती पत्करली.

ह्या लढाईच्या परिणामांचे वर्णन प्लुटार्चच्या शब्दात पहा :

"पण ह्या लढाईमुळे मॅसिडोनियन सैन्याचे धैर्य खचले आणि त्याची पुढील प्रगती बंद झाली. वीस हजार पायदळ व दोन हजार घोडदळ असणाऱ्या सैन्याचा पराभव करतानाच अलेक्झांडरला प्रयास पडले. त्यामुळे गंगा ओलांडून पुढे जाण्याचा विचारच अलेक्झांडरने सोडून दिला. गंगा नदी ही बत्तीस फर्लांग लांब व सहाशे फर्लांग खोल आहे. त्याशिवाय गंगेच्या तीरावर मुकाबला करण्याकरिता ताकदवान शत्रू खडा आहे हे अलेक्झांडरला कळून चुकले. गंगेच्या खोऱ्यात राज्य करणारा 'प्राच्य' राजा गंगारिदन हा ऐंशी हजार घोडदळ, दोन लक्ष पायदळ, आठ हजार सशस्त्र रथ व सहा हजार हत्ती घेऊन अलेक्झांडरला तोंड देण्यास तयार होता. केवळ अलेक्झांडरला घाबरविण्याकरिता उठवलेली ही वावडी नव्हती; कारण त्यानंतर काही थोड्याच काळात पूर्वेकडे राज्य करणाऱ्या सॅन्ड्रोकोटोस (चंद्रगुप्त मौर्य) ह्याने सेल्यूकोस (अलेक्झांडरचा मृत्यू झाल्यानंतर ज्याने त्याच्या राज्याचा पूर्वेकडील भाग ताब्यात घेतला तो अधिकारी) ह्यास पांचशे हत्ती केवळ भेट दिले. त्यानंतर लवकरच सॅन्ड्रोकोटोसने सहा लक्ष सैन्याच्या जोरावर सबंध भारत (अर्थात त्यावेळी जेवढा प्रदेश भारत ह्याअर्थी ओळखला जाई तेवढा) पादाक्रांत केला."

ह्या वर्णनात गंगेच्या खोलीसंबंधी केलेले विधान अतिरेकी आहे; पण गंगेचे पात्र जेव्हा पावसाळ्यात रुंदावते तेव्हा त्याची मोजणी मैलातच करावी लागते.

गंगेच्या पूर्वेकडील खोऱ्यात त्यावेळी मगधांचे एकुलते एक साम्राज्य वृद्धिंगत होत होते. गंगा व यमुना ह्या दोन्ही नद्यांचा वाहतुकीसाठी उपयोग केला जात होता. ह्या विकसित पावणाऱ्या साम्राज्याच्या त्या रक्तवाहिन्याच होत्या. पंजाबमधील आपसात लढाया करणाऱ्या टोळी संघ राज्यापेक्षा किंवा कुलगण राज्ये चालविणाऱ्या राजन्यांपेक्षा गंगेच्या खोऱ्यातील मगध राज्याची शक्ती किती तरी अधिक होती. तेथील नद्यांचे संरक्षण करणे ह्या साम्राज्याला केवळ क्रमप्राप्तच नव्हते तर तसे बळही त्या साम्राज्याकडे होते. ते असो; पण पोरसशी झालेल्या लढाईतच अलेक्झांडर योग्य तो धडा शिकला. मगध साम्राज्याची ताकदही त्याला ऐकून माहीत झाली असावी (हे प्लुटार्चच्या उताऱ्यावरून दिसते.) त्याचे सैनिकही लढायांना कंटाळले होते. अलेक्झांडरने सिंधू नदीच्या पूर्वेकडील प्रदेशात आपल्या नव्या सत्रापांची नेमणूक केली. हिमालयातील पाईन वृक्षांच्या लाकडांच्या जंगी बोटी बांधून सिंधू संस्कृतीतल्या प्राचीन व्यापारमार्गाने त्याचे सैन्य परत फिरले. त्या

मार्गावरून जातानाही वाटेत अनेक टोळ्यांशी त्याला लढाया कराव्या लागल्या. अनेक लहान सहान टोळी राज्ये धुळीला मिळवावी लागली. एवढे सर्व होईपर्यंत अलेक्झांडर व त्याचे सैन्य हतबल झाले होते. पुढचा प्रवास तर इराण ते बॅबिलोनिया ह्या अत्यंत कष्टप्रद मार्गाने त्याला करावा लागला. अर्धे सैन्य वाळवंटात नष्ट झाले. मलेरिया व अतिरेकी मद्यपान ह्यामुळे सैन्याचा व अलेक्झांडरचा अंत झाला. अर्थात उत्तुंग व्यक्तिमत्व व रोमांचकारक जीवन ह्यामुळे त्याचे नाव इतिहासात अजरामर झाले.

अलेक्झांडरचे आक्रमण भारतीय परंपरेवर फारसा परिणाम करू शकले नाही. पारंपरिक भारतीय साहित्यात त्याचा उल्लेखही नाही. उलट काही परदेशी इतिहासकार मात्र प्राचीन भारतीय इतिहासातील नोंद घेण्यायोग्य घडलेली अशी ती एकमेव घटना समजतात; पण ह्या आक्रमणाचा अनपेक्षित असा एक परिणाम झाला तो हा की, ह्या आक्रमणामध्ये पंजाबमधील टोळी-संघ राज्ये नष्ट झाली व त्यामुळे मौर्यांना साम्राज्य विस्तार करण्याकरिता ह्या प्रदेशातील प्रत्येक टोळी-संघ राज्यांशी किंवा गण राज्याशी लढाया कराव्या लागल्या नाहीत.

मॅसिडोनियन सैन्य केवळ आक्रमण करीत नव्हते, तर लढाईत जिंकलेल्यांना गुलाम करून नेत. त्यामुळे ही टोळी राज्ये व जानपदे संपूर्ण मोडली गेली व मौर्यांच्या साम्राज्य-विस्तारातील अडथळा दूर झाला. पंजाबमधील गुरेढोरे ग्रीक आक्रमकांनी फस्त केली किंवा लूट करून नेली. त्यामुळे पशुपालनावर आधारित असलेले टोळीबद्ध सामाजिक जीवन दुरापास्त झाले. अलेक्झांडर परत गेल्यानंतर केवळ पाचसात वर्षानंतर 'पोरस'चे राज्य अस्तंगत पावले.

चंद्रगुप्त मौर्याने थोड्याच काळानंतर पंजाब व तक्षशिलेचा प्रदेश ताब्यात घेतला. नंतर खिस्तपूर्व ३०५ सालापर्यंत उरलेला गांधार प्रदेश सेल्युकोस निकेटरकडून जिंकून घेऊन अफगाणिस्तानच्या अंतर्गत प्रदेशापर्यंत साम्राज्य स्थापन केले. विजयी मौर्य व सेल्युकोस ह्या दोन घराण्यात विवाहसंबंध जडले असण्याची कथा आहे. त्या विवाहात प्लुटार्चने सांगितलेले ५०० हत्ती भेट दिले असावेत. पण त्यानंतर सेल्यूकोसला भारतात राज्यविस्तार करण्यास वाव उरला नाही.

ग्रीक इतिहासकाराच्या विधानाचा आपण वर उल्लेख केला तो सेल्यूकोसचा पाटलीपुत्र येथील वकील मॅगेस्थेनिस ह्याच्या लिखाणावरून केला आहे. अर्थात मॅगेस्थेनीसचे स्वतःचे लिखाण नष्ट झाले असले तरी त्या लिखाणातले उतारे इतर ग्रीक इतिहासकारांच्या लिखाणात आढळून येतात. त्यावरून सेल्यूकोसच्या मुलीचे लग्न चंद्रगुप्त मौर्याच्या बिंदुसार ह्या मुलाशी झाले असल्याचाही उल्लेख त्याने केला आहे. या शक्यतेबद्दल दोन आक्षेप घेण्यात येतात. एक आक्षेप हा की, ग्रीकांच्या पद्धतीत हे लग्न बसण्यासारखे नव्हते व दुसरा आक्षेप हा की, भारतातील जीवनपद्धतीला असे लग्न मानवणारे नव्हते; पण लक्षात हे घेतले पाहिजे की, मॅसिडोनियन्स हे ग्रीस देशाच्या सरहद्दीवरील प्रांतात रहाणारे लढाऊ लोक होते. ग्रीकांच्या नागर संस्कृतीचे (सिटी स्टेट्स) नियम ते निक्षून पाळत



नसत. अलेक्झांडरने स्वत: दोन पार्शियन राजकन्यांशी विवाह करून अशा तऱ्हेच्या लग्नाचे उदाहरण घालून दिले होते. मौर्यांच्या बाबतीतही जातीच्या बंधनाचा फारसा प्रभाव असण्याची शक्यता नाही. मौर्य (पालि : मोरिया) ह्या नावावरून ते 'मोर' हे पशुदैवक मानण्याच्या मूळ आदिवासी समाजातून आले असावेत. नंतर जरी ते आर्य संस्कृतीच्या कक्षेत आले असले तरी त्याचे कूळ वैदिक आर्यांचे नव्हते. सम्राट अशोकाचीही पहिली पत्नी सांची (किंवा भिल्सा) येथील व्यापाराची मुलगी होती. गिरनारच्या भागातील अधिकारी 'पुष्यमित्र' हा त्याचा मेहुणा होता व तो वैश्य जातीचा होता.

चंद्रगुप्तमौर्य व त्याच्यानंतर बिंदुसार ह्यांनी जेथपर्यंत मजल मारता येईल तेवढा सर्व प्रदेश आपल्या अमलाखाली आणला. कूर्ग आणि म्हैसूरमधल्या वायनाड प्रदेशातील घनदाट जंगले ह्यांनी त्याची प्रगती रोखली असावी. दक्षिण पथावरील व्यापार हा जरी त्या काळी वाढत होता तरी तेथील प्रदेश अजूनही मागासलेल्या अवस्थेतच होता. तेथील आदिवासी समूह जीवनाचे रूपांतर शेती व्यवसायी जीवनात काही जलद गतीने झाले नाही. दक्षिणेकडील प्रदेशांत सागरी मार्गाने दूरच्या पल्ल्यावरील व्यापार वाहतूक सुरू झाली होती. सोपारा व भडोच ही सागरांवरील बंदरे मगधांच्या ताब्यात आली. तेथून जगातल्या इतर देशांशी होणारा व्यापार वाढू लागला. पाटलीपुत्र (पाटणा) शहराला आंतरराष्ट्रीय महत्त्व प्राप्त झाले. बिहारच्या आग्नेय प्रदेशातील तांब्याच्या खाणी व्यापक प्रमाणात विकसित करण्यात आल्या. तामलुक ह्या बंदरातून तांब्याची निर्यात होऊ लागली. त्याचप्रमाणे ब्रह्मदेश व इंडोनेशिया ह्या देशांशी व्यापारी संबंध प्रस्थापित झाले. मगध देशाच्या राज्यात चीनमधील रेशीम व बाल्क प्रदेशातील केसाळ जनावरांच्या कातड्याचा व्यापार होत असे. त्याची आयात खुष्कीच्या मार्गाने होत असे. त्याचप्रमाणे वृद्धिंगत झालेल्या व्यापारास आवश्यक असलेल्या चांदीच्या नाण्याचा वापर व्यापक प्रमाणात होऊ लागला. बंगालमध्ये मात्र ह्या काळात मोठ्या प्रमाणावर जंगले साफ करून जमीन लागवडीला आणलेली दिसत नाही. फक्त नद्याकाठची जंगले साफ करून काही थोड्याच भागात शेती व्यवसाय स्थापन केला गेला. त्यानंतर खिस्तपूर्व २७० व्या वर्षी चंद्रगुप्ताचा नातू अशोक ह्याने कलींग देशावर, (ओरिसावर) स्वारी करून तो प्रदेश साम्राज्याला जोडला. मध्यवर्ती राजसत्तेचा उदय होण्याइतका त्या भागाचा विकास झाला नसला तरी साम्राज्याने आक्रमण करून तो भाग आपल्याला जोडला ह्यावरून तेथेही काही विकसित समाजव्यवस्था निर्माण झालेली असावी. कलिंगाच्या स्वारीमध्ये अशोकाला धक्का बसण्याइतपत प्राणहानी करावी लागली, ह्याचा अर्थ तेथे समर्थ कुलगणराज्ये निर्माण झाली असावीत.

तर मगधाचे साम्राज्य हे फार मोठ्या विस्तारित प्रदेशावर प्रस्थापित झाले त्या प्रदेशातून अगदी अश्मयुगांच्या अवस्थेत रहाणारे रानटी जनसमूह होते आणि त्याअगोदर ग्रीकांच्या अमलाखाली असलेले (ज्यांनी कदाचित ॲरिस्टॉटलचा संदेश ऐकला असेल असे) असेही लोक होते. राज्यकारभाराकरिता तक्षशिला व उज्जैन ह्या उपराजधान्यांची स्थापना करण्यात आली व राजपुत्रांनाच तेथले प्रमुख नेमण्यात आले. तक्षशिला येथे

राजपुत्र अशोक सुभेदार होता; कारण त्याने तेथील सुभेदार ह्या नात्याने बंडाचे दमन केले असल्याचा उल्लेख आहे. पाणिनी ह्या वैय्याकरणीचा (व्याकरणकार) जन्म तक्षशिलेच्या परिसरातच झाला. पण सांस्कृतिक केंद्र ह्या अर्थाने तक्षशिलेचे परंपरागत महत्त्व मगधांच्या साम्राज्यात कमी झाले; कारण महत्त्वाकांक्षी विद्वान आता तक्षशिलेऐवजी पाटण्यात मुक्काम ठोकू लागले. पुढे अनेक शतकानंतर कुशाणाच्या राज्यात तक्षशिलेला पुन्हा महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले.

मगधांच्या साम्राज्यानंतर दक्षिण पथावरील व्यापारात चांगलाच नफा मिळण्याची संधी मिळू लागली. लोखंड मुबलक प्रमाणात मिळू लागले; पण चांदी व तांबे यांचा तुटवडा पडू लागला. ह्या भागात सैन्य व साम्राज्य ह्यांच्या शिरकाव व्हावयाच्या अगोदर काही व्यापारी, साधू व भिक्षू ह्यांनी प्रवेश केला होता. त्यांनी नव्या अगोदरच लागवडीस न आणलेल्या जमिनी (व्हर्जिन लँड्स्) लागवडीस आणण्यास सुरुवात केली होती. वस्तूंचा देवघेव पद्धतीचा विनिमयही सुरू केला होता. कार्ले येथील सर्वांत मोठ्या चैत्यावरील लाकूडकाम हे रेडियो कार्बन चांचणीप्रमाणे ख्रिस्तपूर्व २८० सालाचे आहे. त्या विहारातील काही खोल्या त्यापेक्षाही शंभर वर्षे अगोदर खोदल्या गेल्या आहेत, असा अंदाज आहे. कार्ले येथील लेणी हे बौद्ध भिक्षूंचे विहार होते. त्याच्या जवळच धेनुकाकट येथे बुद्ध धर्मीय असलेल्या ग्रीक व्यापारांची वसाहत होती. कार्ले येथील लेण्यात या व्यापाऱ्यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ कोरलेले खांब आहेत. सम्राट अशोकाच्या काळात 'धम्म-राखिता' नावाचा एक बुद्धधर्मीय ग्रीक धर्मोपदेशक अफगाणिस्तानच्याही पलीकडे गेला होता. ही उदाहरणे केवळ अपवादात्मक नाहीत, कारण ह्या बुद्धधर्मीय लेण्यांत स्फिंक्सचे अनेक पुतळे कोरून काढले आहेत. त्यात कार्ले येथील एका खांबावर आधारित असलेले स्फिंक्सचे शिल्प ग्रीक व बुद्धधर्मीय ह्यांच्या त्या काळातील परस्परसंबंधावर खास प्रकाश टाकणारे आहे. हे शिल्प अक्षरश: अलेक्झांड्रिया येथून आणलेल्या एखाद्या स्फिंक्सच्या पुतळ्यावरून खोदलेले असावे. ग्रीक व भारतीय संबंधातले हे सातत्य पुढे ख्रिस्तपूर्व दुसऱ्या शतकाच्या सुमारास झालेल्या मेनेण्डर ह्या ग्रीक अधिपतीच्या आक्रमणाने टिकवून धरले. मॅनेण्डर (मिलिन्द) अलेक्झांड्रिया येथे जन्माला आला. पण त्याने बुद्धधर्माच्या प्रचारकांना उत्तेजन दिले. आपल्या नाण्यांवर त्याने स्वत:ला धम्मका (पाली शब्द) डिकॉयीस (ग्रीक शब्द) म्हणवून घेतले आहे. दोन्ही शब्दांचा अर्थ 'न्यायी' असा आहे, 'मिलिंदपन्हो' ह्या पुस्तकामुळे मिलिंद अजरामर झाला. बुद्ध धर्माच्या मूलतत्त्वांवर या पुस्तकात सांगोपांग चर्चा केली आहे.

ख्रिस्तपूर्व तिसऱ्या शतकापर्यंत मौर्य साम्राज्याने भारताच्या चतु:सीमा गाठल्या व आपल्या संस्कृतीचे लोण विविध भागात नेऊन पोहोचवले. हे सर्व साधण्याकरिता ज्या कठोर राजनीतीचा अवलंब केला गेला, त्याचा विचार करणे आवश्यक आहे.



## मगध साम्राज्याची राजनीती

गंगेच्या खोऱ्यातील राजन्यांनी ख्रिस्तपूर्व सहाव्या शतकांत बुद्धधर्मासह सर्व नव्या धर्मांची तत्त्वे सहानुभूतीपूर्वक ऐकून घेतली, त्याचा पाठपुरावाही केला **तरीसुद्धा ते धर्म किंवा ती तत्त्वे अजातशत्रूसारख्या राजकुमाराचे मन आपल्या बापाचा खून करण्यापासून त्याला परावृत्त करू शकली नाहीत.** बुद्धधर्माने चक्रवर्ती राजाला उपदेश केला होता की राजाने बेकारी नष्ट करण्याकरिता शेतकऱ्यांना जमिनी व पेरणीकरिता धान्य द्यावे. व्यापाऱ्यांना पतपुरवठा करावा वगैरे; पण त्या वर्धिष्णु साम्राज्याची राजनीती मात्र अशा व्यवहारी पण उदार अशा उपदेशापासून दूरच राहिली. प्रत्यक्ष व्यवहारात ह्या साम्राज्याची राजनीती कशी होती हे पाहण्याकरिता ती नीती विशद करणारा ग्रंथ 'अर्थशास्त्र' ह्याचे विवरण करणे आवश्यक आहे. प्रसिद्ध इतिहासकार ए. बी. कीथ ह्याने ह्या पुस्तकावर जो शेरा मारला आहे तो असा "प्लेटोचे रिपब्लिक किंवा क्सेनोफोनच्या नावावर सांगितलेला अथेन्सच्या घटनेवरील ग्रंथ ह्यांच्या तुलनेत राजनीतीवरील ग्रंथ म्हणून जर का अर्थशास्त्र हेच लिखाण ऐतिहासिक भारताने जगासमोर ठेवले असेल तर ती दु:खाची गोष्ट आहे." पण हा शेरा ढोंगीपणाचा व संदर्भहीन आहे. अलेक्झांडर हा राजा ॲरिस्टॉटलचा शिष्य होता, तरी ॲरिस्टॉटलचे राजकीय विचार किंवा कल्पना त्याला कृतीमध्ये आणता आल्या नाहीत. अथेन्सच्या घटनेत व्यवहार व शहाणपणा आहे तरी ॲथेन्समधील तथाकथित लोकशाही काही काळानंतर कोसळून पडली, त्याला कारणीभूत प्लेटोचे शिष्यच होते. निकियास, अल्कि-बिडीयास, क्रिटीयास हे व इतर प्रतिष्ठित धनवंत साक्रेटीसच्या चाहत्यामध्ये होते, असे साक्रेटीसच्या 'डायलॉग' ह्या ग्रंथावरून दिसून येते. पण त्यांनी साक्रेटीसचे गणराज्याचे (रिपब्लिक)चे स्वप्न प्रत्यक्षात आणण्याकरिता काहीच केले नाही. ह्याउलट भारतातील शासनव्यवस्था अगदी प्राथमिक स्थितीमधून विकसित होत होत एकतंत्री सार्वभौम राजे-शाहीच्या अवस्थेपर्यंत सरळ विकसित होत गेली. ग्रीकांच्या प्राचीन इतिहासात शासन-संस्थेचे पाऊल पुढे पडल्यानंतर (म्हणजे अधिक प्रगत शासनसंस्था आल्यानंतर) पुन्हा अधोगतीचे पाऊल पडले. तसे भारतात झाले नाही. ग्रीकांचे राज्यशास्त्रांवरील ग्रंथ वाचायला बहारदार आहेत, पण त्या ग्रंथांचा काळ व तत्कालीन परिस्थिती पहाता, त्या ग्रंथांतील निष्कर्षांची कार्यवाही झालेली दिसत नाही. उलट भारताचे राजनीतीवरील ग्रंथ हे तत्कालीन परिस्थिती दर्शविणारे व प्रत्यक्षात बऱ्याच प्रमाणांत ज्यांची कार्यवाही झाली, असे ग्रंथ आहेत.

ह्या काळातील शासन संस्थेचे धोरण व व्यवस्थापन ह्यावर प्रकाश टाकणारा मुख्य ग्रंथ म्हणजे अर्थशास्त्र होय. ह्या ग्रंथाचा कर्ता चाणक्य किंवा कौटिल्य हा चंद्रगुप्त मौर्याचा मंत्री होता. त्याचे शिक्षण तक्षशिला येथे झाले असावे. पुढील काळांतील कथा व ललित साहित्य ह्यामधून चंद्रगुप्त मौर्याला गादीवर बसवण्याकरिता कटकारस्थाने करणारा अशी त्याची प्रसिद्धी झाली. कौटिल्य हा मुद्राराक्षस ह्या रोमांचकारक नाटकाचा

नायकही झाला. अर्थशास्त्रांत शासनव्यवस्थेचे जे चित्र दिसते, ते त्या काळातील माहिती असणाऱ्या इतर शासन संस्थांपासून इतके वेगळे आहे की, ह्या ग्रंथाच्या खरेपणाबद्दलही शंका प्रदर्शित केल्या जातात. बऱ्याच चर्चेनंतर आता त्या शंकांचे निरसन झाले आहे. त्याचा खरेपणा सिद्ध झाला आहे. तरीसुद्धा दोन मुद्यांबद्दल खास उल्लेख केला पाहिजे. पहिला मुद्दा हा की, त्या ग्रंथात काही मगध साम्राज्याच्या शासनव्यवस्थेचे वर्णन नाही तर राज्यसंस्थेला आवश्यक तत्त्व-सिद्धान्ताची चर्चा आहे. ग्रंथकर्ता म्हणतो—"जुन्या तज्ज्ञांनी राजनीतीवर लिहिलेल्या ग्रथाचा अभ्यास केल्यानंतर जगावर साम्राज्य स्थापण्याचे व राखण्याचे रहस्य समजावून देण्याकरिता हा ग्रथ लिहिलेला आहे." दुसरा मुद्दा हा की, मूळ ग्रथातील १/५ ते १/४ भाग गहाळ झालेला आहे. आणि तोसुद्धा कसा तर कुठलाही एक सलग विभाग हरवलेला नाही. सबंध ग्रंथभर लहान लहान तुकडे गहाळ झाले आहेत. सैन्याची संघटना व डावपेच ह्यावरच्या विभागाचे सर्वात जास्त नुकसान झाले आहे. वास्तविक मगध साम्राज्यात प्रचंड प्रमाणात खडे सैन्य ठेवण्याची प्रथा होती. खिस्तपूर्व दुसऱ्या काळापर्यन्त चालू असलेली ही प्रथा नंतरच्या सरंजामदारीच्या काळात हळूहळू बंद झाली. शासनसंस्था, लष्कर, सैनिकी डावपेच इत्यादींमध्ये नंतरच्या काळात एवढा बदल झाला की, ह्या ग्रंथात वर्णन केलेली तत्त्वे व धोरणे प्रत्यक्ष परिस्थितीला लागू करणे पुढे अशक्य झाले, अधिक तांत्रिक शब्दांचा अर्थ लागेनासा झाला. अर्थशास्त्र हा शीर्षकाचा अर्थ शासनाचे 'अर्थकारण' किंवा 'शासनाचा भौतिक फायदा साधण्याचे अर्थकारण असा होतो, तेव्हा ग्रंथाचे उद्दिष्ट स्पष्ट होते. **ह्या ग्रंथात कोठेही उच्च नीतीमत्तेचा किंवा त्यागाचा आव आणलेला नाही.** शासनसंस्थेसमोरील व्यावहारिक प्रश्नांचा विचार केलेला आहे. कठोर व विश्वासघातकी मार्गाचा अवलंब कसा करावा, हे सांगितले गेले आहे. उपाययोजना सुचवताना कुठली किंमत मोजावी लागेल व त्या उपाययोजनेमुळे काय साधेल व त्याचे दूरगामी परिणाम कोणते होतील त्याचा निर्लेपपणे विचार केलेला आहे. सामान्य नागरिकांचे जीवन नियंत्रित करण्याकरिता कडक कायदे सुचवले आहेत. कायद्याची अंमलबजावणी सुसूत्रपणे व सुसंवादीपणे करण्याकरिता कशी यंत्रणा उभारावी हेही विशद केलेले आहे. अर्थशास्त्रात सांगितलेले मार्ग दुटप्पी पणाचे आहेत; एवढ्याकरिता त्याचा पुढे त्याग करण्यात आला आहे, हेही खरे नाही. खरे कारण हे की, त्या ग्रंथात सांगितलेल्या विविध मार्गांचा अवलंब केल्यानंतर जेव्हा मगध साम्राज्याचा राजकीय व सामाजिक विस्तार झाला, तेव्हा राजसत्तेसमोर नव्या समस्या उभ्या राहिल्या. ह्या नव्या राजकीय व सामाजिक परिस्थितीत अर्थशास्त्रातील मार्ग कालबाह्य व टाकाऊ झाले. अर्थात इसवीसनाच्या बाराव्या शतकापर्यंत ह्या ग्रंथाचे वाचन व पठण होत होते. **प्रत्येक शासनसंस्थेला वर्गीय पाया असतो. ब्राह्मणग्रंथातून दिसून येणारी यज्ञयाग करणारी जी टोळी-संघ राज्ये (ट्रायबल किंग्डमस्) होती त्यांचा शासनसंस्थेचा मुख्य आधार क्षत्रिय कुळे व त्यांचे संबंधित हा होता. म्हणजेच प्रत्यक्षात काही क्षत्रिय कुळांची सत्ता त्या**



**संघ राज्यांत अस्तित्वात होती. हे क्षत्रिय राजन्य इतर क्षत्रिय कुळांच्या मदतीने, ब्राह्मण पुरोहित वर्गाच्या धार्मिक साहाय्याने वैश्य व शूद्र वर्गांचे शोषण करीत. त्यांना दडपून टाकत असत. आपली सत्ता वाढण्याकरिता आपसात लढायाही करीत. नंतरच्या मध्ययुगीन काळातील सरंजामदारी राज्ये सामान्य शेतकऱ्यांकडून कर वसूल करणाऱ्या जमीनदार वर्गांच्या पायावर उभी होती. हे जमीनदार कर गोळा करीत.** शासनाला (राजा, मांडलीक राजा किंवा अधिक वरच्या दर्जाचा सरदार) ह्यांना सैन्य पुरवीत. सरंजामदारी व्यवस्थेत कुळाला जमीनदाराशी, जमीनदाराला सरदाराशी, सरदाराला (मांडलीक किंवा मुख्य) राजाशी इमान राखावे लागे त्यांतून 'स्वामीनिष्ठा', 'इमान' वगैरे श्रद्धा व मूल्ये निर्माण झाली व त्या पायावरच सरंजामदारी टिकून राहिली. अर्थशास्त्राच्या काळांत जी अनेक टोळी किंवा गणराज्ये होती, त्यांच्यामध्ये खाजगी मालकीच्या तत्त्वांचा उगम झाला. जमातीमधील अंतर्गत ताण वाढून गणव्यवस्था कोसळून पडू लागली. ह्या टोळी-गण समाज व्यवस्था असणाऱ्या जानपदांत जरी शेती व्यवस्थेचा उगम झाला होता, तरीही पशुपालन व पारध हेच मुख्य व्यवसाय होते. शेती व्यवसायाच्या वाढीकरिता जंगले साफ करण्याची आवश्यकता निर्माण झाली होती. सर्रास खाजगी मालकी अस्तित्वांत आलेली नव्हती.

ह्या संदर्भात अर्थशास्त्रांत सांगितलेल्या शासनव्यवस्थेकडे पाहिले पाहिजे. **ही शासनव्यवस्था मोठ्या प्रमाणात जंगले साफ करून जमिनी लागवडीखाली आणू पहाणारी सर्वांत मोठी जमीनदार असलेली, खाणी व तत्सम उद्योगांची चालक व मालक असणारी व वस्तूंचे उत्पादन व्यापार मुख्यतः विनिमयाकरिता करणारी अशी शासनव्यवस्था ही समाजात वाढत असणाऱ्या गृहपती, शेतकरी व व्यापारी वर्गाच्या विकासाकरिता आवश्यक झाली होती.** ह्या शासनव्यवस्थेने राज्ययंत्रणेमध्ये वरपासून खालपर्यंत नोकरशाही निर्माण केली. मगध राज्यात पाच लाख खडे सैन्य होते. त्याचे अनेक स्तरावरील व जाती-मधील अधिकारी होते. सैन्यापासून वेगळी अशी गुप्तहेर संघटना होती. त्यातही अनेक अधिकारी होते. पुढे ह्या नोकरशाहीमधूनच शासनसंस्थेचे दप्तर सांभाळणे किंवा कारकुनी करणे, अशी कामे करणाऱ्या लोकांची 'कायस्थ' ही जात तयार झाली. अर्थशास्त्रात 'गुप्तहेर' व शत्रूच्या गोटात फाटाफूट करण्याच्या यंत्रणेवर भर दिला आहे. शासनाचे संरक्षण व फायदा व्हावा ह्या उद्देशाने ह्या यंत्रणेचा वापर करण्याचे आवाहन केले आहे. सामाजिक नीतिमत्तेबद्दलच्या आदर्शवादी सिद्धांताची चर्चा त्या ग्रंथात नाही. राजाच्या गुप्तहेराने मन विचलित होऊ न देता खून, विषप्रयोग, खोटे आरोप करणे, दुसऱ्या राज्यात बंडाळी माजवणे, शत्रूपक्षाच्या गोटात जाऊन कारवाया करणे अशा सर्व मार्गांचा अवलंब करावा, असे निःसंकोचपणे त्या ग्रंथात सांगितले गेले आहे. सर्वसामान्य जनतेचे नियंत्रण करण्याकरिता उभी करण्यात आलेली पोलिसी यंत्रणा अगदी दक्षतेने व कठोरपणे अंमलात

आणली जात असावी, असेही ह्या ग्रंथावरून दिसून येते. ह्या बाबतीत चाणक्याचे विचार किती मार्मिक होते ते पहा. शासकीय नोकरांकडून लाचलुचपत होऊ नये, ह्याकरिता अनेक उपाय सुचवल्यानंतरही काहीशा निराशावादी सुरात चाणक्य म्हणतो, 'पाण्यात पोहोणाऱ्या माशाला पाणी पिण्यापासून थांबवणे आणि त्याने किती पाणी चोरून प्यायलेले आहे हे समजणे जसे कठीण तद्वतच शासकीय अधिकाऱ्यांना पैसे खाण्यापासून परावृत्त करणे व त्याने खाल्लेल्या पैशाची मोजदाद करणे कठिण आहे." **अर्थशास्त्रात सांगितलेले शासन हे एका संक्रमणावस्थेतील आहे.** त्या शासनात उदयोन्मुख वर्ग संपूर्णपणे सत्ताधारी झालेला नाही; पण त्याचा ताबा वाढत आहे. त्याबाबत भारत व चीन ह्यांच्या प्राचीन इतिहासातील समान टप्पा व फरक ह्यांच्या निर्देश करणे उपयुक्त ठरेल. चीनमध्ये स्थापन झालेल्या पहिल्या सार्वभौम राजेशाहीतील पंतप्रधान चि. सी टँग (खिस्तपूर्व २२१ वे वर्ष) स्वत: व्यापारी वर्गातील होता. त्या शासनयंत्रणेतील व्यापारी वर्गाचे महत्त्व नंतर कमी झाले. पण काही काळ नियमित परीक्षापद्धतीने शासन यंत्रणेत विशिष्ट प्रकारची नोकरशाही निर्माण करून व्यापारी वर्गाने त्यावर ताबा मिळवला होता, अर्थशास्त्राच्या काळात गंगेच्या खोऱ्यातही 'गहपती' (गृहपती) हा व्यावसायिक शेतकरी व व्यापारी वर्ग निर्माण झाला होता. त्यांना जरी शासनयंत्रणेत मोक्याच्या जागा नव्हत्या, तरीही राजदरबारी फार मान असे. अर्थशास्त्रांतील राजाच्या अंगी अनेक असामान्य गुण असावे लागत. ठरलेल्या वेळेनुसार त्याला अनेक कामे पार पाडावी लागत. अर्थशास्त्रात राजाच्या ज्या अनेक जबाबदाऱ्या सांगितल्या आहेत त्या पहाता त्याला केवढे काम करावे लागे ते दिसून येते. वेगवेगळ्या अधिकाऱ्याकडून येणाऱ्या अहवालाचे वाचन करणे, गुप्तहेराकडून आलेल्या बातम्या ऐकणे, मंत्र्यांशी चर्चा करणे, इतकेच काय पण विश्रांती, झोप, करमणूक व जनानखाना ह्याकरिताही ठरलेल्या वेळा आहेत. त्याशिवाय राजाने, कटकारस्थाने, विषप्रयोग अचानक हल्ले ह्यापासून खबरदारी घ्यावी; असाही इशारा अर्थशास्त्र राजाला देते.

ह्यामधून त्या काळात निरनिराळ्या राजांच्या घरात किंवा गोटात ज्या बंडाळ्या माजत किंवा बदल होत त्याचे दर्शन होते. ह्या काळांतील नाण्यांमध्ये होणाऱ्या अचानक बदलांवरूनही त्याचा प्रत्यय येतो. अजातशत्रूनंतर दोन पिढ्यांतच राज्यपालट होऊन शिशुनाग राज्यावर आला तेव्हा जुन्या नाण्यावर त्याने नवे शिक्के मारले व नवी नाणी व्यवहारांत आणली. सबंध उत्तर पथावर (उत्तरेकडील व्यापारी मार्ग) मगधांचा व्यापार व नाणी ह्याचे वर्चस्व होते. अशा नाण्यांचे साठे तक्षशिलेला सापडलेले आहेत. त्यानंतर नंदाचे (किंवा नंदीचे) राज्य आले. नंद हे शिशुपालाच्या संबंधित अशा वंशाचे होते. त्याच्या नाण्यावरही सार्वभौमत्वाचे निदर्शक 'चक्र' आहे. ह्या काळापर्यंत म्हणजे बुद्धाच्या मृत्यूनंतर शभर वर्षे झाल्यानंतर मगध साम्राज्याची राजधानी पाटणा शहरी कायमची प्रस्थापित झाली. पाटणा शहराला महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले. त्यानंतर महापद्म ह्या राजघराण्याबाहेरील कर्तृत्ववान माणसाने हिंसाचार केल्याशिवाय नंदाचे राज्य बळकावले. महापद्म नंदाच्या सगळ्यांत धाकट्या मुलाचा गादीवर आल्यानंतर खून करण्यात आला व राज्यपद चंद्रगुप्त मौर्याकडे आले.



राज्यपद मिळवण्याकरिता व टिकवण्याकरिता करावी लागणारी कारस्थाने ही साहजिक व आवश्यकच असतात त्याला इलाज नाही—अशा पद्धतीनेच कौटिल्याने त्याबद्दल लिहिले आहे. नीतिमत्ता, पितृप्रेम किंवा सहानुभूती असल्या भावनांना तेथे जागाच नाही. "राजपुत्र हे खेकड्यासारखे आपल्या जन्मदात्याला मटकावणारे असतात" असे तो चक्कपणे सांगतो. कौटिल्याने आपल्या अगोदरच्या राजनीतिनिपुण विशारदाच्या विचारांचाही परामर्श निर्विकारपणे घेतलेला आहे. राजपुत्राला कसे व कोणते शिक्षण द्यावे. अकाली राज्यतृष्णा त्याच्यात बळावू नये ह्याकरिता कोणते उपाय योजावेत, ते कसे तपासून पहावे, तसे होत असल्यास किंवा तो चोरून व्यसने करीत असल्यास त्याला कसे आवरावे, वगैरे गोष्टींचा विचार केला आहे; पण पुढल्याच प्रकरणात हद्दपार झालेल्या युवराजाने आपल्या पित्याच्या हातून सत्ता बळकावण्याकरिता कुठले झटपट मार्ग अमलात आणावे, हेसुद्धा सांगितले आहे. कोणतीही नावे किंवा निश्चित घटना ह्या ग्रंथात सांगितल्या नाहीत. एक संदर्भ मात्र महत्त्वाचा आहे. तो आहे अपरुद्ध राजपुत्राचा. अपरुद्ध माणूस पूर्वीसारखा केवळ टोळी किंवा गणापासून बहिष्कृत होत नसे, तर त्याला राज्याच्या हद्दीबाहेर घालवून देत व क्वचित त्याचे सर्व नागरी अधिकारही हिरावून घेतले जात.

मगध राज्यातील राजघराण्यात जे बदल होत होते, त्याचा काहीही परिणाम मगध साम्राज्याच्या सतत होणाऱ्या विस्तारावर झाला नाही. सत्तास्पर्धेमुळे ज्या अंतर्गत लढाया होत त्याचाही परिणाम साम्राज्याच्या अंतर्गत किंवा बाह्य धोरणावर होत नव्हता. अर्थशास्त्रातही तशा धोरणात्मक बदल होण्याचा संभव कल्पिलेला नाही. त्याचा अर्थ असा की, शासनव्यवस्थेची रचना निश्चित धोरणांच्या पायावर पक्की करण्यात आली होती. **अर्थशास्त्राच्या अकराव्या प्रकरणात त्या काळी स्वतंत्र, शस्त्रसज्ज व बलशाली असलेल्या गणराज्यांचा कसा पाडाव करावा, ह्याचे विस्तृत विवेचन केलेले आहे.** गुप्तहेराकरवी ती गणराज्ये आतून कशी पोखरावीत, गणराज्यांतील सभासदांत व जनतेत खाजगी मालमत्तेवर आधारलेल्या वर्ण (वर्ग) व्यवस्थेचा प्रादुर्भाव कसा करावा ह्याचे तंत्र सांगितले आहे. गणराज्यांतील प्रभावी नेते किंवा गट ह्यांना लाच व मद्य द्यावे; व्यक्तिगत स्वार्थ व अभिलाषा ह्यांचे आकर्षण त्यांच्यात निर्माण करावे; तशा वृत्तीला उत्तेजन द्यावे, गुप्तहेर, पुरोहित, भविष्यकथन करणारे, नर्तक, वेश्या, ह्या सर्वांचा उपयोग करून त्यांच्यात फाटाफूट पाडावी; गणराज्यांतील वरिष्ठ सभासदांना कनिष्ठांबरोबर रोटी–बेटी व्यवहार करण्यापासून परावृत्त करावे; आणि कनिष्ठ सभासदांना सहभोजन आणि विवाह ह्यांचा आग्रह धरण्यास प्रवृत्त करावे;—असे अनेक विविध मार्ग सांगितले आहेत. गणांमध्ये प्रतिष्ठा पावलेले जे अधिपती असत. त्यांच्याविरुद्ध सर्व तऱ्हेचा प्रक्षोभ निर्माण करावा; गणांतील तरुण सभासदांना किंवा सैनिकांना वृद्ध नेत्यांविरुद्ध किंवा सेनापतीविरुद्ध बंड करण्याकरिता उत्तेजन द्यावे; गणराज्यातील ज्या कुळांना परंपरेमुळे किंवा इतर कारणांमुळे कमी उत्पन्न मिळे, त्यांना तक्रारी निर्माण करावयास लावाव्या, इतकेच नव्हे

तर गुप्तहेराने गण सभासदांचे खून करून आरोप मात्र त्यांच्या गणातील विरोधकावर लादण्याचे प्रयत्न करावे;—अशा तऱ्हेचे डावपेच अर्थशास्त्रांत सांगितले आहेत. अंतर्गत दुफळी, भांडणे, लढाया व कारस्थाने उघड्यावर आल्यानंतर शांतता व सुव्यवस्था प्रस्थापित करण्याकरिता अर्थशास्त्रातील राजाने सरळ आक्रमण करावे व गणराज्य मोडून टाकून ते जानपद आपल्या राज्याला जोडावे, असा हा पोक्त सल्ला आहे. **असे गणराज्य मोडून टाकल्यानंतर त्या गणातील विविध कुटुंबांना दहा दहाच्या किंवा पंधरा पंधराच्या गटाने दूरवरच्या प्रदेशांत (एकमेकांपासून दूर) नव्या जमिनी-वर वस्ती करण्यास पाठवण्यांत येत असे.** प्रत्यक्षांत ज्या गणराज्यांची नावे माहिती आहेत, ती गणराज्ये दोन प्रकारची होती. कंभोज व सुराष्ट्र ही गणराज्ये शस्त्रसज्ज तर होतीच, पण शेती व व्यापार करणारीसुद्धा होती. लिच्छवी वज्जी, मल्ल, मद्र, कुकुर, कुरु, पांचाल व इतर काही गणराज्ये क्षत्रिय कुळांची होती. त्यांपैकी लिच्छवी व वज्जी गणराज्ये अजातशत्रूने मोडून काढली होती. पण ते गण काही नष्ट झाले नव्हते. नेपाळ येथे आढळलेल्या काही कोरीव आलेखांवरून ही नावे त्यानंतरही हजार वर्षेपर्यंत अस्तित्वात होती असे दिसून येते. इसवीसनाच्या चौथ्या शतकांतील चंद्रगुप्त ह्या गुप्त वंशातील राजाने लिच्छवी घराण्यातील कुमारदेवी ह्या स्त्रीबरोबर विवाह केला व तो राजा हा विवाह हे आपल्या श्रेष्ठपणाचे लक्षण मानत असे. मगध सम्राट महापद्म ह्याने सर्व क्षत्रिय घराण्याचा नाश केला व त्यानंतर नाव घेण्यासारखे क्षत्रिय घराणे शिल्लक राहिले नाही, असा शोक करणारी एक ओळ पुराणात आहे. हा संदर्भ बहुधा कुरु व पांचाळ उत्तर वेदकालीन पंजाबमधील क्षत्रिय कुलगणराज्याबद्दलचा असावा. ह्या गणराज्यांबद्दल काव्य व आख्यायिका ह्याशिवाय इतर उल्लेख शिल्लक राहिलेले दिसत नाहीत. पंजाबमधील उरल्यासुरल्या टोळी व गणराज्यांचा विनाश अलेक्झांडरच्या आक्रमणाने केला. कौटिल्याच्या काळा-पर्यंत मद्र किंवा कंभोज ह्या गणराज्यांचा मगध साम्राज्यांशी प्रत्यक्ष संबंध आला नव्हता. कौटिल्य हा तक्षशिलेचा, म्हणजे मगध साम्राज्याच्या सीमेवरील राज्यातून तो आलेला होता. तेव्हा ह्या गणराज्याचा व्यवहार त्याने जवळून पाहिला असावा. अजातशत्रूचा ब्राह्मण मंत्री वस्सकार (ज्याचा उल्लेख राजनीतिनिपुण म्हणून कौटिल्याने केलेला आहे) त्याने लिच्छवी गणांचा विनाश करण्याकरिता जे तंत्र वापरले तेव्हापासून विकसित झालेली राज्यशासनाची धोरणे, अर्थशास्त्रात एकवटलेली आहेत.

## ६·३
## अर्थशास्त्रातील राज्यव्यवस्था

जानपद (म्हणजे आता ज्याला साधारणपणे जिल्हा म्हणता येईल) हे अर्थशास्त्रातील राज्यव्यवस्थेचे सर्वांत तळचे पायाभूत घटक होते. 'जानपद' म्हणजे गणराज्याचे किंवा टोळीचे मुख्य स्थान हा पहिला अर्थ नव्या राज्यात बदलला होता. गणराज्ये मोडल्या-नंतर गणांचे सामान्य सभासद व्यापक शेतकरी समाजात मिसळून गेले. वेगवेगळ्या



जानपदांच्या सीमा एकमेकांना लागून नव्हत्या (कारण मुख्यत: पूर्वीची गणराज्ये मोडून तेथे जानपदे स्थापन केली गेली होती) त्या जानपदांच्या सीमांच्या मधल्या भागात विस्तीर्ण जंगले होती व त्यात अन्न गोळा करून रहाण्याच्या अवस्थेत जगणारे आदिवासी समूहही होते. त्यांचा उल्लेख 'आटविका' असा करण्यात आला आहे. ह्या जंगलातून जानपदांना जळण, इमारती लाकूड, गवत, शिकार, चराऊ कुरणे वगैरे उपलब्ध होत असत. जंगलातील हिंस्र असणारे आदिवासी समूह नष्ट केले जात. रानटी टोळ्या व आक्रमण ह्यांच्या-पासून जानपदांचे संरक्षण केले जाई. आदिवासी समूहांवरही गुप्तहेरांकरवी देखरेख केली जाई. अनेक वेळा हे गुप्तहेर सन्याशांच्या वेषात वावरत असत. जंगलातील आदिवासी हे बलशाली व संघटित असल्यास आणि अन्नोत्पादक समाजात त्यांचे स्थित्यंतर होण्याच्या अवस्थेत ते असल्यास अगोदर सांगितलेल्या विविध मार्गाने त्यांचे उच्चाटन करून त्यांना अन्नोत्पादक (शेती व्यवसायी) समाजांत सामावून घेतले जाई. ख्रिस्तपूर्व तिसऱ्या शतकापर्यंत एकमेकांपासून विलग असलेल्या जानपदांच्या सीमा ह्या साम्राज्यांच्या सीमा सारख्याच महत्त्वाच्या होत्या. व्यापाऱ्यांच्या जथ्थ्यांना 'जानपद' प्रदेशांत शिरताना व तो प्रदेश सोडताना जकात कर द्यावा लागे. जानपदांच्या सीमा पार करणाऱ्या व्यक्तीला सरकारी अधिकाऱ्यांकडून लेखी परवानगी घ्यावी लागे. योग्य कारणाकरिताच फक्त अशी परवानगी मिळे व त्याबद्दल मोबदला घेतला जाई. सर्वसाधारणपणे जानपदाचे वरिष्ठ अधिकारी व स्थानिक पंचायत सदस्य हे त्या जानपदातीलच असत. चंद्रगुप्त मौर्याच्या काळात एखाद्या सुभेदाराचे नाव तुसुहास्प असे ग्रीक वळणाचे आढळते. पुढील काळांतसुद्धा गिरनारच्या ठाण्यावरती पार्शियन नावाच्या अधिकाऱ्याची नेमणूक झालेली आढळते. कारण त्या भागात पूर्वी पर्शियन असणाऱ्यांची वस्ती असावी.

प्रत्येक जानपदाचा सर्वश्रेष्ठ अधिकारी राजाला जबाबदार असे. त्याचा दर्जा राजाच्या मंत्र्याचा असे. त्याला मदत करण्याकरिता अधिकाऱ्यांचे वा पंचायतीचे एक मंडळ असे. त्याचा उल्लेख बहुमुख्या असा केलेला आहे. तशी नोंद ग्रीकांनी केलेली आहे. ह्या श्रेष्ठ पदकरिता होणारी निवड काळजीपूर्वक केली जाई. बुद्धिमत्ता, प्रामाणिकपणा व निष्ठा ह्या गुणांची परीक्षा केली जाई. गुप्तहेरांकरवी त्यांना लाच देण्याचा प्रयत्न करून त्यांच्या कामवासना चाळवून किंवा महत्त्वाकांक्षा जागृत करून तशा तऱ्हेचा कमजोरपणा त्यांचा आहे काय हे पाहिले जाई.

राजाचे हेर अनेक वेळा सधन व्यक्तीचे किंवा संन्याशाचे किंवा सामान्य नागरिकाचे रूप घेऊन लोकमत अजमावीत असत. कधी कधी असे लोकमत ते तयारही करीत. **(म्हणजे हल्लीच्या संपादकाचे काम करीत.)** नोकरशाही यंत्रणा अगदी ग्राम-व्यवस्थेपर्यंत पोहोचलेली होती. गावामध्ये (किंवा नगरांच्या पेठेमध्ये) **गोप** नावाचा अधिकारी असे. त्याच्याकडे गावातल्या प्रत्येक व्यक्तीच्या जन्ममृत्यूची नोंद असे. त्याच-प्रमाणे गावात येणाऱ्या व जाणाऱ्या प्रत्येक व्यक्तीची नोंद केली जाई. परकी माणसे, एकटेदुकटे व्यापारी, पाहुणे ह्यांच्यावर लक्ष ठेवले जाई. एखाद्या माणसास अचानक

संपत्तीचा लाभ झाल्यास किंवा त्याचे वर्तन संशयास्पद वाटल्यास त्याच्यावर खास लक्ष ठेवले जाई व त्याची बातमी वरिष्ठ अधिकाऱ्याकडे पोहोचविली जाई. व्यापाऱ्यांच्या जथ्थ्यांतही गुप्तहेर असत. राजाच्या अधिकाऱ्यांच्या नजरेतून काहीही निसटू नये, अशी दक्षता घेतली जाई. प्रत्येक महत्त्वाची बातमी किंवा घटना राजाच्या श्रेष्ठ अधिकाऱ्याकडे पाळीव कबुतरामार्फत पाठविली जाई. त्या अधिकाऱ्यांच्या आज्ञांचा संदेशही त्याच पद्धतीने पोहोचवला जाई. अशा रीतीने सर्वत्र सार्वभौम राजाचे अस्तित्व ठामपणे दाखवले जाई. जानपदांतील जमिनीचे दोन वर्ग होते. काही जमिनीवरील शेतकरी '**राष्ट्र**' नावाचा **कर** देत, तर काही जमिनी ज्यांना '**सिता**' म्हणत, त्या सार्वभौम **राजाच्या मालकीच्या** होत्या. पहिल्या प्रकारच्या जमिनी ह्या आर्य गणांनी लागवडीखाली आणलेल्या होत्या. गणराज्ये नष्ट केल्यानंतर राजाने त्या आपल्या अधिपत्याखाली आणल्या.

सर्वसाधारणपणे राष्ट्र प्रदेशातील शेतकऱ्यांचे उत्पन्न गोळा करणारे व कारभार करणारे एखादे मध्यवर्ती नागरी ठाणे असे व त्या नागरी ठाण्याच्या अन्न व इतर गरजा भोवतालच्या शेती प्रदेशातून पुरवल्या जात असत. राष्ट्र विभागातील शेती व्यवसायाचा व इतर आनुवंशिक कारभार सर्वसाधारणपणे जुन्याच प्रथांप्रमाणे चाले. अर्थात ज्या प्रथा राजाच्या सार्वभौम स्थानाला व राज्यकारभाराला अडथळा होतील अशा प्रथा बंद करण्यात आल्या होत्या. ग्रीकांच्या लिखाणात भारतातील ज्या स्वतंत्र नगरांचा (फ्री सिटीज)चा उल्लेख आहे, तो राष्ट्र विभागातील अशा नागरी ठाण्याबद्दलचाच असावा.

मौर्यांच्या सर्वसाधारण अधिपत्याखालील काही थोड्या राज्यांनी तर स्वतःच्या छापाची नाणीसुद्धा प्रसृत केली असल्याचे दिसते. ह्या नाण्यावर मध्यवर्ती सत्तेच्या टाकसाळीचे छाप आहेत. पण मध्यवर्ती सत्तेच्या सार्वभौमत्वाचे निदर्शक 'चक्र' ह्या मुद्रेऐवजी 'माणूस', 'चिलखत', 'ढाल' किंवा 'बाण' अशा मुद्रा आहेत. राष्ट्र भागातले करसुद्धा जुने पारंपरिक कर होते. पण ते सार्वभौम राजाच्या खास मंत्रलयातर्फे गोळा केले जात. गावे सबंध गावचा असा कर देत व त्याची विभागणी वेगवेगळ्या कुटुंबात त्यांच्या प्रथा पद्धतीप्रमाणे पंचायतीतर्फे केली जाई. शेतसारा हा एकंदर उत्पन्नाच्या सहाव्या भागाएवढा असे. (षष्ठांश पद्धती)

लष्कराच्या गरजेकरिताही खास वसुली केली जाई. तीसुद्धा गणसमाजांत लष्कर उभारण्याकरिता ज्या पद्धतीने केली जाई, त्याच पद्धतीने होई. पूर्वीच्या काळी यज्ञाच्या वेळी किंवा राज्यांच्या (टोळीप्रमुखांच्या) पुत्रजन्माच्या वेळी किंवा खास गणसभा भरण्याच्या वेळी 'बळी' हा भेटवजा कर गोळा करण्यात येई; पुढे हे टोळीप्रमुख (राज्यन्य) व त्यांचे सैन्य सार्वभौम राजाच्या काळात नाहीसे झाले तरीही पारंपरिक कर गोळा करणे चालू राहिले. द्राक्षाच्या मळ्यांवर वेगळा कर असे. धरणे किंवा कालवे शासन संस्थेच्या खर्चाने बांधले जात तो खर्च वसूल करण्याकरिता खास 'सेस' (म्हणजे तात्पुरता कर) लावला जाई. 'अर्थशास्त्रात' सांगितलेले काही कर नक्कीच अस्तित्वात होते, त्या वेळच्या आलेखावरून निश्चित होते. उदाहरणार्थ सम्राट अशोकाने लुंबीनी गावाला (बुद्धाचा जन्म तेथे झाला होता त्यामुळे) 'बळी' करापासून मुक्त केले व महसुलाचा दरही सहाव्या भागापासून आठव्या भागापर्यंत आणला असा आलेख आहे. पुढे सरंजामदारीच्या काळातही नजराणा देण्याच्या स्वरूपात हा कर चालू राहिला.



'सीता' जमिनीच्या प्रदेशातील परिस्थिती व शासनव्यवस्थेचा कारभार अगदी वेगळ्या धर्तीचा होता. ह्या जमिनी सार्वभौम राजसत्तेने लागवडीला आणल्या होत्या. पुढे 'सीता' जमिनीचे प्रमाण एवढे वाढले की, काही ग्रीक निरीक्षकांचे असे मत झाले की, भारतातील सर्वच जमिनी प्रत्यक्ष राजाच्या मालकीच्या आहेत. हे ग्रीक बहुधा गंगा नदीवरून पाटणा शहरापर्यंत म्हणजे नव्या लागवडीच्या प्रदेशामधून गेले असावेत. जंगले साफ करून नव्या जमिनी लागवडीला आणणे, हे अर्थशास्त्रातील राजाचे एक महत्त्वाचे कर्तव्य होते.

ह्या जमिनी लागवडीखाली आणण्याकरिता अनेक तऱ्हेने नव्या वस्त्या वसवल्या जात असत. कधी कधी प्रलोभने देऊन दुसऱ्या जानपदांतून आणलेले, कधी राजाच्या इतरत्र जमिनीवरील किंवा नष्ट केलेल्या गणराज्यांतील कुटुंबे, खास करून शेतमजूर असणारी शूद्र कुटुंबे सक्तीचे स्थलांतर करून आणली जात. (शूद्र वर्ण प्राया:) सम्राट अशोकाच्या कलिंग देशाच्या स्वारीनंतर सक्तीने आणलेल्या लोकांच्या संदर्भात ही अपवाह (जबरदस्तीने आणलेली) हा शब्द आहे त्यावरूनही ह्या निष्कर्षाला दुजोरा मिळतो. पण ही कुटुंबे 'गुलाम' नव्हती की भूदासही नव्हती. ते स्वतंत्र निवासी शेतकरी होते. त्यांच्या स्वातंत्र्यावर अनेक बंधने जरूर होती. ही बंधने सार्वभौम राजाचे उत्पन्न व वसुली नीटपणे व्हावी त्याचे नुकसान होऊ नये ह्यासाठीच घातलेली होती. 'सीता' जमिनीवरील कुळाला स्वत:च्या हयातभार जमीन कसण्याचा हक्क असे.

नवीन वस्त्यांची ही गावे ३–४ मैलांच्या अंतरावर बसवली जात. त्या गावाच्या सीमा काळजीपूर्वक निश्चित केलेल्या असत. दोन गावांमधील जंगले साफ केलेली असली तरीही दोन गावांच्या हद्दीत अंतर ठेवलेले असे. प्रत्येक गावात १०० ते ५०० शूद्रांची (कर्षक:) वस्ती साधारणपणे असावीच. त्या गावाचा कारभार करणाऱ्या अधिकाऱ्यांचे ठाणे असे. त्याचप्रमाणे दहा, दोनशे, चारशे आठशे अशा गावांच्या मागे चढत्या क्रमाने कारभारी केन्द्र असे व त्याच्याकडे थोडीफार शिबंदी असे. उत्खननांत सापडलेले 'पालगड' हे बहुधा असे ठाणे असावे. त्याचे अस्तित्व इ. स. पूर्व ३ ऱ्या शतकांतील असावे.

सीता जमिनीवरील कुळाला सर्वसाधारणपणे हयातभर जमीन कसण्याचा अधिकार होता. कसणाऱ्याने अशी जमीन जर स्वत: (साफ करून) प्रथम लागवडीला आणलेली असल्यास ती कसण्याचा हक्क त्यालाच मिळे. दुसऱ्यास मिळत नसे. अशा कुळांच्या वारसदारांनाही अशी जमीन हयातभर कसण्याचा हक्क दिला जाई; पण कुठल्याही शेतकऱ्याला आपली जमीन अधिकाऱ्याच्या परवानगीशिवाय दुसऱ्यास करावयास देता येत नसे. (विकत देण्याचा प्रश्नच नव्हता) त्याचप्रमाणे जमीन कसण्यात कुचराई झाल्यास जमिनीचे हस्तांतर होण्याचा धोका असे. 'सीता' जमिनीवरचे कर राष्ट्र जमिनीवरील करांपेक्षा जास्त

होते. कमीत कमी वसुली एकंदर उत्पन्नाच्या पाचव्या भागाएवढी असे आणि शासनातर्फे (धरणे किंवा कालवे बांधल्यामुळे) जेथे पाणीपुरवठा करण्यात येई, तेथून एकंदर उत्पन्नाचा कमीत कमी तिसरा भाग वसूल केला जाई. फक्त नव्यानेच लागवडीला आणलेल्या जमिनीवरील कर माफ केला जाई. चांगल्या दर्जाचे लाकूड, जंगलातले इतर उत्पन्न (मासे, शिकार व हत्ती राज्यांच्या मालकीची असे) ज्या जंगलात हत्तींची वस्ती असे, अशी जंगले साफ केली जात नसत. तशी मनाई होती. हत्तीची शिकार करणाऱ्याला मृत्युदंड मिळे. लढाई, जड वस्तूंची वाहतूक, नदीवरच्या पुलाची उभारणी इत्यादी लष्करी, निमलष्करी कामाकरिता हत्तीची आवश्यकता लागे. त्याशिवाय हत्ती हे प्रतिष्ठित लोकांचे वाहन होते. वैद्य, पशुवैद्य, सरकारी अधिकारी किंवा निवृत्त लष्करी अधिकारी ह्यांना 'सीता' जमिनीचा तुकडा मिळे व त्याचे उत्पन्न ते वापरू शकत; पण अशी जमीन त्यांना विकता येत नसे किंवा गहाणही टाकता येत नसे. लागवडीखाली असलेली जमीन कोणत्याही करणाकरिता मोकळी झाल्यास किंवा कोणत्याही कारणामुळे त्यावरील कुटुंबाच्या कसवणुकीचा हक्क नष्ट झाल्यास सरकारी अधिकाऱ्यांनी त्या जमिनीची कसवणूक स्वतःच्या देखरेखीखाली शिक्षा झालेल्या गुन्हेगारांकरवी किंवा शेतमजुरांकरवी करावी, असा आदेश अर्थशास्त्रात आहे. असे काम त्या गुन्हेगारांना त्यांचा दंड किंवा शिक्षा पुरी करण्यापुरतेच करावे लागे.

ह्या काळात फार मोठ्या प्रमाणावर गुलाम कामगार होते असे दिसत नाही; पण शिक्षा झालेल्यांना त्या शिक्षेच्या काळापुरते गुलाम म्हणून विकता येत असे. लागवडी-खालील जमिनीसुद्धा ज्यांच्याकडे श्रमाशिवाय विकण्यासारखे दुसरे काही नसे, त्यांना उत्पन्नाच्या अर्ध्या भागाच्या करारावर दिल्या जात असत. उरलेल्या अर्ध्या भागातून शासनाने दिलेली बी-बियाणे वसूल केले जाई. शासनाला मिळणारा अर्धा भाग हासुद्धा धान्य साफसूफ करून व भरडून द्यावा लागे. बहुधा ते काम शेतकऱ्यांच्या स्त्रिया करीत. बैल, नांगर, बीबियाणे व इतर उपकरणे सरकारी अधिकारी पुरवीत असत. पुढे सरंजामदारीच्या काळांत ह्या व्यवस्थेचे रूपांतर (बिहारमध्ये) 'सिस्टीम ऑफ हाफ्' म्हणजे शेतकऱ्यांकडून अर्धा हिस्सा घेण्याच्या प्रथेत झाले. ह्याला मराठीत अर्धेल पद्धत म्हणतात. अर्धेलीची प्रथा सरंजामदारीच्या काळात चालू राहिली व ब्रिटिशांनीसुद्धा त्याला मान्यता दिली. त्यामुळे भारतीय व्यवस्थेत प्राचीन काळापासून काहीच फरक पडला नाही, असा गैरसमज होण्यास मदत होते; पण मौर्यांच्या किंवा त्याअगोदरच्या काळात सार्वभौम राजा व शेतकरी ह्यांच्यात 'मध्यस्थ' नव्हते, ही गोष्ट विसरली जाते. 'सीता' जमिनीच्या बाबतीत फक्त लष्करातील जवानांना सवलत मिळत असे. राजाला उत्पन्नाचा पाचवा भाग देऊन जमीन घेण्याची कुवत ह्या जवानांकडे नसल्यास त्यापेक्षाही सवलतीच्या दराने त्यांना जमीन देण्यात येई. सेवानिवृत्त जवानांनासुद्धा ह्या सवलतीचा लाभ मिळू शकत असे. पुढे सरंजामदारी अवस्थेतही लष्करातील जवानांना खास सवलत देण्याची प्रथा चालू राहिली. त्यातून परंपरागत लष्करभरती होणाऱ्या कुटुंबाचा एक खास वर्गच तयार झाला.



निराधार मुले, म्हातारे-कोतारे, अपंग, विधवा व (निराधार) गर्भवती स्त्रिया इत्यादींची काळजी घेणे हे राजाचे कर्तव्य आहे, असे अर्थशास्त्रात सांगितलेले आहे. अर्थात कर्तव्याचा हा प्रकार पितृत्वाच्या प्रकारासारखा नसून मालकाने आपल्या गुराढोरांची काळजी घेण्याच्या प्रकारासारखा होता. सीता गावात 'सजात' लोक असल्यास फक्त त्यांनाच एकत्र जमण्याचा अधिकार असे, पण सर्वांना इतर कुठल्याही निमित्ताने एकत्र जमण्याचा अधिकार नव्हता. सार्वजनिक कामे करण्यासाठी (बांधबंदिस्ती करणे, गटारे बांधणे वगैरे) फक्त अधिकाऱ्यांच्या परवानगीनेच एकत्र येता येई. ह्या सार्वजनिक कामांत जो आपले श्रम बैल किंवा इतर साधने पुरवण्यात कुचराई करीत त्यांना दंड करण्यात येई. राजाच्या मालकीच्या जमिनीच्या क्षेत्रात कारागिरांना किंवा व्यापाऱ्यांना संघटित होण्याचा अधिकार नव्हता. धर्मांचे प्रचारक व धर्मसुधारक ह्यांना 'सीता' प्रदेशात प्रवेश करण्यास मनाई होती. फार तर धर्मप्रचारक नसणारा संन्यासी त्या प्रदेशामधून प्रवास करू शकत असे. (त्यामुळेच जैन किंवा बुद्ध धर्माच्या वाङ्मयात 'सीता' प्रदेशातील परिस्थितीचा उल्लेख आढळून येत नाही.) बुद्ध किंवा महावीर हे गणराज्यांचे रूपांतर राष्ट्र प्रदेशांत होण्याच्या काळातील आहेत. शासनाने लागवडीला आणलेल्या 'सीता' प्रदेशाचा काळ त्यानंतरचा आहे; पण बुद्ध किंवा महावीर ह्यांच्या उपासकांना तेथे जाण्यास मनाई असल्यामुळे तेथील परिस्थितीबाबत ते सर्वस्वी अनभिज्ञच राहिले. 'सीता' प्रदेशातील कुठल्याही गावकऱ्याला आपली सर्व मालमत्ता वाटून दिल्याशिवाय आणि कुटुंबियांची व्यवस्था केल्याशिवाय परिव्राजक (संन्यासी) होता येत नसे. स्त्रियांना संन्यासिनी करता येत नसे. त्यावेळी जंगलातले काही भाग विद्वान ब्राह्मणांना आश्रम बांधण्याकरिता दिले जात. त्यांच्याकडून कर गोळा केला जात नसे; पण कुठल्याही शेतकऱ्याला 'करदात्या' प्रदेशातून अशा आश्रमात किंवा कमी कर असलेल्या 'राष्ट्र', विभागात स्थलांतर करता येत नसे. इतकेच काय—सूत, (गायक, कवी) नर्तक, विदूषक, जादूगार इत्यादींनासुद्धा 'सीता' प्रदेशात जाण्याची बंदी होती. ह्या 'सीता' प्रदेशात सार्वजनिक सभा, खेळ किंवा करमणूक ह्याकरिता जागा नव्हत्या. चाणक्य स्पष्टपणे म्हणतो : 'गावकऱ्यांना असहाय करून त्यांचे सर्व लक्ष शेतीच्या कामावर केन्द्रित करण्यानेच राजाच्या खजिन्यात वसूल व द्रव्य यांची भर पडते. ह्या अशा गावामधूनच वेठबिगार, करणारे मनुष्यबळ, धान्य, तेलबिया वगैरे उत्पन्न मिळू शकते.' इ. स. पूर्व चवथ्या शतकातील ग्रीक निरीक्षकांनी आश्चर्याने अशी नोंद केली आहे : दोन सैन्यांत तुंबळ युद्ध चालू असतानाही भारतीय शेतकरी निर्विकारपणे शेतावर काम करीत असतात. 'सीता' प्रदेशातील शूद्र शेतकरी संपूर्णपणे निशस्त्र असल्यामुळे त्या वेळच्या नियमानुसार त्याला जीवितहानीचे भय नव्हते. लढाईत कुठलाही पक्ष जिंकला तरी त्याच्या जीवनात काही फरक पडत नसे. हेसुद्धा भारताच्या तथाकथित अपरिवर्तनीय समाजाचे एक लक्षण मानले गेले आहे. भारताच्या ग्राम जीवनांत दिसणारी ही उदासीनता जाणीवपूर्वक जोपासली गेली आहे. शासनाने निर्माण केलेली ही ग्रामव्यवस्था त्या शासनव्यवस्थेच्या विनाशा-

नंतरही टिकून राहिली व त्या विनाशाला कारणीभूत झाली. येथील समाजजीवनावर ह्या ग्रामव्यवस्थेचा न पुसला जाणारा ठसा शिल्लक राहिला.

जंगले साफ करून शेती व्यवसाय प्रस्थापित करणे हे जरी शासनव्यवस्थेचे त्या काळातील एक महत्त्वाचे कर्तव्य व धोरण असले तरीही ते काम फक्त शासनव्यवस्था करी असे नाही; नागरिकांचे गटसुद्धा साधारणपणे श्रेणी संघटित करून हे काम करीत असत. तेथील कर ह्या जमिनी राष्ट्र विभागातील आहेत की 'सीता' विभागातील आहेत, ह्यावर अवलंबून असे. बहुतांशी असे गट राज्याच्या किंवा जानपदांच्या सीमेबाहेरील प्रदेशांत काम करीत. त्याचा अर्थ असा की, ह्या नागरिक गटांना जंगलातील रानटी समूहांशी (आटविक) सशस्त्र लढा द्यावा लागे किंवा सलोखा ठेवून वाटाघाटी कराव्या लागत. नागरिकांचे हे गट साधारणपणे वस्तूंचे उत्पादन व व्यापार करणारे असल्यामुळे ते दोन्ही मार्गांचा अवलंब करीत. हे व्यापारी रानटी टोळ्यांतून सैनिकांची पथके तयार करून राजाच्या स्वाऱ्यांकरताही पाठवीत. आटविकांचा विकास होण्यात ह्या नागरिक व्यापाऱ्यांनी केवढी मदत केली, ते निश्चितपणे सांगता येत नाही, परंतु अर्थशास्त्रामध्ये 'राजाने आटविकांचा उपयोग टेहळणी करणे, सामान वाहून नेणे, इत्यादी दुय्यम सैनिकी कामाकरिता करावा, असे सांगितले आहे. रानटी टोळ्यांवर सुसंस्कृत जीवनपद्धतीचा परिणाम होण्यास त्यामुळे मदत झाली.

आपल्या शेजारच्या राज्यावर आक्रमण करण्याचे विविध मार्ग अर्थशास्त्रात सांगितलेले आहेत. एकाविरुद्ध दुसऱ्याशी तह करणे व मोडणे, लढाया करणे, विषप्रयोग करणे वगैरे वगैरे. अगोदरच्या काळात तोंडी केलेल्या तहालासुद्धा किंमत होती. पण अर्थशास्त्रामध्ये राजाने आपल्या सोयीकरिता कोणताही तह बेदिक्कतपणे मोडावा, असा राजाला सल्ला दिला आहे. जगातील इतर साम्राज्याप्रमाणे स्वारीचा हेतू खंडणी मिळवणे हा नव्हता. पराभूत राजा आपली गादी, आपले उत्पन्न व अधिकारी काही प्रमाणात राखून ठेवू शकत होता. जेता राजा फक्त लागवडीखाली जमिनीवर अधिकार प्रस्थापित करी. त्या ठिकाणी नव्या वस्त्या वसवणे, शेती व्यवसाय प्रस्थापित करणे व नव्या खाणी सुरू करणे, हे काम सार्वभौम राजाच्या वतीने व त्याच्या अमलाखाली होई. जीत राजाला जेत्या राजाचे मांडलीकत्व पत्करावे लागे. जमल्यास हे हक्क लढाया केल्याशिवाय तहनामे करूनसुद्धा प्रस्थापित केले जात. **इ. स. पूर्व पाचव्या व चौथ्या शतकामध्ये मगध साम्राज्यांत राजनीती हे शास्त्र मानले जाई. त्या शास्त्राप्रमाणे मध्यवर्ती शासन चालत असे.** इतर लहानसहान राज्ये हवे ते कर लावून जनतेची नागवणूक करीत. त्यामुळे प्रत्यक्षात त्यांचे उत्पन्न कमी होई. **अर्थशास्त्रातील सार्वभौम राजा शेती व्यवसाय-धंदे ह्यांची वाढ घडवून आणून आपले उत्पन्न वाढवीत असे.** पंजाबमधल्या टोळी राज्याबद्दल ग्रीकांनी असा शेरा मारला आहे की, त्यांना धातु उत्पादनाचे ज्ञान नव्हते की कुठलेही तंत्र नव्हते. पाणीपुरवठा करण्याकरिता होणाऱ्या रहाटांचा उपयोगही त्यांना ज्ञात नव्हता, पण मगध साम्राज्यांवर त्यांना तशी टीका करता आली नसती. अर्थशास्त्रांच्या शासनपद्धतींत खास करून 'सीता' प्रदेश सार्वभौम राजाच्या मालकीचे असल्यामुळे अनेक खाणी व पाणीपुरवठ्याच्या सर्व तऱ्हेच्या योजना त्यांनी अमलात आणल्या होत्या. जास्तीत जास्त वसुली व्हावी ह्याकरिता जास्तीत जास्त उत्पन्न निर्माण करण्याचा ह्या शासनव्यवस्थेचा प्रयत्न असे.

मौर्यांच्या काळानंतरही बऱ्याच काळपर्यंत शेती उत्पन्नाचा सहावा भाग हे शासनाच्या उत्पन्नाचे मुख्य साधन राहिले. नंतरच्या काळांत राष्ट्र व सीता प्रदेशातील फरक झपाट्याने नष्ट झाला. राष्ट्र शब्द नंतरच्या काळात देश (कंट्री) किंवा एकात्म प्रादेशिक राज्य (नेशन) ह्या अर्थी वापरला जाऊ लागला. पूर्वीच्या राष्ट्र जमिनीवरील कराप्रमाणे सहावा भाग हा राजाला महसूल म्हणून मिळत रहाणे चालू राहिले; पण तो कधी शेतकऱ्याकडून प्रत्यक्ष मिळे तर जमीनदार सरंजामदार वर्ग जो नवा मध्यस्थ वर्ग निर्माण झाला, त्यांच्याकडून वसूल केला जाई. जमीनदाराचे कूळ म्हणून कसणारा शेतकरी सीता जमिनीवरील कराप्रमाणे अर्धे उत्पन्न जमीनदाराला देई. ह्या खंडातून शेतसारा वजा जाता उरलेले उत्पन्न नंतर जमीनदार, सरंजामदारांना मिळू लागले. ह्या करपद्धतीने मूळ जरी मौर्यांच्या काळातील असले आणि राजेशाहीचे बाह्यस्वरूप जरी नंतर तसेच राहिले तरीही शासनव्यवस्थेची यंत्रणा ही ह्या मध्यस्थ सरंजामदार जमीनदारांच्या पायावर नंतरच्या काळात उभी होती. त्या सरंजामदार-जमीनदारांचे अधिकार जरी सर्वत्र सारखे नसले तरी ते प्रत्यक्ष व्यवहारात स्पष्टपणे मान्य करण्यात आले व शासनव्यवस्था चालवण्याची जबाबदारी ह्या वर्गावर पडली.

## ६·४
## शासन आणि व्यापाराकरिता उत्पादन

अर्थशास्त्रातील शासन हे प्राचीन काळातील जगातील दुसऱ्या कोणत्याही शासनव्यवस्थेपेक्षा एका बाबतीत अगदी वेगळे व खास वैशिष्ट्यपूर्ण होते. हे शासन मोठ्या प्रमाणावर व्यापाराकरिता वस्तूंचे उत्पादन करणारे शासन होते. शासनाचे मुख्य उत्पन्न 'सीता' प्रदेशातून केलेल्या धान्याच्या वसुलीचे होते. राष्ट्र प्रदेशातील करसुद्धा धान्याच्या स्वरूपातच गोळा केला जाई. ह्या धान्याचा आटा करण्याचे किंवा खाण्याच्या तेलाचे उत्पादन करण्याचे, कापड विणणे, लाकडाचे सामान करणे अशी अनेक कामे सरकारी देखरेखीखाली केली जात. ती बहुधा पगारी नोकरांकरवी केली जात असत. अशा कामगारांचा पगार अन्न व काही थोडे पैसे ह्या रूपातच दिला जाई. अर्थशास्त्रात अशा अनेक वस्तूंचे उत्पादन कसे करावे; हे उत्पादन करीत असता, उत्पादनाच्या विविध प्रक्रियेत मूळ स्वरूपातील वस्तूंचे प्रमाण किती व कसे कमी होते, वगैरे खुलासेवार वर्णन केले आहे. वस्तूंचे उत्पादन दुधारीने केल्यास अंतिम उत्पादन केवढे होईल, त्याचे वजन किती असेल हेही सांगितले आहे. अर्थशास्त्रातील हा भाग वाचत असता, आपण राजनीतीवरचा ग्रंथ वाचत नसून एखाद्या कारखान्यातील उत्पादनाबाबतची केली गेलेली नियमावली वाचीत आहोत असे वाटते.

सर्व उत्पादनाच्या आकडेवारीचे दफ्तर ठेवण्यात येई. त्यामुळे फसवणूक किंवा लबाडीला फारसा वाव नसे. सरकारी अधिकाऱ्यांनी हलगर्जी केल्यास वसुलीत होणाऱ्या नुकसानीच्या प्रमाणात त्यांना दंड करण्यात येई व जे अधिकारी उत्पादनात वाढ करून दाखवीत किंवा मूळ अंदाजपत्रकात नसलेले उत्पादनाचे मार्ग दाखवीत किंवा खर्चात बचत करून दाखवीत. त्यांना बक्षिस दिले जाई. इतकेच काय, उत्पन्नाचा अंदाज करण्याचे कामही अधिकारी करीत.

सरकारी उत्पादनाची विक्री होत असे. ह्या विक्रीचा बराचसा भाग शासनाच्याच इतर विभागाकरिता खास करून सैन्याकरिताच खर्च होई. पण त्या विभागाकरिताही वस्तूंची विक्री केली जाई व त्याचा पुरेपूर हिशेब ठेवण्यात येई. सैनिकांना चांगला पगार देण्यात येई. पण त्याबरोबरच मोहीम चालू असताना राजाने आपल्या सैनिकी तळावर गुप्तहेरांना व्यापाऱ्यांच्या वेषांत पाठवावे व आपला माल दामदुपटीने विकून पैसे परत मिळवावे असाही पोक्त सल्ला अर्थशास्त्रात दिला गेला आहे. प्रत्येक शासकीय अधिकाऱ्याला रोख रकमेत पगार मिळे. अर्थशास्त्रात वेगवेगळ्या शासकीय अधिकाऱ्यांचे पगार निश्चित केलेले आहेत. राज्याचा मुख्य पुरोहित, मुख्य सल्लागार, पट्टराणी, राजमाता, राजपुत्र, सेनापती या सर्वांना वर्षाला ४८००० 'पण' पगार मिळे. शारीरिक श्रमांचे काम करणाऱ्या सर्वात खालच्या दर्जाच्या कामगाराला वर्षाला ६० 'पण' पगार मिळे. मोहिमांवर असलेल्या सैनिकांच्या छावण्या तसेच राज्याची सार्वजनिक कामे याकरिता वेठ पद्धतीचा (विष्टीचा) अवलंब करण्यात येई; पण त्या कामगारांना जरी सक्तीने काम करावे लागत असले तरी त्यांना पगार देण्यात येई. पुढल्या सरंजामदारी पद्धतीच्या काळात मात्र 'विष्टी' शब्दाला नवीन अर्थ प्राप्त झाला. त्या काळात शेतकरी व कारागीर यांना बाह्यत: सार्वजनिक कामाच्या नावाने; परंतु प्रत्यक्षात राजा किंवा सरंजामदार यांच्याकरिता (फुकट) विनामोबदला काम करावे लागे. (ह्याला वेठबिगार म्हणू लागले) वेठीचे मुख्य काम म्हणजे खडतर प्रदेशात माल वाहून नेणे; सडका तयार करणे; कालवे खणणे; बांध-बंदिस्ती करणे यासारखे असे. शारीरिक श्रमाचे काम करणाऱ्या माणसास (मजुरास) जिवंत राहण्यास ६० 'पण' पगार आवश्यक आहे, असे अर्थशास्त्रात सांगितले गेले होते. (ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनी १८ व्या शतकात सर्वात खालच्या दर्जाच्या मजुराला महिन्याला १७·५ ग्राम्स चांदीची नाणी पगार (म्हणून) देत असे. त्याची किंमत बरोबर वर्षाला ६० 'पण' इतकी होत असे.) सुतार व इतर कारागीर यांना शासनाकडून १९० 'पण' पगार मिळे. सशस्त्र व प्रशिक्षित सैनिकाला ५०० 'पण' व वरिष्ठ अधिकाऱ्यांना हिशेब तपासनीस ह्यानाही ५०० 'पण' पगार मिळे व त्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना चढत्या श्रेणीने पगार मिळे. कारकून किंवा हिशोब-तपासनीस ह्यांनाही पाचशे 'पण' पगार दिला जाई. खाणीत काम करणाऱ्या कुशल कामगाराला एक हजार 'पण' पगार मिळे. जो हेर गृहस्थ, व्यापारी किंवा साधुसंन्यासी असे निरनिराळे वेष घेऊन गुप्त बातम्या काढीत असे त्यांनाही भरपूर पगार दिला जाई. एकंदरीत असे दिसते की,



मगध राज्यातील गृहपतीचे कमीत कमी उत्पन्न एक हजार 'पण' असावे, मारेकरी, विष-प्रयोग करणारे, स्त्री गुप्तहेर ह्यांना पाचशे 'पण' पगार मिळत असे. त्याचप्रमाणे जन्ममृत्यूची नोंद ठेवणारे, वसुली करणारे व गावांवर लक्ष ठेवणारे, ग्रामाधिकारी ह्यानाही पाचशे 'पण' पगार मिळे. संदेश-वाहकांना मिळणारी रक्कम त्यांच्या कामाच्या पल्ल्यावर अवलंबून असे. पल्ला जर लांबचा असेल तर रक्कम सामान्य दराच्या दुप्पट दराने मिळे. सरकारी नोकरींत असताना जे पंगू होत असत त्यांना; सरकारी नोकरांच्या निराधार मुलाबाळांना, तसेच नोकरीत असतांना मृत्यू पावलेल्यांच्या कुटुंबांना नियमित निवृत्तीवेतन मिळे. प्रदीर्घ काळ नोकरीत असलेल्यांना धान्य, वस्त्र किंवा इतर वस्तूंच्या रूपांत अधिकांश रक्कम दिली जाई. पण शासनाचे उत्पन्न कायमचे कमी होईल अशा रूपात काहीही दिले जात नसे. **पैशाची चणचण पडल्यास राजाने आपल्या खाजगी मालकींतील वस्तू विकावी; पण कुठल्याही परिस्थितीत जमीन किंवा गावाची विक्री करू नये, असा इशारा अर्थशास्त्राने दिला आहे.** वास्तविक चाणक्यासारख्या ब्राह्मण मंत्र्याकडून असा इशारा येतो, हे आश्चर्यजनक वाटावे. बिंबिसार (मगध) व पसेनदी (कोसल) ह्या राजांनी यज्ञकर्त्या ब्राह्मणांना गावेच्या गावे दान केली आहेत. त्याचप्रमाणे पसेनदीने वरच्या दर्जाच्या सेनाधिकाऱ्यांना गावे बक्षिस दिल्याचे उल्लेख आहेत. पुढे सरंजामदारीच्या काळात अशा तऱ्हेची वंशपरंपरागत वतने देण्याची प्रथा सुरू झाली व वाढली, पण अर्थशास्त्रात अशा जमिनींच्या देणग्या देण्यास विरोध दर्शवला आहे. राजसेवकाला फार फार तर सीता जमिनीचा एखादा तुकडा इतरांना लागू असलेल्या अटीवरच मिळू शके. अशा जमिनीची मशागत करून कर भरावा लागे. तो पंगू झाल्यासच त्याला सूट मिळे; पण परंपरागत मालकी हक्क मिळत नसे.

**ह्याचा अर्थ असा की, मगध साम्राज्याचा कारभार हा रोख चलन-व्यवस्थेवर आधारलेला होता.** 'पण' किंवा 'कर्षपण' ह्या शब्दामुळे काही गैरसमज निर्माण झाले आहेत. कर्षपण ह्या शब्दामुळे काही गैरसमज निर्माण झाले आहेत. 'कर्षपण' ह्या शब्दाला नंतर 'तांब्याचे नाणे' हा अर्थ प्राप्त झाला. पण अर्थशास्त्रातील 'पण' हे नाणे चांदीचे होते, हे अर्थशास्त्रातील निरनिराळ्या आदेशांवरून व त्या काळातील नाण्यांचे जे साठे आढळून येतात, त्यावरून दिसून येते. त्या काळातील ३·५ ग्राम वजनाची चांदीची नाणी भरपूर प्रमाणात आढळली आहेत. सोन्याचे एकही नाणे आढळलेले नाही व तांब्याची अगदीच थोडी आढळून आली आहेत. चंद्रगुप्त मौर्याकडे असलेले अवाढव्य सैन्य, त्या सैन्याच्या तळावरील काम करणाऱ्या इतर कामगारांची संख्या, इतर सार्वजनिक कामावरील वेठीचे कामगार आणि सर्व व्यवहार लक्षात घेता त्या काळात फार मोठ्या प्रमाणात नाण्यांची आवश्यकता वाटत असेल ह्यात शंका नाही. साम्राज्याच्या परिसरांतील सर्व खाणी शासनाच्या ताब्यात असत, हे लक्षात ठेवले पाहिजे खणीवरील शासकीय मक्तेदारीबद्दल चाणक्याने दिलेला आदेश असा :

**“राज्याची तिजोरी खाणीतून निर्माण होणाऱ्या संपत्तीवर आणि राज्याचे सैन्य त्या तिजोरीवर अवलंबून असते. ज्या राजाकडे भरलेली तिजोरी आणि भरपूर सैन्य असेल तोच चक्रवर्ती राजा होऊ शकतो. पंजाबमधल्या जुन्या टोळीवजा राज्यांना हे कळले नव्हते आणि अजूनही अनेक राजकारण्यांना जड उद्योगधंद्याचे महत्त्व कळत नाही.** असो. ‘अर्थशास्त्रा’त कच्च्या धातूच्या मातीपासून पक्का धातू कसा वितळावा, त्याचा दर्जा कसा ठरवावा ह्याबद्दलही काही थोडक्यात सूचना केलेल्या आहेत. पण कारागिराची साधने किंवा इतर उपकरणे ह्यांचे उत्पादन शासनाने करावे असा आदेश मात्र दूरान्वयानेसुद्धा दिलेला आढळत नाही. उत्पादित धातूंची विक्री शासनव्यवस्था व्यापाऱ्यांना, सोनारांना किंवा इतर कारागिरांना त्यांच्या श्रेण्यांना करीत असे. खाजगी व्यक्तीसुद्धा सरकारी टाकसाळीतून नाणी पाडून घेऊ शकत असत. खाजगी व्यक्तींनी आणलेल्या चांदीच्या तुकड्याचे वजन करण्यांत येई, व त्यांचा दर्जा बघण्यात येई. यानंतरच त्यांच्यावर अधिकृत मुद्रा मारल्या जात व त्यांना चलनाचे स्वरूप येत असे. खोटी नाणी पाडणाऱ्यांना कठोर शिक्षा देण्यात येत असे. कापड, भांडी, टोपल्या व इतर अनेक गरजेच्या वस्तूंचे उत्पादन खाजगी क्षेत्रांतच होत असे. खाजगी क्षेत्रांतील उत्पादकांचे व शासनाचे संबंध कुठल्या तत्त्वावर व व्यवहारावर आधारित होते हे बघणे महत्त्वाचे आहे.

व्यापारी किंवा दलाल (मध्यस्थ व्यापारी) ह्यांना शासनाकडून किंवा इतर खाजगी उत्पादकाकडून माल विकत घेण्याचे स्वातंत्र्य होते. त्याचप्रमाणे शेतकरीसुद्धा करभार दिल्यानंतर त्याच्याकडे राहिलेले उत्पन्न कोणालाही विकू शकत असे किंवा इतर वस्तूंच्या अदलाबदलीत (बार्टर) देऊ शकत असे. प्रत्येक जानपदामध्ये शासनाचे कोठार असे. त्या कोठारात केवळ धान्यच नव्हे, तर दोऱ्या, बांबू, लाकूड व उपकरणे व इतर गरजेच्या वस्तूंचा साठा करावा. अवर्षण वा अतिवर्षण, आग, महापूर, रोगांची साथ, त्याच्यामुळे टंचाई निर्माण झाल्यास ह्या कोठारातून जनतेला साह्य व्हावे अशी इच्छा चाणक्याने व्यक्त केली आहे. श्रावस्ती (सावत्थी) नगराजवळील उत्खननात सापडलेल्या एका ताम्रपटावरून व बोग्रा येथे सापडलेल्या अशा तऱ्हेची कोठारे अस्तित्वात होती व त्याचा उपयोग दुष्काळाच्या कळात मदतीकरिता होत असे हे दिसून येते. हा असा ‘साठा’ सोडल्यास बाकी सर्व उत्पादन व उत्पन्न विकता येत असे; पण व्यापाऱ्याने माल विकत घेतल्यानंतर मात्र त्याला काही नियमांना व अडचणींना तोंड द्यावे लागत असे. ह्याबाबत चाणक्याने असा कडक नियम घालून दिला होता. विकत घेतलेला माल त्याच ठिकाणी किंवा त्याच स्वरूपात विकता येणार नाही. ह्याचा अर्थ असा की, विकत घेतलेल्या कच्च्या मालावर काही संस्कार करून (प्रोसेसिंग) साधारणपणे तो दुसऱ्या ठिकाणी पाठवावा लागत असे. म्हणजे व्यापाऱ्याला विकत घेतलेल्या मालाच्या उपयोगीतेत भर घालावी लागत असे. ह्या नियमामुळे साठेबाजी करणे कठीण होई व वस्तू व पैसा ह्यांचे चलनवलन समाधानकारक पातळीवर होणे



शक्य होई. खाजगी व्यापाऱ्यांच्या वापरात असलेल्या वजने व मापे वारंवार परीक्षण करण्यात येई. त्याचप्रमाणे त्यांच्याकडे असलेल्या वस्तूच्या गोदामांचीही अधूनमधून तपासणी करण्यात येई. व्यापारांचे तांडे एका जानपदांतून दुसऱ्या जानपदात जात त्यांना जंगलातून जावे लागे. त्यामुळे त्यांना शस्त्रे बाळगण्याचे स्वातंत्र्य होते. पण जानपदाच्या हद्दीत प्रवेश केल्यानंतरही शस्त्रे त्यांना राजाच्या शस्त्र भंडारात ठेवावी लागत. अगदी खास कारणाकरिताच त्यांना शस्त्र जवळ ठेवण्याची परवानगी मिळे व तीसुद्धा काही फी देऊनच. जानपदाच्या हद्दीत कुठल्याही व्यक्तीस खाजगीरीत्या शस्त्र बाळगता येत नसे. लष्करातल्या जवानांनासुद्धा कामावर नसताना — सुटीवर असताना शस्त्रे घेऊन नगरात येण्याची परवानगी नसे. जानपदात प्रवेश करताना व जानपदांतून जाताना व्यापाऱ्यांना जकात किंवा आयात-निर्यात कराच्या धर्तीवरील कर द्यावा लागे. जानपदात चोरटी आयात करणे किंवा मालाची खोटी किंमत दाखवणे कठीण होते, पण अशा गुन्ह्याबद्दल जबरदस्त शिक्षा सांगितलेल्या आहेत. त्याशिवाय व्यापाऱ्यांच्या सगळ्या मोठ्या तांड्यामध्ये एखादा तरी व्यापारी पगारी गुप्तहेराचे काम करणारा असावा, असा आदेश आहे. बहुतेक वेळा जानपदात येणाऱ्या व्यापाऱ्यांची व त्याच्या मालाची माहिती आगाऊच जानपदाच्या अधिकाऱ्यांना पाठविली जाई. ह्यावरून त्यावर देण्यात येणाऱ्या जकातीची रक्कमही सरहद्दीवरील संरक्षक अधिकारी अगाऊ ठरवीत. जानपदांत बाहेरून आणलेला माल उघड्या बाजारांत ठराविक जागीच विकता येत असे. व्यापाऱ्यांना चांगला फायदा होईल, अशा तऱ्हेनेच वस्तूंच्या किंमती ठरवल्या जात. पण ग्राहकाची लूट करता येत नसे. किंमती जास्त झाल्यामुळे जो माल पडून राही त्यांची योग्य किंमत ठरवून सरकारी अधिकारी त्यांची विक्री करीत. आजच्या काळाप्रमाणे गरजेच्या वस्तूंचे साठे करून त्याची चणचण निर्माण करून चढ्या भावाने किंवा काळया बाजारांत विकण्याची सवलत त्या काळच्या व्यापाऱ्यांना मिळत नसे.

पण माल उत्पादन करून तो विकण्याचा व्यापार करणाऱ्या मार्गातील सर्वात मोठी अडचण ही कसबी कामगारांचा तुटवडा ही होती. कारागीर स्वतंत्र होते व श्रेण्यांत संघटित होते. स्वतंत्र शूद्रालासुद्धा विकता येत नसे. ग्रीक निरीक्षकांना त्या काळच्या भारतात गुलामगिरीची प्रथा कोणत्याही स्वरूपात दिसून आलेली नाही. शिक्षा झालेल्या व्यक्ती त्या काळापुरतेच ‘गुलाम’ असत. त्याशिवाय नर्तक, खुषमस्करे, विदूषक वगैरे अनेक तऱ्हेचे गृहदास होते. पण त्यांना घाणेरडे काम करण्यास सांगता येत नसे. असे काम करण्याची सक्ती केल्यास किंवा बलात्कार केल्यास किंवा क्रौर्याची वागणूक दिल्यास त्यांना स्वतंत्र होण्याचा अधिकार होता. ह्या गृहदासाची मुले दास नसत. त्यांना विकता येत नसे. त्याचप्रमाणे दासांच्या श्रमाची किंमत कायद्याने ठरवलेली होती. ती चुकती करून त्यांना स्वातंत्र्य विकत घेता येई. पगारी कामगारांच्या बाबतीतही वेतन व नियम होते. त्या कायद्याचे संरक्षण कामगारांना मिळत असे. त्याशिवाय त्या काळात एवढी मोठी जंगले होती की, कुठलाही धीट माणूस येथे

आसरा घेऊ शकत असे. त्या जंगलात जाऊन अन्न गोळा करून रहाता येई किंवा तेथल्या जंगली जमातीबरोबर चांगले संबंध ठेवून थोडीफार जागा साफसूफ करून शेतीही करता येई. जानपदांच्या कक्षा त्या वस्तीपर्यंत परतण्याआधी त्याला करही द्यावा लागत नसे. व्यापाऱ्यांचे जे हितसंबंध शासनाच्या हितसंबंधाच्या विरोधी नसत त्यांचे रक्षण करण्यात येई. पण सर्वसाधारणपणे अर्थशास्त्राचे धोरण व्यापारी हे मुळांत लुच्चे असतात व त्यांच्यावर दक्षतापूर्वक लक्ष ठेवले नाही तर ते समाजाच्या हितविरोधी वागतात. त्यांचे शत्रू होतात. त्यांना कह्यांत ठेवले पाहिजे. समाजाविरोधी वर्तनाबद्दल त्यांना कडक शासन दिले पाहिजे असेच आहे. वेगवेगळ्या अपकृत्यांबद्दल अर्थशास्त्रात विविध दंड सांगितलेले आहेत. त्यांची यादी एवढी लांबलचक आहे की, ह्याबाबत ९॥ कॉलम्सचे एक परिपत्रकच 'अर्थशास्त्रात' आहे. त्यातले काही अत्यंत गंभीर पाप किंवा गुन्हा ह्या सदरात मोडतील तर काही केवळ असभ्य वर्तनाची अपकृत्ये ठरावीत. पुरोहितालासुद्धा कबूल केल्याप्रमाणे पूजाविधी व यज्ञविधी करावे लागत. न केल्यास त्यासाठी दंड सांगण्यात आला आहे. सर्वसंगपरित्याग केलेल्या साधूलाही मर्यादाभंग केल्यास दंड आहे, पण दंड न भरता आल्यास राजाकरिता ठराविक वेळी प्रार्थना करावी लागे.

**कौटिल्याच्या अर्थशास्त्रात वेश्या व्यवसाय हा गुन्हाही नाही की पापसुद्धा नाही ती एक व्यवसाय आहे. त्यावर देखरेख करण्याकरिता एका खास मंत्र्याची नेमणूक केली जावी असा आदेश आहे.** ह्या व्यवसायावरही इतर धंद्यासारखे नियम घालून दिले आहेत. काही पैसे कमावल्यानंतर वेश्या निवृत्त होऊ शकत आणि समाजात सन्मानाने जगू शकत. त्यांचा धंदा खालच्या दर्जाचा समजला जात नसे; पण शासनाच्या उत्पन्नांत त्यांना हातभार लावावा लागत असे. निवृत्त झालेली वेश्या, वेश्यागृहावर देखरेख करणारी अधिकारी (मॅडम) होऊ शकत असे. **मदिरेचे उत्पादन व विक्रीसुद्धा शासनातर्फे होई व त्याकरिता वेगळा मंत्री असे. सर्व जुगारगृहेसुद्धा शासनाच्या मालकीची होती. ह्या सर्व लक्षणावरून चलनव्यवहार नागरी जीवनाच्या स्तरांवर कसा पोहोचला होता, हे दिसुन येते. त्याचबरोबर हेही लक्षात ठेवले पाहिजे की, वेश्यागृहे, मदिरा व जुगारगृहे ह्या सर्व सवलती 'महानगरात' व नगरातच उपलब्ध होत्या. राज्यातील बहुसंख्य प्रजा मात्र 'सीता' जमिनीवर माना मोडून काम करीत होती.** मगध राज्यात सर्व व्यवहारांचे रूपांतर चलन-व्यवहारात झाले होते, असे आपण जेव्हा म्हणतो, तेव्हा ते विधान नागर जीवन, व्यापारी व सरकारी अधिकारी ह्यापुरते मुख्यत: खरे आहे. **'सीता' जमिनीवर काम करण्याकरिता आणलेल्या गरीब शूद्र किसानाला लागू नाही.**



६.५

## सम्राट अशोक व मगध साम्राज्याचे सर्वोच्च शिखर

सम्राट अशोक (पाली : असोक) हा बिंदुसाराचा मुलगा व चंद्रगुप्त मौर्यांचा नातू होय. तो इ. स. पूर्व २७० ह्या वर्षी गादीवर आला. त्याचे अनेक आदेश शिलालेखांच्या स्वरूपात आहेत. ते जुन्या लिपीत असले तरी त्यांचा अर्थ आता लावण्यात आला आहे. त्याच्या चरित्राबद्दल वेगवेगळ्या कथांमधून जो तपशील आढळतो त्यावरून सुसंबद्ध जीवनपट निर्माण करणे कठिण आहे. तो आपल्या सावत्र भावाचा खून करून राज्यावर आला अशी कथा आहे. त्याची कारकीर्द एकंदर छत्तीस वर्षे चालली. त्यापैकी पहिली आठ वर्षे त्याने अत्यंत कठोरपणे राज्य केले. पाटण्याजवळ कैद्यांचा छळ करण्याकरिता त्याने जे कारागृह बांधले होते, ती जागा नंतर हजारो वर्षे पर्यटकांना दाखवली जाई. हे कारागृह म्हणजे पृथ्वीवरचा साक्षात नरक होता. सरंजामशाहीच्या उदयाच्या काळात असा छळ करण्याची प्रथा बंद झाली. पण सरंजामशाहीचे बस्तान बसल्यानंतर पुन्हा रूढ झाली. ऐतिहासिक काळाच्या साहित्यामध्ये मगधाचा राजा असलेल्या दोन अशोकांचे उल्लेख आहेत. दोघांच्या नाण्यावरती सारखाच शिक्का असल्यामुळे त्याच्यांत घोटाळा केला जातो. एक ख्रिस्तपूर्व पाचव्या शतकात होऊन गेला. दुसरा ज्याला आपण सम्राट अशोक म्हणतो तो त्यानंतर दोनशे वर्षांनी झाला. पहिला अशोक हा शिशुनाग घराण्यातील असून त्याला काल अशोक म्हणत. मौर्य वंशातील सम्राट अशोक स्वत:ला 'प्रियदस्सी' (प्रियदर्शी) म्हणवून घेत असे. पुढे त्याने स्वत:चे वर्णन 'देवानाम् पिया' ईश्वराचा लाडका असेही केलेले आहे. पुढे हे बिरुद सर्वच राजे स्वत:ला लावून घेऊ लागले व त्याचा अर्थ असा लावला जाई की, राजाला राज्य करण्याचा अधिकार परमेश्वराकडूनच मिळालेला आहे. पण मूळ संकल्पनेप्रमाणे तसा अर्थ नव्हता, कारण ही उपाधी भोळा, अर्धवट अशा माणसाकरिताही वापरली जाई. अशोकाच्या आदेशांचा अधिकृतपणा, अशोकाचे प्रत्यक्ष नाव असलेल्या आणि त्याच लिपीत व पद्धतीत लिहिलेल्या मस्की (म्हैसूर राज्य) व गुजरा येथील आलेखांवरून निश्चित करण्यात आला. त्या आलेखांतसुद्धा अशोकाचा उल्लेख 'प्रियदस्सी' असा केला आहे. बौद्ध वाङ्मयांत अशोकाचे नाव त्याने बुद्धधर्म स्वीकारल्यामुळे व बौद्ध विहारांना देणग्या दिल्यामुळे अजरामर झाले आहे. त्याच्याबद्दल अनेक 'दंतकथा' प्रसिद्ध झाल्या आहेत. ह्या महान सम्राटाची नाणी अगदी अलीकडेपर्यंत निश्चित झाली नव्हती. कारण त्या नाण्यांवर त्याचे नाव नाही की खास चिन्ह नाही. राज्यावर आल्यानंतर आठ वर्षांनी (की छत्तीस वर्षांनी ?) अशोकाने कलिंग देशावर स्वारी केली. त्यात एक लाख माणसे मारली गेली. त्याशिवाय युद्धाचा परिणाम म्हणून त्यांच्या काही पटीने माणसे देशोधडीला लावण्यात आली. त्यामुळे सम्राट अशोकाला युद्धाचा किळस आला. देशोधडीला लावण्याबद्दल अर्थशास्त्रात 'अपवाह' हे क्रियापद वापरण्यात आले आहे. अशा माणसांना 'सीता' जमिनीवर वसवण्यात आले असावे. मौर्यांनी साम्राज्य पसरवण्याकरिता केलेली ही बहुधा शेवटची लढाई असावी. कलिंग देशात जी काही जनता

शिल्लक राहिली ती सम्राट अशोकाने, आपल्या मुलाप्रमाणे स्वत:च्या कृपाछत्राखाली आणली असा दावा केला गेला आहे. ह्याच काळात अशोक मगधांतील धर्मोपदेशकांची प्रवचने ऐकू लागला व त्याने बुद्ध धर्म स्वीकारला. अशोकाच्या ह्या धर्मपरिवर्तनाची तुलना अनेक वेळा रोमन साम्राज्याधिपती कॉन्टस्टाईन ह्याच्या इ. स. ३८५ मधील ख्रिस्ती धर्म स्वीकाराशी केली जाते. पण खास फरक लक्षात घेतला पाहिजे तो हा की, त्या राजा-प्रमाणे येथे शासन संस्थेच्या पाठिंब्यावर कोठलेही धर्मपीठ उभारले गेले नाही, की त्या साम्राज्याने 'पॅगनिझम'सारख्या अनेक पंथांचा विनाश केला, तसे तेथे घडले नाही. उलट सम्राट अशोक व त्यानंतरचे त्याचे वारसदार ह्यांनी ब्राह्मण, जैन, आजिविका ह्या इतर धर्मीयांना उदार हस्ते देणग्या दिल्या आहेत. सम्राट अशोक फिरतीवर असताना सर्व धर्मांतील आदरणीय साधुसंत, वृद्ध गृहस्थ ह्यांना भेट देई. त्यांच्याशी संवाद साधे, त्यांना देणग्या व भेटी देत असे. मूलतः हा बदल धार्मिक नसून राजाच्या आपल्या प्रजेच्या बाबतीत असणाऱ्या दृष्टीकोनांतील बदल होता. "मी जे काही प्रयास करीत आहे ते ह्या जगातील जीवित प्राण्याविषयी माझे जे ऋण आहे ते फेडण्याकरिता करीत आहे," असे उद्‌गार अशोकाने काढले आहेत. राजधर्मांच्या संकल्पनेतील झालेला हा बदल मूलगामी होता. आगोदरचे मगध राजे शासनाच्या सार्वभौमत्वाचे प्रतीक होते. ते सर्वसामान्य नागरिक किंवा इतर कोणीही ह्यांचे काही देणे मानत नव्हते. त्या राजाचे एकच कर्तव्य होते, ते म्हणजे शासन संस्थेचा जास्तीत जास्त फायदा होईल अशा कुशल-तेने सत्ता राबवणे. ह्याउलट सहाव्या शतकात ज्या सामाजिक दृष्टी असणाऱ्या विचार-धारा निर्माण झाल्या, त्याचा काही प्रभाव सम्राट अशोकाच्या काळातील शासनव्यवस्थेवर पडलेला दिसतो. अशोकाचे जे आलेख आहेत, ते केवळ बौद्धधर्माचा प्रसार करण्या-करिता केलेले आहेत, असे पुष्कळदा मानण्यात येते, पण ते खरे नाही. ह्या राजाने सर्व धर्मीयांना उघडपणे साहाय्य केलेले आहे. त्यामध्ये बौद्धधर्माने ज्यांच्या श्रेष्ठत्वाचा फुगा फोडला, ते ब्राह्मण किंवा ज्या जैन व आजविका ह्यांना कालबाह्य ठरवले, त्यांचाही समावेश होता. हे अगदी खरे की, अशोक स्वत:ला बुद्धधर्मीय म्हणवून घेत असे. बुद्धाची रक्षा जेथे जेथे पुरली गेली, तेथे तेथे त्याने अनेक स्तूप बांधले. त्याशिवाय त्याने पवित्र स्थानी-सुद्धा इतर स्मारके बांधलेली आहेत. उत्खननांतील पुराव्यावरून हे सिद्ध झाले आहे. त्या काळातील व्यापारमार्गावर व जेथून राज्यकारभार चाले अशा ठिकाणी स्तंभ बांधून त्यावर त्याने आपल्या आदेशांचे आलेख कोरलेले आहेत. बुद्धाच्या जीवनातील महत्त्वाच्या घटना जेथे घडल्या, अशा जागांवरील त्याचे स्तंभ हे सुद्धा जुन्या उत्तरापथ व्यापार-मार्गांवरील आहेत. पुढे गंगेच्या खोऱ्यात झपाट्याने वस्ती वाढल्यामुळे व परदेशी व्यापार कमी झाल्यामुळे ह्या मार्गाचे महत्त्व कमी झाले. ह्यापैकी एक आलेख बुद्ध संघांना उद्देशून आहे. त्यामध्ये बौद्धधर्मांमध्ये जे पंथभेद निर्माण झाले होते त्याचा निर्देश आहे. ह्या आलेखांत कोणतेही विशेषाधिकार नसून फक्त अभ्यास व चांगली वर्तणूक ह्यावर त्यांचा अधिकार असल्याचा उपदेश आहे. बौद्धधर्माचा विस्तार व त्याला मिळलेला राजाश्रय



ह्यामुळे संघाच्या शिस्तीमध्ये शिथिलता येऊ लागली होती. बुद्ध धर्मीयांच्या संघप्रमुखांची तिसरी बैठक अशोकाच्या काळात झाली. सम्राट अशोकाने बुद्धधर्मांचे प्रचारक शेजारच्या म्हणजे सिलोन, मध्य आशिया व चीन ह्या ठिकाणी पाठवले असा जो उल्लेख पाली साहित्यांत मिळतो त्याला कोरीव आलेखांचा दुजोरा आहे. बुद्धधर्मावरील सर्वांत जुने प्राचीन वाङ्मय हे बुद्धाच्या मृत्यूनंतर काही काळानंतर संग्रहित केलेले आहे. परंतु त्याला आज जे स्वरूप आहे, ते अशोकाच्या काळात दिले गेले. अशोकाचे जे शिलालेख आहेत, त्यामधून केवळ त्याचे बुद्धधर्मावरील प्रेम व्यक्त होत नाही, तर शासकीय धोरणामध्ये झालेले बदल दिसून येतात. **पहिला बदल हा की, ज्यामधून शासनाला उत्पन्न होणार नाही अशी सार्वजनिक कल्याण कामे त्याने सुरू केली.** त्याकरिता खजिन्यातून बराच पैसाही खर्च केला. त्याने साम्राज्याच्या सर्व विभागात माणसे व पशू त्यांच्याकरिता इस्पितळे बांधली. तेथे फुकट वैद्यकीय सल्ला व मोफत उपचार होई. व्यापारी व वाहतुकीच्या महत्त्वाच्या रस्त्यावर त्याने विश्रामगृहे बांधली. दाट वनराई, त्यांत फळा फुलांची झाडे, छोटीशी तळी, त्या तळ्यात उतरण्याकरिता पायऱ्या अशा तऱ्हेची ती खरो-खरीची विश्रामगृहे होती. ही विश्रामगृहे एक एक योजनेच्या अंतरावर असत. (एक योजना म्हणजे पाच ते नऊ मैल) ही विश्रामगृहे व वैद्यकीय मदत केवळ साम्राज्यांच्या हद्दीतच नव्हती. साम्राज्याच्या सरहद्दीबाहेरही बांधली गेली होती. त्यामुळे फिरत्या व्यापाऱ्यांना केवढा दिलासा मिळाला असेल, ह्याची कल्पना करावी. बुद्धधर्मांत चक्रवर्ती राजाचे जे कर्तव्य सांगितले होते (त्याचे विवेचन आपण मागच्या प्रकरणांत केले आहे.) त्याच्याशी अशोकाचे हे वर्तन तंतोतंत जुळणारे असेच होते. वसुलींत (उत्पन्नात) वाढ होत नसलेली सार्वजनिक कामे करण्याची अपेक्षा अर्थशास्त्रात व्यक्त केली गेलेली नाही. अर्थात त्या कर्तव्यकठोर पुस्तकांतही वृद्ध, अनाथ मुले व पंगू ह्यांच्याकडे शासनाने लक्ष द्यावे असा आदेश दिलेला आहे.

सम्राट अशोकाने जो नवा राजवाडा बांधला तो त्याच्या ऐश्वर्याचे प्रतीक होता व जास्तीत जास्त सुखदायक व्हावा अशा तऱ्हेनेच बांधला गेला होता. अर्थशास्त्रातील राजाचा राजवाडा मात्र केवळ उपयुक्ततेच्या व संरक्षणाच्या दृष्टीने बांधला गेला होता. त्यामध्ये केवळ चांगल्या लाकडाचा वापर केला गेला होता. अशोकाने मात्र राजवाडा बांधताना चकचकीत घासून आरशासारख्या स्वच्छ व सुंदर दगडांचा उपयोग केला होता. ती पद्धत, ती चकाकी आणि तो सौंदर्यदृष्टीकोन नंतरच्या अनेक भारतीय शिल्पा-मध्ये आढळून येतो.

अशोकाच्या काळातील वैशिष्ट्यपूर्ण कलाकौशल्य ज्यात सांचीच्या महान स्तुपाचाही अंतर्भाव व्हावा. ह्याचे खास वैशिष्ट्य म्हणजे पारंपरिक पद्धतीने केल्या जाणाऱ्या लाकडाच्याच बांधणीचा चकचकीत दगडांच्या बांधणीत केलेला आविष्कार होय. कार्ले, कोंडाणा व इतर ठिकाणी जी बौद्ध लेणी आहेत, त्यातील चित्रांमधून अनेक मजली लाकडी घरे दिसतात. खास बौद्ध शैलीतील कमानसुद्धा मुळात लाकडाची होती. पाटण्या-

जवळ कूम्रहार येथे मौर्य साम्राज्याच्या उत्तरकाळातील जे सभागृह उत्खननात सापडले आहे त्याची जमीन, छत, छप्पर, अंतर्गत बांधणी, इतकेच काय, पण मोऱ्यासुद्धा मजबूत लाकडाच्या आहेत. त्या सभागृहातील दगडी खांब हे लाकडाच्या मजबूत व गुळगुळीत ओंडक्यावर उभे आहेत व हे ओंडके चिकणमातीच्या साहाय्याने जमिनीत पुरले गेले आहेत. त्या काळी जंगलात चांगले मजबूत लाकूड भरपूर प्रमाणात मिळत होते. अगदी सातव्या शतकापर्यंत बिहारमध्ये तासून स्वच्छ केलेल्या लाकडाचे मैलोगणती रस्ते होते. पाटणा शहराच्या संरक्षक भिंतीसुद्धा मातीने लिंपलेल्या लाकडाच्या होत्या. ह्या भागात आता भयंकर जंगलतोड झालेली आहे **सिंधू संस्कृतीमधील नगररचना लक्षात घेऊनही भारतीय कला, स्थापत्यशास्त्र व शिल्पशास्त्र ह्यांचा एक स्रोत व विकास सम्राट अशोकाच्या काळात झाला, ह्यांत संदेह नाही.**

ह्याचा अर्थ असा नव्हे की, सार्वजनिक हित व धार्मिक व्यवहार ह्यामुळे अशोकाचे राज्यकारभारावरचे लक्ष विचलित झाले होते. साम्राज्याची वाढ करण्याकरिता चंद्रगुप्ताने केलेल्या सतत मोहिमा व ते प्रस्थापित ठेवण्याकरिता बिंदुसाराने केलेल्या लढाया ह्यामुळे साम्राज्याचा विस्तार दूरवर झाला होता. त्यामुळे ठिकठिकाणाहून नियमितपणे अहवाल येणे बंद झाले होते ह्याची दखल अशोकाने घेतलेली आहे. तो लिहितो : अधिकाऱ्यांनी असे अहवाल पाठवावेत. मी त्यांची दखल जरूर घेईन. जेवत असताना राणीवंशांत असताना, संचलनाची देखरेख करीत असताना किंवा बागबगिच्यात फिरत असतानाही केव्हाही जनतेच्या परिस्थितीबद्दलचे अहवाल आणावेत. मी ते वाचीन. अर्थशास्त्रात सांगितलेल्या राजाच्या कामाबाबतचे जे वेळापत्रक होते, ते त्याने पुन्हा सुरू केले. त्याचबरोबर कौटिल्याच्या राज्यकारभारासंबंधीच्या नियमांतही बदल केले (बिंदुसाराच्या राज्यकारभाराच्या पहिल्या काही वर्षातच चाणक्य निवृत्त झाला असावा) दर पाच वर्षांनी अशोक सर्व साम्राज्याची देखरेख करण्याकरिता दौरा करीत असे. त्याने प्रत्येक जानपदांच्या प्रमुखांनाही आपआपल्या भागांत दौरा काढण्याचे आदेश दिले आहेत. त्याने **धर्ममहामात्र** अशी उपाधी असलेले नवे अधिकारपद निर्माण केले. धर्ममहामात्र म्हणजे नीतीचे संरक्षण व संवर्धन करणारा 'मंत्री' होय. त्या मंत्र्याकडे जी विविध कामे होती त्यावरून तो त्या काळातील 'हायकमिशनर ऑफ इक्विटी' म्हणजे **समभाव तत्त्वाची अंमलबजावणी करणारा सर्वोच्च अधिकारी होता.** साम्राज्याचा त्या काळी दूरवर विस्तार झाला होता. राज्याचे कायदे व नियम ह्यांना मानणारे पण त्याचबरोबर निरनिराळे धर्म व पंथ ह्यांनाही मानणारे विविध गट व समूह होते. त्या सर्वांना शासनाकडून योग्य व समान वागणूक मिळण्याची व्यवस्था करणे, हे धर्ममहामात्राचे कर्तव्य होते. त्याचबरोबर ह्या वेगवेगळ्या गण, पंथ, समूह ह्यांच्या प्रथा व रूढी ह्यांचे ज्ञान करून घेणे, हेसुद्धा त्या अधिकाऱ्याचे कर्तव्य होते. सम्राट अशोकानेही दौरे काढून त्याचे ज्ञान करून घेतले. मौर्यांच्या काळामध्ये अनेक जानपदांमध्ये मागासलेल्या आदिवासी जमाती होत्या. त्यांचा धर्म हा प्रथा, आचार, व रूढी ह्यांनी व्यक्त होई व तो वेगवेगळा असे. नांगरणीपासून पाखडणीपर्यंत प्रत्येक



कामाला सुरुवात करताना काही धार्मिक विधी पार पाडण्याचा प्रघात आजच्याप्रमाणे तेव्हाही होता. त्याचप्रमाणे अन्न गोळा करण्याच्या अवस्थेत असल्यापासून चालेल्या काही प्रथा चालू होत्या. अशा ह्या संमिश्र समाजामध्ये विविध संकुचित व काही वेळा परस्परविरोधी समजुतींचा मेळ घालणे हा मुख्य प्रश्न होता. बुद्धधर्माचेही ते एक कार्य होते. पण बुद्धधर्म पशुबळी त्याज्य मानीत होता, तर अर्थशास्त्राने यज्ञविधीकडे संपूर्ण दुर्लक्ष केले आणि रोगांपासून मुक्त होण्याकरिता जादूटोण्याचा मार्ग सांगितला आहे. अशोक व महामात्र ह्यांना ह्या सगळ्यांचा सांभाळ एका समतोल धोरणाने व समन्वयाने करण्याची पाळी आली. अशोकाने सर्व तऱ्हेची पशुहत्या थांबवली नाही तर फक्त काही पशु व पक्षी ह्यांचीच हत्या थांबवली. त्याची कारणमीमांसा नमूद केलेली नाही, पण आपण करू शकतो. बहुधा जे पशु व पक्षी काही जमतीची पशुदेवके (टोटेम्स) होती, त्यांची हत्या थांबवली गेली असावी. बैल, गाय किंवा म्हैस व रेडा ह्यांची हत्या थांबवली गेली नाही; पण सांडकांची हत्या मात्र थांबवली गेली. (सांडक : सांड : पोळ) अजूनही अशा सांडाला पवित्र देवक मानण्यात येते. अशोकाच्या काळातसुद्धा गोमांस इतर मांसाप्रमाणे बाजारात विकण्यास येत होते. अशोकाने स्वतः मांसभक्षण सोडले. राजवाड्यातील मांसाहार जवळजवळ संपुष्टात आणला व शाकाहारी भोजनाचा आदर्श त्याने घालून दिला. हवन-यज्ञ विधी (ज्यात पशूंची फार मोठ्या प्रमाणावर हिंसा होत असे) त्याने खास कायदा करून बंद केले. सर्वांत महत्त्वाचा बदल म्हणजे रानटी जनावरांना हुसकावून काढण्याकरिता किंवा नव्या जमिनी लागवडीखाली आणण्याकरिता किंवा इतर कोणत्याही कारणास्तव जंगले जाळण्यावर संपूर्ण बंदी घालण्यात आली. हा आदेश म्हणजे केवळ बुद्धधर्मीय संस्कारामुळे निर्माण झालेला लहरीपणा नव्हता, तर नव्या परिस्थितीत वस्त्यांचे संरक्षण करण्याकरिता व नैसर्गिक साधनसंपत्ती वाचण्याकरिता तसे धोरण आवश्यक झाले होते. महाभारताच्या नंतरच्या आवृत्तींतसुद्धा मृत्यूशय्येवरील भीष्माच्या तोंडी 'जंगले जाळणे पाप आहे' असा आदेश घालण्यात आला आहे. वास्तविक ह्याच महाभारतात पांडवांनी इंद्रप्रस्थ (दिल्ली)च्या सभोवती असलेली जंगले साफ करून नवी राजधानी वसवली व कृष्णाने त्यांना मदत केल्याची कथा आहे. त्या संदर्भात भीष्माच्या तोंडी घातलेला हा उद्गार विसंगत वाटतो. वस्तुस्थिती अशी आहे की, वैदिक काळांतील जीवन-पद्धती पार बदलून गेली होती. त्यामुळे त्यावेळच्या कठोर पद्धती आता कालबाह्य झाल्या होत्या. पशुसंवर्धन करीत जगणाऱ्या समाजाचे आता अन्नोत्पादक समाजात परिवर्तन झाले होते. आता तुरुंगातील कैद्यांनाही चांगली वागणूक मिळू लागली होती. कैद्यांच्या सोयी-सवलतींकडे लक्ष देण्याचे काम आता धर्ममहामात्रांकडे सोपविण्यात आले. अगोदरच्या काळात शिक्षा संपल्यानंतरही अनेक आरोपींना बंधनांत ठेवले जाई. आता त्यांची मुक्तता करण्यात येऊलागली. कैद्यांच्या निराधार कुटुंबांना मदत करण्याचे कामही धर्ममहामात्रांचे अधिकारी करू लागले. ज्यांना मृत्युदंड होत असे, त्यांना आपली निरवानिरव करण्याकरिता तीन दिवसांचा अवधी मिळू लागला. पण मृत्युदंडाची शिक्षा मात्र बंद करण्यात आली नाही.

**अशोकाच्या अनेक आदेशांवरून असे दिसते की, ते आदेश म्हणजे सार्वभौम सत्तेविरुद्ध जनतेला मिळालेली ती हक्कांची सनद होती. प्रश्न असा आहे की, वर वर विलक्षण वाटणारे हे बदल का आवश्यक झाले, त्याचा आपण थोडक्यात विचार करू.**

समाजप्रगतीच्या प्रक्रियेत परिस्थितीत अनेक लहानसहान बदल घडत असतात. असे अनेक बदल घडले. समाजरचनेत गुणात्मक बदल घडणे आवश्यक होते. सम्राट अशोकाने केलेल्या सुधारणा ह्या सिद्धांताचे उत्तम उदाहरण आहे. जानपदांची व्याप्ती, त्यातील शेतकरी कुटुंबे, कसबी कामगार कारागीर ह्यांची संख्या एवढी वाढली होती कीं, राजाचा 'रज्जुका' हा वसुली करणारा अधिकारी ब्रिटिश अंमलाखालील कलेक्टरप्रमाणे लाखो व्यक्तींचे जीवन नियंत्रित करू लागला होता. विविध जानपदांच्या सीमा आता एकमेकांपासून फार दूर राहिल्या नव्हत्या. आता काही थोडेच व्यापारमार्ग नव्हते. अनेक नवीन व्यापारमार्ग निघाले होते. त्यांचे स्वरूपही बदलले होते. हे रस्ते म्हणजे केवळ घनदाट जंगलातून जाणाऱ्या वाटा नव्हत्या. जंगलात रहाणाऱ्या आदिवासींचा फार तर त्रास होई, पण त्यांच्यापासून भय किंवा धोका नव्हता. आपले धम्माधिकारी त्यांच्याकडे पाठवून अशोकाने त्यांचे मन वळवण्याचा प्रयत्न केला. रानावनांत गेलेल्यांनी जमिनी साफ करून लहान लहान तुकड्यांनी शेती करण्यास सुरवात केली होती. त्यांचे विभाजन राष्ट्र किंवा सीता ह्या दोहोमध्ये करणे कठिण होते. साम्राज्याला स्थैर्य प्राप्त झाले होते. लढायांची आवश्यकता नव्हती. प्रचंड प्रमाणात सैन्य ठेवण्याची जरूरी, नव्हती व ठेवल्यास त्याचा खर्च प्रमाणाबाहेर झाला असता. अशोकाने आपल्या एका शिलालेखांत सांगितले आहे, 'समभावतत्त्वाची अंमलबजावणी केल्यास सैन्याचा उपयोग संचलन व शक्तीचे प्रदर्शन एवढ्यापुरताच राहील.'

त्या काळच्या साम्राज्यान्तर्गत प्रदेशांची विभागणी तीन स्वरूपाच्या प्रादेशिक विभागांत करता येईल. साम्राज्याचा पंजाब व पश्चिमेकडील प्रदेश हा सरहद्दीवर होता त्यामुळे इतर राज्यांकडून त्यावर आक्रमण होण्याची भीती होती. तेथे सैन्य ठेवणे आवश्यक होते. त्यावर एक किंवा अनेक सैन्याधिकारी ठेवणे आवश्यक होते. ते स्वतंत्र होऊन बंड करतील अशीही भीती होती. त्याशिवाय ग्रीक, शक किंवा मध्य आशियांतील इतर राज्यांकडून हल्ला होण्याची भीती होती. (प्रत्यक्षांत अशोकानंतर पन्नास वर्षांनी ह्या घटना घडल्या) गंगेच्या खोऱ्यांतील मध्यवर्ती प्रदेश हा साम्राज्याचा दुसरा विभाग. जोपर्यंत पंजाब परकियांच्या आक्रमणाखाली जात नव्हता तोपर्यंत तेथे फारसे सैन्य ठेवण्याची जरूरी नव्हती. खाणीवरील शासनाची मक्तेदारी मात्र संपुष्टात येत होती. बिहारमधील तांब्याच्या खाणी पाण्याच्या पातळीपर्यंत एव्हाना पोचल्या होत्या व त्या काळापर्यंत पाणी काढून टाकण्याकरिता वापरण्यात येणाऱ्या पंपाचा शोध लागला नव्हता. लोखंडाची गरज समाजव्यवस्थेच्या विकासामुळे एवढी वाढली होती की, बिहारमधील खाणींतून त्याचा पुरेसा पुरवठा करणे कठिण झाले होते. दक्षिणेकडील प्रदेशात मगधांचे आक्रमण होण्यापूर्वीच खाजगी उपक्रमशीलतेने लोखंडाच्या नव्या खाणींचा शोध लागला होता. त्यांचा



विकासही झाला होता. बावरीच्या गोष्टीवरून हे दिसून येते. भारतीय पोलादाच्या तलवारीचा उपयोग अलेक्झांडरच्या आक्रमणाच्या शंभर वर्षे अगोदर अखेनिमिड दरबाराने केला होता. त्या धातूंची कधीही न संपणारी मागणी पुरवण्याकरिता आंध्र व म्हैसूर येथील जंगलातील उत्तम दर्जाच्या लोखंडाच्या परंतु इतस्ततः पसरलेल्या छोट्या खाणी होत्या. त्यांचा वापर करणे जरूर होते. हे काम शासनसंस्थेच्या नोकरशाहीतर्फे पार पाडणे कठिण व खर्चाचे होते. तेव्हा खाजगी उपक्रमशीलतेला वाव होता. तिसरा प्रदेश दख्खनच्या पठारांचा. येथील प्रदेशांवर मगध देशातील 'सीता' प्रदेशाप्रमाणे वस्त्या करणे शक्य नव्हते, कारण तेथील चांगली कसाऊ जमीन सलगपणे नव्हती तर तुकड्या-तुकड्यांत होती. त्या ठिकाणी साम्राज्य स्थिरावण्याकरिता स्थानिक लोक, स्थानिक भाषा, त्याच्या प्रथा पद्धती, नीती-नियम ह्यांना सांभाळून घेण्याची सामावण्याची आवश्यकता होती. ह्या प्रदेशात सम्राट अशोकाचे राज्य पसरण्यापूर्वी कोणतीही राजेशाही किंवा एकतंत्री अंमल आलेला नव्हता. फक्त रानटी किंवा अर्धरानटी असे आदिवासी पद्धतीचे समाजजीवन अस्तित्वात होते त्या काळातील ज्या राजांची नावे अशोकाने दिली आहेत, ती फक्त पश्चिमेकडील सरहद्दीच्या पलीकडील ग्रीक राजांची (सत्रापांची) आहेत. कलिंग देशाच्या राजाच्या नावाचाही उल्लेख त्याने कोठेही केलेला नाही. शंभर वर्षानंतर ह्याच कलिंग प्रदेशात 'खारवेला' हा जेता राजा उदयास पावला.

अशोकाने जंगले जाळण्यावर बंदी आणली, त्याचा उल्लेख वर केला आहे. त्याचे कारण हेच की, जंगले जाळल्यामुळे नद्यांना पूर येई व राज्याचे नुकसान होई. एखाद्या मोसमात जरी पूर किंवा रोगराई आली, तरी अशा परिस्थितीत जनतेला मदत करण्याच्या अशोकाच्या धोरणामुळे खजिन्यांवर फार भार पडे. सर्वांत महत्त्वाची बाब ही की, जरी साम्राज्याचा विस्तार झाला होता, तरी त्यामानाने वाहतुकीच्या साधनात फारसे क्रांतिकारक बदल झाले नव्हते. त्यामुळे केंद्रीय सत्तेला दूरवर असणाऱ्या प्रदेशात सत्ता चालवण्यात व कारभार करण्यामध्ये ज्या अडचणी निर्माण होतात, त्या निर्माण झाल्या होत्या.

आम्ही जे वर्णन वर केले आहे, त्याला अशोकाच्या काळातील नाण्यांच्या परिस्थितीवरूनही पुष्टी मिळते. चंद्रगुप्त मौर्याच्या काळानंतर नाण्यांच्या (कर्षपणांच्या) वजनात फारसा फरक पडलेला नाही. पण ह्या काळांतील नाण्यांमध्ये तांब्याचे प्रमाण वाढलेले दिसते. त्याचबरोबर ही नाणी खडबडीत झालेली दिसतात. ह्या नाण्यांच्यावजनात जो कमीअधिक फरक पडलेला दिसतो त्यावरून टाकसाळीवरील भार वाढला असला पाहिजे. हा तर्क करता येतो. नाण्यांची झीज व नाण्यावरील व्यापाऱ्यांच्या श्रेणीच्या छाप्यांचा पुसटपणा वाढलेला दिसतो. त्यावरून एकीकडे व्यापाऱ्याचे नियंत्रण कठिण होत होते. त्याचबरोबर दक्षिणेकडे चांदीचे प्रमाण कमी असणारी व शिसे असणारी मिश्र धातूंची नाणी वापरली जात. त्यावरून व्यापाराची झालेली वृद्धी दिसून येते. दक्षिणेकडील आदिवासी जमातीशी अदलाबदलीचा (बार्टर) व्यापार करून व्यापारी चांगला फायदा कमावीत असले पाहिजेत.

नाण्यांच्या दर्जातील ही घसरण प्रथम चाणक्याने घडवून आणली. आर्थिक अडचणीत सापडलेल्या राजाने तिजोरीवरील भार कमी करण्याकरिता अर्थशास्त्रांत वेगळेच उपाय सुचवले आहेत. त्यारून त्या काळच्या सामाजिक, सांस्कृतिक परिस्थितीवर प्रकाश पडतो. अशा राजाने 'जायदाद, साठवलेले धान्य व इतर वस्तू; ह्यांवर खास नैमित्तिक कर लादावेत; (तसे वारंवार मात्र करू नये) आपल्या हस्तकांकरवी लोकांना उत्तेजित करून त्यांच्याकडून देणग्या जमा कराव्यात; गुप्तहेरांकडून नाग, भूतेखेते, इत्यादींच्या पूजा घडवून आणून भोळ्या लोकांनी अशा रीतीने दिलेले पैसे त्यांच्याकरवी गोळा करावे; इत्यादी मार्ग चाणक्याने सांगितले आहेत. चाणक्यासारख्या ब्राह्मण मंत्र्याने असले उपाय सांगावेत हे विचित्र वाटेल; पण इ. स.च्या तिसऱ्या शतकापर्यंत अनेक ब्राह्मण वेदांखेरीज इतर श्रद्धांकडे तिरस्काराच्या नजरेने पहात होते. पातंजली ह्या वैय्याकरण्याने 'मौर्य साम्राज्यांत अशी अनेक दैवते पैसा मिळविण्याकरिता प्रस्थापित केली', असे जाता जाता सांगितले आहे. त्याशिवाय पैसा मिळवण्याकरिता आताप्रमाणे राष्ट्रीय कर्ज वगैरे उभे करण्याऐवजी, व्यापाऱ्यांविरुद्ध करता येतील अशा कारवाया अर्थशास्त्रात सांगितल्या आहेत. 'गुप्तहेराने व्यापाऱ्याला मद्यपान करावयास लावून, धुंद करून लुटावे किंवा त्यांच्यावर गुन्हेगारी केल्याचा आरोप लादून किंवा जरूर पडल्यास खून करूनही त्यांची संपत्ती लुटावी', असा सल्ला दिलेला आहे. अनेक व्यापाऱ्यांची खालसा केलेली संपत्ती शासनाच्या तिजोरीत भर घालीत असे. हे गुप्तहेर जरी काळजीपूर्वक निवडले असले तरी अशा निर्घृण उपायांमुळे त्यांच्या चारित्र्यावर व सामाजिक मानसावर केवढा ताण पडला असेल, ह्याची कल्पना करवत नाही. त्यांची सुरक्षितताही सतत धोक्यात असणे साहजिकच असणार.

पण अशोकाने त्याऐवजी जी सार्वजनिक हिताची कामे सुरू केली, त्यामुळे चलनव्यवहार वाढला असला पाहिजे. त्याच्या व त्याच्या अधिकाऱ्यांच्या होणाऱ्या दौऱ्यांमुळे स्थानिक उत्पादनाला तेथेच गिऱ्हाईक मिळवून वाहतुकीवरील भारही कमी होत असावा. प्रजेबद्दलचा साम्राज्याचा नवा दृष्टीकोन व वाहतूक मार्गावरील नव्या सोयी त्यामुळे ह्या शासनसंस्थेला नवा भक्कम वर्गीय पाया मिळाला. अशोक व त्यानंतरच्या शासनसंस्थांकडे नवी नैतिक जबाबदारी असण्याची भावना तयार झाली. ती जबाबदारी होती विविध वर्गांमध्ये समन्वय राखण्याची. हा नवा वर्गसमन्वय शासनसंस्थेने शेती व्यवसाय वाढवण्याचे, नवे व्यापारमार्ग सुरू करण्याचे व त्याची व्यवस्था बघण्याचे जे धोरण घेतले त्यामुळेच साधू शकला. अर्थशास्त्रात अशी जबाबदारी घेतलेली नव्हती. ते शासन नोकरशाहीने सार्वभौम राजाकरिता चालवलेल्या नोकरशाहीकरिता घेतलेले होते. हा नवा समन्वय साधण्याचे सर्वात प्रबळ साधन होते नव्या समान प्रादेशिक समाजनिर्मितीला आवश्यक असणारा समभाव सांगणारा नीतिधर्म. अर्थात् राजाच्या अधिकारांचा त्याला पाठिंबा होता व त्यामुळे राजा व प्रजा ह्यांच्यात दुवा निर्माण झाला. कदाचित् आता हा उपाय काही सर्वोत्तम वाटणार नाही; पण त्या काळच्या परिस्थितीत तो अधिक कुशल व परिणामकारक ठरला. किंबहुना असेही म्हणता येईल की, भारतीय संस्कृतीवर समभाव तत्त्वाचा पुरोगामी ठसा हा अशोकाच्या काळापासून उमटलेला आहे. पुढे धर्म (धम्म) ह्या शब्दाला समभावतत्त्वापेक्षा किती तरी जास्त निम्न दर्जाचा किंवा त्या नीतितत्त्वाशी किती तरी विसंगत असा व्यक्तिसापेक्ष दैवतश्रद्धेने भारावलेल्या धर्मश्रद्धेला अनुकूल असा अर्थ प्राप्त झाला की, जो अर्थ अशोकाच्या मूळ धर्म (धम्म) शब्दाला अभिप्रेत नव्हता. अशोकानंतरच्या काळातील भारताच्या सांस्कृतिक विकासाला पंथवादी धर्मांचे (सेक्टेरियन) आवरण चढले आहे. तरीसुद्धा विसाव्या शतकात स्वातंत्र्य मिळवणाऱ्या भारताचे राष्ट्रीय चिन्ह सारनाथ येथील अशोक स्तंभावरून घेतले आहे. हे भारताच्या उर्जस्वल परंपरेशी सुसंगत आहे, ही केवढी समाधानाची गोष्ट आहे !

| सात |

# सरंजामशाहीचा उदय

## ७·१
## नवा पुरोहित वर्ग

सम्राट अशोकाने ज्या सुधारणा केल्या त्यामुळे पुरोहित वर्गाच्या स्वरूपात संपूर्ण बदल झाला. त्याअगोदरच्या पुरोहित वर्गाचा पाया हा पंजाबमधील टोळीबद्ध समाजाचे पशु-संवर्धन व पशुबळी असणारे यज्ञविधी हा होता. मागच्या प्रकरणांत सांगितलेले अलेक्झांडरचे विनाशी आक्रमण, शेतीप्रधान संस्कृतीवर आधारलेला मौर्य साम्राज्याचा विस्तार यामुळे ब्राह्मण धर्माचा हा पाया मोडून पडला. वास्तविक बुद्ध, जैन, आजिविका या धर्मांच्या उदयामुळे व त्यातील 'अहिंसा' तत्त्वामुळे गंगेच्या खोऱ्यातील प्रदेशात यज्ञसंस्थेचा फारसा विस्तार होऊच शकलेला नव्हता. नव्या सामाजिक जीवनात यज्ञयाग व होमहवन करणे हे हळूहळू, पण जवळजवळ बंद झाले. अर्थशास्त्राचा कर्ता जरी ब्राह्मण असला तरी त्या ग्रंथामध्ये यज्ञसंस्थेवर भर देण्यात आलेला नाही. आपण कृष्ण दैवताच्या उदयाचा व प्रभावाचा विचार केला आहे. त्यावरून पंजाबसारख्या जुन्या आर्य संस्कृतीच्या प्रभावाखाली असलेल्या प्रदेशातसुद्धा वैदिक होमहवन पद्धतीचा प्रभाव किती कमी झाला हे दिसून येते. त्यामुळे टोळीवजा समाजातील एक प्रमुख वर्ग ब्राह्मण वर्ग हा यज्ञसंस्थेशी संलग्न असणाऱ्या पारंपरिक कर्तव्यातून मुक्त झाला. या वर्गाला शिक्षणाची व बौद्धिक कामाची परंपरा असल्यामुळे, धर्म व भाषेचे शिक्षण देणे हे नवे काम त्याच्या वाट्याला आले. त्यामुळे त्या वर्गात विचारवंतांची परंपरा निर्माण झाली. आश्रमात जाऊन ब्राह्मण विद्यार्थ्याला बारा वर्षे वेद, व्याकरण व भाषांचे अध्ययन करावे लागे. वेद 'श्रुती' होत. त्याचे त्या काळी लिखाण झाले नव्हते. विद्यार्थ्याला त्यातला प्रत्येक शब्द योग्य उच्चारासह पाठ करून स्मृतिबद्ध करावा लागे. सम्राट अशोक व त्यानंतरच्या राजांना विद्वान ब्राह्मण शिक्षकांबद्दल जो आदर वाटे तो काही उगाचच नव्हे! **शिक्षण, संस्कृती, नवी वर्ग व्यवस्था, वेगवेगळ्या समाजांना एकत्र आणण्याची प्रक्रिया व शेती व्यवस्थेचा विस्तार ही नवी कामे ब्राह्मण वर्ग जाती-**



**व्यवस्थेच्या उगम होण्याच्या काळापासून पार पाडू लागला होता.** नवे शासन व समाजव्यवस्थेला हे कार्य उपयुक्त होते. त्यामुळेच या राजांना ते कार्य करणाऱ्या ब्राह्मण पुरोहितांबद्दल आदर होता. आता ब्राह्मण पुरोहित वर्गाच्या या नव्या कार्य-कर्तृत्वांबाबत अधिक सखोल विचार करू.

संस्कृत भाषेचे सैद्धांतिक स्वरूप जरी तेच राहिले असले तरी एक जिवंत भाषा म्हणून वेगवेगळ्या प्रदेशांत संस्कृत भाषेचे स्वरूप बदलू लागले. तिला प्रादेशिक वळण मिळू लागले. संस्कृत भाषेचे निश्चित स्वरूप ठरविण्याचे काम अनेक वैय्याकारण्यांनी किंवा त्यांच्या परंपरेने केले असेल, पण पाणिनी या वैय्याकारण्याने या क्षेत्रांत एवढे प्रभावी कार्य केले आहे की, बाकीच्यांची नावे स्मृतिपटलावरून पुसली गेली आहेत. केवळ संस्कृतच नव्हे तर त्या काळातील जगातील अनेक भाषांचा विचार केला तरी पाणिनीचा 'अष्टाध्ययी' हा ग्रंथ म्हणजे भाषेचे पहिले शास्त्रशुद्ध व्याकरण होय. इसवी सनाच्या दुसऱ्या शतकात पातंजलीने पाणिनीच्या ग्रंथावर भाष्य लिहून पाणिनीने घालून दिलेले नियम सूत्रबद्ध केले. त्यातून संस्कृत भाषेची मूलतत्त्वे अगदी स्पष्टपणे व तर्कशुद्धरीत्या मांडली गेली. **संस्कृतमधील गद्य वाङ्मयामध्ये पातंजलीचा ग्रंथ हा अत्यंत स्पष्ट व स्वच्छ अशा भाषासौंदर्याने नटलेला आहे.** त्यानंतर व्याकरणाचा अभ्यास हे भारतातील विद्वानांना बौद्धिक समाधान देणारा विषय झाला. संस्कृत भाषेची आजची रचना पाहिली तर व्याकरणदृष्ट्या त्यात फारसा फरक पडला असे म्हणता येणार नाही, **पण वेगवेगळ्या स्थानिक भाषांतून शब्द, वाक्प्रचार, म्हणी संस्कृत भाषेने उचललेल्या आहेत. वेगवेगळ्या स्थानिक भाषा या निरनिराळ्या समूहांच्या व्यापार-व्यवहारातून आलेल्या संकरांतून निर्माण झालेल्या आहेत.** आणि संस्कृत भाषेचा प्रभावही त्या भाषांवर पडला आहे. विविध भाषांचा संकर आजही चालू आहे. मगध साम्राज्याच्या विस्ताराबरोबर विनिमयाचाही विस्तार झाला. मगध देशाची जी भाषा होती, ती काही देशभर चालू शकत नव्हती. नुसते आसामकडे पाहिले तरी दिसून येते की, तेथील दऱ्या खोऱ्यांतील प्रत्येक जमातीची स्वतःची अशी बोली भाषा होती. अशोकाने जेव्हा आपल्या आदेशांचे आलेखन केले तेव्हा तशी परिस्थिती सबंध भारतभर असावी. कालांतराने संस्कृत भाषा ही उच्चवर्णीय लोकांची भाषा झाली. या भाषेचे शिक्षण सर्वसाधारणपणे ब्राह्मण वर्गाच्या हातात राहिले. संस्कृत भाषेतील पहिला कोरीव शिलालेख इसवीसनानंतर १५० व्या वर्षीचा 'गिरनार' येथे आहे. चंद्रगुप्त मौर्याने बांधलेल्या एका धरणाची पुनर्बांधणी शक राजा रूद्रदामन याने केली. त्याबद्दल हा शिलालेख आहे. या शिलालेखात रुद्रदामन संस्कृत भाषेवरील आपल्या प्रभुत्वाची शेखी मिरवीत आहे. परदेशांतून आलेले आक्रमक संस्कृत भाषेवर प्रभुत्व मिळवून सामाजिक प्रतिष्ठा मिळवू शकत, याचे हे उदाहरण होय. तरीसुद्धा इसवी सनाच्या चौथ्या शतकापर्यंतचे शिलालेख साध्या प्राकृत भाषेत आहेत. नाशिकजवळील बौद्ध लेण्यामधील उच्च दर्जाच्या संस्कृत भाषेतील कोरीव आलेख हे परकीय पूर्वज असणाऱ्या शकदात्यांचे आहेत. उलट शात-

वाहनांसारख्या एतद्देशीय राजांनी साध्या प्राकृत भाषेचा वापर केला आहे. धार येथील इसवीसनाच्या १००० ते १०५५ या काळात झालेला राजा भोज हा आदिवासी नाग समाजातील स्त्रीचा पुत्र होता. तिचे नाव शशीप्रभा होते. या भोज राजाने शास्त्र, शिल्पकला, काव्य, नाटक अशा विविध क्षेत्रांत संस्कृत भाषेत साहित्यनिर्मिती केली आहे. त्याचा पिता सींधुराज याने शशीप्रभेचे मन जिंकण्याकरिता जे प्रयत्न केले त्यावर 'नवसहासांकचरितम' नावाचे काव्य कवी पद्मगुप्त परिमल याने रचले आहे. वैश्य हे मुळात जरी आर्य असले तरी हळूहळू संस्कृत भाषेच्या शिक्षणापासून ते वंचित झाले. क्षत्रियांनी मात्र मग ते मूळ आर्य असोत की बाहेरून आलेल्या शस्त्रधारी जमातीतील असोत, संस्कृत भाषेत रचना केल्या आहेत. तेव्हा त्यांना त्या भाषेचे शिक्षण घेता येत असे हे दिसून येते. चौथ्या शतकानंतर राजदरबारी व न्यायाधिकारी यांचे दप्तर संस्कृत भाषेत ठेवले जाई. त्याकरिता ठराविक पद्धतीचे, पत्राचे व नोटीसांच्या निकालांचे नमुने आखण्यात आले होते. त्याला 'लेखप्रकाश', 'लेखापद्धती', म्हणत त्यामुळे हे दप्तर ठेवणे व्यावसायिक कायस्थ जातीला सुलभ होई.

संस्कृत भाषेतील आदेशपर, आशीर्वादपर क्रियापदांवरून त्या भाषेवरील ब्राह्मणी ठसा सहज दिसून येतो. वैदिक कामांतील यज्ञविधींचे स्वरूप बदलल्यानंतरही इतर विधी वा उपचार करणारा वर्ग ब्राह्मण वर्गच राहिला. याबाबतीत त्यांच्याशी स्पर्धा करणारे होते केवळ आदिवासी समाजांचे मांत्रिक! या समाजाचे शेती व्यवसायी समाजामध्ये स्थित्यंतर झाल्यानंतरसुद्धा बराच काळ संस्कार व परंपरा म्हणून जुन्या प्रथा पद्धती शिल्लक राहिल्या; पण मांत्रिकांचा प्रभाव आपल्या टोळ्यांपुरता होता. नव्या व्यापक समाजांत अशा अनेक मांत्रिकांना—त्यांच्या दैवी समजुती, आचार, उपचार प्रथा इ. वैशिष्ट्यपूर्ण विधीसहित नव्या पुरोहित वर्गात सामावून घेतले गेले. काही पारंपरिक आचार-उपचारांना धार्मिक उपचारांची मान्यता मिळाल्यामुळे ब्राह्मण पुरोहित स्वत: ते करू लागले. जुन्या आदिवासी टोळ्या किंवा समूह इत्यादींच्या परंपरागत उपचारांना धार्मिक मान्यता देताना अनेक वेळा त्यातला रानटीपणा किंवा दुष्टपणा काढून टाकण्यात येई. अनेक ब्राह्मण पुरोहित नव्याने सामावलेल्या समूहांचे खास पुरोहित बनले व आपले ब्राह्मणी व त्या समूहांचे परंपरागत असे दोन्ही विधी ते धार्मिक विधी म्हणून करू लागले. या विविध समूहांच्या परंपरेने आलेले जन्म, मृत्यू, मुंज, गरोदरपणाची अवस्था अशा अनेक प्रसंगी करावयाचे विधी व उपचार ब्राह्मण वर्ग करू लागला. **बुद्ध किंवा जैन भिक्षूंच्या धर्मात असे विधी व उपचार करणे हे संमत नसल्यामुळे नव्या समाजात चालत आलेली ही कार्ये ते करू शकत नव्हते. त्यामुळे या समाजांमध्ये ब्राह्मणांनी जी जागा घेतली, ती जागा ते घेऊ शकले नाहीत.** नागरणीच्या किंवा इतर वेळी पूजाविधी करणे, देवांचा कोप होऊ नये म्हणून त्यांची किंवा ग्रहांची शांती करणे, मुहूर्त पाहणे वगैरे कामे ब्राह्मणाकडेच चालू राहिली. जुन्या यज्ञविधींचे महत्त्व केवळ पुस्तकी राहिले. पावित्र्याच्या एका पोकळ कल्पनेपलीकडे त्याला प्रत्यक्ष स्थान राहिले



नाही. एखादा राजा कधी कधी अश्वमेध यज्ञ करीत असे; पण अशा यज्ञात मिळणाऱ्या दान-दक्षिणांवर ब्राह्मण पुरोहित जगू शकेल एवढ्या प्रमाणात ते होत नसत. या वर्गाला दक्षिणा मिळण्याकरिता आता नव्या वर्गाचे पौरोहित्य करण्याची आवश्यकता होती. तो वर्ग होता गृहपतींचा. '**गृहपती**' हा शब्द स्वतःच्या मोठा बारदाना असणाऱ्या श्रीमंत शेतकऱ्यांच्या कुटुंब-प्रमुखाला किंवा श्रीमंत व्यापारी कुटुंबप्रमुखाला उद्देशून वापरला गेलेला आहे. त्यापेक्षाही व्यापक अशा एकत्रित कुटुंबाच्या प्रमुखांकरिता '**महाशाला**' असाही शब्द वापरला गेला आहे. हे कुटुंबप्रमुख जरी कोणत्याही जातीचे असले तरी योग्य दक्षिणा व सन्मानाची वागणूक या अटीवर ब्राह्मण त्यांचे पौरोहित्य करू लागले. ज्या आदिवासी जमाती किंवा कारागिरांच्या श्रेणी होत्या, त्यांच्यातही ब्राह्मणांनी आपला शिरकाव करून घेतला. अशा रीतीने विविध जातीजमातींच्या विधी व उपचारांचे पौरोहित्य ब्राह्मण वर्गाकडे आले.

हळूहळू जातीजमातींच्या देवतांना अधिकृत ब्राह्मणी देवदेवतांचा दर्जा देण्यात आला. या देवदेवतांना एक धर्मव्यवस्थेत सामावून घेण्याकरिता नवी पुराणे व दंतकथा रचण्यात आल्या. त्याबरोबर नवे विधी व उपचारही आचारात आले. चांद्रमास पंचांगामध्ये ठराविक दिवसांना पवित्र व वैशिष्ट्यपूर्ण स्थान मिळाले. त्या दिवसांकरिता खास विधी ठरविण्यात आले. निरनिराळ्या जातीजमातींची दैवतस्थाने (जागा) पवित्र ठरविण्यात आली. त्यामुळे भारतात पवित्र क्षेत्रांची संख्या प्रचंड झाली. त्या पवित्र क्षेत्राबद्दलही दंतकथा प्रसृत करण्यात आल्या. (ही प्रक्रिया अजूनही चालू आहे) **महाभारत, रामायण खास करून पुराणे यात अशा भरपूर कथा आहेत. या सर्व एकत्रित करण्याची प्रक्रिया (प्रोसेस ऑफ ॲसिमिलेशन) विलक्षण मजेशीर आहे.** केवळ कृष्ण किंवा बुद्धच नव्हे तर मत्स्य, कासव आणि रानडुक्कर अशा पशुदेवकांचीही विष्णु-नारायणाच्या अवतारात गणना होऊ लागली. वानर-हनुमान हा शेतकऱ्यांचा आवडता देव; त्याला मानणारा स्वतःचा पंथ होताच; पण त्याला रामाचा सेवक करण्यात आले. तो राम पुन्हा दशावतारात आहेच! भारतातील अनेक आदिवासी समूहांचे पशुदेवक 'नाग' हे होते. हा नाग (शेष) आता भगवान विष्णूची शय्या झाला; शिवाच्या गळ्यातील हार झाला; गणेशाचे शस्त्र झाला. हत्ती हे पशुदेवक गणेशाच्या स्वरूपात मानले गेले. तो शिवपार्वतीचा पुत्र झाला. वास्तविक शिव हासुद्धा भूतगणांचा देव! त्याचे एक स्वरूप वेताळ, हा देव आजही काही जमातीत अगदी लोकप्रिय आहे. वशिंड असणाऱ्या नंदीची पूजा दक्षिणेतील लोक अश्मयुगापासून करीत असल्याचे पुरावे आहेत. सिंधू संस्कृतीमधील छाप्यांवरसुद्धा वशिंड असलेल्या बैलाची चित्रे आहेत. पण ह्या नव्या जमान्यात तो शिवाचे वाहन झाला. काही आदिवासी समूहांच्या मातृदैवतांचे पुरुषी दैवतांशी विवाह लावण्यात आले व ती मातृदैवते मानणाऱ्या समूहांना समाजव्यवस्थेत स्थान दिले गेले. (उदा. दुर्गा, पार्वती, लक्ष्मी वगैरे) काही कमी महत्त्वाचे समूह जी स्थानिक मातृदैवते मानीत असत. (उदा. तुकाई, काळूबाई वगैरे) त्यांना महत्त्वाच्या मातृदैवताची रूपे समजण्यात येऊ लागले.

या समन्वयीकरणाच्या प्रक्रियेत देवांची कुटुंबे तयार झाली. सरंजामदारी काळात तर देवांचे दरबार भरू लागले. देवदेवतांचे विवाह झाले; याचा अर्थ विवाह संस्थेला विविध समूहात मान्यता मिळाली व अशा विविध समूहांचे एकत्रीकरण झाले. त्यांचे आपसात विवाह व अधिक व्यापक प्रमाणात सामाजिक संबंध घडू लागले असले पाहिजेत! समाजात काही प्रमाणात एकरूपता वाढू लागली असली पाहिजे. जातीव्यवस्थेत विविध समूहांच्या ज्या जाती झाल्या, त्यांना त्यांच्या आर्थिक दर्जाप्रमाणे सामाजिक दर्जा मिळाला. जुन्या आदिवासी टोळी-समाज समूहांनीसुद्धा आपली ओळख म्हणा किंवा अस्मिता म्हणा, (आयडेंटिटी) अनेक मार्गांनी टिकवून धरण्याचा प्रयत्न केला. तो आजही चालू आहे. उदा. कुळदैवते मानणे, समाज करणे, ठराविक दिवशी खास विधी करणे वगैरे. त्यांच्या दैवतांना समाजात जे मानाचे स्थान मिळाले, त्यामुळे त्यांचे सामाजिक स्थानही संरक्षित राहिले. आता सर्व समन्वयित सामाजिक घटक एका व्यापक समाजाचे घटक झाले. आपापल्या जुन्या दैवतांबरोबर ते खास करून ब्राह्मणी व इतर दैवतांची पूजा करू लागले. ग्रीक संस्कृतीमध्ये एकाच प्रदेशात जवळजवळ रहणाऱ्यांच्या एकाच समान दैवतांभोवती एक पंथ निर्माण होण्याची प्रक्रिया झाली होती. (त्याला ॲम्फिक्टीऑनी असा शब्द आहे.) तसाच काही प्रकार येथेही झाला; पण या एका प्रादेशिक समाजात सामावलेल्या समूहामध्ये संपूर्ण एकरूपतही निर्माण झाली नाही की, त्यांच्या सामाजिक व सांस्कृतिक दर्जांत समानता आली नाही. पुराणामध्ये भोंगळ व परस्परविसंगत अशा ज्या कथा दिसतात. त्याचा अर्थ जर समजून घ्यायचा असेल तर समाजनिर्मितीची ही प्रक्रिया समजून घेतली पाहिजे.

या सर्व सांस्कृतिक देवाणघेवाणीमधून (म्युच्युअल ॲकल्चरेशन) नवी वर्गव्यवस्था निर्माण झाली. या अगोदरच्या टोळीसंघ समाजव्यवस्थेत किंवा गणव्यवस्थेत स्पष्ट स्वरूपातील वर्गव्यवस्था होती, असे म्हणता येणार नाही. या काळातील व नंतरच्या काळातील धार्मिक साहित्यांत (स्मृतिग्रंथामध्ये) चाणक्याच्या अर्थशास्त्राप्रमाणेच राजेशाहीची अवश्यकता सांगितली आहे. "मोठ्या माशाने लहान माशाला गिळू नये" याकरिता 'सार्वभौम राजाने दंडनीतीचा अवलंब करावा' असा उपदेश करण्यात आला आहे. प्राथमिक समाजात किंवा गणराज्यात बहिष्कारांचे अस्त्र वापरले जाई; पण दंडनीतीची आवश्यकता भासत नसे. दक्षिणेतील अनेक टोळयांच्या किंवा समूहाच्या प्रमुखांनी हिरण्यगर्भ विधी केल्याचे उल्लेख पुराणात आहेत. त्या विधीचे वर्णन पौराणिक ग्रंथात दिलेले आहे ते मोठे अर्थगर्भ आहे. सोन्याच्या मोठ्या कुंभामध्ये त्या प्रमुखाला गर्भाप्रमाणे बसविण्यात येई. (कुंभ हा स्त्रीच्या उदराचे प्रतीक असे) गरोदरावस्था व प्रसूती अशा वेळी म्हणावयाचे मंत्र पुरोहितांकडून विधीपूर्वक म्हटले जात असत. ते मंत्र व इतर विधी झाल्यानंतर तो प्रमुख पुनर्जन्म झाल्याप्रमाणे बाहेर येई. त्याला नवी श्रेष्ठ जात मिळत असे किंवा त्या समूहांत जातपात नसल्यास त्याला प्रथम 'जात' प्राप्त होई. अशी जात चातुर्वर्ण्यापैकी एखादी बहुधा क्षत्रियांत मोडणारी असे. अर्थात सबंध



समूहाला त्यांचा मुख्य व्यवसाय किंवा त्यांच्या कमीअधिक मागासलेपणामुळे जी जात मिळे त्यापेक्षा वरच्या दर्जाची जात त्या समूहप्रमुखाला मिळत असे. ज्या ब्राह्मणाने असा विधी केलेला असे, त्याचे गोत्र नव्या क्षत्रियाला प्राप्त होई. मध्ययुगांतील अशा रीतीने पुनर्जन्म पावलेले अनेक राजे (उदा. गोमतीपुत्र सातवाहन) स्वत:ला एकाच वेळी ब्राह्मण व क्षत्रिय अशा दोन्ही वर्णाचे म्हणवून घेत असत. सोन्याचा तो कुंभ 'दक्षिणा' म्हणून ब्राह्मण पुरोहिताला मिळत असे. नंतरच्या मध्ययुगीन काळातील राजे (अगदी बुद्ध धर्मीय राजेसुद्धा) चातुर्वर्ण्य पद्धतीचा पुरस्कार करणारे होते. वास्तविक त्यांच्यातले अनेक राजे नाग किंवा तत्सम आदिवासी समूहांच्या मूळ घराण्यांचे होते. (उदा. महाभारतातील 'अश्वत्थामन' राजा) या राजांनी चातुर्वर्ण्य धर्माला मान्यता दिली. कारण आपले श्रेष्ठत्व व अधिकार गाजविण्याकरिता आणि धर्मसंस्कार व शस्त्रे यांच्या जोरावर वैश्य व शूद्र या उत्पादक वर्गाचे दमन करण्याकरिता वर्ण व जातीव्यवस्था त्यांच्या दृष्टीने उपयुक्तच होती.

पूर्वीचा टोळीप्रमुख [किंवा गणप्रमुख] गणराज्यातील समानतेच्या नियमांतून आपल्याप्रमाणेच मोकळ्या झालेल्या इतर शस्त्रधारी सभासदांच्या साहाय्याने राजा झाला. त्या गणातील इतर लोक शेतकरी किंवा इतर व्यावसायिक वर्गांत मिसळून गेले. अशा राजांना क्षत्रियत्व देण्यासाठी त्यांची वंशावळ पुराणातील राजापर्यंत नेऊन जोडली जाऊ लागली. त्या कथांचाही पुराणात समावेश केला गेला. त्याहीपुढे जाऊन ब्राह्मणांनी इतर समूहातील स्त्रियांशी लग्ने करून नव्या ब्राह्मणांची निर्मिती केली. अशा मिश्र विवाहांतून जन्माला आलेली मुले प्रमुखही बनली. अशा मिश्र विवाहातून खास मिश्र जातीच्या पुरोहित वर्गाचा जन्म झाला. बंगालचा राजा लोकनाथ हा ब्राह्मण पिता व टोळीची राणी गोत्रदेवी माता यांचा वंशज असल्याचे अभिमानाने सांगत असे. कौंडिन्य नावाच्या शूर ब्राह्मणाने धनुष्यबाणाच्या जोरावर भारत-चीन सरहद्दीवरील नाग जमातीच्या समूहांना जिंकून त्यांची राणी 'सोम' हिच्याशी विवाह केला. पुढे स्वत:चे राज्य स्थापन केले, ते त्यांच्या वंशजांनी चालविले. रानटी जमातीमधील मातृसत्ताक पद्धतीमुळे असा समन्वय सोपा जात असे. मलबार येथे तर अशी परंपराच आढळते. तेथे जुन्या मातृसत्ताक जमातीमधील स्त्रिया व पितृसत्ताक नंबुद्री ब्राह्मण जमातीमधील पुरुष यांच्या संबंधातून 'नायर' जातीचा उदय झाला आहे. दोन्ही जातींनी आपल्या संस्था आजतागायत टिकवून धरल्या आहेत.

जुन्या जमातीचे वेगळेपण केवळ तिच्या एका किंवा अनेक प्रमुखांना वरिष्ठ दर्जा देऊन नष्ट करता येणे शक्य नव्हते किंवा तेवढ्याने त्यांना व्यापक शेतीप्रधान समाजांत सामावताही आले नसते. नवी वर्ण-जाती-वर्गव्यवस्था राबविण्याकरिता त्यांच्या जीवनपद्धतीतसुद्धा बदल घडविणे आवश्यक होते. शेती व्यावसायिक व संबंधित व्यावसायिकांचा सर्वसाधारणपणे शूद्र वर्णात समावेश झाला. टोळी-संघाबाहेर विवाह न करण्याचे रूपांतर जातीबाहेर विवाह न करण्याच्या प्रथेत झाले. त्यामुळे जातीव्यवस्था पक्क्या पायावर उभी झाली. त्याचबरोबर हेही लक्षांत ठेवले पाहिजे की, दक्षिणेतील नव्या प्रदेशात शेती

व्यवसायाचा प्रसार करण्यात ब्राह्मणांनी अग्रेसर भूमिका पार पाडली आहे. ज्या ठिकाणी जमीन जाळून मागासलेल्या पद्धतीने शेती केली जाई किंवा अन्न गोळा करून उदरनिर्वाह केला जाई. अशा प्रदेशात ब्राह्मणवर्गानेच प्रथम नांगराची ओळख करून दिली. त्या नांगराबरोबर प्रगत शेती व्यवसाय, व्यापार-व्यवहार ज्ञान ग्राम संघटना, नगरे इ. चा विकास झाला. टोळी-संघांचे किंवा आदिवासींचे प्रमुख अनेक वेळा गंगेच्या खोऱ्यातील ब्राह्मणांना असा प्रदेश कसविण्याकरिता बोलावीत असत. ह्या प्रदेशात जे हजारो ताम्रपट सापडले आहेत. (खास करून खिस्तपूर्व चवथ्या शतकातले व त्यानंतरचे) त्यातले बहुतेक ताम्रपट ब्राह्मणांना जमिनी दान दिल्याबद्दलचे आहेत. बरे, या जमिनी देवळाशी संबंधित नाहीत; कारण बहुसंख्य ताम्रपटांत तसा उल्लेख नाही. त्यानंतर गावात थोडीशी जमीन किंवा गावाच्या उत्पन्नाचा काही भाग हा देवळे किंवा गावाचा पुरोहित, यांकरिता राखून ठेवण्याची प्रथा निर्माण झाली. त्याशिवाय अनेक करांमधून ब्राह्मणांनी सुटका मागून घेतली व ती त्यांना मिळाली. (ब्राह्मण ग्रंथामध्ये तर ब्राह्मणांना सवलतीच्या दराने कर्ज द्यावे अशी मागणी आहे, पण ती नेहमीच मान्य झाली असे नाही.)

शेतीप्रधान समाजात आलेले नवे समूह आपल्या प्रथा, रीतिरिवाज जतन करीत व एकंदर आचारात त्यांना काही स्थान मिळे, हे आपण वर पाहिले आहे. त्यामुळे अशोकाच्या काळातील 'धम्म' या शब्दाचा अर्थ बदलला. या चालीरीतींचे समर्थन करण्याकरिता त्यांना धर्मग्रंथात पाठिंबा आहे, असेही ब्राह्मणांनी दाखवून दिले. असा पाठिंबा ब्राह्मणांनी निर्माण केल्यामुळे धर्मग्रंथांचा अर्थ सांगण्याचा अधिकार हासुद्धा ब्राह्मणवर्गांकडेच राहिला. या आचारविधींचे पौरोहित्यसुद्धा त्यांच्याकडेच आले. या सर्व जातीजमातींच्या समूहांवर राज्य करण्याकरिता राजाने किंवा न्यायाधिशाने जमातींच्या किंवा श्रेणींच्या स्थानिक प्रथा, परंपरांचा विचार करून न्याय द्यावा, असा नियम मध्ययुगांत अस्तित्वांत होता. आजही काही जातीत काडीमोड होऊ शकते किंवा स्त्रीचा पुनर्विवाह धर्ममान्य आहे. आजही अनेक कनिष्ठ जाती आपसांतले मतभेद हे अधिकृत कायद्याप्रमाणे नव्हे तर जातपंचायतीच्या पारंपरिक नियमांप्रमाणे मिटवतात; पण अशा समाजामध्ये जेव्हा खाजगी मालकीचा उदय होतो किंवा निरनिराळ्या गटांमध्ये जेव्हा भांडणे उद्‌भवतात तेव्हा सर्वांना लागू असणाऱ्या कायद्याची जरूरी भासते. अर्थशास्त्रांत सांगितलेल्या कडक कायद्याचा प्रभाव यामुळे नंतर नष्ट झाला.

वर सांगितलेल्या प्रक्रियेमुळे निरनिराळ्या समूहांचे व्यापक समाजांत समन्वयीकरण होताना हिंसेचा फारसा वापर करावा लागला नाही. ज्या पद्धतीने हा विकास घडून आला त्यामुळे उत्पादनवाढ व सांस्कृतिक उत्पादनावर मात्र मर्यादा पडल्या. आदिवासी किंवा टोळी अवस्थेत प्रचलित असणाऱ्या भोळसट समजुतींची जोपासना करण्यात आली. जुने विधी व संस्कारांना धर्म आणि समाजव्यवस्थेत स्थान मिळाल्यामुळे अर्थहीन कर्मकांडाचे महत्त्व वाढत गेले. मध्ययुगातील दोन ब्राह्मण मंत्र्यांनी राज्यकारभारविषयक जे ग्रंथ लिहिले आहेत, ते ग्रंथ आणि अर्थशास्त्रांचे परस्परविरोधी रूप पाहण्यासारखे आहे. एक आहे



भट्ट लक्ष्मीधर याने लिहिलेला कृत्य कल्पतरु [काळ इ. स. ११७२] आणि दुसरा आहे, हेमाद्रीपंताचा 'चतु: वर्ग चिंतामणी'. भट लक्ष्मीधर हा कनोजच्या गढवाल राजाचा मंत्री होता. आणि हेमाद्रीपंत हा देवगिरीच्या रामचंद्र राज्याचा मंत्री होता. हे दोन्ही ग्रंथ लहानमोठ्या प्रसंगी आणि खास प्रसंगी करावयाच्या विधी व उपचारांनी भरलेले आहेत. त्यामध्ये इतक्या धर्ममर्यादा व मर्यादाभंगाबद्दल इतकी प्रायश्चित्ते आहेत की सांगता सोय नाही. तीर्थयात्रा, श्राद्ध, शुभ–अशुभ कल्पना, पापक्षालन विधी यांचा इतका धुमाकूळ आहे की, जर ते प्रसिद्ध केले तर त्याचे मोठे बारा खंड काढावे लागतील. यावरून भोळ्या समजुतीच्या आधारे राज्यकर्त्या वर्गाला स्वतःवरही काही बंधने घालून घ्यावी लागत होती, हे दिसून येते. या ग्रंथात खऱ्याखुऱ्या अर्थाने राज्यकारभारविषयक फारसे असे काही लिहिलेले नाही. प्रत्येक गटाला आपल्या अलिखित नियमांप्रमाणे वागू द्यावे हाच 'न्याय' शब्दाचा अर्थ झाला. या पुस्तकांवरून असे दिसून येते की, न्यायदान देण्यात अग्नीपरीक्षेसारखा भोळसट आणि रानटी मार्गांचा अवलंब केला जाई. हे ग्रंथ लिहिले गेल्यानंतर थोड्याच काळात संख्येने अल्पसंख्य असलेल्या मुस्लिम आक्रमकांनी या राजांचा विध्वंस केला ही वस्तुस्थिती बोलकी आहे. स्मृती वाङ्मयाबद्दल आदर बाळगणारा एक हुशार प्रशासक अशी प्रसिद्धी हेमाडपंतांना लाभली आहे, पण आपल्या राज्याची तटबंदी कच्ची ठेवण्याकरिता अल्लाउद्दीन खिलजीकडून त्यांनी लाच खाल्ली, असा आरोप महानुभाव ग्रंथात करण्यात आला आहे. (तर ते असो.)

ज्या विविध समूहप्रथांचे व रीतिभातींचे जाती नियमांत (कायद्यांत) रूपांतर झाले, त्यांचे सूत्रबद्ध लिखाण मात्र झाले नाही. सर्व समाजाला लागू असणाऱ्या सर्वसाधारण कायद्याचे व समभाव तत्त्वाचे महत्त्व व नंतरच्या काळात अस्तित्वच नष्ट झाले. गुन्हा आणि पाप या कल्पनांची गल्लत करण्यात आली. धार्मिक समजुती अंधश्रद्धा आणि दंतकथांचे एवढे स्तोम माजवले गेले की, त्याच्या भाराखाली न्याय व समभावतत्त्व यांचा चुराडा झाला. मध्ययुगांतील श्रेण्या व नगरांच्या व्यवहारांबद्दल ज्या काही नोंदी उपलब्ध होत्या, त्याचा अभ्यास करण्याएवढे महत्त्व त्यांना दिले गेले नाही. त्यामुळे समाजांतील निरनिराळ्या गट-समूहांनी भारतीय संस्कृतीच्या विकासाला जो हातभार लावला आहे त्याचे मुल्यमापन करता येणे कठिण झाले आहे. बुद्ध आणि अशोकांनी सबंध समाजामध्ये एकात्मता आणून एका प्रादेशिक संस्कृतीचा विकास करण्याचे जे कार्य केले ते पुढे चालू ठेवण्यात आले नाही. जातीव्यवस्थेच्या शृंखला व आपसातील भिंती दृढ झाल्यामुळे वर्ण-जाती-पंथ व व्यवसायनिरपेक्ष असे न्याय किंवा समभाव याबाबत निकष प्रस्थापित होणे दुरापास्त झाले. त्याचाच परिणाम म्हणून मध्ययुगीन भारताचा इतिहास काळोखात बुडून राहिला.

खिस्तपूर्व पाचव्या शतकातील लिच्छवी, मल्ल व पंजामधील आर्यांच्या गणराज्यांनी सार्वभौम राज्यांच्या आक्रमणाचा चांगला मुकाबला केला होता. ग्रीक संस्कृतीमधील स्वतंत्र नगर राज्यांनी (ग्रीक सिटी स्टेटस) खास करून ॲथेन्सने मॅसिडोनियन आक्रमणा-

विरुद्ध जो लढा दिला, त्यापेक्षाही प्रखर लढा या गणराज्यांनी दिला होता; पण ॲरिस्टॉटलप्रमाणे येथील नगरराज्यांच्या घटनांचा व प्रथापद्धतींचा अभ्यास करणारा, नोंद ठेवणारा, एखादा ब्राह्मण ॲरिस्टॉटल झाला नाही; त्यामुळे भारतीय स्वतंत्र गण-राज्यांचा विनाश झाल्यानंतर, त्यांच्या स्वतंत्र प्रथा, पद्धती व संस्था कुठलाही इतिहास मांडू शकला नाही. ग्रीकांच्या सार्वजनिक सभांप्रमाणे येथेही गणसभा होत असत व येथेही अमोघ वक्तृत्वाने गाजत असत.

जुन्या ग्रीक साहित्याचे अभिजात स्वरूप व वाङ्मयीन गुण लक्षांत घेता मध्ययुगीन पौराणिक ग्रंथ अत्यंत रटाळ वाटतात; पण प्रत्यक्ष ग्रीक व भारतीय इतिहासकालीन वस्तुस्थितीमध्ये तेवढा मोठा फरक नाही. 'स्वतंत्र नगर राज्य' हा शब्द मेगॅस्थेनिसने भारताच्या संदर्भातसुद्धा वापरला आहे. ग्रीक नगर राज्ये नष्ट झाल्यावरही त्यांचे स्वरूप ग्रीक इतिहासकारांना ज्ञात होते आणि तरीही मेगॅस्थेनिसला तशी गणराज्ये भारतात आढळली हे महत्त्वाचे आहे. स्पार्टा क्रेट आणि इतर नगरराज्यांत सर्व नागरिक एका ठिकाणी सहभोजन करीत, ही एक महत्त्वाची लोकशाही प्रथा होती. यजुर्वेदामध्ये 'संग्धी' 'सपिटी' हे जे शब्द आहेत, त्यावरून गणसभासद सहभोजन, सहपेयपान करीत, असे दिसते. अर्थशास्त्रामध्ये गणराज्ये नष्ट करण्यासाठी जे उपाय सांगितले आहेत, त्यामध्ये गणराज्यांमधील सहभोजनाची पद्धत राजाने गुप्तहेरांकरवी नष्ट करावी असे सांगितले आहे. सहभोजनाची पद्धत नष्ट करण्याकरिता श्रेष्ठकनिष्ठपणाची भावना राबविण्यात आली. त्यातून आपल्यापेक्षा कमी दर्जा असलेल्या माणसांबरोबर भोजन करणे हे चांगल्या शिष्टाचाराचे लक्षण नव्हे असे मानले जाऊ लागले. त्याचेच पर्यवसान जातीबाहेरच्या माणसाबरोबर खास करून व्यवसायाने किंवा जातीने कनिष्ठ असणाऱ्या जातीच्या माणसांबरोबर सहभोजन करण्याबाबत असणाऱ्या सामाजिक निर्बंधात झाले.

भूतकाळ व वर्तमानकाळाच्या बाबतीत वास्तवांबद्दल ब्राह्मणवर्गाला वाटणाऱ्या उदासी-नतेमुळे भारतीय इतिहास व संस्कृतीच्या अभ्यासाचा फार मोठा भाग नष्ट झाला. ब्राह्मणी तर्कशास्त्राने वास्तवांकडे संपूर्णपणे पाठ फिरविली. त्याची अखेरची परिणती आठव्या शतकातील शंकराचार्यांच्या तत्त्वज्ञानामध्ये झालेली दिसते. त्यानी बाह्य-विश्व हे मिथ्या आहे; असा सिद्धांत मांडला. त्याचबरोबर सत्य हे अनेक पातळीवर असू शकते आणि जीवात्मा व परमात्मा यांचे ऐक्य हीं त्याची सर्वात वरची पातळी होय असे मांडले. अशा संधी-साधू तत्त्वज्ञानामुळे एकीकडे ब्रह्म व मोक्षाचा जप करीत असता धार्मिक विधी व उप-चारांच्या पातळीवर सामान्य लोकांबरोबर व्यवहार करण्यास ब्राह्मणांना मोकळीक मिळाली. बुद्धधर्माच्या उदयानंतर ब्राह्मणांना अहिंसेचा पुरस्कार करावा लागला तरीही पशुबळी असणारे यज्ञविधी सांगणारे वेद हे 'पवित्र' आहेत, असाही घोष चालू राहिला. स्मृति-ग्रंथामध्येही श्राद्धाच्या प्रसंगी ब्राह्मणांना कोठकोठल्या पशूंचे मांस भक्षण करण्याकरिता द्यावे याबद्दल एक यादीच आहे; पण ह्या काळापर्यंत ब्राह्मणांना मांसार्जन वर्ज्य ठरले. परस्परविरोधी प्रमेये पचविण्याची ही जी कुवत आहे त्याचा परिणाम भारतीयांच्या



मानसावर झाला आहे.

वास्तवतेकडे केलेले दुर्लक्ष, तर्काचा अभाव, कसबी आणि श्रमाच्या कामाबद्दलची घृणा, मंत्रपठण, त्या मंत्राचा तथाकथित गुप्त अर्थ समजाऊन घेण्यासाठी आवश्यक केलेली गुरुपरंपरा, जुन्या ग्रंथात लिहिल्या गेलेल्या परिच्छेदांच्या आधारे केला जाणारा खुळचट परंपरांचा गौरव ह्याचा भारतीय विज्ञानावर फार घातक परिणाम झाला. (या संघर्षाने प्रदीर्घ विवेचन डी. पी. चटोपाध्याय यांच्या सायन्स ॲंड सोसायटी इन ॲन्शन्ट इंडिया या ग्रंथात आढळून येईल. : निवेदक) जुन्या वैद्यकीय शास्त्राने–आयुर्वेदाने–अनेक उपयुक्त शोध लावले आहेत. त्यातील अनेक उपाय आदिवासींकडून घेतलेले आहेत. अरबांनी भारतीय वैद्यकीय ग्रंथाचे भाषांतर करून समृद्ध केले. पण मध्ययुगीन सरंजामदारीच्या काळांत या आयुर्वेदाचाही विकास होऊ शकला नाही. भारतीय वैद्यक शास्त्रांत कळा येण्या-वर अनंताच्या झाडाचा उपयोग करावा, असे सांगितले आहे; पण अगदी गवतापासून ते चांगल्या मोठ्या झाडापर्यंत अनेक वनस्पतींना अनंत म्हणतात, त्यातला नेमका कोणता अनंत उपयोगी आहे; याबाबत वैद्यकांच्यात एकमत नाही. अशी त्या शास्त्राची स्थिती झाली. भारतातच काय, पण ईजिप्त व बाकू येथील प्रदेशांपर्यंत ब्राह्मणांची तीर्थक्षेत्रे होती; पण त्यातील अनेक क्षेत्रांचा पत्ता लागत नाही. प्रवासमार्ग किंवा ठिकाणे याबद्दल कोणतेही लिखाण उपलब्ध नाही. भारतातील ऐतिहासिक परिस्थितीच्या वर्णनाकरिता किंवा एखाद्या भग्नावशेषाचा काळ ठरविण्याकरिता आपल्याला 'ग्रीक लेखक किंवा अरब व्यापारी किंवा चिनी प्रवासी' यांनी लिहिलेल्या ग्रंथावर अवलंबून रहावे लागते. या ग्रंथांना ऐतिहासिक दृष्टीने जे महत्त्व आहे, तसे महत्त्व असलेला एकही भारतीय ग्रंथ नाही. (वास्तविक जीवनाबद्दलची केवढी ही वैचारिक उदासीनता !)

संस्कृतीची झपाट्याने झालेली वृद्धी व सतत झालेल्या ऱ्हासांचे जे चित्र आपण उभे केले आहे, ते सम्राट अशोकानंतरच्या पंधरा शतकांच्या काळतील आहे. शेवटी अशी स्थिती आली की, आश्रमात जाऊन बारा वर्षे वेदविद्या शिकण्याऐवजी गावातला ब्राह्मण पुजारी फक्त विधी व उपचारांची पोपटपंची करणारा निरक्षर माणूस झाला. हा ऐतखाऊ वर्ग स्वतःला मिळणाऱ्या सवलती सोडायला मात्र तयार नव्हता. कर देण्याऐवजी तो मरेपर्यंत उपास करायला तयार होई. राजांच्या नावाने नकली ताम्रपटही तयार करण्यात आले. तसे ताम्रपट आता सापडले आहेत. 'भारतीय कधी खोटे बोलत नाहीत' या एरियनच्या उद्‌गारांच्या काळातील परिस्थिती संपूर्ण बदलली होती. यावरून ब्राह्मण वर्गाचा ऱ्हास झाला होता हे दिसून येते. संस्कृतीची जवळजवळ मक्तेदारी असणाऱ्या या वर्गाला समाजाला नवजीवन देण्याची शक्तीच राहिली नव्हती. त्यामुळे भारतात असहाय, उदासीन, नि:शस्त्र, गावगाडा असलेले ग्रामजीवन शतकांनुशतके टिकून राहिले. चाणक्याने साम्राज्याच्या तिजोरीत भर टाकण्याकरिता व राजसत्तेचा आधार म्हणून ज्या ग्रामजीवनाची तरफदारी केली, त्याचे पर्यवसान असे झाले. संस्कृतीचा विकास होण्याकरिता विचार व कल्पनांची देवघेव व्हावी लागते. त्याकरिता वेगवेगळ्या समाजांमधील वस्तूंचे उत्पादन

व विनिमय वाढावा लागतो. अशा व्यापारासाठी होणाऱ्या तंत्राचा विकास व्हावा लागतो. भारतामध्ये लोकसंख्येबरोबर उत्पादनांत वाढ झाली, पण व्यापारविनिमय न वाढल्यामुळे (अधिक व्यापक न झाल्यामुळे) उत्पादन त्या पद्धतीने वाढले नाही व उत्पादन तंत्राचा विकास झाला नाही. ग्रामजीवन हे गावातल्याच उत्पादनावर बरेचसे आणि कसेबसे अवलंबून रहात असे. त्या उत्पादनांतील ज्या भागाचा थोडाफार विनिमय होत असे, तो भाग प्रथम जमीनदार किंवा करवसुली करणाऱ्यांकडे खंड, भेट किंवा कर अशा स्वरूपात जात असे. (बहुतेक वेळा गावचा जमीनदार हाच कर वसूल करणारा अधिकारी असे) भारतातील ग्रामसमाज-जीवनाच्या या जगावेगळ्या अलिप्तते-मुळे अनेक धर्मपंथ व विचारसरणीचा सुळसुळाट झाला. पण मलेशियातील काही क्षुल्लक अपवाद सोडल्यास भारताबाहेर त्यांचा प्रसार झाला नाही. भारताबाहेरील लोकांना आकृष्ट करण्याचा मान बुद्धधर्माला मिळाला.

## ७·२
## बुद्धधर्माचा विकास व ऱ्हास

इसवी सनाच्या ६३० व्या वर्षी चिनी यात्रेकरू सियान त्सँग हा भारतातील नालंदा विद्यापीठात संस्कृत भाषेचा व भारतीय बौद्धविचारांचा अभ्यास करण्याकरिता आला. तो बाळवंट ओलांडून बर्फाच्छादित शिखरे पार करून खोतान ते गांधार या प्रदेशात असलेले प्रचंड स्तूप बघत बघत नंतर पंजाब ओलांडून राजगीर येथे आला. नालंदा विद्यापीठातील कायदे खात्याच्या प्रमुखाने शीलभद्राने त्याचे स्वागत केले. त्या स्वागताचे वर्णन त्याच्याबरोबर असलेल्या चरित्रकाराने असे केले आहे : "राजा बालादित्याच्या नावे असलेल्या विद्यालयाच्या अंगणात असलेल्या बुद्धभद्राच्या घराच्या चौथ्या मजल्यावर सियान त्सँगला प्रथम रहावयास जागा दिली. सात दिवस त्याचे आगत-स्वागत केल्या-नंतर, धर्मपाल बोधिसत्त्वाच्या घराच्या उत्तरेकडील अतिथीगृहात त्याला जागा देण्यात आली, त्याच्या निर्वाहाकरिता दैनंदिन दिल्या जाणाऱ्या सोयीमध्ये वाढ करण्यात आली. दररोज त्या अतिथीला १२० विड्यांची पाने, २० सुपाऱ्या, २० जायफळे, १ औंस कापूर व एक 'शँग' महासाळ तांदूळ देण्यात येई. या तांदळाचे दाणे काळ्या वाटाण्या-पेक्षा मोठे होते; आणि जेव्हा ते शिजविले जात, तेव्हा घमघमाट सुटत असे. दुसऱ्या कोणत्याही तांदळाला असा वास येत नसे. त्या जातीचा तांदूळ मगधाशिवाय इतर कोठेही मिळत नसे. तो फक्त राजेरजवाडे व मठाधिपती अशा स्थानांवरील व्यक्तींनाच मिळू शकत असे. सियान त्सँगला महिन्याला तीन 'टू' तेल मिळे. दही, दूध, लोणी तर पाहिजे तितके मिळे. त्याच्या दिमतीला एक सेवक व ब्राह्मण देण्यात आला होता. सियांगला फिरण्या-करिता हत्ती मिळत असे. नालंदा विद्यापीठांत जवळजवळ दहा हजार निवासी होते. त्यातील फक्त दहा जणांना अशा तऱ्हेच्या सवलती मिळत." याच चरित्रकाराने नालंदाचे जे वर्णन केले आहे ते असे : 'सहा राजांनी नालंदाला अनेक मठ बांधले आहेत. त्या



सर्व मठांच्या भोवती विटांच्या भिंतीचे प्रचंड कुंपण घालण्यात आले आहे व वेगवेगळ्या मठांत जाण्याकरिता त्या कुंपणाला दरवाजे आहेत. विद्यापीठात सर्वत्र प्रशस्त अंगणे आहेत व त्याची विभागणी आठ भागांत केली गेली आहे. मठातील इमारतींच्या गच्च्या एखाद्या ताऱ्याप्रमाणे विस्तीर्ण आहेत. इमारतींची शिखरे आकाशातील धुक्यात गेली आहेत व आराधना करावयाची सभागृहे ढगांच्याही वर पोहचली आहेत. विद्यापीठाच्या परि-सरांतील बागांमधून निळ्या रंगाचे ओढे वाहतात व चंदनाच्या सुवासिक झाडांच्या रायांमधून हिरवी कमळे डोकावतात. विद्यापीठांतच्या कुंपणाबाहेर मोठी आमराई आहे. विद्यापीठातल्या महंतांची निवासस्थाने चार मजल्यांची आहेत. त्यांच्या छतांचे लाकडी खांब इंद्रधनुष्याच्या वेगवेगळ्या रंगात रंगवलेले आहेत व त्यावर चित्रे कोरलेली आहेत. भिंतीमधील खांब लाल व हिरव्या रंगाचे आहेत. कमानी व दरवाजे कलात्मक नक्षिकामाने मढवलेले आहेत. भिंतीवर जागोजागी सुंदर चित्रे टांगलेली आहेत. फरशी गुळगुळीत व चकचकीत दगडाची आहे. नालंदातील मठाएवढे सौंदर्य व कलात्मकता दुसऱ्या कोठेही आढळणार नाही. या विद्यापीठात नेहमीच दहा हजारांच्या आसपास भिक्षू व इतर पाहुणे असतात. ते महायान पंथाचा व त्याचप्रमाणे हिनयान पंथाच्या १८ शाखांचा तसेच वेद व इतर परंपरागत शास्त्र व वाङ्मय यांचा अभ्यास करीत असतात. या विद्यापीठाला राजाने शंभर गावांचे उत्पन्न प्रदान केले आहे. त्या प्रत्येक गावात २०० कुटुंबे आहेत व ती कुटुंबे दररोज शेकडो 'टॅन' तांदूळ, दहीदूध, लोणी पुरवितात. येथील विद्यार्थ्यांना कपडा, अन्न, निवारा व वैद्यकीय सेवा याकरिता भिक्षा मागावी लागत नाही. या सर्व सोयी-सवलतीमुळे येथील विद्यार्थी प्रत्येक क्षेत्रात समाधानकारक ज्ञान मिळवू शकतात.'

प्रस्तुत वर्णन उपमा, उत्प्रेक्षा सोडल्यास फारसे अतिशयोक्तीपूर्ण आहे, असे म्हणता येणार नाही; कारण उत्खननामध्ये नालंदाचे जे अवशेष मिळाले आहेत ह्यावरून त्या काळी सात मजली इमारती होत्या हे दिसून येते. 'बुद्ध-गया' येथील महाबोधी देऊळ सध्याच्या एकशे साठ फूट उंचीपर्यंत तेव्हाही पोहोचले होते. भिक्षूंच्या दैनंदिन जीवना-बद्दल स्वतः सियॉन त्सँग याने दिलेली माहिती अशी आहे :

'बुद्ध वाङ्मयामध्ये विनय आणि सूत्रे या दोहोंचाही समावेश आहे. या धार्मिक ग्रंथाचा एक भाग जो विशद करू शके, त्याला कर्मदानाच्या कर्तव्यापासून मुक्त करण्यात येई. दोन भाग विशद करू शके त्याला खास जागा मिळे. तीन भाग विशद करू शके त्याची परिचर्या करण्याकरिता सेवक मिळे. चार भाग विशद करणाऱ्याला उपासकांकडून सेवा मिळे. पाच भाग विशद करू शके त्याच्या:दिमतीला खास नोकर मिळे. धर्मसभांच्या चर्चासत्रात उत्तम भाषा, सूक्ष्म संशोधन सखोल व्यासंग किंवा तर्कशुद्धता अशा तऱ्हेचे गुण दाखविणाऱ्यांची हिऱ्यामाणकांनी मंडित केलेल्या हत्तीवरून मिरवणूक काढण्यात येई. याउलट वादविवादात वाईट भाषा वापरल्यास, तर्कदुष्टता दाखविल्यास किंवा मूर्खपणाची विधाने केल्यास तशा तऱ्हेचे वर्तन करणाऱ्याच्या तोंडावर लाल व

पांढरा रंग थापून त्याचे शरीर धूळ व घाण ह्यात माखून त्याला दूरवर नेऊन खड्डयात टाकीत.

ख्रिस्तपूर्व सहाव्या शतकात बुद्धधर्म स्थापन करणाऱ्या सिद्धार्थच्या विचारांपासून आणि आचरणापासूनही त्याचा धर्म पाळणारे केवढे दूर गेले होते! पण या काळातही सर्वसंग-परित्यागी भिक्षुक होते. अजूनही ते अनवाणी पायाने खेड्यापाड्यात फिरून तेथील रहिवाशांच्या भाषेत धर्माचा प्रचार करीत, भिक्षा मागून रहात असत. आभाळाच्या निवाऱ्याला निद्रा घेत असत. अशा भिक्षुकांची संख्या मात्र सतत कमी होत होती. बुद्ध काळातील भिक्षुकांची वस्त्रे शिवलेल्या चिंध्यांची होती. आता मठातील महंत उत्तम कापडाची किंवा लोकरीची किंवा चीनमधून आयात केलेल्या रेशमाची वस्त्रे वापरीत. अत्यंत महाग अशा केशरी रंगात ती बुडवलेली असत. निर्वाणाच्या काही काळ अगोदर बुद्ध जुन्या नालंदा गावाला गेला होता. खरोखरच तोच महान बुद्ध पुन्हा त्याच नालंदाला गेला असता तर ऐश्वर्य व सौंदर्याने नटलेल्या मठामध्ये त्याला प्रवेशसुद्धा मिळाला नसता. अर्थात काही 'चमत्कार' करून त्याने आपली ओळख पटवली असती तरच त्याचे स्वागत झाले असते. बुद्धाने स्वत: चमत्कारांची थट्टा केलेली आहे; पण नंतर बुद्धाचे चमत्कार हे त्या धर्मरचनेचे एक महत्त्वाचे अंग झाले. बुद्धाच्या पुनर्जन्माबद्दल व पुनर्जन्मी त्याने केलेल्या चमत्काराबद्दल अनेक कथा प्रसृत करण्यात आल्या. पूर्वीच्या काळातील आदिवासी समाजातील सुफली-करण विधींचा नव्या तांत्रिक विधींच्या स्वरूपात (तंत्रिझम्) पुनरुद्धार करण्यात आला. त्यातून अनेक नवे पंथ निर्माण झाले. या नव्या पंथांचा शिरकाव ब्राह्मण, जैन व बुद्ध धर्मातही झाला. जुन्या धर्मातील साधेपणा व त्याग ही तत्त्वे जशी नष्ट झाली तसे त्या धर्मांच्या तत्त्वज्ञानातही बदल करण्यात आले. इसवी सनाच्या दुसऱ्या शतकानंतर महायान पंथाने तर उघडपणे विलासी जीवनपद्धतीचा पुरस्कार करण्यास सुरुवात केली. तसा पुरस्कार न करणाऱ्यांना ते तिरस्काराने 'हिनयान' म्हणू लागले. 'महायान' पंथाच्या पुरस्कर्त्यांनी बुद्धतत्त्वे किंवा विचारांबद्दल त्यांना योग्य वाटेल ते लिहिले; पण 'हीनयान' पंथाने पाली भाषेतील ग्रंथच प्रमाण मानले. 'महायान' पंथाचे धर्मविचार मूळ संस्कृत भाषेतून तिबेटियन व चिनी भाषेत रूपांतरित झाले आहेत. एखादे स्वतंत्र ग्रंथालय होऊ शकेल एवढी या ग्रंथांची संख्या आहे. तरीसुद्धा काळाच्या ओघात मूळ संस्कृत भाषेतील ग्रंथासह अनेक ग्रंथ गहाळ झाले आहेत. पुढे पुढे हीनयान आणि महायान या दोन्ही पंथांच्या मठ चालविण्याच्या पद्धतीत फारसा फरक राहिला नाही. कारण 'हीनयान' मठांनाही राज्यकर्त्यांकडून देणग्या मिळत असत. नंतरच्या काळात काही ठराविक कुटुंबां-कडून या मठाचा कारभार चाले.

सिलोन किंवा ब्रह्मदेश या देशात चालू असलेल्या प्रथेवरून असेही दिसून येते की, या मठांचा कारभार चालविण्याकरिता कुटुंबांतील सर्वांत धाकट्या मुलाचे मुंडण करून त्याला 'मठाधिपती' करीत. बुद्धधर्मात अशी दुफळी माजण्याच्या अगोदरही पळून गेलेले गुलाम, नाग व इतर आदिवासी, तुरुंगातून पळालेले गुन्हेगार, अपंग, आजारी माणसे इत्यादींना संघात प्रवेश मिळणे बंद झाला. या सर्व लक्षणांचा अर्थ असा की, बुद्धधर्म व शासन-संस्था आणि वरिष्ठ वर्ग यांचे एकमेकांशी असणारे नाते पक्के जमले होते. व्यावहारिक जीवनांमध्ये चक्रवर्ती राजाला जे स्थान दिले जाते, ते स्थान आता धर्मसंस्थेमध्ये बुद्धधर्माला देण्यांत आले. मूळ बुद्धविचारामध्ये मानवी शरीराबद्दल घृणानिर्माण करण्याचा प्रयत्न आहे. शरीरसुखापासून भिक्षूने निवृत्त व्हावे, असा यत्न आहे. "भिक्षूने आपल्या शरीरांतील घाणीचे तपशीलवार चिंतन करावे, जेथे प्रेते टाकतात अशा जागेजवळ जाऊन गिधाडे, कोल्हे, किटक हे मानवी शव कसे खातात ते पहावे", असा उपदेश आहे. पण बुद्ध धर्मीयांनी कोरलेली जी नितान्त सुंदर लेणी आहेत, त्यावरून असा आदेश बुद्धाने दिला होता, हे खरेही वाटणार नाही. सुंदर मुकुट घातलेल्या बोधिसत्वांची, कमनीय व पुष्ट बांध्याच्या स्त्रियांची आणि प्रेमी युगुलांची हजारो चित्रे व शिल्पे गांधार भार्‌हुत्‌पासून अजंठा अमरावतीपर्यंत साखळीसारख्या पसरलेल्या लेण्यांमधून आहेत. मूळ संस्थापकांच्या त्यागी आणि भूतदयावादी संदेशाची आठवण व्हावी, असे एकही चित्र नाही. ज्या गरीब जनतेच्या मेहनतीमधून निर्माण होणाऱ्या संपत्तीवर हे मठ पोसले जात, त्या पामरांच्या परिस्थितीचे चित्रण कोठेही आढळत नाही. पूर्वजन्मातील पापपुण्यावरून हा जन्म निश्चित होतो, त्याबद्दलची शिक्षा म्हणून हे दु:ख सहन करावे लागते, असा सिद्धान्त मांडल्यामुळे सामान्य माणसांच्या दु:खाकडे लक्ष देण्याची जरूरीच भासत नव्हती.

बुद्धधर्मांच्या पाली भाषेतील साहित्यात प्रथम **इंद्र व ब्रह्म** यांना स्थान दिले गेले. ते दोघेही अत्यंत आदराने बुद्धाचे प्रवचन ऐकत असत असा उल्लेख केला गेला आहे. महायान ग्रंथामध्ये तर नंतर गणेश, शिव, विष्णू या देवांसह सर्व दरबाराला बुद्ध साहित्यांत प्रवेश मिळाला. अर्थात या सर्वांचे स्थान बुद्धदेवाच्या खाली होते. त्याबरोबर काही निवडक देवतांनीही बुद्धधर्माच्या मंडपात प्रवेश मिळविला. रमणीय सौंदर्यवती 'तारा' व मुळात अर्भकांचे भक्षण करणारी राक्षसी असलेली 'हारीती' हिचा संरक्षक मातृदेवतेच्या स्वरूपात प्रवेश करण्यात आला. साप, भूतेखेते यांचे निवारण करण्याकरिता म्हणावयाच्या '**धारिणी**' या मंत्राचाही अंतर्भाव बुद्ध वाङ्मयात केला गेला. काही मठांचे **संरक्षक दैवत नाग** होते. पण बुद्ध अर्थात सर्वोच्च स्थानी होता. त्यातून पूर्व-जन्मीच्या बुद्धांची संख्या वाढत चालली आणि त्यामध्ये 'बुद्ध मैत्रेय' या पुढे कधी काळी जन्मास येणाऱ्या बुद्धाची सुद्धा भर पडली. जनसामान्यांत असलेल्या अनेक लोककथा बुद्धावतारांच्या कथा मानण्यात आल्या व जातक कथांच्या रूपाने त्यांचा बुद्ध साहित्यात समावेश झाला. धर्माच्या विविध शाखा व भिक्षूसंघाचे नवे नियम यांचे समर्थन करण्या-करिता बुद्धाविषयी विविध कथा रचण्यात आल्या. ठिकठिकाणी बुद्धाचे अवशेष असल्याचा दावा करून शेकडो स्तूप बांधण्यात आले; पण धर्मभोळेपणा वृद्धिंगत करण्याच्या डावपेचात ब्राह्मण पुरोहित सरस ठरले. ब्राह्मणांनी पुराणांत ज्या देवदेवतांना उच्चासन दिले ते शेतकऱ्याचे किंवा राजपदी जाऊन पोहोचलेल्या टोळीप्रमुखांचे देव होते.

याचे एक उदाहरण घ्यायचे तर काश्मीरच्या 'नागनिलमत' या देवतेचे देता येईल. बुद्धधर्माच्या प्रसारामुळे या देवतेचे महत्त्व जवळजवळ लोप पावले होते. ब्राह्मणांनी खास '**निलमतपुराण**' लिहून त्या देवतेचा व पंथाचा उद्धार केला व त्याचबरोबर स्वतःचे प्रस्थ वाढविले.

इस्लाम किंवा ख्रिस्त धर्म ज्याप्रमाणे राजधर्म झाले, तशा तऱ्हेने बुद्धधर्म राजधर्म झाला नाही. त्या दोन्ही धर्मांच्या प्रसाराकरिता शासन व्यवस्थेने ज्याप्रमाणे लढाया व युद्धे या मार्गांचा अवलंब केला तसा ह्या धर्माच्या प्रसाराकरिता केला गेला नाही. तसेच दुसऱ्या विरोधी विचारधारांना दडपण्याकरिता शासन व्यवस्थेने आपले अधिकार वापरले नाहीत. पहिल्यापासून बौद्धसंघामध्ये जातीचा त्याग करून आलेले ब्राह्मण होते. त्यांची बौद्धिक परंपरा तेथेही कायम राहिली. बुद्धधर्माच्या प्रभावामुळे ब्राह्मणांनी प्रथम गोमांसभक्षण व नंतर मांसभक्षण सोडले. अहिंसा धर्माचा पुरस्कार केला. बुद्धधर्मीयांनीसुद्धा ब्राह्मण तत्त्वज्ञानाचा (दर्शनांचा) आदर केला. बौद्धविचार व ब्राह्मण दर्शने एकमेकांत मिसळून जाण्याची प्रक्रिया सुरू झाली. (रामानुजांनी शंकराचार्यांना 'प्रच्छन्न बौद्ध' म्हटले आहे, याची आठवण व्हावी : निवेदक) दोन्ही तत्त्वज्ञानांत वास्तविक जगाला सत्य मानले जात नव्हते. शंकराचार्यांच्या दर्शनात काय किंवा ज्या विविध विरोधी दर्शनांचा शंकराचार्यांनी समाचार घेतला आहे, त्या दर्शनांतसुद्धा अशोकाच्या काळातील किंवा त्याअगोदरच्या काळातील बुद्धविचारांची पुसट छायासुद्धा दिसून येत नाही. मूळ बुद्धधर्मातील प्रमुख विचाराचा—अहिंसा धर्माचा—सामाजिक व राजकीय प्रभावसुद्धा कमी होत गेला. कलिंग देशावरील रक्तपाती मोहिमेनंतर सम्राट अशोक अहिंसा धर्माकडे वळला; पण उलट सातव्या शतकातील कनोजचा राजा हर्ष शिलादित्य हा (इ. स. ६०२–६५५) बुद्धधर्माचा निष्ठावंत अनुयायी असतानाही त्याने सतत तीस वर्षे लढाया केल्या व जवळजवळ सगळा भारत पादाक्रांत केला. तसे पाहिले तर 'चेंगिजखान' (तेमुजिन) व त्यानंतरचे मोगल राजे हेसुद्धा बुद्धधर्मीय होते; पण त्यांनी सबध युरेशियन खंडात ज्या लष्करी स्वाऱ्या केल्या, जो विध्वंस आणि मानवहत्या केली, त्यामुळे ते इतिहासात कुप्रसिद्ध झाले आहेत. कोठल्याही बुद्धधर्मीय राजाने बुद्धधर्माच्या प्रसाराकरिता मात्र युद्धे केलेली नाहीत. परक्या धर्माच्या माणसाची त्या कारणाकरिता हत्या केलेली नाही.

अशोकाच्या काळात बुद्धधर्माला मिळालेला राजाश्रय अशोकानंतरही इ. स. बाराव्या शतकापर्यंत चालू होता. त्या शतकात मुसलमानी आक्रमणांनी उत्तरेकडील सर्व मठ लुटून उध्वस्त करून टाकले. मेनेन्डरप्रमाणे इंडो-ग्रीक राजा ॲगाथोक्लस यानेही आपल्या नाण्यांवर बुद्धधर्माच्या चिन्हांचे छाप मारले. महायान पंथाला कुशाणांनी भरघोस देणग्या देऊन त्या पंथाचा पाया भक्कम केला. कुशाण घराण्यांची सत्ता इसवी सनाच्या चौथ्या शतकापर्यंत चालू होती. मुसलमानी आक्रमणाअगोदर झालेल्या राजांनी पूर्वीच्या राजांनी दिलेल्या जमिनीच्या किंवा गावाच्या देणग्या रद्द केल्या नाहीत. मौर्यांच्या नंतर आलेल्या शुंग राजांनी ब्राह्मण धर्माला आश्रय दिला. पाहिल्या शुंग राजाने जुन्या वेदांतील यज्ञ



पद्धतीप्रमाणे अश्वमेध यज्ञही केला; पण बौद्धधर्मावर या धोरणाचा काहीही प्रतिकूल परिणाम झाला नाही, हे त्या काळातील सांची येथील स्तुपाची शुंग राजांनी केलेल्या दुरुस्तीवरून दिसून येते. इसवी सनाच्या चौथ्या शतकात गुप्त राजांनी ब्राह्मणांना जमिनी दान दिल्या. त्या दानपत्रात महाभारतातील श्लोकांचा उल्लेख आहे; पण ह्याच काळात गुप्तांनी बौद्ध मठांची पुनर्बांधणी केल्याचे व त्या बौद्धमठांच्या देणग्यात वाढ केल्याचेही दिसून येते. बुद्धधर्मीयांचा पहिला छळ सर्वांत प्रथम पश्चिम बंगालमधील **नरेन्द्रगुप्त शशांक** या राजाकडून झाला. इसवी सनाच्या सातव्या शतकात त्याने गंगेच्या खोऱ्यातील अंतर्भागात स्वाऱ्या करून अनेक बुद्धमूर्ती उध्वस्त केल्या. गया येथील बोधी वृक्षाचे झाड कापून टाकले; पण या सर्व मूर्ती नंतरच्या काळात हर्षवर्धन राजाने पुन्हा अधिक सुंदर स्वरूपात बराच खर्च करून प्रस्थापित केल्या. पण त्सॅंग ज्यावेळी नालंदा येथे अभ्यास करीत होता, तेव्हापासून बुद्धधर्माचा अंतर्गत ऱ्हास सुरू झाला होता. बुद्धधर्माचा ऱ्हास होणार अशी भीती त्याने व्यक्त केली आहे. ती शंका इ. स. सहाशे पंचावन्नच्या सुमारास हर्षवर्धन राजाच्या मृत्यूनंतर राज्यात जो (इ. स. ६५५ च्या सुमारास) अभूतपूर्व गोंधळ माजला तेव्हा खरी ठरली. नालंदा येथील भव्य विहार लोकांकडून लुटले व जाळून टाकले गेले. त्यानंतर पुन्हा 'पाल' राजांनी पुढील शतकात बुद्धधर्मीय विहारांना चांगली आर्थिक मदत केली. त्यांनी अनेक विहार बांधले. त्यातील एक विहार नालंदापासून जवळच आहे. या विहारांच्या अस्तित्वामुळेच त्या प्रदेशाला बिहार हे नाव पडले. त्यानंतरचे 'सेना' घराण्यातील राजे, हिंदू राजे होते; पण त्यांनीही बुद्ध विहारांना देणग्या देणे चालू ठेवले. 'पाल' राजांनी बांधलेल्या विहारांचे दरोडेखोरांपासून रक्षण करण्यासाठी त्यांनी विहारांभोवती संरक्षक तट बांधले. इसवी सनाच्या बाराशे साली महम्मद बिन बख्तियार खिलजी याच्या नेतृत्वाखाली मुसलमान हल्लेखोरांच्या एका लहान टोळीने हे तट उध्वस्त केले; कारण त्यांना बहुधा असे वाटले असावे की, या संरक्षक तटाच्या आड प्रचंड संपत्ती असावी. बुद्धाचे जेथे प्रथम प्रवचन झाले, त्या सारनाथ येथील परिसरात प्रचंड स्तूप व विहार उभारले गेले होते. त्यांचा तर असा विध्वंस करण्यात आला की, पुन्हा ते उभारता येणे दुरापास्त झाले. त्याशिवाय बुद्धाच्या साध्या पर्णकुटीचासुद्धा नाश करण्यात आला. सारनाथ 'हुणां'च्या हल्ल्याच्या तडाख्यांतून वाचले होते. पाशुपताची भांडणे व हल्ले यांमधूनही हे विहार शिल्लक राहिले होते. सारनाथाचा नाश व्हावयाच्या थोड्या अगोदरच्या काळात म्हणजे इ. स. ११५० च्या सुमारास गोविंदचंद्र गाहडवाल या हिंदूधर्मीय राजाच्या बुद्धधर्मीय पत्नीने तेथील स्मारकांचा जीर्णोद्धार केला होता.

बुद्ध काळाच्याही कित्येक शतकांपूर्वीपासून सारनाथ हे ठिकाण सर्वसंगपरित्याग करणाऱ्या संतमहंतांचे विश्रांतीचे व वैचारिक देवाणघेवाणीचे स्थान होते. त्या दृष्टीनेही सारनाथाच्या विध्वंसनाला ऐतिहासिक अर्थ आहे. मुसलमानी आक्रमणाने बुद्धधर्माचा अगोदरच सुरू झालेला ऱ्हास पूर्ण झाला. त्यानंतरही इसवी सनाच्या चवदाव्या शतकांत कोरियांतील लोकांनी बौद्ध भिक्षूंना निमंत्रित केले होते; पण ते भिक्षू धर्माच्या पुण्यभूमी-

तील नव्हते, तर जेथे त्यावेळी बुद्धधर्म हळूहळू अस्तंगत होत होता अशा दक्षिणेकडील प्रदेशांतील होते. तसे पाहिले तर बौद्धधर्माच्या बाहेरील लोकायतांसारखे जडवादी पंथ, शाक्य देवदत्ताचे बौद्धधर्माला जवळ असणारे अनुयायी हे मगधामध्ये सातव्या शतकापर्यंत टिकून होते. त्यांना कोणी नष्ट केले नाही; परंतु हे पंथ हळूहळू नाहीसे झाले. भारतभूमीमध्ये परस्परविरोधी विचारधारा चालवून घेतल्या जात; पण कुठल्याच विचारधारेचे सिद्धान्त किंवा परंपरा यांची नीट मांडणी झाली नाही. ते असो; पण भारतीय संस्कृतीच्या संदर्भात अमुक राजाने हिंदुधर्म पुन: प्रस्थापित केला किंवा कुठलाही राजा या अर्थाने हिंदू किंवा बौद्ध होता, असे म्हणण्याला फारसा अर्थ नाही. अनेक राजे व नागरिक नंतरच्या काळातील ब्राह्मणी विधी व कर्मकांड करीत असतानाही, पारंपरिक ग्रामदैवताची पूजा करीत. त्याचबरोबर बौद्ध, जैन, आजिविका इत्यादी धर्मांना देणग्याही देत. कनोजच्या हर्षवर्धन राजाने बुद्धधर्माला आश्रय दिला, याबद्दल किंचितही शंका नाही. बुद्धविचारांचा त्याच्यावर इतका प्रभाव होता की, त्याने मारेकऱ्याला नि:शस्त्र करून सोडून दिले; पण त्याने ब्राह्मणांना दिलेल्या जमिनींच्या दानपत्रांत स्वत:ला 'परम महेश्वराचा भक्त' असेही म्हणवून घेतले आहे. त्याशिवाय त्याचे 'कुलदैवत' सूर्य होते. त्याच काळात 'माघ-ब्राह्मण' (मगध देशातील मूळचे ब्राह्मण) असा नवा पंथ उदयास आला. हर्षाने 'परमभट्टारक' अशी उपाधीसुद्धा लावून घेतली होती. याच हर्षराजाने आपले नागानंद हे नाटक गौरी म्हणजे शिवाची पत्नी 'पार्वती' या देवतेला अर्पण केले आहे. या सर्व परस्परविरोधांची जाणीव त्यालाच काय पण त्याच्याकडून दक्षिणा घेण्याकरिता दर पाच वर्षांनी गंगा-यमुनेच्या परिसरातून जे हजारो ब्राह्मण, बुद्धभिक्षू, जैन भिक्षू किंवा आजिविका जमा होत, त्यांनाही असावी असे दिसत नाही. **या सर्व वर्णनावरून धर्मव्यवस्थेवर संपत्तीचा असलेला प्रभाव दिसून येतो. संपत्तीमान राजे व वर्ग स्वतःच्या हितसंबंधाकरिता धर्मव्यवस्थेचा उपयोग करीत होते, हे सहज लक्षात येते.** वास्तविक हा बदल होण्याची सुरुवात सम्राट अशोकाच्या काळाच्या अगोदरच बुद्धाच्या निर्वाणानंतर शंभरवर्षांनी झाली होती. मगधात अशोकाच्या काळातच वेशाली (वैशाली) येथील विहारांतील भिक्षूंनी आपल्या स्थानिक विहारांकरिता पैसे गोळा करणे सुरू केले, त्यामुळे इतर मठातील भिक्षूंत खळबळ माजली. महंत 'यश' ह्याच्या नेतृत्वाखाली परिषद बोलावण्यात येऊन पैसा जमा करण्याचा हा प्रकार बुद्धतत्त्वाच्या विरोधी आहे असे ठरविण्यांत आले. (ही नोंद पाली साहित्यात आहे) बुद्धधर्माच्या मूलभूत तत्त्वांप्रमाणे भिक्षूंना अगदी आवश्यक वस्तू व कपडे किंवा त्या दिवसांपुरते अन्न यापेक्षा जास्त दान मागता येत नसे. परिषदेनंतर हा निर्णय विनपिटीकेत अंतर्भूत करण्यात आला. इतका स्पष्ट निर्णय असतानाही नंतरच्या काळांत एवढे भव्य व वैभवशाली मठ उभारले गेले असतील तर त्यामागे परिस्थितीमध्येच असलेले महत्त्वाचे बदल कारणीभूत असणार, ते शोधून काढणे फारसे कठिण नाही.

बुद्धाने चक्रवर्ती राजाची जी कर्तव्ये सांगितली त्यांत शेतकऱ्याला नांगर व जमीन,



व्यापाऱ्याला माल व पैसा पुरविण्याचे कर्तव्य सांगितले आहे. सम्राट अशोकाने रस्ते, धर्मशाळा, इस्पितळे, पाणपोया वगैरे सार्वजनिक कामे केली; पण व्यापारांना पैसा व माल पुरविण्याचे कर्तव्य मात्र पार पाडले नाही. ते कर्तव्य आता बौद्ध मठांनी सुरू केले. नव्या समाजातील व्यापारवृद्धीच्या काळात कारागिरांच्या श्रेण्यांना व खास करून फिरस्त्या व्यापारांना लागणाऱ्या भांडवलाची व इतर सोयींची गरज हे मठ पुरी करू लागले. चार अनुयायी व थोडेसे पशुधन घेऊन नव्या ठिकाणी वस्ती करण्याकरिता जाणाऱ्या बावरीसारख्या अग्रेसर ब्राह्मणांना किंवा नांगराखाली न आलेली जमीन ज्या अग्रहार ब्राह्मणांना दिली होती, अशा ब्राह्मणांना हे शक्य नव्हते; पण संघटित मठांना देणग्या व इतर मार्गांनी जी संपत्ती मिळत असे, ती कारागिरांच्या श्रेण्यांना व फिरस्त्या व्यापारांना कर्जाऊ मिळू लागली. विहार ही अशा व्यापाऱ्यांची विश्रामस्थानेही झाली. गुंतवलेले भांडवल जसे वृद्धिंगत होते, तशी ही संपत्ती वाढूही लागली.

ह्या काळात ब्राह्मण धर्म व बौद्धधर्म या दोन्ही धर्मांत समान्तर वाढ होती; कारण दोन्ही धर्म हे वाढत जाणाऱ्या शेती व्यवसायी व व्यापारी वर्गाच्या गरजा भागविण्याचे कार्य करीत होते. त्यामुळेच उत्तरेत सातव्या शतकापर्यंत व दक्षिणेस नवव्या शतकापर्यंत दोन्ही धर्म एकत्र नांदू शकले. मूलत: बुद्धधर्म हा यज्ञविधीमध्ये होणारे पशुबळी व त्यामुळे होणारे नुकसान ह्याला विरोध करण्याकरिता स्थापन झाला होता. पण तशा यज्ञसंस्थेचा ऱ्हास झाल्यानंतरही आणि शेतीप्रधान अन्नोत्पादक समाजव्यवस्थेचा प्रसार झाल्यानंतरही अनेक वर्षे या धर्मांचा विकास होत राहिला. बुद्धधर्माचे नवे आर्थिक व सामाजिक कार्य हेच आहे. भारताबाहेर बुद्धधर्म पसरला याचे कारणही तेच आहे.

चीनला जाणारे पहिले बौद्ध भिक्षू प्रचारक हे व्यापाऱ्यांच्या तांड्याबरोबर बाहेर गेले होते, हे सर्वांना ज्ञात आहे. बौद्ध मठांनी आर्थिक क्षेत्रात जी कामगिरी केली, त्याची माहिती चिनी नोंदी व दक्षिण भारतातील उध्वस्त लेण्यांचे स्वरूप यावरून उपलब्ध होते. चिनी नोंदीमध्ये ज्या लेणी-मठांचा उल्लेख आहे, ते महासंघिका पंथाचे आहेत. तो महायान पंथाचाच एक भाग किंवा त्यालाच जवळपासचा एक पंथ असावा. चिनी नोंदींवरून स्पष्ट दिसून येते की, चीनमधील शेती व व्यापारांची वृद्धी होण्यात महासंघिका मठांचा फार मोठा हातभार लागलेला आहे. बुद्धधर्मीय मठांची जमीन, त्यावर काम करणारे गुलाम व पगारी नोकर, त्यामधून मिळणारा उत्पन्नाचा व्यापार, शेतकऱ्यांना मठांकडून मिळणारे कर्ज यासंबंधीची माहिती चिनी कागदपत्रांत आहे. त्याचप्रमाणे दुष्काळाच्या काळात या मठांनी दिलेले कर्ज किंवा देणग्या, व्यापारांशी केलेले करार, इत्यादींचा उल्लेखही या कागदपत्रात आहे. त्याचबरोबर हा कारभार भारतीय महासंघिकेच्या पद्धती व नियमांनुसार चालतो, असाही स्पष्ट उल्लेख आहे. भारतीय बौद्ध मठांत जे चिनी भिक्षू शिक्षण घेण्यास येत, ते मठ चालविण्याचे, त्याचा कारभार करण्याचेही शिक्षण घेत असत. इ. त्सिंग हा बौद्ध भिक्षू, त्सँगनंतर शंभर वर्षांनी भारतात आला. त्याने आपल्या लिखाणात भारतीय मठांची स्वच्छता, टापटीप व

दिनचर्या इत्यादींचा उल्लेख केला आहे. भारतीय भिक्षूंनी रेशमी वस्त्रे वापरण्याबाबत जो युक्तिवाद केला, त्याचाही उल्लेख या लेखकाने केला आहे. भारताप्रमाणेच चीनमध्येही भिक्षा मागून राहणारे भिक्षू होते. पुढे त्यांचे अस्तित्वही भारतीय भिक्षूप्रमाणेच विरळ होत गेले.

आता आपण मठांचे स्वरूप बघू. उदाहरणार्थ पश्चिम भारतातील **कार्ले** येथील मठ घ्या. हा मठसुद्धा महासंघिका पंथाचा आहे. या लेण्यांतील चैत्य सभागृहाचा अपवाद सोडल्यास बाकी लाकूडकाम व धातूकाम नष्ट झाले आहे. या लेण्यांत सुंदर स्त्री-पुरुषांची व युग्मांची शिल्पे आहेत. ते पुष्ट व कमनीय बांध्याचे असून विलासी वृत्तीचे दिसतात. त्यांची वस्त्रे झिरझिरीत, तलम कापडाची आहेत. हत्ती व घोडे अशा वाहनांचा ते वापर करीत असताना दिसतात. आता अशी जागा भिक्षूंनी चिंतन करण्याची किंवा एकत्र येण्याची असणे शक्य नाही. श्रीमंत व्यापाऱ्यांना विश्रांती घेण्याकरिता किंवा सुखविलास करण्याकरिता अशी जागा नक्की पसंत पडावी. या लेण्यांतील खोदकाम व शिल्पकाम करावयास खास कसबी कारागीर आणले असावेत, भरपूर पैसा खर्च केला असावा, हे उघड आहे; त्याशिवाय हे काम वर्षांनुवर्षे चालले असावे. त्यावरून पैशाचा ओघ व मठांची सातत्य असणारी कारभार यंत्रणा सिद्ध होते. या लेणी—मठांमध्ये खांब, पुतळे व गुहा यावर जे कोरीव लेखन आहे, त्यावरून त्यांना व्यापारी व श्रेष्ठी यांच्याकडून सतत देणग्या मिळत होत्या, हे स्पष्ट दिसून येते. त्याशिवाय अनेक लहानसहान देणग्या मिळत असाव्यात, ज्याचा उल्लेख केला गेला नसेल! एका खांबावर 'वणिया ग्राम' म्हणजे व्यापाऱ्यांच्या संस्थेकडून देणगी मिळाल्याचा उल्लेख आहे. मुसलमानी आक्रमणांच्या अगोदरच्या काळात **व्यापारी ग्राम** पद्धत होती. मुसलमानांच्या स्वाऱ्यानंतर त्यांचे महत्त्व कमी होऊन नव्या तऱ्हेचा व्यापारी वर्ग अस्तित्वांत आला. दुसऱ्या शतकांमध्ये शातवाहनांनी शकराजकर्त्यांचा पराभव केला; पण बौद्ध मठांना गावांची दाने मात्र चालू ठेवली. काही नावे धक्कादायक वाटतील. बांबूच्या, पितळेच्या, मातीच्या वस्तू भांडी बनविणाऱ्या कारागिरांच्या श्रेण्यांनी या मठांना उदारहस्ते देणग्या दिल्याचे उल्लेख आहेत. या मठांना निरंतर वर्षासने मिळावीत, याकरिता राजा भांडवल गुंतवणूक करी व त्याचे व्याज या श्रेण्यांना मिळत असे. त्याशिवाय काही वैद्य, लेखनिक, सुतार, लोहार, कोळी व शेतकऱ्यांची पत्नी किंवा माता हिने लेण्यांना व्यक्तिश: देणग्या दिल्याचे उल्लेख आहेत. पुढील गावगाड्यांच्या काळात भारतीय खेड्यांत असे जे कारागीर होते, त्यांच्याकडे एवढा पैसा जमा होण्याची शक्यताच नव्हती; आणि त्याअर्थी सरंजामदारीच्या काळात असे ग्रामजीवन उदयास येण्याअगोदर वस्तूंच्या व्यापाराकरिता मोठ्या प्रमाणावर उत्पादन होत होते असे दिसते; कारण त्याशिवाय शेतकरी, कारागीर व व्यापारी यांची अशी भरभराट होणेच शक्य नाही. या लेण्यांच्या भोवतालची जमीन ही खडकाळ व अद्यापही अविकसित आहे. त्यामुळे अर्थशास्त्रात सांगितलेली शासकीय उपक्रमातून जमीन लागवडीला आणण्याची पद्धत येथे उपयुक्त नव्हती. ही लेणी पश्चिम किनाऱ्यावरील खाड्यांच्या



काठी कल्याण, ठाणे, चौल, कुडा, महाड अशी जी बंदरे आहेत, तेथून सुरू होऊन घाटांमधून दख्खनच्या पठारावर येणाऱ्या व्यापार मार्गांवर वसलेली आहेत. उलट उत्तरेकडील मठांच्या इमारती सुपीक प्रदेशात होत्या. त्यानंतर नांगराखाली आल्या. दक्षिणेकडील लेणी वर सांगितल्याप्रमाणे व्यापार मार्गांवर पण लोकवस्तीपासून दूर आहेत. जुन्नर हे असे एक महत्त्वाचे व्यापार ठाणे होते. शातवाहन राजांची ती पर्यायी राजधानी होती. त्या जुन्नर शहराभोवती तर लेण्यांची मालिकाच सापडली आहे. दक्षिणेत जेव्हा पहिले लेणीमठ बांधले गेले, त्या काळात दक्षिणेत सुसंघटित राज्ये स्थापन झाली नव्हती; तेव्हा राजांनी धर्माचा स्वीकार करण्याचा प्रश्नच नव्हता. जुन्नरच्या पश्चिमेकडे तीस किलोमीटर अंतरावर '**नानाघाट**' हा व्यापारी मार्गावरील अत्यंत महत्त्वाचा घाट आहे. तेथे जी लेणी आहेत, ती बौद्ध लेणी नाहीत. तेथे शातवाहन राजांनी ब्राह्मणांना यज्ञाकरिता ज्या दक्षिणा दिल्या आहेत, त्यांची संपूर्ण यादीच आहे. त्या यादीत हजारो गुरे, हत्ती, रथ, घोडे, नाणी वगैरेंचा समावेश आहे. त्याचबरोबर कृष्ण व त्याचा नांगरधारी भाऊ बलराम संकर्षण यांच्या उपासनेचा उल्लेख आहे. याचा अर्थ असा की, बावरीची ब्राह्मणी परंपरा चालू राहिली. उत्तरेकडील ब्राह्मणी धर्म विकसित स्वरूपात दक्षिणेकडे आला. भाजे येथील द्वारपालांच्या ज्या प्रचंड मूर्ती आहेत, त्यांचा आकार लक्षात घेता, त्या राजांच्या साहाय्यानेच खोदल्या गेल्या असल्या पाहिजेत.

बौद्ध मठांना मिळालेल्या काही देणग्या या बुद्ध भिक्षू व भिक्षु यांनी दिलेल्या असल्याचाही उल्लेख आहे. त्यावरून वैशालीचा निर्णय उघडपणे धाब्यावर बसविला जात होता, यात शंका नाही. सुरुवातीला बुद्धमठांत प्रवेश करणारी व्यक्ती आपली सर्व संपत्ती वाटून टाकी आणि सुखासीन जीवनाचा त्याग करीत असे. आता मठात येणाऱ्या व्यक्ती आपला पैसा व पैसे कमविण्याचा अनुभव यांसह मठात प्रवेश करीत असत. कार्ले येथील एक सभागृह बुद्धरखिना नावाच्या बुद्धधर्माच्या एका श्रीमंत अनुयायाने बांधले आहे. त्याच्या नावाचा उल्लेख पुन्हा एकदा एका लहानशा कोठडीवर आढळून येतो. बहुधा त्याने पुढे वृद्धपणी सर्वसंगपरित्याग केल्यानंतर तेथे निवास केला असावा. कार्ले येथील किंवा कोठल्याही बुद्ध विहारात मुख्य सभागृहांच्या आतील बाजूस लहान लहान कोठड्या आढळतात. त्या ठिकाणी प्रकाश किंवा पुरेशी हवासुद्धा येत नाही; त्याअर्थी अशा खोल्या निवासाकरिता नसून किंमती वस्तू ठेवण्याकरिता त्यांचा वापर होत असावा असे दिसून येते. या लेण्यांतील बाहेरच्या सर्व खोल्यांना लाकडांची दारे होती व ती आतून किंवा बाहेरून बंद करता येत होती. यावरून या लेण्यांकडे भरपूर संपत्ती असावी, असे दिसते. ही लेणी फिरस्त्या व्यापाऱ्यांची चांगली गिऱ्हाइकेही असावीत. भिक्षूकरिता वस्त्रे, वेगवेगळ्या विधीकरिता लागणारा कापूर व इतर सुगंधी द्रव्ये, मूर्ती व दिवे या काही स्थानिक जागी मिळत नसत. हे लेणी-मठ म्हणजे व्यापाऱ्यांची विश्रांतीस्थाने, मालाचा पुरवठा करणारी, विक्रय होणारी, विश्वासू गोदामे, पैसे पुरविणाऱ्या पतपेढ्या, अशी अनेकविध कार्ये साधणारी स्थाने होती.

जुन्नरजवळ जी अनेक लेणी आहेत, ती एकाच डोंगरावर जवळजवळ खोदणे अधिक सोयीचे झाले असते; परंतु ती एकमेकांपासून दूर लहान लहान गटांमध्ये खोदली आहेत. त्यापैकी प्रत्येक गटाला निरनिराळ्या व्यापारी श्रेण्यांचे साहाय्यच असावे. याचा अर्थ असा की, व्यापाऱ्यांच्या श्रेण्यांमध्येसुद्धा विविध पंथांचा प्रसार झाला होता व ते आपापल्या पंथाच्या मठांना साहाय्य करीत.

**इतिहासाच्या ओघात अर्थव्यवस्थेला मदतकारक ठरण्याऐवजी जेव्हा ही लेणी व त्यामागची पद्धत अडथळा आणणारी किंवा खर्चाचा बोजा लादणारी ठरली, तेव्हा त्यांचे महत्त्व नष्ट झाले व त्यांचा विनाश झाला. पुढे जो नवा व्यापारी वर्ग अस्तित्वात आला, त्याचा मुख्य व्यापार हा अंतर्गत प्रदेशातील नव्या विकसित गावांमधून आवश्यक वस्तूंचा विनिमय करणे हा झाला. दक्षिणेत जसजसा शेती व्यवसाय व ग्रामे वाढू लागली, तसतसा असा स्थानिक गरजेच्या वस्तूंचा व्यापार दूर पल्ल्यांवरच्या चैनीच्या वस्तूंच्या व्यापारापेक्षा अधिक वृद्धिंगत झाला.** इसवी सनाच्या तिसऱ्या शतकात रोमन साम्राज्याचा ऱ्हास झाल्यानंतर परदेशी व्यापाराचे खुष्कीचे मार्ग उध्वस्त झाले, हेसुद्धा भारतातील निर्यात व्यापाराच्या ऱ्हासाचे कारण असावे. पुढे जेव्हा गाव व लहान नगरे यांची वाढ झाली, तेव्हा अशा लेण्यांची स्थाने गावापासून दूर असल्यामुळे गैरसोयीच्या जागी असलेली झाली. गावातील व्यापार व्यवहार या मठ–लेण्यांच्या साहाय्याने करणे शक्य नव्हते. पुढे पुढे फिरस्त्या व्यापाऱ्यांचे मोठे जथ्थे विरळ होत होत वाणिज्यकार (वंजारा) आणि लांबमाना (लमाण) अशा भटक्या जमातींच्या स्वरूपातील छोट्या तांड्यांत त्याचा ऱ्हास झाला. **व्यापारी व कारागीर यांच्या संघटित श्रेण्या मोडल्या गेल्या व गावागावातून ते नव्या जातीच्या स्वरूपात पसरले. एकंदर उत्पादन वाढले; पण व्यापारांकरिता होणारे खास करून दूर-वरच्या पल्ल्यावरील किंवा निर्यात व्यापारांकरिता होणारे चैनीच्या वस्तूंचे उत्पादन घटले. बांधकाम करणारे बुरुडासारखे कारागीर तर पोटा-पाण्यासाठी धडपडणारे, गावोगाव फिरणारे कारागीर व्यापारी झाले.** पुढे इसवी सनाच्या सहाव्या शतकात घाटमार्गांवर किल्ले उभे राहिले. त्यांचे प्रयोजन जरी घाटमाथ्यांवरून येणाऱ्या आक्रमकांपासून त्या संस्थानाचे संरक्षण करणे असले तरी जकात गोळा करणे, हेसुद्धा होते. सर्वात दु:खद परिस्थिती ही की, बौद्ध व इतर मठातून ब्रॉंझ, पितळ, चांदी, सोने इत्यादी धातूंचा जो साठा झाला होता, वेगवेगळ्या राजांना नाणी, भांडी व उपकरणे अशा वस्तू करण्याकरिता त्याची आवश्यकता भासू लागली असावी. (चिनी बादशहांनी तर उघडपणे बुद्धाच्या धातूंच्या मूर्ती बनवण्यावर बंदी घातली होती) त्यामुळेही कदाचित लेण्यामधील लाकडाचे व धातूंचे काम नष्ट झाल्याचे आढळते. भारतात अशी आर्थिक उपाययोजना धर्माच्या स्वरूपातील बदलामधून आली. जुने मठ गेले; पण त्यांचे अस्तित्व पुसले गेले नाही. बुद्धधर्मांच्या प्रभावामुळे मठांच्या आसपास असणाऱ्या मातृदैवतांचे महत्त्व कमी झाले होते, पण मठांचा ऱ्हास झाल्यानंतर त्या मूर्ती पुन्हा त्याच जागी किंवा काही ठिकाणी चक्क मठांच्या एकाकी वास्तूत पुन्हा अवतरल्या. जुन्नरजवळील



**मानमोडी** ह्या मातृदैवताच्या नावाचा शोध त्या जागी कित्येक वर्षे मागे जाऊन घेता येतो. कार्ले येथील दगडाचा एक स्तूप '**यमाई**'चा स्तूप असल्याचे सांगितले जाते. पण ह्या मूर्तींना पशुबळी देण्याची पद्धत एक तर बंद झाली किंवा ते स्थान दूरवर नेण्यात आले. कुशाणांच्या काळांतील उत्तरेकडील जड नांगर महाराष्ट्राच्या ज्या थोड्या भागांत दिसून येतो, ते प्रदेश बुद्ध लेण्यांच्या आसपासचे आहेत. **मराठी संत तुकाराम ह्याने बुद्ध हा विठोबा असल्याचे मानले आहे.** अशाच एका बुद्ध लेण्यांतल्याने चिंतन करून आपले अभंग रचले हा काही केवळ योगायोग नाही.

दुसऱ्या एका संदर्भात ह्या बदलामागील आर्थिक कारणे स्पष्ट दिसून येतात. काश्मीरच्या हर्ष राजाने (काळ १०८९ ते ११०१) (हा सातव्या शतकातील सम्राट हर्ष नव्हे) आपल्या राज्यातील चार मूर्ती सोडून सर्व मूर्ती वितळवून टाकल्या. 'देवोत्पाटन नायक' ह्या खास मंत्र्याची ह्या कामाकरिता नेमणूक केली होती. ह्या मूर्तींचा प्रथम पावित्र्यभंग करण्यात आला व नंतर त्या मूर्ती वितळविण्यात आल्या. ह्याकरिता त्याने कुठलीही धार्मिक सबब सांगितली नाही. ह्या राजाच्या संरक्षकांमध्ये पगारी मुसलमान होते, पण तो चक्क डुकराचे मांस खाऊन त्यांना डिवचत असे. तरीसुद्धा हा राजा सुसंस्कृत होता. उत्तम साहित्यिक होता. नाटक, संगीत, नृत्य ह्यांचा शोकी होता. ब्राह्मणांना एका मर्यादेपर्यंत त्याने आश्रय दिला. एका बौद्ध आचार्याचा त्याने सन्मान केला आहे. त्या आचार्यांच्या आग्रहामुळेच चार मूर्ती नष्ट होण्यापासून वाचल्या. त्यात दोन बुद्धाच्या होत्या. पण मूर्ती वितळवण्याचा हा प्रकार ह्या राजाने एवढ्याकरिताच केला की, त्यावेळी त्याला राज्यांतील उमारा नावाच्या स्वतंत्र झालेल्या उमरावांशी सतत लढाया कराव्या लागत व त्या लढाया करण्यासाठी सतत पैसा व शस्त्रे बनवण्याकरिता धातूंची गरज लागे. चवदाव्या शतकात इस्लामी आक्रमकांनी काश्मीर सहजगत्या पादाक्रांत केले. त्यांना नंतर तेथील रहिवाशांचा छळ करण्याची किंवा लुटालूट करण्याची गरज भासली नाही.

## ७·३
## आर्थिक व राजकीय बदल

मौर्यानंतर जी घराणी राज्यावर आली, त्यांची नावे परिचित आहेत; पण त्यांचा काळ किंवा राज्याच्या सीमा वगैरेबद्दलची निश्चित माहिती नाही. विविध राजांच्या बाबतीत प्रचलित असलेल्या सुरस कथांमध्ये त्यांचे खरे व्यक्तिमत्त्व व कर्तृत्व लोप पावलेले आहे. प्राचीन इतिहासाच्या शेवटच्या कालखंडांतील काश्मीरच्या राजांचा अपवाद सोडल्यास इतर राजांची दरबारी दप्तरे उपलब्ध नाहीत. मौर्यांच्या नंतरच्या काळांतील सार्वभौम सत्ता म्हणजे 'कुशाण', 'शातवाहन' व 'गुप्त' ही होत. त्यानंतर 'हर्ष' त्यानंतर सार्वभौम सत्तांचा विलय झाला. अर्थात मधल्या काळात अनेक शूर राजांनी भारतीय उपखंडात स्वाऱ्या केल्या, पण भारतीय ग्रामव्यवस्थेवर त्याचा फारसा परिणाम झाला नाही. अशा बदलत्या राजाचा, सत्तांचा किंवा स्वाऱ्यांचा दैनंदिन जीवनपद्धतीवर

फारसा परिणाम होत नसे. असा परिणाम न होणे हे त्या काळातील सांस्कृतिक जीवनाचे लक्षण होते.

अशोकानंतर आलेल्या पाचसात मौर्यांनी कदाचित् एकाच काळात साम्राज्याच्या निरनिराळ्या प्रदेशांवर राज्य केले असेल. अगोदर सांगितल्याप्रमाणे प्रत्येक विभागाचे प्रश्न वेगळे होते, पण इतके स्पष्ट आहे की, मूलभूत धोरणांत बदल झाले नाहीत. अशोकाचा नातू 'दशरथ' ह्याने बाराबर येथील लेणी आजिविकांना दान दिली आहेत तर संप्रती ह्या दुसऱ्या मौर्य राजाने जैन पंथ स्वीकारला होता. शशांक राजाच्या विध्वंसक आक्रमणाचा उल्लेख वर आला आहे. पण त्यानंतर अशोकाच्या वंशांतील शेवटचा राजा–पूर्णवर्म–ह्याने बुद्ध-गया येथील बौद्ध विहारांची पुनर्स्थापना केली व गया येथील तोडलेल्या बोधीवृक्षाचे पुनर्रोपण केले. राजस्थानमधील मौर्यांचे राज्य संपुष्टांत आणून बाप्पा रावळ ह्याने राजपुतांची सत्ता स्थापन केली. असे लहानसहान मौर्य अधिकारी इसवी सनाच्या दहाव्या शतकापर्यंत गोव्यापर्यंतच्या प्रांतात प्रचलित होते.

मौर्य साम्राज्यांतील शेवटचा राजा बृहद्रथ ह्याचा वध त्याचा सेनापती पुष्पमित्र ह्याने सैन्याचे संचलन चालू असताना केला. पुष्यमित्रांनी शुंग घराण्याची सत्ता स्थापन केली. शुंग घराण्याने यज्ञसंस्थेचा पुनरुद्धार करण्याचा प्रयत्न केला, पण तो फारसा टिकलेला नाही. कलिंग देशातील मौर्य राज्याचा शेवट मूळ रानटी जमातीमधून आलेल्या 'खारवेलांनी' केला. काबूल खोऱ्यांतील मौर्य साम्राज्याचा प्रदेश ग्रीकांनी, मौर्यांचा अधिपति 'शुभगसेन' ह्याचा पराभव करून ताब्यात घेतला व 'युक्राटिडीस' ह्याच्या नेतृत्वाखाली त्यांनी पुढे पंजाबपर्यंत धडक मारली. नंतर प्रसिद्धीस आलेला ग्रीक राजा 'मेनँडर' (मिलींद) ह्याने सियालकोट येथे राजधानी स्थापन केली. त्याने गंगेच्या खोऱ्यातील फैझाबादपर्यंत स्वाऱ्या केल्या. उज्जैनच्या परिसरांतील प्रदेश मुख्यत: शुंग घराण्यातील राजांच्या ताब्यात होता. पण खिस्तपूर्व पहिल्या शतकात दक्षिणेकडून शातवाहनांनी ह्या विभागातील काही प्रदेशात शिरकाव केला होता. ठिकठिकाणच्या विस्कळीत संदर्भावरून आपल्याला ही माहिती मिळते. त्याशिवाय इतर माहिती म्हणजे केवळ मधून मधून येणारी राजांची नावे. तीसुद्धा भारताच्या सांस्कृतिक इतिहासाच्या दृष्टीने हा काळ महत्त्वाचा आहे. साची येथील अतुलनीय शिल्पे व बांधकाम ह्यामध्ये गुप्त घराण्यांच्या कारकीर्दीपर्यंत सतत भर पडत होती व ती भर सुंदर व आगळी अशीच होती. पातंजलीच्या व्याकरणाचा आपण उल्लेख केला आहे. त्याचा काळ शुंग घराण्याच्या राज्याशी समकालीन आहे. तक्षशिलाच्या ॲन्टीअकिडस ह्या ग्रीक राजाचा वकील 'हेलिओडोरस' ह्याने भिल्सा येथे गरुडचिन्ह असलेला स्तंभ बांधला आहे. त्या स्तंभावरील आलेखात तो स्वत:ला कृष्णभक्त म्हणवून घेतो. त्या आलेखाची भाषा जरी प्राकृत असली तरी वाक्यरचना ग्रीक धर्तीची आहे.

ह्या आलेखावरून कृष्ण पंथाच्या त्या काळच्या स्वरूपाबद्दल अत्यंत मौलिक माहिती मिळते. त्यावेळी कृष्णाला विष्णूचा अवतार मानले जात नव्हते की तो सर्वोच्च परमेश्वरपदापर्यंत पोहोचला नव्हता. कृष्णाचा भाऊ नांगरधारी संकर्षण बलराम ह्याला व इतर यादव पुरुषांनाही कृष्णाएवढीच प्रतिष्ठा होती. राज्यपद मिळवल्यानंतरही शुंग घराण्याने आपली 'सेनानी' ही उपाधी चालू ठेवली. पुष्यमित्राचा पुत्र अग्निमित्र हा कालिदासाच्या 'मालविकाग्निमित्र' नाटकाचा नायक आहे; पण ते नाटक त्यानंतर काही शतकांनी लिहिलेले आहे. शुंग घराण्याने ब्राह्मण धर्माची स्मृती जागृत केली खरी. त्याचा काही उपयोगही झाला असेल, पण कण्वायन नावाच्या ब्राह्मण मंत्र्यानेच शुंग घराण्यातील दहाव्या राजाचा वध करून सत्ता बळकावली. हे ब्राह्मण घराणे फार काळ सत्तेवर राहू शकले नाही.

भारतीय नाटके, महाकाव्ये, पुराणे, काव्ये, संस्कृती त्यावरील ग्रीकांच्या प्रभावाबद्दल प्रत्येक टीकाकारांची आपल्या पूर्वग्रहाप्रमाणे मते आहेत. त्या प्रश्नांत आम्ही जाऊ शकत नाही. आमच्या मताने हा प्रभाव अगदीच अल्पसा आहे. भारतीयांनी ग्रीकांकडून खगोल शास्त्र घेतले, पण ग्रीकांची सर्वात मौलिक बौद्धिक कमाई म्हणजे भूमिती. अत्यंत कडव्या तर्कशास्त्रांवर व प्रमेयांवर आधारलेले ते शास्त्र भारतात फारसे मूळ धरू शकले नाही. बिजगणित हे खास भारतीय संशोधन आहे. भारतात आलेल्या ग्रीकांवर भारतीय संस्कृतीचा जो प्रभाव पडला, त्याची चर्चा मागेच केली आहे. खिस्तपूर्व ५० व्या वर्षी भारतात आलेल्या शक आक्रमकांनी पंजाबमधील उरल्यासुरल्या ग्रीक राज्यांचा शेवट केला. हे रानटी समूह नंतर लवकरच ब्राह्मणी अर्थाने सुसंस्कृत झाले. रुद्रदामनचा उल्लेख वर आलेलाच आहे. पश्चिमेकडील अनेक बंदरे त्यांनी ताब्यात घेतली. त्यांच्या जमातीची तेथे लहानसहान राज्ये स्थापन झाली.

पश्चिमेकडील सागर किनाऱ्यावरील प्रदेशांच्या विकासाचे खरे कारण नारळाची लागवड होय. पूर्वेकडील किनाऱ्यांवर नारळाची लागवड खिस्तपूर्व पहिल्या शतकापासून सुरू झाली व नंतरच्या एका शतकात तो पश्चिम किनाऱ्यांवर पसरला. इ. स. च्या १२० साली शकराजा नहापन ह्याचा जावई उषवादत्तने हजारो नारळाची झाडे असणाऱ्या बागा ब्राह्मणांना दान दिल्या. तो बुद्धधर्मीयांबाबतसुद्धा उदार होता; पण त्या किनाऱ्यांवर बुद्धधर्मीयांचे विहार नव्हते. ते असो. आज हिंदूंच्या सर्व धर्मविधीमध्ये नारळाचा उपयोग केला जातो; पण इसवी सनाच्या सहाव्या शतकापर्यंत देशाच्या अनेक भागात नारळ परिचितसुद्धा नव्हता. भारतीय प्रथापद्धतीत प्राचीन काळापासून बदल झालेलेच नाहीत, अशा तऱ्हेचे गैरसमज आहेत, त्यावर ह्या वास्तवाने प्रकाश पडावा. नारळ विविध दृष्टीने उपयुक्त आहे. भरपूर पाऊस व उष्ण हवामान असलेल्या पश्चिम किनाऱ्यांवर जगले हटवून लोकवस्त्या वाढवणे हे नारळाच्या लागवडीशिवाय व त्याच्या व्यापारी उत्पादनाशिवाय शक्य झाले नसते. ह्या व्यापारामुळे दख्खनच्या पठारावर व्यापार करणाऱ्या फिरस्त्या व्यापाऱ्यांना काही काळ जीवदान मिळाले. पश्चिम किनाऱ्यांवरचे मीठ व नारळ घेऊन ते पठारावरील कापड, भांडी व धान्य ह्यांचा व्यापार करीत.

मध्य आशियाचा काही भाग व उत्तर प्रदेशाचा काही भाग ह्यांवर इसवी सनाच्या

७८ सालापासून ते तिसऱ्या शतकापर्यंत कुशाणांचे राज्य होते. त्यामुळे आशियाच्या मध्य-भागापर्यंत जाणारा उत्तरापथ पुन्हा ऊर्जितावस्थेत आला. त्यामुळे बुद्धधर्म व भारतीय संस्कृती ह्यांचा प्रसार मध्य आशियातील प्रदेशापर्यन्त झाला. पहिल्या कनिष्क राजाने 'महात्राता' ह्या शीर्षकाची सुरेख नाणी पाडली आहेत. सोन्याची नाणी पाडणारा कनिष्क हा बहुधा पहिल्या कनिष्काचा नातू होता. कनिष्काच्या वंशजांनी सम्राट अशोकाप्रमाणेच सर्व धर्म व पंथ ह्यांना उदार आश्रय दिलेला आहे. त्यांनी अनेक स्तूप बांधले आहेत. त्यांच्या नाण्यांवर बुद्धाचे, शिवाचे, नंदी छाप आहेत. त्याचबरोबर 'ननईअ' ह्या मातृदैवताचे नावही कोरलेले आहे. कुशाणांच्या नाण्यांवरून असे दिसते की, टाकसाळींतील तज्ज्ञांना ॲलेक्झांड्रा येथून आलेले व रोमन सम्राटांना माहीत असणारे तंत्रज्ञान होते. ह्या काळात त्या प्रदेशात सोन्याच्या नाण्यांचा वापर वाढला व चांदीच्या नाण्याचा वापर कमी झाला. त्यावरून उत्तरापथावरील व्यापार हा मुख्यतः केशर, रेशीम, दारू, अशा अमीर उमरावांना लागणाऱ्या महाग वस्तूंचा असावा. शेतकऱ्यांना मात्र आपल्या गरजा वस्तूंच्या विनिमयाद्वारे भागवाव्या लागत होत्या. अर्थशास्त्रात सांगितलेली उत्पादन पद्धत व धातूंच्या खाणीवरील शासकीय मक्तेदारी आता संपुष्टात आली होती. ह्याउलट ह्याच काळात शक राजे रुद्रदामन नहपान व त्याचे वारसदार ह्यांनी चांदीची नाणी पाडली आहेत. त्यावरून पश्चिम व दक्षिणेकडील नव्या उदयोन्मुख प्रदेशात चालत असणारा व्यापार, उत्तरेपेक्षा वेगळा असा गरजेच्या वस्तूंचा असावा.

शातवाहन राजांबद्दल आपण जाता जाता काही उल्लेख केले आहेत. बावरीच्या काळात घोडा हे पशुदेवक मानणारे हे टोळी-संघ समाजांतील कूळ पुढे राजपदी पोहोचलेले दिसते. एका कथेप्रमाणे गोदावरी नदीवरील डोहाजवळ एका नागाने ब्राह्मण विधवेवर केलेल्या बलात्कारामधून हे कूळ निर्माण झाले. दख्खनच्या पठारावरील मुख्य व्यापार हा तांबे व लोखंड ह्यांचा असला तरी दूरवरच्या पल्ल्यांवरील रोमन साम्राज्याशी होणाऱ्या चैनीच्या व्यापारांमधून शातवाहनांनी संपत्ती मिळवली. भारतामध्ये लाख, तांबे, चांदी, दारू, ग्रीक रोमन पद्धतीच्या कलात्मक वस्तू, त्याचप्रमाणे घरकाम करणे, करमणूक करणे, लैंगिक सुख देणे ह्याकरिता गुलामांची आयात केली जाई; हे ऐतिहासिक नोंदी-वरून दिसून येते. त्या बदल्यात कापड, मसाल्याचे पदार्थ, हस्तिदंत, चामड्याच्या वस्तू ह्यांची निर्यात केली जाई. ह्या वस्तूंच्या उत्पादनाकरिता व व्यापाराकरिता लागणाऱ्या भांडवलाचा पुरवठा बुद्ध मठ व व्यापारी संघ ह्यांच्याकडून होत असे. दक्षिणेतील प्रदेशात (नव्या) अश्मयुगीन अवस्थेतील पशुपालन करणाऱ्या अनेक भटक्या टोळ्या होत्या. त्या दक्षिणेकडील पठारांकडून विविध वाटांनी नद्यांच्या खोऱ्यात हंगामाप्रमाणे उतरत. तात्पुरत्या वस्त्या करीत. जुन्या आदि ऐतिहासिक कालापासून ह्या वाटा व त्या वाटांवरची दगडी दैवते अस्तित्वात होती व त्यांची स्मृती जागृत राहिलेली होती. (अजूनही ती जागृत आहे.) येथे शेती व्यवसायाच्या स्थापनेकरिता जड नांगर व लोखंडाच्या उपयोगाचे ज्ञान आवश्यक होते. ते उत्तरेकडून कसे आले ते आपण पाहिले आहे. येथे काही सुपीक जमीन



होती; पण उत्तरेकडील प्रदेशाप्रमाणे ती सलगपणे उपलब्ध नव्हती. विविध पठारांवर तुकड्या तुकड्यांनी अशी सुपीक जमीन अस्तित्वात होती. त्यामुळे येथील शेती व्यवसायी वस्त्याही अशा तुकड्या तुकड्यांनी प्रस्थापित झाल्या. शातवाहनांच्या शिलालेखात आपल्याला 'गुल्म' हा शब्द आढळतो. 'गुल्म' म्हणजे सैन्याची छोटी तुकडी. ह्या तुकडीचे त्या त्या भागाचे संरक्षण करण्यापुरते मर्यादित असे प्रचंड सैन्य एकत्र ठेवणे शक्य नव्हते. ह्यामधूनच पुढे अशा तुकड्यांचे सरदार स्वतंत्र होऊन सरंजामशाहीच्या उदयाला उत्तेजन मिळाले.

शातवाहनांच्या काळांत प्राकृत भाषेत भरपूर वाङ्मय निर्माण झाले, पण ते बरेचसे गहाळ झाले. इसवी सनाच्या तिसऱ्या शतकामध्ये शातवाहन राजवटीचा शेवट झाला. ह्या काळांतील कथा सरित् सागर ह्या मूळ प्राकृत ग्रंथाचे संस्कृत भषांतर उपलब्ध आहे. 'सत्तसाई' हा सातशे श्लोकांचा संग्रह शातवाहन राजा 'हल' ह्याने लिहिला आहे, असे सांगितले जाते. त्या खंडकाव्यांत सहजता व सौंदर्य ह्यांचा बहारदार संगम आहे. ह्या काळात दक्षिणेकडील प्रदेशातील लहान नगरांतून कारागिरांच्या श्रेणी होत्या. व्यापाराकरिता होणाऱ्या उत्पादनाचे प्रमाण बरेच होते. अशा नगरांतून नागरी संस्कृतीचा विकास झाला होता. वात्सायनाच्या कामसूत्रांत 'नागरक' असा उल्लेख आहे. तो ह्या नागरी संस्कृतीचे अस्तित्व व परंपरा ह्यांचा निदर्शक आहे. कामसूत्र हा ग्रंथसुद्धा शातवाहनांच्या काळात किंवा त्यानंतरच्या ताबडतोबीच्या काळांत लिहिलेला आहे ह्या ग्रंथात माणसाच्या लैंगिक जीवनाच्या विविध पैलूंचा—सामाजिक, व्यक्तिगत शारीरिक, मानसिक, वैवाहिक आणि विवाहबाह्य—अशा सर्व पैलूंचा विचार रसिकपणे व अभिजातपणे केला आहे. रतिक्रीडेचे विविध मार्ग सांगितले आहेत. तरीसुद्धा हा ग्रंथ अश्लील ग्रंथात मोडणारा नाही की केवळ रोमांचकारक नाही. ह्या ग्रंथात जी निर्व्याज सहजता आहे, ती त्या काळातील नागरी जीवनाची प्रत्ययकारी आहे. ह्या ग्रंथात नागरिकाला असा सल्ला दिला आहे की, त्याने भोवतालच्या प्रदेशांत जाऊन अशी सांस्कृतिक केंद्रे काढावीत की, जेथे नागरिकांना संगीत, गायन, नाच व रतिक्रीडा ह्यांचा सुखासमाधानाने आस्वाद घेता येईल.

ह्या काळातील सांस्कृतिक देवघेवीचे एक उदाहरण ह्या संदर्भात सांगण्यासारखे आहे. इसवीसन पूर्व ४ थ्या शतकाच्या पूर्वीपासून माहीत असलेला खंडक हा पैठणचा यक्षदेव ह्या व नंतरच्या काळात शिवाचा स्थानिक अवतार झाला व खंडोबा ह्या नावाने प्रसिद्धीस आला. खंडोबाचे भक्त महाराष्ट्रात सर्व जातीजमातीमध्ये पसरले आहेत. त्यांचे मुख्य स्थान आता 'जेजुरी' आहे. ह्या देवाच्या मूळच्या उपासनेचा प्रकार वाघ्या व मुरळी ह्यांच्या विशिष्ट तालासुरांत नाचण्याच्या प्रकारांत अजूनही दिसून येतो. अर्थात् अशा सर्वमान्य देवाची पूजा चांगलीच फायदेशीर असल्यामुळे त्यालाही ब्राह्मणी देवांच्या रांगेत बसवून पुरोहितांनी भरपूर फायदा कमविलेला आहे. खंडोबाची पूजा जरी अनेक तऱ्हेने होते तरी फायद्याचे मुख्य लोणी ब्राह्मण पुरोहितच लाटतात.

शातवाहनांच्या काळांत भारताच्या पूर्व किनाऱ्यांवरील व दक्षिणेच्या टोकाकडील

प्रदेशांचा विकास झाला. अर्थात दक्षिणेच्या टोकाकडील प्रदेश शातवाहनांच्या अंमलाखाली कधीच आले नाहीत. कृष्णा नदीच्या दक्षिण तीरावरील नागार्जुनकोंडा व कांची ही दोन्ही बुद्धधर्मांची केंद्रे दुसऱ्या शतकाच्या पूर्वीच वसवली गेली होती. ह्या दोन्ही केंद्रांच्या विकासावरून हेच दिसून येत की, ह्या प्रदेशांतसुद्धा इतरत्रपणे आयात-निर्यात व अंतर्गत व्यापार वाढत होता. नागर संस्कृतीचा विकास होत होता. भांडवल जमा करणे, त्याचा पुरवठा करणे व व्यापाराला उत्तेजन देण्याचे काम बुद्ध विहार करीत होते.

राजेरजवाडे व राजकुळांचा इतिहास म्हणजेच खरा इतिहास, असे मानणाऱ्या धंदेवाईक इतिहासकारांना आवश्यक अशी दक्षिणेकडील राजघराण्यांची यादी उपलब्ध आहे. ती अशी इक्ष्वाकू, पल्लव, बाण, कदंब, चेदी, कलचुरी, चालुक्य, चोल, पांड्य, चेर, वगैरे ह्या घराण्यांचा तपशील मध्ययुगीन भारताच्या इतिहासावरील कोणत्याही पुस्तकात सापडेल; पण अशा पुस्तकांत समाजाचा विकास कसा झाला ? कशा तऱ्हेची सांस्कृतिक देवघेव झाली ह्याकडे दुर्लक्ष केले जाते. ह्या काळात येथील आदिवासी जमातीवर ब्राह्मणी संस्कृती लादली गेली. त्याचबरोबर ब्राह्मणी संस्कृतीने आदिवासी संस्कृतीमधील अनेक प्रथा व कल्पना आत्मसात केल्या आहेत. खंडोबाचे उदाहरण आपण वर दिले आहे.

शातवाहनांच्या अखेरीच्या काळापासून ते इसवी सनानंतरच्या चौथ्या शतकातील गुप्तांच्या साम्राज्यांच्या काळापर्यन्त विकसित–अर्धविकसित अशा पूर्वकालीन टोळ्यांनी आपापली राज्ये स्थापन केल्याची, एकमेकांवर आक्रमण केल्याची ठिकठिकाणी नोंद आहे. त्यात गंगेच्या खोऱ्यातील नाग होते, तसेच मध्यभारतापासून दक्षिणेकडील प्रदेशात असलेले नाग होते. [अनेक आदिवासी टोळ्यांना नाग ह्या समान नावाने ओळखले जाई] काही भिल्ल टोळ्यांनीसुद्धा राज्ये स्थापन केली आहेत. जैन आचार्य कालका ह्याच्या भगिनीवर गर्दभिल ह्या राजाने बलात्कार केला. तेव्हा त्याने शकांची मदत घेऊन त्यांचा नायनाट केल्याची नोंद आहे. जरी अनेक छोटी राज्ये त्या काळात उदयास आली व जरी त्यांच्यात सतत लढाया झाल्या तरी बराचसा प्रदेश हा अविकसित व जंगलाचाच होता. संघटित समाज मुख्यतः शेतीप्रधान होता.

ह्यानंतरचा राजकीय सामाजिक व सांस्कृतिक विकासाचा काळ हा गुप्त साम्राज्याचा होय. ह्या घराण्यांतील श्रीगुप्त व घटोत्कच ही केवळ नावे माहिती आहेत. त्याच्याबद्दल फारशी माहिती नाही. ह्या साम्राज्याचा खरा संस्थापक पहिला चंद्रगुप्त होय. त्या घराण्यातील नंतरच्या सर्व राजांच्या नावाचा शेवट 'गुप्त' ह्या शब्दाने होत असे. त्यामुळे ह्या घराण्याला 'गुप्त' घराणे हे नाव पडले. त्या घराण्यातील राजांना 'गुप्त' राजे म्हणण्याचा प्रघात पडला. त्या राजघराण्याला कुठल्याही जुन्या राजघराण्याच्या वंशावळीवर किंवा मोठ्या टोळीच्या वारसदारीवर हक्क सांगता आलेला नाही. पण ह्या राजघराण्यात झालेल्या राजांनी स्वतःला मर्जीप्रमाणे उपाध्या जोडून घेतल्या आहेत. त्यामुळे इतिहासकारांचे कार्य अधिक कठिण होऊन बसले आहे. पहिल्या चंद्रगुप्ताचा लिच्छवी घराण्यातील राजकन्येशी विवाह झाला. ही गोष्ट त्याने स्वतः अभिमानपूर्वक नोंदलेली आहे. राजा व राणी ह्या दोघांच्या



एकत्रित नावाने नाणी पाडण्यात आली आहेत. त्याचप्रमाणे चंद्रगुप्ताचा पुत्र समुद्रगुप्त हा आपल्या आईच्या घराण्याचा वारंवार अत्यंत प्रौढीने उल्लेख करताना आढळतो. चंद्रगुप्ताने कोसल व मगध देशाच्या काही भागांवर राज्य प्रस्थापित केले, असा अंदाज करता येतो. त्याचा पुत्र समुद्रगुप्त (इ. स. ३३५ ते ७५) ह्याने मात्र राज्याचा विस्तार केला व साम्राज्य प्रस्थापित केले. समुद्रगुप्ताच्या स्तुतिपर असलेला एक अशोक स्तंभ कोशांबी येथून अलाहाबाद येथील किल्ल्यात हलवलेला आहे. सम्राट अशोकाच्या स्तंभावरील आलेख व ह्या स्तंभावरील आलेख ह्यातील परस्परविरोध डोळ्यांत भरणारा आहे. मौर्य राजाच्या (अशोकाच्या) स्तंभावरील आलेख पाली भाषेत, अत्यंत साध्या शब्दात लिहिलेले आहेत, तर समुद्रगुप्ताची प्रशस्ती अनेक विशेषणांनी युक्त असणाऱ्या लांबलचक व क्लिष्ट संस्कृत वाक्यांनी भरलेली आहे. त्या आलेखात समुद्रगुप्तांनी पराजित केलेल्या राजांची नावे एकामागून एक दिली आहेत व मिळवलेल्या अनेक विजयांची शेखी मिरवलेली आहे. अर्थात सम्राट अशोकाच्या काळात 'राजा' ह्या अभिधानाला पात्र असा दुसरा 'राजा' अस्तित्वातच नव्हता. समुद्रगुप्ताने सर्व लहानसहान राजांना नष्ट केल्यामुळे देशात साहजिकच शांतता व सुबत्ता निर्माण झाली. ह्या सर्व लहानसहान राजांचा पराभव केल्यामुळे जो संपत्तीसंचय झाला त्यामुळेच गुप्त राजे विलासी व सुसंस्कृत दरबार भरवू लागले. मोठे खडे सैन्य बाळगू लागले. चिनी यात्रेकरूच्या लिखाणावरून आणि गुप्त राजांचे ताम्रपट आहेत. त्यावरून असे दिसून येते की, गुप्ताचे साम्राज्य एवढे वैभवशाली असतानाही लोकांवरील करांचे ओझे मात्र कमी होते.

पण गुप्तांच्या विजयांबाबत सर्वांत महत्त्वाची व लक्षणीय वस्तुस्थिती म्हणजे त्याच्या विजयाचा शेती व्यवसायाचा प्रसार व नागरी समाजाचा विस्तार ह्याबाबत झालेला परिणाम. समुद्रगुप्ताने आर्यावर्तातील नऊ नाग राजांचा संपूर्ण निःपात केला आणि जंगलांतील इतर सर्व टोळी-संघ राज्यांना आपल्या अधिपत्याखाली आणले. विनाश झालेल्या अनेक टोळी व आदिवासी राज्यांचा उल्लेख करण्याइतके महत्त्वही त्यांना दिले गेले नाही. पण ह्या विजयामुळे इतिहासातील एक प्रक्रिया सुरू झाली. छोट्या प्रमाणावरील शेती व्यवसायांच्या प्रादुर्भावामुळे जंगलातील काही टोळ्या व त्यांचे प्रमुख सबळ झाले असावेत. आपले स्वामित्व त्यांनी अल्प प्रमाणात का होईना, पण विस्तारित केले असावे. त्यामधून आक्रमणे लढाया निर्माण होऊन प्रदेशातील सुव्यवस्थेला चांगलाच धोका पोहोचला असावा. गंगेच्या खोऱ्यातील अशा सर्व राज्यांचा निःपात करून समुद्रगुप्ताने शांतता प्रस्थापित केली. त्यामुळे शेती उत्पादनाला मोठ्या प्रमाणावर चालना मिळाली. त्यानंतर शेती उत्पादनाकडे न वळलेल्या (किंवा काही प्रमाणात वळलेल्या) अशा टोळ्या फक्त **नेपाळ, आसाम** किंवा **मध्य भारतातील दाट जंगले** अशा ठिकाणीच शिल्लक राहिल्या. शेती व्यवसायाच्या संघटित वाढीची प्रक्रिया इ. स. पूर्व सहाव्या शतकात (अर्थशास्त्राच्या काळात) शासनाच्या प्रेरणेने सुरू झाली. ब्राह्मण पुरोहितांनी व अशोकाच्या 'धम्म' विचारांच्या पुरस्कर्त्यांनी तो व्यवसाय 'आत्विक' पेढ्यांच्या प्रमुखापर्यंत पोहोचवला; पण (वर दिलेले थोडे भाग

सोडल्यास) भारतभर शेती व्यवसायाची प्रस्थापना करण्याची प्रक्रिया शेवटी बळाचा वापर करून गुप्तांच्या साम्राज्यांत पूर्ण करण्यात आली. गुप्तांच्या काळानंतर 'आत्विकां'चा प्रश्न शिल्लकच राहिला नाही. इसवी सन ३७९ ते ४१४ ह्या काळातील दुसऱ्या चंद्रगुप्ताने कुबेर नागा ह्या नाग कुमारीशी विवाह केला आहे. (हा चंद्रगुप्त विक्रमादित्य नावाने प्रसिद्ध आहे व अनेक रोमांचकारक कथांचा नायक आहे. त्याने अनेक स्त्रियांशी विवाह केले; आपल्या भावाची विधवा ध्रुवस्वामिनी हिला शत्रूंच्या हातातून सोडवून तिच्याशी विवाह केल्याचीसुद्धा कथा आहे.) विक्रमादित्याच्या काळात फा-हिन हा चिनी यात्रेकरू भारतात आला होता. त्याला भारतात कमालीची शांती व समृद्धी आढळून आली. चंद्रगुप्त व कुबेरनागा ह्यांच्या कन्येचा विवाह दक्षिणेतील 'वाकाटक' राजाशी झाला होता. तिने आपल्या पतीच्या मृत्यूनंतर अल्पवयी राजपुत्राच्या नावाने राज्यकारभार केला आहे.

जवळजवळ सबंध भारत वर्ष, आसाम, अफगाणिस्तान आणि मध्य आशियातील काही प्रदेश ह्यावर गुप्तांचे साम्राज्य प्रस्थापित झाले होते किंवा त्या साम्राज्याचा प्रभाव पडला होता. बंगालमध्ये विकासाची सुरुवात झाली होती. पाटणा हे ह्या काळातही महत्त्वाचे शहर होते; पण अशोकाचा राजवाडा मात्र उध्वस्त झालेला होता.

ह्यानंतर मध्यवर्ती सत्तांचा अस्त इतक्या हळूहळू व इतक्या प्रदीर्घ काळापर्यन्त चालला होता की, ह्या पुस्तकाचा शेवट हर्षानंतरच्या कोठल्याही काळात करता येईल. सार्वभौम अधिपत्याखाली चालणारे, ग्रामव्यवस्थेपर्यन्त पोहोचलेले, परंतु सरंजामदारीचा पाया नसलेले असे शेवटचे राज्य म्हणजे हर्षाचे साम्राज्य. महमद इब्न कासीम ह्याने पहिले मुस्लीम आक्रमण इसवी सन ७१२ साली केले. तो मुलतानपर्यन्त आला व परत गेला. नंतर लवकरच अरबांनी 'सिंध'चा ताबा घेतला व मक्रान किनाऱ्यावरील जुन्या सिंधू संस्कृतीतील व्यापारी रस्त्यावरून पुढे वाटचाल केली. त्या काळी अनेक मुसलमानांनी कुशल दर्यावर्दी व व्यापारी अशी ख्याती मिळवली होती व हिंदु राजांच्या छत्राखाली त्यांना सरकारी अंमलदाराच्या (खास करून बंदरावरील अधिकाऱ्यांच्या) जागा मिळाल्या होत्या. पश्चिमेकडील किनाऱ्यांवरील गोवा, संजाणा व इतर बंदरावर असे मुसलमान अधिकारी होते. महम्मद पैगंबराच्या मृत्यूनंतरच्या शंभर वर्षांच्या काळात अनेक मुसलमानी व्यापारी केंद्रे कॅन्टनपर्यंत पसरली होती. स्थानिक राजांनी त्यांच्या धार्मिक आचारांना संरक्षण दिले होते. पण त्याची परतफेड मात्र मुसमान राजांनी केली नाही. महम्मद गजनीच्या काळापासून मूर्तिभंजन करण्याच्या नावाखाली मुसलमानांनी आक्रमणे सुरू केली. इ. सनाच्या १०२५ अनेक हल्ले करून त्यांनी उत्तरेकडील अनेक उत्तम देवालयांचा विध्वंस केला व लूट केली. त्यात मथुरा व बनारस येथील देवालये तर होतीच; पण काठियावाड येथील सोमनाथाचे अगदी विश्वाससुद्धा बसणार नाही इतके श्रीमंत असलेले देवालय होते. ह्या लुटीत मिळालेल्या अमाप संपत्तीमुळे नंतरच्या सर्व आक्रमकांना अभिलाषा निर्माण झाली. त्याशिवाय अरबी भाषिक विद्वानांनी भारताबद्दल जी खुलासेवार माहिती लिहिली त्यामुळे ह्या आक्रमकांना मार्गदर्शन झाले. ह्या विद्वानांत 'अल् बरुनी'



(इ. स. १०३१) हा सर्वांत श्रेष्ठ होता. इ. स. १२०५ मध्ये महम्मद घोरीने गंगा व सिंधु ह्या दोन्ही नद्यांच्या खोऱ्यात आक्रमण करून उत्तरेत प्रथम मुसलमानी अंमल बसवला. त्याने दिल्ली येथे आपले मुख्य ठाणे वसवले आणि इतर ठिकाणी कारभार चालवण्याकरिता सरदार नेमले. पुढे हे सरदार–सुभेदार स्वतंत्र झाले. ह्या राजवटींना गुलाम घराण्यांची राजवट असे इतिहासात म्हटले जाते. कारण राजाचा गुलाम असलेला; पण पुढे सेनापती-पदापर्यन्त पोहोचलेला अधिकारी सत्ता काबीज करीत असे. त्यानंतर शंभर वर्षांनी म्हणजे इसवी सन १३१२ साली अल्लाउद्दीन खिलजीने दक्षिणेत स्वारी करून लुटालुटीचे सत्र सुरू केले व त्याचा प्रधान मलीक काफूरने ते चालू ठेवले. त्या राजाचा निजामउल्कमुल्क हा सरदार दक्षिणेतच राहिला, पण पुन्हा मुसलमान अंमलांचे तुकडे पडले व निरनिराळ्या सरदारांनी सरंजामदारी व्यवस्थेवर आधारलेल्या आपल्या स्थानिक राजवटी स्थापन केल्या.

गुप्तांचे साम्राज्य हे 'अर्थशास्त्रात' सांगितलेल्या तत्त्वावर आधारित असलेले साम्राज्य नव्हते किंवा सम्राट अशोकाने ज्याप्रमाणे नवा समाज उभाण्याकरिता धम्मांची मदत घेतली. तसे करण्याची जरूरी गुप्त राज्यकर्त्यांना वाटली नाही. गुप्तांच्या काळातील शिलालेख संस्कृत भाषेतील आहेत. **संस्कृत भाषा ह्या काळात उच्च वर्गीयांची व वर्णीयांची मिरासदारी झालेली होती. ब्राह्मणी पुरोहित वर्गाशी सांस्कृतिक दृष्ट्या संलग्न असा उच्च व मध्यम वर्ग ह्या काळात विकसित झाला होता.** त्याचबरोबर ह्या वर्गाचे बुद्धधर्मीय संघटनेशी—महायान पंथांशीसुद्धा चांगले सख्य होते.

गुप्त साम्राज्याच्या काळातील सुरुवातीची भरभराट व नंतर झालेला ऱ्हास ह्याचे रहस्य नीटपणे अभ्यासले पाहिजे. ग्रामजीवनात झालेल्या बदलांशी हे रहस्य निगडित आहे. जंगली टोळ्या व त्यांच्या स्वतंत्र राजवटी ह्यांचा नायनाट झाल्यामुळे, शांतता प्रस्थापित झाल्यामुळे नवी गावे वसवण्याला फार मोठ्या प्रमाणात उत्तेजन मिळाले असले पाहिजे. अशी अनेक गावे खाजगी उपक्रमाने वसवली गेली असावीत. शेती व्यवसाय, अंतर्गत व्यापार व राजाचे उत्पन्नही वाढले. पण त्याचबरोबर वाहतूक व्यवस्थेमध्ये क्रांतिकारक बदल घडून आले नाहीत. रेशमी वस्त्रे विणण्यापासून ते तेल उत्पादन करणाऱ्या कारागिरांच्या श्रेण्या नगरे व महानगरे येथे होत्या; पण त्यांना इतक्या व्यापक प्रदेशात वस्तूंचा पुरवठा करणे शक्य नव्हते. त्यामुळे अनेक नव्या ग्रामांच्या गरजांच्या इतर वस्तूंचा पुरवठा करण्यात त्या असमर्थ ठरू लागल्या. ह्या सर्व वस्तूंच्या व्यापाराला आवश्यक असणाऱ्या चांदीच्या नाण्यांचाही तुटवडा पडू लागला. त्याबाबतचा उल्लेख आपण वर केला आहे. अशा परिस्थितीत गरजेच्या विविध वस्तूंचे मध्यवर्ती उत्पादन दुरापास्त व अनावश्यक ठरू लागले. गुप्तांच्या काळात पाडलेल्या नव्या नाण्यांचे फारच थोडे नमुने मिळालेले आहेत. साठे तर जवळ जवळ मिळालेलेच नाहीत. अशोकाच्या काळात जेव्हा नागरी समाज वाढीला लागला तेव्हा त्याने नाण्यांचा दर्जा घसरवला. शकांनी व शातवाहनांनी कमी दर्जाची मिश्र धातूंची नाणी वापरात आणून वेळ भागवण्याचा प्रयत्न केला. सोन्याची नाणी अस्तित्वात होती. त्यावरून चैनीचा व्यापार तेजीमध्ये होता हे

दिसते. पण चांदीच्या नाण्यांबाबतची ही परिस्थिती लक्षात घेता असे दिसून येते की, वाढती लोकसंख्या, वाढती शेती व्यवसायी गावे व व्यापार ह्याकरिता लागणाऱ्या चलनाचा तुटवडा पडत होता. अर्थशास्त्रात शिकवलेले विविध मार्ग संपुष्टात येत चालले होते. अजूनही अधिकाऱ्यांना वापरण्याकरिता दिलेल्या जमिनीचे उत्पन्न घेण्याचा अधिकार होता; पण अजूनही त्या जमिनीवर त्यांना सरंजामदारी मालकी हक्क मिळाला नव्हता. सार्वजनिक कामाकरिता वेठीचा वापर केला जाई, पण मजुरी मिळत असे. पुढे सरंजामदारीच्या काळात कर देऊ न शकणाऱ्या गरीब जनतेकडून कराऐवजी सक्तीची फुकट मजुरी घेण्यात येऊ लागली—त्याला वेठबिगार म्हणण्यात येऊ लागले. गुप्त-काळात सरंजामदारी व्यवस्थेची बीजे जरूर रोवली गेली, तरीसुद्धा इसवी सनाच्या सहाव्या शतकापर्यंत सरंजामदारी समाजव्यवस्था अस्तित्वात आली नव्हती.

वाहतुकीची अडचण आणि चलनाची वाढ अशा परिस्थितीत प्रचंड प्रमाणावर पसरलेल्या ग्राम जीवनाच्या गरजा भागवण्याचा प्रश्न निर्माण झाला. व्यापारासाठी केंद्रीय पद्धतीने उत्पादन करणे व पुरवठा करणे अशक्य झाल्यामुळे ह्या गरजा भागवण्याचा प्रश्न कारागिरांना खेड्यांतील अर्थव्यवस्थेत सामावून घेऊन सोडवण्यात आला. प्रत्येक गावात आता लोहार, सुतार, पुरोहित, चांभार, महार, ढोर, न्हावी, असे विविध कसबी कारागीर खेड्यांतील चलनाचा प्रसार नसलेल्या अर्थव्यवस्थेत विशिष्ट पद्धतीने सामावले गेले. त्यांना गावकामगार (कारू नारू) असे संबोधण्यात येऊ लागले. अशा व्यवसायांची संख्या साधारणपणे बारा ठरवण्यात आली. त्यांना फावल्या वेळात किंवा कुटुंबाच्या मदतीने कसण्यासाठी जमिनीचा छोटा तुकडा देण्यात येई. त्याचबरोबर गावातील प्रत्येक शेतकरी कुटुंबाच्या उत्पन्नातला काही हिस्सा बलुते म्हणून देण्याची व्यवस्था करण्यात आली. गावाचा कारभार म्हणजे जमिनीची व्यवस्था व इतर अंतर्गत कारभार ग्रामसभा करीत असे. अजूनही नांगराखाली न आलेली जमीन लागवडीला आणण्यासाठी राजांची व नंतरच्या काळांतील सरंजामदारांची संमती लागे, अशा रीतीने कारागीर व कामगार हे ग्रामव्यवस्थेचे घटक बनले. आपले कसब व श्रम विकण्यास ते मोकळे नव्हते, पण त्यांना गावाकडून निश्चित मोबदला हक्काने मिळण्याची व्यवस्था होती. तसा मोबदला न मिळाल्यास ते शेती व्यवसायी होण्यास मोकळे होते. शेतकऱ्यांना लागणाऱ्या विविध सुविधा पुरवणारा कारागीर व अशा कारागिराला द्यावा लागणारा मोबदला, ह्यांत समतोल साधला गेला. हे कारागीर मूळांत वेगवेगळ्या जातीचे होते, तरी काळाच्या ओघांत त्यांच्या जुन्या जातीची ओळख नष्ट वा दुय्यम होऊन त्यांच्यात व्यवसायनिहाय एकजूट निर्माण झाली व त्याचे जातीमध्ये रूपांतर झाले. त्याचबरोबर व्यवसायनिहाय जातीमध्ये उपजाती निर्माण झाल्या. अशा कारागिरांना लग्न, मृत्यु किंवा मुंज इत्यादी निमित्ताने जादा काम पडल्यास जेवण किंवा जादा धान्य ह्या स्वरूपात जादा मोबदला दिला जाई. त्या काळच्या शारीरिक श्रम व हस्तव्यवसायी उत्पादनतंत्रावर अशी एक बंदिस्त पण भक्कम ग्रामव्यवस्था उभी राहिली. ह्या ग्रामव्यवस्थेमध्ये परंपरेने विविध



श्रमिकांची कामे निश्चित केली गेली व आर्थिक दर्जानुसार त्यांचा सामाजिक दर्जा निश्चित झाला. ही ग्रामव्यवस्था इतकी स्वयंसिद्ध होती की संकटाच्या काळात किंवा सरंजामदारीच्या काळात तेव्हा एखाद्या खेड्यावर अनन्वित दडपशाही होई, तेव्हा सगळे गावच्या गाव उठून स्थलांतर करीत असे. अशा रीतीने संरक्षणाचा अखेरचा उपाय अमलात आणला जाई. अर्थात् नवी वस्ती करण्यायोग्य जमीन उपलब्ध होती तोपर्यंत हा इलाज करता आला. नंतरच्या काळात हा इलाज करता येणे शक्य नव्हते. त्याचप्रमाणे राजा किंवा सरंजामदार एखाद्या गावकऱ्यावर खूष होई तेव्हा त्याच्या गावाला सरकारी अंमलदाराने त्रास देऊ नये, त्या गावाच्या कारभारात ढवळाढवळ करू नये अशा सनदा तो गावकरी राजा किंवा सरंजामदारांकडून मिळवीत असे. जातीव्यवस्थेमुळे दुसरा एक परिणाम हा झाला की, संकटाच्या काळात आपल्या जातीबांधवाना मदत करण्याची जबाबदारी जातीमधील इतर लोकांना पत्करावी लागे. जातीव्यवस्थेतील घृणास्पद लक्षणे ग्रामव्यवस्थेच्या उदयाच्या काळांतच उद्भव पावली, हे अगदी खरे; पण ग्राम व जातीव्यवस्था टिकून रहाण्याकरिता त्या काळची जमेची बाजू व अपरिहार्यता कारणीभूत होती, हे लक्षात घेणेही आवश्यक आहे.

अशा तऱ्हेच्या ग्रामजीवनाचा विकास झाल्यानंतर कसबी कारागिरांच्या व व्यापाऱ्यांच्या श्रेण्या मोडून पडणे साहजिकच झाले. गुप्त राजांच्या दानपत्रात प्रथम ग्राम सुतार, ग्राम लोहार, वगैरेंना जमिनी दिल्याची नोंद आहे. गुप्त काळातील भारतीय समाजाच्या विकासाचे स्वरूप दुहेरी आहे. तत्कालिक दृष्ट्या तो विकास सर्वांच्या हिताचा होता; पण त्याचा दूरगामी परिणाम हा झाला की, सामर्थ्यशाली व आधुनिक भारतीय समाजनिर्मितीमध्ये तो सगळ्यात मोठा अडथळा झाला. भारतीय ग्रामजीवनाच्या भोवतालचे जातीयवादाचे कवच एवढे अभेद्य झाले की, नवा प्रगतिकारक संस्कार त्यावर होणे दुरापास्त झाले. साम्राज्ये येवोत की नाश पावोत; गावगाड्यांतील शेतकरी व इतर सर्व वर्ग आपापल्या कामात गढलेले असत. व्यापार व व्यवहार कुंठितच झाला. दरिद्री लमाणांनी आणलेले मीठ व धातू धान्याच्या बदल्यात विकत घेणे एवढाच त्यांचा बाह्य जगाशी संबंध राहिला. त्यामुळे देवाणघेवाण वाढून खेड्यांचा विकास होण्यास वावच राहिला नाही. देवस्थानी होणाऱ्या जत्रा किंवा तीर्थस्थानी होणाऱ्या यात्रा हाच काय तो ग्रामजीवनाच्या ठराविक चौकटीत असणारा विरंगुळा होता. ह्या काळात नगरांचे महत्त्व कमी होऊन त्यांचा ऱ्हास झाला. इ. स. सहाव्या शतकात पाटणा हे केवळ छोटे गाव झाले.

सरंजामशाहीच्या उदयाच्या काळातील हे बदल मध्ययुगीन काळातील देवालयांच्या रचनेत दिसून येतात. ह्या काळांत देवळे बांधण्याच्या अनेक स्थानिक पद्धती उदयास पावल्या व त्यांचे स्थापत्य तंत्र वेगवेगळे होते. ही देवळे छोट्या राजधान्यांच्या किंवा अंमलदारांच्या गावी बांधली जात असत. ह्या देवळांतून हिंदूधर्मातील त्या प्रदेशांतील त्या काळचा लोकप्रिय पंथ आणि सरंजामदारांची महत्त्वाकांक्षा ह्या दोघांचा संगम झालेला दिसून येतो. ह्यापैकी मोठी देवस्थाने होती. त्यांना राजा किंवा सरंजामदार ह्यांच्याकडून

जमिनी व इतर दाने मिळत, भक्तांकडून देणग्या मिळत. त्याशिवाय गंडेदोरे अंगारेधुपारे विकून, पापक्षालनार्थ अनेक अनुष्ठाने घडवून आणून, श्राद्ध किंवा इतर विधी करण्याची सोय करून, ही देवस्थाने पैसा कमावीत असत. काही देवळांशी संलग्न असणाऱ्या देवदासी जो वेश्याव्यवसाय करीत, त्याचे उत्पन्नही देवळाला मिळत असे. ह्यांतील काही पैसा देवळामधील सुंदर मूर्ती व त्याचे जडजवाहीर ह्यामध्ये गुंतवला जाई तर काही पुरोहितांच्या पदरात पडत असे. देवळांतील संपत्तीचा हिशोब तपासण्याची कोणतीच व्यवस्था नसल्यामुळे, ह्या पुरोहितांपैकी अनेकजण अशा पैशाच्या जोरावर सावकार होत असत. कधी कधी ह्यामुळे देवस्थानचा ऱ्हासही होत असे. बौद्ध मठांप्रमाणे कोणतेही मोठे देवस्थान हे विद्यादानाचे केंद्र झालेले दिसत नाही.

सरंजामदारीच्या काळातही असे अनेक उदार राजे व सरंजामदार झाले की, त्यांनी विद्वानांना आश्रय दिला. पण अशा आश्रयाची निश्चिती नसे की, तो टिकून राहील ह्याची शाश्वती नसे. तशा उदार आश्रयदात्याच्या मृत्यूनंतर विद्वानांना परागंदा व्हावे लागे. उदाहरणार्थ धारच्या भोर राजाची किंवा कनोजच्या हर्ष राजाची विद्वानांना आश्रय देण्याची परंपरा टिकून राहिली नाही. बनारससारख्या काही ठिकाणी राजा किंवा देवस्थान ह्यांच्यावर अवलंबूनही न रहाता काही विद्वान ब्राह्मणांनी पाठशाळा चालवलेल्या होत्या व त्यांना चांगली शिष्यपरंपरा लाभली. त्यांनी भारतीय संस्कृती-तल्या अनेक चांगल्या परंपरांचे जतन केले. असे अपवाद सोडल्यास खेड्यांतील पुरोहित क्वचितच वेदविद्या किंवा इतर शास्त्रे शिकण्यास गाव सोडून दूर जात असे. परंतु त्यांच्या पूर्वज अग्रेसर ब्राह्मणाला जे मानाचे स्थान, सवलती व हक्क होते, ते त्याला मिळत राहिले. अनेक गावांत तर स्थानिक दैवतांची पूजा व इतर कौटुंबिक संस्कार ब्राह्मणेतर जातीमधील गुरव किंवा तत्सम पुरोहित करू लागले. पण ज्योतिष सांगणे, मुहूर्त काढणे, तिथी सांगणे ह्या कामांसाठी साक्षरतेची आवश्यकता होती, त्यामुळे ती कामे ब्राह्मणांकडे राहिली.

ग्रामव्यवस्थेच्या निर्मितीच्या काळात मुख्यतः शेतीखालील जमीन ही गावाच्या सामायिक मालकीची होती, (अर्थात् सार्वभौम राजाचा किंवा सरदारांचा सबंध गावाकडून वसुली करण्याचा हक्क होता). गावातील कुटुम्बाच्या गरजेनुसार किंवा त्यांच्या मनुष्य-बळाप्रमाणे शेतीचे तुकडे कसावयास मिळत असत. जमिनीचा विक्रय अगदी अपवादात्मक परिस्थितीत होत असे व तोसुद्धा तेथे जवळपास व्यापारी केंद्र असे अशा ठिकाणीच होई. उदाहरणार्थ उषवादत्तने एका ब्राह्मणाला चार हजार चांदीचे तुकडे देऊन त्याची नाशिकजवळील जमीन बौद्ध विहारांना दिली, अशी नोंद आहे. त्या काळी नाशिक-जवळील बौद्ध मठ हे व्यापारी केन्द्रे होती. सर्वसाधारणपणे गावांतील मुख्य शेती-व्यवसायी कुटुंबे एकाच सजातीय रक्तसंबंधी कुळातील असत. त्यामुळे शेती करणाऱ्या व्यक्तीला समाजाचे सदस्यत्व व जमीन कसण्याचा हक्क एकाच वेळी प्राप्त होई. बहिष्कार ही त्यामुळे सर्वांत कडक शिक्षा झाली होती. बहिष्काराबरोबर समाजाचे सदस्यत्व व जमीन



कसण्याचा हक्क दोन्ही नष्ट होई. अशा व्यक्तीला गाव सोडून जाण्याशिवाय गत्यंतर नसे. गावाच्या अधिपत्याखाली सशस्त्र सैन्य नव्हते, ते राजा किंवा सरंजामदार ह्यांच्याकडे असे. गावाच्या सरहद्दीत परक्या माणसाची चोरी किंवा लूट झाल्यास सबंध गावाला त्याची भरपाई करावी लागे.

सरंजामदारीच्या काळात राजा किंवा सरदाराच्या वतीने वसुली करणाऱ्या अंमलदारांना अनेक नवी नावे व उपाध्या प्राप्त झाल्या. **सामंत** ह्या शब्दाला अगोदरच्या काळात 'शेजारील गाव'चा असा अर्थ होता. नंतर त्या शब्दाला सरंजामदार असा अर्थ प्राप्त झाला. तसेच वसुली करणाऱ्या अधिकाऱ्याबद्दल **'ठाकूर'**, **'राणक'**, **'राऊत'** असे विविध शब्द वेगवेगळ्या भागात प्रचारात आले. अशी वसुली सर्वसाधारणपणे धान्याच्या स्वरूपात केली जाई. त्या वसुलीतला काही भाग विकला जाऊन रोख चलनाच्या रूपात शासनाकडे (मुख्य राजाकडे) पाठवला जाई. हे सर्व जुन्या परंपरागत हक्क व पद्धती चालवण्याच्या नावाखाली पार पाडण्यात येई. त्याशिवाय सरंजामदार स्वत:चे सैन्य राजाच्या परवानगीने बाळगत असत. राजाच्या मोहिमेत त्याला सैन्यासह भाग घ्यावा लागत असे. त्या सरंजामदाराचा दर्जा त्याने ठेवलेल्या सैन्याच्या संख्येवर व प्रदेशाच्या व्याप्तीवर अवलंबून असे. अनेक वेळा हे सरंजामदार स्वतंत्र होऊन स्वत:च राजे होत. त्याचा खरा अर्थ असा होता की, सर्व वसुली त्याला गिळंकृत करावयाची असे. सरंजा-मदारांचे असे अधिकार जसे अनिर्बंध होत गेले, तसे जमिनी कसावयास देण्याचा, दान करण्याचा हक्क त्याने घेतला. खास करून लागवडीखाली नव्याने येणाऱ्या जमिनीबाबत हा हक्क वापरला जाई. त्याचे पर्यवसान शेतकऱ्यांचे दोन प्रकार निर्माण होण्यात झाले. एक प्रकार गावाच्या मूळच्या शेती व्यवसायी कुटुंबाचा होता (त्यांना मिराशी कुळे म्हणतात.) तर दुसरा प्रकार सरंजामदारांकडून जमीन मिळालेल्यांचा होता. (त्यांना अजूनही उपरी कुळे म्हणतात.) पहिल्या प्रकारच्या शेतकऱ्यांना परंपरागत जमिनी कसा-वयाचा हक्क होता व शेती उत्पादन होवो न होवो ठराविक उत्पन्न सारा म्हणून द्यावा लागे तर दुसऱ्या प्रकारातील शेतकऱ्यांना काही वर्षांच्या मुदतीने जमीन कसण्यासाठी मिळे व उत्पन्नाचा काही भाग जमीनदाराला द्यावा लागे. दुसऱ्या प्रकारांतील शेतकऱ्यांना ग्रामसभेचा सदस्य होण्याचा किंवा इतर अनेक अधिकार नसत. एकेका गावाच्या कुवती-बाहेरील सार्वजनिक कामे (उदाहरणार्थ कालवे बांधणे, धरणे बांधणे इत्यादी) सरंजामदार करीत असे. त्याबद्दल गावांना जादा वसुलीच्या स्वरूपांत कर द्यावा लागे. सरंजामदाराला सैन्याची उभारणी करावी लागे. त्यामुळे सैनिकी सेवा करणाऱ्या कुटुंबाचा एक वर्गच तयार झाला. अशा कुटुंबांनाही वंशपरंपरेने जमिनी कसण्यास मिळू लागल्या. त्यांनाही ठराविक जातीचे स्वरूप प्राप्त झाले. काही ठराविक नगरांतून खास करून बंदराजवळील नगरांतून चैनीच्या वस्तूंचे उत्पादन करणाऱ्या व्यापारी व कारागीर श्रेण्या टिकून राहिल्या होत्या. सरंजामदार व श्रीमंत अंमलदार ही त्यांची गिऱ्हाइके होती. पण जुन्या श्रेण्यांची जागा आता विस्कळीत अशा 'गोष्ठीं'नी घेतली होती. त्याचे कार्य मर्यादित होते. उदाहरणार्थ देऊळ

उभारण्याकरिता जी गोष्ठी उभी केली जाई त्यामध्ये त्या गावातील देशमुख, व्यापारी, शेतकरी व देवदासी ह्यांचा समावेश असे. व्यापाऱ्यांच्या संघटनांचे अस्तित्वही बराच काळ चालू होते. छोट्या अंमलदारांनी त्यांच्या व्यवहारांत ढवळाढवळ करू नये, त्यांना त्रास देऊ नये, अशा सनदा ह्या व्यापारी संघटनांनी राजाकडून किंवा सरंजामदारांकडून मिळवल्याच्या नोंदी आहेत.

## ७·४
## संस्कृत वाङमय व नाटक

ज्याला आपण अधिकृतपणे संस्कृती समजतो, त्याबद्दल काही विचार करणे आवश्यक आहे. भारतीय संगीताला अगदी प्राचीन काळापासून अव्याहत परंपरा आहे. पण त्याचा नीटपणे लिहिलेला इतिहास नाही. अधिकृत भारतीय संगीत हे मुख्यत: दरबारी बैठकीचे आहे. भारतीय संगीतात सुरचित निश्चित राग आहेत. हृदयंगम ताल व स्वरमाधुर्य आहे; पण पाश्चात्य संगीताप्रमाणे विविध वाद्यांच्या सुसंवाद व मेळ ह्यांवर भर नाही. पण ह्या संगीताचे स्रोतसुद्धा सामान्य जनतेच्या विविध प्रथांतून उगम पावलेले आहे. शबर जमातीचे लोक फार प्राचीन काळापासून बांबूची बासरी-वेणू-वाजवतात. बासरीचा शोध त्यांनीच लावला असावा. उत्सवप्रसंगी किंवा विवाहप्रसंगी सामूहिक नृत्य ठराविक तालांत करण्याची प्रथा अगदी आदिवासी अवस्थेतून चालत आलेली आहे. महाराष्ट्रात अजूनही खास प्रसंगी गोंधळ घालण्याची प्रथा आहे. हा गोंधळ ही आदिवासीपासून घेतला गेला आहे. भारतीय शिल्पकला व स्थापत्यशास्त्र ह्याबद्दल उत्खननांतून मिळणारी माहिती अपुरी आहे. उष्ण व दमट हवा, लोकांमधील नासधूस करण्याची वृत्ती व शासकीय दुर्लक्ष ह्यामुळे अनेक उत्तम चित्रे व शिल्पे ह्यांचा नाश झाला आहे. पण एवढे निश्चित की, सरंजामदारीच्या काळात भारतीय संगीत व कला ह्यांचे प्रयोजन धर्म व दरबारी रीतिरिवाज ह्यांना सांभाळणे हा होता. त्यामुळे सर्व संगीत कलाप्रकारांना धर्माला दुय्यम असा दर्जा मिळाला. कसबी कारागिराला भारतातही मागणी होती व भारतातही अलौकिक प्रतिभेचे कारागीर होऊन गेले; पण फेडीयस किंवा मायखेलान्जेलो ह्या पाश्चात्य चित्रकाराप्रमाणे शिल्पकाराला किंवा चित्रकाराला येथे सामाजिक प्रतिष्ठा मिळाली नाही. (उदाहरणार्थ उत्तम लेणी कोरणाऱ्या कलावंताची नावेही माहीत नाहीत. : निवेदक) सुबोध वळणाची अक्षरे व हस्तलिखितातील चित्रे सोडून इतर वस्तू बनवणारे कारागीर बहुधा निरक्षर अशा खालच्या जातीमधले असत. जुन्या ओबडधोबड मूर्तींना धार्मिक परंपरेत प्रतिष्ठा मिळाली होती. पण देवालयांना आश्रय देणाऱ्या श्रीमंत आश्रयदात्यांना आपल्या देवांच्या मूर्ती अगदी खास सुबक नसल्या, तरी स्वत:प्रमाणे उत्तम वेश परिधान केलेल्या व दागिने घातलेल्या असाव्यात असे वाटे व त्याप्रमाणे मोठ्या देवळातल्या मूर्तींना वेश व दागिने चढवण्यात येऊ लागले. कलेचा केवळ कला म्हणून स्वाद घेण्याची वृत्ती व्यापक प्रमाणात अलीकडेच



भारतीय मध्यमवर्गीयात पाश्चात्य संस्कृतीच्या परिचयामुळे निर्माण झाली आहे. मात्र अनेक पाश्चात्य भारतीय कलेला ओबडधोबड असंस्कृत अशा स्थानिक लोकांची कारागिरी असे समजून तुच्छ मानीत असत.

जुन्या भारतीय वाङ्मयाचा काही भाग भारतीयांनी साहित्यगुणासाठी जतन केलेला आहे. मौर्य किंवा शिशुनाग ह्यांच्या काळातील धार्मिक नसलेले वाङ्मय उपलब्ध नाही. शातवाहनाच्या काळातील हल ह्याने संपादित केलेला काव्यसंग्रह आहे. प्राचीन काळातील वाङ्मयाचा विचार करताना संस्कृत वाङ्मयावरच लक्ष केन्द्रित करावे लागते. कारण इतर भारतीय भाषांतील वाङ्मयनिर्मितीचा प्रारंभ आपण ज्या कालखंडाचा विचार करीत आहोत त्यानंतरच झालेला आहे. अर्थात ह्या सर्वसाधारण विधानाला अपवाद आहेत. सिंधू संस्कृतीच्या काळात जी वाङ्मयनिर्मिती झाली असावी, ती नष्ट झाली आहे. छोट्या मातीच्या छाप्यावर जे लिखाण सापडले आहे, त्याचाही ती लिपी अजून उलगडली न गेल्यामुळे अर्थ लावता येत नाही. त्याचप्रमाणे जुन्या तामीळ भाषेतील वाङ्मयनिर्मितीचाही विचार मी केलेला नाही. नाटकाची सुरुवात आदिवासी जमातीमधून व दैवतपूजेमधून सुरू झाली असावी. ऋग्वेदांतील अनेक ऋचा ही हावभाव करून म्हणावयाची समूहगीते आहेत. ह्या ऋचांत अनेक ठिकाणी दोन किंवा अधिक पात्रांचे संवाद आहेत. प्राथमिक सामाजिक अवस्थेत सुफलीकरण विधी करीत असताना तालबद्ध घोष करणे व विशिष्ट लयीत नाच करणे चालू असते. संस्कृत नाटकात सुरुवातीला नांदी गाऊन परमेश्वराचे आशीर्वाद मागण्याची परंपरागत पद्धत आहे; त्यावरून संस्कृत नाटकांचा उगम यातुविधीशी संबंधित अशा आचारांतून झाला असावा असे दिसते. संस्कृत नाटकांत संगीत व गीत ह्यांचा अंतर्भाव असतो. पूर्वीच्या संस्कृत नाटकात नर्तनाचाही समावेश असे; पण पुढील काळात तो नाट्यशास्त्राचा अविभाज्य भाग राहिला नाही. जुन्या पद्धतीत गायन व नर्तन ह्याचप्रमाणे नाटकातील पात्रे मुकाभिनयसुद्धा करीत. कथकली नृत्यप्रकारामध्ये मुकाभिनय व नृत्य ह्यांचा हृदयंगम संगम आहे. करमणूकप्रधान नाटकांची मध्यवर्ती कल्पना पुराणांतील कथेवर आधारित असे. ही नाटके मुख्यतः वरच्या वर्गातील नाटककारांनी ज्यांना संस्कृत समजते, अशा वरिष्ठ वर्णीयांच्या करमणुकीकरिता लिहिली होती; पण देवदेवता व पौराणिक नायक ह्यांच्या रोमहर्षक कथांवर ती आधारित असल्यामुळे सामान्य जनही नाटके पहावयास जात. नाटकातील नायक व वरिष्ठ वर्गांतील पुरुष पात्रे उत्तम दर्जाच्या संस्कृतमध्ये संवाद करीत असत. स्त्रिया, नोकर, गुलाम इत्यादी मात्र प्राकृत भाषेत संवाद करीत. संस्कृत नाटकांतून ज्या उच्चवर्णीय पुरुषांना नायकाचा दर्जा मिळत असे, ते आपल्या स्त्रियांशी व नोकरांशी बोलताना प्राकृत भाषेत बोलत असावेत; पण नाटकात मात्र उच्चवर्णीयाने प्राकृत भाषेत बोलणे कमीपणाचे मानले जाई. ह्यावरून या काळच्या सामाजिक परिस्थितीवर प्रकाश पडतो. आजही मराठी नाटकात सुसंस्कृत पात्रांच्या व नोकरांच्या भाषेचा ढंग वेगळा असतो; कारण तशी सामाजिक व सांस्कृतिक परिस्थिती आहे. पुढे पुढे तर प्राकृत भाषेत इतके

फरक पडले की, जुनी प्राकृत भाषा समजणारे लोक कमी होत गेले तरीसुद्धा परंपरा म्हणून तिचा वापर चालू राहिला. शुद्ध पद्यात्मक नाटकात मात्र संस्कृत भाषेचाच उपयोग केला जाई. नाटककार हा कवी असावा लागे; कारण गद्य नाटकातसुद्धा पद्यांचा समावेश असे. वरच्या वर्गाच्या ह्या तथाकथित सुसंस्कृत प्रकारांबरोबरच सामान्य जनतेचे करमणुकीचे काही अनवट प्रकार अस्तित्वात होते. त्यांना प्रतिष्ठा नव्हती, तरी नाटके त्या अनवट प्रकारांच्या माध्यमांना हटवू शकली नाहीत. त्याची परंपरा तमाशा व इतर लोकनाट्यांच्या स्वरूपात अजूनही चालू आहे. आज ज्ञात असलेली सुरुवातीची नाटके बुद्ध मठांकडून वार्षिकोत्सवाच्या निमित्ताने केली जात असत. चिनी यात्रेकरूंच्या नोंदी व मध्य आशियातील काही हस्तलिखिते ह्यावरून मी हा अंदाज केला आहे. बौद्ध धर्मग्रथांतील सारिपुत्र, मोग्गल्लान, कस्सप ह्या बौद्ध भिक्षूंचे दीक्षा घेण्यापूर्वीचे जीवन, त्यांनी केलेला बौद्धधर्माचा स्वीकार, बुद्धाचा गृहत्याग, ह्या घटना ह्या नाटकातून लोकांसमोर मांडल्या जात. **पहिला प्रथितयश संस्कृत नाटककार अश्वघोष हा बौद्धधर्मीय होता.** नंतरच्या नाटककारांच्या लेखनपद्धतीवर त्याची छाप पडलेली दिसून येते. अश्वघोषाचे सौंदरा नंदा हे काव्य गौतम बुद्धाच्या सावत्र भावाने बुद्धधर्म स्वीकारल्यानतर त्याच्या पत्नीवर वज्राघात होऊन ती मृत्यू पावल्याच्या घटनेवर आधारलेले आहे. त्या नाटकांत मात्र बुद्ध भिक्षूंना ज्याचा संपूर्ण त्याग करावा लागे, अशा वैभवशाली जीवनाचे व मुक्त रतिक्रीडेचे वर्णन केलेले आहे. अजिंठा येथील चित्रेसुद्धा अशाच प्रणयी प्रसंगांनी युक्त असलेली आहेत. बुद्धचरित् ह्या खंडकाव्याचा मुख्य गाभा जरी अश्वघोषाने लिहिला असला, तरी ते पुरे करण्यात इतरांनी हातभार लावला आहे. त्यामुळे त्याचे चिनी रूपांतर व संस्कृत आवृत्ती एकमेकांशी जुळत नाहीत. अश्वघोषाच्या नाट्यसंपदेपैकी सारिपुत्र प्रकरण ह्या नाटकाचे काही भाग सोडल्यास त्यांची नाट्यसंपदा हरवली आहे. पण नंतरच्या काव्यसंग्रहांतीस त्याच्या अनेक काव्यपंक्तींवरून त्या काव्यपंक्ती नाटकांतील असाव्यात असे दिसते. त्यानंतर पालराजाच्या काळातील वल्लाण ह्या नाटककाराच्या बाबतींतसुद्धा असेच घडले आहे. त्याच्या हरवलेल्या नाटकातील काही काव्यपंक्ती सोडल्यास बाकीचा भाग उपलब्ध नाही. ही नाटके बौद्धपंथीय वा दुसऱ्या कोणीही लिहिली असोत; पण नाटकांचा एकंदर रागरंग हा मात्र ज्या वर्गाकरिता लिहिली गेली, त्यांचाच आहे. **शृंगार हाच ह्या सर्व नाटकांचा मुख्य विषय आहे. शृंगार विषयाबाबत भारतीय परंपरा उदार व समृद्ध आहे.** बौद्ध भिक्षूंना ब्रह्मचर्याचे व्रतपालन करावे लागत असे तरी त्यांच्या विहारांतून जशी शृंगारिक चित्रे व शिल्पे आहेत, तसे त्यांच्या वाङ्मयामध्येसुद्धा शृंगारिक वर्णने आहेत. हा विरोधाभास वाटतो पण त्यातून सामाजिक चित्र दिसून येते. त्या काळच्या दरबारी उच्च वर्गीयांत सरंजामदारीचा उदय होता, हे कळून येते.

संस्कृत नाटकाच्या क्षेत्रात नंतर **भास** ह्या अलौकिक नाटककराचे नाव केवळ ज्ञात होते. पण ह्या शतकाच्या सुरुवातीला त्याची हरवलेली काही नाटके सापडली. पुढील काळातील नाट्य वाङ्मयात जी शैली व प्रथा आढळते त्यांचा अवलंब ह्या नाटकात



केलेला दिसत नाही. म्हणून ही नाटके भासांची आहेत किंवा नाहीत ह्याबद्दल वाद आहे. तरीसुद्धा नाटककर्त्याच्या अलौकिक प्रतिभेबद्दल जरासुद्धा शंका घेता येणार नाही, इतकी ही नाटके सुंदर आहेत. प्रणयकथा असणारे स्वप्नवासवदत्ता हे नाटक त्याच्या सर्व नाटकांत सर्वात चांगले आहे.

संस्कृत भाषेतील साहित्यात किंबहुना प्राचीन भारतीय वाङ्मयात सर्वश्रेष्ठ नाव अर्थात कालिदासाचे आहे. त्याचे चरित्र फारसे उपलब्ध नाही. पण त्याचा काळ भासानंतरचा आहे. कालिदास हा बहुतेक विक्रमादित्य नावाने प्रसिद्ध असणाऱ्या दुसऱ्या चंद्रगुप्त राजाच्या दरबारातील कवी असावा. त्याच्या मेघदूत दीर्घ काव्यात विरही यक्ष मेघाला आपला दूत होऊन प्रेयसीस आपल्या व्यथा व भावना कळवण्यास सांगतो, अशी अत्यंत उत्तुंग कल्पना आहे. ह्या मेघदूताला ज्या प्रदेशातून आक्रमण करावे लागे, अशा प्रदेशांचे बहारदार वर्णन आहे. त्याच्या रघुवंश ह्या दुसऱ्या महाकाव्यात रामाच्या पूर्वजांच्या विजयांची कथा असली तरी त्याला गुप्त राजांनी मिळवलेल्या विजयांची पार्श्वभूमी आहे. त्याचे 'कुमारसंभव' हे अपुरे राहिलेले 'दीर्घ काव्य' आहे. त्यांत देव व मानव ह्यांना त्रास देणाऱ्या दानवाला नष्ट करणाऱ्या शंकर-पार्वतीच्या स्कंद ह्या पुत्राच्या जन्माची कथा आहे. शब्दसंपत्ती, छन्दोबद्ध रचना, सार्थ उपमा त्यामुळे कालिदासाची ही तीन महाकाव्ये संस्कृत भाषेतील काव्यात सर्वोत्तम मानली गेली आहेत. एक मालविकाग्निमित्र सोडले तर कालिदासाची नाटके व दीर्घ काव्ये ह्यांचे कथाविषय हे पुराणांतून घेतले गेले आहेत. मालविकाग्निमित्र हे शुंग घराण्यातील राजाच्या प्रणयकथेवर आधारलेले आहेत. विक्रमोर्वशिय नाटकामध्ये जुन्या काळातील पुरुरवा व उर्वशी ह्यांच्या कथेला एक मानव राजा व स्वर्गातील अप्सरा ह्यांच्यातील प्रेमकथेचे रूप देण्यात आले आहे. विक्रम ह्या नावावरून गुप्त घराण्याचा संदर्भ जाणवतो. साहित्यगुण आणि नाट्यतंत्र ह्या दोन्ही दृष्टीने कालिदासाची सर्वश्रेष्ठ कलाकृती आहे 'शाकुन्तल'. त्याची मूळकथा महाभारतामधून घेतली असली तरी कालिदासाने त्याला विलक्षण साज चढवलेला आहे. कालिदासानंतर भवभूती हा दुसरा श्रेष्ठ नाटककार. त्याचेही उत्तररामचरित्र हे नाटक पुराणातील कथेवर आधारित आहे. भवभूती हा श्रेष्ठ ब्राह्मण कवी आठव्या शतकाच्या पूर्वार्धात होऊन गेला. ह्याच्याही जीवनाबद्दल फारशी माहिती नाही. इतर अनेक कवींबद्दल तर त्यापेक्षाही कमी माहिती आहे. काहींची नावे फक्त माहीत आहेत तर काहींचे संग्रहात जमा केलेले काही श्लोकच माहीत आहेत. माघ, भारवी हे कवी त्यामानाने नशिबवान आहेत असे म्हणावे लागेल; कारण त्यांची काही समग्र काव्ये शिल्लक आहेत, ती अजूनही आवडीने वाचली जातात. कुमारदासाचे 'जानकीहरण' हे प्रथम त्या काव्याच्या सिलोनी अनुवादावरून पुन्हा प्रकाशात आले. दक्षिण भारतात नंतर त्याची हस्तलिखिते मिळाली. ज्या नाटककार कवींचा आपण जाता जाता उल्लेख केला तेवढेच कवी व नाटककार प्रथितयश होते असे नाही. हर्ष राजाचा वा त्याच्या नागानंद नाटकाचा उल्लेख

अगोदरच केला आहे. त्याने इतर नाटके लिहिली. पण त्यांतील दोनच नाटके शिल्लक राहिली. ही परंपरा नवव्या शतकाची अखेर व दहाव्या शतकाच्या सुरुवातीपर्यंत चालू राहिली. राजशेखर हा एक श्रीमंत जमीनदार होता. त्यानेही नाटके व काव्ये रचली आहेत. त्याने अनेक कवींना आश्रय दिला होता. नंतरच्या काळात संस्कृत साहित्याचा दर्जा कमी झाला. नंतरच्या काळांत अनेक राजांनी कवी व नाटककार ह्यांना आसरा दिला. ःपाल राजाच्या काळांतील काही कवींची नावे ज्ञात आहेत. त्यात काही राजपुत्रसुद्धा आहेत. ःधार येथील राजा भोज हा कवी, लेखक कलावंतांना आश्रय देणारा होता व त्याशिवाय स्वतःही एक चांगल्या दर्जाचा लेखक होता. बाराव्या शतकातील गाहडवाल राजांनी श्रीहर्ष नावाच्या एका उत्तम कवीला आश्रय दिला होता. (हा सम्राट हर्ष नव्हे) त्याचे 'नलदमयंती' हे प्रेमकाव्य आवर्जून नाव घेण्यासारखे आहे. संस्कृत वाङ्मयाच्या समृद्धीचे शेवटचे केन्द्र म्हणजे बंगालच्या 'लक्ष्मणसेन' राजाचा दरबार होय. इ. सनाच्या १२ व्या शतकात मुसलमानी आक्रमणाने हे केंद्र नष्ट झाले; पण संस्कृत साहित्याची उतरती कळा त्याअगोदरच बऱ्याच काळापासून सुरू झाली होती.

सर्वात वैशिष्ट्यपूर्ण व सर्वांगसुरेख असे नाटक म्हणजे शूद्रकाचे 'मृच्छकटीक.' शूद्रक हा शातवाहन ह्या राजघराण्यातील आहे, असे मानण्यात येते; पण त्या नाटकात जुलमी राजवटीविरुद्ध क्रांती होत असल्याचे दाखवले आहे. .शूद्रकाने नाटकाकरिता पौराणिक कथाविषय घेण्याची परंपरा मोडली आहे. ह्या नाटकाची नायिका अत्यंत सुंदर व सुसंस्कृत गणिका आहे. पण ती पैसा किंवा अधिकार ह्यांना वश होत नाही की त्यांना शरण जात नाही. चारुदत्त ह्या कंगाल झालेल्या धीरोदात्त व उदार पुरुषावर प्रेम करते. शकार नावाच्या एकाच वेळी दुष्ट व मूर्ख असणाऱ्या राजशालकामुळे चारुदत्ताला फासावर चढण्याचा व वसंतसेनेला मृत्युमुखी पडण्याचा प्रसंग येतो. जनतेचे बंड यशवी होऊन त्या बंडाचा नेता दोघांना मृत्यूच्या दाढेतून वाचवतो. असे हे विलक्षण वेगळे व अत्यंत अर्थपूर्ण कथानक आहे. ह्या नाटकात भावना व कृती, करुणरस व हास्यरस ह्यांचा उत्तम समतोल साधला आहे. प्राचीन भारतीय नाट्याचा स्वाद घेण्याची इच्छा असलेल्याने हे नाटक जरूर वाचावे.

'दण्डी' ह्या कवीचे 'दशकुमारचरित' हा दुसरा महत्त्वाचा ग्रंथ. जोष, समाजातील विविध थरांचे ज्ञान, अनेक साहसपूर्ण व रोमांचकारक प्रसंग, व्याजोक्ती, भावनांचा फुलोरा ह्या सर्वच बाबतींत हा ग्रंथ संस्कृत वाङ्मयांत अतुलनीय आहे. सातव्या शतकातील दण्डी ह्या प्रतिभावंत कवी व समीक्षक होता. त्याचा व्यासंग दांडगा व भाषेवर अफाट प्रभुत्व होते. त्याने अशा अत्यंत चमत्कृतिपूर्ण शब्दरचना केल्या आहेत की त्याचा इतर भाषेत अनुवाद करणे कठिण झाले. पण त्यानंतर अशा चमत्कृतिपूर्ण रचना करण्याची साथ दुय्यम दर्जाच्या नाटककारांमध्ये पसरली. शब्दांच्या रचनेला कथाविषय किंवा कलात्मकतेपेक्षा जास्त महत्त्व दिले जाऊ लागले. भारतीय शिल्पकला, चित्रकला ह्याप्रमाणेच तंत्र व कारागिरी ह्यांनी कलेचा विध्वंस केला.



पातंजलीने सांगितले आहे की, शब्द अविनाशी आहेत. पातंजली म्हणतो, "कुंभाराकडे जाऊन असे भांडे पाहिजे, असे सांगता येते; पण वैय्याकारण्याकडे जाऊन असा शब्द पाहिजे हे सांगता येत नाही." जेव्हा भावना किंवा विचार किंवा एखादी परिस्थिती वर्णन वर्णन करण्यास नवा शब्द सापडत नाही, तेव्हा जुन्या शब्दांचे संमिश्रण करून तो अर्थ ध्वनित करण्यास लेखक किंवा कवी कचरत नाही. जुन्या शब्दांचे अर्थही नव्या संदर्भात बदलतात. वेदवाङ्मयातील यज्ञविधीशी संबंधित अनेक शब्द नंतरच्या ब्राह्मण ग्रंथांत व उपनिषदांत नव्या अर्थाने वापरण्यात आले आहेत. हा नवा अर्थ रूढ करण्यासाठी जुन्या शब्दांची हास्यास्पद व्युत्पत्ती लावण्यात आली आहे. पदार्थ हा शब्द आपण आता एखाद्या भौतिक वस्तूसाठी वापरतो. त्याचा मूळ अर्थ शब्दार्थ असाच आहे. पुढील काळातील चैतन्यवादी धर्मवेत्यांनी तर सर्व जगाला मिथ्या ठरवण्याचे प्रचंड शब्दजंजाळ निर्माण केले. लेखकांची कारागिरी ही लांबलचक सामासिक शब्दांची निर्मिती करून आणि त्याचा वेगवेगळा विग्रह करून त्यांतून निरनिराळे अर्थ काढण्यात खर्ची पडू लागली. संस्कृत भाषेचे स्वरूपच असे आहे की, अशा कृती वाचण्याकरिता किंवा समजून घेण्याकरिता भरपूर वेळ असावा लागतो. बाराव्या शतकापर्यंत ही साथ इतकी पसरली की, संस्कृत कृतीचे वाचन म्हणजे एखादे शब्दकोडे सोडवण्याचा बौद्धिक पातळीवरचा खेळ झाला. 'कादंबरी' ह्या ग्रंथाचा कर्ता **बाणभट्ट** ह्याने ही शैली रूढ करण्यात फार मोठा हातभार लावला आहे. ह्या प्रदीर्घ कथेमध्ये काही सामासिक शब्द एवढे लांब आहेत की, त्याला छापील पुस्तकांच्या काही ओळी भरतील. पण बाणभट्टाचे कौशल्य इतके वाखाणण्यासारखे होते की, 'कादंबरी' ह्या नायिकेच्या नावाने गद्य वाङ्मयातील दीर्घकथा ओळखली जाऊ लागली. बाण हा हर्ष राजाच्या दरबारातील एककवी होता. त्याने लिहिलेले 'हर्षचरित' हा संस्कृत गद्य वाङ्मयाचा मेरुमणी आहे. ह्या रोमांचकारक चरित्रांतून फारशी ऐतिहासिक माहिती मिळत नाही, पण त्या ग्रंथात राजाचे सैन्य अगदी स्वतःच्या प्रदेशांतून जात असतानासुद्धा लोकांचे जे हाल होतात, त्यांची जी दाणादाण उडते किंवा लूट होऊन त्यांच्यावर जे दारिद्र्य लादले जाते, त्याचे वर्णन दिले आहे. खरोखरच ही माहिती वस्तुस्थितीच्या निदर्शनामुळे मौलिक आहे. बाणाच्या अगोदरच्या काळातील सुबंधू ह्या लेखकाच्या 'वासवदत्ता' ह्या प्रदीर्घ कथेमुळे संस्कृत वाङ्मयात अरेबियन नाईटससारखा कथाप्रकार रूढ झाला असता, पण कादंबरीच्या विशिष्ट शैलीमुळे संस्कृत गद्यांचे एक कथावस्तू सांगणारे साहित्य माध्यम असे महत्त्वच संपुष्टात आले.

दुसरा ग्रंथ 'सरीत सागर' ह्यांतील कथा मौर्यपूर्वकालीन कोसंबीचा उदार राजा उदयन ह्याच्या भोवती गुंफण्यात आल्या आहेत. मुळात ह्या कथा गुणाढ्य ह्या कोण्या व्यक्तीने पैशाची भाषेत रचल्या असा प्रवाद आहे. पण मूळ भाषेतील कथा व संपूर्णपणे नाहीशा झाल्या असल्यामुळे मूळ लेखक व कथासंग्रहाची मूळ भाषा ह्याबद्दल मतभेद आहेत. ह्या कथांच्या स्वरूपावरून दिसून येते की, ह्या कथा व्यापारी, कारागीर वर्ग ह्यांची आणि

उच्च वर्णीयांची करमणूक करण्याकरिता लिहिल्या गेल्या आहेत. गुप्तांच्या काळातील दरबारी भाषेची तुलना केली असता त्यांच्या अगोदरच्या शातवाहनाच्या काळातील नागरिकांची मनोवृत्ती व प्राकृत भाषा ह्यांचा ठसा ह्या कथासाहित्यावर आहे, हे दिसून येते.

पण भारतीय साहित्याने जागतिक वाङ्मयाला दिलेली सर्वात मोठी देणगी म्हणजे विष्णुशर्मांचे पंचतंत्र होय. हे पंचतंत्र निर्बुद्ध व अशिक्षित राजकुमारांना व्यवहारी शहाणपण शिकवण्याकरिता लिहिले गेले. पंचतंत्रावरील अर्थशास्त्राचा ठसा सहज दिसून येतो. अर्थशास्त्रकर्ता चाणक्य ह्याचे नावसुद्धा विष्णुशर्मा होते हा काही योगायोग नाही. पंचतंत्राचा अनुवाद पिलपाईच्या कथा ह्या नावाने सिरियन व अरेबिक भाषेत झाला. त्यामुळे पंचतंत्राची माहिती व प्रसिद्धी पाश्चिमात्य देशांतही पसरली.

मध्ययुगाच्या काळात प्राचीन वाङ्मयाचा दीप विझण्यापूर्वी एकदम प्रकाशमान झालेला दिसतो तो **जयदेवाच्या 'गीतगोविंद'** ह्या संगीतमय व नाट्यमय काव्यात. कृष्ण व राधा ह्यांचे गूढ प्रेम व मिलन हा ह्या काव्याचा विषय आहे. मूळच्या दंतकथांतील शृंगारिक संबंधाचे ह्यांत उदात्तीकरण केले आहे. तरीही काव्यांमध्ये शृंगारिक भावना उत्तेजित होतील, अशा अनेक जागा आहेत. ह्या काव्यामध्ये जे नादमाधुर्य आहे, त्यामुळे 'गीतगोविंद' हे काव्य त्याच विषयावरील इतर सर्व काव्यापेक्षा श्रेष्ठ ठरते. सेना राजांनी नंतर जयदेवाला आश्रय दिला; पण त्याचे जीवन इतर दरबारी कवींपेक्षा वेगळ्या तऱ्हेने व्यतित झाले होते. यौवनावस्थेत तो एक गरीब, पण हुशार ब्राह्मण होता. तशाच एका हुशार व सुंदर तरुणीचे प्रेम संपादन करण्यात तो यशस्वी झाला होता. बोली भाषेत जयदेवाने केलेल्या लयबद्ध रचनांच्या तालावर त्याची पत्नी नर्तन करीत असे. असे हे जोडपे लोकांची करमणूक करीत फिरत असे. 'गीतगोविंद' हे काव्यसुद्धा कदाचित प्रथम प्राकृत भाषेत लिहिले असावे व पुढे त्याला संस्कृतचा पेहेराव चढवला असेल. जयदेवाचे दुसरे वैशिष्ट्य हे की, जयदेवाने वैष्णव पंथाच्या उदयाला हातभार लावलेला आहे. 'वैष्णव' हा सुधारक पंथ शिवपार्वती मानणारे 'स्मार्त' व भगवान विष्णूची पूजा करणारे वैष्णव ह्यांच्यामधील धार्मिक वादाच्या निमित्ताने वाढला; असे जरी वर वर दिसत असले तरी त्याला एक सामाजिक अर्थ होता. बंगालमधील ह्या पंथातील प्रमुख संत म्हणजे चैतन्य महाप्रभू होय. ते पंधराव्या शतकात होऊन गेले. पण दक्षिणेमध्ये हा पंथ बऱ्याच अगोदर बाराव्या शतकातच पुढे आला. त्याचे नेतृत्व रामानुज ह्या धर्मवेत्त्यांकडे होते व तो शंकराचार्यांच्या शैव पंथीयविरोधी होता. ह्या दोन पंथीयांतील संघर्षातून अनेक जणांची डोकीही फुटली आहेत. हा संघर्ष अगदी एकोणिसाव्या शतकापर्यंत चालू होता. पण दोन्ही पंथीयांनी मूर्तिभंजक मुसलमानांची मात्र सेवा केलेली आहे. ह्या पंथांमध्ये नंतर जरी पंथीय दुरभिमानाचा प्रादुर्भाव झाला तरी मुळात हा संघर्ष समाजातील जुने सरंजामदार व त्यांचे पुरोहित आणि त्यांच्या मगरमिठीतून सुटू पहाणारे व्यापारी व इतर मध्यमवर्गीय ह्यांतील संघर्ष होता. हरी-हर पंथ स्थापन करून ह्या दोन्ही पंथांचा समन्वय



करण्याचा काही प्रयत्न झाला; पण तो फारसा यशस्वी झाला नाही. वास्तविक शंकर आणि पार्वती ह्यांच्या समन्वयीकरणातही समाजामधील पुरुष देव व स्त्री देवता मानणाऱ्या विभागांच्या समन्वयीकरणाची यशस्वी प्रक्रिया घडली होती. तसेच विविध देवदैवते ह्यांचेही यशस्वी समन्वयीकरण भारतीय समाजात झाले होते. पण हे समन्वयीकरण मात्र यशस्वी ठरले नाही. कारण अगोदरच्या समन्वयीकरणाच्या प्रक्रियेत विविध समाज एकत्र येऊन अधिक उत्पादक समाज निर्माण होत असे. उदाहरणार्थ अगोरच्या समन्वयीकरणाच्या प्रक्रियेत पशुपालन करणारे व शेती करणारे किंवा अन्न गोळा करणारे एकत्र येत व अधिक उत्पादक समाजाकडे वाटचाल होई. पण सबंध समाजावर सत्ता गाजवणारे जमीनदार व त्यांचे पुरोहित आणि त्याच समाजातील व्यापारी व इतर मध्यमवर्गीय ह्यांना एकत्र येण्याने उत्पादकता काही वाढणार नव्हती. समाजातील अतिरिक्त संपत्तीचा वाटा घेण्याबद्दल फक्त भांडण होते तो काही हे दोन वर्ग एकत्र येण्याने वाढणार नव्हता. पण वैष्णव धर्माने साध्यासुध्या जीवनाचा पुरस्कार केला. त्यामुळे सामान्य जनतेत इतका उत्साह निर्माण झाला की, लोक नाचत नाचत एका गावाहून दुसऱ्या गावाला जाऊन ह्या पंथाचा प्रचार करू लागले. चातुर्वर्ण्य व ग्रामजीवनाच्या चौकटीमुळे उदासीन व बधिर झालेल्या लोकांमध्ये ह्या पंथाने एक नवी आशा काही काळ पालवली. कवी जयदेवाच्या तेंडुली ह्या जन्मग्रामी अजूनही त्याची स्मृती गायन, नृत्य व संगीत कार्यक्रम करून साजरी केली जाते; त्याचे कारण हे केवळ त्याने केलेले काव्य नाही. कवी जयदेवाला अभूतपूर्व सौंदर्यदृष्टी होती; कारण सामान्य माणसाच्या कष्टमय जीवनात विरंगुळा आणण्याकरिता सौंदर्याची केवढी आवश्यकता असते, ह्याची जाणीव त्याला प्रत्यक्ष अनुभवाअंती आलेली होती.

जयदेवाच्या अगोदर शंभर वर्षांच्या काळात विकासक्षम साहित्याचा कसा ऱ्हास झाला हे काही संग्रहावरून दिसून येते. सर्वात जुने संकलन हा इसवी सन अकराशेच्या सुमारास बौद्ध मठांतील पंडित (बहुधा जगद्दल) ह्याने केलेले आहे. हे संकलन आताच्या पूर्व पाकिस्तानमधील राजशाही जिल्ह्यात केले गेले. त्याचे पुनर्मुद्रण नेपाळ व तिबेट ह्या देशात सापडलेल्या हस्तलिखितांवरून करावे लागले. अनेक संग्रह हे 'भर्तृहरी'च्या नावाने आहेत. ही व्यक्ती प्रत्यक्षात होऊन गेली असावी. तो एक प्रतिभाशाली, परंतु दरिद्री कवी होता. ह्या काव्यांतून दारिद्र्याचे व असहायतेचे—खास करून ब्राह्मणांच्या दारिद्र्याचे व असहायतेचे—दर्शन घडते. **जातीव्यवस्था व ग्रामव्यवस्था ह्यांची चौकट ह्यामुळे त्यांचीही कोंडी झाली होती.** आपल्या चरितार्थाकरिता व उत्कर्षाकरिता त्यांना छोट्या छोट्या लहरी सरंजामदारांवर अवलंबून रहावे लागे. त्यांची संख्या तर वाढली आणि सामाजिक प्रथा व चौकटीमुळे उत्कर्षाच्या संधी कमी झाल्या होत्या. ह्यामुळे वैफल्याचे सूर असणारे काव्य ह्या काळात निर्माण झाले. ह्या काव्यात म्हणी व वाक्प्रचार ह्यांचा सुळसुळाट झालेला आहे. त्याचप्रमाणे खालच्या मध्यमवर्गीय नीतिमत्तेच्या कल्पना आणि कवीच्या कुवतीबाहेरील काल्पनिक विलासी जीवनाचे कसेबसे चित्रण, त्यानंतर अशा तऱ्हेच्या

विलासी जीवनाचा नायकाने त्याग करणे वगैरे आले. भर्तृहरीच्या अनेक काव्यपंक्ती कित्येक सुशिक्षित भारतीय (जे श्रमाचे किंवा यांत्रिकी काम करण्यास तयार नसतात) उथळ ज्ञानाचा पुरावा म्हणून दुसऱ्याच्या तोंडावर फेकताना आढळतात.

भारतीय समाजमानसाची घडण करणारी संस्कृत भाषेतील रचना कोणती ? ह्याचे उत्तर भगवद्गीता हेच आहे. भगवद्गीतेची रचना खिस्तपूर्व तिसऱ्या शतकाअगोदर केली असण्याची शक्यता नाही; परंतु भगवान श्रीकृष्णाच्या मुखाने गीता वदवली गेली आहे व महाभारत ह्या सतत वाढत जाणाऱ्या महाकाव्यांच्या कोंदणांत ती घातली गेली. भगवद्गीतेत कृष्ण हा नव्या स्वरूपात अवतरलेला आहे. धर्म तत्त्वज्ञान सांगणाऱ्या अतिमानवी दैवी प्रणेत्याचे स्थान कृष्णाला देण्यात आले आहे. कृष्णाला नवी प्रतिष्ठा प्राप्त झाली आहे अशा तऱ्हेचा एक ओझरता उल्लेख 'छांदोग्य उपनिषदे'त आहे. तेथे तो घोर अंगीरस मुनीचा शिष्य आहे, पण गुरु किंवा परमेश्वर नाही. गीतेमध्येच तो परमेश्वर आहे.

गीतेची तथाकथित पार्श्वभूमी अशी : महाभारत युद्धातील पांडव योद्धा अर्जुन सैन्य समोरासमोर आल्यावर आता आपल्याला आप्तेष्ट व मित्रांची हत्या करावी लागणार, क्षत्रिय कुळांचा नाश करावा लागणार ह्या विचाराने व्याकुळ होतो व आपला धनुष्यबाण खाली ठेवतो. त्याचे सारथ्य करणारा श्रीकृष्ण युद्ध करणे हे त्याचे कर्तव्य आहे, असे सांगून अर्जुनाला युद्धास प्रवृत्त करतो. हा उपदेश एकंदर सातशे श्लोकांचा आहे. हे सर्व श्लोक अगदी धडाधड पाठ म्हटले तरी दिवस तीन लागले असते, आणि तेवढ्या काळात पांडव लढाई हरले असते. आपण परमेश्वर असल्याचे जाहीर करून त्यावेळी प्रचलित असलेली सर्व दर्शने त्यांची नावे न घेता श्रीकृष्णाने पाळीपाळीने स्वत:ची म्हणून माडली आहेत. ह्या सर्व दर्शनांचा उगम एकाच परमेश्वराकडून झाला, असे मानले गेल्यामुळे त्या विविध दर्शनांतील परस्परविरोधांची दखलही घेतलेली नाही. मात्र जुन्या वेदांतील यज्ञविधीचा जो थोडा उल्लेख ह्यामध्ये आहे, त्याबद्दल नापसंती व्यक्त केलेली आहे. कृष्ण प्रथम अहिंसा, स्वच्छ चारित्र्य त्याग आणि वैराग्य ह्या सद्गुणांचा गौरव करतो. त्यामुळे अर्जुन अधिकच बुचकाळ्यात पडतो व विचारतो की, जर हे सगळे खरे आहे तर तू मला हत्या करण्यास का सांगतोस ? अर्जुनाने हा प्रश्न त्याला वारंवार विचारलेला आहे; पण ह्या सरळ प्रश्नाचे उत्तर कोठेच दिलेले नाही. उलट हा देवाधिदेव एकापासून दुसऱ्या तत्त्वज्ञानाकडे वळतो. अखेर अर्जुनाचे मन वळवण्याकरिता आपले अकाळ-विकाळ काळस्वरूप प्रगट करतो. त्या काळमुखात अर्जुनाला स्वर्ग, पातळ, पृथ्वी ह्यासह सर्व विश्वाचे दर्शन घडते. त्याला हेही दिसून येते की, ज्यांच्याशी लढण्याकरिता आपण उभे आहोत, त्या सर्वांचा घास अगोदरच काळाने घेतलेला आहे. आपण केवळ निमित्तमात्र आहोत. निष्काम वृत्तीने आप्तेष्टांचा वध करण्यात पाप नाही हे अर्जुनास पटते. परमेश्वरावर परम भक्ती केल्याने भक्तास सायुज्यता मिळते, असे आश्वासन गीतेमध्ये आहे. भारतीय मनोवृत्तीमध्ये परस्परविसंगत गोष्टींचा समन्वय करण्याची व मूलभूत दृष्ट्या परस्परविरोधी



अशा कल्पना सहजगत्या स्वीकारण्याची जी क्षमता आहे तिचे दर्शन गीतेमधील सौष्ठवपूर्ण व नादमधुर संस्कृत भाषेतील तर्कदुष्ट व दैवी संदेशांत आहे. कृष्णाचे गौळणीशी असणारे खिलाडू संबंध, त्याने केलेले विवाह, आपल्या मामाचा केलेला वध, महाभारतात वेळोवेळी धूर्तपणे केलेल्या सूचना लक्षात घेता, त्याने सांगितलेल्या नीतीवर विश्वास बसणे कठिण होते. प्रत्यक्षात गीतेचा प्रसार होण्यास बराच काळ जावा लागला. महाभारताच्या निरनिराळ्या आवृत्त्या काढणाऱ्या ब्राह्मणांचा गीता ग्रंथ लिहिण्यामागे जो उद्देश होता, तो सफल झाला नाही. म्हणून अर्जुनाच्या विजयानंतर पुन्हा श्रीकृष्णांनी त्याला केलेला उपदेश अनुगीता ह्या नावाने पुन्हा महाभारतात घुसडण्यात आला. ह्या अनुगीतेत ब्राह्मण व ब्राह्मण्य ह्याची बेफाट स्तुती केलेली आहे. ही अनुगीता आता कोणी वाचत नाही; पण पहिली गीता अधिकाधिक मान्यता पावू लागली ह्याचे कारण मध्ययुगीन समाजात घडून येणारे बदल हेच होय !

आपल्या नातेवाईकांशी लढाई करण्याकरिता राजाला प्रवृत्त करण्यासाठी एक खोटी गोष्ट जुन्या ग्रंथात घुसडली गेली, असा उल्लेख सुॲंग त्सॅंग ह्याच्या लिखाणामध्ये आहे. तो संदर्भ गीतेबद्दल असावा असे दिसते. सर्वश्रेष्ठ धर्म सांगणारा ग्रंथ ह्या दृष्टीने गीतेचा पहिला वापर इसवी सनाच्या आठव्या शतकात प्रथम शंकराचार्यांनी केला. त्यांचे गीतेवरील भाष्य हे अजूनही प्रमाण मानले जाते. शंकराचार्य हे शैवपंथी, गीता ही तर विष्णूच्या अवताराने सांगितलेली आणि बुद्धाचे विचारही त्यात समन्वित केलेले, अशी स्थिती आहे. त्यानंतर शंकराचार्यांच्या अद्वैत विचारांचे प्रतिस्पर्धी रामानुज ह्यांना गीतेमधूनच आपल्या विचारांची स्फूर्ती मिळाली व त्यांनी वेगळा अर्थ लावणारी टीका लिहिली. गीतेवर अशा रीतीने आपल्या स्वत:च्या कार्याला उपयुक्त असणाऱ्या टीका अनेकांनी लिहिल्या. महाराष्ट्रातील सामान्य जनांना गीतेची ओळख ज्ञानेश्वराने आपल्या काव्यगुणांनी युक्त अशा 'ज्ञानेश्वरी' या ग्रंथान्वये करून दिली. ज्ञानेश्वरी इसवी सनाच्या १३ व्या शतकात लिहिली गेली आहे. आधुनिक काळामध्ये भारतीय स्वातंत्र्य चळवळीला तात्त्विक अधिष्ठान देण्याची गरज ज्यावेळी लोकमान्य टिळक व महात्मा गांधी ह्यांच्यासारख्या नेत्यांना भासली तेव्हा त्यांनी गीतेचाच आधार घेतला व नवे निष्कर्ष काढले. वेगवेगळ्या काळातील वेगवेगळ्या पंथांच्या व विचारांच्या प्रणेत्यांना गीतेमधून आपल्या कार्याला उपयुक्त असे वेगवेगळे निष्कर्ष काढता आले, ह्याचे रहस्यच हे आहे की, त्या एकाच ग्रंथात वेगवेगळ्या व परस्परविरोधी ग्रंथांचे संकलन केले आहे. गीतेला धार्मिक ग्रंथाचे पवित्र स्वरूप प्राप्त झाले, तो काळ अंधश्रद्धेचा होता व अंधश्रद्धा वाढवण्यात गीतेनेसुद्धा हातभार लावला आहे. तरीसुद्धा गीतेच्या वैशिष्ट्यपूर्ण रचनेमुळे त्या काळातील प्रस्थापित धर्मकल्पनेच्या विरोधी असणाऱ्या सुधारकांनाही गीतेचाच आधार मिळाला.


पण प्रश्न निर्माण होतो की, त्या काळाची सर्व पुराणे कुठल्या ना कुठल्या देवाची स्तुती करणारी आणि काही पुराणे कृष्णाचीच स्तुती करणारी असताना गीतेलाच सर्वश्रेष्ठ

धर्मग्रंथाचे ज्ञान का प्राप्त झाले? विविध दर्शनांचा समन्वय हे एक कारण तर आहेच; परंतु गीतेच्या अनन्यसाधारण यशाचे रहस्य त्या ग्रंथात सांगितलेल्या भक्तिमार्गात आहे. त्यामुळे अशिक्षित जनतेला मरणोत्तर आध्यामिक मुक्तीचा मार्ग मोकळा झाला. त्याचबरोबर ही विचारसरणी सरंजामदारी समाजाला पोषक अशी होती. अशा समाजव्यवस्थेमध्ये राजा आणि सरंजामदार, सरंजामदार आणि त्याचे आश्रित, जमीनदार आणि कुळे ह्यांचे परस्परसंबंध अविचल स्वामिनिष्ठेच्या नैतिक पायावर उभे असतात. आपला धनी कसाही असो; तो धनी आहे, त्याच्याशी निष्ठेने व सचोटीने वागणे हा धर्म आहे, अशी विचारसरणी भक्तिमार्गामधून येथे प्रसृत झाली. ह्या भक्तिमार्गाच्या नावाखाली अनेक जुन्या रानटी प्रथांचे पुनरुज्जीवन करण्यात आले. त्यांची उदाहरणे इतिहासात आहेत. हर्ष राजाच्या पित्याला झालेला असाध्य रोग बरा करण्यासाठी तो रोग निर्माण करणाऱ्या अतिमानवी दुष्ट शक्तीचे समाधान करण्याकरिता दरबारातील सरदारांनी आपल्या शरीराच्या मांसाचे तुकडे कापून दिले आहेत. दक्षिणेतील गांग व पल्लव राजाच्या दरबारातील सरदार धन्याच्या कल्याणाकरिता एखाद्या देवीसमोर आपले शीर अर्पण करण्याची तयारी दाखवीत हे आठव्या शतकानंतरच्या आलेखांवरून व शिल्पकृतीवरून दिसून येते. मार्कोपोलो ह्या प्रवाशाने लिहिलेल्या वृत्तांवरून असे दिसून येते की, निष्ठावंत सरदार आपली स्वामिनिष्ठा सिद्ध करण्यासाठी राजाच्या चितेमध्ये उडी घेत असत. इसवी सनाच्या सहाव्या शतकानंतरच्या साहित्यात असे उल्लेख वारंवार येतात. ह्या चालीचा सतीच्या चालीशी काही संबंध नाही. जरी सहाव्या शतकापासून वरिष्ठ वर्गांमध्ये सतीच्या चालीचा बराच प्रसार झाला असे जरी असले तरी ग्रीक साहित्यावरून असे अनुमान काढता येते की, ती चाल फार प्राचीन काळापासून अस्तित्वात असावी. तसे सरदारांच्या ह्या कृतीबाबत म्हणता येत नाही. भारतीय सरंजामदारीची सर्वांत वरची पायरी गाठली जात असतानाच शंकराचार्यांचे तत्त्वज्ञान आणि गीता ह्यांची लोकप्रियता कळसास जाऊन पोहोचली. गीतेला सर्वजण पवित्र मानतात; पण तिचे वाचन मात्र फारसे होत नाही. काही तर भक्तिभावाने गीतेची पारायणे करतात; पण अर्थ समजावून घ्यायचा व विवेचक दृष्टीने अभ्यास करण्याचा प्रयत्न करीत नाहीत. परस्परविरोधी विचार सहजगत्या स्वीकारणे हे भारतीय मनोवृत्तीचे खास वैशिष्ट्य आहे हे खरे; पण अशी मानसिक वृत्ती सरंजामदारी युगापर्यंत घडवली गेली नव्हती. बंदुकीच्या दारूचा शोध लागल्यानंतर अर्जुनाच्या धनुष्यबाणाप्रमाणेच सरंजामदारीचा प्रभाव कमी होऊ लागला. गिरण्या आणि कारखाने, बँका आणि शेअर्स, रेल्वे, विमाने आणि आगबोटी असणाऱ्या ह्या नव्या जगातही स्वातंत्र्य मिळवण्यासाठी राष्ट्राभिमान जागृत करण्याकरिता भारतीय विचारवंत सहजप्रेरणेने गीतेकडेच वळले. आधुनिक समस्यांना उत्तरे देण्यासाठी भारतीय जसे धडपडू लागले तशी ह्या ग्रंथाची प्रतिष्ठा कमी होऊ लागली. तरीही समस्या सुटत नाहीत किंवा दारिद्र्य किंवा बेकारी नष्ट होत नाहीत; ह्याचे कारण नशीब किंवा पूर्वजन्मीचे पाप आहे, अशी मांडणी करणारे किंवा बाह्य जगच खोटे आहे, त्यातील समस्या सोडण्याच्या मागे लागण्याऐवजी आध्यात्माकडे वळा असे



सांगणारे पुन्हा पुन्हा गीतेचा उदो उदो करतात. भौतिक वास्तवाची पकड घेणारे तर्कशुद्ध विचार जेव्हा भारतात दृढमूल होतील तेव्हा गीतेमधील तत्त्वज्ञानाचे एक आकर्षण संपेल; तरीही ह्या ग्रंथाची शैली, भाषासौष्ठव व तत्त्वज्ञानाचा ऐतिहासिक संदर्भग्रंथ म्हणून वाचकाला त्यातून कलात्मक आनंद मिळत राहील. माझे हे विधान गीतेप्रमाणेच सर्व भारतीय संस्कृतीला लागू पडणारे आहे. ह्या पुस्तकाचा योग्य शेवट ह्या विधानानेच व्हावा.

• • •


BACTRIA ZARIASPA (Balkh)
BACTRIA
KABUL
Khyber Pass
ALEXANDRIA (Ghazni)
GANDHARA
PUSKARAVATI
TAXILA
ATTOCK
R. Indus
KINGDOM of PORUS
ALEXANDRIA ARACHOTON (Kandahar)
QUETTA
Return route of Craterus
GEDROSIA
Return route of Alexander
Return route of Nearchus
PATTALA
Probable old course of the Indus
Dry bed of the Hakra R.
R. Hydaspes (Jhelum)
R. Akesines (Chenab)
R. Hydraotes (Ravi)
R. Zaradrus (Satlej)
KURUKSETRA
HASTINĀPU
INDRAPRASTHA
R. Yamuna
MATHURA
KOSALA
SĀKYAS
KAPILAVASTU
KUSINĀRA
MALLAS
LICCHAVIS
AYODHYA
BANARAS
VESĀLĪ
R. Ganges
KOSAM
PATNA
CHAMPA
GAYA
RĀJGĪR
MAGADHA
R. Brahmaputra
BHILSA
UJJAIN
R. Narbadā
MAHEŚVAR
BHARUKACCHA (Broach)
R. Tapti
TĀMLUK
KALINGA
SOPARA
PAITHAN
NEVASA
R. Godāvarī
R. Krishna
BRAHMAGIRI
DAKSINĀPATHA
UTTARĀPATHA
ALEXANDER'S ROUTE
Areas not under ASOKA
0 100 200 300 400
Kilometres